डॉन संथ वहातच आहे

(मिखाईल शोलोखोव लिखित "And Quiet Flows the Don" चा अनुवाद)

भाषांतरकार

नरेंद्र सिंदकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९८५

प्रकाशक : श्री. सू. द्वा. देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२

मुखपृष्ठ : सुहास बावडेकर

मुद्रक : सौ. कांता जयसिंग नल्लावडे
शिल्पा आर्टस
सी / ४ दीप अपार्टमेंट, छेडा नगर,
मुंबई–४०० ०८९

किंमत : रुपये ३५/–

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने अनेक उत्तम ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात येतात. या योजनेत साहित्य, शास्त्र, विज्ञान, कला इत्यादी विषयांवरील ग्रंथ मंडळाने प्रकाशित केले आहेत. रशियन लेखक श्री. शोलोखोव यांची नोबेल पारितोषिक विजेते कादंबरी' अँड क्वाएट क्लोज द डॉन ' अनुवादित करण्याचे मंडळाने ठरविले. या कादंबरीचे भाषांतराचे काम रशियन नभोवाणी केंद्रांतील अधिकारी श्री. नरेंद्र सिदकर यांनी स्वीकारले. मोठ्या पुस्तकांचे भाषांतर करताना अनेक अडचणी उद्भवतात. विशेषत. अनेक पात्रे असलेल्या कादंबरीत पात्रांच्या नावाच्या उच्चारात फरक होतो. श्री. सिदकर यांनी प्रयत्नपूर्वक हे टाळले आहे. काही ठिकाणी अशा चुका झाल्या असल्यास त्या नजरेआड होऊ देणेच योग्य होईल असे वाटते. श्री. प्र. श्री. नेरूरकर यांनी या पुस्तकात विस्तृत प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचा तसेच श्री. सिंदकर यांचा मी मंडळाच्या वतीने आभारी आहे. ही कादंबरी दोन भागात प्रकाशित होत असून त्यापैकी भाग–१ चे प्रकाशन करण्यात मंडळास आनंद होत आहे. दुसऱ्या भागाचेही प्रकाशन अल्पावधीत होत असून वाचक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

४२. यशोधन,
मुंबई– ४०० ०२०

सुरेंद्र बारलिंगे,
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

डॉन संथ वहातच आहे

थोडी तोंड ओळख

प्रास्ताविक

श्री. नरेन्द्र सिंदकर यानी जगविख्यात रशियन लेखक मिखैल शोलोखोव् यांच्या 'अॅण्ड क्वाएट फ्लोज् द डॉन' या महाकादंबरीचा मूळ रशियन भाषेतून मराठी अनुवाद केला आहे व 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा' तर्फे तो प्रकाशित होत आहे. यापूर्वी सुद्धा साहित्य संस्कृती मंडळाने महान रशियन कादंबरीकार काऊण्ट लिओ टॉल्स्टॉय यांच्या 'वॉर अॅण्ड पीस' या महाकादंबरीचा मराठी अनुवाद संक्षिप्त रुपात मराठी वाचकांसाठी सादर केला आहे. मी स्वत: शोलोखोव् यांच्या या कादंबरीचा इंग्रजी अनुवाद समोर ठेवून श्री. सिंदकर यानी खूप मेहनत घेऊन पूर्ण केलेल्या या मराठी अनुवादाचा आढावा घेणार आहे व साहित्य निर्मितीच्या विविध प्रक्रियांची या कादंबरीशी संलग्नता जोडणारी चिकित्सा घडवून आणण्याचा, या कादंबरीचा व रशियन साहित्याचा एक अभ्यासक या नात्याने प्रयत्न करणार आहे.

लेखक म्हणून शोलोखोवची जडणघडण

इ. स. १९२३ साली शोलोखोव्ने आपलं पहिलं कथालेखन केलं. १९२६ साली त्याचा 'टेल्स फ्रॉम द डॉन' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९२५ साली त्याने 'अॅण्ड क्वाएट फ्लोज् द डॉन' लिहायला सुरुवात केली. त्यावेळी तो वीस वर्षांचा

होता. रशियातील डॉन प्रदेशात शोलोखोवचं बालपण गेलं. त्याचं तारुण्य 'यादवी युद्धा' (Civil War)च्या धकाधकीत गेलं. डॉन प्रदेशातील व्हेशेन्स्काया खेडं (Veshenskaya) हे शोलोखोव्हच्या जीवनाशी अतूटपणी निगडीत झालं आहे. जसे टॉल्स्टॉयच्या जीवनाशी 'यास्नाया पोल्याना' (Yashaya Polyana) हे खेडं निगडीत झालं होतं. आपल्या डॉन प्रदेशावरच्या प्रेमातूनच शॉलोखोव आपली ही महाकादंबरी लिहायला उद्युक्त झाला. 'अॅण्ड क्वाएट फ्लोज् द डॉन' चा उत्तर वयात मागे वळून विचार करताना शोलोखोव् म्हणाला होता, 'ज्या लोकात मी जन्मलो व ज्यांना मी ओळखत होतो त्या लोकांबद्दल मला लिहायचं होतं.'

डिसेंबर १९६५ ला स्टॉकहोम येथे नोबेल पारितोषिक स्वीकारताना शोलो-खोव्ने जे भाषण केलं होतं त्यावरून त्याची कलेबद्दलची जीवनदृष्टी दिसून येते. तो म्हणतो, "वाचकाशी प्रामाणिकपणे बोलायचं, लोकांना सत्य सांगायचं, मग ते कितीही कटू असो, माणसांच्या हृदयात भविष्यकाळाबद्दलची आणि तो भविष्य–काळ निर्माण करण्याच्या स्वतःच्या सामर्थ्यावरची श्रद्धा बळकट करायची, जगभर शांतता नांदावी म्हणून सक्रीय लढवैय्या व्हायचं, आणि स्वतःच्या लेखनाने अशा लढवैय्यांची संख्या वाढवायची. प्रगतीची स्वाभाविक आणि उदात्त ओढ लागलेल्या लोकाना एकत्र करायचं. कला माणसांच्या मनावर व हृदयावर प्रचंड प्रभाव पाड–तात. मला वाटतं की त्या माणसाला स्वतःला कलावंतम्हणवून घेण्याचा हक्क आहे. जर तो, ही माणसाच्या अंतरात्म्यात सौंदर्य निर्माण करण्याची शक्ती, माणसाच्या भल्यासाठी मार्गी लावील."

शोलोखोव्च्या साहित्याचे एक ज्येष्ठ अभ्यासक श्री. न्यॅकिमेन्को म्हणतात त्याप्रमाणे शोलोखोवचं सामर्थ्य वास्तवतेतून तो घेतो – वास्तवता तिच्या ऐति–हासिक स्वरुपात, वास्तवता तिच्या विकसनशीलतेत, वास्तवता दैनंदिनी जीवनाची. त्याचे नायक ठाम भौतिक वस्तूंच्या जगात वावरतात. ते स्वतःच वास्तवता असतात. व्यक्तिचित्रणाच्या नेमकेपणाने ही वास्तवता अशी काही निर्माण केलेली असते की त्या प्रत्येकाला एक अपूर्व व अनुकरणदुर्लभ असं स्वतःचं व्यक्तिमत्व लाभलेलं असतं. १९३२ साली शोलोखोव्बद्दल मॅक्झिम गॉर्कीने म्हटलं होतं की युरोमधील सूज्ञ लोक शोलोखोव्चं साहित्य एक वास्तवता म्हणूनच स्वीकारतात. कलेची पाळंमुळं जनतेत असतात, या जाणीवेतून शोलोखोव् आपलं लेखन करीत होता. स्टॉकहोमला केलेल्या आपल्या भाषणात हा मुद्दा मांडताना शोलोखोव् अभिमानाने म्हणतो, "ज्या ऐतिहासिक वाटेवरून माझे लोक गेले ती

मळलेली वाट नव्हती. नवी वाट शोधणारे, जीवनाचे उद्गाते म्हणूनच ते पुढे गेले. माझे ध्येय एक लेखक म्हणून नेहमीच, माझ्या सर्व साहित्यातून या कष्टकऱ्यांच्या, इमारती उभारणाऱ्यांच्या आणि शूरवीरांच्या राष्ट्राचा सन्मान करण्याचेच राहिले आहे. त्यानी कुणावरही कधीच हल्ला केलेला नाही. उलट जे त्यानी निर्माण केलंय त्याचं रक्षण करणं नेहमीच त्याना ठाऊक आहे. रक्षण करणं आपल्या स्वातंत्र्याचं आणि सन्मानाचं. त्यानी स्वतः होऊन निवडलेल्या मार्गाने स्वतःच भवितव्य घडविण्याच्या आपल्या हक्काचं. माझ्या पुस्तकांनी लोकांना अधिक चांगलं अंतःकरणातून शुद्ध करायला मदत केली तर मला आवडेल माणसासाठी प्रेम निर्माण करणं, मानवतेच्या आदर्शासाठी आणि मानवतेच्या प्रगतीसाठी होणाऱ्या लढ्यात सक्रीय भाग घेणं यासाठी जर खरोखरच मी यशस्वी झालो असेन तर मी स्वतःला एक आनंदी माणूस समजेन."

मिखेल अॅलेक्झाण्ड्रोविच शोलोखोव्चा जन्म डॉन प्रदेशातील क्रुझिलिनो शेतवाडीवर व्हेशेन्स्काया या खेड्यात २४ मे १९०५ रोजी झाला. पुढे १९३७ साली आपल्या मतदारांना उद्देशून शोलोखोव म्हणाला होता, "मी डॉनमध्ये जन्मलो आणि वाढलो. याच ठिकाणी मी माणूस आणि लेखक म्हणून घडलो. आमच्या महान कम्युनिस्ट पक्षाचा सभासद म्हणून शिक्षण घेतलं. मी माझ्या महान, बलवान देशाचा एक देशभक्त आहे. आणि डॉन प्रदेशाचा मी एक देशभक्त आहे हे जाहीर करताना सुध्दा मला अभिमान वाटतो. शोलोखोव्ची आई अनास्तासिआ डॅनिलोव्हना चेर्निकोव्हा एका कुणबी कुटुंबातील होती. शोलोखोव्च्या पहिल्याच पुस्तकाला (कथासंग्रह) प्रस्तावना लिहिणारा व व्हेशेन्स्काया येथे शोलोखोव्च्या घरी राहिलेला, रशियाचा ज्येष्ठ लेखक ए. एस.– सेराफिमोविच शोलोखोव्च्या आईबद्दल लिहितो, "त्याची आई एक विलक्षण बाई आहे. पूर्णपणे निरक्षर तथापी बळकट, सजीव, भेदक मन असणारी. आपल्या मुलाला पत्र लिहिता यावे म्हणून तिने स्वतःलाच सज्ज केलं आणि लिहाय– वाचायला शिकवलं. त्यानंतर तिच्यामध्ये आणि मुलामध्ये आनंददायक पत्र– व्यवहार झाला. उचडच मौलिक निर्माणक्षम देणगी त्याला आईकडूनच मिळाली. जिने त्याला महान लेखक केलं." १९४२ साली व्हेशेन्स्काया खेड्यावर नाझी विमानानी केलेल्या बॉम्ब हल्ल्यात ती ठार झाली. शोलोखोव्चा बाप, अॅलेक्झांडर मिखेलोविच शोलोखोव्, रॅझॅन परगण्यातील होता. विकत घेतलेल्या कोझॅक जमिनीवर तो धान्य पेरायचा, शेतावरचा निरोप्या म्हणूनही त्याने काम केलं. वाफेवर चालणाऱ्या गिरणीचा तो व्यवस्थापक होता. तो १९२६ साली मरण

पावला. व्हेशेन्स्काया खेड्यातील माध्यमिक शाळेत चार इयत्ता पुऱ्या करून कसाबसा शोलोखोव् शाळेबाहेर पडला. रशियामध्ये यादवी युद्ध सुरु झालं होतं. डॉन प्रदेशातील वर्गलढयात तो सामील झाला. पंधराव्या वर्षी शोलोखोव्नं आपल्या आत्मचरित्रात लिहीलंय "१९२० पासून रासनखात्यात मी दीर्घकाळ नोकरी केली. सर्वत्र डॉन प्रदेशात प्रवास केला. १९२२ सालापर्यंत गोऱ्या टोळ्या (White band) या प्रदेशांचं नियंत्रण करीत होत्या. त्यांचा पाठलाग केला व तेही आमचा पाठलाग करीत असत. स्वाभाविकच आमची सर्व प्रकारच्या लफडयात गुंतवणूक झाली .. डॉन प्रदेशातच शोलोखोव्ने वर्ग लढ्याचा अनुभव कोवळ्या वयात घेतला. त्याच्या पहिल्या वहिल्या कथा व नंतर त्याने लिहिलेली, डॉन संथ वहातेय' ही कादंतेरी या अनुभवावरच आधारलेली आपल्याला आढळून येते.

यादवी युद्ध संपल्यावर शोलोखोव् १९२२ च्या अखेरीला मॉस्कोला गेला. त्याच्या डोळयासमोर लेखक होण्यांचं स्वप्न होतं. तो मॉस्कोला आला तेव्हा ते शहर नुकतंच भूक आणि विनाश यातून सावरत होतं. रशियन क्रांती आणि यादवी युद्ध यांच्या यातनांतून ते बाहेर पडत होतं. नविन आर्थिक धोरण (New Economic Policy) त्याचवेळी सुरू झालं होतं. ३० ऑक्टोबर १९३० रोजी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'तीन' (थ्री) या कथेत मॉस्को नगरीचं त्याला झालेलं दर्शन त्याने व्यक्त केलं आहे. पहिल्यांदा त्याला मॉस्को नगरीचं कठीण परिस्थितीला तोंड द्यावं लागलं. त्याने हमाल, फातरफोड, कारकून अशी कामे केली. त्याचवेळी तरुणांच्या एका वर्तमानपत्रासाठी सुद्धा तो लेखन करीत होता. परंतु लेखक म्हणून त्याची खरी कारकिर्द १४ डिसेंबर १९२४ रोजी सुरू झाली. त्या दिवशी मॉस्को-मधील एका प्रमुख मासिकात त्याची ' द बर्थमार्क ' (जन्मखूण) ही कथा प्रसिद्ध झाली. कालांतराने त्याच्या कथांचे ' टेल्स फ्रॉम द डॉन ' व ' द अझूर स्टेप्पी ' हे संग्रह प्रकाशित झाले. मोठमोठ्या नामांकित मासिकातून त्यांच्या कथा येऊ लागल्या. सेराफिमोविच हा साहित्यातील शोलोखोव्चा देवपिता होता. त्याने त्याच्या पहिल्या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहिली व तो उद्याचा रशियातील महान लेखक होईल म्हणून त्याचे भाकीत केले. १९३८ साली आपल्या देवपित्याच्या (godfather) पंचाहत्तराव्या वाढदिवशी शोलोखोव्नं त्याच्याबद्दल लिहीलं होतं, " मी खरोखर सेराफिमोविचचा कृतज्ञ आहे. कारण त्यानेच प्रथम माझ्या साहित्यिक कारकिर्दीच्या सुरुवातीला मला पाठिंबा दिला. त्यानेच मला प्रथम मान्यता आणि उत्तेजन दिले ·· ·· ··· आमची पहिली भेट ' फर्स्ट हाऊस ऑफ

सोव्हिएट्स' मध्ये झाली. सेराफिमोविचने मला धीर देऊन सांगितलं की मी लिहीणं आणि अभ्यास चालू ठेवला पाहिजे. त्याने मला प्रत्येक बाबतीत लक्षपूर्वक काम कर व कधीही घाई करू नकोस असं सांगितलं. मी नेहमीच त्याच्या उपदेशाप्रमाणे चालण्याचा प्रयत्न करीत आलो आहे.'

शोलोखोव्ने लिहायला सुरुवात केली तो काळ सोव्हिएत साहित्यातील ऐतिहासिक महत्त्वाचा होता. अनेक तरूण त्याच काळात एकाच वेळी लिहायला लागले. ते सर्व तरुण सैनिक होते आणि यादवी युद्धातील अनंत हाल अपेष्टांना तोंड देऊन ते माघारे परतले होते. त्यांना खूप कांही सांगायचं होतं. सोव्हिएत साहित्यात त्यानी जी लेखननिर्मिती केली ती वैशिष्ट्यपूर्ण होती. " युद्ध आणि क्रांती हा आमचा अत्यंत महत्त्वाचा भावनिक अनुभव होता. आमच्या जीवनाचे एकमेव ध्येय हा अनुभव कलेतून व्यक्त करण्याचा होता. " श्रेष्ठ सोव्हिएत लेखक फेदिन याने नंतर लिहीलं होतं. अॅलेक्झांडर फ्यॅदयेव हा रशियन लेखक म्हणतो " आम्ही आमचा व्यक्तिगत अनुभव आणि आमचं व्यक्तिमत्त्व घेऊन लाटे मागून लाट असे साहित्यात आलो. नवे जग आमचे आहे या जाणीवेने आणि आमच्या त्याच्यावरील प्रेमाने आम्ही एकत्र आलो होतो." या जाणीवेचा नितांत प्रत्यय शोलोखोव्च्या सर्वच साहित्यात आपल्याला सतत येत रहातो. थॅकिमेन्को म्हणतो त्याप्रमाणे शोलोखोव्च्या कथांतून नेहमी दोन परस्परविरोधी शक्तींचे संघर्ष टिप–लेले असतात. समाजवादाच्या उगवत्या जगातील लोक आणि चिवटपणे भूत–काळाला चिकटून राहणारे लोक यांच्यातील संघर्ष–कुलक (Kulaks) आणि व्हाईटगार्ड. दोन विसंगत तत्त्वांचा झगडा तो नाट्यमयतेने वर्णन करतो. एक मानवता व दुसरं संपत्तीवर आधारलेली प्रतिष्ठा.

' डॉन संथ वहाते आहे ' आकार घेते

१९२५ साली मॉस्को सोडन शोलोखोव् आपल्या डॉन प्रदेशात परत आला. तेव्हापासून त्याने आपलं जीवन फक्त लेखनासाठी वाहून घेतलं. लगेच दुसऱ्या वर्षी त्याने आपल्या युद्धपूर्व आणि युद्ध काळातील कॉझॅक लोकांचं जीवन वर्णन करणाऱ्या सुप्रसिद्ध कादंबरीचा पहिला खंड लिहायला घेतला. खरं म्हणजे ' आणि संथ वाहतेय डॉन ' त्याने लिहायला घेतली तेव्हा तो वीस वर्षांचा होता. दोन वर्षापूर्वीच त्याची लेखन कारकिर्द सुरू झाली होती. त्या लेखनाकाळाबद्दल आपल्या आत्मचरित्रात तो लिहितो, ' १९२५ च्या शिशिरऋतूत मी ' आणि संथ वाहतेय

डॉन ' लिहायला घेतली. परंतु तीन चार भाग लिहिल्यानंतर मी ते लेखन सोडून दिलं. मला वाटलं ते माझ्या आवाक्याबाहेरचं आहे. " मग पुढे तो लिहितो, " मी १९१७ साली, जनरल कोर्निलोवने पेट्रोग्राडवर चाल केली, तेव्हापासून मुळात लिहायला सुरुवात केली. एक वर्षाने मी पुनः त्या लेखनाकडे आलो आणि माझा विचार बदलला. युद्धापूर्वीचं कोझॅक लोकांचं जीवन दाखवायचं मी ठरवलं. " शोलोव्खोचा पहिला बेत कोर्निलोवच्या स्वारीत कोझॅक लोकांनी कोणती भूमिका पार पाडली ते दाखवण्याचा होता. हळूहळू त्याचा विस्तार महान ऑक्टोबर समाजवादी क्रान्ती आणि यादवी युद्ध यांचं महाकाव्यसदृश वर्णन करणाऱ्या चार खंडात झाला. या महान घटना घडत असताना कोझॅक लोक कसे वागले याची कहाणी शोलोखोव लिहितो. ' आणि संथ वाहतेय डॉन ' या कादंबरीचे पहिले दोन खंड त्याने १९२५ ते १९२८ या काळात लिहिले.

रशियन साहित्याची एक समृद्ध पूर्वपरंपरा आहे. तिच्याकडे शोलोखोव्ने आपल्या लेखनात दुर्लक्ष केल नाही. ती परंपरा आहे जनतेच्या खऱ्या गरजांचा आणि आकांक्षांचा शोध घेणे आणि त्यांची ऐतिहासिक भूमिका नीट समजून घेणे. आपल्या क्रांतिकाळातील अनुभवांना महाकाव्याची कलात्मक आखणी व बांधणी देण्यासाठी व तिची लेखन निर्मितीची उत्तुंग परिमाणे साधण्यासाठी शोलोखोव्ने टॉलस्टॉय, गोगोल, मॅक्झिम गॉर्की या महान लेखकांचा आदर्श अर्थातच स्वतःसमोर ठेवला होता. म्हणूनच ' आणि संथ वहातेय डॉन ' या कादंबरीची सतत टॉल्स्टॉयच्या ' युद्ध आणि शांतता ' या महाकाव्याशी तुलना करण्यात आली. या दोन्ही कादंबऱ्या वास्तवतेचं विशाल चित्रण करतात. आपली रचना महाकाव्यासारखी करतात. नाट्यात्मक निवेदन आणि खोल मानसशास्त्रीय अवगाहनाची डूब लेखक आपल्या कादंबऱ्यांना देतात. अनेक अंगांनी शोलोखोव गॉर्कीची परंपरा पुढे चालवतात. थॅकिमेन्को म्हणतात की हे साम्य केवळ शैलीचं किंवा लेखनपद्धतीचं नव्हतं. हे होतं मूलभूत विचारसरणीचं आणि सौंदर्यतत्त्वांचं. गॉर्कीच्या व्यक्तिमत्वातील तीन महत्त्वाच्या घटकांचं शोलोखोव्ला फार मोठं आकर्षण होतं. ते म्हणजे (१) त्याचा माणसाबद्दलचा अभिमान, (२) लढणारा म्हणून माणसावरचं त्याचं प्रेम आणि (३) कष्टकरी जनतेच्या प्रयत्नातून जगाचा कायापालट होऊ शकतो यावरची त्याची श्रद्धा.

महाकादंबरी लेखनाची पंधरा वर्षे

'आणि संथ वाहतेय डॉन' ही कादंबरी शोलोखोव् पंधरा वर्षे लिहीत होता.

पडलेला असतो. पण हे बंडखोर 'लाल सैन्या'शी हात जुळवणी करीत नाहीत. या बंडखोरांची दिशाभूल करण्यात आलेली असते. संभ्रमाच्या भोवऱ्यात त्यांची फरफट झालेली असते. त्यांना कामकरी वर्गाच्या क्रांतिविरुद्ध होणाऱ्या लढाईसाठी वर्गद्रोहीपणाने प्रवृत्त केलेले असते. या घटनेतच त्यांच्या पुढे होऊ घातलेल्या शोकांतिकेची बीजे असतात हे वाचक चाणाक्षपणे ओळखतो. शोलोखोव् 'इतिहासाच्या एका प्रवाहावर काव्यमय शिक्कामोर्तब' करतो. याचे कारण इतिहासांच्या जडणघडणीची मूलभूत तत्त्वे तो चांगल्या प्रकारे ओळखतो. आपल्या कादंबरीसाठी. म्हणूनच तो समर्थपणे एक कथनशैली निवडतो. पात्रांची समूहरचना करतो. आपल्या प्रमूख पात्रांची वैयक्तिक सुखदुःखे लेखकाला प्राप्त झालेल्या विविध अभिव्यक्ती साधनांतून साकार करीत जातो. मॅक्झिम गॉर्की यानी मध्यस्थी केल्यावर 'आणि संथ वाहतेय डॉन' चा तिसरा खंड प्रसिद्ध झाला व लगेच शोलोखोवने चौथा खंड लिहायला घेतला.

शोलोखोवला चौथा खंड लिहायला प्रदीर्घ काळ लागला. "सगळं काही बराच काळ माझ्याजवळ कच्चं टिपलेलं होतं." तो नंतर म्हणाला, "परंतु त्यावर मी सतत पुनः पुनः काम करीत होतो." शेवटी १९३४ – ३५ साली एकदाचा कादंबरीचा अंतिम आकार ठरला. "आणि संथ वाहते डॉन" ही कादंबरी चार खंडात प्रसिद्ध होईल असे लेखकानेच जाहीर केले. ग्रिगरी मेलेखोवला कोणकोणत्या प्रसंगातून कसे न्यायचे याची रुपरेखा कादंबरीकाराच्या मनात स्पष्ट झाली होती. तिसऱ्या खंडाच्या शेवटी व्हेशेन्स्कायाजवळ बंडखोरांच्या तुकडीचे नेतृत्व मेलेखोव करीत असतो. तिथून तो उत्तरेकडे, बालाशोव्हकडे हल्ला करतो. पण त्याला 'व्हाईट' सैन्याबरोबर नोव्होरोसिस्ककडे माघार घेणे भाग पडते. नंतर दक्षिणेकडे 'व्हाईट' सैन्याचा पूर्ण धुव्वा उडतो आणि कोझॅकांचा सशस्त्र लढा संपुष्टात येतो. तेव्हा मेलेखोव लाल सैन्यात सामील होतो. पोलंडच्या आघाडीवर तो पहिल्या घोडदळासह लढतो. त्यानंतर काही काळाने तो लुटारुंच्या टोळीत सामील होतो. सामाजिक व ऐतिहासिक वास्तवाच्या संदर्भात आपण ग्रिगरी मेलेखोव ज्या परिस्थितीतून निर्माण झालेला दाखवलाय, त्याबद्दल लिहिताना शोलोखोव् निक्षून सांगतो, "मेलेखोवची नियती ही विशुद्धपणे एक वैयक्तिक घडामोड आहे. ते काही मध्यम–कुणबी कोझॅकांचं कोणतं वैशिष्टच आहे असं सुचविण्याचा माझा मुळीच इरादा नाही. मी त्याला अर्थातच 'व्हाईट' लोकांपासून वेगळा करतो. परंतु मी त्याचा 'बोल्शेविक' होऊ देणार नाही. तो बोल्शेविक नाहीय."

१९३७ च्या अखेरीला १९३८ मालच्या प्रारंभाला सातवा भाग 'नोव्ही मिर' मध्ये प्रसिद्ध झाला. १७ डिसेंबर १९३८ ला आपली आठव्या भागाची कच्ची प्रत तयार झाल्याचे लेखकाने सांगितले. आपल्या कादंबरीच्या अंतिम भागावर काम करायला या काळातच शोलोखोव्हने सुरुवात केली. २० मार्च १९३९ रोजी झालेल्या एका मुलाखतीत शोलोखोव् म्हणाला " मी नक्कीच ती फेब्रुवारीत लिहून पूर्ण करीन'. त्याप्रमाणे १९४० साली ' नोव्ही मिर ' च्या दुसऱ्या व तिसऱ्या अंकात कादंबरीचा आठवा आणि शेवटचा भाग प्रकाशित झाला. १९३० ते ४० काळातील सोव्हिएट साहित्यात परंपरेला छेद देणारे नवे बदल घडून येत होते. नवा सोव्हिएट माणूस घडत होता व त्याचे दर्शन देण्याची उत्सुकता सोव्हिएट साहित्याला लागली होती. जीवनाच्या विलक्षण विविध अंगांनी हा नवा सोव्हिएट मानव सोव्हिएट साहित्यातून प्रकट होत होता. हा समाजवादी मानव आपल्या, गुणवत्तेने कसा विकसित होत होता याचे प्रतिबिंब विश्वव्यापी ऐतिहासिक संदर्भात काही पुस्तकातून, दैनंदिन वास्तवाच्या चित्रणासह, प्रत्ययकारिकतेने उमटत होते. या काळातील साहित्यातून प्रकट होणारी कथानकांची व साहित्यप्रकारांची विविधता नव्या सोव्हिएट माणसाच्या चैतन्यगर्भ विकसनशील जीवन वैभवाची अनुभूती वाचकांना समृद्धपणे देत राहते. हा नवा सोव्हिएट मानव केवळ वर्तमान काळा-चाच अर्थ व त्या काळातील आपले स्थान शोधत नव्हता किंवा तो नजिकच गुदरलेला क्रांतीचा आणि यादवी युद्धाचा भूतकाळ धुंडाळीत नव्हता. तर तो आपल्या लोकांच्या संपूर्ण इतिहासाचाच काळजीपूर्वक अभ्यास करीत होता. इतिहा-सातील लोकोत्तरांचा मागोवा घेत होता. आणि ' संथ वाहते डॉन ' च्या शेवटच्या भागात ऐतिहासिक विकसनशीलतेचे नियम प्रत्ययकारिकतेने व ठामपणे देण्याचा, अवघड प्रयत्न कलात्मकतेने कादंबरीकाराने केलेला सूज्ञ वाचकाला जाणवल्या-वाचून रहात नाही. या महाकाव्याचे रूप धारण करणाऱ्या महाकादंबरीचा महान चित्रफलक कादंबरीकार विविध घटनांनी, विविध पात्रांनी व विविध रंगांनी पण विलक्षण ताकदीने नटवून सजवून टाकतो, आणि तरीही त्यातील वैणिक तरलता व काव्यात्मकता तो टिकवून ठेवतो. मानवी परस्परविरोधी भावनांचे व विकारांचे सुखदु:खदायी खेळ जसे तो प्रभावीपणे चित्रित करतो त्याचप्रमाणे त्यांच्या शोकांतिक जीवनातील वैय्यर्थाला अर्थकारी संपन्न विनोदाची जोडही द्यायला तो विसरत नाही. गॉर्कीने एकदा कादंबरीकार फेदिनला लिहिलं होतं, " कला ही जर प्रामाणिक व विमुक्त असेल तर ती कधीच जुजबी नसते. नव्हे, ती एक जीवन आणि मनुष्याबद्दलचा पवित्र ग्रंथ असते. " कलेची ही उत्तुंग संकल्पना डॉन संथ वहातच आहे.

शोलोखोव्च्या कादंबरीला निश्चितपणे लागू होते. ती कामकरी, कष्टकरी माण-साच्या प्रेमाने व आदराने ओतप्रेत भरलेली असते.

ग्रिगरी मेलोखोवची शोकांतिका :

डॉन कोझॅक ही सर्वसामान्य कुणब्यांपेक्षा एक वेगळी जमात होती. त्यांना सरंजामी दास्यत्व कधी ठाऊक नव्हतं. त्यांचं शिक्षण वेगळं होतं तसंच त्यांना लहानपणापासूनच लष्करी सेवेसाठी तयार करण्यात आलं होतं. त्यांना धीटपणाचं आणि लागेल ती वस्तू हस्तगत करण्याचं बाळकडूच झारच्या राजवटीत पाजण्यात आलं होतं. झार सरकारने त्यांना आपण एक विशेष जातिजमातीचे लोक आहोत याचा अभिमान बाळगायला नेहमीच उत्तेजन दिलं होतं. ' मुझिक ' आणि नागरी कामगार वर्गाचा तिरस्कार करायला शिकवलं होतं. झार आणि देश याचे आपण एकनिष्ठ सेवक आहोत असा अभिमान त्यांच्या रोमारोमात भिनला होता. लहान-पणापासूनचा ग्रिगरी मेलेखोवच्या मनात 'कोझॅक' हा एक अतिशय गौरवाचा किताब आहे असं बिंबविण्यात आलं होतं. झारचे अधिकारी, कोझॅक जमीनदार, बडे शेतकरी (Kulak) आणि अन्य सत्ताधीश मोठ्या कौशल्याने व दक्षता-पूर्वक कोझॅकांची ही जातीय अलिप्तता पोसत होते व जपत होते. तिचे प्रत्यंतर प्रकर्षाने नंतर यादवी युद्धात आलं. क्रांतिकारी रशियामध्ये डॉन कोझॅक यांनी सवता सुभा व स्वतःची 'कोझॅक परंपरा' प्रस्थापित करण्याची अलगतावादी चळ-वळ केली. जमिनीचा भलामोठा तुकडा देऊन कोझॅकांना वश करण्यात येई. कोझॅक 'बाहेरच्या' कुणब्यांचं आणि भूहीन रहिवाशांचं शोषण करीत. गरीब आणि मध्यम कोझॅक आपल्या कुटुंबियांच्या मदतीने आपली जमीन आपणच कसीत असत. मेले-खोव कुटुंब मध्यम कोझॅक होते. त्या कुटुंबाचा प्रमूख पॅनोलिय प्रोकोफोविच म्हणतो "यंदाचा हंगाम सोडून दिला तरी आपल्याकडे दोन वर्षे पुरेल इतके धनधान्य भरलेले आहे." उलट इलियनिचना म्हणते, "मी आणि माझा म्हातारा रात्रंदिवस आम्ही गुलामासारखे शेतावर खपत होतो." लिस्टनिट्स्कीसारख्या कोझॅक सेनापती व अधिकाऱ्यांजवळ हजारो एकर जमीन होती. आपल्या तातार्स्की खेड्यात कुलक मिरॉन कोर्शुनोव्हने प्रचंड संपत्ती आणि सत्ता हस्तगत केली होती. त्याने कायमचे मजूर कामाला लावले होते. जमीन विकत घेतली होती. जनावरांची जोपासना केली होती. व्यापारी मोखोव आणि त्याचा भागीदार आटेपिन तर सावकारी व्याजाने कर्जाऊ रक्कम देऊन गरीबातील गरीब कोझॅकांना पिळून काढीत होते.

'आणि संथ वाहते डॉन ' मध्ये शोलोखोव रशियाच्या क्रांतिकाळातील कोझॅक जीवनाची ही विसंगती व विषमता उघड करून देतो. मिखैल कोशेव्हाय सारखा कोझॅक, आपली स्वतःची जमीन कसता येत नाही म्हणून वेठबिगार मजुराचे काम करतो. कोतल्यारोव सारखे कोझॅक आपली जमीन सोडून मोखोवच्या गिरणीत काम करतात. ते अर्ध कुणबी अर्ध - कामकरी होतात. या गरीब खेडूतांमध्ये एक खोल असंतोष धुमसत असतो. 'नेव्ह' या टोपण नावाच्या मोखोवच्या गिरणीतील कामगाराला १९०५ साली झालेल्या श्रमिकांच्या उठावाची आठवण असते. धनि-कांचा द्वेष त्याच्या नसानसात भरलेला असतो. पुन: एक क्रांती घडून येणार आहे आणि शोषकांचा समूळ उच्छेद होणार आहे याचा त्याला भरंवसा वाटत असतो.

यादवी युद्ध आणि क्रांती आली. सगळा देश पेटून उठला. पण तत्पूर्वी ग्रिगरी मेलेखोवने सामाजिक प्रश्नांचा कधीच विचार केला नव्हतं. मेलेखोव कुटुंब श्रीमंत नव्हतं. पण खाऊन पिऊन सुखी होतं. समाजात त्या कुटुंबाला आदर मिळत होता. ग्रिगरीचं आपल्या शेत जमिनीवर प्रेम होतं. तीवर तो कामही करीत होता. त्याचा बाप पॅन्टेली प्रोकोफेविच झारच्या लष्करात सिनियर सार्जण्ट होता. म्हणजे त्या कुटुंबाच्या सन्मानाची ती अधिक बाजू होती. ग्रिगर सुद्धा सैन्यात दाखल होतो पण रणांगणावर लढत असताना सुद्धा त्याला त्याची शेतजमीन आठवत रहाते. कोझॅक कुटुंबपद्धती ही पितृसत्ताक होती. बाप हा घरादाराचा एकमेव मालिक होता. लहानपणापासूनच कोझॅक मुलावर, त्याने बापाची आज्ञा पाळणे व त्याची भीती बाळगणे याचे संस्कार होत असत. ग्रिगरीच्या बापाने भर गावात आपली अवज्ञा केल्याबद्दल मुलाची पाठ आपल्या कुबडीने फोडून काढली होती. वरिष्ठ कोझॅकांना कनिष्ट कोझॅकांना शिक्षा करण्याचा अधिकार होता. ग्रिगरी धैर्यशाली व संवेदनशील होता. आपल्या कुटुंबाशी त्याने चांगलं जुळवून घेतलं. गावात अक्सिन्याशी त्याची भानगड होती यामुळे त्याने कुळाला कलंक लावला होता. पण बापाने त्याचे लग्न ठरविल्यावर तो निमूटपणे नताल्याशी लग्न करायला बोहल्यावर उभा राहिला. तसं पाहिलं तर ग्रिगरीच्या बोलण्या चालण्या वागण्यातून त्याच्या अंगी असलेल्या माणुसकीचा प्रत्यय वाचकाला निरंतर येत रहातो. त्याच्या कुटुंबातील भांडणं असोत, युद्धातील पेचप्रसंग असोत किंवा दैनंदिन जीवनातील बारकावे असोत, ग्रिगरीला त्याची न्यायबुद्धी, आत्मप्रतिष्ठा व त्याचं जीवनावरचं उत्कट प्रेम काही कधी सोडून जात नाही. ज्या जगात ग्रिगरी वावरतो त्या जगाचा तो एक अवश्यमेव घटक आहे

असेच कादंबरीकार नेहमी सूचित करतो. अक्सिन्या व नताल्या या दोन्ही स्त्रियांशी तो संबंध ठेवतो व त्या दोघींवरही तो प्रेम करतो. पण प्रत्येकीजवळील त्याच्या प्रेमाची तऱ्हा वेगवेगळी आहे. अक्सिन्या आपल्या मनुष्य घातक सौंदर्याचा अभिमान बाळगणारी आहे. उच्छृंखल आहे. उलट नताल्या शांत, संयमशील, श्रद्धाळू व प्रेमळ पत्नी व माता म्हणून आपल्या मनात ठसते. अक्सिन्याचे लेफ्टनंट लिस्ट-निट्स्कीशी लागेबांधे आहेत. हे ध्यानात आल्यावर ग्रिगरी तिला गुरासारखी बदडून काढतो आणि तरी रणांगणात आघाडीवर लढत असताना त्याला सारखी अक्सिन्याची आठवण येत रहाते. ग्रिगरीला राजकारणचं ज्ञान जेमतेमच असतं. भाबडेपणाने तो झार व देश यानाच प्राणपणाने मानीत असतो. एक कोसॅक म्हणून आपले लष्करी कर्तव्य तो एकनिष्ठेने पार पाडीत असतो. मात्र जेव्हा मिलिटरी हॉस्पितळात त्याला सैनिक गरांझा भेटतो व त्याला बोल्शेविकांचं तत्त्व-ज्ञान समजावून सांगतो तेव्हा त्याचे डोळे लखकन उघडतात. बोल्शेविक गरांझाने आपल्या चतूर युक्तिवादाने त्याला युद्धाचं वैयर्थ पटवून दिलेलं असतं. त्या रात्री ग्रिगरीची झोपच उडते. मध्येच भर रात्री गरांझाला झोपेतून जागा करून तो रागारागाने त्याला विचारतो, " तू म्हणतोस की धनिकांच्या फायद्यासाठी आप-ल्याला मृत्यूच्या खाईत लोटलयं ? पण मग लोकांचं काय ? त्याना समजत नाही? युद्ध कसं थांबवता येईल यावर त्याने जोरदार वादविवाद केला. मग तो गरांझाला म्हणाला, " म्हणजे प्रत्येक गोष्ट उलटीची सुलटी केली पाहिजे. असं तुझं म्हणण आहे ? आणि नवं सरकार आल्यावर तू युद्धाचं काय करणार आहेस ? तू युद्धाचं मूळ कसं उपटून काढणार आहेस ? युगानुयुगे माणसे लढत आली नाहीत काय ?" गरांझाकडे प्रत्येक प्रश्नाला उत्तर होतं. मग त्याचे आभार मानून त्याचा निरोप घेताना ग्रिगरी म्हणतो, " अच्छा, खोखोल, माझे डोळे उघडल्याबद्दल तुझे आभार मी आता पाहू शकतो. माझी समज तितकी चांगली नाहीय . . . "

ऑक्टोबर क्रांतीच्या पहिल्या महिन्यामध्ये ग्रिगरी बोल्शेविकाना व्हाईट लोकांविरुद्ध येऊन मिळाला. नंतर पुढे त्याने आपला मार्ग बदलला तरी त्याच्या विचारांना जोरदार चालना मिळाली हे लक्षात घेतले पाहिजे. याकिमेंको 'शोलोकोव्ह' या आपल्या पुस्तकात ग्रिगरीच्या व्यक्तिमत्वाची चिकित्सा करताना लिहितात, "मध्यम कुणबी वर्गाची पार्श्वभूमी असलेल्या एका माणसाला आपल्या महाकादंबरीचा नायक करुन शोलोखोव यांनी क्रांतीच्या काही मूलभूत समस्या उलगडून दाखविल्या आणि तिची सामाजिक व राजकीय अनुभूती दिली."

'श्रमिक कुणबीची, व्याख्या लेनिनने अचूक दिली होती, त्याने लिहीलं होतं, "कुणबी हे अर्ध-मजूर व अर्ध-संपत्तीधारक आहेत." ग्रिगरी मेलेखोवच्या मानसिकतेत या सत्याचा प्रत्यय वाचकाला येतो. लोकांविरुद्ध लढताना ग्रिगरीच्या मनातील सुंदर व कोमल भावभावनांचा चुराडा होतो. आपल्या पत्नीशी अप्रामाणिक राहिल्याबद्दल त्याला टोचून बोलताना नताल्या विचारते, "तुला शरम नाही वाटत?" जणू कुणी एक भाबडी पोर बालिशपणें आपल्याशी बोलतेय अशा अविर्भात ग्रिगरी हसतो आणि म्हणतो, "हं ! शरम ! . . . शरम कशाशी खातात हे मी विसरून गेलोय ज्याच्या सगळ्याच जीवनाचा बट्ट्याबोळ झालाय त्याला शरम कशी काय वाटणार?" एकदा त्याची आई वैतागून ग्रिगरीला म्हणते, 'तुझ काळीज लांडग्याच असलं पाहिजे." त्याची बहिण दुनिया हीचंही तेच मत असतं. शोलोखोवने ग्रिगरीची रशियन लांडग्याशी तुलना करून त्याच्या जीवनाची शोकांतिका अधिक उत्कट व परिणामकारक केली आहे. त्याच्या जीवनात घडणाऱ्या आत्मविघातक अदला-बदलींची व चंचलतेची चुणूक दाखविली आहे. ग्रिगरीच्या अंत:करणातसदैव अंत-र्कलह उफाळलेला असतो. त्याच्या अंतर्यामातील नाना तऱ्हेचे अंतर्विरोध त्याचा छळ मांडतात, त्याची झोपमोड करतात. त्याला त्यांच्यावर उपाय सापडेनासा होतो. ते त्याला उध्वस्त करतात. नताल्याला आवेगाने तो एकदा म्हणतो, मुलांची मला क्वचितच काळजी वाटते आणि मी माझ्या स्वत:चा विचार केलेला नाही. लढाईने मला आतून कोरडं केल आहे. मी टणक झालोय .. माझ्या अंत:करणात डोकावून पहा .. आणि तुला दिसून येईल की एखाद्या कोरड्या विहरीसारखेच ते काळंकुट्ट आहे.." खरोखरच मेलेखोवच्या जीवनाची शोकांतिका गडद काळ्या रंगाची आणि यातून रिक्त कोरडी अशी आहे.

'आणि संथ वाहतेय डॉन' मधील स्वभाव चित्रण :

प्रभावी व्यक्तिचित्रण हे रशियन साहित्याचं पूर्वापार वैशिष्टच नेहमिच टिकून राहिलेलं आहे. शोलोखोव देखील आपली व्यक्तिचित्रणे सजीव व गतिमान अशी रेखाटतो. १९२८ साली ए. एस. सेराफिमोविच यानी शोलोखोवच्या लेख-णीचं स्वभावचित्रणाचं सामर्थ ओळखलं होतं. यावेळी यानी लिहीलं होतं, "कितो तरी काळजीपूर्वक काढलेल्या रेखा चित्रासारखी तो (शोलोखोव) आपली पात्रे 'लिहीत' नाही. उसळणाऱ्या रंगबहार गर्दीसारखे लोक याच्या पुस्तकातील पानात फेकले जातात. तिथे प्रत्येक माणसाला आपलं स्वत:चं नाक असतं. स्वत:च्या

आठचा असतात. त्यांच्या कावळचाच्या पायांबरोबर स्वतःचे डोळे असतात. स्वतःचे शब्दोच्चार असतात आणि प्रत्येकजण आपल्या विशिष्ट पद्धतीने चालतो व आपले डोळे वळवतो." शोलोखोवची लेखनकला ही चित्रदर्शी आहे. पण त्याबरोबरच ती आपल्या पात्रांचे मानसशास्त्रीय चित्रणही अचूक व नेमके करीत रहाते. जणू काही प्रत्येक पात्राचा वाचकाला साक्षात्कार होत रहातो. आपल्या कादंबरीतील प्रत्येक पात्राची विशिष्ट भावावस्था, त्यांच्या आंतरिक भावनांचं निश्चितरूप शोलोखोव ताकदीने टिपतो. या बाबतीत त्याची तुलना टॉल्स्टॉयशी करता येईल. माणसाच्या केवळ बाह्य रूपातच तो अडकून रहात नाही तर त्याची जी अंतर्बाह्य छाप त्याच्या जाणीवेत उमटलेली असते तिचा शोध घेत शोलोखोव आपली पात्रनिर्मिती करतो. विशेषतः त्याच्या कादबरीतील नायकाबद्दल हे विशेषच जाणवतं. ग्रिगरी मेलेखोव हा तसा एक नायक आहे. ग्रिगरीच्या जळजळीत निळसर डोळ्यांचं जसं तो रंगतदार वर्णन करतो तशीच त्याची कौटुंबिक स्वभाव वैशिष्ट्येही तो त्यातील आनुवशिक बारकाव्यासह रेखाटतो. वेगवेगळे अनुभव घेताना पात्राचा स्वभाव कसा बदलत जातो त्याचं सूक्ष्मतम दर्शन शोलोखोव कलात्मकतेने देतो. गंभीर आजारातून ग्रिगरी बरा होतो व सभोवार जगाकडे पाहतो तेव्हा त्याला एका नव्या जगाचा साक्षात्कार होतो. त्याच्या चेहऱ्यावर साधं बालसदृश्य हास्य उमटतं. त्याचा राकट चेहरा आणि लांडग्यासारखे जनावरी डोळे मऊशार हळुवार होतात. यादवी युद्धात, व्हेशेन्स्काया उठावात आणि नव्याने जन्माला आलेल्या तरूण सोव्हिएट राज्याविरूद्ध फोमिनच्या तुकडीत सामील झालेल्या ग्रिगरीची वेगवेगळी दर्शने शोलोखोव प्रत्यय-कारिकतेने देतो. शेवटचे ग्रिगरीचं दर्शन वाचकाला होतं ते त्याच्या लहान मुलाच्या- मिश्ताकाच्या- डोळ्यांतून. " मिश्ताकाने त्याच्याकडे भयभीत होऊन पाहिलं आणि त्याची नजर खाली गेली. त्याला जाणवलं की हा दाढीवाला आणि भयंकर दिसणारा माणूस त्याचा बाप आहे."

' आणि संथ वाहते डॉन , या महाकादंबरीचा चित्रफलक विशाल आहे. या फलकावर इतर अनेक पात्रांबरोबर ठळकपणे उठून दिसतो तो ग्रिगरी मेलेखोव. त्याच्या मनातील वादळ, शंका, चांचल्य, गोंधळ आणि संघर्ष रशियन जनतेच्या क्रांतिकारी लढ्याच्या पार्श्वभूमीवर कादबरीकार चित्रित करतो. दोन परस्पर विरोधी जगाचा तो संघर्ष असतो. तो कोणता अमूर्त व गूढ असा अध्यामिक झगडा नसतो किंवा कोणत्या नैतिक तत्त्वांचा त्यात विजय किंवा पराजय झालेला नसतो. ग्रिगरी मेलेखोवला सामाजिक सत्य जाणून घेण्याचा ध्यास लागलेला असतो. यादवी युद्धात तो सामील होतो त्याच वेळी त्याला एकामागून एक निर्णय पटापट घ्यावे

लागतात. चुकामागून चूका त्याच्या हातून घडत रहातात आणि पावलापावला-गणिक त्याची वाट चुकत रहाते. एका व्यापक ऐतिहासिक घडामोडींच्या पातळीवर कादबरीकार ग्रिगरी मेलेखोव या पात्राची उभारणी करीत रहातो. त्यात माणसांचं अंत:करण हीच एक युद्धभूमी झालेली असते व तीवर नव्या जुन्याचे युद्ध पेटलेले असते. शेवटी ग्रिगरीची जी भयानक अवस्था होते ती इतिहासानेच त्याला दिलेली निष्ठूर शिक्षा असते. ग्रिगरीबरोबरच अक्सिन्या आणि नताल्या व ग्रिगरीची आई इल्यिनिचना ही स्त्री पात्रे कादंबरीत सजीव व गतिमान होऊन वावरतात. मातृत्वाच्या प्रबळ भावनांनी इल्यिनिचनाचं हृदय भरलेलं असतं तर अक्सिन्या व नताल्या उत्कट सर्वग्राही प्रेमाचं प्रतीक होऊन रहातात. त्यांच्या प्रेमाची उत्कटता व अलौ-किकता ग्रिगरीचं व्यक्तिमत्व निस्तेज करीत रहाते. ऐतिहासिक विकसनशीलतेच्या शास्त्रीय ज्ञानातून कादंबरीकाराची सौंदर्यलक्षी जाणीव आपलं भरणपोषण करते आणि त्यातूनच सामाजिक, ऐतिहासिक व व्यक्तिगत वास्तवाचं लेखकाचं भान अतूट व अचूक रहातं. मॅक्झिम गॉर्कीने आपल्या साहित्य विचारातून दिलेली 'समाजवादी वास्तवतावादाची' संकल्पना (Socialist Realism) शोलोखोवच्या 'आणि संथ वाहते डॉन' या महाकादंबरीत पुरेपूर साकार झाल्याची प्रचिती वाचकाला येत रहाते.

गॉर्कीप्रमाणेच शोलोखोवच्या कादंबरीतील लहानमोठी पात्रे आत्मपरीक्षण करताना आढळतात. परंतु गॉर्कीहूनही वेगळी अशी स्वत:ची पद्धती शोलोखोव 'आणि संथ वाहते डॉन' या कादंबरीतील पात्रांना अतर्मुख करण्यासाठी वापरतो. ही पात्रे नेहमी आंतरिक स्वगत (inner monologues) बोलतात. ग्रिगरी स्वत:शीच स्वत:बद्दल बोलतो तद्वतच तो स्वत:बद्दल इतरांशीही मोठ्याने बोलतो. स्वभावत: तो बहिर्मुख आहे पण परिस्थिती त्याला अंतर्मुख बनवून आत्मपरिक्ष-णाला उद्युक्त करते. साहजिकच या पद्धतीने लेखक आपल्या पात्रांचे मानसिक विश्लेषण सूक्ष्मपणे करतो व त्यांच्या स्वभावातील परस्पर गुंतागुंतीचे अंतर्विरोध तपशीलवार टिपतो. पुष्कळदा या कादंबरीतील मुख्य पात्रांच्या मनातील विचार स्वयंकथनपद्धतीने तसेच तृतीय पुरुषी सुद्धा प्रकट होतो. स्वाभाविकच त्या त्या पात्रांचे त्यालाही ठाऊक नसलेले त्याचे आंतरिक विश्व त्यातून विस्तृत उलगडले जाते. या कादंबरीचा चौथा खंड त्या दृष्टिने लक्षणीय ठरतो. या महाकादंबरीवर आणि तिच्यात प्रकट झालेल्या मानवी वास्तवावर या खंडात शिक्कामोर्तब होतं. या खंडातील प्रत्येक घटना, प्रत्येक दृश्य, प्रत्येक तपशीलसुद्धा, अर्थपूर्ण आहे असे याकिमेन्को म्हणतो ते खरेच आहे. ग्रिगरी मेलेखोवचं जीवन संपुष्टात येतं तसा

वाचकही त्याचं जीवन अधिकाधिक जाणून घ्यायला अधीर होतो. याकिमेन्को या खंडाचे विश्लेषण करताना म्हणतो, "संपन्न, अभिव्यक्त होत जाणारी प्रतिमा-सृष्टी हा शोलोखोवच्या गद्यलेखनाचा विशेष गुण आहे. प्रत्येक ओळ प्रत्येक वाक्यप्रयोग स्पंदन पावतो. जिवंत असतो. प्रत्येक संतुलन संपूर्णपणे अधिकृत, सुस्पष्ट व गतिमान असते. एका प्रबळ मानवी भावनेने ती ओथंबून भरलेली असते. ती वाचकाच्या सगळ्या हृदयतारा छेडीत रहाते." कादंबरीची अखेरची प्रकरणे एका उदात्त दुःखवेदनेने व्यापलेली आहेत. गिगरीचं दुर्दैवी जीवन संपुष्टात येत असतं. तो एक जिवंत मरण जगत असतो. त्याच्या सुखदुःखात वाचकही समरस झालेला असतो. कधी कधी ग्रिगरीच्या जीवनाचा कालपट पाहून त्याला धडकी भरते. ग्रिगरीच्या जीवनाचं वास्तव त्याला भयभीत करतं. तो स्वतःलाच पुनःपुनः प्रश्न विचारीत असतो. ग्रिगरी मेलेखोवच्या शोकांतिकेचं मूलभूत कारण कोणतं असावं? या शक्तिमान भावना व विकारप्रबळ व बुद्धिमान माणसाच्या वाट्याला असा बदनाम जीवनान्त का यावा?

'आणि संथ वाहते डॉन'चा मराठी अनुवाद:

'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा'ने मिखैल शोलोखोव यांच्या या महाकादंबरीचा अनुवाद मराठी भाषेत प्रसिद्ध करावा ही खरोखरच मराठी साहित्यातील महान घटना आहे यात संशय नाही. मॉस्को या रशियाच्या राजधानीत गेली अनेक वर्षे वास्तव्य करून राहिलेले श्री. नरेंद्र सिंदकर यानी हा मराठी अनुवाद मूळ रशियन कादंबरीवरून समर्थपणे केला आहे असे म्हणता येईल. या संपूर्ण महाकादंबरीचा शेकडो पात्रांचा व घटनांचा पल्ला लक्षात घेता नरेन्द्र सिंदकर यांनी केलेली ही मराठी अनुवादाची कामगिरी विशेष लक्षणीय ठरते. शोलोखोवच्या या कादंबरीतील एकूण पात्रांची संख्या आठशेहूनही अधिक भरते. विशेषतः या कादंबरीतील स्थळ, पात्रे, प्रसंग व ऐतिहासिक जुने नवे संदर्भ, ग्रामीण व नागरी जीवन, उच्चभ्रू तसेच तळागाळातील लोकभाषेचे ढंग व लोकबोलीतील वाक्यप्रयोगांचे बारकावे, स्त्रीपुरुषांच्या ग्रामीण व कौटुंबिक स्तरावरील बोलण्या-चालण्याचा विशिष्ट प्रकार, लोकाचार व लोकम्हणी, लोकसंस्कृती या सर्व लोक-जीवनाचे रशियातील व विशेषतः डॉन परिसरातील जिवंत व बोलके वास्तव नरेंद्र सिंदकर यांनी केलेल्या या महाकादंबरीच्या मराठी अनुवादात प्रकर्षाने उमटते व तीच अनुवादकाची एक अनुवादक म्हणून खरी कमाई ठरते. रशियन भाषेचा मी स्वतः अभ्यासक नसल्यामुळे रशियन भाषेतून इंग्रजीत

झालेला या कादंबरीचा अनुवाद डोळ्यासमोर ठेवूनच मी गेले कित्येक महिने श्री. सिदकर यांनी मराठीत केलेल्या या अनुवादाचा तुलनात्मक अभ्यास करीत आहे. उत्तम अनुवादकाचं असं लक्षण सांगितलं जातं की त्याने अनुवाद केलाय हेच मुळी त्याचा अनुवाद वाचताना लक्षात येत नाही. ज्या अभिजात साहित्यकृतीचा अनुवाद परभाषेवरून स्वभाषेत एखादा अनुवादक करीत असतो त्यावेळी ती साहित्यकृती तो सर्वार्थाने व सर्वांगाने पुनः जगत असतो. वस्तुतः तो द्विज बनून दोन जन्मांच्या फेऱ्यातून जात असतो. एक त्याचा जन्म त्या अभिजात साहित्यकृतीची संपूर्ण अंगकाठी आत्मसात करण्यात खर्ची पडतो, व त्याचा दुसरा जन्म त्यातून त्याला येणाऱ्या अनुभूतीची पुनराभूती प्रत्यक्ष भाषेच्या माध्यमातून साकार करण्यात गुंतलेला असतो. दोन जन्माच्या या सर्जनशील प्रक्रियेतून तो जाणीवेने जात असतो. 'डॉन संथ वाहतच आहे' असं शीर्षक श्री. सिदकर आपल्या मराठी अनुवादाला देतात आणि ते समर्पकच ठरतं. या महाकादंबरीची विभागणी पाच पर्वांमध्ये झालेली आहे. नुसत्या पहिल्या तीन पर्वांतच दीडशेहून अधिक पात्रे वावरताना आपल्याला विविध स्थळी, विविध काळी व विविध प्रसंगातून भेटतात. त्यांच्या नावांची यादी द्यायची झाली तरी सुध्दा पानामागून पाने भरून जातील आणि एका मर्यादित प्रस्तावनेत या सर्व पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांचे व वैचित्र्याचे बारकावे नेमके टिपणे अवघड व अनावश्यकही आहे. मूळ महाकादंबरीच्या महा अरण्यात मराठी वाचक स्वतःला ज्या समरसतेने व समझोत्याने धुंदफुंद होत झोकून देईल त्याप्रमाणे त्याला त्या अरण्यातील विस्मयकारक व मनाला व बुद्धीला कलानुभुतीने व जीवनानुभूतीने व्यापून टाकणाऱ्या स्थळकाळपात्रांचा परिचय आपोआपच समृद्धपणे होत जाईल. नरेन्द्र सिदकर यांनी केलेला हा मराठी अनुवाद शोलोखोवच्या मूळ रशियन भाषेतील लेखनाची मराठी प्रतिकृती ठरल्यावाचून रहात नाही. सर्जनक्षम साहित्यिक पातळीवर श्री. सिदकर अनुवादक म्हणून 'संथ वाहते डॉन' मराठीत सजीव साकार करतात व हे त्यांचे यश म्हटले पाहिजे.

प्रत्यक्ष आपल्या पतीला शय्यासोबत देत असताना आक्सीनीयाच्या मनात ग्रिगरीबद्दलच्या विचारांचे जे वादळ घुमत होते त्याचे वर्णन सिदकर यानी केलेल्या मराठी अनुवादात कसे उमटते ते 'पर्व पहिले' पृ. १०४ वर शेवटच्या परिच्छेदात वाचावे. तसेच त्याच पर्वात पृ. १२०, पृ. १५९ वरील संवाद व वर्णने वाचावीत. उदाहरणार्थ 'कझाक आणि रशियन अस्मिता व्यक्त करणारा पुढील संवाद पहाः-

भगदाडे पडलेल्या दातांतून ओझेरोव तिरस्काराने पचकन थुंकला. वाऱ्यावर उडणाऱ्या थुंकीकडे बघत तो पाय फाकून उभा राहिला.

‘ मी कझाक आहे ...! पण तू ...? तू कोण आहेस? जिप्सी?’

‘ तू आणि मी --- दोघे रशियन आहोत ! ’

‘ थापा मारतोयस! ’

आफोनकाने मुद्दाम आरोप केला.

‘ कझाक रशियनांच्याच कुळातले आहेत ! ठाऊक आहे तुला ?’

‘ मी तुला सांगतो ! कझाक कझाकांच्या कुळातील आहेत ? ’

‘ खूप पूर्वी वेठबिगार जमिनदाराकडून पळून आले आणि डॉनवर त्यानी वस्ती केली. त्यानाच पुढे कझाक म्हणायला लागले. ’

‘ अरे जा न ऽ आपल्या वाटेनं ! ’

पुढील आणखी एक नमुना पहा : (पर्व दुसरे. पृ. १८०)

संध्याकाळी नाईक व्होडका घेऊन आला ! दोन दिवस चंगळ केली ! पण नंतर आम्हाला त्यातली गोम कळली ! त्या पोरानं रांडीच्यानं आम्हाला जर्मनीतल्या सगळ्यात गाजलेल्या दंगलखोराचं चित्र दिलं होतं ! मी आपलं ते माझ्या बिछान्यावर लावलं होतं ! त्या माणसाला पिकलेली दाढी होती ! मोठा खानदानी वाटत होता. शेटजी बिटजी सारखा दिसत होता ! जुमलेदारानं ते पाहिलं आणि विचारलं,

‘काय रे ए भडव्या! कुठन आणलं हे चित्र?’

मी त्याला सांगून टाकलं. तशी शिवीगाळ करीत माझ्या कानफटात द्यायला लागला.

‘तुला ठाऊक आहे रे कोण आहे हा? हा त्यांचा आतामन कार्ल–च्यायला विसरलो सालं नाव-! काय बरं होतं?’

‘कार्ल मार्क्स!’ रुंद हसत स्तोकमनने सुचवले.

पृष्ठ ३२३ वरील ‘तिसऱ्या पर्वा’तील कझाक जीवनाचे चित्रण, त्यांच्या श्री. सिंदकर यांनी मराठीत अनुवादीत केलेल्या लोकगीतांसह कसे लक्षवेधी ठरते ते पहा:-

जून महिन्याच्या उकडत्या सायंकाळी कझाक झगरीभोवती गाणे म्हणत होते.

कझाक दूरच्या गेला मुलखाकड
खडया रानावर फेकीत घोड
कायम ठेवून मागं खेडं
परत यायचा पुन्हा न इकडं

लोचदार मध्यमाच्या स्वरात शोकार्त हुंदका होता तर खर्जातून प्रगाह मुलायम दुःख प्रकटले होते.

मध्यमाने शोकाची तीव्र पट्टी आता गाठली होती.

त्याची होती कझाक नवरी नव्या नवतीची उषा
उरी फोल ही घेऊन आशा निरखी उत्तर दिशा
सांज सकाळी वाट पाहते येईल साजणं घरी
कझाक दिलवर कधी न माझा जाईल सोडून दुरी

अनेक आवाजानी गाण्याचा भरणा केला आणि घरी बनविलेल्या 'बीअर' प्रमाणे ते समृद्ध झाले आणि भिनू लागले.

कडे पठारा पल्याड तेथे घुमताती वादळे
धरणी गोठून बर्फाखाली तडतडुनी तळमळे
देवदारू फिर राने झुकती खिन्नपणे तेथली
कझाक हाडे पडली, वरती हिमचादर ओढली

कझाकाची साधी कहाणी आवाज सांगत होते आणि एप्रिल महिन्यातील पाघळत्या धरणीवरील आकाशात चंडोलाने भरारी घ्यावी त्याप्रमाणे आपल्या कंपित्र स्वरांनी मध्यमानी ती कहाणी पेलली होती.

मरणाद्वारी कझाक पडला ज्योत विझत चालली
काकुळतीने परी आर्जवे करितो शेवटली
थडग्यावरती माझ्या बांधा सान एक चौथरा
वरी वृक्ष अन् गावाकडला ढाळो धवल फुलोरा

पुढील आणखी एक उतारा पहाः (पृ३४२: पर्व तिसरे)

'आणि खरोखर घडले होते काय? आपल्यासारखाच एक असणाऱ्या दुसऱ्या माणसाला ठार मारण्याचे कसब ज्यानी संपादन केलेले नव्हते ते सैनिक मृत्युक्षेत्री कवटाळत्या प्राणांतिक भयापोटी एकमेकांवर तुटून पडले होते. परस्परावर त्यांनी आंधळेपणाने घाव घातले होते. एकमेकांना झोडपून काढले होते. एकमेकांना आणि

एकमेकांच्या घोड्याला त्यांनी घायाळ केले होते आणि नंतर आपल्यातील एकाचा जीव घेणाऱ्या गोळीचा आवाज ऐकून ते मोहरा वळवून पळून गेले होते! नैतिक-दृष्टया लुळे होऊन ते घोड्यावरून पसार झाले होते!

आणि ह्याला म्हटले जात होते शर्थीचा पराक्रम!

आणखी एक नमुना मला द्यावासा वाटतो (पृ. ३९२ : पर्व तिसरे)

'ज्युनिअर कॅप्टन कालमिकोव एक गुबगुबीत ठेंगणा अंमलदार होता. त्याचा तोंडावळा आणि नाव त्याच्या मंगोल वंशाची साथ देत होते. तावातावाने हातवारे करीत तो म्हणाला,

'हे युद्ध आपल्यासाठी नाय! मी चारशे वर्षं उशिरा जनमलो. प्येतर ठाउकाय'? स्क्वाड्रन कमांडर तेरसित्सेवला तो सांगत होता. 'प्यो' तर ऐवजी तो 'प्ये' तर असे ठासून म्हणत होता. 'ह्या युद्धाचा शेवट पहायला काही मी जगत नाय!'

'तुझं ज्योतिष राहू दे' आपल्या कॉकेशन चुग्यांखालून तो बोलला.

'ह्या ज्योतिषाच्या गोष्टी नव्हत! माझा हा शेवट आधीच ठरलेलाय! मी कुळकर आहे! इथं मी फालतू आहे! आज आपल्यावर भडीमार चालू असताना मी भ्रमिष्टपणे थरथरत होतो. गनिम दिसत नाय हे आपल्याला सहनच होत नाय. मला वाटणारी दळभद्री भावना हे एक प्रकारचं भयचाय! कित्येक मैलां-वरून त्यानी तुमच्यावर भडीमार करण्याचा आणि रानमाळावर शिकारी मागं लागलेल्या माळढोकासारखं तुम्ही घोडी फेकीत रहायचं!'

ग्रिगरी मेलेखोवच्या संतप्त मनोवृत्तीचे दर्शन पुढील उताऱ्यात पडते ते असे:—
(पृ. ४४६: पर्व तिसरे)

'चकचकीत गणवेशातील हा जमाव आणि उंची सुगंधाची जंगी लाट ग्रिगरीच्या दिशेला वळली. दाढी वाढलेला, दुर्मुखलेला, ज्वरग्रस्त डोळ्यांचा ग्रिगरी आपल्या खाटेजवळ उभा होता. त्याच्या उंच गालफडावरील पिंगट कातडीच्या सूक्ष्म थरथरण्यातून त्याची क्षुब्धता प्रकट होत होती.

'हेच ते!' त्याच्या मनात येत होते. 'आमच्या घरच्या खेड्याखेड्यांतून आम्हाला हुसकून मरणाच्या खाईत फेकून देण्यात ज्याना मौज वाटते तेच हे

लोक! आह्! डुकरीचे! मढी उचलली त्यांची! आमच्या पाठीवरच्या हृया उवा आहेत उवा! दुसऱ्या माणसांचा धान्यदाणा आम्ही टापांखाली तुडवला आणि अनोळख्यांना ठार मारले ते काय हृयांच्यासाठी? पिकाच्या खुंटातून मी सरपटत गेलो आणि ओरडलो! आणि आमचं भग्र? आमच्या घरादारापासून हृयांनी आम्हाला तोडलं! बराकीतून फाके मारायला लावलं!' त्या जळजळीत विचाराने त्याचे डोके फुटायच्या बेताला आले. संतापाने त्याचे ओठ थरथरू लागले. 'त्यांची माजलेली चकचकीत थोबाडं पाहून घ्या! तुमच्या आयला! तुम्हालाच तिकडं पाठवतो! पाठीवर बंदुक देऊन घालतो घोडयावर! उवांचा भारा लादतो पाठीवर! कुजलेला पाव आणि कीडे पडलेलं मांस खायला लावतो तुम्हाला!'

तर ग्रिगरी आपल्या जिल्हृयातील पहिल्या खेडयात पोचतो व काही मैलावर राहिलेल्या योगोदनोये या आपल्या खेडयाकडे चालू तेव्हा लागतो नदीच्या वळु-जीखाली गावातील पोरे कझाक गीत गात होती. त्याचा नरेंद्र सिंदकर यांनी केलेला मराठी अनुवाद कसा मराठमोळा होऊन उतरतो पहा:
(पृ४४८-पर्व तिसरे)

रानामागुन चमकत आले तलवारी भाले
कझाक शंभर दौडत दौडत आले मिशीवाले
तरूण अंमलदार तयांचा बिनिवरतो स्वार
पाठीवरती कझाक घेऊन दौडतसे शंभर

सणसणीत दाणेदार स्वच्छ सुराने गाणे पुढे नेले—

चला गडयांनु मिऊ नगा या
माझ्या मागुन या

इतर गाणारांनी द्रुत लयीत सूर पकडला.

अलंगावरी खुशाल सगळे चालुन जाऊ या
अलंगास त्या भिडेल पहिला
कझाक पट्टा तो
मानमरातब मिळविल सगळे कीरत
मिळविल तो

अर्थातच नरेन्द्र सिंदकर यांचा 'डॉन नदी संथ वहातच आहे' याचा समग्र अनुवाद सगळाच सरळ, सरस व समाधानकारक उतरला आहे असे म्हणता येणार

नाही. पण अशा असमाधानाच्या बाबी अल्पप्रमाणातच आहेत, एवढीच या अनु- वादाची कमतरतेची बाजू आहे. उदाहरणार्थ या मराठी अनुवादाचे 'पहिले पर्व' शब्द योजना व वाक्यरचनेच्या अंगाने क्लिष्ट होत जाताना दिसते. असे अनेक शब्द विशिष्ट रशियन संदर्भात अनुवादकाने मराठीत आणले आहेत की ज्यांचा नीट अर्थबोध बिगर रशियन वा इंग्रजी भाषेच्या मराठी वाचकाला सहजपणे होणे अवघड झाले आहे. 'चरवणीचे फाटक' 'वळुंजीचे फाटक' 'बळदात गेला' 'गोटचाळ काठावर' 'आवाडातून' 'झगाराखालून' 'खडूळ' 'डांगेतून 'धाटा' 'टांगूलाच्या टोकावर' 'झिंजाडले' 'घमतड' 'गाठचाळ मूठ' 'दांडेरी' 'टेल्याटिकोव्य' 'दाताळचानं' 'बुडुखाला' 'पोडळाभोवती' 'इष्टापुरीच्या डहाळीशी' 'ढीस देह' 'सायवानात' 'डाचाळ' 'उफलून' 'प्रपाणा' 'सुजीर' 'मथलेले स्मित' 'राशिजलधर' 'मंडल घेत होती' 'पगजाळे' 'खबाड' 'बीदीनाळे' 'फोंडाऱ्यात' 'किचडतळ' 'अपरे ओठ' 'रेकल्यातून' 'उपलाणे घोडे' 'खरपट माया' 'खमाविशी' 'खकाण उडाला' 'पतझडीच्या मोसमात' 'पडली रहायची' 'चुलवणीचे दार' 'पेंदेबांधणी' 'उटंगळ' 'निखदणी' 'फसाटीला' 'द्रिशक' 'उटव्यात' विधूळवाटचा' 'चांदमारी' कुंमेरी' 'भ्रू–मध्याचा मुका' 'मारमानेच्या बिळात' 'कोठंत्रीला' 'सालोत्री' 'ढेलचीत' 'दारकसावर' (काही वाक्यरचना पहा: माथ्यावर अचूक ठेवून दिलेल्या टिब्याने दणकट आणि निबर रखवालीच्या पहारे सैनिकालाही स्तिपान तिनताड उडवीत असे.) 'जिजाबाच्या' 'छायाळ निवाऱ्यात' 'गाव आखरीला असलेल्या' 'सुंदर दीर्घ पायापर्यंत' 'थकिस्त' 'दाभाडाची हालचाल' 'ओकाडे' 'बांदाडीला' 'तणस–वीण गवताळचात' 'बुरकुले बसलेल्या' 'फोंडवलीच्या सोनेरी लवीच्या पुंजक्याशी बागडत होती.' 'त्याचा बांबू सुंकारीत थरथरत होता.' 'घोडखवडे' 'गुंजाडनखे' 'रबलंद' 'निमूर' 'नमद्यांवरील 'राघावळी' 'चोभ्यामागे' 'सुकाट मुठीने' 'चकमकीचे गारमणी' 'दांड बरड' 'डुचके डोळे' 'वाऱ्याच्या झकारा' 'कांडीवर' अशा प्रकारच्या शब्दप्रयोगांमुळे व वाक्यरचनेतील दोषामुळे अनुवादाचे स्वरूप काहीसे बेडौल व कुरूप होत रहाते. अनुवादकाने मूळ रशियन शब्दांना जे मराठी शब्दरूप दिले त्यांचा शब्दकोष त्यांच्या अर्थासह व संदर्भासह कादं- बरीच्या शेवटी दिला असता, किंवा ज्या पृष्ठांवर असे शब्दप्रयोग होतात त्या पृष्ठाखाली टिकाटिप्पणी दिली असती (क्वचित काही पृष्ठांवर तशी ती दिलेली आढळली) तर अर्थ सुलभतेच्या दृष्टीने वाचकाला ती उपकारक ठरली असती.

लोकांचा लेखक :

१९५५ साली रोस्टोव्ह आणि कामेन्स्क परगण्यातील तरूण लेखकांसमोर बोलताना शोलोखोव म्हणाला होता, ' लोकांसाठी लेखकावर असलेली जबाबदारी फार फार मोठी असते. आपण सगळे मिळून आणि विभक्तपणे आपण प्रत्येक जण लोकांची सद्सदविवेकबुद्धी बनले पाहिजे आणि मला हेच तुम्हाला सांगायचं आहे माझ्या तरूण मित्रांनो तरूण लेखकाला लिहिणं नेहमीच सोप नसतं. खरं म्हणजे अगदी प्रामाणिकपणे बोलायचं तर पुष्कळदा त्याच्यावर चांगलीच अवघड वेळ येऊन ठेपलेली असते. परंतु तुमच्या मनात ज्याने अजून आकार घेतलेला नाही ते शब्दांत मांडण्याची घाई करू नका. तुम्ही जे पुस्तक निर्माण कराल त्याला प्रतिसाद मिळाला पाहिजे आणि ते दीर्घजीवी झाले पाहिजे.' आणि मग आपल्या भाषणाचा नसमारोप करताना शोलोखोव म्हणतो, ' तुम्हाला पुनः एकदा मला इशारा द्यायचा आहे. पहिल्यांदा तुम्हाला कितीही कष्ट पडले तरी सहजसोप्या यशाच्या मागे लागू का. काही झालं तरी तुम्ही आमची जागा घेणार आहात. तुम्ही आमची आशा तुम्ही आमचं भवितव्य. तुमच्यापैकी पुष्कळाना वर्तमानकाळ आहे आणि तुम्हा सगळ्यांनाच भविष्यकाळ आहे. लेखकाचा भविष्यकाळ. तुम्ही सुंदर लोकांचे सुंदर प्रतिनिधी आहात.'

कॉन्स्टॅन्टिन फेदिन हा थोर रशियन लेखक शोलोखोवबद्दल लिहितो. ' धैर्य हा शोलोखोवच्या लेखनाला अविभाज्य घटक आहे. त्याच्या लेखनाने सोव्हिएट साहित्याची प्रचंड सेवा केली आहे. जीवनातील अंतर्गत अंतर्विरोध त्याने कधीच बाजूला काढलेला नाही मग कोणत्याही कालाचं तो वर्णन करीत असेना का. त्याचे ग्रंथ भूत आणि भविष्यकाळातील संघर्ष त्यातील संपूर्णतेसह दाखवतात तरूण असताना लेव्ह टॉलस्टॉयने आपल्याला जे दंडक घालून घेतले होते त्याची एखाद्याला आपोआपच आठवण व्हावी–खोटं सांगायचं नाही. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष. आणि टाळाटाळ करून कधीच खोट सांगायचं नाही. शोलोखोव काहीच टाळत नाही. तो संपूर्ण सत्य लिहितो तो शोकांतिकेचं नाटकात रूपांतर करीत नाही किंवा नाटकाला हलक्या फुलक्या लेखनाचं स्वरूप देत नाही. वरवरचे समाधान देणाऱ्या रानफुलांच्या घोळक्यात त्याच्या शोकांतिक घटना दडून रहात नाहीत. पण सत्याचं सामर्थ्य एवढं मोठं असतं की जीवनातील कडवटपणा किंवा दुःख, मग ते कितीही भयानक असो, त्यावर ते मात करतं. सुखाकडे नेणारी इच्छाशक्ती, सुखप्राप्तीची लालसा, आणि ती सफल झाल्याचा आनंद

त्यावर विजय मिळवितो. मला वाटतं वस्तुस्थिती ही अशी आहे. तिच्या संपूर्ण आकलनासह आपण 'आशावादी शोकांतिके'ची (Optimistic tragedy) कल्पना उगीच नाही स्वीकारलीय. हा काही केवळ शब्दावरचा खेळ नाहीय. एका कलावंताने चितारलेल्या वस्तुस्थितीच्या शोकांतिकेची सखोलता ध्यानात घेऊन आपण त्याचं पुस्तक तरीही एका प्रकाशमय साक्षात्काराच्या जाणीवेने मिटतो. 'आणि संथ वाहतेय डॉन' चा समारोपाचा महान खंड हा थेट तसा एक ग्रंथ आहे. कॉन्स्टान्टिन फेदिन पुढे लिहितो, 'मी शोलोखोवच्या गद्यलेखनाच्या इतर ठळक गुणवत्तेचं वर्णन असं करीन. रशियन महाकाव्याच्या राष्ट्रीय परंपरेला ते जीवनदायी सातत्य देतं. त्याचा अर्थ असा नव्हे की आमच्या अभिजात लेखक पूर्वजांनी जे रस्ते व पायवाट मळवल्या त्यावरूनच आपल्याला चालायला पाहिजे. शोलोखोवने आपल्याला एका भावनात्मकतेने प्रतीत होणाऱ्या वस्तुस्थितीचे प्रत्यंतर देऊन ठेवले आहे आणि ते म्हणजे आपल्या काळाशी जडणाऱ्या लेखकाच्या सेंद्रीय एकात्मतेतून व नातेसंबंधातूनच कलेची प्रगती साध्य होते. आपण लेखनातील आशय ज्याला म्हणतो तो लेखक ज्या काळात जगत असतो, त्याबद्दलच्या त्याच्या ज्या कल्पना असतात, त्यांच्या संपूर्णतेपासून अविभक्त असतो. आपण जेव्हा शोलोखोवचा ग्रंथ हातात घेतो तेव्हा त्यातील धारणा, कल्पना आणि मानवी आकांक्षांसह आपण आपला स्वत:चा काळच हातात धरतो.'

डॉन संथ वहातच आहे! आणि डॉन परगण्यातील प्राचीन डॉन लोकगीते अजूनही कझाकांच्या ओठांवर टिकून आहेत. यापुढेही अनंतकाळ ती तशीच टिकून रहाणार आहेत.

प्र. श्री. नेरूरकर

१३ फुलराणी
साहित्य सहवास
वान्द्रे (पूर्व) मुंबई ४०००५१

नांगराच्या फाळाने
नाही जात नांगरली....
आमची पावन धरणी,
नांगरली जाते
घोड्यांच्या टापांनी...!
धरणीत ह्या पेरणी होते,
कझाकांच्या शिरांची...!
शांत डॉनच्या प्रवाहावर
तरुण विधवांची रूपकळा आहे...!
आमचा पिता शांत डॉन
अनाथ अर्भकांनी बहरला आहे...!
शांत डॉनवर लाटा उठतात
आईबापांच्या आसवांच्या !
शांत डॉनच्या नदा !
आमच्या बापा !
अरे, आमच्या डॉन नदा,
प्रवाहात एवढा गढूळलास ?
मामी शांत डॉनचा नद
गढूळल्याखेरीज राहावा कसा ?
खोलवर माझ्या अथांगतेत
शीतल झरे उचंबळताहेत
मी डॉनचा शांत नद...माझ्या आत...
शुभ्र मासळी उसळते आहे...!

१.

मेलीखोव शेतीवाडी त्या खेड्याच्या पार टोकाला होती. चखणीचे फाटक उत्तरेला डॉनच्या दिशेला होते. खडूळ, शेवाळलेल्या काठापर्यंत उभट पन्नास फुटांची डगर आणि खाली किनारा, पाण्यानें वाहून आणलेले शंखशिंपले, आदळ-णाऱ्या लाटांनी गुळगुळीत केलेले कंकर गोटे आणि पुढे खळखळता, मोरपंखी, वाऱ्याने उकळ्या फुटणारा-डॉनचा पृष्ठभाग. मळणीच्या खळ्याला घातलेल्या वळुंजीच्या कुंपणापलीकडे पूर्वेला हेटमनची हमसडक, कुठे कुठें पिकलेल्या पोलयन-इची झुडपे, घोड्याच्या टापांनी तुडवलेले जिवट करवंदी रंगाचे रानगवत, सडकेच्या फाट्यावरचे गिरिजाघर आणि पुढे मोकळे मैदान—विरळ धुक्यात गुरफटलेले. दक्षिणेला टेकड्यांची खडूळ रांग. पश्चिमेला रस्ता—चौक ओलांडून कुरणात धावलेला.

तुर्कस्थानबरोबर गेल्याच्या गेली लढाई झाली त्यावेळी प्रकीफी मेलीखोव त्या खेड्यात जो परत आला तो बायको घेऊन परत आला. डोक्यापासून पाया-पर्यंत ही बाई शालीत गुरफटलेली होती. आपले तोंड ती नेहमी झाकलेले ठेवायची. तिचे रासवट, व्याकुळ डोळे ती सहसा दृष्टीला पडू द्यायची नाही. तिच्या शालीला एक वेगळाच सुगंध यायचा. त्या शालीवरची इंद्रधनुष्याच्या छटांची नक्षी पाहून कझाक बायकांचा जळफळाट व्हायचा. धरून आणलेली ही तुर्की बाई प्रकोफीच्या गोतवळ्यापासून दूर रहायची. थोड्याच दिवसात म्हाताऱ्या मेलीखोवने पोराची वाटणी त्याला देऊन टाकली. जन्मभर पोराच्या दारात त्याने पाऊल टाकलें नाही. झालेली नाचक्की तो विसरू शकला नाही.

प्रकोफीने लागलीच आपली चूल वेगळी केली. सुतारांनी त्याला घर बांधून दिले. चरवणीला त्याने स्वतःच कुंपण घातले. पानगळतीच्या सुरुवातीला वाक-लेल्या परदेशी बायकोला घेऊन तो नवीन घराकडे निघाला. त्याचा संसार भरलेली गाडी पुढे चालली होती. तिला घेऊन हा खेड्यामधून चालला होता. लहाना-पासून मोठ्यापर्यंत सगळेजण रस्त्यावर लोटले होते. बाप्ये माणसांनी दाढी-मिशांच्या आड हसे आवरून धरले होते. बायका गलबला करून एकमेकींना

आपली मते सांगत होत्या. कळकट कज्जाक पोरांच्या झुंडी प्रकोफीच्या मागे टवाळीचे आवाज काढीत चालल्या होत्या. पण नुकत्याच नांगरलेल्या मातीतून चालावे तसा ओव्हरकोटची बटणे सोडलेला प्रकोफी धीमेपणाने टवाळीची पर्वा न करता चालत होता. आपल्या प्रचंड काळ्या पंज्यात बायकोचे नाजुक मनगट त्याने आवळून धरले होते.

ह्यानंतर तो खेड्यात क्वचितच नजरेस पडायचा. कज्जाकांच्या मेळाव्यातून त्याने कधीही भाग घेतला नाही. डॉनच्या काठी असलेल्या एकाकी घरात तो एकलकोंड्यासारखा रहायचा. गावात त्याच्याबद्दल नाही नाही त्या गप्पा उठत.कारण रस्त्याच्या पलीकडे वासरे चरवायला नेणाऱ्या पोरांनी उठवून दिले की, अगदी तातार मसणवटीच्या ढुव्यापर्यंत प्रकोफीने बायकोला उचलून नेल्याचे आपण पाहिले. ती कातरवेळ होती. शिखराबर युगान् युगे उन्हावाऱ्यात झिजून क्षते पडलेल्या खडकाला तिची पाठ टेकवून त्याने तिला बसती केली. तिच्या बाजूला आपण बसला. दोघांच्या नजरा मैदानापलीकडे कुठेतरी खिळल्या होत्या. झांजर काळोखात बुडेपर्यंत ते टक लावून बसले. मग घरी बनवलेल्या मेंढकातडी कोटात त्याने बायकोला गुरफटले आणि परत घरी उचलून आणले. ह्या चमत्कारिक वर्तनाचा खुलासा शोधण्यासाठी तर्ककुतर्क करण्यात गाववाले गढून गेले. बायकांच्या गप्पांना इतका ऊत आला की, एकमेकीच्या डोक्यातल्या उवा हुडकायला त्याना फुरसत होईना. प्रकोफीच्या बायकोबद्दल अफवांचे पेव फुटले. कुणी म्हणे तिची रूपकला भुलवणारी आहे. कुणी अगदी विरुद्ध सांगत. अखेरीस सगळा उलगडा झाला. ताजे आंबवण मागायचे निमित्त करून मावरा ही सैनिकाची बायको धावत पळत प्रकोफीच्या घरी आली. आंबवण आणायला प्रकोफी खाली बळदात गेला. एवढ्या वेळात मावराने हे पाहून घेतले की प्रकोफीचा हा तुर्की 'पराक्रम' काहीच्या बाहीच आहे !

थोड्याच वेळात मावरा परत आली. तिचा चेहरा उफलून आला होता. डोक्याचा रुमाल सरकला होता. तिच्या सांगण्याने गल्लीतल्या बायकांची करमणूक होत होती.

'अग बायानो, मेल्यानं तिच्यात पाहिलन तरी काय ? धड बाई तरी असावी का नाय ? मास तरी असावं पोटाबुडाला ? ध्यान मेलं ! धक्का दिला तर भुकनी व्हायची. डोळे तेवढे हेऽऽ असलाले ! काळेकंच ! सटवीच्या डोळ्यांची फडफड तेवढी बघून घ्या. देवा परमेश्वरा ! दिवस भरत आलेत तिचे. देवा शप्पत !'

‘ दिवस भरत आलेत ?’ बायका चकीत झाल्या.

‘ काय पोर समजलीस काय मला ? तीन पोरं झालीत मला–’

‘ चेहऱ्यामोहऱ्यानं कशी आहे ?–’

‘ चेहऱ्यानं पिवळी, डोळ्यात काही जीवच नाही. परक्या मुलखात जीव रमत नसेल. आणखी बरं का ग बायांनो, तिच्या नेसूला आहे– प्रकोफीची विजार–!’

‘काही तरीच काय ?’ सगळ्या बायकांनी एकदम श्वासच रोखून धरले.

‘ मी स्वतः पाह्यलंय. विजार नेसते विजार ! पट्टेरी नाही एवढंच ! त्याची रोजची नेसण्यातलीच विजार असणार. लांबच्या लांब कुडता आहे अंगावर. खाली मोज्यांत कोंबलेली विजार चक्क दिसते. ते पाहूनच मी सर्द झाले–’

गाव कुजबुजू लागले. प्रकोफीची बायको चेटकीण आहे. अस्ताखोवच्या सुनेने (अस्ताखोव कुटुंब खेड्याच्या टोकाला प्रकोफीच्या घराजवळच रहायचे) शपथेवर सांगितले की, ‘ त्रोइत्सीई ’ (ट्रिनिटी) च्या दुसऱ्याच दिवशी उजाडण्यापूर्वीच प्रकोफीची बायको अनवाणी, उघड्या केसाने, अस्ताखोवच्या गाईची धार काढत असलेली आपण पाहिली. तेव्हापासून त्या गाईचे आंचळ लहान पोराच्या मुठीएवढे आक्रसले, गाय आटली आणि थोड्याच दिवसात मेली. त्या वर्षी कधी नाही अशी गुरेढोरे पटापटा मेली. डॉनचा प्रवाह जिथे उथळ झाला होता त्या गोटयाळ काठावर गाई आणि खोडांची ताजी मढी रोज दिसू लागली, मग घोड्यांत लागण झाली. खेड्यांतील कुरणाऊ जमिनीत चरणारे कळप पाहता पाहता विरघळूनच गेले. खेड्याच्या गल्याबोळातून भयानक अफवा पसरली.

कझाकांची गावकी झाली आणि ते प्रकोफीकडे गेले. बाहेर येऊन घराच्या पायऱ्यांवर तो उभा राहिला. गावकीला पुढे झुकून त्याने आदर दाखवला–

‘ तुमच्यासाठी काय करू शकतो मायबापहो ?–’

चिडीचीप निःशब्द असलेला जमाव पायऱ्यांजवळ सरकला. सर्वात आधी किंचाळला तो एक झिंगलेला म्हातारा–

‘ खेच तुझ्या हडळीला इथं ! तिच्याकडं पहायचंच आम्हांला.’

प्रकोफी घरात जायला झपाट्यानं मागं वळला. पण वाटेतच त्यांनी त्याला धरला. लुशनाया म्हणून लोक चिडवीत त्या तोफेचा गोलंदाज असणाऱ्या आडदांड कझाकाने त्याचे डोके भिंतीवर आदळून त्याला सांगितले, ‘ तंडू नको ! बोंबलायचं कारण नाही. तुला कोणी हात लावीत नाही पण तुझी बायको पायाखाली तुडवायचीय आम्हाला. गुराचं दुर्भिक्ष्य होऊन गाव मरण्यापेक्षा तिचा

नायनाट केलेला बरा. पण तंडलास तर याद राख टाळकं भिंतीत चिणीन !'

'खेचा कुत्तरडीला अंगणात !' पायऱ्यावरून गर्जना आली. प्रकोफीच्याच रेजिमेन्टमध्ये असणाऱ्या त्याच्या दोस्ताने त्या तुर्की बाईचे केस पंजात गुंडाळले. तिच्या किंचाळणाऱ्या तोंडावर दुसरा हात दाबला. एका झपाट्यात तिला आवाडातून खेचली आणि जमावाच्या पायाखाली फेकून दिली. आवाजाच्या कल्लोळातून एक बारीक किंकाळी उठली. अर्ध्याडझन कझाकांना झुगारून देऊन प्रकोफी घरात घुसला. भिंतीवर लटकणारी तलवार त्याने खस्सदिशी काढली. एकमेकांना चेंगरत कझाकांनी घराबाहेर धूम ठोकली. तळपती तलवार डोक्या भोवती नाचवीत प्रकोफी धावत पायऱ्या उतरून आला. जमाव मागे हटला अंगणात पांगला.

लुशनाय पळायला जड होता. मळणीच्या खळ्याजवळ प्रकोफीने त्याला गाठला. मागच्या बाजूने डाव्या खांद्यावरून उभा आडवा घाव घालून त्याने त्या कझाकाचा देह पट्ट्यापर्यंत चिरफाळला. कुडाचे खुंट उपसणारा जमाव मागे हटला आणि मळणीच्या खळ्यातून बाहेरच्या मैदानात धावला.

अर्ध्या तासाने परत हिय्या करून कझाक प्रकोफीच्या शेताजवळ आले. सैंपाकघराच्या उंबऱ्यावर प्रकोफीची बायको रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिने चमत्कारिकपणे मान टाकली होती. वेदनेने ओठ पिळवटत होते. दाताखालून जीभ बाहेर पडली होती. प्रकोफीची मान डगडगत होती. दृष्टी शून्य झाली होती. टाहो फोडणारा मांसाचा गोळा अकाली जन्मलेले अर्भक—मेंढीच्या कातडीत तो गुंडाळीत होता.

त्याच दिवशी संध्याकाळी प्रकोफीची बायको मेली. त्याच्या म्हाताऱ्या आईला तान्हुल्याची कणव आली आणि त्याला तिने ताब्यात घेतले. कोंड्याचा दाट काला त्यांनी त्याच्या अंगाला चोपडला. घोडीचे दूध लावले. एक महिना लोटला. हे सावळे तुर्की तोंडवळ्याचे पोर जगेल ह्याची तें खात्री देऊ लागले. त्यांनी त्याला देवळात नेऊन त्याचे बारसे केले. त्यांनी त्याला त्याच्या आजोबांचे पंतीलेय् हे नाव ठेवले. सक्तमजुरी भोगून प्रकोफी बारा वर्षांनी परत आला. छाटलेली, तांबूस रंगाची—मधूनच पिकले केस चमकणारी दाढी, रशियन पेहराव ह्यामुळे तो कझाक वाटत नव्हता. आपल्या पोराला घेऊन तो परत शेतावर आला.

वाढत्या वयाचा पंतीलेय् सावळा आणि बेफाट होता. चणीने आणि तोंड-वळ्याने तो आईच्या वळणावर गेला होता. एका कझाक शेजाऱ्याच्या मुलीबरोबर प्रकोफीने त्याचे लग्न लावून टाकले.

तेव्हापासून कझाकात तुर्की नाकाचे रांगडे देखणेपण घेतलेले मेलीखोवचे कुटुंब त्या खेड्यांत आले. त्यांचे नांव 'तुर्क' असेच पडले.

बाप मेल्यावर पंतीलेयनं शेतीवाडी ताब्यात घेतली. घराची नव्याने शाकारणी करून घेतली. शेतीवाडीत एक एकर सामाईक जमिनीची भर टाकली, नवीन गोठे बांधले. पत्र्याचे छप्पर असलेले कोठार बांधले. पत्र्याच्या फुटकळ तुकड्यातून पत्रेवाल्याला सांगून 'वातकुक्कुटा' ची जोडी कापून तयार करून घेतली. कोठाराच्या छपरावर ही जोडी बसवल्यावर मेलीखोव शेतीवाडीला खुशालीच्या ढंगाची चमक आली. त्या वास्तूला एक संतुष्ट सुखवस्तु कळा आली.

वाढत्या वयाच्या ओझ्याखाली पंतीलेय प्रकोफीएविच् थकून जून झाला. त्याचे अंग सुटले. देहाला पोक आले. तरीही अजून म्हातारा दणकट दिसत होता. त्याच्या हाताला काठीण्य आले होते. चालताना तो लंगडायचा (तरुणपणात फौजेच्या शाही पाहणीच्या वेळी घोड्याच्या 'अडथळा' शर्यतीत त्याचा पाय मोडला होता) डाव्या कानात त्याने चांदीची कोर अडकविली होती. उतार वय झाले तरी त्याच्या दाढीकेसांची काळीभोर छटा कायम होती. संतापला की त्याचा स्वत:वर ताबा रहायचा नाही. त्याची तुंदिल बायको ह्याचमुळे अकाली म्हातारी झाली होती. एकेकाळी सुंदर असलेले तिचे मुख आता निव्वळ सुरकुत्यांचे जळमट झाले होते.

प्योत्र हा त्याचा लग्न झालेला मोठा मुलगा. ठोसर बांध्याचा, गव्हाळी रंगाचे दाट केस असलेला, निळ्या डोळ्यांचा प्योत्र आईच्या वळणावर गेला होता, पण धाकटा ग्रिगरी बापासारखा होता. प्योत्रपेक्षा अर्धाबोट उंच असलेला ग्रिगरी त्याच्यापेक्षा सुमारे सहा वर्षांनी लहान होता. बापासारखेच त्याचे नाक वर उचललेले, अणकुचीदार होते. त्याच्या धगधगीत डोळ्यांच्या कवड्यांना चिंचोळ्या गर्तेतून निळसर झाक मारीत असलेली दिसायची. उंचावलेल्या गालफडांच्या हाडांवर पिंगट तांबूस चामडी ताणून बसली होती. बापासारखाच ग्रिगरी किंचित पोक काढून चालायचा. त्याच्या स्मितातसुद्धा तोच रासवट ढंग होता. सडसडीत बांध्याची मोठ्या डोळ्यांची दुन्या बापाची लाडकी लेक होती. शिवाय प्योत्रची बायको दार्या–तिचं लहान पोर–एवढे मिळून मेलीखोवचे कुटुंब झाले होते.

२.

पहाटेच्या रात्री आभाळांत कुठे कुठे चांदण्या रेंगाळल्या होत्या. झगाराखालून वारे सुटले होते. डॉनच्या खूप वर धुके तरंगत होते. खडूळ टेकड्याच्या उतरणींला त्याचे ढीग जमले होते. डांगेतून एकाद्या करड्या सर्प–कबंधासारखे ते सरपटत होते. नदीचे डावे तीर, वाळू, खाचर, कळकीची दलदल, दहिवरात भिजलेली झाडे, त्या सर्वांवर उषःकालच्या शिरशिरत्या आनंदप्रभेची झळाळ आली होती. सूर्य क्षितिजाखाली धुमसत होता. पण वर येत नव्हता.

मेलीखोवच्या घरात पहिली जाग आली ती पंतीलेय् प्रकोफीएविचला.

कशिदा काढलेल्या सदऱ्याच्या कॉलरीची बटणे लावीत तो पायऱ्या उतरून खाली आला. गवताळ आवाडात दवाची चांदी पसरली होती. त्याने गुरे रस्त्यावर सोडली. चुणीदार झगा घालून दायी तेथून धाटा काढायला धावली. तिच्या उघड्या गोऱ्या पोटऱ्यांवर दवाची शिंपण झाली. तिच्या पावलांचे धूसर सपाट ठसे अंगणात गवतातून उमटत गेले. दायीच्या पावलांखाली दबलेले गवत पुन्हा उभारी घेत असलेले बघत पंतीलेय प्रकोफीएविच् थोडा वेळ उभा राहिला. नंतर वळून तो आपल्या चाफेखणीत आला.

पुढच्या दारी बहरलेल्या चेरी वृक्षाच्या कोमेजलेल्या गुलाबी पाकळ्या सताड उघड्या खिडकीच्या ओटयावर पडल्या होत्या. ग्रिगरी पालथा झोपला होता. एक हात त्यानं बाजूला टाकला होता.

‘ग्रिगरी, मासळी धरायला येतोस ! –’

‘काय ?’ ग्रिगरी पुटपुटला. आपले पाय त्याने खाटेखाली सोडले.

‘बाहेर चल. उजाडेपर्यंत मासळी धर–’

मोठाले सुस्कारे टाकीत ग्रिगरीनं रोजची विजार खुंटीवरून खाली ओढली. पायातून ती खेचून घेतली. पांढऱ्या लोकरी मोज्यात पाय घातले. संथपणे पायताण चढवले त्याची झिजलेली टाच नीट केली.

‘पण आईनं गळाला शिजवलाय का ?’ बापाच्या पाठोपाठ अंगणात जात त्याने खर्जात विचारले–

'होय. तू होडीवर जा. मी एका मिनिटात आलो.'

दर्प मारणारे उकडलेले राय म्हतान्याने खुजात ओतले. खाली पडलेलं दाणे काळजीपूर्वक हातात गोळा केले आणि लंगडत लंगडत तो बांधावर आला. त्या होडीत वाकून बसलेला आपला पोरगा त्याला दिसला.

'कुठं जायचं आपण ?'

'काळ्या तीराकडे. त्या दिवशी आपण बसलो होतो त्या ओंडक्यापाशी शोधू या—'

होडीचं पट्टण जमीन खरवडत तीरापासून सुटे झाले आणि पाण्यावर टेकले. प्रवाहात होडी वहायला लागली. धार होडी हेलकावू लागली. तिचा मोहरा वळवू लागली. वल्ह्याने ग्रिगरी होडी वळवत होता. पण वल्ली मारीत नव्हता.

'वल्हं का मारीत नाहीस ?'

'आधी खालच्या धारेपर्यंत जाऊ या—'

प्रवाहाच्या मध्यभागी असणारी होडी झपाट्याचा धारसा ओलांडून डाव्या किनाऱ्याकडे जाऊ लागली. खेड्यातील कोंबड्यांची बांग प्रवाहापलीकडून त्यांच्या मागे घुमली. नदीच्या वर उगवलेल्या काळ्या खडकाळ बांधाला घासत होडी खालच्या खाजणात सरकली. बांधापासून सुमारे चाळीस फुटांवर पाण्यात बुडालेल्या एमवृक्षाच्या वाकलेल्या फांद्या पाण्याबाहेर डोकावत होत्या. त्यांच्या भोवती फेसांचा भोवरा तयार होऊन त्याचे टहाळे गरगरा फिरत होते.

'पांगड उलगड तोपर्यंत मी गळाळ फेकतो' पंतलीय् कुजबुजला. खुजाच्या काफाळणाऱ्या तोंडात त्याने हात खुपसला. चोरट्या आवाजात 'श्श् श्श्' करावे तसा शुत्कार पाण्यावर पसरणाऱ्या रायचा झाला. टरारलेले धान्य ग्रिगरीने आकडीवर गोवले आणि स्मित केले.

'माशा माशा गळाला ये, लहान माशा ये, मोठ्या माशा ये—'

पांगड नागमोडी वळणाने पाण्यावर पडला. त्याला खेच बसली. परत तो ढिला झाला. टांगूलाच्या टोकावर ग्रिगरीने पाय ठेवला आणि सावधपणे तो ठोस्तान शोधू लागला.

'आज नशीब हात देईलसं दिसत नाही, बाबा. चांद फिका व्हायला लागलाय.'

'आगपेटी आणल्येस बरोबर ?'

'हा हा !'

'शिलगवायला दे—'

म्हातारा सिगरेट ओढू लागला. एमच्या झाडापल्याड खोड्यात सूर्याकडं त्याने दृष्टी टाकली.

'कार्प ! तो कुठं गळाला लागेल सांगवत नाही. कधी कधी चांद मावळा-यच्या वेळेलाही तो जाळ्यात फसतो–'

'आमळचा गळाला झटतायतसं वाटतं' ग्रिगरीने उसासा टाकला.

होडींच्या दोन्ही अंगावर जळ खळखळून थापटत होतं. एवढ्यात तांब्याच्या मुशीतून ओतल्यासारख्या वाटणाऱ्या चार फुटी तांबूस कार्पने चीत्कारून वर उसळी घेतली. आपल्या रुंद बाकदार शेपटीने त्याने पाणी झिजाडले. सबंध होडीभर फवाऱ्याचा झल्लर उधळला गेला.

'थांब आता.' पंतेलीयने आपली भिजलेली दाढी बाहीने पुसली.

बुडालेल्या झाडाजवळ फांदारलेल्या नागव्या डहाळ्यातून दोन कार्प माशांनी एकाच वेळी उसळ्या घेतल्या. तिसऱ्या लहान कार्प माशाने हवेतच तडफड केली आणि मग जिद्दीने तो काठाजवळ ताडकन् पाण्यात आदळला.

सिगरेटचे ओले टोक ग्रिगरी आधीरपणे चावत चघळत होता. धुकट सूर्य अर्धा वर आला होता. उरले सुरले गळाचे धान्य पंतेलीयने विखरून टाकले. नाराजीने ओठाचा चंबू करून गळाच्या स्तब्ध टांगूलाकडे तो बावळटासारखी टक लावून बसला.

सिगरेटचे थोटूक ग्रिगरीने थुंकून टाकले. झपाट्याने उडत जाणाऱ्या त्या थोटकाकडे तो रागाने बघत होता. एवढ्या पहाटे आपल्याला उठवल्याबद्दल मनातून तो बापाला शिव्या देत होता. अनोशापोटी सिगरेट ओढल्याने केसाचे खुंट जळावेत तशी धुरकट घाण त्याच्या तोंडाला येत होती. खाली ओठंगून ओंजळीत पाणी भरून घेण्याच्या बेतात तो होता. एवढ्यात टांगलाला नाजूक हिसका बसला आणि ते आत बुडू लागले.

'घे त्याची फिरकी' म्हाताऱ्याने ऊसासा टाकला. ग्रिगरीने उडी मारली आणि टांगूल पकडले पण त्याच्या हातापासून दांडा वाकून त्याची कमान झाली. आणि त्याचे टोक डुबकन पाण्यात बुडाले.

'धर त्याला' होडी काठापासून बाजूला दामटीत पंतेलीय् गुरगुरला.

ग्रिगरीने टांगूल उचलण्याची कोशीश केली पण तो मासा भलताच ताकदीचा होता. तो दणकट दोरखंड करकरत तुटला. ग्रिगरी भेलकांडला आणि जवळ जवळ आपटला.

'खोंडासारखा ताकदीचा आहे.' त्याचा बाप कुजबुजला. ताज्या गळात

आंकडी टुपण्याची तो कोशीश करू लागला पण ती हुकू लागली. हंसायची उबल येऊन ग्रिगरीने नवीन पांगड टांगलाला लावून गळ फेकला. त्याला लावलेले शिसे तळाला टेकलं न टेकलं एवढयात परत टांगूल वाकले.

'तोच तो सैतान' मधल्या धारव्याच्या दिशेने धावू पाहणाऱ्या माशाला मुष्किलीने खेचत ग्रिगरी गुरगुरला. घुमवत्या आवाजाने पांगडाने पाणी कापले. आणि आपल्या मागे उतरते हिरवट तकट उभारले. पंतलीय् आपल्या थोराड बोटानी धमतडीची मूठ रापू लागला.

'त्याला पांगड तोडू देऊ नको–'

'फिकीर करू नको–'

एक प्रचंड लाल आणि पिवळा कार्प पृष्ठभागावर उंचावला. थापटचा मारीत त्याने पाण्याला फेस आणला आणि परत तळाला सूर मारला.

'माझं बखोटं उपटून राहिलाय ! नको नको तू येऊ नको–'

'धरून ठेव ग्रिशा–'

'मी त्याला धरून ठेवलाय.'

'त्याला होडीखाली जाऊ देऊ नको.'

छातीत दम भरीत ग्रिगरीने तो थकित कार्प होडीकडे खेचला. म्हाताऱ्याने धमतड खस्कन पुढे आणले, पण उरले सुरले बळ एकवटून कार्पने तळाशी परत बुडी मारली.

'त्याचं डोकं वर घे ! थोडं वारं गिळू दे त्याला म्हणजे मग येईल वठणीवर.'

दमणूक झालेल्या त्या माशाला ग्रिगरीने परत होडीकडे खेचला. होडीच्या पुढच्या खडबडीत भागाला नाक टेकून 'आ' वासून तो तरंगत होता. त्याचे नारिंगी सोनेरी खवले थरथरत होते.

'संपला तो' धमतडीत तो मासा उचलीत पंतेलीय गुरगुरला.

आणखी अर्धातास ते बसून राहिले. कार्पच्या उसळचा थांबल्या होत्या.

'पांगड गुंडाळून घे. आजची शिकार झाली' अखेर म्हातारा म्हणाला.

ग्रिगरीने होडी काठापासून बाजूला दाबली. वल्हे मारीत असताना त्याने बापाच्या तोंडाकडे पाहून ताडले की त्याला काहीतरी बोलायचंय. पण टेकडीखाली विखुरलेल्या गावातील घरांकडे टक लावून पंतेलीय गुळणी धरून बसला होता.

'हे बघ ग्रिगरी–' पायाखालच्या पोत्याची गाठ ओढीत त्याने मोघमपणे विषयाला हात घातला.

‘ माझ्या लक्षात आलंय की तू आणि आक्सीनिया आस्ताखोवा-’

ग्रिगरीचे तोंड लालबुंद झाले. त्याने मोहरा फिरवला. त्याच्या सदऱ्याची गळपट्टी त्याच्या त्याच्या पुष्ट रापलेल्या गर्दनीत घुसून कातडीची सफेद वळी बाहेर उतरली होती.

‘ जपून ऐस पोरा ’ म्हातारा आता खरमरीत आणि आणि रागाने बोलू लागला ‘ नाहीतर तुझ्याशी वेगळ्या भाषेत बोलायला लागेल मला. स्तिपान आपला शेजारी आहे. त्याच्या बायकोबरोबर राडा केलेला चालणार नाही मला. त्यातनं लचांड निघेल. मी आधीच तुला बजावंतोय. परत तुला ह्यात पाहिला तर चामडी लोळवीन तुझी.’

पंतीलेयने आपली गाठचाळ मूठ आवळली आणि आकुंचित नजरेने आपल्या पोराचा गोरामोरा होणारा चेहरा न्याहाळला.

‘ हा सगळा खोटारडेपणा आहे ’ ग्रिगरी पुटपुटला आणि आपल्या बापाच्या नाकाच्या निळसर दांडेरीकडे त्याने थेट नजर लावली.

‘ चूप–’

‘ लोकांना बोलायला काय–’

‘ जीभ आवर रांडिच्या.’

ग्रिगरी वल्ह्यावर रेलला. होडीने पुढे उसळी घेतली. खळखळत्या पाण्याचे लहान लहान तरंग होडीच्या वरामीपासून नाचत दूर जात होते. मग ते गप्प झाले. काठाजवळ ते यायला लागले तशी त्याच्या बापाने आठवण करून दिली.

‘ मी काय म्हटलं ते ध्यानात असू दे. नाहीतर रात्रीचं तुझं बाहेर जाणंच बंद करून टाकतो. आवाडाबाहेर पाय टाकू देणार नाही. ’

ग्रिगरीनें उत्तर दिले नाही. होडी तटेला लावल्यावर त्याने विचारले–

‘ बायांना हा मासा देऊ का ?’

‘ जा आणि विक ’ म्हतारा जरा मवाळपणे म्हणाला–

‘ तुझ्या तंबाखूला पैसा होईल.’

ओठ चावीत ग्रिगरी बापामागोमाग गेला.

‘ पहाच बाबा ! माझ्या पायात खोडा घातलाय तरी आज रात्री आपण बाहेर जाणार ’ मनांतल्या मनात तो म्हणाला. त्याची नजर म्हताऱ्याच्या खोपडीत तीक्ष्णपणे घुसत होती.

घरी आल्यावर ग्रिगरीने माशाच्या अंगावरची रेती नीट धुऊन काढली आणि त्याच्या नाकाडातून टहाळ खुपसून ठेवले.

वाडीच्या फाटकापाशी त्याला त्याचा जुना दोस्त मित्का कोर्शुनोव्ह भेटला. चांदीच्या चमक्या बसवलेल्या आपल्या पट्ट्याच्या टोकाशी चाळा करीत मित्का टेल्याटिकोव्या करीत चालला होता. त्याचे वाटोळे पिवळट डोळे निमुळत्या खोबण्यातून उर्मटपणे चमकत होते. मित्काच्या भावल्या मांजरासारख्या मोठ्या होत्या. त्यामुळे त्याची नजर चंचल आणि फसवी वाटायची.

'मासा घेऊन कुठं निघालास ?'

'आज आम्ही हा धरला. मी तो विकायला निघालोय–'

'मोखोवला ?'

'तिकडंच.'

माशाचं वजन मित्कानं नजरेनंच तोललं.

'पंधरा पौंड ?'

'साडे पंधरा !' काट्यावर आम्ही वजन केलं.

'मला घे बरोबर. मी सौदा पटवतो.'

'चल.'

'मला काय देणार ?'

'घाबरू नको. त्यावर आपला बखेडा नाही होत–'

गिरजाघरातील प्रार्थना संपली होती आणि गावकऱ्यांची रस्त्यावर गर्दी होऊ लागली होती. तीन शामील बंधू एका ओळीत पुटून टांगा टाकीत आले. सगळ्यात मोठा, थोटा अलेक्सी मधोमध होता. लांब लष्करी फर्गोलाच्या आवळ गळपट्टीने त्याची पुष्ट गर्दन ताठ झाली होती. त्याची पातळ टोकदार लहानशी दाढी खिजवल्यासारखी दोन्ही बाजूंना फिस्कारली होती. त्याच्या डाव्या डोळ्याची विकलतेनं उघडझाप व्हायची. खूप वर्षांपूर्वी चांदमारीवर त्याची बंदूक त्याच्या हातावर उडाली होती आणि उडालेल्या लोखंडाचा तुकडा त्याच्या गालफडात घुसला होता. आता त्याच्या डाव्या डोळ्याची वारंवार फडफड व्हायची. एक निळा व्रण त्याच्या गालापासून निघून बुरणुसासारख्या त्याच्या केसात लुप्त झाला होता. कोपरापासून त्याचा डावा हात तोडला गेला होता. पण एका हातानं सिगरेट वळण्यात अलेक्सी अट्टल होता. आपल्या छातीशी तो चंची दाबून धरायचा. नेमका हवा तेवढा कागद दाताने फाडायचा. त्याची सुरनळी करायचा, दाताळ्यानं तंबाखू गोळा करायचा. सिगरेटची गुंडाळी करायचा आणि तो काय करतोय ते तुमच्या लक्षात यायच्या आत सिगारेट चघळत आणि डोळा मिचकावीत तो तुमच्यापाशी शिलगवायला मागायचा.

तो जरी थोटा होता तरी गावात त्याच्या सारखा जंगबहादुर कुणी नव्हता त्याच्या मुठीचा (उपमा देतात) तसा कटोरा नव्हता, पण एकदा नांगरणी करीत असताना तो खोंडावर चिडला. हाताशी चाबूक नव्हता म्हणून त्याने त्या खोंडाला ऐसा ठोसा हाणला की, नांगरणीच्या पलीकडे ते खोंड होलपडत गेले त्याच्या कानातून रक्ताची धार लागली. त्यातून काही ते सावरलं नाही. दुसरे दोघे भाऊ मातिन आणि प्रखोर ह्यांचे अलेक्सीशी तीळन् तीळ साम्य होते याच्या सारखे तेही दणकट होते. मात्र दोघाना दोन्हीही हात होते.

ग्रिगरीने शामील बंधूना सलाम केला. पण मित्का मान गर्रकन बाजूला फिरवून तसाच पुढे गेला. व्रतमास सुरू होण्याआधी झालेल्या मुष्टियुद्धाच्या दंगलीत अलेक्सी शामीलने मित्काच्या जवान दातांबद्दल दयामाया दाखवली नव्हती. मित्काला त्याने एक ऐसा तडाखा लगावला होता की पोलादी टाचां-खाली तुडवून विदीर्ण झालेल्या त्या पारव्या बर्फात आपले दोन उत्तम दांत त्याला थुंकून टाकावे लागले होते.

तो त्यांच्याजवळ आला तेव्हा अलेक्सीनं पांच वेळा डोळ्यांची उघडझाप केली.

'पाटी विकतो काय ?'

'घ्यायचीं का विकत ?'

'काय भाव लावला ?'

'बैलाची जोडी न् वर एक बायको.'

डोळे आकुंचित करीत अलेक्सीने हाताच्या बुडुखाला झटका दिला.

'ए यडपट ! हा : हा : हा : ! वर बायको काय ? औलाद नको का ?'

'पोसायला राहू दे तुला. नाहीतर शामीलाचं घराणं बुडायचं' ग्रिगरी हसला.

चौकांत गावकरी गिरिजाघराच्या पोडळाभोवती गोळा झाले होते. गिरिजा-घराच्या रखवालदाराने एक कादंब डोक्याच्या वर उंच धरला होता. आणि तो ओरडत होता. 'पन्नास कोपेक्सला चालला ! कोणाला बोलायचंय ?' मान उंच करून तो कादंब आजूबाजूला टकाटका बघत होता. त्याचे गुंजेसारखे डोळे तिरस्काराने, तिरप्या नजरेने पाहत होते.

लोकांच्या एका कड्याच्या मधोमध करड्या केसांचा एक म्हातारा हातवारे करीत उभा होता. क्रूस आणि पदकांनी त्याचे छाताड झाकले होते.

'म्हतारा ग्रिश्का तुर्की युद्धाबद्दल आपली एक गोष्ट सांगतोय्' त्या कड्याकडे मानेने खूण करीत मित्का म्हणाला–

'चल ऐकू या–'

'त्याची गोष्ट ऐकता ऐकता कार्प कुजून फुगायला लागेल–'

'फुगला तर वजनात जास्त भरेल–'

बंबखान्याच्या पलीकडच्या चौकात मोखोवच्या घराचे हिरवे छप्पर उंचावले होते. पडघरावरून जाताना ग्रिगरी थुंकला आणि त्याने आपले नाक दाबून धरले. एका पिंपाच्या मागून एक म्हातारा विजारीची बटणं लावीत आणि दातात आपला पट्टा धरून बाहेर आला.

'घाईची लागली होती?' मितकाने खोटेपणे विचारले. आपले शेवटचे बटण लावून म्हाताऱ्याने तोंडातला पट्टा काढून घेतला.

'तुला काय करायचंय?'

'त्यात तुझं नाक खुपसलं पाहिजे. नाहीं तर तुझी दाढी–! म्हणजे हप्ता गेला तरी तुझ्या म्हातारीला धुऊन काढता यायचं नाही.'

'तुलाच त्यात खुपसतो' म्हातारा चिडून म्हणाला, उन्हाच्या तिरपेत मित्काने आपले मांजरी डोळे आकुंचित केले.

'चिडायला काय झालं?'

'चालायला लाग रांडिच्या. माझी का छेड काढतोय्स? माझ्या पट्ट्याची चव पहायचीच?'

शांतपणे हसत ग्रिगरी पायऱ्यांजवळ आला. कठड्यावर द्राक्षाची भरगच्च वेलपत्ती पसरली होती. आळसावलेल्या सावल्यांची जाळी पायऱ्यांवर पसरली होती.

'काही माणसं कशी राहतात बघ मित्का?'

'दाराच्या मुठीला सुद्धा सोनं लावलंय.'

व्हरांड्याचे दार उघडीत मित्काने जोराने हुंगल्यासारखे केले.

'ते म्हातारं इथपर्यंत आलं होतं म्हणजे बघ.'

'कोण आहे?' दाराच्या पलीकडून कुणीतरी विचारलं. प्रथम ग्रिगरीने चाचरत आत पाऊल टाकले. रंगवलेल्या लाकडी जमिनीवरून कार्पची शेपटी फटफटत आली.

'कोण हवंय तुम्हाला?'

'एक मुलगी वेताच्या झुलत्या खुर्चीवर बसली होती. तिच्या हातात

इष्टापुरीची बशी होती. एक इष्टापुरी तिने ओठांत आवळून धरली होती. त्या गुलाबी बदामी आकाराच्या परिपूर्ण, ओठांकडे ग्रिगरीने नि:शब्द नजर खिळवली होती. मान कलती करून त्या मुलीने त्या पोराना खालपासून वरपर्यंत न्याहाळले. मित्का ग्रिगरीच्या मदतीला आला. तो खोकला–

'काही मासळी विकत घ्यायच्येय ?'

'मासळी ? मी जाऊन विचारते.'

झोका घेऊन तिनं खुर्ची ताठ केली. तिने उठून पायात आपले भरजरी पैजार घातले आणि ती आत गेली. तिच्या शुभ्र वेषांतून उन्हाची झळाळी उतरली होती. तिच्या पुष्ट पोटऱ्यांची अस्पष्ट रेषाकृती आणि आतल्या परकराची घोळदार फीत मित्काच्या नजरेला पडली. तिच्या उघडचा पोटऱ्यांचे मखमली गोरेपण पाहून तो चकित झाला. फक्त तिच्या लहानशा गोल टाचाभोवतालची कातडी दुधी पिवळट होती.

'बघून घे ग्रिशा. काय पोशाख आहे ! काच जशी काही ! आतलं सगळं पाहून घ्या.' ग्रिगरीला ढोसत तो म्हणाला. पडवीकडे येणाऱ्या दरवाजातून ती मुलगी परत आली आणि हळूच खुर्चीवर बसली.

'सैंपाकघरात जा.'

चवडचावर चालत ग्रिगरी घरात गेला. तो गेल्यानंतर मित्का तिथेच एक पाय मागे टाकून उभा राहिला. त्या मुलीचे केस दोन सोनेरी अर्धगोलात विभागणाऱ्या भांगाच्या शुभ्र रेषेकडे बघत तो डोळे मिचकावत होता. खोडकर चंचल नजरेनं ती त्याला न्याहाळीत होती.

'तुम्ही गावातलेच का ?'

'होय.'

'तुम्ही कुणाचे चिरंजीव ?'

'कोर्शुनोव्हचे.'

'तुमचं नाव काय ?'

'मित्री.'

आपल्या गुलाबी नखाची तिने लक्षपूर्वक पाहणी केली आणि चटकन् पाय वर घेतले.

'तुमच्यापैकी कुणी मासळी धरली ?'

'माझ्या दोस्तानं–ग्रिगरीनं.'

'तुम्हीही मासे धरता ?'

'लहर लागली तर धरतो.'

'आकडी आणि पांगड घेऊन ?'

'होय !'

'मला कधीतरी मासे धरायला जायचंय.' थोडा वेळ थांबून ती म्हणाली.

'ठीक. तुमची इच्छा असेल तर मी घेऊन जाईन तुम्हाला.'

'खर्‌ऽच ? कसं जमवायचं आपण ?'

'तुम्हाला खूप लौकर उठावं लागेल.'

'मी उठेन. फक्त तुम्ही मला उठवायला हवं.'

'मी उठवीन. पण तुमचे बाबा ?'

'बाबांचं काय ?'

मित्का हसला. 'ते मला चोर समजून माझ्या अंगावर कुत्री सोडतील.'

'हॅट् ! मी कोपऱ्यातल्या खोलीत एकटी झोपते. ती पहा खिडकी.' तिने खिडकीकडे बोट करून दाखविले.

'माझ्याकडं आलात तर खिडकीवर टक्‌टक् करा म्हणजे मी जागी होईन.'

ग्रिगरीचा भेदरट आणि सैपाक्याचा जाड तुपकट आवाज सैपाकघरातून मधून मधून येत होता. पट्ट्यातील काळ्या पडलेल्या चांदीवर बोटाची चाळवाचाळव करीत मित्का गप्प होता.

'तुमचं लग्न झालंय ?' हसू दाबीत तिनं विचारलं.

'का ?'

'काही नाही. सहज विचारलं.'

'नाही झालं. मी एकटाच आहे.'

मित्का एकदम लाजला. नखरेलपणे हसत आणि जमिनीवर पसरलेल्या इष्टापुरीच्या डहाळीशी खेळत तिने विचारलं.

'तुम्हाला मुली आवडतात का हो मित्का ?'

'काही आवडतात. काही नाही आवडत--'

'खरंच...? तुमचे डोळे मांजरासारखे का हो आहेत ?'

'मांजरासारखे ?' मित्का आता पुरता खजील होऊन गेला होता.

'हो हो. अगदी अगदी मांजराचेच डोळे आहेत.'

'माझ्या आईपासून मी घेतले असतील. माझा काय इलाज ?'

'तुम्ही लग्न का करून टाकीत नाही, मित्का ?'

आपल्या क्षणैक गोंधळातून मित्का भानावर आला.

तिच्या शब्दात दडलेला कुत्सितपणा जाणवल्यावर त्याने आपल्या पिवळट डोळ्यात चमक आणली.

'कोंबडी सापडायच्याआधी कोंबडा वाढायला हवा–'

चकित होऊन तिने आपल्या भुवया उंचावल्या, तिच्या तोंडावर लाली पसरली आणि ती खुर्चीतून उठली. रस्त्यावरून पायऱ्या चढणाऱ्या पावलांचा आवाज आला. तिचे चंचल हास्य खाजखुजलीसारखे मित्काला झोंबले

कमावलेल्या कातड्याच्या प्रशस्त बुटात हलक्या फरफटल्या चालीने घराचा धनी सेर्गेइ प्लोतोनोविच मोखोव यानी आपला ढीस देह मित्कापुढून प्रतिष्ठेने सावरीत नेला.

'माझ्याकडं काम आहे ?' मान न वळवता जाता जाता त्यानी विचारलं,

'त्यानी काही मासळी आणलीय पपा–'

ग्रिगरी बाहेर आला. त्याच्याजवळ कार्प नव्हता.

३.

संध्याकाळी बाहेर पडलेला ग्रिगरी परतला तेव्हा पहिल्या कोंबड्याने बांग दिली होती. आवाडातून आंबूस 'हॉप्स' चा सुवास आणि 'स्टिच्वोर्ट' चा उग्र गंध दरवळला होता.

चवड्यांवर चालत तो खोलीत गेला. कपडे काढले. सणासुदीला घालायची विजार नीट अडकवून ठेवली. अंगावर क्रूसाची खूण केली आणि तो बिछान्यावर पडला. जमिनीवर चांदण्याचे सोनेरी तळे झाले होते. खिडकीच्या चौकटीच्या सावल्या त्यात उभ्या आडव्या पडल्या होत्या. कोपऱ्यात भरतकाम केलेल्या रुमालांच्याखाली देवपुतळ्यांची चांदी मंदपणे चमकत होती. खाटेच्या डोक्यावर असलेल्या फळीवरून चाळवलेल्या माश्यांची भुणभुण ऐकू येत होती.

त्याला झोप लागली असती. पण सायवानात त्याच्या भावाचे पोर रडायला लागले. गाडीच्या वंगण न दिलेल्या चाकासारखा पाळणा करकरू लागला. त्याच्या भावजईचा– दार्याचा– पेंगुळलेला आवाज त्याच्या कानावर पडला, 'झोप न,

कारट्या ! घटकेची उसंत देऊ नकोस !' आणि ती पोराला हलकेच जोजावू लागली.

तू कुठ्ठं गेला होतास ?

मी घोडी पाहत होतो.

काय काय पाह्यलंस ?

जिनाचं घोडं पाह्यलं

जीन होतं सोन्याचं.

धिम्या लयीतील सुखद करकर कानावर पडून पेंगता पेंगता ग्रिगरीला आठवलं : उद्या प्योत्र शिबिराला जायला निघतोय. दार्या पोराबरोबर घरी राहणार. त्याच्या मदतीशिवाय आपल्याला गवतकापणी केली पाहिजे.

गरम उशीत त्याने डोके खुपसले. पण ते सूर त्याच्या कानात अखंडपणे ठिबकत राहिले.

तुझं घोडं कुठं आहे ?

घोडं माझं फाटका-बाहेर-

आणि फाटक कुठं आहे ?

पुरामधे वाहून गेलं.

खणखणीत खिकाळण्याने तो एकदम जागा झाला. त्याच्या ध्वनीवरून त्याने तो प्योत्रचा फौजी घोडा असल्याचे ओळखले. झोपेने शिथिल झालेली त्याची बोटे सुस्तपणे खमिसची बटणे लावू लागली. दर्याच्या गाण्याच्या झुळझुळत्या लयीत त्याचा परत डोळा लागला गेला.

आणि कादंब कुठं आहेत ?

कादंब गेले वेळूच्या बनात.

वेळूचं बन कुठं आहे ?

पोरींनी ते कापून टाकलं.

आणि पोरी कुठं आहेत ?

पोरी गेल्या सासरला.

आणि कझाक कुठं आहेत ?

कझाक गेले लढायला !

डोळे चोळीत ग्रिगरी तबेल्यापर्यंत जाऊन पोचला आणि प्योत्रच्या घोड्याचा लगाम धरून त्याने त्याला रस्त्यावर आणला. एक तरंगते कोळिष्टक त्याच्या चेहऱ्यावर झुरमुळले आणि त्याची पेंग खाडकन् उतरली.

चांदण्याचा अक्षुण्ण चुणीदार पट्टा डॉनवर तिरकस पडला होता. नदीच्या पात्रावर धुके तरंगत होते. आणि त्याच्याही वर धान्याचे दाणे विखरून टाकल्यासारख्या चांदण्या दिसत होत्या. घोडा आपले खूर जपून टाकीत होता. पाण्याकडे गेलेला उतार मुष्कीलीचा होता. नदीच्या परतीरावरून बदकांचा कलकलाट ऐकू येत होता. तीराजवळच्या गाळाच्या उथळ पाण्यातून सापडेल त्या लहान मासळीची शिकार करणाऱ्या एका डाचाळ सोम माशाने पाण्याचा फवारा उडवीत उसळी मारली.

ग्रिगरी बराच वेळ नदीच्या काठी उभा होता. काठावरून दमट कुबट घाण मारत होती. घोड्याच्या ओठावरून पाण्याचा चिमुकला थेंब पडला. ग्रिगरीच्या अंत:करणात एक हल्लक सुखद पोकळी निर्माण झाली होती. त्याला छान आणि विचारातून मुक्त झाल्यासारखे वाटत होते. परत जाताना त्याने पूर्वेकडे नजर टाकली. तिथली निळसर काळोखी निवळूही लागली होती.

तबेल्याजवळ त्याला आई भेटली.

'ग्रिशा, तू काय रे ?'

'मग कोण वाटलं तुला ?'

'घोड्याला पाणी दिलंस ?'

'होय' त्याने तुटक उत्तर दिलं.'

ओटीभर शेण्यांचे सरपण घेतलेली त्याची आई डुलत डुलत तिथून गेली. तिची अनवाणी वाळकुंडी पावले जमिनीवर चपचपत होती.

'जा आणि आस्ताखोव्ना जागं कर. स्तिपान म्हणालाय् की तो आपल्या प्योत्रबरोबर जाणार म्हणून.'

पहाटेच्या शिरशिरीनं ग्रिगरीच्या अंगातून एका स्प्रिंगची ताठरलेली थरथर सुरू झाली. त्याच्या सर्वांगाला झिणझिण्या आल्या. आस्ताखोवच्या घराच्या पावलाणाच्या तीन कुरकुरत्या पायऱ्या तो धावत चढून गेला. दाराला कडी घातलेली नव्हती. सायवानात पसरलेल्या रगावर स्तिपान झोपला होता. त्याच्या बायकोचे मस्तक त्याच्या दंडावर बिसावले होते. पहाटेच्या झुंजुमुंजु प्रकाशात ग्रिगरीने पाहिलें की आक्सीनियाचा खमीस गुडघ्याच्या वर गोळा झाला होता आणि नि:संकोच फाकलेले तिचे पाय बर्च वृक्षाच्या सालीसारखे गोरेपान होते. क्षणभर तो टक लावून उभा राहिला. आपल्या तोंडाला कोरड पडल्येय आणि मस्तकात घणाचे घाव घातले जात आहेत असे त्याला वाटले.

चोरट्यासारखी त्याने नजर बाजूला वळवली, आगळ्याच घोगऱ्या आवाजात त्याने हाक मारली.

'ए! कोणी आहे का ? उठा !'

आक्सीनिया दचकून जागी झाली.

'आई ! कोण आहे ते ?'

ती लगबगीने आपला खमीस चाचपडू लागली आणि तो तिने पायावरून ओढून घेतला.

लाळेचा लहानसा थेंब तिच्या उशीवर पडला होता. बाईची झोप पहाटेला गाढ असते.

'मी आहे. आईनं तुम्हाला उठवायला पाठवलंय.'

'एका मिनिटात उठलोच. पिसवांच्या त्रासानं आम्ही जमिनीवर झोपलोय स्तिपान उठ, ऐकलंस का ?'

तिच्या आवाजावरून ग्रिगरीने ताडले की, तिला अवघडल्यासारखे झाले आहे आणि तो तिथून झपाट्यानं निघाला.

मे शिबीरासाठी त्या खेड्यातून तीस कझाक चालले होते. सात वाजायच्या सुमारास ताडपत्र्यांची ढापणे घातलेले रेकले, पायी चालणारे, घोड्यावर स्वार झालेले, घरी शिवलेले सदरे घातलेले, आपले चंबुगबाळे वाहणारे कझाक ह्यांची रीघ चौकाकडे लागली.

तुटलेल्या लगामाला घाईघाईने टाके घालीत प्योत्र पायऱ्यांवर उभा होता. पंतीलेयची प्योत्रच्या घोड्याभोवती धांदल उडून गेली होती. त्याच्या पुढ्यातल्या पेल्यात तो ओट ओतीत होता. पुन्हा पुन्हा ओरडत होता.

'दुन्या, अग गोणीत 'सुखारी[१]' घातल्यास का ? अग 'बेकन' खारवलास का ?'

गुलाबी आणि उफलून आलेली दुन्या चिमणीसारखी इकडून तिकडे धावत होती. बापाच्या गर्जनांना हसून उत्तर देत होती.

'तुझं तू बघ बाबा. भाऊची फडशी मी इतकी पक्की बांधून देते की चेरकास्कला पोहोचेपर्यंत काहीही इकडचं तिकडं व्हायचं नाही.'

'अजून खाणं संपलं नाही नं ?' मान उडवीत प्योत्रनं विचारलं.

'नाही झालं अजून' आपल्या खरबरीत तळव्यांनी खोगीराची फराकी तपाशीत त्याच्या बापाने मुद्दामच म्हटले.

टीप : १. सुखारी टोस्टसारखे भाजलेले पावाचे तुकडे.

'कापडातून एवढंसं कुसळ जरी बाहेर निघालेलं असलं तरी एकाच रपेटीत घोड्याची पाठ फोड येईस्तो चोळवटते–'

'बाबा, त्याचं खाणं झालं की त्याला पाणी दाखव.'

'ग्रिशा त्याला डॉनवर घेऊन जाईल.'

कपाळावर पांढरे नाम असलेल्या हाडे निघालेल्या त्या उंच घोड्याचा लगाम ग्रिगरीने हातात घेतला. फाटकातून त्याला बाहेर काढला. आपल्या डाव्या तळहाताचा त्याच्या गर्दनीवर टेकू देऊन तो उडी मारून त्याच्या पाठीवर स्वार झाला आणि त्याने घोड्याला टाच दिली. नदीच्या उताराशी त्याने घोड्याचा लगाम खेचण्याचा प्रयत्न केला पण ते जनावर ठेचकाळले. आपली चाल त्यानं तेज केली, सर्रकन् त्याने उतार कापला. त्या जनावराच्या पुठ्ठ्यावर जवळजवळ झोपण्याइतका मागे वाकलेल्या ग्रिगरीला कावड घेतलेली एक बाई दरड उतरताना दिसली. वाटेतून तो गर्रकन वळला आणि तीरासारखा पाण्यात शिरला. त्याच्या मागोमाग धुळीचा लोटच्या लोट उधळला गेला.

आक्सीनिया तरतरा दरड उतरून आली. त्याच्यापासून थोड्या अंतरावर आल्यावर ती त्याच्यावर खेकसली,' पागल सैतान कुठचा! चांगलं तुडवत होतास मला घोड्याखाली. थांब घोडा कसा पिटाळतोस ते तुझ्या बापालाच सांगते–'

'रागावू नको ग शेजीबाई! शिबिरावर निघालेल्या नवऱ्याला निरोप दिलास की तुझ्या शेतावर मी तुझ्या कामाला येईन–'

'तू रे काय मेल्या माझ्या कामाला येणार?'

'गवत कापणीचे दिवस आले की मला विचारत येशील.' ग्रिगरी हसला.

आक्सीनियाने मोठ्या कौशल्याने नदीतून हंडा भरून पाणी काढले. वाऱ्यावर उडणारा झगा आपल्या गुडघ्यात दाबून धरला.

'तुझ्या स्तिपानची तयारी झाली की नाही?' ग्रिगरीने विचारले.

'तुला काय करायचंय?'

'फिस्काटतेस काय मांजरीसारखी! मी विचारू सुद्धा नये की काय?'

'झाली तयारी! पुढे काय?'

'म्हणजे भरताराला सोडून तुला रहायला लागणार–'

'हो.'

त्या घोड्याने पाण्यापासून आपले प्रपाणा उचलले आणि डॉनच्या प्रवाहापलीकडे बघत तो उभा राहिला. त्याचे पुढचे पाय प्रवाहात बुडाले होते.

आक्सीनियाने आपला दुसरा हंडा भरून घेतला. कावड खांद्यावर घेतली आणि तरतरा ती दरड चढू लागली. ग्रिगरीने घोडा वळवला आणि तो तिच्या मागोमाग जाऊ लागला.

वाऱ्यावर तिचा झगा फडफडत होता. तिच्या रापलेल्या मानेवर पडलेल्या केसाच्या कुरळ्या बटा वाऱ्याशी खेळत होत्या. चपटी, भरतकाम केलेली जाळी तिच्या भरदार अंबाड्यावर चमकत होती. झग्याच्या आत कमरेजवळ गोळा झालेला तिचा गुलाबी खमीस उभट पाठीला आणि सुबक खांद्यांना चिकटला होता. दरड चढताना ती पुढे झुकली होती. आणि काचोळीतून तिच्या पाठीची पन्हळ स्पष्ट दिसत होती. तिच्या कांचोळीला जिथे घामाचे डाग पडले होते त्या खाकेतून डोकावणारे कुरळे केस त्याने पाहिले. तिची प्रत्येक हालचाल ग्रिगरी न्याहाळीत होता. तिच्याबरोबर त्याला परत बोलणे काढायचे होतं.

'तुला नवऱ्यावाचून करमणार नाही. नाही का ?' न थांबता आक्सीनियाने तोंड वळवले आणि ती खुदकन हसली.

'अर्थात नाही. लग्न कर म्हणजे कळेल.' श्वास रोखून ती अडखळत म्हणाली,

'मग कळेल की आपल्या लाडकीवाचून आपल्याला करमतं का ते'

ग्रिगरीने घोडा अगदी तिला भिडवला आणि तिच्या डोळ्यात रोखून पाहिले.

'पण नवरे गेले की इतर बायकांना आनंद होतो. प्योत्र गेला की आमची दार्या बघ कशी आडवी सुटेलं !'

आक्सीनियाच्या नाकपुड्या थरारल्या. तिचा श्वासोच्छ्वास जलद होऊ लागला तिने आपल्या केसावरून हात फिरवला.

'नवरा म्हणजे जळू नसला तरी रक्त शोषून घेतोच. तुझं होईलंच की आता लग्न.'

'कुणास ठाऊक ? बाबांवर अवलंबून आहे.

फौजेतली चाकरी संपल्यावर होईल कदाचित.'

'अजून तरणा आहेस. लग्न करू नकोस.'

'का नको ?'

'लग्नानं माणसाचा चोथा होतो' त्याच्याकडे तिरपा कटाक्ष टाकीत ओठ मिटून तिने कसनुसे स्मित केलें. ग्रिगरीच्या प्रथमच हे लक्षात आले की तिचे ओठ

नि:संकोच हावरे आणि काहीसे सुजीर आहेत. घोड्याची आयाळ बोटांनी विचरीत त्याने उत्तर दिले.

'मला लग्न करायचं नाही. तसंच कुणीतरी प्रेम करेल माझ्यावर !'

'कुणी हेरलंयस् वाटतं ?'

'मी काय हेरायचं ? तुझ्या स्तिपानला तू निरोप देत्येच आहेस.'

'माझी छेड काढू नको हं !'

'काय करशील ?'

'मी स्तिपानला सांगेन.'

'तुझ्या स्तिपानला मी बघून घेईन.'

'भलतीच घमेंड दिसत्येय. मग रडू नको.'

'मला भीती दाखवू नको, आक्सीनिया.'

'मी नाही तुला भीती दाखवत. खुशाल पोरींच्या मागं गोंडा घोळत फीर. तुझे हातरूमाल का शिविनात त्या. पण माझ्या वाटेला जाऊ नको.'

'आता तर जास्तच जाईन.'

'पहा हं !' आक्सीनियाने त्याच्याकडे पाहून मथलेले स्मित केले. त्याच्या घोड्याच्या पुढे जाण्यासाठी ती रस्ता सोडून निघाली. ग्रिगरीने जनावर बाजूला चळवले आणि तिचा मार्ग रोखला.

'जाऊ दे मला ग्रिशा.'

'नाही जाऊ देणार.'

'वेड्यासारखं करू नको. माझ्या नवऱ्याचं मला पाहिलं पाहिजे.'

ग्रिगरीने हसून घोड्याला चाळवले. त्याने आक्सीनियाला तिराकडं सरकायला लावले.

'जाऊ दे मला राक्षसा ! तिकडं माणसं आहेत, त्यांनी पाहिलं तर काय म्हणतील ?'

तिने आपली भेदरलेली दृष्टी आजूबाजूला टाकली आणि धुसफुसत, मागे वळून न बघता ती तिथून पुढे गेली.

आपल्या घराच्या पावलाणावर प्योत्र कुटुंबाचा निरोप घेत होता. ग्रिगरीने घोड्यावर जीन चढवले. आपली तलवार एका बाजूला पकडून त्याचा भाऊ पावलाणावरून धावत खाली आला आणि त्याने लगाम हाती घेतला. रस्ता हुंगत घोडा अस्वस्थपणे लगाम चघळीत उभा होता. रिकीबीत एक पाय टाकून प्योत्र बापाला म्हणाला—

'बैलं ताबडू नको. पतझडीच्या मोसमात आपण ती विकून टाकू' फौजेत जायला ग्रिगरीला घोडं लागेल. माहिती आहे ना ? आणि करपेल, कडबा विकू नको. यंदा कुरणातून केवढा कडबा हाती येईल ते तुला स्वत:लाच ठाऊक आहे–'

'बरं बरं ! देव तुला साथ देवो. यशवंत हो' म्हाताऱ्याने कपाळ छाती खांद्यावर क्रूसाची निशाणी करीत म्हटलं.

आपला दणकट देह प्योत्रने जीनावर फेकला. मागच्या बाजूला पट्ट्यात खुपसलेल्या सदऱ्याच्या चुन्या सारख्या केल्या. घोडे फाटकाच्या दिशेने निघाले. तलवार ठेक्यात मागेपुढे होत होती. तिची मूठ उन्हात मंदपणे तळपत होती.

कडेवर पोर घेऊन दार्या मागोमाग चालली होती. बाहीने डोळे आणि कमरेच्या एप्रनच्या टोकाने नाक पुसत त्याची आई इलीनिचना आवाडाच्या मधोमध उभी होती.

'भाऊ ! पिराशूकी [1]? पिराशूकी विसरलास !

बटाट्याच्या पिराशूकी !' दुन्या तीरासारखी फाटकाकडं धावली.

'ओरडायला काय झालं मूर्खे' ग्रिगरी चिडून फटकन म्हणाला.

'तो पिराशूकी मागंच ठेवून गेला' फाटकाच्या डांबावर रेलून ती स्फुंदून म्हणाली, तिच्या तप्त गालांवरून आसवे पोलक्यावर ओघळत होती. कपाळावर आडवा हात धरून उभी असलेली दार्या धुळीच्या पडद्यामागून दिसणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या पांढऱ्या सदऱ्याकडे टक लावून बघत होती. म्हाताऱ्या पंतीलेय्‌ने कुजत चाललेल्या फाटकाच्या खांबाला धक्का दिला आणि ग्रिगरीकडे पाहिले.–

'फाटक दुरुस्त कर आणि नवा खांब उभा कर.' क्षणभर विचारात गढल्यासारखा तो उभा राहिला आणि नंतर एकाएकी बातमी सांगावी तसे त्याने जाहीर केले–

'गेला प्योत्र'

कुडाच्या कुंपणापलीकडे स्तिपानची तयारी चाललेली ग्रिगरीने पाहिली. हिरवा लोकरीचा झगा चढवलेली आक्सीनिया घोड्याला धरून नेत होती. हसत हसत स्तिपानने तिला काही तरी सांगितले. मुळीच घाई गडबड न करता स्वामित्वाने त्याने बायकोचें चुंबन घेतले. त्याचा हात तिच्या खांद्याभोवती बराच वेळ रेंगाळत राहिला. उन्हाने आणि काबाडकष्टाने काळजलेला त्याचा हात तिच्या पांढऱ्या पोलक्याच्या पार्श्वभूमीवर कोळशासारखा काळा वाटत होता.

टीप : १. पिराशूकी– मास किंवा सागुतीचे पुरण भरलेले. समोशासारखे खाद्य.

त्याची भक्कम, स्वच्छ तासलेली गर्दन, त्याचे रुंद किंचित उतरते खांदे आणि (बायकोच्या दिशेनं तो वाकला की) त्याच्या फिक्कट भुऱ्या मिशांचे वळवलेले आकडे कुंपणापलीकडून दिसत होते.

कशावरून तरी आक्सीनिया हसली आणि तिनं डोके हालवले. आपला वजनदार देह जिनावर स्तिपानने झोकला तेव्हा तो धिप्पाड काळा घोडा किंचित पुढे झुकल्यासारखा झाला. रुतल्यासारखा जिनात बसलेल्या स्तिपानने दुडक्या चालीने घोडा फाटकाबाहेर काढला. रिकीब हातात धरून आक्सीनिया त्याच्या बाजूनं चालली होती. एखाद्या कुत्र्याने पाहावे तसे प्रेमाने आणि बुभुक्षित-पणे ती त्याच्या डोळ्यात पहात होती.

रस्त्याच्या कोपऱ्यावरून ते वळेपर्यंत ग्रिगरी त्यांच्याकडं अपलक नजरेनं बघत उभा होता.

४.

संध्याकाळपर्यंत वीजवादळ भरून आले. सबंध खेड्यावर एक कभिन्न राशिजलधर दाटून आला होता. वाऱ्याने झोडपल्याने चवताळलेल्या डॉनच्या फेसाळ लाटा काठावर आदळत होत्या. जळजळीत विजेने आभाळ प्रदीप्त होत होते आणि मधून मधून होणाऱ्या गडगडाटाने धरणी हादरत होती. जलधाराच्या खालीच एक घार पंख पसरून मंडले घेत होती. कावकाव करणारे डोमकावळे तिच्यामागे लागले होते. आपले थंड निःश्वसित पसरवून तो जलधर पश्चिमेकडून डॉनच्या खालच्या अंगाला सरकला. कुरणापलीकडचे आभाळ भयानक गडद होऊन गेले होते. माळरानांवर पर्युत्सुक शांतता पसरली होती. झाकल्या जाणाऱ्या झडपांचे खडखडाट खेड्यात ऐकू येत होते. दिवेलागणीची प्रार्थना आटोपून अंगावर क्रुसाची निशाणी करीत म्हातारेकोतारे घाईघाईने घरी चालले होते. धुळीचा भुऱ्या रंगाचा खांब चौकातून भिरभिरत गेला आणि उष्म्याने भारावून गेलेल्या धरणीवर पहिल्या पर्जन्यबीजांची उधळण झाली.

आपल्या गुंफलेल्या वेण्या उडवीत दुन्या आवाडातून धावत गेली आणि कोंबड्यांच्या खुराड्याचे दार तिने फटकन लावून टाकले. अटकाव्याशी थबकलेल्या

घोडघासारख्या नाकपुड्या फेंदारून ती आवाडाच्या मधोमध उभी होती. रस्त्यावर मुलांचा धिंगाणा चालू होता. आठ वर्षांचा मिस्का स्वतःभोवती गिरक्या घेत होता. त्याच्या बापाचा काहीच्याबाही उंच ढापणाची टोपी त्याच्या डोळ्यावर सरकली होती. किंचाळून तो गात होता.

पावसा पावसा निघून जा
वार आमच्या सुट्टीचा
देवाचा नवस फेडायचा
येशूपुढं वाकायचा

जमीन तुडवणाऱ्या मिस्काच्या भेगाळलेल्या अनवाणी पावलांकडे दुन्या हेव्याने पाहत होती. तिलाही पावसात नाचायचे होते. डोके भिजवून घ्यायचे होते. म्हणजे तिचे केस त्यामुळे दाट आणि कुरळे झाले असते.

खाजखुयलीच्या झुडपात पडण्याची पर्वा न करता रस्त्याच्या कडेच्या धुळीत मिस्काच्या मित्रांसारखे हातावर उभे राहावे असे तिलाही वाटत होते. पण तिची आई तिच्यावर नजर ठेवून उभी होती. खिडकीपलीकडे तिच्या ओठांची रागारागाने उघडझाप होत होती. सुस्कारा सोडून दुन्या पळत पळत घरात गेली.

आता पाऊस संतत आणि मुसळधार लागला होता. छपराच्या ऐन माथ्यावरच मेघांचा प्रचंड गडगडाट होऊन तो मेघनाद डॉनवरून खाली पसरत गेला.

आवाडात पंतीलेय आणि घामाघूम झालेला ग्रिगरी अडगळीच्या खोलीतून गुंडाळलेले पगजाळे ओढून आणीत होते.

'कच्चा दोरा आणि दाभण! लौकर!' ग्रिगरीने दुन्याला ओरडून सांगितले.

दार्या जाळे शिवायला बसली.

पोराला झोके देताना तिची सासू धुसपुसत होती.

'आणखी काय काय डोक्यात घेणारेस म्हाताऱ्या! झोपू या आता. घासलेटाचा भाव रोज वाढतोय. आता काय पागणार आहात कुणास ठाऊक! जातांय् तरी मेल्यानो कुठं? सगळ्या उचापतीत नदीत जीव जायचा. देव बघ कोपून राहिलाय. ती वीज तरी बघ! देवा येशू ख्रिस्ता! आकाशातल्या माये!' क्षणार्धांत सायवानात लखलखीत निळा प्रकाश आला आणि चिडीचीप झाले. झडपांवर वाजणाऱ्या पावसाचा आवाज कानावर येत होता. त्याच्या पाठोपाठ मेघगर्जना झाली. दुन्याने केकाटत आपले तोंड जाळ्यात खुपसले. दार्याने साहन्याच्या आणि दाराच्या दिशेने क्रुसाची निशाणी केली. आपेल्या पायाशी अंग

घासणाऱ्या मांजराकडे म्हातारीने भयंकर नजरेनं पाहिलं. 'दुन्या हाकल ह्या रां..., आकाशातल्या माये, घडल्या पातकाची क्षमा कर, दुन्या ह्या मांजराला आवाडात नेऊन सोड. शुत्‌शुत ! हडळ मेली ! तुझं...'

जाळे खाली टाकून ग्रिगरी आतल्या आत गदगदून हसला.

'खिदळायला काय झालं ?' पंतिलेय खेकसला.

'ए बायांनो शिवण लौकर आटपा. परवाच तुम्हाला सांगितलं होतं की जाळ्याकडे जरा बघा म्हणून–'

'ह्यावेळी कुठली आल्येय मासळी ?' त्याची बायको घोटपणे म्हणाली.

'तुला समजत नसेल तर गप बैस. स्टरलेट आताच काठाकडं येत असतात. वादळाला घाबरतात ते. आतापर्यंत पाणी गढूळलं असेल. दुन्या बाहेर जाऊन बघ नाल्याची खळखळ ऐकू येतेय का ?'

दुन्या नाखुषीनं दाराकडे सरकली.

'तुझ्याबरोबर कोण पाणी तुडवणार ? दार्यानं नाय जायचं. छातीत सर्दी होईल तिच्या' म्हातारीची पिरपिर चालूच होती.

'मी आहे आणि ग्रिगरी आहे. दुसऱ्या जाळ्यासाठी आम्ही आक्सीनियाला बोलावू अन्‌ बायकांपैकी आणखी कुणालातरी बोलावू.'

दुन्या धापा टाकीत धावत आत आली. तिच्या पापण्यांवर पाण्याचे थेंब थरथरत होते. तिच्या अंगाला भिजट काळ्या मातीचा गंध येत होता.

'कसला तुफान वाहतोय नाला' ती धपापत म्हणाली,

'तू पण येत्येस ?–'

'आणखी कोण जातंय ?–'

'काही जणींना गोळा करा, आपण–'

'चालेल–'

'कोट घाल आणि आक्सीनियाकडं पळ' तिच्या बापाने तिला सांगितले–

'ती येत असली तर तिला म्हणावं मलाश्का फ्रलोवाला पण घेऊन ये–'

'ती बाई नाही गारठायची' ग्रिगरी हसून म्हणाला.

'डुकरीसारखी माजलीय ती–'

'ग्रिशा राजा, थोडा कडबा का घेईनास बरोबर ?' त्याच्या आईनं सल्ला दिला.

'काळजावर ठेव थोडासा नाहीतर आतून गारठशील'

'हो हो घेऊन ये थोडा कडबा, ग्रिगरी. म्हातारीचं अगदी बरोबर आहे.'

दुन्या चटकन त्या बायांना घेऊन आली. आक्सीनियाने निळा झगा आणि दोराच्या पट्ट्याने आवळलेल्या घोंगडीचे जाकीट घातले होते. त्यात ती ठेंगणीशी आणि जास्त सडपातळ वाटत होती. दार्याशी हसत हसत तिने आपला डोक्याचा रुमाल सोडला. केसांची घट्ट गाठ मारली आणि मान मागे झुकवून थंड नजरेने तिने ग्रिगरीकडे पाहिले. दणकट मलाश्काने मांडमोजे वर ओढून घेतले आणि घोगऱ्या आवाजात ती म्हणाली–

'तुमच्या गोणी आहेत का तुमच्याजवळ ? आज नक्कीच रग्गड मासळी मिळणार आहे.'

ते सगळेजण आवाडात गेले. थबथबलेल्या मातीत पाऊस अजून कोसळत होता. खबाड फेसाळत होते आणि बीदीनाले खाली डॉनकडे खळखळत चालले होते.

ग्रिगरीच्या मागोमाग ते खाली नदीपर्यंत गेले. काही कारण नसताना एकाएकी त्याला मोठीच खुषी वाटू लागली–

'बाबा, इथं खबाड आहे–'

'कसला काळोख आहे !'

'माझ्या मागोमाग ये आक्सीनिया, बरोबरच खोड्यात पडू' मलाश्का खरखरीत आवाजात हसली.

'हा पडतोर ना रे ग्रिगरी ?'

'होय होय'

'इथूनच सुरुवात करा' वाऱ्याच्या गर्जनेच्या वर आवाज चढवून पंतीलेय ओरडला.

'काय म्हणता ते ऐकू नाही येत काका.' मालाश्का घोगऱ्या आवाजात ओरडली.

'पाण्यातून चालायला लागा. मी खोलीची बाजू धरतो– खोलीची म्हणाले मी. मालाश्का, ए बहिरट भवाने, कुठं भयकतच चाललीस ? मी पेंडाच्या बाजूला जातो. ग्रिगरी, ग्रिशा, आक्सीनियाला बाणीची बाजू धरू दे.'

डॉनवरून आक्रोशणारी गर्जना येत होती. पावसाची तिरपी होत गेलेली कनात फाटून वारा तिच्या चिंध्या करीत होता. पावलाने तळ चाचपीत ग्रिगरी कमरठाव पाण्यात चालत गेला. चिब थंडी सरपटत त्याच्या उरात शिरली आणि त्याच्या काळजाभोवती तिने घट्ट विळखा घातला. त्याच्या तोंडावर आणि घट्ट आवळून घेतलेल्या डोळ्यांवर लाटा आसुडासारख्या फटकारीत होत्या. जाळ्याचा

फुगा झाला आणि फोंडाऱ्यात ते ओढले गेले. लोकरी मोज्यातले ग्रिगरीचे पाय रेताळ तळावरून घसरले. जाळे त्याच्या हातून खेचले जात होते. अधिकाधिक खोलवर चालले होते. अचानक तो होलपाडला. त्याच्या पायाचा आधार सुटला. ससेटघाने त्याला खेचून घेतले आणि ऐन धारेवर आणले. आपल्या उजव्या हाताने पाणी कापीत तो आवेशाने काठाकडे पोहत आला. काळाकुट्ट वाटणारा फोंडारा त्याला कधी नाही असा भेडसावू लागला. किचडतळ पायाना लागल्यावर त्याला आनंद झाला. एक मासा त्याच्या गुडघ्यावर आदळला.

'फोंडाऱ्याकडं ने' चिप्प काळोखातून त्याच्या बापाचा आवाज आला.

परत जाळचाचा झोक गेला आणि ते फोंडाऱ्यात खेचले गेले. धारेने परत त्याच्या पायाखालची जमीन निसटली. पाण्याच्या चुळा टाकीत ग्रिगरी पोहत आला.

'आक्सीनिया तू ठीक आहेस?'

'आतापर्यंत ठीक आहे–'

'पाऊस थांबत नाही ना?'

'मस्त पाऊस आहे. आता दणदणीत शिकार मिळणार–'

'हळू बोल. माझ्या बापानं ऐकलं तर येईल माझ्या मागं–'

'तुझ्या बापाची भीती वाटते का?'

थोडा वेळ तें न बोलता जाळे खेचत होते. चिकट खेळीने घालावा तसा पाण्याने प्रत्येक हालचालीला पायबंद घातल्यासारखा होतो.

'ग्रिशा, मला वाटतं काठाशी एक बुडालेलं झाड आहे. त्याच्याभोवती जाळं बांधू या.'

एका भयंकर धोदाण्याने ग्रिगरी तिच्यापासून लांब फेकला गेला.

'अग आई ग ऽ!' काठावरून कुठून तरी आक्सीनियाची किंचाळी आली भेदरून तो तिच्या आवाजाच्या दिशेने पोहत आला.

'आक्सीनिया ऽ'

वारा आणि पाण्याचा वाहता घोघोकार!

'आक्सीनिया ऽऽ!' भीतीनं गारठत चालेला ग्रिगरी पुन्हा ओरडला.

'ए–! ग्रिगरी ऽ!' दूरवरून त्याने आपल्या बापाचा आवाज ऐकला.

त्याने हाताने सपासपा पाणी कापले. त्याच्या पायाला काहीतरी चिकट जाणवले. त्याने ते हाताने पकडले. ते जाळे होते.

ग्रिशा कुठं आहेस तू?' आक्सीनियाचा रडवेला आवाज त्याने ऐकला.

'माझ्या हाकेला ओ का नाही दिलीस ?'

हातावर आणि गुडघ्यावर रांगत दरड चढत तो रागाने ओरडला.

उकिडवे बसून ते जाळ्याचा गुंता सोडवू लागले. एका ढगाच्या उफललेल्या टरफलातून चंद्र बाहेर पडला. कुरणापलीकडे दबलेला गडगडाट ऐकू येत होता. धरणीवर ओल चमकत होती. पावसाने स्वच्छ धुतलेले आकाश लखलखीत आणि नितळ दिसत होते.

जाळ्याचा गुंता सोडल्यावर ग्रिगरीने आक्सीनियाकडे रोखून पाहिले तिचा चेहरा पांढरा फटफटीत दिसत होता. पण तिचे लाल किंचित अपरे ओठ स्मिताने विलग झाले होते.

'काठाला कसली आदळले मी ! शुद्ध हरपल्यागत झालं मला. भीतीनं बोबडीच वळली. मला वाटलं तू बुडालास.' धापा टाकीत ती म्हणाली.

त्यांच्या हातांचा एकमेकांना स्पर्श झाला. आक्सीनियाने आपला हात त्याच्या बाहीच्या आत खुपसण्याचा प्रयत्न केला.

'तुझा हात किती गरम आहे' ती खिन्नपणे म्हणाली.

'आणि मी गारठून गेल्येय्. काटा आलाय सर्वांगावर–'

'बघ तो रांडीचा कुठून निसटला.'

जाळ्याच्या मधोमध पाच फुटाचे भोक गेलेले ग्रिगरीने तिला दाखवले.

कुणीतरी काठावरून धावत आले. ती दुन्या असल्याचे ग्रिगरीने ताडले तो तिच्यावर ओरडला.

'दोरा आहे का ?

'आहे' दुन्याश्का[1] धापा टाकीत धावत त्याचेकडे आली होती.

'आहे. इथं का बसलास तू ? बाबानं मला तुझ्याकडं पाठवलंय. तुला ताबडतोब तिकडं बोलावलयं. आम्ही पोतंभर स्टर्लेट धरलेत.'

तिच्या आवाजात जिंकल्याचा सूर होता. दातावर दात थडथडणाऱ्या आक्सीनियाने जाळ्यातील भोक शिवले. नंतर ऊब येण्यासाठी ते धावत ढिम्यावर चढून आले. पाण्याने सुजलेल्या, घट्ट पडलेल्या बोटांनी पंतीलेय् सिगारेट वळत होता नाचत उडत तो फुशारकीने म्हणाला, 'पहिल्या खेपेला आठ मासे ! पण दुसऱ्या खेपेला–' असे म्हणून तो थांबला आणि न बोलता त्याने पायाने पोत्याकडे खूण केली. आक्सीनियाने उत्सुकतेने आत डोकावून पाहिले. बळवळणाऱ्या मासळीचा धडपडता फडफडता आवाज त्यातून येत होता.

टीप : १. दुन्याश्का हे दुन्याचे पोर वय सूचित करणारे लाडिक संबोधन.

'तुम्ही कुठं होता ?'

'सोमनं आमचं जाळं फाडलं'

'शिवलं काय नाय् ?'

'शिवलं कसंतरी–'

'ठीक ! परत गुडघाभर पाण्यापर्यंत जाऊ या न् मग घरी ! आधी तू पुढं होऊन जाळं फेक ग्रिशा, वाट कशाची बघतोयस् ?'

पाय बधिर झालेला ग्रिगरी पुढं झाला. आक्सीनिया इतकी कुडकुडत होती की त्याला ते जाळे थरथरत असल्याचं जाणवत होते.

'थरथरणं थांबव –'

'मला काय हौस आहे थरथरायची ? पण दम लागल्यासारखा झालाय–'

'हे बघ आपण बाहेर पडू या. गेली फाफलत ती मासळी.'

त्याच क्षणी एका जंगी कार्प माशाने जाळ्याकडं झेप घेतली. ग्रिगरीने ते कंकणाकृती आवळण्यासाठी जाळे खेचले.

आक्सीनिया धापा टाकीत काठावर आली. जाळ्यात मासा फडफडत होता

'कुरणातून परत माघारी जायचं ?'

'रानातली वाट जास्त जवळची आहे'

'अरे ए ! येतोयस् का ?'

'तुम्ही व्हा पुढं. आम्ही तुम्हांला गाठतो. आम्ही जाळं साफ करतोय.'

चरफडत आक्सीनियाने आपला झगा पिळला. माशाची गोणी खांद्यावर टाकली आणि तुरुतुरू ती चालायलाही लागली. ग्रिगरीने जाळे गोळा केले. ते जेमतेम दोनशे यार्ड गेले असतील एवढ्यात आक्सीनिया कण्हू लागली.

'माझ्यानं नाही चालवत. पायाला मुंग्या आल्यात.'

'हे बघ, तिकडं जुनी गवताची गंज आहे तिथं जरा ऊब घे ना !'

'झकास ! नाहीतर मी ह्या जन्मात काही घरी नाही पोचायची.'

गवताच्या गंजीचा माथा ग्रिगरीने कलता केला. आणि आत एक खळगा तयार केला. कित्येक दिवस पडून राहिलेल्या गवताला उबलेला कुजट वास येत होता.

'सरपटत मध्यापर्यंत जा. इथं हे चुलीसारखंच आहे.'

तिने स्वतःला गंजीवर झोकून दिले आणि त्या वाळलेल्या गवतात मानेपर्यंत शरीर बुडविले.

'किती बरं वाटलं !' ती म्हणाली.

थंडीन कुडकुडणारा ग्रिगरी तिच्या बाजूला लवंडला. तिच्या ओल्या केसातून कोवळा चाळवता गंध येत होता.

डोके मागे झुकवून ती पडली होती. अर्धवट उघडलेल्या तोंडातून तिचा श्वास संथपणे चालला होता.

'तुझ्या केसाला ओव्याचा वास येतोय्. ते पांढरं फूल ठाऊक आहे तुला?'

तिच्याकडं झुकून ग्रिगरी कुजबुजला. ती गप्प होती. धूसर आणि दूरवर गेलेली तिची नजर क्षीण होत जाणाऱ्या चंद्रकोरीवर खिळली होती.

ग्रिगरीने आपला हात खिशातून काढला आणि तिचे मस्तक अचानक आपल्याकडे ओढले. तिने बळ एकवटून स्वतःला त्याच्या मिठीतून सोडवून घेतले. आणि त्या गंजीवरून तिने देह किंचित उंचावला.

'सोड मला–'

'गप्प बस–'

'सोड नाहीतर किंचाळेन–'

'थांब, आक्सीनिया–'

'पंतीलेय् काका!'

'वाट चुकली काय?'

अगदी जवळूनच काटेरी झुडपाच्या पुंजामागून पंतीलेय्चा आवाज आला. दात घट्ट आवळून ग्रिगरीने गंजीवरून उडी मारली.

'काय झालं ओरडायला? वाट सापडत नाही?' जवळ येत म्हाताऱ्याने विचारलं.

आपला रुमाल सारखा करीत आक्सीनिया गंजीजवळ उभी होती. तिच्या कपड्यातून वाफा येत होत्या.

'वाट नाही चुकली. पण आमची अगदी गोठून जायची पाळी आलेय.'

'ए बाई, हे बघ. ती गवताची गंज आहे तिथं जरा ऊब घे.'

गोणी उचलून घेण्यासाठी थांबलेल्या आक्सीनियानं स्मित केलं.

५.

सित्राखोव शिबीर सुमारे चाळीस मैलावर होते. प्योत्र मेलीखोव आणि स्तिपान आस्ताखोव एकाच रेकल्यातून चालले होते. त्यांच्याबरोबर त्यांच्या

खेड्यातले आणखी तिघेजण होते. देवीचे वण असलेल्या 'कालमिक [1]' चेहऱ्याचा तरुण कझाक फिदोत बदोपस्कफ हुजुरातीच्या 'आतामान' पथकातील दुय्यम राखीव शिपाई खिरसांफ तोकीन ह्याला खिरस्तोनिया तोकीन म्हणून लोक ओळखत आणि तिसरा होता तोफखान्यावरील इवान तोमिलीन.

जेवणाचा पहिला मुक्काम झाल्यानंतर त्यानी खिरस्तोनिया आणि अस्ताखव ह्यांचे घोडे रेकल्याला जुंपले आणि बाकीचे घोडे मागच्या बाजूला बांधले. आडव्या अंगाच्या आणि 'अतामान' रेजिमेन्टमधल्या इतर सैनिकाप्रमाणेच तऱ्हेवाईक डोके असलेल्या ख्रिस्तोनियाने लगाम हाती घेतले. धुरेवर तो बसला होता. चाकासारख्या त्याच्या वक्र पाठीने रेकल्याच्या आत येणारा उजेड झाकला गेला होता. आपल्या खोल खर्जातल्या आवाजाने तो घोड्यांना हाकारीत होता. ताठ खेचलेल्या ताडपत्रीच्या आडोशाखाली पडून प्योत्र, स्तिपान आणि तोमिलीन ह्यांचे धूम्रपान चालले होते. बदोपस्कफ पाठीमागून चालत येत होता. त्याचे फेंगडे 'कालमिक' पाय त्या धुळीच्या रस्त्याला दाद देत नव्हते. ख्रिस्तोनियाचा रेकला सगळ्यांच्या पुढे चालला होता. त्याच्या मागोमाग सात आठ रेकले होते आणि त्याच्याही मागे ओझी लादलेले किंवा उपलाणे घोडे चालले होते. हशा, आरडाओरडा, घोड्यांची फुरफुर, रिकाम्या रिकिबीचा किणकिणाट ह्यांचा त्या रस्त्यावर गोंगाट उडाला होता. 'सुखारी'[2]च्या थैलीवर प्योत्रने डोके टेकले होते. आपल्या पिंगट मिश्यांच्या आंकड्याना पीळ देत तो शांतपणे पहुडला होता.

'स्तिपान–'

'आँ ?–'

'गाणं होऊन जाऊ दे–'

'भलती गरमी आहे कोरड पडल्येय घशाला–'

'इथं कुठं काही प्यायला मिळायचं नाही. तेव्हा त्याची वाट बघत बसू नको.'

टीप : १. कालमिक हे मुळचे लामाचे उपासक. बाराव्या शतकाच्या प्रारंभी आजच्या कालमिकांचे पूर्वज 'आईरात' म्हणून ओळखले जात. ते मध्य आशियात राहात. चंगीजखानाच्या साम्राज्याचा ते भाग होते. चौदाव्या शतकाच्या अखेरीस 'देरवान ओर्द' नावाखाली त्यांची लहान लहान राज्ये उदयाला आली. सोळाव्या-सतराव्या शतकात 'आईरात' रशियात आले. व्होलगाच्या काठी कॅस्पिअन समुद्राच्या किनाऱ्यावर ते राहू लागले. ह्याच स्थलांतरातून कालमिक जमात उदयाला आली. त्यांच्यात तुर्की, रशियन वगैरे रक्ताचा संकर झाला होता. म्हणूनच नाकाडोळ्यांच्या ठेवणीत हे मंगोलवंशियाप्रमाणे आहेत.

टीप : २. सुखारी टोस्टसारखे भाजलेले पावाचे तुकडे.

'चल सुरू कर. गाण्यात तुझी तेवढी तयारी नाही हे खरं! तुझा ग्रिशा तयार आहे. त्याचा आवाज म्हणजे आवाज नाही निव्वळ चांदीची तार आहे.'

स्तिपानने डोके मागे झुकवले. तो खोकला आणि खालच्या पट्टीत सुरावर गाऊ लागला.

'अहा आलं आलं मस्त, झांजर पेटतं
एरमोळि आलं पहा आलं आभाळात'

एकाद्या बाईसारखा तोमिलीनने गालाला हाताच्या तळव्याचा आधार दिला आणि गाण्याचे कडवे पकडून तो आपल्या किनऱ्या आळवत्या आवाजात गाऊ लागला. त्या यातायातीने त्याच्या कानशिलाच्या पिवळटणाऱ्या शिरांकडे प्योत्र स्मित करीत आणि तोंडात मिशीचे टोक चघळीत पाहत होता.

'ऐन जवानीची बाळी नार अशी अट्टकर
लटपट चालीनं ही आली, आली ओढ्यावर'

ख्रिस्तोनियाकडे डोके करून पडलेल्या स्तिपानने कोपरावर रेलत मोहरा वळवला. त्याच्या भरदार गर्दनीला तांबुस छटा चढली होती.

'ख्रिस्तोनिया चल साथ दे'

'आणि गड्यानं जाणला जाणला हो तिचा हेत
कुमायती घोडी त्याची टाकी पाय रिकिबीत.'

स्तिपाननं आपली सस्मित नजर प्योत्रकडं वळवली. आपल्या मिश्यांचे टोक तोंडातून थुत्कारीत प्योत्रनं आपला आवाज मिसळवला. घनदाट दाढी असलेला आपला जबडा सताड वासून ख्रिस्तोनियानें अशी काही गर्जना केली की त्याने ताडपत्र्यांचे ढापणच हादरले.

'कुमायती घोडी त्याची पाय टाकी रिकिबीत
नार अट्टकर तिला भेटायला उधळत'

ख्रिस्तोनियाने आपला उघडा पाय अंगाखाली मुडपून घेतला आणि स्तिपानने परत सुरुवात करायची तो वाट पाहू लागला. आपले डोळे स्तिपानने मिटून घेतले. त्याच्या घामेजलेल्या चेहऱ्यावर सावली पडली होती. हळुवारपणे तो गाऊ लागला. कधी त्याचा आवाज खर्जात जाई तर कधी तारसप्तकात खणखणून उठे--

'अग अग पोरी' मला जाऊ दे ग ओढ्यावर
घोडो कुमायती माझी नेऊ दे ग ओढ्यावर,

आणि परत ख्रिस्तोनियाच्या खोल घुमणाऱ्या आवाजात इतरांचे आवाज

बुडून गेले. शेजारच्या रेकल्यातील आवाजांचीही गाण्याला साथ मिळू लागली. आपल्या लोखंडी धावांवर चाके खडखडत होती. तोंडात जाणाऱ्या धुळीने घोडी फुरफुरत होती. गाण्याचा जोमदार आणि गाढा ओघ हेल काढीत पुढे जात होता. पांढऱ्या पंखांची एक टिटवी त्या पिंगट कोळपलेल्या मैदानातून उडाली. पांढऱ्या ढाषणाच्या रेकल्यांची रांग, आपल्या खुरांनी धुळीचे लोट उडवीत चाललेली घोडी. . ., धुळीत भरलेले, पांढरे सदरे घातलेली रस्त्याच्या कडेनं चाललेली माणसे . . ह्यांना आपल्या हिरव्या कंच डोळ्यांनी निरखीत ती टिटवी एका खळग्याकडे उडून गेली त्या खळग्यात ती उतरली आणि भटकणाऱ्या जनावरानी तुडवून सपाट केलेल्या दमट गवताला आपले काळे ऊर बिलगवून बसली. मग रस्त्यावर घडत असणारा प्रसंग तिच्या नजरेआड गेला. आधी चालले होते तसेच ते रेकले खडखडत चालले होते. घामाने निथळणारी घोडी तशीच अनिच्छेने धूळ उडवीत चालली होती .पण धुळीधूसर सदरे घातलेले कझाक आपल्या रेकल्यातून धावत आपल्या म्होरक्याकडे निघाले होते. त्याच्या भोवती दाटी करीत त्यांनी हसण्याचा दणका उडवून दिला.

स्तिपान आता रेकल्यात ताठ उभा राहिला होता. ताडपत्री त्याने एका हाताने धरली होती. दुसऱ्या हाताने त्याने ठेका धरला होता. आणि आपला मोहक, द्रुत लयीतला आवाज त्याने टिपेत लावला होता.

‘ बसू नको जवळी माझ्या
बसू नका जवळी माझ्या
लोकांनी पाह्यलं तर बसतील म्हणत
तुझी नि माझी आहे पिरत
म्हणतील की पिरतीच्या नादानं
पुन्हा पुन्हा येशि माझ्या मागानं
ध्येनात घर मी नाय असली तसली ’

डझनावारी रांगड्या आवाजांनी हे पालूपद उचलून असा काही गदारोळ उडवून दिला की रस्त्याच्या कडेची धूळही त्याने चोपली गेली.

‘ ध्येनात धर मी नाय असली तसली
ध्येनात धर मी नाय असली तसली
ल्येक हाये बेरडाच्या कुळातली
ध्येनात धर मी नाय असली तसली
राजपुत्तराच्या पिरतित गुंतलेली ’

फेदोत बदोपस्काफाने शिट्टी मारली. घोड्यांनी दावणीला नेट लावला. रेकल्याबाहेर वाकून प्योत्र हसत हसत आपली टोपी हलवू लागला. चेहऱ्यावर हसू झळकणाऱ्या स्तिपानने फुशारकीने खांदे उडवले. रस्त्याच्या कडेने धुळीचा लोट उठला होता. लांब सदऱ्याचा पट्टा सोडलेल्या ख्रिस्तोनियाने रेकल्याबाहेर उडी घेतली. त्याच्या केसांचा गुंता झाला होता. चेहरा घामानं निथळत होता. किंचाळत घुमत भिंगरीसारखा गरगरा फिरत त्याने कझाक नृत्य सुरू केले. करड्या मुलायम धुळीवर त्याच्या अनवाणी पावलांचे ठसे उमटून राहिले.

६.

खरपट माथा असणाऱ्या एका डुंगीवर रात्रीचा मुक्काम करण्यासाठी ते थांबले. पश्चिमेला ढग गोळा झाले होते. त्यांच्या काळ्या पाखातून पाऊस ठिबकत होता. एका तळ्यावर घोड्यांना पाणी दाखवण्यात आले. बांधावरची उदास वळुंजी वाऱ्यापुढे लवत होती. साचलेल्या टिकलीच्या शेवाळ्याने झाकलेल्या आणि भिकार टीचभर तरंगाचे खवले उठवणाऱ्या पाण्यात विजेचे वेडेविद्रे प्रतिबिंब उमटत होते. धरणीच्या कोळपून गेलेल्या ओंजळीत भीक उधळावी तसा वारा मधून मधून पावसाच्या थेंबांचा चुरा टाकीत होता.

पायबंद घातलेले घोडे चरायला सोडण्यात आले. त्यांच्यावर राखण म्हणून तिघांना नेमण्यात आले. इतरांनी चुली पेटवल्या आणि गाड्यांच्या जोखडांना गाडगी लटकावली.

ख्रिस्तोनिया मका शिजवीत होता. चमच्याने ढवळता ढवळता आजूबाजूला बसलेल्या कझाकांना तो गोष्ट सांगू लागला.

'डुंगी ही अशीच उंच होती. माझ्या स्वर्गवासी झालेल्या बापाला मी म्हणीतलं—'

'डुंगी बिगरपरवाना खणली म्हणून आतामान[१] आपल्यावर उखडेल काय ?'

'काय वटवट करतोय हा ?' घोड्याकडून परत आलेल्या स्तिपानने विचारले.

'स्वर्गवासी झालेल्या बापाबरोबर– ईश्वर त्याच्या आत्म्याला शांती देवो ! – आम्ही खजिना कसा शोधीत होतो त्याची गोष्ट सांगतोय.'

'कुठं शोधला खजिना ?'

'अस्सं अस्सं !'

स्तिपान जाळाजवळ उकिडवा बसला आणि त्यातला निखारा टिचकीने उडवून त्याने तो तळहातावर घेतला. तो बराच वेळ हातावर घोळवीत त्याने सिगरेट शिलगावली.

'ती होती मेटकुलोव डुंगी' तेव्हा आपला बापूस म्हणतो, 'चल ख्रिस्तोनिया आपण मेटकुलोव डुंगी खणू या. त्यानं त्याच्या बापाकडून ऐकलं होतं की ह्यात खजिना पुरलेला आहे. आपल्या बापसानं देवाला नवस बोलला होता. 'हा खजिना मला मिळू दे. मी एक मस्तपैकी गिरिजा घर उठवून देईन.' दोघांचा विचार ठरला आणि आम्ही निघालो, ती जागा होती खमाविशी, तेव्हा आम्हाला आडकाठी फक्त आतामनच करू शकत होता, उन्हं उतरायच्या वेळेला आम्ही येऊन पोचलो. दिवस बुडेस्तो आम्ही थांबलो. नंतर फावडी घेऊन चढणीला लागलो. पार टेंब्यावरूनच आम्ही सरळ खाली खणायला लागलो. सहा फूट खोलीपर्यंतचं बळद आम्ही खणलं. माती दगडासारखी होती, आपण चिंब निथळलो. बापूस ओठातल्या ओठात देवाचा धावा करीत होता. पण भाऊ, गळ्याशपथ

टीप : १. आतामान– निरनिराळ्या पातळीवरील नाईकीच्या जागांवर झारशाही रशियांतील कझाक 'आतामान' ना निवडून देत. डॉनफौजेच्या नाईकाला 'फौजांचा नाईक' म्हणत. कझाक जिल्हा किंवा जिल्ह्याचे ठिकाण असणाऱ्या स्तनित्साच्या नाईकाला 'स्तनित्सा नाईक' म्हणत. कझाक तुकडी मुलखगिरीसाठी जाई तेव्हा ती आपल्या स्वतःच्या 'मोहिमेचा आतामन' निवडीत असे. व्यापक अर्थाने आतामान म्हणजे नाईक. डॉन कझाकांनी अखेरीस जेव्हा आपले स्वातंत्र्य गमावले तेंव्हा 'अखिल कझाक फौजांचा आतामान' ही किताबत गादीच्या वारसदारांची वंशपरंपरेची किताबत झाली आणि सर्व कझाक सैन्यावर 'नेमलेल्या' आतामानची हुकमत चालू झाली.

सांगतो, माझं पोट असं काही कुरकुरू लागलं–उन्हाळ्यात आपण काय खातो तुम्हाला ठाऊकच आहे, दुधाचं आंबोण आणि क्वॉस.[1]

आपला बापूस कसा म्हणतो, 'थुत् तिच्या ! ख्रिस्तोनिया तू गव्हार आहेस. मी इथं धावा करतोय आणि तुला खाल्लेलं पोटात ठेवायला येईना, दुर्गंधीनं मला गुदमरायला व्हायला लागलंय, जा, उतर डुंगीच्या खाली नाही तर हातातल्या फावड्यानं तुझ्या डोक्याचं भक्कलच फोडतो, तुझ्या घाणीनं खजिना आणखी रसातळाला जायचा. तेव्हा आपण डुंगी उतरून येतो. पोटदुखीनं मरायला टेकतो. आपला बापूस–हा ऽ दणकट माणूस ! खणतोय आपला एकट्यानं ! खणता खणता त्याला दगडी कपार लागते, तो मला हाक घालतो. मी कपारीखाली टिकाव घालतो आणि वर उचलतो. देवाच्यान भाऊ ! चांदणी रात्र होती. आणि कपारीखाली असा काही चकचकाट !'

'आता मात्र तू थापा मारतोयस ख्रिस्तोनिया' हसत हसत मिशाना पीळ भरीत प्योत्र मधेच म्हणाला.

'कोण थापा मारतोय ? खड्ड्यात गेलास लेका' तुमान वर खेचीत ख्रिस्तोनियाने आपल्या श्रोत्यांवरून नजर फिरवली–

'नाही. देवाच्यान खोटं सांगत नाही–'

'काय सांगायचं ते लवकर सांग–'

'लखलखत होतं. मी त्याच्याकडं पाहतो तो असतो दगडी कोळसा ! चांगला चाळीस एक बुशेल.' बापूस म्हणतो, 'उतर खाली ख्रिस्तोनिया आणि काढ उकरून, तेव्हा मी हा कचरा उकरून काढतो तांबडं फुटेपर्यंत मी खणतोय आपला आणि सकाळी हा आपला तिथं–'

'हा कोण ?' तोमिलीनने विचारले.

'कोण काय ? आतामान ! दुसरा कोण ? त्याची स्वारी तिथूनच चाललेली–'

'कुणाच्या परवानगीनं ?'

'आम्ही चिडीचीप. आम्हाला धरून बांधून गावाकडे आमची धिंड नेली त्यानं. तिगस्ता कामेन्स्कायाच्या कोडतात आम्हाला बोलावणं ! पण काय होणार ते बापसानं ओळखलं आणि आधीच तो मरून गेला. आम्ही लिहून कळवलं.– 'सदर इसम मयत आहे.'

टीप : १. क्वास– राय आणि बार्ली आंबवून तयार करण्यात येणारे एक काळसर पिंगट आंबूस रशियन पेय.

उकळत्या मक्याचे गाडगे घेऊन ख्रितोनिया चमचे आणायला गाडीकडे गेला.

'मग तुझ्या बापसानं गिरिजाघर बांधायचा नवस फेडलाय की नाही ?' तो परत आल्यावर स्तिपानने विचारले.

'मूर्ख आहेस स्तिपान ! दगडी कोळसा मिळाला तर बांधणार काय ?'

'नवस बोलला की फेडलाच पाहिजे.'

'कोळशाबद्दल काही बोली झाली नव्हती आणि खजिना—'

त्याबरोबर खिदळण्याचा असा काही खकाणा उडाला की तो जाळही थरारल्यासारखा झाला. भांड्यात घातलेले डोके ख्रिस्तोनियाने वर उचललं आणि कशाबद्दल खसखस पिकल्येय हे न समजल्याने त्याने असा काही कल्लोळ उडवून दिला की इतरांचा आवाज त्यात बुडून गेला.

७.

स्तिपान आस्ताखोवशी आक्सीनियाचे लग्न लावून देण्यात आले तेव्हा ती सतरा वर्षांची होती. डॉनच्या पैलतीराच्या वाळूत वसलेले दोब्रोफका हे तिचे गाव.

तिच्या लग्नाआधी एक वर्षाची गोष्ट. गावापासून पाच साडेपाच मैल अंतरावर असलेल्या शेतात तिने नांगर धरला होता. पन्नास वर्षे वयाच्या तिच्या बापाने रात्रीं तिचे हातपाय बांधून तिच्यावर बलात्कार केला.

'चकार शब्द कुठं बोललीस तर मुडदा पाडीन. पण गप्प राहिलीस तर मखमलीचं जाकीट आणि खाली रबरी तळ बसवलेले उंच बूट घेऊन देईन' त्याने तिला वचन दिले.

फाटलेल्या परकरानिशी रात्रीच्या काळोखातून आक्सीनिया धावत खेड्याकडे आली. आपल्या आईच्या पायाशी आपला देह लोटून देत तिने स्फुंदत स्फुंदत सगळी कहाणी सांगितली. तिच्या आईने आणि भावाने रेकल्याला घोडे जुंपले. आपल्याबरोबर आक्सीनियाला गाडीत बसायला लावले. आणि त्या बापाकडे गाडी निघाली. पाच साडेपाच मैलांच्या रस्त्यावर तिच्या भावाने घोड्यांना उरी फुटावे

असे पिटाळले. शेतातील झोपडीजवळच त्यांना तो म्हातारा आढळला. फर्गोल खाली अंथरून त्यावर नशेत धुंद होऊन तो पडला होता. जवळच रिकामी व्होडकाची बाटली होती. आक्सीनिया बघत असताना तिच्या भावाने रेकल्याचा दांडेरा सोडवला. म्हाताऱ्याला एका लाथेत उभा केला. एकदोन प्रश्न विचारले. आणि लोखंडाचे पत्रे ठोकलेल्या त्या दांडेऱ्याचा प्रहार त्याच्या दोन डोळ्यांच्या मधोमध हाणला. तो आणि त्याची आई ह्यांनी त्याला तास दीडतास घोसळला. सदैव आज्ञाधारक पतिव्रता असलेल्या, म्हातारपणाकडे झुकणाऱ्या तिच्या आईने त्या बेहोश नवऱ्याचा केसन्‌केस उपटला. भावाने लाथांचा उपयोग केला. आक्सीनिया तोंड झाकून टेकल्याखाली पडून राहिली होती आणि मिटल्यातोंडी थरथरत होती. पहाटेच्या सुमारास त्यानी तिच्या बापाला घरी आणला. दीनवाणेपणाने तो कण्हत पडला होता. आक्सीनियाला शोधीत त्याचे डोळे खोलीभर भिरभिरत होते. ती लपून बसली होती. त्याच्या फाटलेल्या कानावरून उशीवर रक्त आणि पू वहात होता. संध्याकाळच्या सुमारास तो मेला. रेकल्यातून तो खाली पडला असे त्यानी शेजाऱ्यापाजाऱ्याना सांगितले.

एक वर्षाच्या आतच नटून थटून शृंगारलेल्या गाडीत बसून आक्सीनियाला मागणी घालायला मध्यस्थ आले. रेखीव गर्दन आणि डौलदार बांधा असलेला उंचापुरा स्तिपान त्याच्या नवरीला आवडला आणि पतझडीच्या मोसमात लग्न करायचे ठरले.

आस्ताखोवच्या संसारात आक्सीनियाची घरधनीण म्हणून प्रतिष्ठापना झाली. तो दिवस गोठवणाऱ्या थंडीचा होता. रस्त्यावर पडलेले बर्फही आनंदाने किणकिणत होते.

आक्सीनियाची सासू उंचाडी म्हातारी बाई होती. कुठल्यातरी दुःख देणाऱ्या स्त्रीरोगाने तिची पाठ वाकून गेली होती. सोहळे समारंभ झाल्याच्या दुसऱ्या दिवशी तिने आक्सीनियाला उठवले आणि सैपाकघरात नेले. तिथे उगाच वाचकावाचक करीत ती आक्सीनियाला म्हणाली,

'तुला सून करून घेतल्येय ती गुलगुल गोष्टी करायला नाही– का पलंगावर लोळंपट्टी करायलाही नाही. जा, गायांच्या धारा काढ आणि सैपाकाचं बघ. मी म्हातारी आहे. जिवालाही बरं नाही माझ्या. घरकाम सगळं स्वतःकडं घेतलं पाहिजेस तू. सगळं तुझ्यावरच पडणार आहे.'

त्याच दिवशी स्तिपान आपल्या तरुण बायकोला घेऊन कनगऱ्यात गेला आणि तिला त्याने जाणून बजून भयंकर ठोकून काढली. इतरांना खाणाखुणा

दिसणार नाहीत अशी दक्षता घेऊन तिच्या पोटावर, स्तनावर आणि पाठीवर त्याने तिला झोडपून काढली. त्यानंतर तिची त्याने हेळसांड केली. भ्रतार बाहेर गावी गेलेल्या चंचल भटक भवान्यांची संगत त्याने जोडली. जवळ जवळ रोज रात्री तो बाहेर जायचा. जाताना तिला कनगऱ्यांत नाहीतर चाफेखणीत दरोबस्त कोंडून ठेवायचा.

मूल होईपर्यंत म्हणजे जवळ जवळ दीड वर्ष स्तिपानने तिच्याकडून हूं का चू सहन केले नाही नंतर तो जरा निवळला. तरी तिला आजारायगोंजारयला तो कधीच राजी नसे. रात्री क्वचितच घरी राहायचा.

गुराढोरांचा मोठाच बारदाना असलेल्या शेतीवाडीचा बोजा आक्सीनियावर पडला होता. स्तिपान चाखतमाखत काम कायचा, आणि मग सिगरेट ओढायला, पत्ते खेळायला नाहीतर ताज्या बातम्या ऐकायला जायचा. मग आक्सीनियाला सगळे करायला लागायचे. तिच्या सासूची मदत शून्यच होती. उगाच आपले इकडचे तिकडे केले की ती बिछान्यावर जाऊन लोळायची. ओठ घट्ट आवळून विव्हळ नजर आढ्याकडे लावून कण्हत कुंथत अंगाची मुरकुंडी करून पडली रहायची. मोठाल्या आणि विद्रूप चामखिळांनी डागाळलेला तिचा चेहरा अशावेळी घामाने डबडबून जायचा. गालांवरून आसवांचा एकेक थेंब ठिबकत रहायचा. हातातले काम तसेच टाकून आक्सीनिया कोपऱ्यात लपून बसायची. भयाने आणि अनुकंपेने आपल्या सासूच्या चेहऱ्याकडे टक लावून बघायची.

पोर जन्माला येण्याआधी म्हातारी खपली. सकाळी आक्सीनियाला वेणा यायला लागल्या. दुपारी– म्हणजें ते पोर जगात येण्याच्या सुमारे तासभर आधी– तबेल्याच्या दरवाजाजवळ आजो मरून पडली. बाळंतिणीच्या खोलीत जाऊ नको असा इशारा झिंगलेल्या स्तिपानला द्यायला सुईण पळाली. तेव्हा पाय पोटाशी मुडपून पडलेली ती म्हातारी तिने पाहिली. पोराच्या जन्मानंतर आक्सीनियाने पतिसेवेला वाहून घेतले खरे. पण त्याच्याबद्दल तिला काही भावना उरलेली नव्हती. होती ती फक्त कडवटलेली स्त्रीसुलभ दयाबुद्धी. आणि एक सवयीचा धर्म. ते पोर एका वर्षाच्या आत मेले. जुने आयुष्य परत सुरू झाले. आणि ग्रिशा मेलीखोव जेव्हा तिच्या वाटेत आडवा आला तेव्हा त्या लोभस सावळ्या जवानाचे आपल्याला आकर्षण वाटत असल्याचे ध्यानात येऊन ती थरारून गेली. आग्रही आशाळभूत प्रेमाने तो तिच्या मागे घोटाळू लागला. आणि त्याच्यातील त्या आग्रहीपणालाच आक्सीनिया भीत होती. स्तिपानला तो डरत नाही हे तिने ओळखले. त्याच्यामुळे तो माघार घेणार नाही हे तिने जाणले. स्वत:च्या

इच्छेची तिला जाणीव नव्हतीच. पण सारे बळ एकवटून त्या भावनेचा ती प्रतिकारच करीत होती. तरीही तिच्या ध्यानात असे आले की रविवारी आणि आडवारी आपण विशेष काळजीपूर्वक वेषभूषा करीत आहोत. स्वतःच्याच मनाला फसवीत ती पुन्हा पुन्हा त्याच्या वाटेवर येजा करू लागली. ग्रिगरीचे कृष्णनेत्र आपल्याला उत्कटतेने आणि तल्लीनतेने कुरवाळत आहेत ह्या भावनेने ती सुखावून जायची. एकाद दिवशी सकाळी उठून धारा काढायला जाताना ती स्मित करायची. आणि का ते कळून स्वतःशीच म्हणायची, 'आज काहीतरी आनंदाचं घडणारं' पण का ? अय्या, ग्रिगरी. . . ग्रिशा, आंतरबाह्य व्यापून टाकणाऱ्या ह्या नवीन भावनेने ती घाबरून जाई. मग विचारात चूर झालेली आक्सीनिया मार्च महिन्यातील वितळत्या बर्फावरून डॉन ओलांडावी अशी चाचपडत खबरदारीने पावले टाकू लागायची.

शिबिराकडे गेलेल्या स्तिपानाला निरोप दिल्यानंतर आता ग्रिगरीला शक्य तेवढे टाळायचे तिने ठरवले. मासळी धरायच्या त्या दिवसापासून तर तिचा निश्चय जास्तच ठाम झाला.

८.

ट्रिनिटीच्या सुमारे दोन दिवस आधी खेड्यातील चराऊरानाच वाटप झाले. पंतीलेय् बटवाऱ्याला हजर होता. जेवायच्या वेळेला तो परत आला. तोंडाने रेकत त्याने पायातले बूट झाडून टाकले. थकलेली पावल कराकरा खाजवीत त्याने बातमी दिली.

'लाल तटाईजवळचा पट्टा आपल्याला मिळालाय. गवत काही म्हणावं तसं नाही. पट्ट्याचा वरचा भाग जंगलापर्यंत गेलाय. कुठं नुसतं गवत आहे. कुठंकुठं कुसळ उगवलंय.'

'गवत कधी काढायचं ?' ग्रिगरीने विचारले.

'सणसुद झाल्यानंतर—'

'दार्याला घेणार काय बरोबर ?' म्हातारीने रागेजून विचारलं. पंतीलय् प्रकोफीएविचने तिला हुडुत करून झटकून टाकले.

'लागली जरूर तर घेऊ. वाढायला घे. 'आ' करून काय उभी राहिल्येस?'

त्याच्या म्हाताऱ्या बायकोने चुलवणीचे दार खडखडत उघडले आणि गरम केलेला कोबीरस्सा बाहेर काढला. पंतीलेयुचे जेवण बराच वेळ चालले होते. त्यादिवशी काय काय झाले... तमाम कझाक मंडळीच्या डोळ्यात चालबाज आतामाननं कशी धूळफेक केली... त्याबद्दल तो सांगत बसला होता.

'गेल्यावर्षी त्यानं अशीच चालबाजी केली' दार्या मधेच म्हणाली, 'मालाष्कांच्या वावराची वाटणी करताना त्यानं अशीच धूळफेक केली.'

'कुत्र्याची अवलाद आहे साला' पंतीलेय पुटपुटला.

'पण कोळपणी आणि पेंढेबांधणी कोण करणार, बाबा?' दुन्याने भीतभीत विचारले.

'तू काय करणार आहेस?'

'मला एकटीला नाही सगळं जमायचं–'

'आपण आक्सीनिया आस्ताखोवाला बोलावून घेऊ, स्तिपानने त्याची गवत कापणी आपल्याला सांगितली होती. त्याच्या शब्दाला मान दिला पाहिजे.'

दुसऱ्या दिवशी सकाळी मित्का कोर्शुनोव आपल्या हलायक घोड्यावर बसून मेलेखोवच्या आवाडात दौडत आला. रिमझिम पाऊस पडत होता. खेड्यावर दाट धुके तरंगत होते. खोगीरावरून खाली वाकून मित्काने फाटक उघडले आणि त्याची स्वारी आत आली. म्हातारीने त्याला पावलाणावरून हाकारले.

'एमेल्या लफंग्या! काय रे हवं तुला?' तिच्या आवाजातील नाराजी उघड होती. ह्या अफाट आणि भांडकुदळ मित्काबद्दल तिच्या मनात मुळीच ओलावा नव्हता.

'तुला ग काय करायचंय् इलीनिचना?' मित्काने कठड्याला घोडा बांधीत आश्चर्याने विचारले.

'मला ग्रिशा हवाय. कुठाय तो?'

'तो झोपलाय कोपटीतं. पण तुला काय धाड भरली का रे? का पायावरून वारं गेलं तुझ्या तेव्हा घोड्यावर बसलंच पाहिजे?'

'तुला नसती लुडबुड करायची खोड लागलेल्य, मावशे' मित्काने चिडून जबाब दिला. आपल्या चकचकीत कातडी बुटांवर नक्षीदार चाबकाचा फटकारा मारून तो डुलतडुलत ग्रिगरीला शोधायला निघाला. एका गाडीत तो झोपलेला त्याला आढळला. डाव्या डोळ्यांची पापणी आवळीत मित्काने ग्रिगरीला चाबकाचा फटकारा मारला–

'ऊठ ए नांगऱ्या!'

'नांगऱ्या' ही मित्काला सुचू शकणारी सर्वांत इरसाल शिवी होती.

स्प्रिंग लावल्यासारखा ग्रिगरी ताडकन् उठला–

'काय आहे ?–'

'झोपा पुरे झाल्या आता–'

'मित्का आचरटपणा बंद कर, नाहीतर माझ्याशी गाठ आहे–'

'ऊठ. मला तुझ्याशी बोलायचंय–'

'काय ?–'

गाडीच्या एका बाजूवर मित्काने बैठक मारली आणि एका ओलपाटयाने बुटावरचा वाळलेला चिखल खरवडत तो म्हणाला–

'माझा पाणउतारा झाला ग्रिशा–'

'आँ ?–'

'अरे तो आहे–' मित्कान लांबलचक शिवी घातली.

'लेफ्टनंट आहे म्हणून मिजास दाखवतोय्'

तोंड धड न उघडताच तो रागाने तडतडा बोलत होता. त्याचे पाय थरथरत होते. ग्रिगरी उठून बसला–

'कोण लेफ्टनंट ?'

त्याची बाही पकडून मित्का जरा शांतपणे म्हणाला–

'चटकन तुझ्या घोडयावर जीन घाल आणि कुरणावर चल. दाखवतो त्याला !' मी त्याला म्हणालो :

'यावंच तुम्ही हुजूर ! आम्ही बघून घेतो.' तो म्हणाला.

'तुमचे सगळे दोस्त आणि साथीदार घेऊन या. एकजात सगळयाना लोळवीन. सेन्टपिटर्सबर्ग मधे झालेल्या अधिकाऱ्यांच्या अडथळा शर्यतीत माझ्या घोडीच्या आईनं बक्षिसं जिंकलीत.' 'त्याची घोडी अन् तिची आई ह्यांच्याशी मला काय करायचंय ? खड्डयात का जाईनात ! माझ्या जनावराच्या पुढं त्याना जाऊ देणार नाही मी.'

ग्रिगरीने घाईघाईने कपडे चढवले. रागाने धुमसत मित्का त्याला घाई करीत होता.

'मोखोव शेटच्या घरी तो पाहुणा आलाय. दम धर. त्याचं नाव काय बरं ? लिस्त्‌नित्स्की मला वाटतं ! उंचापुरा आणि उग्रट दिसणारा आहे, चष्मा लावतो !'

अरे लावी ना का ? चष्मा काय त्याला मदत करतो काय ? माझ्या जनावराला तो काय गाठतो बिशाद !' ग्रिगरीने हसत हसत आपल्या म्हाताऱ्या

घोडीवर जिन चढवलं आणि बापाला टाळण्यासाठी खळ्याच्या फाटकातून तो दौडत उघड्या मैदानात आला. टेकडीच्या पायथ्याशी असणाऱ्या कुरणाकडे ते थोडी फेकीत आले. एका पार सडलेल्या हिवरच्या झाडाजवळ घोडेस्वार त्याची वाट बघत होते. लेफ्टनंट लिस्तनित्स्की एका देखण्या उमद्या घोड्यावर आरूढ झाला होता आणि खेड्यातील सात जवान आपापल्या घोड्यावर स्वार झाले होते.

'कुठून सुरवात करायची ?' त्या अधिकाऱ्याने मित्काकडे पाहून विचारले, एकभिंगी चष्मा नाकावर नीट बसवीत त्याने त्या जनावराच्या दणकट छाताडाकडे कौतुकाने पाहिले.

'हिवर झाडापासून झारच्या तळ्यापर्यंत–'

'कुठं आहे झारचं तळं ?' किलकिल्या डोळ्यांनी दूरचे पाहण्याचा प्रयत्न करीत लिस्तनित्स्कीने विचारले.

'तिकडे आहे हुजूर ! रानाच्या कडेला–'

त्यांनी घोडे ओळीत आणले. त्या अधिकाऱ्याने आपला चाबूक उंच डोईवर धरला.

'मी तीन म्हटलं की सुटायचं ! ठीक ? एक . दोन...तीन!'

खोगीरमुदीवर खालवर झुकलेला आणि टोपी हाताने दाबून धरलेला लिस्तनित्स्की पुढे गेला. सेकंदभर तो सगळ्यांच्या पुढे होता. पांढराफटक चेहरा झालेला मित्का रिकिबीत उभा राहिला. आपल्या घोड्याच्या पुठ्ठ्यावर चाबूक ओढण्यातील त्याची ढिलाई ग्रिगरीला असह्य वाटत होती.

झारच्या तळ्यापर्यंत सुमारे दोन मैल अंतर होते. निम्मे अंतर काटल्यावर मित्काच्या घोड्याने तीरासारखे लिस्तनित्स्कीच्या घोडीला गाठले. सुरुवाती-पासूनच मागे राहिलेला ग्रिगरी त्या घोडेस्वारांची उधळलेली साखळी बघत दुडक्या चालीने येत होता.

झारच्या तळ्याजवळ वाळूची उटंगळ होती. वासंतिक जळाने ती तयार झाली होती. तिच्या पिवळ्या मदारीवर तण माजले होते.

तो लेफ्टनंट आणि मित्का उटंगणीवरून दौडत जाऊन माथ्यावरून पलीकडे दिसेनासे झालेले ग्रिगरीला दिसले. त्यांच्या मागोमाग इतर घोडेस्वारही गेल. तो तळ्यापाशी पोचला तेव्हा सगळ्या घोड्यांचा घोळका उभा होता. लिस्तनित्स्कीच्या भोवती इतरांनी गराडा घातला होता. आवरून धरलल्या आनंदाची तुकतुकी मित्काच्या तोंडावर पसरली होती. त्याच्या प्रत्येक हालचाली-तून त्याचा 'विजय' व्यक्त होत होता. तो लेफ्टनंट तिळमात्रही बावरून गेला

नव्हता. झाडाला पाठ टेकून तो सिगरेट ओढीत उभा होता. आपल्या फेसाळल्या तोंडाच्या घोडीकडे बोट करून तो म्हणाला–

'आधीच तिच्यावरून माझी शंभर मैलाची रपेट झालीय. कालच मी गावाहून आलो. ती ताज्या दमाची असती तर तू मला कधीही गाठू शकला नसतास, कोर्शुनोव '

'शक्य आहे.' मित्का दिलदारपणे म्हणाला.

'त्याचा घोडा सगळ्या जिल्ह्यात चांगला आहे.'

अंगावर पिवळसर डाग पडलेल्या एका मुलाने मत्सराने सांगितले.

'चांगलं जनावर आहे.' असं म्हणून मित्काने घोड्याची गर्दन थोपटली. भावनावेगाने त्याचे हात थरथरत होते. ग्रिगरीकडे नजर टाकून तो बावळट-सारखा हसला.

इतरांना सोडून ग्रिगरी आणि मित्कानी घोडीं घराकडे वळवली. गावात त्यानी चक्कर मारली. लेफ्टनंट लिस्तनित्स्कीने त्याचा थंडपणे निरोप घेतला. टोपीच्या ढापणाखाली दोन बोटे खुपसली आणि मोहरा वळवला.

घराच्या जवळ येत असताना समोरून आक्सीनिया येताना ग्रिगरीने पाहिली. हातातल्या डहाळीची पाने खुडत ती चालली होती. त्याला पाहिल्यावर तिने मस्तक खाली झुकवले.

'लाजायला काय झालं? आम्ही काय नागव्यानं हिंडतोय?' असे ओरडून मित्काने डोळा मारला.

'बर्फफुलाच्या कडवट झाडा–' तो गाऊ लागला.

नाकासमोर बघत ग्रिगरीने तिच्या अंगाला घसटून घोडी नेली आणि तुर्की चालीने चालणाऱ्या घोडीवर अचानक चाबूक ओढला. त्याबरोबर घोडी मागच्या पायांवर उभी राहिली आणि आक्सीनियावर राडपाण्याचा फवारा उडाला.

'पागल सैतान!'

गर्रकन् मोहरा वळवीत आणि फुरफुरलेले जनावर तिच्याजवळ आणीत ग्रिगरीने सवाल केला–

'नमस्ते का म्हणत नाहीस?'

'तुझी लायकी नाही ती–'

'म्हणूनच राड उडवली तुझ्या अंगावर. स्वतःला जादा समजू नको.'

'जाऊ दे मला.' घोडीच्या नाकापुढे हातवारे करीत आक्सीनिया ओरडली. 'कशासाठी तुझ्या घोड्याखाली तुडवतोयस मला?'

"ती घोडी आहे, घोडा नाही.'

'मला काय त्याच्याशी करायचंय ? मला जाऊ दे.'

'रागवायला काय झालं आक्सीनिया ? त्या दिवशी कुरणावर जे झाले त्याबद्दल नाही ना ?'

ग्रिगरीने तिच्या डोळयात रोखून पाहिले. आक्सीनियाने काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या काळयाभोर नेत्रांच्या कडेने एक अश्रू ओघळला आणि तिच्या ओठांची केविलवाणी थरथर झाली. कष्टाने आवंढा गिळीत ती कुजबुजली–

'जा ना रे, ग्रिगरी– मी रागावले नाही. मी–' आणि ती निघून गेली.

चकित झालेल्या ग्रिश्काने मित्काला फाटकाजवळ गाठले.

'संध्याकाळी येणार का बाहेर ?' मित्काने विचारले.

'नाही'

'का ? काय झालं ? का रात्रीच्या सोबतीला तिनं बोलावलं तुला ?'

ग्रिगरीने कपाळ तळव्याने चोळले आणि काहीच उत्तर दिले नाही.

९.

जमिनीवर विखुरलेल्या थाइमचा पाचोळा–चोळामोळा पानांचा चुरा–फाटकाना आणि पावलानाना बांधलेल्या ओक आणि अॅशच्या सुकलेल्या झडलेल्या तुटक्या डहाळचा अेवढचाच खेडचातील घरातून ट्रिनिटीच्या खुणा उरल्या होत्या.

गवत कापणी 'ट्रिनिटी' नंतर लागलीच सुरू झाली. बायकांचे सणासुदीचे झगे, अेप्रन्सवरचे भडक भरतकाम आणि रंगीबेरंगी रुमाल ह्यानी उजाडल्यापासून कुरणे फुलू लागली. सबंध खेडे गवत कापणीला लागले. वर्षाच्या सणाला करावेत असे पोशाख निखदणी आणि पेंढे बांधणी करणाऱ्यांनी केले होते. पूर्वापार असेच चालत आले होते. डॉनपासून दूरच्या आल्डर झाडीपर्यंत सगळे उध्वस्त कुरण रान सचेतन होऊन निःश्वासू लागले.

मेलेखोव कुटुंबाला काम सुरू करायला विलंब झाला. निम्मे खेडे कुरण रानावर जाऊन काम करू लागले तेव्हा हे बाहेर पडले.

'फार वेळ झोपून राहता पंतीलय प्रकोफीअेविच्' घाम गाळणाऱ्या पेन्ढी बांधणाऱ्यांनी त्याचे स्वागत केले.

'माझा दोष–हृचा बायकाच परत–' म्हातारा हसला आणि कच्चे चामडे लावलेल्या आसुडाने त्याने बैलाना ढोसले.

'राम राम शेजारी ! तुम्हाला थोडा उशीरच झाला, नाही का !' गवताची टोपी घातलेल्या अेका उंच कझाकने विचारले. रस्त्याच्या कडेला दावलीला पाणी देत तो उभा होता.

'गवत सुकूनबिकून जाईल का काय ?'

'वेळेवर हालला नाहीत तर सुकायला वेळ नाही लागणार. तुझा कापणीचा पट्टा कुठं आहे ?'

'लाल तराईजवळचा–'

'तुझे 'अंजनी' हाकून ने लवकर. नाही तर आजच्या दिवसात तिथवर पोहचायचा नाहीस.'

गाडीच्या फसाटीला आक्सीनिया बसली होती. उन्हाचा त्रास चुकवण्यासाठी तिने तोंड पूर्णपणे झाकून घेतले होते. डोळ्यांपुरत्या ठेवलेल्या फटीतून ती तिच्या समोरच बसलेल्या ग्रिगरीकडे निश्चलपणे आणि रोखून बघत होती. दार्याही रविवारच्या खास कपड्यात होती. रेकल्याच्या पावतकीवर तिचे पाय लोंबकळत होते. हातावर घेतलेल्या आणि पेंगणाऱ्या आपल्या पोराच्या तोंडात तिने आपला लांबोडा, निळ्या शिरा उठून दिसणारा स्तन दिला होता. दुन्या पेटीवर बसून चुळबुळत होती. तिचे डोळे आनंदाने कुरणाचे आणि रस्त्याव र ये जा करणाऱ्या लोकांचे निरीक्षण करीत होते नाकावर पिवळट ठिपक्यांची कणी असलेला तिचा उन्हात रापलेला आनंदी चेहरा जणू सांगत होता, 'मला आनंदी आणि सुखी वाटतंय. कारण निळं आणि निरभ्र आकाश असलेला दिवसही सुखात आहे. माझं मनही त्याच निरभ्र नीलप्रसन्नतेनें भरून गेलं आहे. मी सुखी आहे. मला हवं ते सगळं मिळालंय.'

आपल्या सुती सदऱ्याची बाही मुठीत पकडून पंतीलेयने टोपीतून ओघळणारा घाम पुसला. त्याच्या ओणव्या पाठीवर सदरा घट्ट ताणला गेला होता आणि घामट ठशांनी तो कुठे कुठे काळपटलेला होता. एका भुरक्या झुबकेदार ढगातून तिरपी उन्हे बाहेर पडली होती. आणि त्यामुळे धुकट वक्र किरणांचा एक पंखा कुरणावर, खेड्यावर आणि डॉनच्या दूरबरच्या चंदेरी टेकड्यांवर पसरला होता.

त्यादिवशी उकाडा होत होता. लहान लहान ढग इतक्या सुस्तपणे सरकत होते की रस्त्यावरून रखडत चाललेल्या पंतीलेय्च्या बैलानाही ते गाठत नव्हते. स्वत: तो म्हाताराही आळसटल्यासारखा आसूड उचलत आणि फिरवत होता. बैलांच्या हाडं निघालेल्या पाठाडीवर तो मारावा किंवा नाही असा जणू त्याला संदेह पडला होता. जणू काही हे ओळखूनच बैलही आपली चाल वाढवीत नव्हते. मंद गतीनं चाचपडल्यासारखे आपले द्विशफ ते पुढे टाकीत होते आणि शेपटचा फिरवीत होते. एक धुळकट सोनेरी नारिंगी गोमाशी त्यांच्या अंगावर गिरक्या घेत होती. खळ्याजवळ खुरपून झालेली कुरण जमीन फिकट हिरव्या ठिगळानीं झळकत होती. जिथे अजून खुरपणी झाली नव्हती तिथे काळ्या रंगाची छटा असलेले गवताचे रेशीम वाऱ्यावर सळसळत होते.

'तो आपला पट्टा.' पंतीलेय्ने चाबूक उडवून सांगितले.

'रानापासून सुरु करायचं का ?' ग्रिगरीने विचारले.

'इकडून सुरवात करायला हरकत नाही. इथं मी फावड्याची खूण केल्येय.'

दमलेले बैल ग्रिगरीने सोडले. म्हाताऱ्याच्या कानातील कोर चमचमत होती. परवाच्या दिवशी त्याने केलेली खूण पहायला तो गेला. तिथे त्याने एक शब्द कोरून काढलेला होता.

'दावल्या आण.' थोड्या वेळाने हात हालवीत तो ओरडला.

गवत तुडवीत ग्रिगरी त्याच्याकडे गेला. त्याच्या मागोमाग गवताचा हलका पट्टा उमटत गेला. दूरवरच्या घंटामनोऱ्याकडे तोंड वळवून पंतीलेय् उभा राहिला. आणि त्याने अंगावर क्रूसाची खुण केली. जसे काही नुक्तेच रोगण लावल्यासारखे त्याचे बाकदार नाक चमकत होते. त्याच्या कोळपलेल्या गालफडाच्या खड्डयात घामाचे ओघळ साचले होते. तो हसला आणि त्याच्या काळ्याभोर दाढीतून त्याच्या दातांची पांढरी शुभ्र सुरेख ओळ चमकली. त्याची सुरकुतलेली गर्दन त्याने उजवीकडे झुकवली आणि गवतातून सपकन दावली फिरवली. खुरपलेल्या गवताचे सात फुटी अर्ध वर्तुळ त्याच्या पावलाशी तयार झाले.

अर्धोन्मीलित डोळ्यानी ग्रिगरी त्याच्या मागोमाग चालला होता. दावलीने गवताचे भारे पाडीत होता. बायकांच्या एप्रन्सचे इंद्रधनुष्य त्याच्यासमोर फुलले होते. पण त्याचे डोळे कशिद्याचे काठ लावलेला एकच एप्रन शोधीत होते. आक्सीनियाकडे त्याने नजर टाकली आणि बापाच्या पावलांशी आपली लय जमवीत त्याने परत गवत कापायला सुरवात केली.

आक्सीनिया अष्टौप्रहर त्याच्या ध्यानीमनी होती. डोळे अर्धवट झाकीत कल्पनेतच त्याने तिचे चुंबन घेतले आणि उत्कट लडिवाळ शब्दात तो तिच्याशी बोलला. कुठून आणि कसे हे शब्द आपल्या जिभेवर आलेत ते त्याला समजले नाही. मग त्याने असले विचार झटकून टाकले आणि परत तो तालात पावले टाकू लागला. एक...दोन...तीन...परत त्याचे मन गतकाळाच्या प्रसंगात भरकटले. गवताच्या दमट उटव्यात बसलो होतो. ते कुरणावर प्रकाशणारा चंद्र झुडपांवरून मधूनच पाण्यात ठिबकणारा थेंब..एक दोन.. तीन मस्त ! आहा! ते मस्त होतं !

आपल्यामागून त्याने हसण्याचा आवाज ऐकला. त्याने वळून पाहिले. दार्या गाडीखाली झोपली होती. आक्सीनिया तिच्यावर ओठंगून तिला काहीतरी सांगत होती. दार्या हातवारे करीत होती आणि परत त्या दोघी हसत होत्या. दुन्या जुंपणीच्या जोत्यावर बसली होती. आणि कर्कश आवाजात गाणे म्हणत होती. 'झाडापर्यंत जावे आणि मग दावणीला पाणी द्यावे' ग्रिगरीने विचार केला. त्याच क्षणी त्याला कोणत्या तरी कोमल आणि लुसलुशीत वस्तूंतून आपल्या दावलीचे पाते गेल्याचे जाणवले. तो खाली वाकला. एक लहानसे रानबदकाचे पिल्लू गवतातून केकाटत तुरतुरत गेले. जिथे बीळ होते त्या घराजवळ दुसरे एक मुटकुळे करून पडले होते. ते मेलेले पाखरू त्याने तळहातावर ठेवले. ते अंड्यातून बाहेर पडून थोडेच दिवस झाल्याचे स्पष्ट दिसत होते. त्याच्या मऊ परात अजून जिवंत ऊब होती.

सपाट अर्धवट उघडलेल्या चोचीवर रक्ताचा एक गुलाबी बुडबुडा होता. मण्यासारख्या डोळ्यांना शहाजोग चुण्या पडल्या होत्या. पाय अद्याप गरम होते. आणि थरथरत होते. आपल्या हातावरील त्या निश्चळ गोळ्याकडे तो अतीव कणवेने टक लावून पाहू लागला.

'काय सापडलं तुला ग्रिशा ?' खुरपणी झालेल्या वाफ्यातून दुन्या नाचत नाचत आली. तिचे शेपटे तिच्या वक्ष:स्थळावर आंदूळत होते. कपाळाला आठ्या घालून ग्रिगरीने ते बदकाचे पिल्लू फेकून दिले आणि रागाने दावली सरसावली.

त्याचे जेवण घाईतच उरकले. डुकराची चरबी आणि कझाकांचे हुकमी पान असणारे बिनसाईचे आंबट दूध एवढेच जेवण ! त्यानी हे घरून आणले होते.

जेवण झाल्यावर बायका पेंढे बांधू लागल्या. कापलेले गवत कोमेजले आणि सुकले. त्यातून एक डोक्यात भिनणारा उग्र गंध सुटला.

'घरी जाण्यात काही अर्थ नाही' जेवताना पंतीलेय् म्हणाला 'रानात बैलं

चरायला सोडू आणि उद्या गवतावरची पहाटओल ओसरली रे ओसरली की खुरपणी संपवून टाकू.'

दिवसाचे काम त्यांनी संपवले तेव्हा काळोख पडू लागला होता. आक्सीनियाने शेवटच्या पेंढ्या बांधल्या आणि मक्याचा लगदा शिजवण्यासाठी ती गाडीकडे गेली. सबंध दिवसभर तिने दुष्टपणे ग्रिगरीची टर उडवली होती. कोणत्या तरी प्रचंड अविस्मरणीय दुखापतीचा सूड उगवावा अशा ओसंडत्या द्वेषाने तिचे डोळे त्याच्यावर रोखलेले होते. उदास आणि कोमेजून गेलेल्या ग्रिगरीने बैलांना कसेतरी डॉनवर पाण्याला नेले. त्याच्या बापाचे त्याच्यावर आणि आक्सीनियावर दिवसभर लक्ष होते. नाराजीने ग्रिगरीकडे पाहत तो म्हणाला,

'जेवण करून घे आणि मग बैलांवर लक्ष ठेव. गवतात ती तोंड घालत नाहीतसं बघ. माझा मेंढी कुडता घेऊन जा.'

दार्याने आपले पोर गाडीखाली ठेवले आणि ती झाडंझुडपं गोळा करण्यासाठी दुन्याबरोबर रानात गेली.

कुरणावरच्या गडद बेलाग आभाळांत क्षयी चंद्र उंच चढला होता. जाळाभोवती पतंगाचे शुभ्र वादळ घिरट्या घालत होते. झगरीजवळ एका रकट्यावर जेवण वाढले होते. धुरकटलेल्या गाडग्यात मका शिजत होता. आपल्या पदराणीच्या काठाने चमचा पुसत दार्याने ग्रिगरीला हाक मारली–

'चल जेवायला ये.'

बापाचा मेंढीकुडता खांद्यावर ओघळलेला ग्रिगरी अंधारातून अवतीर्ण झाला आणि झगरीकडे आला.

'आज लहर कशानं फिरल्येय ?' दार्याने स्मित करून विचारले.

'पाठ दुखत्येय ! पाऊस पडणारसं दिसतंय' सहजगत्या द्यावे असे त्याने प्रत्युत्तर दिले.

'त्याला बैलांची राखण करायला नकोय्.' दुन्या हसली आणि आपल्या भावाजवळ बसून तिने संभाषणाचा प्रयत्न केला. पण काही केल्या तिचे प्रयत्न सफल होईनात. अर्धाकच्चा मका दाताने चावत पंतीलेय् खीर भुरकत होता. डोळे वर न करता आक्सीनिया खात होती. दार्याच्या विनोदाला बळेच हसत होती. छळणाऱ्या लालीने तिचे गाल तापून गेले होते.

सर्वांच्या आधी ग्रिगरी उठला आणि बैलांकडे चालता झाला.

'बैलांकडं नीट बघ. दुसऱ्या कुणाचं गवत तुडवू देऊ नको.' त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून त्याच्या बापाने ओरडून सांगितले आणि एवढ्यात

मक्याचा घास गळ्यात अडकून बराचवेळ कर्कश आवाजात तो ठसकत राहिला. आपले हसू दाबण्याचा प्रयत्न करणाऱ्या दुन्याच्या गालांचा फुगा झाला होता.

जाळ आता कमी झाला होता. धुमसणाऱ्या झाडाझुडपांनी त्या इन्यागिन्या मंडळींना जळत्या पानांच्या मधुगंधानें वेढून टाकले.

मध्यरात्री ग्रिगरी चोरपावलाने छावणीजवळ आला आणि सुमारे दहा पावलावर येऊन थबकला. गाडीत त्याचा बाप सुरेल घोरत होता. धुगधुगणारे निखारे सुवर्णमोराच्या डोळ्यांसारखे राखेतून टवकारून बघत होते.

एक धुरकट अवगुंठित आकृती गाडीतून बाहेर पडली आणि हळूहळू ग्रिगरीकडे आली. दोन तीन पावलांवर ती थबकली. आक्सीनिया! ग्रिगरीचे काळीज थडाथड उडू लागले. त्याने दबून पुढे पाऊल टाकले. आपल्या मेंढेकुडत्याचे टोक मागे फेकले आणि तिचा शरणागत धगधगता देह आपल्या अंगाशी कवटाळला- तिचे पाय गुडघ्यात झुकले. ती थरथरु लागली. तिचे दात थडथडू लागले. फाड-लेले कोकरू लांडग्याने पाठीवर मारावे तसे ग्रिगरीने तिला झटदिशी खांद्यावर टाकले आणि बटणे सुटलेल्या कोटाच्या, पायात लोळत येणाऱ्या काठावर धडपडत धूम ठोकली.

'अ: ! ग्रिशा, ग्रिशा ! तुझे बाबा ...'

'गप्'

त्याच्या मिठीतून स्वत:ला सोडवून घेण्याचा प्रयत्य करणारी, मेंढयांच्या उग्र लोकरीत गुदमरल्याने धापा टाकणारी, कटु पश्चात्तापाने सद्गदित झालेली आक्सीनिया ओरडल्यासारखे वाटावे अशा दबल्या कण्हणाऱ्या आवाजात म्हणत होती–

'सोड मला.. आता काय उपयोग? मी स्वत:च येते.'

१०.

स्त्रीच्या जीवनातील वेळावलेले प्रेम सुनील किंवा आरक्त खसखस सुमनां-सारखे नसते. ते असते आडवाटेला उगवणाऱ्या गांजेफुलासारखे माथेफिरू.

खुरपणीनंतर आक्सीनिया पार बदलून गेली. जणूकाही कुणीतरी तिच्या तोंडावर निशाणी ओढली होती, मुद्रा ठोकली होती. ती भेटली की दुसऱ्या

बायका गालातल्या गालात हसू लागल्या. तिची पाठ वळली की माना हलवू लागल्या. इतर मुलींना तिचा मत्सर वाटू लागला. ही मात्र आपले सुखावलेले पण निर्ढावलेले डोके ताठ ठेवून होती.

ग्रिगरी मेलीखोवच्या आणि तिच्या प्रकरणाचा लौकरच गवगवा झाला. प्रथम माणसे अर्धवट साशंकतेने कुजबुजत होती. पण पवनचक्कीजवळ रायच्या कोवळ्या शेतात पहाटेच्या चांदण्यात त्यांना एकमेकांच्या कुशीत त्या खेड्यातील धनगराने जेव्हा पाहिले तेव्हा वशाडीवर आदळणाऱ्या गढूळ लाटेप्रमाणे ती अफवा गावात फुटली.

पंतीलेयच्याही कानावर हा प्रकार आला. एका रविवारी त्याला मोखोवच्या दुकानी जाण्याचा प्रसंग आला. तिथे लोकांची अमाप गर्दी उडाली होती. तो आत गेल्यावर प्रत्येकजण त्याच्याकडे पाहून हसत त्याला वाट करून देऊ लागला. कापडचोपड जिथे विकत होते त्या फळीजवळ तो लोकाना रेटत गेला. दुकानाचे मालक सेर्गेइ प्लोतोनोविच मोखोव जातीने म्हाताऱ्याच्या सेवेला धावून आले.

‘इतके दिवस कुठे होतास प्रकोफीएविच ?’

‘कामाचा व्याप ! शेतकामाची कटकट !’

‘काय ? एवढे मुलगे असून कटकट कसली ?’

‘कुठले मुलगे ? प्योत्र तर शिबिराला गेलाय, सगळं करायला आहोत फक्त मी आणि ग्रिशा–’

मोखोवनी आपली कडक तांबूस दाढी बोटानी फाकली आणि कझाकांच्या घोळक्याकडे डोळ्यांच्या कोपऱ्यातून सहेतुक कटाक्ष टाकला.

‘खरंय रे म्हाताऱ्या ! आम्हाला ह्याबद्दल काही सांगायचंस तर खरं !’

‘कशाबद्दल–’

‘कशाबद्दल काय ? पोराचं लगीन काढलंस आणि कुणाला पताही नाही लागू देत.’

‘कुठल्या पोराचं ?’

‘कुठल्या काय ? ग्रिगरीचे लग्न कुठं झालंय ?’

‘त्याचं लग्न लाऊन द्यायचा अजून विचार नाही.’

‘पण मी तर ऐकलं की सून आणतोयस घरी म्हणून...स्तिपान आस्तारखोवची आक्सीनिया.’

‘काय ? तिचा भ्रतार जिवंत असताना ? बोलतोस काय प्लोतोनोविच ? थट्टाबिट्टा तर नाही मांडलीस ?’

फळीवर पसरलेल्या कापडाच्या चुण्यावरून पंतीलेयने हात फिरवला आणि झर्रकन् वळून लंगडत लंगडत तो दाराकडे निघाला. त्याने सरळ घराची वाट धरली. एखाद्या बैलासारखी मुंडी खाली झुकवून आणि बोटांची मूठ आवळून लंगड्या पायावर जास्तच लंगडत तो चालत होता. आस्ताखोवच्या घरावरून जाताना वळुंजीच्या कुंपणापलीकडे त्याची नजर गेली. नटली थटली तरणीताठी दिसणारी आक्सीनिया नितंब लचकवीत एक बादली घेऊन घरात जात होती.

'थांब ए!' असे ओरडून त्याने रागाने फाटक उघडले व तो आत शिरला आक्सीनिया थबकून उभी राहिली. तो जवळ येण्याची वाट बघू लागली. ते दोघे घरात शिरले. स्वच्छ केरवारे केलेल्या मातीच्या जमिनीतून कुसंबी रेती चमकत होती.

कोपऱ्यातील बाकड्यावर नुकत्याच तव्यातून काढलेल्या 'पिरोगी[1]' होत्या. कुबट कपड्याचा आणि गोड सफरचंदाचा वास चाफेखणीतून येत होता.

भले मोठे डोके असलेले बांड्या रंगाचे पट्टेरी मांजर पंतीलेय्च्या पायात घोटाळत गुरगुरू लागले. पाठीची कमान करून त्याच्या बुटांना ते लगटू लागले. पंतीलेय्ने त्याला चिडून अशी काही लाथ हाणली की पार त्या बाकड्याच्याही पलीकडे ते उडाले.

'मी हे सगळं काय ऐकतोय? ऑं?' आक्सीनियाच्या डोळ्यांत रोखून बघत तो किंचाळला.

'तुझा नवरा आत्ता कुठं नजरेआड झाला नाही तर लागलीच दुसऱ्याच्या कसोटचाचं तीर्थ घ्यायला! ग्रिशाचं रगत सांडीन ह्याबद्दल. आणि स्तिपानालाही लिहून कळवीन. जाऊ दे त्याच्या कानावर! अग रांडे, तुझं पुरतं कांडात निघालं नाही वाटतं अजून? खबरदार यापुढे माझ्या परसात पाय टाकशील तर! निघाली मारे पोरासोराबरोबर रंग खेळायला. येऊ दे स्तिपान म्हणजे मी...'

डोळे किलकिले करून आक्सीनिया ऐकत होती आणि एकदम निर्लज्जपणे आपल्या झग्याच्या काठाला गोलाकार उचलझटका देऊन तिने पंतीलेय्ला बायकी कपड्याच्या वासाने गुदमरून टाकले. वक्षस्थळ उंचावून ती त्याच्याजवळ आली. ओठ काढून दात दाखवीत ती म्हणाली–

'कोण रे तू? माझा सासरा? आं? तू कोण मला शिकवणार? घरी जा आणि आपल्या बूड सुटलेल्या बायकोला शिकव. तुझी शिस्त तुझ्या आवाडांच्या आत ठेव. चल चालता हो. मला धमकवतोय!'

टीप : १. पिरोगी– केकसारखा एक खाद्य विशेष.

'दम धर बेवकूफ भवाने !'

'दम धरायला आहे काय ? जिथून पडलास तिथं जा ना मेल्या ! आणि तुझा ग्रिशा मला हवा असेल तर त्याला कच्चा खायला सोडणार नाही आणि फळं भोगायला मागं हटणार नाही ! मारणार आहेस मला ? लिहिणार आहेस माझ्या नवऱ्याला ? आतामानला का लिहिनास ! पण ग्रिशा माझ्या मालकीचा आहे. तो माझा आहे ! माझा. तो माझ्याजवळ आहे आणि त्याला मी ठेवून घेणार आहे !'

लटपटू लागलेल्या पंतीलेयला आक्सीनियाने आपल्या ऊराने रेटले. (जाळ्यात सापडलेल्या माळढोक पक्षासारखे तें ऊर तिच्या पातळ चोळीतून उसळू बघत होते) आपल्या कृष्ण नेत्रातील ज्वाळांचे तिने त्याला चटके दिले, अधिकाधिक भयंकर आणि अवाच्य शब्दांनी त्याला नको नको करून टाकले. त्याच्या भुवया थरथरू लागल्या. तो म्हातारा मागच्या पावली दाराकडे सरकू लागला. कोपऱ्यात ठेवलेली आपली काठी चाचपडू लागला आणि हात उडवीत ढुंगणाने फाटक उघडले. धापा टाकीत आक्सीनियाने त्याला वाटेतून दूर लोटले आणि उन्मत्तपणे ती किंचाळून म्हणाली—

'मी प्रेम करणार ! मला भोगाव्या लागलेल्या अन्यायाचं पुरतं उट्ट काढणार ! मग वाटलं तर माझा जीव घ्या. तो माझा ग्रिशा आहे ! माझा !'

दाढीतल्या दाढीत काहीतरी पुटपुटत पंतीलेय् लंगडत झपाट्याने घराकडे निघाला.

ग्रिगरी त्याला खोलीत आढळला. चकार शब्द न बोलता त्याने पोराच्या पाठीवर काठी हाणली. कळवळून ग्रिगरी आपल्या बापाच्या खांद्यावर वाकला.

'का पण बाबा ?'

'तुझ्या कर्मासाठी रांडेच्या !'

'कसलं कर्म ?'

'शेजाऱ्याचं वाटोळं करू नको ! बापाच्या तोंडाला काळोखी फासू नको ! बायकांच्या मागं लागू नको कुत्तरड्या !' पंतीलेय्च्या नाकपुड्या फुलल्या होत्या. हातातील काठी पकडलेल्या ग्रिगरीला ती काठी परत मिळवण्यासाठी खोलीभर फरफटवीत होता.

'बाबा, मी मारू देणार नाही तुला !' ग्रिगरी खरखरीत आवाजात ओरडला आणि दात लावून त्याने बापाच्या हातून काठी हिसकावून घेतली. त्याच्या गुडघ्यावर ती विसावली आणि काडकन् तुटली ! आपल्या दणकट गुद्याने पंतीलेय्

प्रकोफीएविच्ने त्याच्या मानेवर हाणले. 'सगळ्या लोकांच्या देखत तुला आसुडाने फोडून काढतो. विधूळवाट्या ! कुळबुडव्या !' आणखी एक टोला ठेवून देण्याच्या सुरसुरीने पंतीलेय् ह्या पायाचा त्या पायावर नाचू लागला. 'खेड्यातल्या एखाद्या देडगळ पोरीच्या गळ्यात तुला बांधतो, खच्ची करून टाकतो तुला !' त्याच्या बापाने डरकाळी फोडली.

तो गोंगाट ऐकून म्हातारी आई धावत त्या खोलीत आली.

'पंतीलेय् प्रकोफीएविच् ! शांत हो. शांत हो !' पण म्हातारा रागाने खरोखरच बेभान झाला होता. त्याने दिलेल्या धक्क्याने त्याची बायको कोलमडून गेली. शिवण्याचे मशीन ठेवलेले टेबल त्याने उलथून टाकले. आणि फत्ते झाल्या-सारखा तो धावत आवाडात आला. त्या झटापटीत ग्रिगरीचा सदरा फाटला. तो काढायलाही त्याला वेळ मिळाला नाही. कारण तेवढ्यात दार धाडकन आपटले आणि वादळी ढगासारखा त्याचा बाप परत उंबरठ्यावर येऊन उभा राहिला.

'तुझं लगीनच लावून टाकतो. कुत्तेकी अवलाद !'

घोड्याने टाप टाकावी तसा त्याने पाय आपटला आणि ग्रिगरीच्या पुष्ट पाठीकडे तो रोखून पाहू लागला. 'उद्याच गाडी घेऊन निघतो आणि जमवून टाकतो. माझ्या पोरापायी लोकांनी फिदीफिदी हसावं म्हणून जगलो नाही.'

'आधी मला सदरा घालू दे. मग लाव माझं लगीन.'

'खेडवळ, बिनक्कल पोरीशीच लावतो तुझं लग्नं.'

धाडकन दार आपटून म्हातारा धडाधडा पायऱ्या उतरून गेला.

११.

ताडपत्र्यांची ढाकणं लावलेल्या गाड्यांची रांगच्या रांग सेत्राखोव खेड्याच्या पलीकडे असलेल्या मैदानावर पसरली होती. अजब झपाट्याने एक नीटस ढवळ्या छपराचे चिमुकले गाव उभे राहिले होते. सरळसोट रस्त्याच्या मध्यभागी लहानसा चौक असलेले गाव ! इथे एक संत्री पाहायला उभा होता.

शिकाऊ शिबिराचे नेहमीचे बेचव आयुष्य माणसे जगत होती. कझाकांची एक तुकडी चरणाऱ्या घोड्यांची राखण करीत असे. सकाळ झाली की घोड्यांना '

ते शिबिराकडे हाकलून नेत. मग साफसफाई, खरारा, फाळणी, हजेरी ही कामे सुरू होत. शिबिराचा मुख्य अधिकारी लेफ्टनंट-कर्नल पोपोव खणखणीत आवाजात गरजायचा, पोरगेल्या कझाकांना शिकवणारे सार्जंटस् ओरडून हुकूम सोडायचे. टेकडीवर ते लुटुपुटूचा हल्ला चढवीत, धूर्तपणे गनिमाला वेढा घालीत चांदमारी-वर निशाण चालवीत. तलवारीच्या झटापटीत पोरगेले कझाक एकमेकांशी होड घेत. त्यांच्याहून मोठ्या वयाचे कझाक चुकवता येईल तेवढी तालीम चुकवायला बघत.

उकाड्याने आणि व्होडक्याने आवाज खरखरीत झाले. बंदिस्त रेकल्यांच्या लांबच लांब रांगेवरून सुगंधी उद्दीपक वारा वाहू लागला. दूरवरून 'सुस्लीकांची'[1] शीळ ऐकू येऊ लागली. सफेता दिलेल्या झोपड्यातील कोंदटपणा आणि धूर ह्यापासून दूरदूर जायला हे खडे मैदान माणसाना खुणावू लागले.

शिबीर संपायच्या एक आठवडा आधी आन्द्रेइ तोमिलीनची बायको त्याला भेटायला आली. घरी बनवलेली कुरकुरीत बिस्किटे, निरनिराळी मिठाई आणि बातम्यांची कुंभेरी आपल्याबरोबर ती घेऊन आली होती.

दुसऱ्या दिवशी उजाडता ती निघून गेली. तिच्याबरोबर कझाकांनी आपल्या कुटुंबाना आणि खेड्यातील नातेवाईकांना निरोप नमस्कार कळवले. फक्त स्तिपान आस्ताखोवने तिच्याबरोबर काही निरोप धाडला नाही. आदल्या दिवशी संध्याकाळी तो आजारी पडला होता. बरे वाटावे म्हणून त्याने इतकी व्होडका घेतली की तोमिलीनची बायकोच काय पण ह्या अफाट विश्वातले काही म्हणता काही त्याला दिसेचना. दुसऱ्या दिवशी कवायतीला तो गेला नाही. त्याच्याच विनंतीवरून डॉक्टरांच्या मदतनिसाने एक डझन जळवा त्याच्या छातीला रक्त काढण्यासाठी लावल्या. गाडीच्या चाकापाशी अंगात बंडी घालून स्तिपान बसला होता. गाडीच्या वंगणाने त्याच्या टोपीला लावलेले लीनन तेलकट होत होते. आपल्या पिंपासारख्या छाताडाचे शोषण करून काळ्या रक्ताने फुगणाऱ्या जळवांकडे टक लावून तो दुर्मुखला बसला होता. रेजिमेंटच्या डॉक्टरच्या अडली बाजूला सिगरेट ओढीत उभा होता. दाताला पडलेल्या भगदाडातून गाळून धूर बाहेर सोडीत होता.

'बरं वाटतंय का ?'

'चांगलं पितायत, काळजालाही बरं हे'

टीप : १. सुस्लीक खारीसारखा एक प्राणी.

'जळवा म्हणजे काय बात आहे !'

तोमिलीन तिथे आला आणि स्तिपानकडं पाहून त्यानं डोळा घातला—

'स्तिपान तुझ्याशी जरा खाजगी बोलायचंय'

'बोल'

'मिनिटभर इकडे ये'

स्तिपान डुरकत उठला आणि तो मिलीनला घेऊन बाजूला गेला.

'हं ! बोल आता'

'माझी बायको इथं भेटायला आली होती. आज सकाळी ती गेली.'

'मग ?'

'खेड्यात तुझ्या बायकोबद्दल बरंच बोललं जातंय'

'काय ?'

'चांगलं नाही बोललं जात !'

'काय ? आहे काय ?'

'ग्रिगरी मेलीखोवला ती लागू आहे म्हणे. अगदी उघड चाललंय.'

स्तिपानचा चेहरा पांढरा फटक पडला. छातीवरच्या जळवा त्याने ओरबाडून काढल्या आणि पायाखाली चिरडल्या. शेवटची जळू चिरडल्यानंतर त्याने बंडीची बटणे लावली आणि एकाएकी भिऊन परत बटणे सोडली. त्याचे विवर्ण ओठ हलायला लागले. ते थरथरत होते. अवघडलेल्या स्मिताने ते विलग झाले. मग त्या ओठांना वळ्या पडल्या, काळ्या निळ्या सुरकुत्या पडल्या. तोमिलीनला वाटले स्तिपान काहीतरी टणक घट्ट पदार्थ चावत असला पाहिजे. हळूहळू त्याचा चेहरा पूर्ववत झाला. दाताखाली धरलेले ओठ निश्चल झाले. त्याने टोपी काढून हातात घेतली. तिच्या पांढऱ्या आच्छादनाला लागलेले तेल बाहीने पुसले आणि तो म्हणाला—

'बातमी सांगितल्याबद्दल आभार.'

'मला फक्त तुला इशारा द्यायचा होता. माझ्यावर रागावू नको.'

तुमानीवर हाताची थापटी मारून तोमिलीनने सहानुभूती दाखवली आणि तो आपल्या घोड्याकडे निघून गेला. शिबिरातून आरडाओरड ऐकू येत होती. तलवारीच्या हाताची तालीम करुन कझाक परतले होते. आपल्या टोपीला लागलेल्या काळ्या डागाकडे अढळ आणि उग्रपणे टक लावून बघत स्तिपान क्षणभर उभा राहिला.

अर्धवट चिरडलेली मरणोन्मुख जळू सरपटत त्याच्या बुटाबर चढत होती.

१२.

शिबिराहून कझाकांना परतायला दहा दिवस उरले होते. उशीरा लाभलेल्या कडवट प्रेमाच्या धुंदीत आक्सीनिया जगत होती. बापाच्या धमकावण्याना न जुमानता ग्रिगरी झुकांड्या देऊन रात्री तिच्याकडे जात होता. पहाटे घरी परतत होता.

आपल्या ताकदीच्या बाहेर धावू पहाणाऱ्या घोड्याप्रमाणे दोन आठवड्यात त्याची शक्ती झिरपून गेली होती. रात्रीच्या रात्री जागरणे केल्याने त्याची उंच गालफडं काळवंडून गेली होती. खोल गेलेल्या खोबण्यांतून त्याचे श्रांत डोळे मलूल नजरेने पाहू लागले होते. आक्सीनिया चेहरा संपूर्ण उघडा टाकून हिंडत होती. तिच्या डोळ्याखालची खळी आसन्नमरण झाल्यागत काळी पडली होती. तिच्या सुजलेल्या हावरट ओठांवर चंचल आव्हानाचे स्मित आले.

त्यांचे पागल संघटन अनन्य आणि खुल्लमखुल्ले होते. त्यांना ना विवेकाचा जाच होता ना जगापासून ते आपले प्रेम छपवीत होते. दोघेही एका निलाजऱ्या ज्वाळेत इतक्या तल्लीनतेने जळत होती की त्याना रस्त्यात पाहून लोकानाचा शरम वाटू लागली होती.

आक्सीनियाबद्दल पूर्वी ग्रिगरीची चेष्टा करणारे त्याचे दोस्त आता मूक झाले होते आणि त्याच्या संगतीत त्याना अवघडल्यासारखे, जखडल्यासारखे वाटू लागले होते. मनोमनी बायका आक्सीनियाचा मत्सर करीत होत्या. पण बोलताना मात्र तिची छी: थू: करीत होत्या. स्तिपान परत आल्यानंतर काय चित्तरकथा घडेल ती चविष्टपणे चघळीत होत्या. सगळ्याचा शेवट काय होईल त्याबद्दलच्या उत्सुकतेने झुरणीला लागल्या होत्या.

नवरा बाहेरगावी गेलेल्या ह्या बाईबरोबरची आपली भानगड जगापासून लपवण्याचा थोडासा देखावा जरी ग्रिगरी करता, प्रोषितभर्तका आक्सीनिया ग्रिगरीबरोबरचे संबंध इतराना धाब्यावर न बसवता थोडेसे गुप्त राखती तर ह्यात जगाला जगावेगळे काही दिसते ना! थोड्याशा गटारगप्पा मारल्यानंतर खेड्याला ह्याचा विसर पडला असता. पण जवळ जवळ उघडपणेच ती दोघं

एकत्र राहत होती. कुठल्याही क्षणभंगुर संगतीशी सादृश्य नसलेल्या अेका श्रेष्ठतर गोष्टीने ती दोघे जखडली गेली होती. म्हणूनच खेडुतानी असे ठरवून टाकले की हे अनैतिक आहे आणि डोकावत्या उत्सुकतेने त्यानी श्वास आवरून धरले होते. स्तिपान येऊन ही गाठ कापणार होता.

आक्सीनियाच्या झोपायच्या खोलीतील पलंगावर काळी पांढरी सुताची रिकामी रीळे ओवलेली एक दोरी बांधलेली होती. सजावट म्हणून ती टांगलेली होती. रात्री माशा निवाऱ्याला त्या रिळांवर येऊन बसत. त्यावरुन आढ्यापर्यंत कोळ्यानी जाळी विणलेली होती. आक्सीनियाच्या अनावृत्त थंड बाहूवर माथा टेकून ग्रिगरी त्या रिळांच्या साखळीकडे बघत होता. काम करून निबर झालेल्या आपल्या दुसऱ्या हाताच्या बोटांनी आक्सीनिया त्याच्या केसांच्या दाट झुलपांशी खेळत होती. तिच्या बोटांना गरम दुधाचा वास येत होता. ग्रिगरीने डोके वळवून नाक आक्सीनियाच्या बगलेत दाबले तेव्हा स्त्रीच्या घामाचा मधुर गंध त्याच्या नाकपुड्यांतून तुडुंब भरून गेला. चौबाजूला टोकदार देवदारी शंकू बसवलेल्या रंगीत खाटेशिवाय त्या खोलीत एक लोखंडी पत्रा ठोकलेला ऐसपैस पेटारा होता. त्यांत आक्सीनियाचे स्त्रीधन आणि ठेवणीतले पोशाख ठेवलेले होते. कोपऱ्यात एक मेज, खाली झुकलेल्या फडफडत्या लगींच्या रांगांकडे कूच करणाऱ्या जनरल स्कबेलेव्हचे तैलचित्र, दोन खुर्च्या आणि त्याच्या वरच्या बाजूला बेगडी तेजोमंडळांत उभ्या असलेल्या देवपुतळ्यांएवढे सामान होते. बाजूच्या भिंतीवर डागाळलेली छायाचित्रे लावलेली होती. एक छायाचित्र कझाकांच्या एका गटाचे होते. कुरळ्या बटा घड्याळी साखळ्यांनी शृंगारलेल्या आणि फुगलेल्या छात्या, उपसलेल्या तलवारी. ...रणांगणावर गेलेल्या स्तिपान आणि त्याच्या दोस्तमंडळींचे हे छायाचित्र होते. एका खुंटीवर स्तिपानचा गणवेश लटकला होता. तो फेकून देण्यात आला नव्हता. चंद्र आता खिडकीसमोर आला होता. 'श्वेत' सार्जंटच्या खांद्यावरील दोन माकुलांना त्याच्या पिठुर चांदण्याने ओझरता स्पर्श केला.

एक सुस्कारा टाकून आक्सीनियाने ग्रिगरीच्या नाकाच्या पाकळीचा आणि भ्रू-मध्याचा मुका घेतला.

'ग्रिशा माझ्या लाडक्या—'

'काय ?'

'फक्त नऊच दिवस उरले.'

'म्हणजे अजून अवकाश आहे.'

'काय करू मी ग्रिशा ?'

'मी काय सांगू ?'

निघू पाहणारा सुस्कारा आक्सीनियाने आवरला. परत ग्रिगरीच्या झुलपां-वरून नेटका हात फिरवीत ती बोटांनी त्याचे केस विंचरू लागली.

'स्तिपान माझा जीव घेईल' तिने अर्धवट विचारले, अर्धवट सांगितले.

ग्रिगरी गप्प होता. त्याला झोप आली होती. मिटणारे डोळे त्याने कष्टाने उघडले, तेव्हा अंगावर ओठंगलेल्या आक्सीनियाच्या डोळ्यातील चमकते निळसर काजळ त्याला दिसले.

'माझा नवरा परत आला की तू मला सोडून देशील ना? तुला भीती वाटेल ?'

'मी का त्याला भिऊ ? तू त्याची बायको आहेस म्हणायचंस तू.'....

'तुझ्याबरोबर असते तेव्हा नाही भीती वाटत, पण दिवसा त्याचा विचार केला की वाटतं–'

जांभई देऊन ग्रिगरी म्हणाला, 'स्तिपान परत येण्याचं विशेष काही नाही. माझं लग्न लावून देण्याच्या गोष्टी बाबांनी चालवल्यायत.'

तो हसला. आणखी काहीतरी तो म्हणणार होता पण आपल्या डोक्या-खालचा आक्सीनियाचा बाहू एकदम लटका आणि कमजोर झाल्यासारखा त्याला वाटला. उशीत तो हात रुतल्यासारखा झाला. क्षणभराने परत तो पहिल्यासारखा टणक झाला.

'कुणी मुलगी हेरल्येय वाटतं ?' गुदमरल्या आवाजात तिने विचारले.

'त्याचं नुसतच बोलणं चाललंय. आई म्हणतेय् कोर्शुनोवच्या नतालियाबद्दल त्याच्या मनात आहे.

'नतालिया– चांगली आहे मुलगी दिसायला. फार सुंदर आहे. मग काय तर ! करून टाक तिच्याशी लग्न ! परवाच तिला गिरिजाघरात पाहिली. छान-छुकीचा पोशाख केला होता.' आक्सीनिया बोलत होती झपाट्याने पण त्याला धड ऐकूही येत नव्हतं इतका तिचा आवाज निर्जीव आणि मरगळलेला होता.

'तिचं सौंदर्य तिला लखलाभ होवो. मला तुझ्याशी लग्न करायचंय.'

ग्रिगरीच्या डोक्याखालचा हात आक्सीनियाने सप्कन काढून घेतला आणि शुष्क नजरेने ती खिडकीकडे बघू लागली.

परसात थिजलेले पिवळसर धुके होते. केठीची लांबलचक सावली पसरली होती. रातकिडे किरकिरत होते. डॉनच्या खालच्या अंगाकडून क्रौंचजातीच्या पक्षांचा भेदक धूत्कार खिडकीतून आत तरंगत येत होता.

'ग्रिशा'

'काही सुचतंय् का ?'

आक्सीनियाने ग्रिगरीचे राकट टणक तळवे हातात पकडले आणि ते आपल्या वक्ष:स्थळावर, जवळजवळ निश्चेतन झालेल्या गालावर दाबले आणि विव्हळतेने ती ओरडली.

'का जीव लावलास मला मेल्या ? काय करू मी आता ? ग्रिशा ! माझं वाटोळं झालं. स्तिपान परत येतोय्. त्याला काय सांगू ? कोण आहे मला मदत करायला ?'

ग्रिगरी गप्प होता. त्याच्या देखण्या गरूडनाकाकडे, त्याच्या काळवंडलेल्या डोळ्यांकडे त्याच्या मूक ओठांकडे शोकसंतप्त नजरेने आक्सीनिया पाहत होती. पाहता पाहता भावनेच्या लोंढ्यात संयमाचे बांध वाहून गेले पागलपणे तिने त्याच्या चेहऱ्याचे, मानेचे, दंडाचे, छातीवरील राकट कुरळ्या काळ्या केसांचे मुके घेतले. तिच्या शरीराची थरथर ग्रिगरीला जाणवत होती. धापा टाकीत ती कुजबुजु लागली.

'ग्रिशा माझ्या जीवाच्या जीवा–दिलवरा–आपण पळून जाऊ या. माझ्या लाडक्या ! आपण सगळं सोडून निघून जाऊ या. माझा नवरा, घरदार सगळं मी सोडून देते. तू माझ्याबरोबर असलास की झालं. आपण दूरदूर खाणीवर जाऊ या. मी तुझ्यावर प्रेम करीन. तुला सांभाळीन. पारामोनोव खाणीवर माझा एक चुलता चौकीदार आहे. तो आपल्याला मदत करील. ग्रिशा ! बोल ना रे काहीतरी !

ग्रिगरी विचार करीत पडला होता. अचानक त्याने आपले धगधगते परदेशी वाटणारे डोळे उघडले. ते डोळे हसत होते. उपहासाने चमकत होते.

'तू मूर्ख आहेस, आक्सीनिया... मूर्ख ! तू नुसतीच बडबडतेस. त्यात ऐकावं असं काहीसुद्धा नसतं. मी शेती सोडून कसा जाऊ ? पुढच्या वर्षी माझी फौजेतली नोकरी मला करायला हवी. ते नाही जमायचंय. ह्या जमिनीपासून मी कुठेही हलणार नाही. हे इथं खडं मैदान आहे. श्वास घ्यायला मिळतोय आणि तिथं ? गेल्यावर्षीच्या उन्हाळ्यात बाबाबरोबर मी स्टेशनवार गेलो होतो. मरायचाच बाकी उरलो. इंजिनाची घरघराट ! कोळशाच्या धुरानं गुदमरायला होत होतं ! कशी माणसं तिथं राहातात कोण जाणे ! कदाचित त्यांच्या अंगवळणी पडलं असेल !' ग्रिगरी पचकन् थुंकला आणि म्हणाला,

'मी खेडे सोडून कधी जाणार नाही.'

खिडकीबाहेर रात्रीचे काजळ वाढत चालले होते. चंद्र ढगाआड गेला होता. थिजलेले पिवळसर धुके आवाडात दिसेनासे झाले. सावल्या निघून गेल्या. खिडकीच्या बाहेर दिसणारी विरळ आकृती गेल्यावर्षीच्या लाकडाच्या मोळ्यांची होती का ते कुठलं तरी जुनाट झुडुप होतं हे सांगणे कठीण होते.

खोलीतला काळोखही वाढला. स्तिपानच्या गणवेषावरचा माकूल विरून गेला. आक्सीनियाच्या खांद्याचा सूक्ष्म कंप किंवा दोन्ही हातांनी दाबून धरूनही उशीवर निःशब्दपणे थरथरणारे तिचे मस्तक त्या कबऱ्या, कोंडलेल्या काळोखात ग्रिगरीला दिसले नाही.

१३.

तोमिलीनची बायको येऊन गेल्यावर स्तिपानच्या चेहऱ्यावरची कळा स्पष्टपणे उतरून गेली. भुवया डोळ्यावर झुकू लागल्या. कपाळावर खोल उग्र आठ्यांचे जाळे पसरले. आपल्या दोस्तांशी त्याचे बोलणे विरळ झाले. एवढ्या-तेवढ्यावरून तो हमरीतुमरीवर येऊ लागला. सार्जंट मेजरशी त्याचा बखेडा झाला, प्योत्र मेलीखोवकडे बघायलाही तो तयार नव्हता. पूर्वी त्यांना बांधणारे स्नेहरज्जू तुटून गेले. आपल्या विषादयुक्त खदखदत्या क्रोधामुळे स्तिपान उधळलेल्या वारूसारखा पार खाली घसरला. ते जे घरी आले ते एकमेकांचे शत्रू बनूनच.

त्यांच्या संबंधातील सूक्ष्म वैर भडकायला कशाचे तरी निमित्त अर्थात हवेच होते. पूर्वीसारखे एकाच गटात ते खेड्याकडे निघाले. प्योत्र आणि स्तिपानचे घोडे रेकल्यांना जुंपलेले होते. स्वतःच्या घोड्यावर बसून ख्रिस्तोनिया पाठीमागून येत होता. अंगात ताप असलेला तोमिलीन फर्गोल पांघरून गाडीत पडला होता. फिदोत बोदोफ्स्कोफ् गाडी हाकायला फारच सुस्त होता. तेव्हा प्योत्रने लगाम आपल्या हाती घेतले. वाटेवर वाढलेल्या सराट्याच्या जांभळ्या तुऱ्यांना हातातील चाबकाने फटकारीत स्तिपान रेकल्याच्या बाजूने चालला होता. (पाऊस पडत होता) काळ्या मातीचा चिखल डांबरासारखा चाकांना चिकटू लागला. ढगामुळे आकाशाला शारदीय निळा-राखी रंग आला होता. रात्र पडली, कुठल्याही गावठाणाचे दिवे

दिसेनात. प्योत्र आसुडाने घोड्यांना मनसोक्त झोडपीत होता. काळोखातून स्तिपान एकाएकी गरजला—

'तू— तुझ्या—! स्वतःचे घोडे सोडून माझ्या घोड्यावर तेवढा आसूड धर!'

'डोळे उघडून बघ ! न चालणाराला मी हाणतोय—'

'तुलाच जुंपीन गाडीला काय समजलास ? तुर्की त्याच लायकीचे.'

प्योत्रने लगाम खाली टाकले.

'काय म्हणणं आहे ?'

'अरे बस ना आपल्या जागेवर !'

'चूप.'

'त्याच्यावर का भडकलायस ?' स्तिपानजवळ घोडा आणीत ख्रिस्तोनियाने विचारले. स्तिपानने उत्तर दिलें नाही. आणखी अर्धा तास ते गुपचूप चालले होते. चाकाखाली चिखल रपरपत होता. ताडपत्रीवर पाऊस सुस्तपणे तडकत होता. लगाम खाली ठेवून प्योत्र सिगरेट ओढीत होता. स्तिपानबरोबर ह्यानंतर होणाऱ्या भांडणात कोणते पाणउताऱ्याचे शब्द वापरावेत ह्यांचा मनाशी विचार करीत होता.

'बाजूला हो, मला निवाऱ्याला बसायचंय.' स्तिपानने प्योत्रला बाजूला ढकलले आणि गाडीच्या पावतकीवर त्याने उडी मारली.

गाडी एकदम हिंदकळली आणि थांबली. चिखलात घसरलेले घोडे खूर हाणू लागले. .

त्याच्या टापानी ठिणग्यांचा झोत उसळला आणि जुंपणी करकरू लागली.

'हैक हैक !' प्योत्र ओरडला आणि त्याने जमिनीवर उडी मारली.

'काय झालं ?' स्तिपान दचकून डाफरला.

ख्रिस्तोनिया दौडत तिथे आला.

'मोडलं काय सालं ?'

'बत्ती दाखव' प्योत्र ओरडला.

'काडेपेटी कोणाजवळ आहे ?'

'स्तिपान इकडं टाक काड्याची पेटी.'

पुढच्या बाजूला एक घोडा धडपडत खिंकाळत होता. कुणीतरी काडी झोडली. नारिंगी प्रकाशाचे चिमुकले रिंगण उजळले आणि परत काळोख झाला. थरथरत्या हाताने प्योत्रने पडलेल्या घोड्याचे पुट चाचपडले आणि मग लगाम ओढला. घोड्याला त्याने चुचकारले.

उच्छ्वास टाकून घोडा कुशीवर कलंडला. त्याच्या नाकपुडच्या फुरफुरल्या. रेकल्याची जुंपणी दुभंगली. स्तिपानने काडचांचा जुडगाच उजळला. त्याचे घोडे मान उंचावून पडले होते. त्याचा एक पाय गुडघ्यापर्यंत मारमोतच्या बिळात घुसला होता.

ख्रिस्तोनियाने पाठबंद सोडले.

'घोडयाचा पाय वाचव.'

प्योत्रचा घोडा चटकन मोकळा कर' त्याने हुकूम केला.

'हर्रर्र ! हाइक् ! ऽ चक्ऽचक् !'

'लाथा झाडतोय सैतान ! बाजूला हो.'

सरतेशेवटी मोठचा मुष्किलीने स्तिपानचा घोडा पायावर उभा करण्यात आला. प्योत्रने त्याला लगामाने धरून ठेवले होते. ख्रिस्तोनिया चिखलातून गुडघ्यावर सरपटत गेला आणि असहायपणे लोंबणारा घोडचाचा पाय त्याने चाचपडला.

'मोडलेला दिसतोय' तो धुत्कारला.

फेदोत बंदोपरकोवने घोडयाच्या थरथरत्या पाठीवर थाप मारली.

'चालतोय का पहा.'

प्योत्रने लगामाला खेच दिली. पुढचा पाय जमिनीवर न टेकता घोडा एक दोन पावले लंगडत गेला आणि मंद खिकाळला, आपला फर्गोल अंगावर चढवून तोमिलीन पाय आपटून रागाने म्हणाला—

'मोडला हत् तेरी ! गेला घोडा !'

आतापर्यंत एक शब्दही न बोलणारा स्तिपान अशा उद्‌गारांसाठी जवळ जवळ दबाच धरून बसला होता. ख्रिस्तोनियाला बाजूला ढकलून त्याने प्योत्रच्या अंगावर झेप घेतली. त्याने नेम डोक्यावर धरला होता पण तो हुकून प्योत्रच्या खांद्यावर प्रहार बसला. ते एकमेकांना झोंबले आणि चिखलात आदळले. सदरा फाटल्याचा आवाज आला. स्तिपानने प्योत्रला खाली घेतला होता. त्याचे डोके गुडघ्याने दाबून धरून तो त्याच्यावर गुद्यांचा वर्षाव करीत होता. ख्रिस्तोनियाने शिव्या देत त्याला बाजूला खेचला—

'कशासाठी हे सगळं ?'

रक्त थुंकीत प्योत्र ओरडला.

'कुठं गाडी घालतोस बघ सर्पा !'

ख्रिस्तोनियाच्या हातून सुटण्याची प्योत्रने धडपड केली.

'अरे हो हो हो ! आता काय माझ्याशी मारामारी करायचीय का ?' गाडीवर एका हाताने प्योत्रला दाबून धरीत ख्रिस्तोनिया ओरडला.

बादोफस्कोफचे लहान पण दणकट घोडे त्यांनी प्योत्रच्या घोड्याबरोबर गाडीला जुंपले. 'माझ्या घोड्यावर बस' ख्रिस्तोनियाने स्तिपानला फर्मावले ख्रिस्तोनियाने आपला घोडा स्तिपानला बसायला दिला आणि तो स्वत: प्योत्रबरोबर गाडीत चढला. खेड्यात ते पोचले तेव्हा मध्यरात्र झाली होती. पहिल्याच घराशी थांबले. रात्रीच्या निवाऱ्यासाठी ख्रिस्तोनियाने मालकाला विनंती केली. आपल्या कोटाच्या टोकाचें लचके घेणाऱ्या कुत्र्याकडे लक्ष न देता तो चिखल तुडवीत खिडकीजवळ गेला. झडप उघडली आणि काचेवर आपल्या चिवट नखाने खरवडले–

'मालक–'

फक्त पावसाची रिमझिम आणि उंच आवाजात कुत्रेभुंक !

'मालक ! दादानु ! देवाच्यान, रात्रीपुरतं आम्हाला आत घ्या. ऑ ? काय म्हटलत ? शिबिराहून आलोय शिबिराहून ! किती आहोत ? आम्ही पाचजण आहोत ! बरं, बरं देव तुमचं भलं करो.'

'घ्यारे आत !' फाटकाकडे वळून तो ओरडला.

बादोफस्कोफ् घोड्याना घेऊन आत आला. परसाच्या मधोमध असलेल्या डुकराच्या कोठंबीला ठेचकाळून तो आदळला. त्याबरोबर त्याने शिव्यांची लाखोली वाहिली. घोड्याना त्यानी तबेल्याकडे नेले. दातावर दात वाजणारा तोमिलीन घरात गेला. प्योत्र आणि ख्रिस्तोनिया रेकल्यातच राहिले. पहाटेच्या सुमारास त्यानी पुढे कूच करण्याची तयारी केली. स्तिपान घरातून बाहेर आला. एक कुबडी बाई त्याच्या मागोमाग लंगडत आली. रेकल्याला घोडे जुंपणारा ख्रिस्तोनिया चुकचुकत ओरडला.

'ए आज्ये. कसलं कुबड निघालंय ग तुझं ? बाकी गिरिजाघरात वाकाय बिकायचा तुझा त्रास वाचला ! जमिनीला टेकायला फारसं वाकावं नाही लागत ना ?'

'मला वाकायला चांगलं येत नसेल माझ्या पुता, पण तुझ्या अंगावर मात्र कुत्र्यांना फासावर लटकवता येईल, तेव्हा आपल्या प्रत्येकात काहीतरी खोड असतेच.' म्हातारी खदखदून हसली, तिची अणिदार सुरेख दंतपंक्ती पाहून ख्रिस्तोनिया चकित झाला.

'काय दात आहेत तुझे ! मला थोडेसे दे की ! मी बघ तरणाताठा असून चावायला दात नाही.'

'मग माझ्याजवळ काय राहिलं माझ्या राजा ?'

'घोडीची कवळी देतोय तुला आज्ये ! एक दिवस तू मरणारच. वरच्या जगात तुझे दात कुणी बघत नाही. तिथली संत मंडळी काही सौदागर नव्हत.'

'गप्प रे ख्रिस्तोनिया' गाडीत चढत हसत हसत तोमिलिन म्हणाला.

ती म्हातारी स्तिपानच्या पाठोपाठ तबेल्यात गेली.

'कुठला तो ?'

'काळा' सुस्कारा सोडून स्तिपान म्हणाला.

त्या बाईने हातातील काठी जमिनीवर ठेवली आणि मर्दानी आवेशाने सरसावून तिने घोड्याचा दुखावलेला पाय उचलला. आपल्या वाकड्या झालेल्या बोटानी तिने त्याच्या गुडघ्याची वाटी काळजीपूर्वक चाचपडली. कान मागे फेकून घोडा दु:खाने मागच्या पायांवर उभा राहिला.

'कशाका ! पाय नाही मोडला. ठेवून दे, मीं त्याला बरं करीन.'

स्तिपानने हात झटकला आणि तो गाडीकडे गेला.

'ठेवणार आहेस का नाही ?' त्या म्हातारीने डोळे किलकिले करून त्याला न्याहाळले.

'राहू देतो त्याला' त्याने उत्तर दिले.

'ती तो तुला देत्येय बरा करून ! तू परत आलास म्हणजे त्याला पायच दिसायचा नाही. सालोत्री स्वतःच कुबडी आहे !' ख्रिस्तोनिया खिदळत म्हणाला.

१४.

'त्याच्यापायीं तळमळत्येय् मी आजी–तळमळत्येय् ! माझ्या डोळ्यादेखत मीं सुकून चालल्येय. झगासुद्धा झटपट खोवता येईना मला. तो जेव्हा जेव्हा घरापुढून जातो तेव्हा जळतं ग माझं काळीज ! त्याच्या उमटलेल्या पावलांचा मुका घ्यायला धुळीतसुद्धा लोळेन मी. आजीग्–मला हात दे ! त्याचं लग्न काढलंय त्यानी. बाई ग मला हात दे ! पडेल ती किंमत वेचीन. उरलासुरला अंगावरचा

कुडतादेखील देईन. पण मला हात दे ग माय् !' सुरकुत्यांच्या झालरीत बसवलेले आपले तेजस्वी डोळे रोखून द्रझ्‌दिखा आजीने आक्सीनियाकडे पाहिले आणि ती दुःखद कथा ऐकून मान हलवली.

'कोण पोरगा आहे ?'

'पंतीलेय् मेलीखोवचा–'

'तुर्की आहे तो ? होय ना ?'

'होय'

आपल्या दंतहीन हिरड्या चघळत राहिली. ती चटकन उत्तर देईना.

'उद्या अगदी सकाळीच तांबडं फुटायच्या वेळेला माझ्याकडं ये, पोरी. आपण खाली डॉनच्या पाण्यावर जाऊ. तुझी तळमळ धुऊन टाकू. येताना चिमुटभर मीठ घेऊन ये.'

आपली पिवळी शाल आक्सीनियाने अंगाभोवती गुंडाळून घेतली आणि खांदे झुकवून ती फाटकातून बाहेर पडली. तिची कृष्ण आकृती अंधाराशी एकजीव झाली. फक्त जमिनीवर खरडत जाणाऱ्या चपलांचा तेवढा आवाज येत राहिला. मग तो पावलांचा आवाज विरून गेला. खेड्याच्या दूरच्या कोपऱ्यावरून तंडल्याचे आणि गाण्याचे आवाज येत होते.

सबंध रात्रभर जागी असलेली आक्सीनिया पहाटेस द्रझ्‌दिखाच्या खिडकी-जवळ आली–

'आजी–'

'कोण आहे ?'

'मी आहे आक्सीनिया ! ऊठ !'

'थांब कपडे घालते.'

मागच्या बाजूच्या गल्ल्यातून त्या खाली नदीकडे गेल्या. रेकल्याचे फेकून दिलेले दांडे पडतोऱ्याजवळ पाण्यात मुरत होते. प्रवाहाच्या काठाला रेती त्यांच्या अनवाणी पायाला बर्फासारखी डसत होती. डॉन नदीवरून दमट थंडगार धुके वर तरंगत होते.

द्रझ्‌दिखाने आक्सीनियाचा हात आपल्या हडकुळ्या हातात घेतला आणि तिला ती पाण्याकडे घेऊन गेली.

'मीठ आण इकडं. उगवत्या सूर्याकडे पाहून क्रूसाची खूण करून घे. अंगाला.'

पूर्वेच्या सुखद सुरखाईकडे रोखलेल्या नजरेने बघत आक्सीनियाने अंगा-भोवती क्रूसची खूण केली.

'ओंजळीत थोडं पाणी घेऊन पी.'

आपल्या पोलक्याच्या बाह्या भिजवीत आक्सीनिया ओंजळीने पाणी प्याली. खळाळणाऱ्या लाटात एकाद्या काळ्या कोळ्याप्रमाणे म्हातारी पाय फाकून उभी राहिली मग उकिडवी बसून पुटपुटू लागली–

'पातळातील बरफधार– देह भडकलाय– जनावरच्या काळजाचा– तळमळ झाली– आणि ताप झाला– पवित्र क्रूसा शपथ– शुद्ध आणि पवित्र माऊली शपथ– देवाचा गुलाम– ग्रिगरी–'

आक्सीनियाच्या कानांवर हे शब्द पडत होते.

द्रझ्दिखाने थोडेसे मीठ पावलाजवळच्या दमट रेतीवर आणि थोडेसे पाण्यात शिंपडले, बाकीचे आक्सीनियाच्या वक्षःस्थळात ठेवून दिले–

'खांद्यावरून थोडं पाणी शिंपड– पटकन'

आक्सीनियाने पाणी शिंपडले. द्रझ्दिखाच्या तांबूस गालांकडे ती खिन्नपणे आणि रागाने पहात होती.

'झालं?'

'झालं. घरी जाऊन झोप.'

आक्सीनिया धापा टाकीत घरी आली. आवाडात गाई हंबरत होत्या. झोपाळू डोळ्यांची, चेहरा आरक्त झालेली दार्या गाईना खेड्याच्या कळपात हाकलून नेत होती. जवळून धावत गेलेल्या आक्सीनियाला पाहून तिने स्मित केले.

'झोप लागली ना शेजीबाई?'

'देवाची दया–'

'पहाटेच कुठं गेली होतीस?'

'खेड्यात, एके ठिकाणी काम होतं.'

प्रातःस्मरणासाठी गिरिजाघराच्या घंटा वाजत होत्या. तांब्याची जिव्हा असलेल्या त्या ठणत्कारातून नादांचा फवारा उधळला जात होता. बाजूच्या गल्लीतून धनगराचा चाबूक कडाडला. आक्सीनियाने त्वरा करून गाईना हाकलले आणि दूध गाळण्यासाठी ती ते घेऊन पडवीत आली. आपल्या एप्रनला तिने तळहात पुसले आणि विचाराच्या तंद्रीत ती गाळणीत दूध ओतू लागली.

रस्त्यावरून गाडीच्या चाकांचा खडखडाट आणि घोड्यांचे खिकाळणे ऐकू आले. आक्सीनियाने घागर खाली ठेवली आणि पुढच्या खिडकीतून डोकावून बघायला ती गेली. तलवारीच्या मुठीचे बोंड हाती धरून स्तिपान फाटकातून आत येत होता. इतर कझाक खेड्यातल्या चौकाकडे दौडत चालले होते. आपला एप्रन

आक्सीनियाने मुठीत चुरगळला आणि ती बाकड्यावर बसली. ढेलचीत पावले-पडवीत पावले-अगदी दारवड्यात पावले.

हाडाडलेला स्तिपान उंबऱ्यावर परक्यासारखा उभा होता.

'हूं ऽऽ मग ?'

उभार पुष्ट शरीराची आक्सीनिया झोकांड्या खात त्याच्याजवळ गेली.

'मार मला' ती हळूच म्हणाली आणि मोहरा वळवून उभी राहिली.

'हूं! मग आक्सीनिया ?'

'मी लपवाछपवी करीत नाही. मी पाप केलंय, मार मला स्तिपान.'

मान कलती करून त्याच्यापुढे ती वाकून उभी राहिली. आपल्या बाहूनी तिने फक्त पोट तेवढे झाकून घेतले होते. तिच्या अवाक् भयग्रस्त चेहऱ्या वरील गर्द खोबणीतील डोळे अविचल नजरेने बघत होते. झोकांड्या खात स्तिपान तिच्या अंगावरून गेला. त्याच्या पारोशा सदऱ्याला पुरुषी घामाचा आणि वाटथडीच्या उग्र गंधाचा भपकारा येत होता डोक्यावरची टोपी न काढता तो बिछान्यावर पडला. क्षणभर तो पडला असेल. मग त्याने खांद्याला झटका दिला आणि तलवारीचा पट्टा काढून फेकून दिला. त्याच्या भुऱ्या, नेहमी कुडकुडीत. असणाऱ्या मिशा गलित झाल्यागत खाली पडल्या होत्या. मान न वळवता आक्सीनिया डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे बघत होती. पलंगाच्या पायथ्यावर स्तिपानने आपली पावले ठेवली. त्याच्या बुटातून चिखल हळूहळू ओघळू लागला. त्याची नजर आढ्याकडे लागली होती आणि आपल्या तलवारीच्या कातडी गोंड्याशी तो खेळत होता.

'न्याहरी बनवल्येय् ?'

'नाही-'

'मला काहीतरी खायला आण-'

दुधाचे त्याने थोडे घुटके घेतले त्याने त्याच्या मिशा ओल्या झाल्या. तो संथपणे पाव चघळीत होता. चुलीजवळ आक्सीनिया उभी होती. खाताना वरखाली होणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या लहानशा काटकुळ्या कानांकडे ती जाळणाऱ्या धास्तीने निरखून बघत होती. मेजाजवळून स्तिपान उभा राहिला आणि त्याने अंगावर क्रुसाची खुण केली.

'ये माझ्या लाडले-सांग सगळं मला' सटकन तो म्हणाला.

खाली मान घालून आक्सीनिया मेज साफ करीत होती. ती गप्प होती.

'नवऱ्याच्या वाटेकडे कसे डोळे लावून बसली होतीस ? त्याची इज्जत कशी सांभाळलीस ? ते सांग ना. आँ ?'

मस्तकावर बसलेल्या रामटोल्याने आक्सीनियाच्या पायाखालचा सगळा आधारच निघून गेला. भेलकांडत ती दरवाज्याकडे गेली. तिची पाठ दारकसावर आदळली आणि ती अस्फुटपणे चीत्कारली.

बायकांचे शरीर तर काय दुबळे आणि गुलगुलीत असते. माथ्यावर अचूक ठेवून दिलेल्या टिंब्याने दणकट आणि निब्बर रखवालीच्या पहारे सैनिकालाही स्तिपान तिनताड उडवीत असे. आक्सीनियाला वर उठवणारी भीती म्हणा– किंवा स्त्रीची जीवनेच्छा म्हणा– ती भानावर आली. क्षणभर तशीच दम घेत पडून राहिली. नंतर पडल्यापडल्या सरपटू लागली.

खोलीच्या मधोमध उभा राहून स्तिपान सिगरेट पेटवीत होता. ती पायावर उभी राहिलेली. त्याने पाहिली नाही. आपली तंबाखूची चंची त्याने टेबलावर टाकली पण त्याआधीच बाहेर पडून आक्सीनियाने धाडकन दार लावून घेतले होते.

रक्ताने निथळणारे डोके घेऊन आक्सीनिया तशीच त्यांचे आणि मेलीखोवचे आवाड विभागणाऱ्या कुंपणाकडे धावली. कुंपणाजवळ स्तिपानने तिला गाठली. त्याचा काळा हात गिधाडासारखा तिच्या मस्तकावर कोसळला. त्याच्या बोटांनी तिच्या झिज्या मुठीत आवळल्या. कुंपणाजवळ आक्सीनिया रोज विझलेले कोळसे आणून टाकीत असे. त्या ढिगात त्याने तिला झिंजाटून फेकून दिले.

हात मागे बांधून नवऱ्याने बायकोला बुटाने तुडवले तर त्यात काय होय ? थोटा अलेक्सी शामिल फाटकावरून गेला. त्याने आत पाहिले. डोळे मिचकावले आणि स्मित करीत आपली लहानशी केसाळ दाढी फाकवली. कायदेशीर लग्नाच्या बायकोला स्तिपान का शिक्षा करीत होता ते अगदी उघडे होते. तो तिला जिवे मारतो किंवा नाही ते थांबून बघण्याचा शामिलला मोह झाला. पण मनाची टोचणी त्याला तसे करू देईना. किती झालं तरी तो काही बाई नव्हता.

दुरून स्तिपानला पाहिले असते तर वाटले असते की तो कझाक नृत्यच करतोय. खालीवर उड्या मारणाऱ्या स्तिपानला खिडकीतून बघताना ग्रिगरीला तसेच वाटले. पण परत एकदा तिकडे नीट पाहिल्यावर तो तीरासारखा घरातून बाहेर पडला. आपल्या दणकट मुठी छातीवर दाबून तो चौड्यावर पळत कुंपणाशी आला. त्याच्या मागोमाग प्योत्रही दणादणा धावत आला.

एकाद्या पाखरासारखी त्या उंच कुंपणावरून ग्रिगरीने झेप घेतली. भर वेगात

त्याने पिछाडीकडून स्तिपानवर स्वारी केली. स्तिपान होलपांडला आणि मागे वळून अस्वलाप्रमाणे ग्रिगरीच्या अंगावर धावून गेला.

मेलीखोव बंधू जिवावर उदार होऊन हुज्जत घालीत होते. जित्राबाच्या मढचा वरच्या डोंबकावळ्याप्रमाणे ते स्तिपानला झोंबले. स्तिपानच्या वज्रमुठीने ग्रिगरी कोलमडला. स्तिपानसारख्या कसलेल्या शिरजोराच्या पासंगालाही तो पुरत नव्हता. वाऱ्यापुढच्या वेळूप्रमाणे प्योत्र मुष्ठीप्रहारामुळे वाकत होता पण आपल्या पायावर तो खबरदार उभा होता.

स्तिपानचा एक डोळा धगधगत होता. (दुसऱ्याला अध्यांकच्या 'स्लिवा[1]' ची छटा येत होती) पायऱ्यांच्या दिशेने तो मागे हटला.

'प्योत्रकडे काही वछड सामानाची उसनवारी करायला आलेला ख्रिस्तोनिया तेवढ्यात तिथे आला. त्याने त्यांना सोडवले.

'बंद करा हे!' तो हात हालवीत म्हणाला, 'व्हा बाजूला, नाहीतर आतामानला वर्दी देईन.'

प्योत्रने रक्त आणि अर्धा तुटलेला दात आपल्या तळहातावर थुंकला–

'चल ग्रिगरी. पुन्हा कधीतरी त्याला बघून घेऊ–'

'अरे मीच घेतो बघून' पायऱ्यांवरून स्तिपानने दम दिला.

'ठीक आहे, ठीक आहे–'

'ठीक आहे काय?' कोथळे बाहेर काढतो तुमचे.'

'खरंच का थट्टा?'

स्तिपान झपाट्याने पायऱ्याखाली आला. ग्रिगरीने स्वतःला सोडवून घेत त्याच्या दिशेने धाव घेतली पण त्याला फाटकाकडे ढकलून ख्रिस्तोनिया डाफरला.

'खबरदार. चामडी लोळवीन पुढं गेलास तर.'

त्या दिवसापासून मेलीखोव आणि स्तिपान आस्ताखोव ह्यांच्या परस्पर द्वेषाची पक्की निरगाठ बसली. दोन वर्षानंतर पूर्वप्रशियात स्तोलिपिन गावाजवळ ग्रिगरी मेलिखोवकडून ही गाठ सोडवली जाणार होती.

टीप १. स्लिवा : जर्दाळूच्या जातीचे एक जांभळे फळ.

१५.

'प्योत्रला म्हणावं घोडी आणि त्याचा घोडा जुंप.'

ग्रिगरी बाहेर आवाडात गेला. कोठीघराजवळच्या मांगरातून प्योत्र फैटण बाहेर ढकलीत होता.

'बाबा म्हणतो तुझी घोडी आणि तुझा घोडा जुंप म्हणून–'

'मला कळतंय. त्यानं सांगायची जरूर नाही. त्याला म्हणावं तू आपल्या-पुरतं बघत जा.' आसकूड बसवीत प्योत्रने उत्तर दिले. धर्मविधीच्या वेळी पुरोहित वाटतो तसा स्थितप्रज्ञ वाटणारा पण बैलाप्रमाणे घामाने डबडबलेला पंतीलेय् सूप संपवीत बसला होता.

आपल्या लांबसडक पापण्यांची पाती दुन्याने वर वळवली होती. त्यांच्या छायाळ निवाऱ्यात कुठंतरी बालिकासुलभ खट्याळ स्मित लपले होते. ग्रिगरीला ती टवकारून न्याहाळत होती.

इलीनिचनाच्या ओठाच्या कोपऱ्यात मातृसुलभ काळजी रेंगाळली होती. लिंबूरंगी शालीत ती प्रशस्त आणि भारदस्त वाटत होती. म्हाताऱ्याला ती म्हणाली,

'खादाडपणा पुरे प्रकोफीएविच्! कुणाला वाटेल की किती दिवसांची उपासमार झाल्येय कोण जाणे.'

'खाऊसुद्धा देत नाहीस अशी खौट बाई आहेस!'

प्योत्रच्या मोठाल्या गव्हाळ सोनेरी मिशा दाराजवळ दृश्यमान झाल्या.

'फैटण तयार आहे निघावं–'

दुन्याला एकदम हास्याची उबळ आली. आणि आपल्या बाहीत तिने आपला चेहरा लपवला. दार्या सैपाकघरातून गेली आणि आपल्या सुरेख पापण्यांची फडफड करीत तिने नवऱ्यामुलाकडे दृष्टीक्षेप केला.

इलीनिचनाची चतुर विधवा चुलत बहीण वासिलिसा मावशी त्यांच्याबरोबर मध्यस्थ म्हणून जाणार होती. सर्वांच्या आधी ती फैटणीत स्थानापन्न होऊन बसली. आपली मान ती मुरडीत फिरवीत हसत होती. ती हसली की तिच्या ओठांच्या

चुण्याआडून तिचे वेडेवाकडे काळे दात दिसत. 'दात नको दाखवू वासिलिसा' पंतीलेय्‌ने तिला बजावले. 'सगळी घाण करून टाकशील, तुझे ते दात असे दिसतात की जसे रात्रभर पहाऱ्याला उभे होते. अन्‌ आता त्यातल्या एकालाही धड उभं राहवत नाही.'

'भावजी, माझं नाही काही लग्न लागायचय.'

'नसेल लागायचं. तरी हसू नको. काय दात आहेत–! नुसता रंग पाहिला तरी ढवळायला लागतं.'

वासिलिसा हिरमुसली झाली पण आतापर्यंत प्योत्रने फाटक उघडले होते. चांगल्या वासाचे कातडी लगाम ग्रिगरीने निवडून घेतले आणि गाडीवानाच्या जागेवर तो उडी मारून बसला. पंतीलेय्‌ आणि इलीनिचना मागच्या बाजूला एकमेकांजवळ नव्या नवरा–नवरीसारखी बसली.

'उडव चाबूक' त्याच्या हातात वागडोर देत प्योत्र ओरडला. ग्रिगिरीने ओठ चावीत घोड्यावर चाबूक ओढला. घोड्यानी पाठबंद खेचले आणि कोणत्याही इशाऱ्याविना ते धाऊ लागले.

'सांभाळून ! पेंगशील अन्‌ पडशील चाकावर.' दार्या किंचाळली. पण फैटण एकदम भरकटल्यासारखी झाली. एका उंचवट्यावरून उशी घेऊन ती खडखडत रस्त्याला लागली.

एका बाजूला झुकून ग्रिगरीने प्योत्रच्या सुस्तावणाऱ्या घोड्याला चाबकाने ढोसले. त्याचा बाप असा काही हातात दाढी धरून बसला होता की जणू काय वारा ती पळवून नेणार होता.

'घोडीला चाबूक लगाव !' तो खरखरीत आवाजात ओरडला. आपल्या पोलक्याच्या लेस लावलेल्या बाहीने इलीनिच्‌नाने वाऱ्याने डोळ्यांना येणारे पाणी पुसले आणि मिचमिचल्या डोळ्यांनी ती ग्रिगरीच्या निळ्या सॅटिनच्या सदऱ्याकडे बघू लागली. वाऱ्यावर फडफडणाऱ्या त्याच्या सदऱ्याचा पाठीवर फुगा झाला होता. रस्त्यावरचे कझाक वाटेतून बाजू होत त्यांच्याकडे बघत उभे रहात. आवाडातून कुत्री धावत घोड्यांच्या पायाजवळ येऊन भुंकत. ताज्या धावा बसवलेल्या चाकांच्या खडखडात ती भुंकणी विरून जात होती.

ग्रिगरीने चाबकाला किंवा घोड्याना ढीले सोडले नाही. दहा मिनिटात खेडे मागे पडले. गाव आखरीला असलेल्या घरापुढचे बगीचे झपाट्याने मागे पडू लागले. तक्तपोशीचे कुंपण घातलेले कोर्शूनोवचे प्रशस्त घर दृष्टिपथात आले. ग्रिगरीने लगाम खेचले. आपले लोहगीत ऐन मध्याला तसेच सोडून देऊन

ली फैटण एका रंगवलेल्या, सुरेख कातलेल्या फाटकापुढे थांबली.

ग्रिगरी घोड्याजवळ थांबला. पंतीलेय् लंगडत पायऱ्यांकडे गेला. इलीनिचना आणि वासिलिसा झगा फडफडवीत त्याच्या मागे डुलत चालल्या होत्या. वासिलिसाने ओठ घट्ट आवळून घेतले होते. गाडीत बसताना गोळा केलेले धैर्य गळून जाईल ह्या भीतीने म्हातारा तुरुतुरु चालला होता. उंचाड उंबऱ्यावर तो अडखळला. त्यावर त्याचा लंगडा पाय आदळला. वेदनेने त्रासून तो त्या स्वच्छ झाडलेल्या पायऱ्या टणाटण चढून गेला.

त्याने आणि इलीनिचनाने जवळजवळ एकाच वेळी सायवानात प्रवेश केला. आपल्या बायकोच्या बरोबर उभे राहायला त्याला आवडत नसे. कारण ती त्याच्यापेक्षा चांगली सहा इंच उंच होती. तेव्हा तो एक पाऊल पुढे सरकला. आपली टोपी काढून त्याने हातात घेतली. काळवंडलेल्या देवपुतळ्यापुढे उभा राहून स्वतःच्या अंगाभोवती क्रूसची खूण केली.

'देव आपल्याला निरोगी ठेवो.'

'ईश्वराची दया आहे.' घराचे धनी उठून उभे राहत म्हणाले. त्यांच्या कातडीवर पिवळे ठिपके पडलेले होते.

'पाहुणे आलेत तुमच्याकडं मिरोन ग्रिगोरिएविच् !' पंतीलेय म्हणाला.

'पाहुण्यांना दार नेहमी उघडं आहे. मरिया पाहुण्यांना बसायला दे.'

प्रौढ वयाच्या आणि सपाट छातीच्या त्याच्या बायकोने तीन स्टुलांवर नसलेली धूळ पुसून ती पाहुण्यांकडे सरकावली. एका स्टुलाच्या अगदी कडेला पंतीलेय् बसला आणि आपल्या हात रुमालाने त्याने आपले घामाने डबडबलेले कपाळ पुसले.

'कामानिमित्त आलोय तुमच्याकडं' उगाच घोळ घालीत न बसता त्याने विषयाला हात घातला. ते ऐकून इलीनिचना आणि वासिलिसाही आपले झगे सावरून स्टुलावर बसत्या झाल्या.

'जरूर. जरूर. काय काम काढलंयत् ?' घरधन्यानी हसून विचारले.

ग्रिगरी आत आला. आजुबाजूला त्याने नजर टाकली आणि कोर्शुनोवना नमस्कार केला. मिरोनच्या पिवळसर ठिपक्याच्या गालावर आरक्ता पसरली. भेटीचा हेतू आता त्यांनी ओळखला.

'घोडी आवाडात घ्या. त्यांच्यापुढं थोडी चारावैरण टाका' त्यांनी बायकोला हुकूम सोडला.

'थोडंसं बोलणं करायचं होतं.' पंतीलेय् पुढं म्हणाला. आपली कुरळी दाढी पिरगळीत कानातील चंद्रकोर ओढीत तो बावरल्यासारखा बोलत होता

'आपल्याला लग्नाची मुलगी आहे. आमचा मुलगाही लग्नाचा आहे. तेव्हा जमेल का हे ? कळलं तर बरं होईल. तिचं लग्न करायचा विचार आहे का नाही ? आपली सोयरीक जुळेल का ?'

'कुणास ठाऊक !' मिरोनने आपले टक्कल खाजवीत म्हटले, 'ह्या पानगळतीत तरी तिचं लग्न करायचा विचार नाही. आमचे हात कामानं अगदी बांधले गेलेत. तशी ती फारशी मोठीही झाली नाही. गेल्या वसंतात तिला अठरावं सरलं. होय ना मारिया ?'

'हो हो'

'म्हणजे अगदी लग्नाच्याच वयाची आहे' वासिलिसा मधेच म्हणाली, 'मुलगी पाहता पाहता जरड होते !' तिने स्टुलावर अंगाची चाळवाचाळव केली. त्या पडवीतला कुंचा चोरून तिने तो जाकिटात लपवला होता. तो तिला टोचत होता. मुलीच्या घरचा कुंचा चोरणाऱ्या मध्यस्थाला वाटाण्याच्या अक्षता कधीही लागत नाहीत. अशी एक समजूत होती.

'वसंतातच आमच्या मुलीला मागण्या आल्या होत्या. आमची पोर ताटावरून पाटावर आणि पाटावरून ताटावर करणारी नाही. देवाला बोल लावावा असं आमच्याजवळ काही नाही सगळं येतं हो तिला करायला. शेतीचं काम–घरकाम–' कोर्शुनोवच्या बायकोने उत्तर दिले.

'चांगलं स्थळ चालून आलं तर तुम्ही काही नाकारणार नाही' पंतीलेय्‌ने त्या बाईच्या जिभेचा पट्टा आवरायला म्हटले.

'नाही म्हणायचा प्रश्न नाही' घरधनी डोके खाजवीत म्हणाले.

'कोणत्याही क्षणी तिला उजवून टाकू.'

आपल्या पदरी नकार येणार असं वाटून पंतीलेय् गांगरला.

'अर्थात प्रश्न तुमचा आहे. माणसाच्या आवडीनिवडी असतात. त्याला वाटेल तिथं त्यानं विचारावं. एखाद्या शेटजीबिटजीचा मुलगाच हवा असा आपला आग्रह असेल तर गोष्ट वेगळी. आम्ही आपली माफी मागतो.'

वाटाघाटी फिसकटण्याच्या बेतात होत्या. पंतीलेय् क्षुब्ध होऊ लागला. बीट मुळाप्रमाणे त्याचा चेहरा लाल झाला. घारीची सावली पडल्यावर बसलेल्या कोंबडीने कलकल आवाज करावा तसा आवाज मुलीची आई करू लागली पण ऐन वेळी वासिलिसा मधे पडली. जखमेवर फुंकर घातल्यासारखा तिच्या मिठ्ठास शब्दांचा ओघ वाहू लागला. पडणारे भगदाड बुजले गेले–

'बरं का, माझं ऐका आता ! असली बाब पुढं आली म्हणजे शांतपणे मुलांचे हिताहित बघून ती ठरवायला हवी. नातालियाबद्दल काय सांगावं ? त्रिखंड धुंडाळलं तरी अशी पोर मिळायची नाही. कामाला वाघीण आहे. किती हुषार आहे ! घर सांभाळायला खबरदार आहे. देखणेपणाबद्दल तर काय सांगावं ! तुम्हीच ते पहा मंडळी ' तिने आपले थुलथुलीत हात ऐसपैस पसरले. पंतीलेयकडे आणि दुर्मुखलेल्या इलीनिचनाकडे वळून ती म्हणाली, 'आणि हासुद्धा कुठल्याही मुलीला साजेसाच नवरा आहे. त्याला पाहिलं की माझं काळीज तडफडू लागतं. अगदी माझ्या गेलेल्या नवऱ्यासारखा आहे. प्रकोफीएविचबद्दल पंचक्रोशीत कुणालाही विचारा. अख्खी दुनिया सचोटीचा आणि प्रेमळ म्हणून त्याला ओळखते. खरं सांगा बरं आपल्या पोराचं वाईट व्हावं असं आपल्याला कधी वाटेल का ?'

कानउघडणी करणाऱ्या तिच्या पातळ आवाजाचा ओघ पंतीलेय्च्या कर्णसंपुटांना एखाद्या सरबतासारखा वाटत होता. तो ऐकत असताना स्वतःशी कौतुकाने म्हणत होता. 'काय गोडबोली सटवी आहे ! कशी बोलत्येय ! ऐकत रहावं. काही बायका जिभेच्या पट्ट्यानं कशाकचीही बोबडी वळवतील आणि–' वासिलिसाचे कौतुक करण्यात त्याची तंद्री लागली होती. वासिलिसा स्वतः मुलीचे आणि तिच्या घराण्याचे गुणगान गाता गाता पार पाचव्या पिढीपर्यंत जाऊन पोचली होती.

'अर्थात आमच्या पोरीचं वाईट व्हावंसं आम्हाला कसं वाटेल ?' 'मुद्दा असा आहे की तिचं लग्न आताच करणं घाईचं होईल,' घरधनी शांतपणे हसून म्हणाले.

'घाईचं नाही ! देवाच्यान ह्यात घाई होत नाही आहे ' पंतीलेय्ने पटकन उत्तर दिले.

'आज ना उद्या तिची पाठवणी आम्हाला करावीच लागणार आहे ' घरधनीण हुंदका देत म्हणाली.

'तुमच्या मुलीला बोलवा मिरोन ग्रिगोरीएविच, नजरेखालून घालू तिला.'

'नातालिया !'

एक मुलगी भेदरून दाराजवळ आली. तिची काळेजली बोटे एप्रनच्या चुण्यांशी चाळा करीत होती.

'आत ये ! आत ये ! लाजली आहे ती ' डोळ्यात आसवे आलेल्या आईने हसत तिला धीर दिला.

निळी मावळ्या रंगाची फुले रंगवलेल्या पेटाऱ्याशेजारी ग्रिगरी बसला

होता. त्याने तिच्याकडे पाहिले. डोक्याला बांधलेल्या काळ्या लेसस्कार्फच्या खाली धीट धारे डोळे ! मुलायम गालावर चिमुकली गुलाबी खळी. ग्रिगरीचे डोळे तिच्या हाताकडे वळले. ते थोराड आणि कामाच्या उस्तवारीने निबर झालेले होते. तिच्या कणखर शरिराला लपेटलेल्या आखूड हिरव्या जाकिटाखालून षोडशेची लहानखुरी टणक वक्ष:स्थळे निरागसपणे, कारुण्याने उफाळली होती. त्यांची टचटचीत चिमुकली कुचाग्रे बटणासारखी दिसत होती. क्षणार्धात ग्रिगरीने डोक्या-पासून सुंदर दीर्घ पायापर्यंत तिचा संपूर्ण आढावा घेतला. खरेदीपूर्वी सौदागराने घोडीची पाहणी करावी तसे तिला न्याहाळून तो मनाशी म्हणाला, 'चालेल !' नंतर त्याने आपले डोळे तिच्या डोळ्यांना भिडवले. ती भाबडी प्रामाणिक आणि किंचित अवघडलेली नजर जणू त्याला म्हणत होती 'ही मी सगळी अशी आहे. मनाला वाटेल तशी माझी परीक्षा कर.'

'ठीक आहे. पुरे' तिच्या बापाने हाताने तिला बाहेर जाण्याचा इशारा केला.

बाहेर गेल्यावर दार लावून घेताना नतालियाने आपले स्मित किंवा उत्सुकता लपवण्याचा प्रयत्न न करता ग्रिगरीकडे कटाक्ष टाकला.

'ऐका पंतीलेय प्रकोफीएविच्,' बायकोशी नजरानजर झाल्यावर कोर्शुनोव बोलू लागले, 'तुम्ही तुमच्या मंडळीशी बोला. आम्हीही घरात विचारविनिमय करतो. नंतर मग ठरवू की कार्य करायचं का नाही ते.'

पायऱ्या उतरताना शेवटचा शब्द म्हणून पंतीलेय् म्हणाला, 'पुढल्या रविवारी आम्ही परत येऊन जाऊ.'

आपण ऐकलेच नाही असे दाखवीत कोर्शुनोव बुढ्याच गप्प बसले.

१६.

आक्सीनियाच्या वर्तणुकीबद्दल तोमिलिनकडून कळले तेव्हा स्तिपानच्या मनोमनी वेदना आणि विद्वेषाने घर केले. पण तेव्हाच त्याला ही जाणीवही झाली की तिचे आपले सहजीवन भिकारडे असले तरी तिच्यावर आपले भारावलेले प्रेम आहे. आपला फर्गोल पांघरून आणि एकमेकात अडकावलेले बाहू उशाला घेऊन

रात्री तो रेकल्यात पडला होता. आपण घरी गेल्यावर आपली बायको आपली संभावना कशी करील ह्याचा तो विचार करीत होता. आणि त्याला वाटत होते की आपल्या छातीत काळजाच्या ऐवजी एक विंचू बसलेला आहे. सूड उगवण्याच्या हजार बारकाव्यांचा विचार करताना त्याला वाटत होते की, आपल्या दातात जडशीळ रेती घट्ट चिकटून बसलीय. प्योत्रबरोबर झालेल्या मारामारीने त्याचा राग उतास गेला होता. घरी आला तेव्हा तो थकिस्त होऊन गेला होता. आणि आक्सीनियाची थोडक्यावर सुटका झाली होती.

त्याच्या घरी परतल्या दिवसापासून आस्ताखोवच्या घरात एक अदृश्य पिशाच्च वास करू लागले. आक्सीनिया चौड्यावर वावरत होती कुजबुजत बोलत होती. तिच्या डोळ्यात भयाची राख उडाली होती. तरी ग्रिगरीने चेतवलेल्या ज्वाळेची उरलेली एक ठिणगी त्या राखेतूनही लुकलुकत होती. तिला निरखताना स्तिपानला हे जेवढे दिसत होते त्याहून जास्त जाणवत होते. तो स्वतःचा छळवाद करीत होता.

रात्री माशांचा थवा तुळईवर झोपी गेला आणि थरथरत्या ओठांनी आक्सीनियाने गादी घातली तेव्हा आपला निबर तळवा तिच्या तोंडावर दाबून त्याने तिला बदडून काढली. ग्रिगरीशी असलेल्या संबंधांचा निलाजरा तपशील सांग म्हणून तिला दरडावले. मेंढयाच्या कातडयाचा वास येणाऱ्या बिछान्यावर आक्सीनिया तडफडत होती. श्वास घेण्यासाठी उघडया तोंडाने धापा टाकत होती. तिच्या कणकेसारख्या गुलगुलीत शरीराचे हाल करून दमल्यावर तिच्या डोळ्यातून हात फिरवला. पण तिचे गाल शुष्कपणे जळत होते. त्याच्या बोटांना तिच्या दाभाडाची हालचाल तेवढी जाणवली.

'सांगणार का नाही ?'

'नाही.'

'जीव घेईन–'

'घे जीव. घे जीव माझा! येशूशपथ जीव घे! करायचंय काय हे आयुष्य...!'

कराकरा दात खात स्तिपानने तिच्या उरावरचं घामाने डबडबलेले मुलायम मांस पिरगळले. आक्सीनिया थरथरली आणि विव्हळली.

'दुखतंय ? स्तिपानने चेष्टेने विचारले.

'हो दुखतंय–'

'माझं काहीच दुखलं नाही असं वाटलं ?'

खूप उशीरा तो झोपला. झोपेत तो हाताच्या मुठी आवळत होता. आपल्या कोपरावर उंचावून आक्सीनिया नवऱ्याच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहात होती. नंतर तिचे डोके उशीवर कोसळले आणि ती स्वतःशी पुटपुटू लागली.

आता ग्रिगरी तिला क्वचितच भेटे. एकदा डॉनच्या काठावर तो तिला अकस्मात भेटला. आपल्या बैलांना पाणी देऊन चढणीवरून तो वर येत होता. आपली पावले न्याहाळीत छडी फिरवीत तो येत होता. आक्सीनिया खाली डॉनकडे निघाली होती. तिने त्याला पाहिले. त्याबरोबर हातातील बादल्यांच्या कावडीचा दोर थंड पडत चालला आहे आणि गरम रक्त कानशिलात उसळून येत आहे असे तिला वाटले. नंतर त्या भेटीची आठवण करण्याचा तिने प्रयत्न केला. तेव्हा ते खरोखरीच घडले ही स्वतःची खात्री पटवणेही तिला मुष्कील वाटू लागले. ती अंगावरून पार निघून गेल्यावर ते ग्रिगरीच्या लक्षात आले. बादल्यांची अखंड करकर–करकर ऐकून त्याने मान वर केली. त्याच्या भुवया थरारल्या आणि तो खुळ्यासारखा हसला. त्याच्या डोक्यावरून पार पलीकडे डॉनच्या हिरव्या लाटांकडे आणि गोटयाळ कडपट्टीच्या कांडाळ्यापलीकडे आक्सीनियाची नजर लागली होती. उमाळ्याने तिच्या डोळ्यांतून आसवे डबडबली.

'क्यूशा[1]!'

ती काही पावले चालून गेली आणि आघाताच्या अपेक्षेने राहिल्यासारखी मान खाली करून उभी राहिली. सुस्तावणाऱ्या बैलावर रागाने चाबूक ओढीत वळून न बघता त्याने विचारले.

'रायची कापणी स्तिपान कधी करणार आहे?'

'चाललयेय् त्याची तयारी–'

'तो गेल्यानंतर आमच्या सूर्यफुलाच्या वावराकडं ये. मी मागाहून येतो.'

आपल्या करकरत्या बादल्या घेऊन आक्सीनिया खाली डॉनवर गेली. काठाने फेस वळवळत होता. लाटेच्या हिरव्या पदराला पिवळेधमक काठ लागले होते. पांढरे समुद्रपक्षी नदीवर चीत्कारीत घिरटया घालीत होते. पाण्याच्या पृष्ठभागावर चिमुकल्या मासळ्यांची चंदेरी बरसात चालली होती. पैलतीरावर गोटयाळ कडपट्टीच्या ढवलाईपलीकडे पुरातन हिंवराचे करडे शेंडे आढयतेने आणि उग्रगांभीर्याने उंचावले होते. पाणी भरता भरता आक्सीनियाने घागर टाकून दिली. झगा अंगावर ओढून घेऊन ती गुडघाभर पाण्यात चालत गेली.

टीप १. क्यूशा : 'आक्सीनिया' चे प्रेमळ संक्षिप्त संबोधन.

पाणी तिच्या पोटऱ्याना गुदगुल्या करीत होते. स्तिपान आल्यापासून पहिल्यांदाच तिला निःशब्द आणि साडेदिडे हसू फुटले.

तिने मुरडून ग्रिगरीकडे पाहिले. अजून आपली छडी फिरवीत तो हळूहळू चढण चढत होता. ठामपणाने भूमीवर पदक्षेप करीत जाणाऱ्या त्याच्या दणकट पायाना आक्सीनियाने आसूधूसर नजरेने कुरवाळले. लोकरी पायमोज्यात दडपलेल्या त्याच्या ढगाळ तुमानीवर रंगीले किरमीजी पट्टे होते. त्याच्या पाठीवर, खाद्याच्या पात्यावर नुकत्याच फाटलेल्या शर्टाची धांदोटी फडफडत होती आणि त्या छिद्रातून काळेजल्या कातडीचा त्रिकोण दिसत होता. एकेकाळी जो तिचा होता त्या आपल्या प्रियकराच्या देहाच्या त्या चिमुकल्या पट्टीचा आक्सीनियाने नजरेने मुका घेतला आणि तिच्या विवर्ण सस्मित ओठांवर अश्रू ओघळले.

कावडीत बांधायला म्हणून तिने आपल्या बादल्या खाली वाळूत ठेवल्या. तेवढ्यात ग्रिगरीच्या बुटांचे ठसे तिच्या नजरेस पडले. तिने चोरट्या नजरेने चौबाजूला पाहिले. आसपास कुणीही नव्हते. फक्त काही पोरे दूरच्या पडतोऱ्यावर आंघुळी करीत होती. ती उकीडवी बसली आणि त्या पदमुद्रा तिने हातांच्या तळव्यांनी झाकून टाकल्या. मग ती उठून उभी राहिली. कावड खांद्यावर मारली आणि स्वतःशी स्मित करीत झपाझपा घराकडे निघाली.

धुक्याची मलमल ओढून घेतलेला सूर्य खेड्याच्या डोक्यावरून चालला होता लहान लहान पांढऱ्या अभ्रांच्या पश्चिमनी कळपापलीकडे प्रगाढ निळाईचे शीतळ कुरण पसरले होते. पण पत्र्याच्या तापलेल्या छपरावर, निर्मनुष्य धूळभरल्या रस्त्यांवर खडखडीत वाळलेल्या पिवळ्या गवताच्या वावरांवर मात्र मरणांतिक घालमेल कलकलली होती.

आक्सीनिया पावलाणाजवळ आली तेव्हा स्तिपान रुंदट काठाची गवती टोपी घालून कापणीयंत्राला घोडी जुंपत होता–

'थोडं पाणी हंड्यात ओत.'

आक्सीनियाने एक बादली हंड्यात ओतली. तापलेल्या लोखंडी काठाचा तिच्या बोटाना चटका बसला.

'पाण्यात थोडा बर्फ टाकायला हवा. नाहीतर पाणी आत्ता गरम होऊन जाईल' आपल्या नवऱ्याच्या घामाने डबडबलेल्या पाठीकडे बघत ती म्हणाली.

'मेलीखोवच्या घरातून थोडा मागून आण जा' एवढ्यात आठवण होऊन स्तिपान ओरडला.

'नको नको– जाऊ नको.'

आक्सीनिया फाटक लावून घ्यायला गेली. स्तिपानने नजर खाली करून आसूड हिसकावून काढला–

'कुठं चाललीस ?'

'फाटक लावायला–'

'मागं फीर कुत्तरडे ! सांगितलं ना जाऊ नको म्हणून !'

ती घाईघाईने पावलाणाकडे परतली. आपली कावड तिने कठडयावर टांगायचा प्रयत्न केला. पण तिचे हात फारच लटपटत होते. कावड खडखडत खाली आली.

स्तिपानने आपला मेणकापडी कोट पुढच्या बाजूला फेकला आणि लगाम हाती घेतले.

'फाटक उघड.'

तिने फाटक उघडले आणि हिय्या करून विचारले.

'परत केव्हा येणार ?'

'संध्याकाळपर्यंत ! आनिकुश्काबरोबर कापणी करायचं मी कबूल केलंय्. त्याला जेवण घेऊन जा. सुतारा-लोहाराकडचं काम झालं की तो शेतावर येणार आहे.'

धुळीची करडी मखमल नकसत जाणारी कापणीयंत्राची चाके करकरत होती. आक्सीनिया घरात गेली. दोन्ही हातात डोके दाबून उभी राहिली. मग तिने केसांवर लगबगीने रुमाल बांधला आणि नदीकडे ती धावत सुटली.

'पण समज तो परत आला तर ग ? मग काय ?' ह्या विचाराने अचानक तिच्या मनाला चटका दिला. पायाखाली खोल खड्डा दिसावा तशी ती थबकली. तिने मागे मुरडून पाहिले आणि नदीकाठाने कुरणाकडे धूम ठोकली.

कोंडे. भाजीपाल्याचे ओफाडे. सूर्याकडे अखंड टक लावून बसलेल्या सूर्यफुलांचा पिवळा दरिया. बटाटयाच्या कोंभांचा फिक्कटलेला हिरवेपणा. शामीलाच्या घरातील बायका आपला बटाटयाचा वाफा फावडयाने उकरीत होत्या. गुलाबी कुडत्यातील वाकलेल्या पाठीवर उडणारी आणि करडया मातीत खस्कन पडणारी फावडी. मेलीखोवच्या मळयात पोचल्यावर आक्सीनियाने आजूबाजूला नजर टाकली. कुडाचा कोयंडा उचलला आणि फाटक उघडले. सूर्यफुलांच्या देठाच्या हिरव्या मेढेकीराकडे जाणाऱ्या बांदाडीला ती लागली. खाली वाकून ती त्या देठांच्या गर्दीत घुसली. सोनेरी केसरांनी तिचा चेहरा माखून गेला. झगा वर उचलून तिने तणस-वीण गवताळयात बैठक मारली.

ती ऐकत होती. नीरवता तिच्या कानात घुमत होती. तिच्या डोक्यावरून कुठूनतरी भुंग्याचा एकाकी गुंजारव ऐकू येत होता. बुरकुले बसलेल्या सूर्यफुलाचे पोकळ दांडे भूमीला चिटत होते. तर्ककुतर्क करून स्वतःला छळीत सुमारे अर्धातास अशीच ती बसली होती.

'तो येईल का ?'

ती परत जाण्याच्या बेतात होती. आपला रुमाल ती डोक्यावर नीट सावरून घेत होती. एवढ्यात फाटक जोराने घसटले. पावलांचा आवाज आला—

'आक्स्यूत्का—'

'इकडून—'

'आलीस तर तू !' पाने सळसळवीत ग्रिगरी जवळ आला आणि तिच्या बाजूला बसला. निःशब्दपणे ते तसेच बसले.

'ते तुझ्या गालावर काय आहे ?'

ती सुगंधी सोनेरी धूळ आक्सीनियाने आपल्या बाहीने पुसली—

'सूर्यफुलाचं लागलं असेल.'

'तिथंही आहे डोळ्याखाली.'

तिने ते पुसून टाकले.

त्यांच्या नजरा एकमेकांना भिडल्या. ग्रिगरीच्या मूक प्रश्नाला उत्तर म्हणून तिला रडू कोसळले.

'माझ्यानं हे सहन होत नाही... माझं वाटोळं झालं ग्रिशा.'

'काय करतो तो ?'

संतप्तपणे तिने आपल्या पोलक्याची गळपट्टी तटतटा उघडी केली. तिची गुलाबी उफाड्याची स्तने काळ्यानिळ्या जखमांच्या खुणांनी भरून गेली होती.

'माहीत नाही तुला ? रोज तो मला मारहाण करतो. माझं रगत पितोय् तो...तू...शहाजोग ! कुत्रीसारखी मला नासवलीस आणि चालता झालास... तुम्ही सगळे...' थरथरत्या बोटांनी तिने पोलक्यांची बटणे लावली. त्याला आपण दुखावले ह्या भीतीने तिने त्याच्या बाजूला फिरवलेल्या चेहऱ्याकडे दृष्टी-क्षेप केला.

'म्हणजे तुला सगळं खापर माझ्या माथी मारायचंय ?' गवताचे पाते चावीत तो हळूहळू म्हणाला.

'आणि तुझा काही दोषच नाही का ?' तिने किंचाळून विचारले.

'कुत्री राजी नसेल तर कुत्रा कशाला वाटेला जातोय ?'

आक्सीनियाने चेहरा आपल्या तळव्यात झाकून घेतला. जाणूनबुजून थोबाडीत मारावी तसा तो अपमान तिच्या मर्माला भिडला.

ग्रिगरीने आठ्या घालून तिरप्या नजरेने तिच्याकडे पाहिले. तिच्या तर्जनी आणि मधल्या बोटाच्या फटीतून एक आसू घरंगळत होता. सूर्यकिरणाची एक भग्न धूसर तिरीप त्या पारदर्शी थेंबावर चमचमत होती. त्यात तो थेंब वाळून गेला आणि त्याची दमट खूण तिच्या कातडीवर उरली.

ग्रिगरीला डोळ्यातून पाणी काढलेले सहन होत नसे. तो अस्वस्थपणे चुळबूळ करीत होता. आपल्या तुमानीवरची धिगट मुंगी त्याने निष्ठुरपणे झटकून टाकली आणि परत आक्सीनियाकडे दृष्टीक्षेप टाकला. ती हालली नव्हती पण आसवांचे तीन ओघळ तिच्या तळव्याच्या मागच्या बाजूने खाली घळघळत होते.

'आरडाओरडा करायला काय झालं ? मी तुला दुखावलं का ? कसूशा हे बघ ! पुरे आता ! मला काही सांगायच.'

बळेच तिने चेहऱ्यावरचे हात दूर केले. 'मी आले तुझं मत विचारायला. तू कशाला आलास ? आधीच मी तडफडत्यय आणि तू--

'पडलेल्यावर प्रहार.' ग्रिगरी ह्या विचाराने एकदम ओशाळून गेला, 'आक्सीनिया, माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नव्हता. मनावर घेऊ नको.'

'तुझ्या गळी पडायला नाही आले. भिऊ नको--'

आपण काही ग्रिगरीच्या गळी पडायला नाही आलो असे त्या क्षणी तिला वाटले खरे. पण डॉनच्या काठाने पळत येत असताना मात्र तिच्या मनात अस्पष्ट विचार घोळत होते. 'मी त्याचं मन वळवीन. ग्रिगरी लग्न करून मोकळा होणार नाही. तसं झालं तर मी कुणाच्या तोंडाकडे पाह्यचं ?' पण मग स्तिपानची तिला आठवण झाली आणि हे त्रासदायक विचार पिटाळून लावण्यासाठी तिची मान निग्रहपूर्वक हलली.

'म्हणजे आपलं प्रेम संपलं ?' ग्रिगरीने विचारले आणि तो पोटावर पालथा वळला. एका कोपरावर शरिराला आधार देत तो तोंडातील तेडंफुलाच्या पाकळ्या थुंकू लागला.

'संपलं म्हणजे ? काय अर्थ तुझ्या बोलण्याचा ?' आक्सीनिया भयभीत झाली. 'काय म्हणायचंय् तुला ?' त्याच्या डोळ्यात बघण्याचा प्रयत्न करीत तिने परत परत विचारले.

तिची नजर टाळणाऱ्या त्याच्या डोळ्यात निळसर पांढरी छटा होती. शुष्क आणि मलूल होऊन गेलेल्या धरणीला धुळीचा आणि उन्हाचा गंध येत होता.

मोठाल्या हिरव्या पानांतून वारा सळसळत होता. एक तरंगता ढग क्षणभर सूर्यावर आल्याने काळोखी पसरली खेड्यावर, आक्सीनियाच्या खाली झुकलेल्या डोक्यावर, तेंडफुलाच्या गुलाबी पेल्यावर, धुरकट सावट आले.

ग्रिगरीने जोराने निःश्वास टाकला आणि तो उताणा झाला. गरम मातीत खांद्याची पाती रुतवीत तो हळूहळू एक एक शब्द मापून बोलू लागला.

'हे बघ आक्सीनिया ! ह्या सगळ्याची ओकारी आल्येय्. छाताडातून हे काहीतरी शोषून घेतंय. मी विचार करत होतो.'

भाजीच्या ओफाड्यातून गाडीचा करकरता आणि त्याच बरोबर एका बाईचा आवाज आला.

'हैक हैक..ढवळ्या बैलाला...!'

ती हाक इतकी जवळून आल्यासारखी आक्सीनियाला वाटली की ती भुई सपाट आडवी पडली. आपले डोके उचलून ग्रिगरी कुजबुजला.

'तुझ्या डोक्याचा रुमाल काढ. दिसतोय तो. त्यांच्या दृष्टीला पडू आपण.'

तिने आपला रुमाल काढून घेतला. सूर्यफुलातून भटकणारी वाऱ्याची गरम झुळूक तिच्या मानेवरील फोंडवळीच्या सोनेरी लवीच्या पुंजक्याशी बागडत होती. गाडीचा आवाज हळूहळू विरत गेला.

'हं...तर मी असा विचार करीत होतो' ग्रिगरी परत बोलू लागला. मग तो जास्त उद्दीपित स्वरात म्हणाला, 'जे झालं ते झालं ! कुणाचा दोष ते कशाला हुडकीत बसायचं ? काही झालं तरी आयुष्य जगलं पाहिजे.'

आक्सीनिया सभय उत्सुकतेने ऐकत होती. ऐकता ऐकता हातातील लांबट डेखाचे तुकडे करीत होती. तिने ग्रिगरीच्या चेहऱ्याकडे रोखून पाहिले. त्याच्या डोळ्यात एक रुक्ष आणि स्थिर चकाकी असल्याचे तिने पाहिले.

'मी विचार करीत होतो आपण शेवट करून टाकू या–'

आक्सीनियाचे झोकांड गेल्यासारखे झाले. त्याचे वाक्य संपण्याची वाट बघताना तिची बोटे तेडाच्या डहाळीवर घट्ट आवळली गेली.

धास्तीची आणि अधीरतेची ज्वाळा तिच्या मुखावर लसालसा चढू लागली. तिच्या तोंडाला कोरड पडली. तिला वाटलं की हा आता म्हणणार 'शेवट करून टाकू या स्तिपानचा.' पण आपल्या कोरड्या चाळबाचाळब करणाऱ्या ओठावरून त्याने अस्वस्थतेने जीभ फिरवून म्हटले ! शेवट करून टाकू या ह्या प्रकरणाचा, आँ ?'

आक्सीनिया उठून उभी राहिली आणि डोलत्या पिवळ्या सूर्यफुलांच्या ताटव्यात घुसून ती फाटकाकडे निघाली.

'आक्सीनिया' ग्रिगरीने रुद्ध कंठाने हाक मारली. उत्तरादाखल फाटक जोरात करकरले.

१७.

रायची कापणी होऊन तो कणगऱ्यात नेईनेईतो गहू पिकला. चिखलाळ शेतातून आणि उतरवटयावरून वाळलेली पाने पिवळी पडून त्यांच्या नळकांड्या वळल्या. देठांचे जीवितकार्य संपले आणि ते झडून गेले.

प्रत्येकजण चांगल्या पिकाची भलावण करीत होता. कणसे पुष्ट झाली होती. दाणा वजनदार आणि गरगरीत होता.

इलीनिचनाशी गोष्टी करून झाल्यावर पंतीलेय्ने ठरवले की, कोर्शुनोवने होकार दिला तरी ऑगस्टच्या सहा तारखेच्या आधी काही कार्य काढता यायचे नाही. उत्तरासाठी तो अजून कोर्शुनोवच्या घरी गेला नव्हता प्रथम कापणी करायची होती. नंतर सणाची तीथ येईस्तोवर थांबायला हवे होते.

शुक्रवारी मेलीखोव कुटुंबाने कापणी सुरू केली. कापणीयंत्राला तीन घोडी जुंपण्यात आली. पंतीलेयने गाडीचा सांगाडा उतरवला आणि भारे वाहून नेण्यासाठी साटीची सिद्धता केली. कापणी करण्यासाठी प्योत्र आणि ग्रिगरी शेतावर गेले. प्योत्र गाडीवर बसला होता. आणि ग्रिगरी बाजूने चालला होता. आपला भाऊ बसला होता त्या धुरेवर हात ठेवून ग्रिगरी आपल्या नादात चालला होता. त्याचे दाभाड आणि गालफड ह्यांच्या मधले स्नायू हलत होते. आपला भाऊ खदखदतोय आणि तंटा करायची त्याला सुरसुरी आली असल्याची ही हमखास निशाणी असल्याचे प्योत्रला ठाऊक होते. पण आपल्या गव्हाळ मिशाखालून स्मित करीत तो ग्रिगरीला खिजवण्याच्या उद्योगाला लागला–

'देवाशपथ तिनं स्वत:च मला हे सांगितलं.'

'सांगितलं तर सांगितलं! मला काय' आपल्या मिशीचा एक केस चावीत ग्रिगरी पुटपुटला.

'म्हणते कशी– 'गावाकडून मी परत येत होते. मेलेखोवच्या सूर्यफुलाच्या वावरात बोलण्याचे आवाज आले '

'प्योत्र, गप्प बस !'

'होय आवाज ! मी कुंपणातून डोकावलं–'

ग्रिगरीच्या पापण्या फडफडल्या, 'आता गप्प बसणार आहेस का नाही ?'

'तू पण चमत्कारिकच पोरगा आहेस. माझं सांगून तर होऊ दे–'

'मी तुला बजावतोय प्योत्र ! आपली 'फाईट' होईल हा !' ग्रिगरीने आपली चाल मंदावत दम भरला.

प्योत्रने भ्रुकुटी उंचावल्या आणि आपल्या जागेवरून त्याने ग्रिगरीकडे तोंड वळवले–

'मी कुंपणातून पाहिलं तर आषुकमाषुकाची जोडी एकमेकांच्या कुशीत पडलेली. ती म्हणते. मी विचारलं–

'कोण आषुकमाषुक ?' ती उत्तर देते 'कोण काय ?' आक्सीनिया आणि तुझा भाऊ ' मी म्हटलं...'

कापणीयंत्राच्या मागच्या बाजूला ठेवलेल्या धारियाचा दांडा हातात धरून ग्रिगरी आपल्या भावाच्या अंगावर धावून गेला. प्योत्रने लगाम टाकून दिले. बसल्या जागेवरून उडी मारली आणि घोड्याच्या आड जाऊन तो ग्रिगरीला चुकवू लागला.

'ए सैतान !' तो ओरडला. 'अरे ह्याला खूळ लागलंय ! एऽऽ धरा ए ह्याला !'

लांडग्यासारखे दात विचकून ग्रिगरीने तो धारिया भावाला फेकून मारला. प्योत्र चटकन गुडघ्यावर हातावर बसला. तो धारिया त्याच्या डोक्यावरून पलीकडे जाऊन एकदम जमिनीत ताठ उभा राहिला. त्याचा बांबू सुंकारीत थरथरत होता. डोळे वटारून प्योत्रने भेदरलेल्या घोड्याचे लगाम हातात घेतले आणि एक सणसणीत शिवी घालून म्हटलें, 'माझा जीव घेतला असतास रे डुकरा !'

'हो हो जीवच घेणार होतो तुझा !'

'मूर्ख आहेस. पागल सैतान. बापाचा पोरगा शोभतोस ! अस्सल तुर्क !'

जमिनीत रुतलेला धारिया ग्रिगरीने उपसून काढला आणि तो कापणी-यंत्राच्या पाठोपाठ जाऊ लागला. प्योत्रने त्याला बोटाने जवळ येण्याचा इशारा केला.

'इकडं ये ! तो धारिया आण इकडं.'

उजव्या हातातले लगाम त्याने डाव्या हातात घेतले आणि दांताळयाच्या टोकाने तो धारिया धरला आणि त्याच्या दांड्याने त्याने ग्रिगरीच्या पाठीवर हाणले.

'आणखी चांगला बसायला हवा होता.'

उडी मारून पळालेल्या ग्रिगरीकडे तसेच डोळे रोखून तो म्हणाला. थोड्या वेळाने दोघांनी सिगरेटी पेटवल्या. एकमेकांच्या डोळ्यात रोखून पाहिले आणि दोघेही खो खो हसत सुटले.

दुसऱ्या एका वाटेने गाडीत बसून घरी निघालेल्या ख्रिस्तोनियाच्या बायकोने ग्रिगरी आपल्या भावावर हल्ला चढवीत असलेला पाहिला. आपल्या रेकल्यात ती उठून उभी राहिली पण काय झाले ते तिला दिसले नाही. कारण ती आणि ते बंधू ह्यांच्या आड मेलीखोवचे कापणीयंत्र आणि घोडे होते.

ती खेड्यात पोचते न पोचते तोच ओरडून आपल्या शेजाऱ्याना सांगू लागली.

'विल्मोव्ना ! धावत जा आणि त्या तुर्की प्रकोफीएविचला म्हणावं की, त्याची पोरं तातार डुंगीच्या जवळ धारियाने एकमेकाशी मारामारी करताहेत. ग्रिगरीनं प्योत्रच्या कुशीत धारिया खुपसला नंतर प्योत्रने त्याला...रक्ताचं थारोळ झालंय. अग आई ग ऽऽ !'

थकलेल्या घोड्यांना हाकलताना प्योत्रचा घसा बसायला आला होता. म्हणून आता तो शीळ घालू लागला. आपला धुळीनं भरलेला एक पाय गाडीच्या तडशावर ठेवून ग्रिगरी धारिया हातात घेऊन कापणी यंत्रावरून गवताचे कवेळ काढीत होता. माश्यानी चावून भंडावलेले घोडे शेपट्या फिस्कारीत अनिच्छेने गाडी ओढीत होते. सगळ्या रानात कापणीची कामे भरात होती. यंत्राची पाती खडखडत रेंगत होती. धान्याच्या कवेळ्यांचे पुंजके मैदानावर ठिकठिकाणी दिसत होते. गाडीवाल्यांची नक्कल करीत मारमोत टेंबल्यावर शीळ घालीत होते.

'आणखी दोन खेपा करून सिगरेट ओढायला थांबू या' यंत्राच्या घरघरीवर आवाज काढून प्योत्र ओरडला. ग्रिगरीने मुंडी हलवली. आपले सुकलेले ओठ त्याऱ्याने उघडवत नव्हते. वजनदार कवेळांवर अधिक नेट लावता यावा म्हणून त्याने धारिया दांताळयाच्या जवळ पकडला होता आणि तो धापा टाकीत होता. घामाने डबडबलेली त्याची पाठ खाजू लागली होती. टोपीखालून घामाच्या धारा चेहऱ्यावर ओघळत होत्या. साबणासारख्या त्या डोळ्यात जाऊन

चुरचुरत होत्या. घोडे थांबवून ते पाणीढिणी प्याले आणि त्यांनी सिगरेटी ओढल्या.

'रस्त्यावरून कुणीतरी भरधाव घोडा फेकत येतोय्.' तळव्याचा आडोसा कपाळावर धरून प्योत्र म्हणाला.

ग्रिगरी बघू लागला आणि चकित होऊन त्याने भुवया उंचावल्या.

'बाबा दिसतोय.'

'यड्पट् आहेस. तो कशावर बसून येणार? दोन्ही घोडी इथंच आहेत–'

'तोच आहे. देवाच्यान्, बाबा आहे.'

घोडेस्वार जवळ आला आणि थोड्याच वेळात दौडत येणारा घोडा आणि वरचा स्वार स्पष्टपणे दिसू लागला.

'होय बाबाच आहे' प्योत्रने सचिंत आश्चर्याने पाय आपटून म्हटले.

'घरी काय झाले का काय!' दोघांच्याही मनाला छळणारा विचार ग्रिगरीने बोलून दाखवला.

सुमारे शंभर यार्ड अंतरावर पंतीलेय्ने आपल्या घोड्याचे लगाम खेचले.

'झोडपून काढतो तुम्हाला कुत्तरडीच्यानो.' हातातला आसूड डोक्याभोवती गरगरा फिरवीत तो गरजला.

'अरे पण काय झालं तरी काय?'

प्योत्र अगदी दिङ्मूढ होऊन गेला होता आणि अर्ध्या मिशा त्याने तोंडात दडपल्या होत्या.

'पलीकडं जा गाडीच्या! देवाच्यान तो आपल्याला आसुडाने हाणील त्याला कायकशाला विचारेपर्यंत तो आपला कोथळाच बाहेर काढायचा' आपल्या आणि बापाच्या मधे ते यंत्र आणीत ग्रिगरी हसून म्हणाला.

फेसाळत्या तोंडाचा घोडा गव्हाच्या कवेळावरून ठेचकाळत आला. घोड्याच्या कुशीवर पंतीलेयचे पाय आदळत होते (कारण तो तसाच उपलाण्या घोड्यावर स्वार झाला होता). पंतीलेयने आपला चाबूक उभारला–

'काय चाललंय रे इथं सैतानाच्या कारट्यानो?'

'आम्ही कापणी करतोय' चाबकाकडे घाबरटपणे बघत प्योत्रने दोन्ही हात उडवून सांगितले.

'धारिया कुणी खुपसला तुला? कसली मारामारी चालली होती?'

बापाकडे पाठ करून ग्रिगरी पुटपुटत ढग मोजू लागला.

'कसला धारिया? कोण मारामारी करतंय?' ह्या पायावरील भार त्या

पायावर देत आणि बापाला खालपासून वरपर्यंत न्याहाळीत प्योत्रने विचारले.

'म्हणजे काय ? ती कोंबडीची केकाटत आली माझ्याकडं. तुमच्या पोरानी एकमेकांना धारियानं भोसकलं. तुमचं काय म्हणणं आहे ह्यावर ?'

जोरजोराने मुंडी हालवत पंतीलेयने लगाम खाली फेकून दिले आणि घोड्यावरून खाली उडी मारली–

'दिसला तो घोडा पकडला आणि दौडत इकडे आलो. अँ ?'

'हे सगळं तुला कुणी सांगितलं ?'

'एका बाईनं–'

'खोटं सांगितलं तिनं बाबा रेकल्यात ती झोपली असेल आणि स्वप्न पडलं असेल तिला–'

'बायकांची जात !' पंतीलेय् थोडासा ओरडत थोडीशी शीळ घालीत म्हणाला. त्याच्या तोंडातून गळणाऱ्या लाळेने त्याची दाढी ओली झाली.

'ही साली क्लिमोह्ची रांड ! देवाच्यान ! त्या कुत्रीला चाबकानं फोडून काढतो.' संतापाने तो नाचू लागला.

दाबलेल्या हसण्याच्या उबळीने गदगदणारा ग्रिगरी जमिनीकडे टक लावून बघत होता. आपली नजर बापावर खिळवून प्योत्र आपल्या घामेजलेल्या कपाळावर थापट्या मारीत होता.

मनसोक्त नाचून झाल्यावर पंतीलेय् निवळला. कापणीयंत्रावर बसून त्यान कापणीच्या दोन चकरा केल्या. नंतर आपल्या घोड्यावर बसून तो खेड्याकड निघून गेला. जाताना आपला चाबूक तिथेंच जमिनीवर तो विसरून गेला. प्योत्रने तो उचलला आणि अजमावल्यासारखा तो फिरवीत आपल्या भावाला म्हणाला, 'तरुण माणसा, आज आपली गच्छंती होती. हा साधा चाबूक नाही ! पांगळा केला असता तुला भाऊ, सफा मुंडी छाटली असती.'

१८.

तातार्स्की खेड्यातील सर्वात श्रीमंत म्हणून कोर्शुनोव कुटुंबाचा लौकिक होता. त्यांच्याकडे बैलांच्या चौदा जोड्या होत्या. घोडे होते. प्रवाल्स्की अश्वशाळेतील घोड्या होत्या. पंधरा गाई, इतर अनेक गुरेढोरे आणि शेकडो मेंढ्यांचा कळप

होता. ह्याखेरीज तेथे आणखीही काही प्रेक्षणीय होते. सहा खोल्या आणि पत्री-छप्पर असलेले त्यांचे घर मेखोव शेटजीच्या घराच्या बरोबरीचे होते. कटघराना नव्या देखण्या कौलांची छपरे घातलेली होती. त्यांची बागाईत आणि कुरण चांगली तीन एकर पसरली होती. माणसाला आणखी काय हवे ?

तेव्हा लग्नाची मागणी घालायला कोर्शुनोवच्या घराला पंतीलेय्‌ने पहिली भेट दिली ती जरा भीतभीत आणि प्रच्छन्न नाराजीनेच. आपल्या मुलीसाठी कोर्शुनोवना खूपच जास्त श्रीमंत नवरा सापडू शकला असता. पंतीलेय्‌ला हे ठाऊक होते आणि नकार पदरी येण्याची भीती वाटत होती. कोर्शुनोवच्याकडे हाती चौपदरी घेऊन जाणे त्याला पसंत नव्हते. पण लोखंडावर गंज बसावा तशी इलीनिचना त्याच्या मानगुटीच बसली आणि अखेर शेवटी म्हाताऱ्याचा हट्टीपणा तिने मोडून काढला. ग्रिगरीला, इलीनिचनाला आणि अख्ख्या दुनियेला लाखोली वहात त्याने अखेरीस कोर्शुनोवची भेट घेतली. आता उत्तर ऐकायला जाण्याची वेळ आली होती. रविवारची ते वाटच बघत होते.

इकडे कोर्शुनोवच्या घराच्या रंगरंगोटी केलेल्या पत्री छपराखाली जळजळीत कलह भडकला होता. मेलीखोव निघून गेल्यावर नतालियाने आईला सांगून टाकले–

'मला ग्रिगरी आवडलाय. दुसऱ्या कुणाशीही मी लग्न करायची नाही.'

'स्वतःचा नवरा स्वतःच शोधून काढलाय तिनं, मूर्ख !' तिच्या बापाने उत्तर दिले. 'जिप्सीसारखा काळा आहे ही त्याच्यात एकच गोष्ट चांगली आहे. अग माझ्या फुटाणे, त्याच्यापेक्षा कितीतरी चांगला नवरा शोधून देतो तुला.'

'मला दुसरा नकोय बाबा' त्या पोरीचा चेहरा आरक्त होऊन गेला आणि ती अश्रू ढाळू लागली.

'नाहीतर मला आपला जोगवा द्या खुशाल.'

'अग तो सतरा बायकांच्या मागे धावणारा– सैनिकांच्या बायकांच्या मागे धावणारा आहे. सगळ्या गावाला हे ठाऊक आहे.' आपले शेवटचे पान बापाने टाकले.

'धावू दे–'

'धावू दे' असंच तुला म्हणायचं असलं तर मला ग काय ?'

आपली सगळ्यात मोठी मुलगी नतालिया बापाची लाडकी होती. तिच्या मागे त्यांनी लग्नाचे टुमणे कधीच लावले नव्हते. तिला मागण्या खूप आल्या होत्या. काही दूरदूरच्या खेड्यातून आल्या होत्या. चुचकान नदीवर राहणाऱ्या

श्रीमंत जुन्या वळणाच्या धार्मिक कझाकांकडून आल्या होत्या. खाप्योर आणि चीर नदीकाठी राहणारांनीही मागण्या घातल्या होत्या. पण कोणताही मुलगा नतालियाच्या मनात भरला नव्हता आणि ते सारे प्रयत्न निष्फळ ठरले होते. ग्रिगरीचा कझाकी तिखटपणा, शेतीवरचे त्याचे प्रेम, कष्टाळूपणा ह्यामुळे ग्रिगरी मिरोनला मनातून आवडला होता घोड्यांच्या शर्यतीत ग्रिगरीने पहिले बक्षीस मिळवले तेव्हा खेड्यातील तरुणांच्या घोळक्यातून त्यांनी त्याला हेरला होता. पण जो श्रीमंत नाही आणि विशेषतः ज्याचा बदलौकिक आहे अशा माणसाला आपली पोर देणे त्याला अपमानास्पद वाटत होते.

'पोरगा कष्टाळू आहे, देखणा आहे' रात्री त्यांचे पिवळे डागाळलेले हात थोपटीत त्याची बायको कुजबुजत म्हणायची, 'नतालियाचा अगदी जीव जडलाय त्याच्यावर–'

आपल्या बायकोच्या थंड, सुकून गेलेल्या वक्षःस्थळाकडे पाठ फिरवीत मिरोन रागाने डाफरायचे–

'चल नीघ इथनं! लावून दे एकाद्या ठोंब्याशी तिचे लग्न! मला काय करायचंय? अक्कल गेल्येय चुलीत तुझी. देखणा आहे म्हणे!' असे म्हणून ते टर उडवण्यासाठी विचारत. 'त्याच्या देखणेपणावर काय शेती करायचीय?'

'शेती म्हणजेच काही सगळं का आहे?'

'त्याचा देखणेपणा काय चाटायचा आहे? काही पत्त आहे का त्याला? तुर्की माणसाला पोर द्यायची, म्हणजे तसं खालच्या पातळीला जाण्यासारखंच म्हटलं पाहिजे. माणसासारखी माणसं तरी असावीत!' बिछान्यावर पडल्या पडल्या उसळी घेत मिरोन ताठ्याने म्हणत.

'ते कुटुंब कष्टाळू आहे, खाऊन पिऊन सुखी आहे' त्यांची बायको कुजबुजे आणि नवऱ्याच्या रुंद पाठीजवळ सरकत समजूत घातल्यागत त्याचा हात थोपट लागे.

'अग ए चांडाळणी! जरा दूर सरक की, थोडी जागा राहू दे की मला! एकाद्या वासरू असलेल्या गाईसारखी थोपटतेयस काय मला? आणि वाटलं तर एखाद्या पुरुषी केस राखलेल्या पोरीशी का तिचं लग्न लावून देईनास.'

'पोरीबद्दल जरा काही कळवळा असावा माणसाच्या मनात' ती त्याच्या कानात पुटपुटली. पण लाथा झाडीत मिरोन जास्तच भिंतीला चिकटले आणि जणू काही झोप लागल्येय असे घोरू लागले.

उत्तरासाठी मेलीखोव कुटुंबाचे आगमन झालेले पाहून कोर्शुनोवना आश्चर्य वाटले. सकाळची पूजाअर्चा होत्येय न होत्येय तोच ते आले. फैटणीच्या पावठाणावर इलीनिचनाने पाय ठेवला तेव्हा फैटण जवळजवळ उलटल्यासारखीच झाली. पण

चुणचुणीत कोंबड्यासारखी पंतीलेय्ने बसल्या जागेवरून उडी मारली. त्या उडीने त्याला वेदना झाल्या. परंतु वरकरणी त्याचे कोणतेही चिन्ह न दाखवता त्याने आनंदाने लंगडत लंगडत घरात प्रवेश केला.

'हे आले! कशाला झक मारायला आले कुणास ठाऊक!' खिडकीतून बाहेर बघणारे मिरोन खरमरले.

'अगबाई, आत्ता मी सैपाक घरातून बाहेर येत्येय. रोजच्यातला झगाही बदलायला वेळ नाही आता–'

'काही हरकत नाही बदलला नाहीस तर. तुझ्याशी कुणी लग्न लावीत नाही. तुला कोण बघतय घोडखवडे!'

'जन्माचा गव्हार तू! आता म्हातारपणी तर जास्तच चळल्यासारखं करतोयस.'

'गप्प बस सटवे!'

'जरा स्वच्छ सदरा घाल. ह्यातून पाठुंगळ दिसतंय तुझं. थोडी लाजबीज ठेव की म्हाताऱ्या.' पाहुणे परसू ओलांडून येत असताना आपल्या नवऱ्याची पाहणी करीत त्याच्या बायकोने त्याला जामले.

'काही काळजी करू नको. माझ्या ह्या कपड्यात ओळखतील ते मला. अगदी गोणपाट पांघरलं तरी नाही म्हणायचे नाहीत.'

'नमस्ते[1]' पंतीलेय् केकाटून म्हणाला आणि उंबरठ्यावर ठेचाळला. आपल्या उंच आवाजाची त्याला एकदम लाज वाटली. देवपुतळ्यासमोर अंगावर दोन दोनदा क्रूसाची खूण करीत त्याने हृचाची सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

'नमस्ते' त्याच्याकडे उग्रपणे बघत मिरोननी उत्तर दिले.

'देवाच्या दयेनं हवा छान पडल्येय–'

'त्याच्या दयेनं अशीच राहू द्या ही–'

'लोकांचं कल्याणच होईल ह्यानं–'

'खराय–'

'खराऽय–'

'हं!'

'तेव्हा आम्ही आलोय मिरोन ग्रिगोरिएवीच! काय ठरलं तुमचं? जमणार का नाही?'

'आत या. मेहरबानी करून. बसा बसा!'

टीप: १. वस्तुतः रशियन अभिवादन पद्धतीप्रमाणे 'झ्द्रास्त्वुइत्ये' म्हणजे 'आपले आरोग्य उत्तम असो' असे म्हणण्याची पद्धत आहे. पंतीलेयने असेच अभिवादन केले.

घरधनीणीने त्यांचे स्वागत केले. खाली वाकून आपल्या लांब आणि चुणलेल्या झग्याच्या टोकाने तिने जमीन झटकल्यासारखी केली.

'कशाला तसदी घेता उगीच ?'

इलीनिचना खाली बसली. बसताना तिची पापलीनची वस्त्रे सळसळली. मेजावरच्या नवीन मेणकापडावर कोपरे टेकून मिरोन ग्रिगोरिएवीच गप्प बसून होते. मेणकापडाला भिजट रबराचा आणखी कसलासा वास येत होता. भूतपूर्व झार आणि झरिनाच्या चित्रानी त्याचे कोपरे सजवले होते. मधोमध सफेत टोप्या घातलेल्या रबलंद शाहजादींची चित्रे होती. शिवाय दुसऱ्या झार निकोलसचे विटून गेलेले चित्र होते.

मिरोनने शांततेचा भंग केला, 'ठीक ! पोरीचं लग्न करायचं ठरलंय आमचं. हुंड्याचा प्रश्न सुटला तर आपली सोयरीक जमावी.'

हे ऐकल्याबरोबर इलिनिचनाने आपल्या सुळसुळीत फुगीर बाह्यांच्या जाकिटातील निगूढ अथांगतेतून जसा काही पाठीमागून काढल्यासारखा पांढऱ्या पावाचा एक मोठा तुकडा काढला आणि टेबलावर ठेवला.

कोणत्या तरी अगम्य कारणाने पंतीलेयला अंगाभोवती क्रूसाची खूण करून घेण्याची इच्छा झाली.

त्याच्या गुंजाड नखे वाढलेल्या बोटानी ती खूण करायचा पवित्राही घेतला.

इष्ट उंचीच्या अर्ध्या अंतरावर ती उंचावलीही–एवढ्यात अचानक त्याचा आकार पालटला. धन्याच्या इच्छेविरुद्ध तो थोराड काळलेला अंगठा, तर्जनी आणि मधले बोट ह्यांच्या बेचक्यात घुसला.

बोटांचा तो अरबुज झुपका हळूच त्या निळचा फर्गोलच्या एका सुटलेल्या पंखामागे गेला.

आणि ...

एक लाल बुचाची बाटली बाहेर पडली !

मिरोनच्या पिवळ्या डागाच्या चेहऱ्याकडे बघत पंतीलेयने डोळ्याची मनस्वी उघडझाप केली आणि आपल्या रुंद घोडखुरासारख्या तळव्याने बाटलीच्या बुडाला लाडाने थापट्या मारल्या.

'आणि आता मित्रानो ! आपण देवाची प्रार्थना करून पिऊ या ! मग आपल्या पोराबाळांबद्दल...देण्याघेण्याबद्दल. . . वाटाघाटी करू या.' त्याने ठराव मांडला.

एका तासानंतर ही दोन माणसे इतकी लगटून बसली होती की, मेलेखोवच्या काळ्याकुळकुळीत दाढीची वेटोळी कोर्शुनोवच्या दाढीच्या लांबट लाल

पडांशी हितगुज करू लागली. हुंड्याच्या रकमेबद्दल हुज्जत घालताना पंतीलेयच्या तोंडाला खारवलेल्या काकड्यांचा वास येत होता.

'माझ्या पाहुण्यांनो !' खर्जात खरखरत त्याने सुरवात केली.

'माझ्या अत्यंत प्रिय पाहुण्यांनो !' आरडल्यासारखा त्याने आवाज वाढवला.

'पाहुणे हो !' आपले थोराड बोथट दांत विचकीत त्याने डरकाळी फोडली–

'तुमच्या मागण्या इतक्या जबर आहेत की मला त्या परवडणार नाहीत. पाहुणे हो विचार करा– विचार करा– मला लुटण्याची आपण कशी कोशीश करीत आहात ! पहिलं ! उंच बूट आणि तळाचे रबरी बूट, दुसरं ! लोकरी फर्गोल, तिसरं ! दोन लोकरी पोशाक, चौथं ! रेशमी रुमाल ! झाला आमचा इथंच सत्यानाश !'

असे म्हणून पंतीलेयने आपले हात इतके फाकले की त्याच्या फर्गोलाची शिवणच उसवली आणि आतून धुरळ्याचे पिसारे उधळले गेले.

सांडलेली व्होडका, लोणचे ह्यांनी भरून गेलेल्या मेणकापडाकडे एक टक बघत मिरोनने मुंडी खाली घातली होती. मेणकापडाच्या फुलबहार वेलपत्तीत कोरलेली अक्षरे ते वाचीत होते. 'रशियन आलीखांदान' त्यांची नजर खाली वळली. 'शाहंशाह खुदबदौलत जहाँपन्हा निकोलस–' पुढची अक्षरे बटाट्याच्या सालीने झाकली गेली होती. त्याची नजर चित्रावर खिळली. व्होडकाच्या रिकाम्या बाटलीखाली शाहंशहाची सुरत अदृश्य झाली होती. सफेद पट्ट्यांच्या अमीरी पोशाकाचा ढंग जाणून घ्यावा म्हणून मिरोनने डोळे नम्रपणे आकुंचित केले पण काकडीच्या निसरड्या बियांनी तो पोशाक घनदाट झाकला गेला होता. मिळमिळीत शाहजादींनी वेढलेली, डोक्यावर रुंद काठाची टोपी घातलेली मलिका संतुष्टपणे त्याच्याकडे बघत होती. मिरोनला इतक्या मिरच्या झोंबल्यासारखे झाले की त्यांच्या डोळ्यांना जवळजवळ पाणी आले. मनात विचार आला.

'टोपलीतून बाहेर बघणाऱ्या कलहंसासारखी आज मिजास दाखवतोयस पण स्वतःच्या मुलीच्या लग्नाची वेळ आली की बघ ! मग टवकारून मी बघणार आणि बोबडी तुझी वळणार.'

एखाद्या घोडभुंग्यासारखी पंतीलेयची भुणभुण त्याच्या कानावर येत होती. आपली आसूधूसर नजर वर करीत कोर्शुनोव ऐकू लागले.

'तुमच्या आणि आता मी म्हणतो 'आमच्या' पोरीच्या बदल्यात हे

उंचबूट, रबरीबूट, कोकरी फर्गोल घ्यायचे म्हणजे आमच्या एका गाईला बाजारात नेऊन फुकून टाकायला हवं. '

'तुमची कुरकुर आहे ह्याबद्दल ?' टेबलावर गुद्दा मारीत मिरोनने विचारले.

'माझी कुरकुर आहे असं नव्हे.'

'कुरकुर आहे का ?'

'थांबा पाहुणे !'

'कुरकुर असली तर खड्डयात जा !' आपला घामेजला हात मिरोनने असा काही उडवला की तिथली ग्लासे जमिनीवर उधळली गेली.

'त्या पायी तुमच्याच पोरीला काम करावं लागणार आहे.'

'लागू दे ! पण देणीघेणी व्यवस्थित झालीच पाहिजेत, नाहीतर ही सोयरीक जुळायची नाही.'

'एका गाईला बाजार दाखवावा लागवार !' पंतीलेय्‌ने मुंडी हलवली. त्याच्या कानातील कोर हेलकावे घेत चमकत होती.

अहेर झालाच पाहिजे ! तिचे स्वतःचे रगड कपडे आहेत, पण ती मनात भरली असेल तर तुम्हीं संभावना केली पाहिजे. माझी ही आपली कझाकाची रीतभात आहे. हे असंच चालत आलंय. आम्ही जुन्याला धरून राहणारे आहोत.'

'तुमची संभावना करायला मी तयार आहे.'

'करा तर मग—'

'करतो ना'

'पोरासोराना करू द्या काम. आपण आपल्यावेळी काम केली आणि तसे चांगले दिवसही आपण बघतोय आता त्यांची पाळी आहे.'

त्या दोन माणसांच्या दाढ्यांची रंगतदार गुंफण झाली. त्यांनी एकमेकांचे मुके घेतले. एक नीरस सुकलेली काकडी पंतीलेय् खाऊ लागला आणि संमिश्र परस्परविरोधी भावना दाटून त्याला रडू कोसळले.

पेटाऱ्यावर बायका एकमेकींना मिठी मारून बसल्या होत्या. आवाजाच्या कलकलाटाने एकमेकींच्या कानठळ्या बसवीत होत्या. चेरी फळाचा लालिमा इलीनिचनाच्या तोंडावर चढला होता. गोठती थंडी लागलेल्या पिअर फळाप्रमाणे मरिया व्होडका पिऊन हिरवी पडली होती. 'जगात शोधू जाता अशी पोर सापडायची नाही. काम ती खबरदारीनं सांभाळील, तुमच्या अध्यावचनात राहील. उणंदुणं चुकूनही नाही बोलायची.' मरिया म्हणाली.

'बाई ग !' इलीनिचना मधेच म्हणाली. डाव्या हाताचा तिने गालाला टेकू दिला होता आणि त्या हाताचा कोपर उजव्या तळव्यात पेलला होता. 'मी त्याला बजावलय हजार का बाराशे वेळा बजावलं कोण जाणे– पण बजावून ठेवलंय रांडिच्याला... परवाच्या आदितवारी चंचीत तंबाखू घालून निघाली स्वारी ! मी म्हटलं त्याला कधी मेल्या लाथ हाणणार आहेस ? माझ्या ह्या म्हातारपणात मला किती दिवस अशी लाज लाजवणार आहेस ? एका मुहरतार स्तिपान तुझे चाळे थांबवतो का नाही बघ !'

दरवाज्याच्या फटीतून मित्का डोकावला. खाली नतालियाच्या दोन बहिणी एकमेकींशी कुजबुजत होत्या. नतालिया स्वतः बापाच्या खोलीत बसली होती. आपल्या ब्लाऊजच्या घट्ट बाहीने डोळे पुसत होती. तिच्या समोर उमलणाऱ्या नवीन जीवनाने ती भांबावून गेली होती. अज्ञात दडपण तिच्या मनावर पडले होते.

पुढच्या खोलीत व्होडकाची तिसरी बाटली संपली. ऑगस्टच्या पहिल्या तारखेला नवरानवरीची गाठ घालून देण्याचे ठरले.

१९.

लग्नाच्या तयारीच्या धामधुमीने कोर्शुनोवचे घर मधमाशांच्या पोळ्या-सारखे गजबजून गेले. नवऱ्यामुलीची आंतर्वस्त्रे शिवण्याची गडबड उडाली. रीतीरिवाजाप्रमाणे रोज संध्याकाळी नतालिया नवऱ्यामुलाला हातमोजे आणि बकऱ्याच्या लोकरीचा गळपट्टा विणत बसे. भाड्याने आणलेल्या शिंपीणीला मदत करण्यासाठी तिची आई काळोख पडेपर्यंत शिवण्याच्या मशिनवर वाकून बसलेली असे.

आपल्या बापाबरोबर आणि शेतमजुराबरोबर मित्का घरी आला. हातपाय न धुता किंवा शेतकामाचे अवजड बूटही पायातून न काढता तो नतालियाशी गप्पा मारायला गेला. आपल्या बहिणीला चिडवण्यात त्याला मोठी धन्यता वाटत असे.

'विणकाम करत्येस ?' तो गळपट्ट्याकडे मान उडवीत मोजक्या शब्दात विचारायचा.

‘होय करत्येय विणकाम. मग ?’

‘खुशाल विणीत बस. यडपटे, तुझे उपकार तर तो स्मरणार नाहीच उलट थोबाड फोडील–’

‘का म्हणून ?–’

‘हॅं ! मी ग्रिशाला चांगला ओळखून आहे. दोस्त आहे आपला तो. ते तसलंच आहे. चावा घेईल– का चावला तें सांगायचा नाही.’

‘थापा मारू नको. तुला काय वाटतं मी त्याला ओळखत नाही ?’

‘पण मी त्याला जास्त चांगला ओळखतो. आम्ही शाळेत बरोबरच होतो.’ मित्का सुस्कारा सोडल्याचं नाटक करी. आपल्या ओरखाडे उठलेल्या हाताकडे पाही. आणि आपल्या लांबोड्या पाठीला पोक काढी.

‘त्याच्याशी लग्न केलंस तर तुझं वाटोळं होणार नतालिया. त्यापेक्षा जन्माची बेगम रहा. त्यांच्यात तू पाहिलंस तरी काय ग ? कुरुप तर एवढा आहे की त्याला पाहून घोडंही बुजेल. तेवढाच मूर्खही ! जरा नीट बघ त्याला. कंडम माणूस आहे.’

नतालियाला राग येई. डोळ्यातील अश्रू आवरीत ती आपलं हिंपुटी तोंड गळपट्टात खालपर्यंत झुकवी.

‘पण सगळ्यात खराब गोष्ट म्हणजे तो प्रेमात पडलेला आहे.’ मित्का निष्ठुरपणे बोलतच राही.

‘धुसपुसायला काय झालं ? मूर्ख आहेस नतालिया ! टाक त्याला झटकून. आता घोड्यावर जीन घालतो आणि दौडत जाऊन त्याला सांगून टाकतो–’

ग्रिशाका आजोबा मग मित्काच्या तावडीतून नतालियाला सोडवीत आपल्या गाठ्याळ कुबडीने जमिनीवर चाचपडत आणि तागासारखी पिवळी दाढी थोपटीत ते खोलीत येत. मितकाच्या कुशीत आपली काठी खुपसून ते विचारीत—

‘काय करतोयस रे इथं कुचकाम्या ? ऑं ?’

‘मी भेटायला आलो होतो आजा ’ मित्का ओशाळून उत्तर देई.

‘भेटायला काय ? अस्स ! चल चालता हो इथून. चले जाव !’ आपली काठी उगारुन लटपटल्या वाळक्या पायाचे म्हातारबुवा मितकाकडे येत.

ग्रिशाका आजोबा एकुणसत्तर वर्षाचे होते. १८७७ च्या तुर्की मोहिमेत त्यांनी भाग घेतला होता. जनरल गुर्कीचे ते अडली होते. पण पुढे त्यांच्यावर गैरमर्जी होऊन त्यांची परत रेजिमेन्टकडे रवानगी करण्यात आली होती. फ्लेवना आणि रोस्सिट्झ इथे भडीमारांच्या गर्दीत दाखवलेल्या मर्दुमकीबद्दल त्यांना दोन

'कझाक' आणि सेंट जॉर्ज पदक मिळाले होते. मनाचा निर्मळपणा, अढळ सचोटी, अगत्यशीलता, ह्या गुणांनी सगळ्या खेड्याच्या आदराला पात्र झालेले ग्रिशाका आजोबा आपले उरलेसुरले दिवस गतकाळाच्या आठवणीत घालवीत होते.

उन्हाळ्यात पहाटेपासून दिवस मावळेपर्यंत ते घराभोवती उभारलेल्या आडाळीवर बसून रहात. त्यांची मान खाली वाकलेली असे. कुबडीने ते जमिनीवर घोटच्या ओढत.

अस्पष्ट आकृत्या आणि फुटकळ विचार त्यांच्या मनात तरंगत. विस्मृतीच्या काळोखात अंधुक आठवणी लुकलुकत. त्यांच्या टोपीच्या तुटक्या ढापणाची त्यांच्या मिटलेल्या डोळ्यावर गडद सावली पडे. त्या सावलीत त्यांच्या गालावरील सुरकुत्या जास्तच खोल वाटत आणि पिकलेल्या दाढीला पारवी छटा येई. कुबडीवर आवळलेल्या त्यांच्या बोटातून, हाताच्या सुजीर शिरातून काळपट रक्त सुस्तपणे वहात होते.

दिवसेंदिवस त्यांचे रक्त थंड पडत चालले होते. आपल्या लाडक्या नातीकडे नतलियाकडे ते कुरकुरत,

'अग, हे मौजे लोकरी असले तरी पुरेसे उबदार नाहीत. मला एक जोड विणून का देईनास पोरी!'

'पण आजा आता उन्हाळा आहे.' नतालिया हसून म्हणे आणि आडाळीवर त्यांच्या शेजारी बसून ती त्यांच्या मोठाड सुरकुतलेल्या पिवळ्या कानाकडे बघत राही.

'म्हणून काय झालं? असेल उन्हाळा! पण माझं रगत धरत्रीच्या पोटातील मातीसारखं थंड झालंय-'

त्यांच्या हातावरील शिरांचे जाळे नतालिया पहात राही. मग बालपणातील एका दिवसाची आठवण तिच्या मनात उजळायची. ती एक लहानशी मुलगी होती. त्यावेळी आवाडात विहीर खोदीत होते. तिथल्या बादल्यात भरलेला चिखल घेऊन त्याच्या ती जाडजूड बाहुल्या आणि ढिसाळ शिंगांच्या गाई तयार करायची. पस्तीस फूट खोलीतून काढलेल्या मातीचा बर्फासारखा अचेतन स्पर्श तिला आता स्पष्टपणे आठवे आणि म्हातारपणाच्या मातट रंगी सुरकुत्यानी झाकून टाकलेल्या आपल्या आजोबांच्या हाताकडे ती भयभीतपण पहायची, तिला वाटायचे की, भडक लालबुंद रक्ताऐवजी त्यांच्या शिरातून गर्द चिखलाळ राडच पाझरते आहे.

'तुम्हाला मरायची भीती वाटते आजा?' नतलिया विचारायची.

गणवेशाच्या कोटाच्या कडक गळपट्टीतून सोडवण्याचा प्रयत्न करावा तशी आपली काष्ठवत् मान म्हातारबुवा मुरडीत आणि आपले निबुरड्या रंगाचे कल्ले हलवीत, 'आवडत्या पाव्हण्याची बघावी तशी मी मरणाची वाट बघतोय, आता वेळ झाली. जिंदगी जगून झाली. माझ्या झारची चाकरी केली. तरुणपणात भरपूर व्होडका पिऊन घेतली.' स्मितातून आपली पांढरी दंतपंक्ती दाखवीत सुकलेल्या पापण्या फडफडवीत ते उत्तर देत.

आपल्या आजोबांचा हात थोपटून नतालिया तिथून निघून जायची. आपल्या ठिगळे लावलेल्या करड्या रंगाच्या गणवेषात ते तसेच आडाळीवर मान झुकवून कुबडीने जमीन खरवडत बसून रहायचे आणि त्यांच्या कडक, ताठ गळपट्टीतील हुद्याची लालभडक फीत आनंदाने आणि नव्या नव्हाळीने चमचमत राहायची.

नतालियाच्या होऊ घातलेल्या लग्नाची बातमी त्यानी वरकरणी शांतपणे ऐकून घेतली. पण आतून त्याना हळहळ वाटली आणि ते चवताळून गेले. जेवायला बसले की नतालिया त्याना त्यांच्या खास आवडीचे वाढायची, त्यांचे कपडे धुवायची, त्यांचे मांडमौजे, त्यांच्या तुमानी, सदरे शिवाय–विणायची, रफू करायची. तेव्हा ही बातमी ऐकल्यावर म्हातारेबुवा दोन दिवस तिच्याकडे कडक उग्र नजरेने बघत होते.

'मेलीखोव मंडळी चांगले कझाक आहेत. प्रकोफी मोठा उमदा कझाक होऊन गेला. पण त्याची नातवंडं कशी आहेत? आँ?' त्यांनी मिरोनला विचारले.

'तशी वाईट नाहीत' मिरोनने उडवाउडवीचे उत्तर दिले.

'तो ग्रिगरी म्हणजे उर्मट पोरगा आहे. परवा गिरिजाघरातून मी येत होतो तेव्हा नमस्कार सुद्धा न करता तसाच माझ्या अंगावरून निघून गेला. अलीकडे म्हाताऱ्यांना कुणी विचारेनासं झालयं–'

'तो चांगला आहे हो पोरगा.'

लुक्रिनिचनाने आपल्या भावी जावयाची रदबदली केली.

'चांगला आहे म्हणतेस? नतालियाला तो आवडतोय तो पर्यंत ठीक आहे.'

लग्नाच्या वाटाघाटीत त्यांनी जवळ जवळ काहीच भाग घेतला नाही. स्वयंपाकघरातून ते बाहेर आले. थोडावेळ मेजापाशी बसले, एक ग्लास व्होडका प्याले आणि मग ती चढल्येयशी वाटल्यावर तिथून चालते झाले. दोन दिवस ते सुखावलेल्या नतालियाला अबोलपणे न्याहाळीत होते. नंतर त्यांचे मन निवळल्या-

सारखे झाले. तोंडातील पदार्थ चघळताना त्यांच्या सफेद हिरवट मिशांचे झुबके हलत होते.

'नतालिया !' तिला हाक मारून ते म्हणाले, 'मग काय ग माझ्या चिमुरड्या नाते ! खूप आनंद झालाय ना ?'

'माझं मलाच नीट कळत नाही आजा' नतालियाने त्याना विश्वासात घेऊन सांगितले.

'बरं बरं ! येशू तुला सोबत करील. देव करो-' आणि मग त्यानी तिची खरमरीत हजेरी घेतली. 'मी उलथेपर्यंत थांबवत नव्हतं काग ग कार्टे-? तू गेलीस की माझं आयुष्य कडवट होणार.'

मित्का त्यांचे संभाषण ऐकत होता. तो म्हणाला,

'तुम्ही आणखी शंभर वर्षं जगणार आहात. आजा तोपर्यंत तिनं काय थांबून बसायचं ? तुम्ही पण कमालच आहात.'

म्हातारबुवा रागाने काळे निळे पडले. आपल्या कुबडीने आणि पायाने त्यानी जमिनीवर प्रहार केला.

'चल निघ इथून कुतरडीच्या ! नीघ इथून म्हणतोय ना ! खवीस साला सैतान ! कुणी तुला ऐकायला सांगितलं ?'

हसत हसत मित्का आवाडात पळून गेला. म्हातारे ग्रिशाका नंतर बराच वेळ भडकले होते. मित्काला शिव्या घालीत होते. आखूड लोकरी मोजे घातलेले त्यांचे पाय गुडघ्यात लटपटत होते.

नतालियाच्या दोन धाकट्या बहिणी- बारा वर्षांची मरिशा आणि आठ वर्षांची खोडकर ग्रिप्पा लग्नाची अधीरतेने वाट बघत होत्या.

कोर्शुनोवच्या पदरी असलेले शेतगडीही खूष झाले होते. आपल्या धन्याकडून घसघशीत बक्षिशीची आणि खूप दिवसाच्या सुट्टीची त्यांना आशा वाटत होती.

त्यात एक ताडमाड उंचीचा युक्रेनी गडी होता. त्याचे हेटबाबा असे. चमत्कारिक नाव होते. दर सहामहिन्यानी हा दारू पिण्याची पैज लावायचा. पिण्यापायी तो आपली मजुरीच काय पण अंगाखांद्यावरचे कपडेही फुंकून टाकायचा. गेले बरेच दिवस नेहमीची सुरसुरी त्याला जाणवत होती. तरीपण पिण्याची पैज लग्नाच्या दिवसापर्यंत त्याने कटाक्षाने पुढे ढकलली होती.

दुसरा एक शेतगडी बारीक चणीचा काळगेला कझाक होता. त्याचे नांव मिखेइ. कोर्शुनोवकडे कामाला लागून त्याला फार दिवस झाले नव्हते. घरादाराला

आग लागून देशोधडी लागल्याने तो मजुरी करीत होता. हेटकाच्या (हेटबाबाला ह्या त्रोटक नावाने संबोधीत) संगतीने हळू हळू तोही पिऊ लागला. त्याला घोड्यांचे मोठे प्रेम होते. पिऊन तर्र झाला की तो रडायला लागायचा. त्याचा त्याचा गालफडे निघालेला भ्रुकुटीविरहीत चेहरा आसवानी थबथबून जायचा आणि मिरोन ग्रिगोरीएविचच्या मागे तो भुणभुण लावायचा–

'मालक, अहो माझे मालक! तुमच्या लेकीचं लग्न निघालं की घोडी माझ्याकडं हाकायला द्या. कशी घोडी हाकावी ते दाखवून देतो सगळ्यांना! फुफाट्यातून नेली तरी घोड्याच्या अंगाचा केस नाही जळायचा! माझीही एकदा घोडी होती. आई ग...'

उग्रट आणि माणूसघाणा हेटबाबा का कुणास ठाऊक मिखेइच्या मागे लागला होता. त्याच्या गावाच्या नावावर तोच तोच जुना विनोद करून तो त्याला सतत छळत असे.

'मिखेइ, हे बघ! तू कुठल्या गावचा?' आपले गुडघ्यात टेकणारे हात एकमेकावर चोळीत हेटबाबा विचारायचा. मग आवाज बदलून विचारलेल्या प्रश्नांची आपणच उत्तरे द्यायचा.

'मिगूल्योव्स्कोइ.'

'आणि तू असं खुळपं रे का?'

'आमची तिकडची सगळी माणसं अशीच खुळपी.'

आपल्याच शिळ्या विनोदावर तो भरड्या आवाजात हसायचा आणि आपल्या लांबोड्या वाळकट नडग्यांवर थप्पड मारायचा. मिखेइ तिरस्काराने हेटबाबाच्या तुळतुळीत दाढी केलेल्या चेहऱ्याकडे बघायचा. गळ्याची घाटी हलवीत तो त्याला शिव्या द्यायचा.

'लेट' च्या (उपवास मास) दुसऱ्या दिवशी लग्नाचा मुहूर्त ठरला होता. तीन आठवडे उरले होते. Day of Assumption च्या दिवशी ग्रिगरी आपल्या नवरीला भेटायला आला. चाफेखणीत वाटोळ्या मेजाजवळ तो बसला होता. मुलीच्या मैत्रिणींबरोबर सूर्यफुलाच्या बिया आणि दाणेबिणे खात होता नंतर तो निघून गेला. नतालिया त्याला निरोप द्यायला बाहेर आली. चमकदार नवीन जीन घातलेला ग्रिगरीचा घोडा पडवीत उभा होता. तिथे आल्यावर तिने चोळीत हात घातला आणि लाजत लाजत प्रेमभरल्या डोळ्यांनी त्याच्याकडे बघत त्याच्या हातात एक नरम पुरचुंडी कोंबली. तिच्या वक्षःस्थळाजवळ ठेवल्याने ती

गरम झाली होती. ती भेट तिच्याकडून घेताना आपल्या लांडग्यासारख्या पांढऱ्या शुभ्र दातांनी तिला दिपवीत ग्रिगरीने विचारले–

'काय आहे ?'

'तूच बघ . . . तंबाखूची चंची आहे. मी कशिदा काढलेली–'

ग्रिगरीने डळमळीत मनाने तिला जवळ ओढले. तिचे त्याला चुंबन घ्यायचे होते. पण आपले हात त्याच्या छातीवर टेकून तिने त्याला बळेच दूर लोटले. ती त्याच्यापासून बाजूला झुकली आणि घराच्या खिडकीकडे भीतभीत नजर टाकत म्हणाली.

'बघेल कुणी '

'बघू दे–'

'मला लाज वाटते–'

'सुरवातीला वाटते लाज ' ग्रिगरीने खुलासा केला.

तो घोड्यावर स्वार होत असताना नतालियाने लगाम धरून ठेवले होते. तिरप्या नजरेने बघत ग्रिगरीने रिकिबीत पाय टाकला. खोगीरात नीट आरामात मांड घेतली आणि घोडा आवाडाबाहेर काढला. तिने फाटक उघडले. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ती टक लावून बघत उभी राहिली. कालमिक ढंगाने ग्रिगरी खोगीरांतून डाव्या अंगाला झुकला आणि चाबूक परजीत त्याने तो नाचवला.

'आणखी अकरा दिवस !' नतालियाच्या मनात आले आणि तिने स्मित केले.

२०.

हिरवा धारदार पानांचा गहू जमिनीतून उफाळतो आणि वाढीला लागतो, पाहता पाहता तो इतका फोफावतो की त्या फडात शिरला तर कावळाही दिसेनासा होतो. धरित्रीचे रस शोषून घेत गहू कणसावर येतो. मग बहराला येतो. सोनेरी धुळीचे कणसाला विलेपन होते. मधुर आणि सुगंधी दुधाने दाणा टटतटतो. कृषिवल शेतावर जातो डोळे भरून उभा राहतो. हरखून जातो. पण मग गुरांचा कळप शेतात घुसतो. भरलेला दाणा तो पायदळी तुडवती. गुरांनी तुडवलेल्या

जागेवर चुरडलेल्या गव्हाच्या बाटोळचा खुणा मागे उरतात. कृषिवल ते पाहून हळहळतो, चवताळतो.

आक्सीनियाच्या बाबतीत तसेच झाले होते. सोनसळी फुलोऱ्यापर्यंत बहरून आलेल्या तिच्या भावना ग्रिगरीने आपल्या अवजड कच्च्या चामड्याच्या सँडल्स-खाली पायदळी तुडवल्या. त्याने त्या मातीत मिळवल्या. जाळून राखरांगोळी केली आणि सगळे संपले.

मेलीखोवच्या सूर्यफुलाच्या मळ्यातून ती परत आली तेव्हा खाजखुयली आणि गवंद माजलेल्या वशाडीसारखे तिचे मन निमूर आणि उजाड होऊन गेले. आपल्या रूमालाचा काठ चावीत ती चालली होती. तिच्या गळ्याशी कढ येत होते. घरात येताच ती जमिनीवर पालथी पडली. अश्रू, वेदना, डोक्यात धाव घालणारा वैराण रितेपणा ह्यानी ती गुदमरून गेली. पण मग आवेग हळूहळू ओसरला. खोलवर घुसणाऱ्या मनोवेदना ओहटल्या आणि शांत होऊन तिच्या मनाच्या तळाशी जाऊन बसल्या.

गुरानी तुडवलेले पीक पुन्हा उभे राहते पायमल्ली झालेले देठ दंवाने आणि उन्हाने पुन्हा उभारी धरतात. ओझ्याने भारावून गेलेल्या माणसासारखे ते सुरूवा-तीला वाकलेले असतात. मग माना उंचावून ताठ उभे राहतात. दिवसाला मग दिवसपण येते. वारा परत वाहू लागतो.

रात्री नवऱ्याला आवेगाने कुरवाळताना आक्सीनियाच्या मनात ग्रिगरीचे विचार घोळत होते आणि अंतःकरणातील उत्कट प्रेमात द्वेष कालवून गेला होता. नवनवीन बेइज्जतीचे, नवनवीन लांछनाचे मनसुबे ह्या बाईच्या मनात शिजत होते प्रेमाची कटुता आणि आनंद ह्या दोन्हीचा अनुभव नसलेल्या सुखी नतालियापासून ग्रिगरीला छिनावून घेण्याचा तिचा निर्धार झाला होता. रात्री हे घावडाव मनात घोळवीत ती पडली होती. तिचे निर्जळ डोळे अंधारात फडफडत होते. स्तिपानच्या देखण्या मस्तकाचा भार तिच्या उजव्या दंडावर पडला होता. त्याच्या लांब कुरळ्या बटा विस्कटल्या होत्या. अर्ध्या उघड्या तोंडाने त्याचा श्वासोश्वास चालला होता. त्याची काळगेली श्रमाने निबर झालेली बोटे विस्मृतीत बायकोच्या वक्षांना कुर-वाळीत होती. विचार करीत योजना शिजवीत आक्सीनिया पडली होती. पण फक्त एकाच गोष्टीबद्दल तिचा निश्चय ठाम झाला होता. सगळ्यापासून ती ग्रिगरीला हिरावून घेणार होती. आपल्या प्रेमात त्याला आकंठ बुडवून टाकणार होती. पूर्वी सारखाच त्याला झपाटून टाकणार आहे. पण तिच्या अंतःकरणाच्या तळाशी मात्र मधमाशीच्या दंशाप्रमाणे एक वेदना झिणझिणत राहिली होती.

दिवसा घरकामात आणि विवंचनात आक्सीनिया आपले विचार बुडवून टाकायची. कधी कधी ग्रिगरी तिला भेटायचा. तो भेटला की ती गोरीमोरी व्हायची. पण तिच्या देखण्या देहाला त्याची विलक्षण ओढ लागली होती. तो देह त्याच्या पुढून नेताना त्याच्या डोळ्यांच्या गर्द विजनात ती निलाजरेपणाने आव्हान देत रोखून पहायची.

तिच्याशी होणाऱ्या प्रत्येक भेटीगणिक ग्रिगरी तिच्या ओढीने झपाटत चालला. विनाकारण तो रागावू लागला आणि हा सगळा राग तो दुन्यावर किंवा आपल्या आईवर काढायचा. पण बहुतेक वेळा आपली तलवार हाती घेऊन मागील दारी जायचा आणि सर्वांग घामाने डबडबून जाईपर्यंत तिथे लावलेल्या कणखर झाडफांद्यांची छटाछट करीत सुटायचा आणि मग पंतीलेय् शिव्या देत बसायचा.

'हलकट, सैतान. दोन कुंपणांना पुरतील एवढ्या फांद्या छाटल्यान्, छाटाछाटच करायची तर जा की रानात. थांब लेका! फौजेच्या चाकरीचं बोलावण आलं म्हणजे हौस फिटेल रग जिरेल तिथं चांगली!'

२१.

नवऱ्या मुलीला आणायला भडक शृंगारलेल्या दोन-दोन घोड्यांच्या चार फैटणी जाणार होत्या. त्या फैटणी मेलीखोवच्या आवाडात उभ्या होत्या आणि खास कपडे घातलेल्या खेडुतांच्या घोळक्याने त्यांच्याभोवती गर्दी केली होती.

प्योत्र करवला होता. त्याने काळ्या रंगाचा जामा आणि निळी पट्टेरी तुमान घातली होती. त्याच्या डाव्या हाताला दोन पांढरे रुमाल बांधलेले होते आणि त्याच्या गव्हाळ रंगी मिशांखालच्या ओठांवर एक तुच्छतेचे स्मित खेळत होते.

'लाजू नको ग्रिगरी' आपल्या भावाला तो म्हणाला, 'कोंबड्यासारखा छाती काढून चाल. घुम्यासारखा बसू नको.'

फैटणीच्या भोवती झिम्मड उडाली होती. कलकलाट चालला होता.

'कुठं आहे? निघायची वेळ झाली.'

'धरमबापा !'

'आँ ?'

'धरमबापा ?' तू दुसऱ्या फैटणीतून ये. ऐकलंस का ए धरमबापा ?'

'फैटणीला पांजऱ्या लावल्या का ?'

'घाबरू नको. पांजऱ्या नसल्या म्हणून काही बाहेर पडत नाहीस ! चांगली गुबगुबीत आहेस—'

वळुंजीच्या डहाळीसारख्या नाजूक आणि लवचिक असलेल्या दर्याने डाळिंबी रंगाचा झगा घातला होता. शलाकेने ताणलेली भुवयांची धनुष्ये नाचवीत तिने प्योत्रला कोपरखळी मारून म्हटले—

'बाबाला म्हणावं वेळ झाली निघायची. आपल्यासाठी मंडळी खोळंबली असतील.'

कुठूनतरी लंगडत आलेल्या आपल्या बापाशी प्योत्र काहीतरी कुजबुजला आणि त्याने हुकूम सोडला, 'आपापल्या जागावर बसून घ्या. माझ्या फैटणीत नवरा मुलगा आणखी पाचजण बसतील.' ते फैटणीत चढले. लाल चेहरा झालेल्या इळीनिचनाने विजयी मुद्रेने फाटक उघडले. चार फैटणी एका मागोमाग एक धावत सुटल्या.

प्योत्र ग्रिगरीच्या बाजूला बसला होता. त्याच्या समोर दार्या लेसचा रुमाल विणीत बसली होती. गाड्यातून सुरू झालेली गाणी रस्त्यावरील खाचखळग्यांनी मधून मधून खंडीत होत होती. कझाकांच्या टोप्यांच्या किरमीजी फिती, निळे आणि काळे पोशाख आणि झब्बे, पांढरे हातरुमाल बांधलेल्या बाह्या, बायकांच्या रुमालांचे उधळलेले इंद्रधनू, भडक रंगाचे झगे आणि प्रत्येक फैटणीमागे उडालेली धुरळ्याची मलमल ह्यामुळे एक रंगदार चित्र तयार झाले होते.

ग्रिगरीचा चुलत भाऊ अनिकेई नवऱ्यामुलाची फैटण हाकीत होता. अगदी खाली झोक जाईल इतका घोड्यांच्या शेपट्यावर वाकून तो आपला चाबूक कडाडवीत शीळ घालत होता. घामाने डबडबलेले घोडे ताणलेले पाठबंद जास्तच खेचत होते.

'लगाव त्याना' प्योत्रने गर्जना केली.

बिनमिशाच्या आणि बहिरीससाण्यासारख्या दिसणाऱ्या अनिकेईने ग्रिगरीकडे पाहून डोळा घातला. त्याच्या निर्लोम बायकी चेहऱ्याला सुरकुत्या पडून एक पातळ स्मित त्यातून उमटले. त्याने एक शिटी ठोकली आणि हातातल्या चाबकाने घोड्यांच्या पाठी झोडपून काढल्या.

‘ हटा बाजूला ’ नवऱ्या मुलाचा मामा इल्या ओझोगिन गरजला. आपली दुसरी फैटण त्यांच्या पुढे नेण्याचा तो प्रयत्न करीत होता. आपल्या मामाच्या पाठीमागे दुन्याचा उन्हात रापलेला चेहरा ग्रिगरीने ओळखला.

‘ अरे, दे सोडून ’ आनिकेई ओरडला, उडी मारून तो उभा ठाकला आणि त्याच्या तोंडातून कर्णकटु शिट्टी बाहेर पडली. घोडयांना चाबकाने झोडपीत त्याने बेफाम पिटाळले.

‘ पडशील तू ’ आनिकेईच्या पोटरीवर चढलेल्या पेटंट लेदर बुटाला हातांचा विळखा घालीत दार्या ओरडली.

‘ होऊन जाऊ दे ’ इल्यामामा बाजूने ओरडला, पण चाकाच्या अखंड घडघडाटात त्याचा आवाज विरून गेला.

आरोळ्या ठोकणाऱ्या, बायकापुरुष खच्चून भरलेल्या त्या दोन फैटणी जोडीने उधळत होत्या. पाठीवर लाल निळ्या गुलाबी झुली घातलेले, आयाळींना आणि आघाडीना चुइट्या, बेगडी फुलांचे शिरोबंद आणि कासऱ्याना घुंघुरमाळा बांधलेले घोडे त्या उंचसखल रस्त्यावर फुलत्या फेसाचे पुंजके उधळीत दौडत होते. त्यांच्या पाठीच्या नमद्यांवरील राघावळी वाऱ्यावर फडफडत, फुगारत होत्या.

कोर्शुनोवच्या फाटकाजवळ खेडयातील पोरांची अेक झुंड त्या रिसाल्याच्या वाटेकडे डोळे लावून उभी होती. रस्त्यावर उडणारे धुळींचे लोट त्यानी पाहिले आणि आरोळ्या ठोकीत ती पोरे आवाडात धावली.

‘ आले रे आले ! ’ ‘ हे पहा आले ! ’

नुकत्याच बाहेर पडलेल्या हेटबाबाला त्यानी घेरले.

‘ गर्दी करायला काय झालं ? चला पळा कारटयानो. काय गोंगाट चालव-लाय ! माझं स्वतःच बोलणं मला ऐकू येई ना ! ’

ढगळ तुमान घातलेल्या हेटबाबाच्याभोवती रिंगण करून पोरे उडया मारीत होती. आरडाओरड करून त्या युक्रेनी माणसाची टर उडवीत होती. खोल विहिरीत डोकावून बघावे तशी हेटबाबाने मुंडी खाली घातली होती आणि चेकाळलेल्या पोराकडे बघत आपली पुष्ट ढेरी खाजवीत लाडे लाडे हसत होता.

फैटणी खडखडत फाटकापाशी आल्या. ग्रिगरीला घेऊन प्योत्र पावठाणा-जवळ आला. बाकीचे वऱ्हाड त्यांच्या पाठोपाठ आले.

पडवीतून सायवानाकडे जाणारा दरवाजा जाम बंद केलेला होता. प्योत्रने तो ठोठावला.

‘ परमेश्वरा येशूख्रिस्ता ! आमच्यावर दया कर ’ तो हेल काढीत म्हणाला.

पासून ते उठले तेव्हा उकडल्या फळांच्या रसाचा आणि गव्हाच्या पावाचा आंबट दर्प सर्वांगाला मारणाऱ्या कुणीतरी त्याला दृष्ट लागू नये म्हणून मूठभर गहू त्याच्या पोटऱ्यावरील बुटात टाकले. घरी परत येईपर्यंत ते गहू त्याच्या पायाला टोचत राहिले. घट्ट आवळलेल्या गळपट्टीत तो गुदमरून गेला. त्या लग्नविधीच्या मन उदास करणाऱ्या अंमलाखाली निगूत निःस्संगपणे पुटपुटत तो स्वतःलाच शिव्या घालू लागला.

२२.

कोर्शुनोवच्या घरी घोड्यानी विश्रांती घेतली होती. तरीसुद्धा मेलीखोवच्या वखळीत परत येईपर्यंत ते अगदी थकून गेले. त्यांच्या काढण्या फेसाने शिपून गेल्या होत्या. पण प्यालेल्या गाडीवाल्यानी त्याना निष्ठूरपणे पिटाळले होते.

मेलीखोव म्हातारा-म्हातारी वरातीला सामोरी आली. पंतीलेय्‌ने देवपुतळी हातात घेतली होती. पिकलेल्या केसांची कलाबूत त्याच्या काळ्याभोर दाढीत मधून मधून चमकत होती. ओठ जाम आवळून त्याची बायको त्याच्या शेजारी उभी होती.

'हॉप' बेलीची पाने आणि गव्हाच्या अक्षतांची बरसात अंगावर घेत ग्रिगरी आणि नतालिया त्यांचा आशिर्वाद घेण्यासाठी त्यांच्याजवळ गेली. त्यांना आशीर्वाद देताना पंतीलेय्‌च्या चेहऱ्यावरून एक अश्रू ओघळला. आपला दुबळेपणा दुसऱ्याच्या दृष्टीला पडतो आहे ह्या जाणिवेने त्याने कपाळाला आठ्या घालून जागच्या जागी चुळबुळ केली.

नवरा-नवरींनी गृहप्रवेश केला. व्होडका, गाडीचा प्रवास आणि उन्हे ह्यांनी लालेलाल झालेली दार्या तीरासारखी पावलाणापाशी आली आणि दुन्याच्या अंगावर धाऊन जात तिने विचारले—

'प्योत्र कुठाय?'

'मी त्याला पाहिला नाही—'

'पुरोहिताला त्यानं घेऊन यायची वेळ झाली तरी कुठंच मेल्याचा पत्ता नाही.'

प्योत्रला तिने शोधून काढलं. जेवढी पेलेल त्यापेक्षा जास्त व्होडका घेतल्यान तो गाडीत पडून कण्हत होता. घारीसारखी तिने त्याच्यावर झेप घेतली. 'प्यालास तरी किती मेल्या ! ऊठ अन् पुरोहिताला घेऊन ये.'

'चल हट ! तुला मी ओळखत नाय. मला हुकूम सोडणारी तू कोण ?' सुक्या गवताच्या काड्या आणि कोंबडयांची विष्ठा बोटाने रापीत प्योत्रने निषेध प्रगट केला.

डोळयात पाणी आलेल्या दार्यांने आपली दोन बोटे त्याच्या तोंडात खुपसली त्याची जड होत जाणारी जीभ पकडली आणि भानावर यावा म्हणून त्याच्या तोंडातून ओकारी काढवली. नंतर तिने विहिरीतील हंडाभर थंड पाणी त्याच्या डोक्यावर ओतले. घोडयाच्या कांबरूणाने त्याला पुसून कोरडा केला आणि त्याला घेऊन ती पुरोहिताकडे गेली

तासभरानंतर ग्रिगरी हातात मेणबत्ती घट्ट पकडून नतालियाच्या शेजारी गिरिजाघरात उभा होता. मेणबत्तीच्या प्रकाशात नतालिया जास्त सुंदर दिसत होती. आजूबाजूला कुजबुज करणाऱ्या लोकांच्या तटबंदीवरून त्याचे डोळे भिरभिरत होते आणि तेच चार शब्द त्याचा पिच्छा पुरवित होते. 'तुझे दात तुझ्या घशात !' त्याच्यामागे सुजीर चेहऱ्याचा प्योत्र खोकत होता. गर्दीत कुठेतरी त्याला दुन्याचे डोळे चमकताना दिसले. इतर चेहरेही त्याला ओळखीचे वाटले. आजुबाजूला चाललेला कोलाहल आणि उपाध्येबुवाच्या मंत्राची भुणभुण त्याला ऐकू येत होती. औदासिन्याने तो जखडून गेला होता. फादर विस्सरिओन ह्यांच्या फाटक्या बुटांच्या पावलावर पाऊल ठेवून तो पोथीपीठाला प्रदक्षिणा घालत होता. त्याचा जामा प्योत्रने हलकेच खेचला तेव्हा तो थांबला. मेणबत्तीच्या थरथरणाऱ्या ज्योतीकडे तो टक लावून बघत होता आणि अंगावर चढणारी झोपेची सुस्ती घालवण्याची धडपड करीत होता.

'आंगठ्या द्या एकमेकांना' ग्रिगरीकडे पाहून अदमुरे स्मित करीत फादर विस्सरिओन म्हणाले.

त्यानी एकमेकांना आंगठ्या दिल्या. प्योत्रच्या डोळयांना डोळा भिडताच ग्रिगरीने मूक प्रश्न केला 'हे लवकर संपणार की नाही ?' प्योत्रच्या ओठांचे कोपरे दुमडले. हसू दाबीत त्याने त्याला उत्तर दिले, 'झालंच' नंतर ग्रिगरीने आपल्या बायकोच्या ओल्या मिळमिळीत ओठांचे तीनदा चुंबन घेतले. गिरिजा

घरामध्ये विझलेल्या मेणबत्त्यांची घाण सुटली होती. लोक दाटीदाटीने दाराकडे चालले होते.

नतालियाचा मोठाड घडबडीत हात हातात घेऊन ग्रिगरी बाहेर पडवीत गेला. कुणीतरी त्याची हॅट त्याच्या डोक्यात कोंबली. पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्याच्या गरम झुळकेने कडू दवण्याचा वास त्यांच्या नाकात शिरला. मैदानाकडून संध्याकाळची निवण हवा येऊ लागली होती. आवाजाच्या त्या कोलाहलातून अस्वस्थ घोड्याच्या घुंगुरमाळाची लाडिक हाक त्याच्या कानावर आली.

२३.

नवरा–नवरी गिरिजाघरात जाईपर्यंत कोर्शुनोव मंडळी मेलीखोवच्या घरी आली नाही. ते आले किंवा नाही हे बघण्यासाठी पंतीलेय् अनेकदा फाटकापाशी गेला. पण दुतर्फा काटेझुडपे माजलेल्या करड्या रस्त्यावर पूर्णपणे शुकशुकाट होता. त्याने आपली नजर डॉनकडे वळवली. रानाला सोनपिवळी कळा येत चालली होती. डॉन थडीच्या झिलाणावर पिकलेले कळक थकिस्तपणे लवत होते. संधी प्रकाशात पतझडीच्या आगमनकाळाची व्याकुळ निळी गुंगी मिसळून तिने ते खेडं, डॉननदी, डोंगरांची खडूळ कांडाळी, नदीपल्याडच्या जांभळट धूसरतेत दडलेली वनराई आणि माळरान ह्या सर्वांना व्यापून टाकले होते. रस्त्याच्या फाट्यावर वाटकडेला असलेल्या गिरिजाघराची रेषाकृती आकाशात उंचावली होती.

अस्फुट ऐकू येणारा गाडीच्या चाकांचा आवाज आणि कुत्रेभुंक पंतीलेय्च्या कानाने टिपली. दोन फॅटणी चौक ओलांडून रस्त्यावर आल्या. पहिल्या फॅटणीत मिरोन आणि शेजारी त्याची बायको होती. त्यांच्या समोरच्या बाजूला सेंट जॉर्जचे क्रॉसेस आणि पदकांनी मंडित केलेला गणवेश घातलेले ग्रिशाका आजोबा होते. एका पेटीवर बसून मितका बेफिकिरीने गाडी हाकीत होता. फेसाळलेल्या घोड्यांना चाबूक दाखवण्याची तसदी तो घेत नव्हता. दुसऱ्या फॅटणीत मिखेइ होता. मागे कलून तो लगाम खेचत होता. गाडीची घोडदौड दुडक्या चालीवर आणण्याची त्याची खटपट चालली होती. त्याचा खडखडीत

भ्रुकुटी विहीन चेहरा शेंदरी होता. टोपीच्या मोडक्या ढापणाखालून घामाच्या धारा ओघळत होत्या.

पंतीलेयने फाटक सताड उघडले आणि त्या दोन फॅटणी आवाडात शिरल्या. इलीनिचना पडवीतून डुलत डुलत आली. तिच्या पोशाकाचा काठ धुळीत लोळत तिच्या मागून येत होता.

'यावे यावे मित्रांनो ! आमच्या गरीबाच्या घरी पायधूळ झडू द्या आपली' आपली सुटलेली कमर वाकवीत ती म्हणाली.

मान एका बाजूला कलती करून पंतोलेय्ने दोन्ही बाहू पसरून त्यांचे स्वागत केले. 'आत यावं अशी प्रार्थना आहे.'

घोडे सोडायला सांगून तो आपल्या व्याह्यांकडे गेला. आपल्या तुमानीवरची धूळ मिरोनने हाताने झटकली, एकमेकांना नमस्कार करून झाल्यावर ते पावलाणा-पाशी आले. तुफान रपेटीने अंग खिळखिळे झालेले म्हातारे ग्रिशाका मागे रेंगाळले होते. 'यावं यावं सोयऱ्यांनो, आत यावं' इलीनिचनाने आग्रह केला.

'धन्यवाद ! आलोच आम्ही.

'आम्ही आपली वाटच बघत होतो. या ! या ! आत या ! आपले कपडे झटकायला मी कुंचा आणते. ह्या दिवसात धुळीचा फार त्रास होतो. श्वाससुद्धा घेता येत नाही नीट.'

'खरंय..खरंय अगदी कोरड पडलंय सगळं–त्यानंच धूळ होते. आपण तकलीफ घेऊ नका. मी जरा–' आपल्या मंदबुद्धी यजमानीण बाईला वाकून अभी-वादन करीत ग्रिशाका कोठीघराकडे गेले आणि पाखडणी यंत्रामागे त्यानी आश्रय घेतला.

'त्या म्हातारबुवाच्या का मागं लागल्येस ? मूर्ख !' पावठाणावर आपल्या बायकोला रोखीत पंतीलेय् खेसकला. 'त्याना लागलेय–आणि तू आपली–! डोकं आहे का नाही बये !'

'आता मला कसं कळणार ?' इलीनिचना ओशाळून म्हणाली.

'ओळखायला हवं ठीक आहे. पाहुण्यांना मेजाकडं घेऊन चल.'

नवऱ्या मुलीकडच्या वऱ्हाडाला चाफेखणीत आणण्यात आले. अर्धवट झिंगलेल्या पाहुण्यांचा घोळका तिथल्या मेजाभोवती आधीच बसलेला होता. ते आल्यानंतर थोड्याच वेळाने नवरा-नवरी गिरिजाघरातून परतले. त्यानी घरात प्रवेश केल्यावर अर्ध्या गॅलनच्या बाटलीतून पंतीलेय्ने ग्लासे भरली. त्याच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले होते.

'मिरोन ग्रिगोरिएविच चला ! आपल्या मुलाना आरोग्य लाभावं म्हणून पिऊ या ! आपल्या सारखंच त्याना चांगलं आयुष्य मिळू दे. ती सुखात जगोत, निरोगी राहोत.'

मोठा ग्लास भरून व्होडका त्यानी ग्रिशाका आजोबाना दिली. दाढीमिशांचे हिरवट रान माजलेल्या त्यांच्या तोंडात त्यातली निम्मी सांडली आणि निम्मी त्यांच्या गणवेशाच्या कडक गळपट्टीत वहात गेली. ग्लासे एकमेकाना भिडली. मंडळी पीत आणि पीतच राहिली. मासळी बाजारासारखी कलकल माजली. कोर्शुनोवचा एक दूरचा नातेवाईक निकिफोर कोलोवेइदिन मेजाच्या दूर टोकाला बसला होता. त्याने ग्लास हवेत उंच केला आणि अशावेळी करतात ती नेहमीच्या रिवाजाची गर्जना केली.

'व्होडका कडू आहे' !'

'कडू आहे ! कडू आहे !' मेजापाशी बसलेल्या पाहुण्यानी त्याच्या पाठोपाठ गजर केला.

'कडू आहे ! कडू आहे !' गर्दी उडालेल्या स्वयंपाक घरातून प्रतिसाद मिळाला.

फणफणत ग्रिगरीने आपल्या बायकोच्या बेचव ओठांचे चुंबन घेतले आणि स्वतःची पारध झाल्यासारखी आपली नजर खोलीभर फिरवली. लालेलाल गरम चेहरे... रांगड्या...धुंद... गढूळ... नजरा... हशा... अधाशीपणे रवंथ करणारी तोंडे... कशिदा काढलेल्या मेणकापडावर गळणाऱ्या लाळा... आवाजांचा कोलाहल !'

दातात रुंद फटी पडलेले आपले तोंड कोलोवेइदिनने सताड उचलले.

व्होडका कडू आहे !' त्याने ग्लास उंच करताच त्याच्या निळ्या रखवाली गणवेशाच्या बाहीवरील दीर्घकाळ चाकरी केल्याचे निदर्शक बिल्ले सुरकुतले-'कडू आहे !' परत सगळ्यानी ते पालूपद उचलले.

कोलोवेइदिनच्या तोंडाकडे ग्रिगरी तिरस्काराने बघत होता. 'कडू आहे' अशी आरोळी ठोकताना बाहेर डोकावणारी त्याची आधाशी जीभ ग्रिगरीच्या नजरेला पडत होती.

टीप : १. विहाहप्रसंगी कुणीतरी 'व्होडका कडू आहे' अशी गर्जना करायची आणि इतरानी त्याला साथ द्यायची अशी रीत आहे. 'व्होडका कडू आहे' म्हणून नवरानवरीने परस्परांचे चुंबन घेऊन 'ती गोड करावी' असा ह्या आग्रहाचा मतितार्थ आहे–

'पिल्लानो घ्या मुका !' व्होडकाने ओल्या झालेल्या मिशाना पीळ भरीत प्योत्र अडखळत म्हणाला.

स्वयंपाकघरात लालबुंद चेहरा झालेल्या आणि झिंगलेल्या दार्याने गायला सुरवात केली. बाकीच्यानी गाण्याचे पालुपद पकडले. चाफेखणातील मंडळीनीही गाण्यांत आपले आवाज मिसळवले.

नदी अल्याडी पूल पल्याडी
नदीत चालली एक होडी

सगळयांचे आवाज एकमेकात मिसळून गेले, पण सर्वांच्या वरताण ख्रिस्तोनियाचा भसडा आवाज खिडक्यांची तावदाने हादरवू लागला.

कुणी आम्हाला पाजली जर
आम्ही सुद्धा पिऊ तर

आतून बायका किंचाळत गाऊ लागल्या—

कश्शाल्ला गातोय शिर्रा ताण्णुन
आवाज्ज गेलाय पुर्रता बस्सुन

इतराना मदत म्हणून एक म्हातारा आवाज खणखणला.

आवाज त्याचा जायचा
आवाज त्याचा बसायचा
दुसऱ्या बागेतली करवंद.
चोरून जो कुणी खायचा.

गाणे संपल्यावर खाणे सुरू झाले.

'मजा आहे मंडळी ! मजा आला !'

'हे मटण चाखून पहा—'

'हात दूर कर ! माझा नवरा बघतोय—'

'दारू कडू आहे ! दारू कडू !—'

'तुझं मटण नको मला ! मला मासळी आवडते. हो हो—मासळी रसाळ आहे !'

'प्रोशका ! आणखी एक ग्लास घेऊया—'

'वा ! कसं मस्त घसा जाळीत गेलं !—'

'सिम्योन गरद्येविच !'

'आँ ?'

'सिम्योन गरद्येविच !'

'चालायला लाग !'

स्वयंपाकघरात जमीन करकरत हादरत होती. पायातील जोडयांचे खडाड खडाड आवाज येत होते. एक ग्लास जमिनीवर पडला. पण सर्वांच्या सातमजली खिदळण्यांत त्याचा आवाज बुडून गेला. मेजाजवळ बसलेल्यांच्या डोक्यावरून ग्रिगरीने स्वयंपाक घराकडे दृष्टी टाकली. आता बायकांचे नाच सुरू झाले होते. किंचाळणे आणि शिट्यांची त्याला साथ होती. आपले विस्तृत पार्श्वभाग हालवीत त्या नाचत होत्या. (तिथे एकही सडपातळ नव्हती, कारण प्रत्येकीने पाचपाच सहासहा झगे घातले होते.) लेसकाम केलेले रुमाल त्या झटकीत फडकवीत होत्या आणि नाचताना कोपरे मागेपुढे करीत होत्या.

अॅकॉर्डियनचा कर्कश आवाज खरमरून उठला. वाजवणाराने कझाक नाचाचे सूर काढले होते. ओरडा झाला—

'रिंगण करा ! रिंगण करा !'

'जरा दाबून घे !' प्योत्रने घामाने डबडबलेल्या एकीला ढकलीत विनवले

ग्रिगरी उठून उभा राहिला. नतालियाकडे पाहून त्याने डोळा घातला.

'प्योत्र, कझाक नाच नाचणारे ! बघ त्याच्याकडे !'

'कुणाबरोबर ?'

'दिसत नाही, तुझ्या आईबरोबर !'

मरिया लुकिनिचनाने कोपरे उंचावून हात नितंबावर ठेवले. तिच्या डाव्या हातात तिचा रुमाल होता. हळुहळु ठेक्यात पावले टाकीत प्योत्र तिच्याजवळ गेला. एक गिरकी मारून परत तो आपल्या जागी आला. एखाद्या डबक्यात पाय टाकताना उचलावा तसा लुकिनिचनाने आपला झगा वर उचलला, चौडयाने तो ठेका पकडला आणि तिची 'वाहवा' करणाऱ्या गदारोळात पुरुषासारख्या तंगडया झाडीत ती नाचू लागली.

अॅकॉर्डियन वादकाने मंद सप्तकातील अशी काही धून छेडली की प्योत्रच्या अंगात आल्यासारखे झाले. डरकाळी फोडून तो उकिडवा बसला आणि 'कोंबडा' घालू लागला. पोटऱ्यावरील बुटांवर हाताच्या तळव्याने तो फटाफटा थापटया मारीत होता. ओठाच्या कोपऱ्यातून मिशांची टोके कुरतडत होता. पायाची मुरड आणि फेक तो विलक्षण झपाट्याने करीत होता. त्याच्या चिंब बटा कपाळावर थयथया नाचत होत्या, पण त्यानासुद्धा त्या पायाची द्रुतगती गाठता येत नव्हती.

दाराजवळच्या घोळक्याने ग्रिगरीची नजर अडली गेली होती. झिंगलेल्या

पाहुणे मंडळींच्या आरोळ्या आणि जळणारी देवदार फळी तडतडावी तसे वाजणारे त्यांच्या नालबंद बूटटाचांचे ताशे एवढेच त्याच्या कानी पडत होते.

नंतर मिरोनने इलीनिचनाबरोबर नृत्य केले. गंभीरपणे आणि सरावलेल्या जबाबदारीच्या आविर्भावात ते पावले टाकीत होते. त्यांना पाहण्यासाठी पंतीलेय् एका स्टुलावर उभा राहिला होता. आपला लंगडा पाय त्याने लोंबकळत सोडला होता आणि जिभेने मिटक्या मारल्यासारखा आवाज तो काढीत होता. त्याच्या पायाऐवजी त्याचे ओठ आणि कानातील चंद्रकोर ह्यांचाच नाच चालला होता.

तरबेज मंडळी नाचायला पुढे आली ज्याना पाय धड मुडपताही येत नव्हता तेही ह्यात सामील झाले. मग बाकीचे गिल्ला करू लागले.

'नीट नाच की !'

'पावलं लहान टाक की ए तुझ्या...!'

'त्याचे पाय हलके आहेत पण बूडच मधेमधे येतं–'

'होऊन जाऊ दे–'

'आमची जिकली–'

'चला चला ! –'

'दमला काय ? नाच नाहीतर बाटलीच फोडतो टाळक्यावर–'

ग्रिशाका आजोबा पुरते तर्र झाले होते. बाकावर शेजारी बसलेल्या माणसाची हाडे निघालेली पाठ कवेत घेऊन त्याच्या कानात एखाद्या डासाप्रमाणे ते भुणभुणत होते.

'कोणत्या साली चाकरी सुरू केली ?'

जुन्या ओकवृक्षाप्रमाणे वाकून गेलेल्या त्या वृद्ध शेजाऱ्याने उत्तर दिले.

'१८३९ मधे, माझ्या पुता !'

'कधी ?' ग्रिशाकाने आपल्या सुरकुतलेल्या कानाच्या चोभ्यामागे हात नेऊन विचारले.

'सांगितलं ना १८३९ त !'

'तुमचं नाव काय ? कोणत्या फलटणीत होता ?'

'मॉकझीम बोगातिरियोव बाकलानोव फलटणीत नाईक होतो.

'क्रायनयार खेड्याचा मी '

'मेलोखोवचे पाव्हणे का ?'

'काय ?'

'मी विचारलं–मेलीखोवचे तुम्ही पाव्हणे का ?'

'हा हा ! मी नवऱ्यामुलाच्या आईचा बाप'

'बाकलानोव फलटणीत होता म्हणाला नाही का ?'

तो म्हातारा दंतहीन हिरड्यानी पावाचा तुकडा चावण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होता. ग्रिशाकाकडे गढूळ नजरेने पाहून त्याने मान हलवली.

'म्हणजे कॉकेशियाच्या मोहिमेत तुम्ही असालच.'

'मी खुद्द बाकलानोवच्याच हाताखाली होतो. देव त्याला शांती देवो !' कॉकेशस सर करायला मी त्याला मदत केली. आमच्या फलटणीत काही बांजिदे कझाक होते. रखवालीच्या शिपायासारखे उंचेपुरे. तेवढे ताठ नव्हते म्हणा ! पण हल्लीच्या शिपायासारखे नव्हते. हे ऽ धिप्पाड लांब हातांचे ! रुंद तकटाचे होते ! अशी माणसं होऊन गेली पुता ! आमचे जनरलसाहेब असेच होऊन गेले. गालीचा चोरल्याबद्दल एकदा त्यानी आमची कणीक तिंबली.'

'मी तुर्कस्थानच्या मोहिमेत होतो. आँ ? हो हो मी तिथं होतो '—पदके खुळखुळणाऱ्या आपल्या छातीला उंचविण्याचा म्हाताऱ्या ग्रिशाकानी प्रयत्न केला.

'पहाटेच्या सुमारास आम्ही खेडं घेतलं आणि मध्यान्हीला शिंगवाल्यानं इशारा फुंकला.'

'आम्ही पण झारची चाकरी केल्येय. रोस्सिट्झच्या आजूबाजूला आम्ही लढत होतो आणि आमची फलटण बारावी डॉन कझाक—जानिस्सारीशी[1] झुंजत होती.'

'शिंगवाल्याने इशारा फुंकला.'

ग्रिशाकाचे म्हणणे ऐकून न घेता तो बाकलानोवचा सैनिक आपलीच कथा पुढे सांगू लागला. 'जानिस्सारी आपल्या अतामान रेजिमेन्ट सारखे असतात.'

'होय !'

ग्रिशाकाना आता चीड येऊ लागली होती. रागाने ते हात उडवीत म्हणाले.

'तुर्की जानिस्सारी त्यांच्या झारची चाकरी करतात. डोक्यात ते सफेद पिशव्या घालतात. आँ ? पांढऱ्या सफेद पिशव्या घालतात.'

'मी माझ्या दोस्ताला म्हणालो,' आपल्याला माघार घ्यावी लागणार तिमोफेइ. पण आधी आपल्याला भिंतीवर लावलेला तो गालिचा काढायला हवा.

टीप : १ जुन्या काळच्या तुर्की पायदळ रखवालीचे सैनिक.

'गोळीबारात मर्दुमकी दाखवल्याबद्दल मला दोन जॉर्जेस मिळाली. एका तुर्की मेजरला जिता पकडला मी!' ग्रिशाका आजोबा रडू लागले आणि आपल्या सुकट मुठीने शेजाऱ्याच्या पाठीवर गुद्दे मारू लागले. पण शेजारी चेरीच्या मुरंब्यात कोंबडीचा तुकडा बुडवून खराब झालेल्या मेजकापडाकडे बघत पुटपुटत होता.

'सैतानानं माझ्या हातून कोणतं पाप करवलं ते ऐक बेटा!' मेज-कापडाच्या पांढऱ्या चुण्यांवर त्या म्हताऱ्याची टक अशी, काही खिळली होती की व्होडक्यात आणि सूपमध्ये भिजलेले मेणकापड नव्हे तर कॉकेशसची डोळे दिपवणारी पर्वतावलीच तो बघत होता. 'जे आपलं नाही त्याला मी कधीही हात लावला नव्हता–'

'त्या चिरकीज लोकांच्या खेड्यात आम्ही आलो, कुणाची मालमत्ता बघून माझ्या कधी पोटात दुखलं नाही. लोकांच्या चीजवस्तूवर कुणी वाईट नजर टाकणार नाही असं– पण आता हा गालीचा नजरेस पडला आणि मनात आलं ह्याचं खोगीर झकास होईल.'

'आम्हीसुद्धा खूप पाहिलंय. समुद्रापलीकडच्या मुलखालाही मी जाऊन आलोय.' आपल्या शेजाऱ्याच्या डोळ्यात बघण्याच्या ग्रिशकानी प्रयत्न केला पण त्या खोल गेलेल्या खोबल्यांच्या आजूबाजूला भुवया आणि दाढीचे घनदाट रान माजलेले होते. तेव्हा त्यानी एक युक्ती लढवली. आपल्या कथेच्या शिखर बन्दूकडे शेजाऱ्याचे लक्ष त्यांना खेचून घ्यावयाचे होते. तेव्हा सुरवातीचा थातुर मातुर गाळून त्यानी एकदम ऐन मध्यावरच उडी झोकली. 'मग कॅप्टन हुकूम देतो : घोडदौडीला एक कतार! एल्गार सुरु!'

पण जुन्या बाकलानोव फलटणीतील कझाकने शिंगाच्या इशाऱ्याबरोबर टाच मारायला तयार झालेल्या स्वाराप्रमाणे मान मागे झुकवली आणि मेजावर गुद्दा मारीत तो कुजबुजला.

'भालाइतानो हुश्शार! बाकलानोवच्या शिपायानो तलवारी उपसा!' त्याचा आवाज एकदम चढता झाला. त्याचे गढूळ डोळे लुकलुकून प्रदीप्त झाले. 'बाकलानोवच्या मर्दानो!' आपले पिवळट बोळके त्याने सताड उघडले आणि तो गरजला 'गनिमावर तुटा, एलगार सुरू!'

जवानमर्द आणि चतुर नजरेने त्यानें ग्रिशाककडे रोखून पाहिले, दाढीवरून ओघळणारा अश्रू न टिपता त्याने तो तसाच ओघळू दिला.

ग्रिशाकालाही चेव चढला.

'त्यानं हुकूम सोडला आणि तलवार उगारली. आम्ही घोड्यांना टाच मारली आणि जानीस्सारींना हे असं वेढलं' थरथरत्या बोटांनी त्यांनी मेजकापडावर चौकान काढला 'आमच्यावर गोळीबार करीत होते. दोनदा आम्ही चाल केली. दोन्ही वेळेला त्यांनी आम्हाला मागं रेटलं. जेव्हा जेव्हा आम्ही चालून जायचो तेव्हा तेव्हा त्याच्या फळीच्या लहानशा रानातून रिसाल्याचे स्वार बाहेर येत. तेव्हा आमच्या कमांडरनं हुकूम सोडला. आम्ही वळून त्यांच्यावर चालून गेलो. त्यांचा धुव्वा उडवला. पार दाणादाण केली. कझाकच्या पुढे उभा राहील असा कोणता रिसाला अलम दुनियेत आहे ? रानात त्यानी धूम ठोकली. त्यांचा सेनानी अगदी माझ्या समोर मी पाहिला. सारंग जनावरावर बसून चालला होता. चांगला देखणा गडी. काळ्याभोर गलमिशा ! त्यानं वळून माझ्याकडं पाहिलं. पिस्तुल काढलं. गोळी घातली ! पण नेम चुकला. घोड्याला टाच मारून त्याला मी गाठला. त्याला छाटणार होतो. पण मग मनात जास्त चांगला विचार आला. किती झालं तरी तोही माणूसच ! तेव्हा त्याच्या कमरेला उजव्या हाताची कव घातली आणि तो रिकिबीतून निसटला. माझ्या हाताला चावला पण मी सोडला नाही त्याला. . .'

ग्रिशाकाने विजयीमुद्रेने आपल्या शेजाऱ्याकडे पाहिले, पण म्हातारबुवांचे कोनदार डोके छातीवर झुकले होते. त्या गोंगाटात त्याना झोप लागून गेली होती आणि ते संतोषपूर्वक घोरत होते.

★★

पर्व दुसरे

१.

सेर्गेइ प्लातोनोविच मोखोव आपली वंशावळ खूप जुन्या काळापर्यंत सांगू शकत असे.

पहिल्या पीटरच्या कारकिर्दीत बिस्किटे आणि बंदुकीची दारू भरलेला एक शाही पडाव डॉनकडून खाली आझोवकडे प्रवास करीत होता. डॉनच्या वरच्या काठाला असणाऱ्या चिगोनाकी ह्या लहानशा दंडेलखोर गावातील कझाकांनी रात्री ह्या पडावावर धाड घातली. झोपलेले रखवालदार त्यांनी ठार मारले. बिस्किटे आणि बंदुकीची दारू लुटली आणि तो पडाव त्यांनी बुडवून टाकला.

झारच्या हुकुमावरून वोरोनेझहून शिपाई पाठविण्यात आले त्यांनी चिगोनाकी गाव जाळून बेचिराख केले. ह्या हल्ल्यात भाग घेणाऱ्या कझाकांना कंठस्नान घालण्यात आले. गिरफदार केलेला कॅप्टन याकीरका आणि त्या बरोबरचे चाळीस कझाक ह्यांना ओंडक्यांच्या तक्तावर फाशी देऊन ते ओंडके दंडेली करू पाहणाऱ्या खेड्याला जरब बसावी म्हणून डॉनच्या प्रवाहातून सोडून देण्यात आले.

चिगोनाकी झोपड्यातील शेकोटीचा धूर जिथून बाहेर पडत होता, या ठिकाणी दहा वर्षानंतर कझाकांच्या आणि त्या सत्यानाशातून बचावलेल्यांच्या वस्त्या परत उठू लागल्या. खेडे परत उभे राहिले आणि त्या भोवती बचावाचे गावकुसू उभारले गेले. त्याच सुमारास झारचा एक गुप्त हस्तक वोरोनेझहून चिगोनाकीला पाठविण्यात आला. हा मोखोव नावाचा रशियन शेतकरी होता. चाकुच्या मुठी, तंबाखू, चकमकीचे गारमणी आणि कझाकांच्या रोजच्या गरजा भागविणाऱ्या किराणा मालाचा तो व्यापारउदीम करीत असे. चोरीचा माल तो विकत घ्यायचा आणि विकायचा. दुकानात माल भरण्याच्या सबबीवर तो वर्षातून एकदा वोरोनेझला जाऊन यायचा. पण प्रत्यक्षात तो अधिकाऱ्यांना अहवाल

देत असे की खेडे सध्या शांत आहे आणि कोणत्याही नवीन कुरापतीचा खेडयाचा विचार नाही.

मोखोवशेटचे कुटुंब म्हणजे ह्याच निकिता मोखोव ह्या रशियन शेतकऱ्याची वंशवेल होती. कझाक भूमीत त्यांची पाळेमुळे खोलवर रुजली होती. त्याना फाटे फुटत सबंध मुलुखांत एकाद्या वाटथडींच्या चिवट रानझुडुपाप्रमाणे ती फैलावली वोरोनेझच्या सुभेदाराने आपल्या पूर्वजाना दिलेल्या अधिकारपत्राच्या पत्रावळी त्यानी पूज्यभावाने जपल्या होत्या. ही अधिकारपत्रे आजतागायतही सहिसलामत राहिली असती पण सेर्गेइ मोखोवच्या आजोबांच्या हयातीत एक मोठी आग लागून देवपुतळयांच्या मागे ठेवलेल्या लाकडी संदुकीबरोबर ती जळून गेली. ह्या मोखोवने पत्त्याच्या नादाने एकदा स्वतःचा सत्यानाश ओढवून घेतला होता आणि आपली सर्व जायदाद उधळून टाकली होती. पण आगीत सगळयाची राखरांगोळी होऊन गेल्यावर सर्गेइ फातोनोविचने परत बस्तान सावरले. आपल्या लोलागोळा झालेल्या बापाला मूठमाती दिल्यावर सेर्गेइला परत ओनाम्यापासून सुरुवात करावी लागली. जनावरांचे केस, पक्ष्यांची परे, वगैरे खरेदी करून त्याने व्यापार उदीम सुरु केला. बनवाबनवी करीत, गावांतील कझाकांकडून कोपेक न् कोपेक उकळीत पाच वर्षे त्याने मोठया मेटाकुटीची काढली आणि मग आचानक 'फेरीवाल्या सिन्योझका'चा सेर्गेइ प्लातोनोविच झाला. कापडचोपडाचे लहानसे दुकान त्याने उघडले. एका अर्धवट असलेल्या पुरोहिताच्या मुलीशी त्याने लग्न केले. लग्नात ह्याला भरपूर हुंडा मिळाला. लीननकापड दुकानदार म्हणून ह्याने बस्तान बसविले. ऐन मोक्याच्या क्षणी सेर्गेइ प्लातोनोविच कापडाच्या व्यापारात पडले.

डॉनच्या डाव्या काठाचा दांड बरड चिकणमातीचा आणि नापिक होता म्हणून लष्करी अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून कझाकांचे खेडेच्या खेडे ह्या वेळी उजव्या काठाला स्थलांतर करीत होते. क्रासनाकुत्स्कायाच्या नवीन खेडयाभोवती घरे उठू लागली. पूर्वीच्या वतनवाडयांच्या कडेने चिर, चोर्नाया आणि फ्रालोवका नद्यांच्या काठाने चौपटयातील तळवटीवर आणि दऱ्याखोऱ्यातून युक्रेनी वसाहतीच्या बरोबरीने नवी खेडी आकाराला आली. सामानसुमान आणायला तीस-पस्तीस मैल जाण्यापेक्षा सेर्गेइ मोखोवचे चकचकीत फळयांचे, चित्ताकर्षक मालान भरलेले दुकान लोकाना मोठयाच सोईचे झाले. भर आकाराचा ॲकॉर्डियन पसरावा तसा सेर्गेइनी आपल्या धंद्याचा व्याप वाढविला. जनावराची चामडी, मीठ, घासलेट, फती, दोरें, गुंड्या वगैरे खेडुत जीवनाला लागणारा सर्व प्रकारचा

माल त्यानी दुकानात भरला होता. शेतीची यंत्राबजारेही ते पुरवू लागले. आक्साइस्क कारखान्यातून आलेली कापणी यंत्रे, पाभर यंत्रे, नांगर, उफणणी यंत्रे दुकानाबाहेर नीट हारीने मांडून ठेवलेली होती. दुकानाच्या शीतळ हिरव्या झडपात ती उन्हाळ्याच्या गरमीपासून सुरक्षित राहिली होती.

दुसऱ्याच्या खिशातील पैशाची मोजदाद कठीणच ! वण असे दिसत होते की तैलबुद्धि सेर्गेइंच्या पदरात व्यापाराने खूपच नफा टाकला होता. कारण तीन एक वर्षात त्यानी धान्य वर उचलणारे यंत्र सुरु केले. पहिली बायको वारल्या नंतर दुसऱ्या वर्षी वाफेवर चालणारी पिठाची गिरणी बांधावयाचे काम त्यांनी सुरु केले

तकतकीत काळ्या केसांचे तोकडे आवरण असलेल्या आपल्या काळगेल्या मुठीने त्यांनी तातारस्की आणि आसपासच्या खेड्याना पिळून काढले सेर्गेइ मोखोवचे देणे नाही असे एकही घर नव्हते.

नारिंगी चौकटीच्या हिरव्या कागदाच्या पट्टीवर लिहिलेले असायचे— ‘कापणीयंत्र अमुक अमुक माणसाला उधारीवर दिलेले आहे.’ फलाण्याच्या मुलीला नवऱ्या मुलीचा पोशाख उधार दिलेला आहे. (‘पोरीचं लग्न करायची वेळ आल्येय. गव्हाची किमत तर पारामोनोवो धान्य उचलणाऱ्या यंत्राने घटल्येय. मोखोव, लिहून ठेवा माझ्या खात्यावर.’)

हे असे चालले होते.

गिरणीत नऊ माणसे कामाला होती. दुकानात सात नोकर होते. चार गडी होते. म्हणजे एकूण वीस पोटे ह्या व्यापाऱ्याच्या खुषीवर अवलंबून होती.

पहिल्या बायकोपासून त्यांना दोन मुले झाली होती. लीझा ही मुलगी आणि तिच्यापेक्षा दोन वर्षांनी धाकटा ब्लादिमीर. हा जडभरत आणि गंडमाळा झालेला होता.

त्यांची दुसरी बायको आना ही नाकेली आणि निपुत्रिक होती. तिचे वेळावलेले मातृप्रेम आणि साठलेले पित्त (चौतिसाव्या वर्षापर्यंत तिचे लग्न झाले नव्हते) ही दोन्हीही त्या मुलावर कोसळली होती. सावत्र आईच्या चिडचिड्या स्वभावाचा मुलांवर वाईट परिणाम झाला होता. आचारी पाणके किंवा मोतद्दाराकडे देत होता त्याहून वेगळे लक्ष त्यांचा बाप त्यांच्याकडे पुरवीत नव्हता. त्यांचा सगळा वेळ धंद्याच्या उलाढालीत जायचा. मॉस्को, निझ्यनी उऱ्यूपिन्स्काया किंवा गावोगावच्या जत्रांतून त्याला फिरावे लागे. तेव्हा मुलांवर कुणाचा दाबच राहिला नाही. त्यांच्या निर्बूज बायकोने बालमनांचा थांग

लावण्याचा कधी प्रयत्नच केला नाही. प्रचंड घरकामात तिचा सारा वेळ जात असे. आणि हे भाऊबहीण एकमेकाशी फटकून राहिले. एकमेकाचा एकमेकांशी जणू काही संबंध नसल्यासारखे त्यांचे स्वभाव भिन्नभिन्न झाले. व्लादिमीर घुम्या, आळशी, भेदरट नजरेचा आणि पोरवयाला विशोभित असा गंभीर होता. लीझाचा वावर मोलकरणी आणि सैपाकणींत होता. (ही एक दुराचारी आणि बारा गावचे पाणी प्यालेली होती) तेव्हा आयुष्याची ही काळी बाजू लिझाच्या नजरेला येऊ नये इतक्या लौकर आली. ह्या बायांनी तिचे विकृत कुतुहल जागृत केले होते. त्यामुळे अद्याप अंग न धरलेली लाजरी किशोरी असूनही स्वैरमनाला अडपते दडपते कुणी नसल्याने रानोमाळ उगवणाऱ्या जंगली फुलाप्रमाणे ती बेफाट झाली होती.

काळ संथ गतीने पुढे जात होता. म्हातारे जास्तच पिकत होते. तरुणाना पालवी फुटत होती.

एक दिवस संध्याकाळी चहा घेता घेता मेजाजवळ बसलेल्या आपल्या मुलीला पाहून सेर्गेइ प्लातोनोविच दचकले. शाळा नुक्तीच पुरी केलेली लिझा नाजुक देखणी तरुणी दिसत होती. त्यांनी तिच्याकडे पाहिले आणि त्यांच्या हातातील निखाररंगी चहाने भरलेली बशी थरथरली. किती ती आपल्या आईच्या वळणार गेली होती ! बापरे, अगदी तिचीच प्रतिमा !

'लीझा, मान जरा बाजूला वळव बघू !'

आपली मुलगी किती विलक्षण तिच्या आईसारखी आहे ते पूर्वी त्याच्या लक्षात आले नव्हते.

बसक्या छातीचा, रोगट, पिवळा व्लादिमीर मोखोव पाचवीत होता. गिरणीच्या आवारातून तो चालला होता. तो आणि त्याची बहीण उन्हाळ्याच्या सुट्टीत नुक्तेच घरी आले होते नेहमीप्रमाणे तो गिरणी बघायला गेला होता.

अंगावर पीठ उडालेल्या लोकात तो हिंडत होता. दातेरी चाक, रुळाची अखंड धडधड आणि गरगरणाऱ्या पट्ट्याचे सित्कार तो ऐकत होता.

'मालकांचा वारस—' कझाक गिऱ्हाईकांची आदबशीर कुजबुज ऐकून त्याला फुशारकी चढत होती.

सगळ्या आवाडभर उभ्या असलेल्या गाड्या आणि शेणाचे ढीग ह्यांच्या पाखळातून निगूतपणे वाट काढीत व्लादिमीर फाटकाशी पोहोचला. नंतर त्याला आठवले की आपण इंजिनाची खोली बघायला गेलो नाही. तसा तो परत फिरला.

इंजिनाच्या खोलीच्या दारापाशी लाल रंगाची तेलाची टाकी होती.

गिरणीतील गडी तिमाफेइ, 'गुड्डू' ह्या टोपण नावाने ओळखला जाणारा टांगडी-वाला आणि पांढऱ्याशुभ्र दातांचा, तिमाफेइचा तरुण मदतनीस दाविद हे तिघेजण आपल्या तुमानी वर गुंडाळून अनवाणी पायाने चिखलाचे एक भले मोठे रिंगण त्या टाकीजवळ तुडवीत होते.

'अरे ! मालक !' टांगडीवाल्याने त्याचे स्वागत केले.

'नमस्ते.'

'व्लादिमीर सेर्गेइविच् नमस्ते !'

'काय करताय तुम्ही ?'

'चिखल मळतोय.' नाखुषीने हसत आणि शेणाचा वास येणाऱ्या त्या रेंद्यारेपातून तंगडी वर खेचीत दाविदने उत्तर दिले. 'तुझ्या बापाच्या हातून रुबल सुटत नाही ! तेव्हा ह्या कामाला तो बाई लावायचा नाही ! तुझा बाप मख्खी-चूस आहे !' असे वर बोलून तो पायाने रप्रप् आवाज करू लागला.

व्लादिमीर चूर होऊन गेला. सदा हसतमुख दाविद, त्याचा घृणास्पद सूर ह्याबद्दलच नव्हे तर त्याच्या पांढऱ्या शुभ्र दातांबद्दलही त्याला जबरदस्त तिटकारा वाटू लागला.

'मख्खिचूस'चा अर्थ काय ?'

'अती हलकट आहे तो ! पैशाला लागलं अगलं तर स्वतःचं शेण खायला सोडायचा नाही तो !' दाविदने हसत हसत त्याला समजावून सांगितला.

इतरांनी खिदळून त्याला साथ दिली.

तो पाणउतारा व्लादिमीरच्या वर्मी झोंबला. थंडपणे दाविदकडे बघत त्याने विचारले.

'म्हणजे तू... तू नाखूष आहेस ?'

'ह्या राडीत ये न् मळायला लाग. म्हणजे तुझं तुलाच कळेल ! कोणता चूत्या खूष होईल ? तुझ्या बापाला सांगितलं पाहिजे हे काम ! दोंद झडेल जरा त्याचं !' दाविदने उत्तर दिले. चिखलाचे रिंगण तो घसाघसा तुडवू लागला आणि मिस्कीलपणे हंसू लागला.

ह्याला कोणते खरखरीत उत्तर द्यावे ह्याचा मनात मांडे शिजवीत व्लादि-मीरने विचार केला.

जरा वेळाने तो म्हणाला,

'ठीकाय ! पपांना सांगतो की तू तुझ्या कामावर खूष नाहीस म्हणून !'

तिरप्या नजरेने त्याने त्या माणसाकडे पाहिले. आपल्या बोलण्याचा प्रभाव बघून तो दचकला. दाविदचे ओठ ओढूनताणून आणलेल्या स्मिताने वेडेवाकडे झाले. इतरांचे चेहरे काळवंडून गेले. क्षणभर ते तिघेही निमूटपणे चिखल तुडवू लागले.

मग आपल्या चिखलाळ पायांवरून नजर बळेच काढून घेत दाविद गोडी-गुलाबीच्या ओशाळचा आवाजात म्हणाला,

'मी आपली मस्करी करीत होतो, वलोद्या !' मी थट्टेनं म्हणालो.

'तू काय म्हणालास तें मी पपाना सांगतो.'

स्वतःचा आणि वडिलांचा अपमान आणि दाविदचे केविलवाणे हसू पाहून घायाळ झालेल्या व्लादिमीरच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले आणि तो तिथून चालता झाला.

'वलोद्या ! व्लादिमीर सेर्गिएविच !'

भयभीत होऊन दाविद त्याला हाका मारू लागला. चिखलातून त्याने बाहेर पाय टाकला तशी त्याची तुमान त्याच्या चिखलाने लडबडलेल्या पायावर ओघळली.

व्लादिमीर थबकला.

धापा टाकीत दाविद त्याच्याजवळ आला.

'तुमच्या पपाना सांगू नका ! मला मूर्खाला माफ करा. देवाशपथ सांगतो. मी फक्त तुमची थट्टा केली.'

'बरं बरं ! नाही सांगणार.' व्लादिमीरने शहाजोगपणा दाखवीत उत्तर दिले आणि तो फाटकाकडे निघून गेला. दाविदबद्दलची दयेची भावना वरचढ ठरली होती.

डोक्यावरचा भार उतरल्यासारखा तो पांढऱ्या कुपाटीच्या कडेने चालला होता. गिरणीच्या आवारातील एका कोपऱ्यात असणाऱ्या लोहारसाळेतून घण घातल्याचे मजेदार आवाज येत होते. लोखंडावर घातलेल्या घावाचा हलका आणि अस्फुट आवाज येत होता. तर त्याच्या मागोमाग ऐरणीवर ठण्‌कन् पडलेला घणघणता ध्वनी येत होता.

'असं का म्हणालास ?'

'गुड्डू'चा खर्जातील आवाज त्याच्या कानावर आला.

'शेण ढवळू नको म्हणजे घाण नाही येणार !'

' सुव्वर ! व्लादिमीर चिडून स्वतःशी म्हणाला. ' उलट उत्तर करतो काय ? पपाना सांगू का नको ?'

त्याने मागे मुरडून पाहिले.

दाविदच्या चेहऱ्यावर ते अक्षयी हास्य झळकत होते.

' मी सांगणार ' व्लादिमीरने निश्चय केला.

दुकानाच्या बाहेर एका खांबाला एक घोडा आणि गाडी बांधून ठेवली होती. बंबखान्याच्या छपरावर किलकिलत्या चिमण्यांचा उदी ढग आला होता. पोरे त्यांचा पाठलाग करीत होती.

वराड्यातून बोयारिशकिन ह्या विद्यार्थ्याचा खणखणीत सुरेल आणि दुसऱ्या कुणाचा तरी कर्कश आवाज येत होते.

व्लादिमीर घराच्या पायऱ्या चढून गेला.

पडवी आणि वरांड्यांत फोफावलेल्या जंगली द्राक्षाची वेलपत्ती सरसळत होती. किरवलेल्या आणि निळ्या रंगाने रंगवलेल्या पागोळ्यातून त्यांचे फुलारलेले घोस लटकत होते.

बोयारिशकिन आपले तासलेले हिरवट मस्तक घुसळीत बालन्दा गुरुजींना काही तरी सांगत होता. तरुण पण दाढीबिढी राखलेले बालान्दा गुरुजी त्याच्या समोर बसले होते.

' ' मी श्रमणाऱ्या कझाकाचा मुलगा आहे. तेव्हा साहजिकच सगळ्या मिरासदार वर्गाचा मला तिटकारा आहे. पण त्याचं लिखाण वाचलं की समाजाच्या ह्या मरणोन्मुख विभागाबद्दल मला किती तीव्र अनुकंपा वाटते त्याची तुम्हाला कल्पना नाही. मी मनोमनी जवळजवळ सरदार किंवा जमीनदारच बनतो. त्याना आदर्श वाटणाऱ्या स्त्रीचा मी तल्लीनतेने अभ्यास करतो· त्यांचे लागेबांधे अक्षरशः माझ्या मनाला भिडतात. कमाल आहे ! हो हो मित्रा ! प्रतिभा काय करू शकते ह्याचं हे उदाहरण आहे. तुमचा पंथही ती बदलून टाकू शकते !'

ओठांवर कुत्सित स्मित खेळवीत बालान्दा गुरुजी आपल्या कमरबंदाच्या रेशमी गोंड्याशी खेळत, सदऱ्याच्या काठावरचा लाल कशिदा निरखीत होते.

लिझा आरामखुर्चीवर पहुडली होती. त्या संभाषणात तिला काडीचा रस वाटत नसल्याचे उघड दिसत होते. सदैव काहीतरी हरपलेले शोधणारी तिची नजर शून्यपणे बोयारिशकिनच्या वस्तऱ्याने खरवडलेल्या निळसर मस्तकावर खिळून राहिली होती.

त्यांना अभिवादन करुन व्लादिमीर आपल्या वडिलांच्या खाजगी खोलीकडे गेला. त्याने दारावर टकटक केले.

सेर्गेइ प्लातोनोविच शीतल कातडी कोचावर बसून ' रुस्कोयो बगातस्त्वो 'च्या जूनच्या अंकाची पाने चाळीत होते. हाडांपासून बनवलेला, कागद कापण्याचा एक पिवळा चाकू त्यांच्या पायाशी पडला होता.

' काय रे, काय आहे ?'

व्लादिमीरने खांद्यांना किंचित पोक काढले आणि आपल्या सदऱ्याच्या चुण्या सारख्या केल्या.

' मी गिरणीतून येत होतो !'

व्लादिमीर सांगतांना चाचरु लागला. पण तेवढ्यात दाविदचे तळपते स्मित त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहिले. टसरच्या जाकिटातून दिसणाऱ्या वडिलांच्या सुटलेल्या पोटाकडे बघत तो सांगू लागला.

' गिरणीतला गडी दाविद म्हणत होता !'

आपल्या मुलाचे म्हणणे सेर्गेइ प्लातोनोविचनी लक्षपूर्वक ऐकून घेतले आणि ते म्हणाले.

' त्याला मी गचांडी देतो ! तू जा !'

मग खाली पडलेला कागद कापायचा चाकू उचलण्यासाठी ते कुंथत वाकले.

खेड्यातील बुद्धिजीवी संध्याकाळी सेर्गेइ प्लातोनोविच मोखोव ह्यांच्या घरी जमत. ह्यात ' मॉस्को तांत्रिक विद्यालया 'त शिकणारा बोयरिशकिन होता. शिष्टपणाची आणि क्षयाची कसर लागलेले बालांदा हे जरत्कारू गुरुजी होते. बालान्दांच्याच घरात राहणारी मार्फा ही मास्तरीणही ह्यात असे. ह्या बांधेसूद मुलीचा पेटीकोट नेहमी असभ्यपणे बाहेर दिसायचा. तिचे वय जसे काही कधी वाढतच नसे. ह्या मंडळीत एक पोस्टमास्तर होते. ह्या कुबट ब्रह्मचाऱ्याच्या अंगाला नेहमी पोष्टातील लाखेचा आणि सवंग अत्तराचा दर्प मारत असे. येवद्येनी लिस्तनिस्तस्की हा तरुण लेफ्टनंट आपल्या बापाच्या वाडीहून घोड्यावर बसून इथे यायचा. वरांड्यांत चहा पीत आणि शिळोप्याच्या गप्पा मारीत ही मंडळी बसत. गप्पा मंदावल्या की कुणीतरी पाहुणा उठून यजमानाचा जडावकाम केलेला उंची ग्रामोफोन सुरु करीत असे.

सटीसामाशी, मोठ्या सणासुदीच्या दिवशी सेर्गेइ प्लातोनोविचना हुक्की येई की भपका दाखवून लोकांचे डोळे दिपवून टाकावेत. मग ते पाहुणेमंडळीना

पाचारण करीत. उंची मद्य, ह्या प्रसंगासाठी खास बाताइस्कहून मागवलेली ताजी गाभोळी, उत्तमोत्तम मिष्टान्न ह्यांची चमचमीत मेजवानी ते पाहुण्यांना देत. एरवी ते अत्यंत कद्रूपणे राहत एकच गोष्ट अशी होती की जिथे त्यानी कोणतेही आत्मसंयमन कधीही पाळले नाही. ती गोष्ट म्हणजे ग्रंथखरेदी ! वाचनाची त्यांना हौस होती. स्वतःच्या बुद्धीने कोणत्याही गोष्टीचा तळ गाठणे त्यांना आवडे. त्यांची बुद्धीही तेडाच्या वनस्पतीसारखी चिवट होती.

येमिल्यान कॉनस्तन् तिनोविच हे त्यांचे भागीदार होते. हा पिकल्या केसांचा, टोकदार दाढीचा, आणि गजनेत्री माणूस मोखोवच्या घरी क्वचितच येत असे. एकेकाळी जोगीण असलेल्या बाईशी त्यांनी लग्न केले होते. पंधरा वर्षात त्यांना तिच्यापासून आठ मुले झाली ते बहुतेक वेळ घरीच असत. फलटणीचा कारकून म्हणून त्यानी सुरुवात केली होती. तिथे त्यांच्या अंगी मुरलेला ओशट हाजीहाजी खोरपणा आणि खुशामतखोरी ह्यांचा गुण त्यांच्या सगळ्या कुटुंबाला लागला होता. ते घरात असले की मुले चौड्यांवर वावरत आणि खालच्या आवाजात कुजबुजत. रोज सकाळी हात पाय तोंड धुऊन झाले की जेवणाच्या खोलीतील प्रचंड घड्याळाच्या लटकत्या काळ्या शवपेटीखाली ही समस्त मुले रांगेने उभी रहायची. त्यांची आई त्यांच्या पाठीशी उभी राहायची झोपण्याच्या खोलीतून कोरड्या खोकल्याचा आवाज ऐकू आला रे आला की, ते बेसूर आवाजात 'आमुचा पिता' आणि इतर तत्सम प्रार्थना म्हणू लागत.

. येमिल्यान कॉनस्तन्‌तिनोविच कपडे करून शयनागारातून बाहेर पडत. तो पर्यंत प्रार्थना आटोपलेल्या असत. आपले डुचके डोळे आकुंचित करीत एखाद्या 'बिशप' प्रमाणे ते आपला थुलथुलीत हात पुढे करीत. ह्या हाताचा मुका, घेण्यासाठी मुले क्रमवार पुढे येत. मग येमिल्यान कॉनस्तन्‌तिनोविच आपल्या कलत्राच्या गालाचा मुका घेऊन बोबड्या आवाजात आणि चमच्यातील 'च' सारखा 'च' ह्या अक्षरावर आघात देत विचारीत,

'पोलीच्का, चहा झाला का ?'

'झालाय, येमिल्यान कॉनस्तन्‌तिनोविच !'

'कडक चहा दे !'

ते दुकानाचे दिवाणजी होते. शिरोभागी ठसठशीत अक्षरात, 'जमा' आणि 'खर्च' असे लिहिलेली पाने ते आपल्या सुढाळ कारकुनी वळणाच्या अक्षरानी भरून काढीत. त्यांना चष्मा लागलेला नव्हता. तरीसुद्धा सोनेरी फ्रेमच्या एक

भिंगाने आपले पसरट नाक सुशोभित करून ते ' वायदे–बाजार समाचार ' वाचीत.

हाताखालच्या नोकरांना ते आदबीने वागवीत.

' इवान पेत्रोविच, गिऱ्हाइकांना ' ताडरिडा कॅलिको ' दाखवा बरं कृपा करून '

त्यांची बायको त्याना ' येमिल्यान कॉनस्तन्तिनोविच ' म्हणायची. मुले ' पपा ' म्हणायची आणि दुकानातील नोकरचाकर त्यांना ' गोडबोले ' म्हणून हाक मारीत.

' फादर ' विस्सारिओन आणि ' होली फादर ' पानक्राती ह्या दोन ग्राम-पुरोहितांचे आणि सेर्गेइ प्लातोनोविचचे बरे नव्हते. त्यांचा जुना बखेडा होता. ह्या पुरोहितांचे परस्परांशीही बरे नव्हते. तुसडा आणि पाताळयंत्री असलेला फादर पानक्राती आपल्या शेजाऱ्याना गोत्यात आणण्यात निष्णात होता. उपदंशाच्या विकाराने फादर विस्सारिओनचा आवाज गेंगाणा होऊन गेला होता. हा आवाज त्याच्या मनमिळाऊ स्वभावाबद्दल गैरसमज निर्माण करीत असे. एका यूक्रेनी माणसाच्या घरात तो रहात असे. फादर पान्क्रातीच्या कमालीच्या अहंमन्य आणि कुटील स्वभावामुळे फादर विस्सारिओनला त्याच्याबद्दल मुळीच आपुलकी नव्हती. त्याच्याशी तो आपला फटकून राहायचा.

बालान्दा गुरुजी सोडून प्रत्येकाचे स्वतःचे घर होते. दर्शनी भागी जोडपट्टी बसविलेले निळ्या रंगाचे मोखोवचे मोठे थोरले घर चौकात होते. समोरच म्हणजे चौकाच्या मध्यभागी त्यांच्या दुकानाची बैठी इमारत होती. दुकानाला काचेचा दरवाजा होता. अक्षरांचा रंग उडालेली पाटी दुकानावर लावलेली होती.

' सि. ग्ल. मोखोव आणि ई. को. अत्योपिन ह्यांचे भांडार '

दुकानाला लागूनच लांबलचक, ठेंगणे, तळघर असलेले मांगरघर होते. पुढे शंभर एक पावलांवर गिरिजाघराच्या चौपेटयाची विटांची भिंत आणि खुद्द गिरिजाघर होते. गिरिजाघराचा घुमट पिकलेल्या हिरव्या कांद्यासारखा दिसत होता. गिरिजाघराच्या पलीकडे शाळेच्या, सफेदा दिलेल्या करड्या सरकारी भिंती होत्या आणि दोन टुमदार घरे होती. ह्यातील निळे, कुंपणाला निळा रंग दिलेले घर फादर पान्क्रातीचें होतें दुसरें (साम्य टाळण्यासाठी) उदी रंगाचे, कोरवलेल्या कुंपणाचे, रुंद सज्जा असलेले घर फादर विस्सारिओनचे होते. ह्यानंतर आतियोपिनचे चमत्कारिक, अरुंदट दुमजली घर, पोस्ट ऑफिस, कझाकांची झापांची

आणि पत्र्याच्या छपरांची घरे होती. अखेरीस गिरणीची उतरती पिछाडी होती. तिच्या छपरावर गंजलेले पत्र्याचे 'वात कुक्कुट' होते.

खेड्यातील रहिवाशी गज लावलेल्या आणि कड्या–कोयंडे घातलेल्या दुहेरी झडपांच्या आड शेष जगतापासून फटकून राहात. शेजाऱ्यापाजाऱ्याकडे कामानिमित्त येणेजाणे सोडले तर रोज संध्याकाळी माणसे आपापल्या दाराना कड्या घालून घेत. कुत्र्यांच्या साखळ्या काढून त्यांना आवाडात मोकळी सोडीत. गस्तवाल्याचा लाकडी तास वाजला तरच काय तो ह्या निरवतेचा भंग होई !

२.

ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस एक दिवस नदीच्या खालच्या अंगाला मित्का कोरशुनोवची आणि लिझा मोखोवाची गाठ पडली.

पैलतीरावरून नुकतीच वल्हवीत आणलेली होडी तो बांधून ठेवीत होता. एवढ्यात एक छानछुकीने रंगवलेली बरकणी प्रवाहावरून तरंगत येत असलेली त्याच्या दृष्टीला पडली. टेकडीला वळसा घालून पडतोऱ्याकडे ती येत होती. बोयारिशकिन हा विद्यार्थी ती वल्हवीत होता. त्याचे तासलेले मस्तक घामाने चमकत होते आणि कपाळावरच्या शिरा तटतटल्या होत्या.

बरकणीत बसलेल्या लिझाला मित्काने चटकन ओळखले नाही. कारण तिने डोक्यावर घातलेल्या गवती टोपीची सावली तिच्या तोंडावर पडली होती. पिवळ्या जळलिलीचा गुच्छ आपल्या उन्हाने रापलेल्या हातात तिने उराशी कवटाळून धरला होता.

'कोरशुनोव !' मित्काकडे बघून मान हालवीत तिने हाक मारली आणि विचारले,

'मला का फसवलंस ?'

'फसवलं ?'

'आठवतंय ? मासे धरायला मला न्यायचं वचन दिलं होतंस !'

बोयारिशकिनने वल्ह्यावरचे हात सोडून देऊन पाठ ताठ केली. तेथील चुनखडीचा भुगा उधळीत बरकणीने काठात थपकन् आपले नाकाड खुपसले.

'आठवतंय तुला ?' हसत हसत बाहेर उडी मारीत लिझाने विचारले.

'मला वेळ झाला नाही. खूप काम होतं.'

मितका ओशाळून म्हणाला.

ती मुलगी जवळ आली तसा त्याने श्वासच रोखून धरला.

'छे बुवा ! अशक्य आहे !' बोयारिशकिन मधेच म्हणाला. 'दमछाक झाली पुरती, येलिझावेता ! तुझी शक्य झाली ती सर्व सेवा केली ! ह्या भयंकर पाण्यातून आपण केवढं अंतर काटलं कल्पना आहे ? हात फोडाळून गेले माझे ! जरा सुकी माती दे मला.'

बोयारिशकिनने आपला लंबूस अनवाणी पाय रेताड काठावर टेकला. आपल्या चुरगळलेल्या टोपीच्या ढापणाने कपाळावरील घाम पुसला.

त्याला उत्तर न देता लिझा मितकाकडे गेली. तिने पुढे केलेला हात हातात घेऊन त्याने लाजत घाबरत तिच्याशी हस्तांदोलन केले.

'मग कधी जायचं आपण मासे धरायला ?' मान उडवीत, डोळे आकुंचित करीत तिने विचारले.

'उद्या जाऊ या हवं असेल तर ! आमच्याकडची झोडपणी झाल्येय. तेव्हा आता वेळ आहे मला.'

'ह्या खेपेला फसवणार नाहीस ना ?'

'छे छे !'

'लौकर येशील ?'

'पहाटेच !'

'मी वाट बघते'

'मी येतो. नक्की येतो.'

'खिडकी विसरला नाहीस ना ?'

'मी शोधून काढीन.'

'मी बहुतेक लौकरच गावी जाईन. पण त्या आधी मला मासे धरायला जायचंय.'

होडीच्या कुलुपाच्या गंजलेल्या चावीशी मितका निमूटपणे चाळा करीत होता. त्यानें एकदम थेट तिच्या ओठांकडे नजर टाकली.

'लौकर निघणार ना ?' तळव्यावर ठेवलेला शिंपला निरखीत बोयारिशकिनने विचारले.

'एक मिनिट !'

थोडा वेळ ती गप्प होती. नंतर स्वत:शीच हसत तिने विचारले,

'तुमच्या घरी लग्न झालं ना ?'

'हो ! माझ्या बहिणीचं झालं.'

'कुणाला दिली ?'

उत्तराची वाट न पाहता तिने परत गूढसे निसटते स्मित केले. ती म्हणाली,

'ये हं ! येशील ना ?'

मोखोवच्या घरातील वरांड्यांत झोंबले होते तसे तिचे हास्य मितकाला परत खाजखुयलीसारखे डसले.

ती बरकणीकडे जाईपर्यंत तो तिला न्याहाळीत होता.

बोयारिशकिनने धसमुसळेपणाने बरकणी ढकलली आणि वल्हवीत ती दूर नेली. त्याच्या डोक्यावरून पलीकडे नजर टाकीत लिझाने स्मित केले. अजूनही त्या किल्लीशी खेळणाऱ्या मितकाने मान हलवून तिला निरोप दिला.

बरकणी बरीच दूर गेल्यावर बोयारिशकिनने शांतपणे विचारलेला प्रश्न मित्काला ऐकू गेला.

'कोण माणूस आहे हा ?'

'असाच आहे ओळखीचा !'

'दिलाबिलाची बात नाही ना ?'

तिने दिलेले उत्तर धाण्याच्या करकरत्या आवाजात मितकाला ऐकू आले नाही. मागे झुकून बोयारिशकिन हसलेला त्याने पाहिला. पण लिझाचा चेहरा त्याला दिसू शकला नाही. ती त्याला पाठमोरी बसलेली होती. वाऱ्याच्या झुळकेवर हलकेच आंदुळणारी तिच्या हॅटची जांभळी फीत तिच्या अनावृत्त स्कंधाना वितळत्या मृदुलतेने कुरवाळीत होती. ते पाहून मितकाच्या धूसर नजरेला गुदगुल्या झाल्या.

पांगड आणि टांगूल घेऊन क्वचितच मासे धरायला जाणाऱ्या मितकाने त्या दिवशी संध्याकाळी ह्या शिकारीची तयारी कधीं नव्हे अशा उत्साहाने केली. त्याने थोडेसे सरपण फोडले. भाजीच्या ओफाड्यात शेकोटी पेटवून त्यावर गळाला लावण्याचे धान्य उकडले. आकड्या नीट निवडून घेतल्या. कुजलेले टांगूल बदलले.

ही सगळी तयारी पहात असलेला मिखेइ म्हणाला, 'मी येतो तुझ्याबरोबर मितका ! तुला एकट्याला जमणार नाही !'

'जमवीन !'

मिखेईने सुस्कारा टाकला. तो म्हणाला, 'खूप दिवस आपण दोघं गेलो नाही. वीस रत्तली मासा टांगुलाला झटलेला बघायचाय !'

भांड्यातून निघणाऱ्या वाफेच्या लोटात मितकाने कपाळाला आठ्या घालून पाहिले आणि काहीच उत्तर दिले नाही.

त्याचे झाल्यावर तो मागच्या खोलीत गेला. ग्रिशाका आजोबा खिडकीजवळ बसले होते. तांब्याच्या फ्रेमचा चष्मा नाकावर चढवून ते पोथी वाचीत होते.

'आजोबा !' दाराच्या चौकटीला रेलून मितकाने हाक मारली.

चष्म्यातून डोळे वर उचलून म्हातारबुवानी त्याच्याकडे पाहिले.

'आँ ?'

'कोंबड्याच्या पहिल्या बांगेला मला उठव.'

'इतक्या लौकर कुठं जायचंय ?'

'मासे धरायला !'

माशाचे नाव काढले की म्हातारबुवा निरुत्तर होत. पण मितकाच्या कारस्थानाला विरोध म्हणून त्यांनी सबब पुढे केली.

'तुझा बाप म्हणत होता की उद्या अंबाडी बडवली पाहिजे. टेल्याटिकोऱ्या करायला फुरसत नाहीय ! निघाला मारे मासे धरायला !'

मितका दारातून हालला आणि त्याने एक हिकमत लढवली.

'असं का ? ठीकाय तर ! तुला काहीतरी चमचमीत द्यावं म्हणत होतो ! पण आता अंबाडी बडवायची असली तर नाही जात मी !'

'थांब ए ! कुठं निघाला ?' म्हातारबुवा घाबरले. त्यांनी चष्मा काढून हातात घेतला.

'मी सांगतो बरं तुझ्या बापाला ! तू आपला जा कसा ! उद्या बुधवार आहे. चालेल बरं मला थोडी मासळी ! ठीक ठीक ! मी उठवतो तुला ! चल निघ गद्धया ! हसत काय उभा राहिलायस ?'

मध्यरात्रीच एका हाताने लीननची तुमान सावरीत आणि दुसऱ्या हातात कुबडी घट्ट धरून म्हातारबुवा चाचपडत पावलाणावरून खाली उतरले. थरथरत्या 'पांढऱ्या' सावलीसारखे अंगणातून डुलत डुलत कोठीकडे गेले. झोपलेल्या मितकाच्या कुशीत त्यांनी कुबडीने ढोसले. कोठीत ताज्या मळलेल्या धान्याचा वास आणि उंदरांच्या लेंड्यांची घाण ह्यात वावर नसणाऱ्या जागेतील कोळिष्टकांनी गुदमरलेली कुबट हवा मिसळली होती.

धान्याच्या पेटाऱ्याजवळ एका रगावर मितका झोपला होता. ग्रिशाकांनी कुबडीने त्याला ढोसले. पण थोडा वेळ तो उठेचना. प्रथम हळूच डिवचत ते कुजबुजले,

'मितका ! मितका! ए बदमाश !'

पण मितकाने फक्त सुस्कारा टाकला आणि पाय पोटाशी ओढून घेतले.

ग्रिशाका जास्त निष्ठुरपणे मितकाच्या पोटात कुबडीचे टोक खुपसू लागले.

दचकून मितकाने काठीचे टोक पकडले आणि तो ताडकन उठला.

'काय पण झोप आहे ! तुझी झोप म्हणजे कर्मकठीणाय शिंची !' म्हातारबुवा डाफरले.

'हळू आजोबा ! ओरडू नको !' आपले बूट चांचपडीत मितका झोपाळू आवाजात पुटपुटला.

तो चौकाकडे गेला. खेड्यातील कोंबड्याची दुसरी बांग सुरु झाली होती. फादर विस्सारिओनच्या घरावरून जाताना कोंबड्याने कोंबडीच्या खुराड्यात पंख फडफडवून पुरोहित शिरोमणीला साजेशी ठणकून केलेली गर्जना त्याच्या कानावर पडली. सगळ्या कोंबड्यांनी भेदरून केलेला कलकलाटही त्याने ऐकला.

दुकानाच्या पायरीवर रात्रीचा पहारेकरी झोपला होता. आपल्या गळपट्टीच्या लोकरी उबेत त्याने तोंड खुपसले होते.

मितका मोखोवच्या कुंपणापाशी पोचला. कुत्र्यांना चाहूल लागू नये म्हणून आपले मासेमारीचे सामान त्याने खाली ठेवले आणि तो सरपटत पडवीत आला. थंडगार पडलेली लोखंडी कडी काढण्याचा त्याने प्रयत्न केला. दार दरोबस्त बंद केलेले होते. कष्टाने तो वरांड्याच्या कठड्यावर चढून खिडकीपाशी गेला. ती अर्धवट झाकलेली होती. मुलीच्या उबदार, निद्रिस्त शरीराचा गंध आणि अनाकलनीय गोड सुवास त्या अंधाऱ्या फटीतून येत होता.

'लिझावेता सेर्गिएवना !'

आपण फार मोठ्याने हाक मारली असे मितकाला वाटले. 'चुकून मी भलत्याच खिडकीजवळ तर नाही आलो ? समजा इथं मोखोव झोपला असेल तर ! कंबख्तीच आली ! तो बंदुक चालवायचा !'

'लिझावेता सेर्गिएवना ! मासे धरायला येतेस ना ?'

'खिडकी चुकलो तर आपलाच मासा गळाला लागायचा ! त्याच्या मनात आले.

'उठतेस का ?' तो चिडून म्हणाला आणि खिडकीच्या फटीतून त्याने तोंड खुपसले.

'कोण आहे ?' एक हलका भेदरलेला आवाज अंधारातून आला.

'मी आहे ! कोर्शुनोव ! मासे धरायला येतेस ना ?'

'हो हो ! एक मिनिट !'

आत हालचाल झाल्याचा आवाज आला. तिच्या तापलेल्या निजसुस्त्या आवाजातून जसा काही पुदिन्याचा वास येत होता. एक धवल आकृती खोलीत सळसळताना, हलताना मितकाला दिसली.

'थंडीत मासे धरायला जाण्यापेक्षा तिच्याबरोबर झोपायला मजा येईल !' शयनगृहाचा गंध नाकात गेल्याने त्याच्या मनात अस्पष्ट विचार तरळला.

थोडया वेळाने डोक्यावरून पांढरा रुमाल बांधलेला तिचा हसरा चेहरा खिडकीजवळ त्याला दिसला.

'मी खिडकीतून येते. मला हात दे.'

'ये' मितकाने हात दिला आणि तिला उतरायला मदत केली. तिने त्याच्या डोळयात रोखून पाहिले.

'मी वेळ तर नाही लावला ?'

'ठीकाय ! आपण वेळेवर पोचू !'

ती दोघे खाली डॉनकडे गेली. गुलाबी हाताने तिने आपले झोपाळलेले डोळे चोळले.

'अशी गोड झोप लागली होती ! अजून झोपून राहिले असते. आपण भलतेच लौकर निघालो.'

'आपण अगदी नेमके वेळेवर जाऊ !'

चौकापासून खाली नदीकडे जाणाऱ्या पहिल्या गल्लीच्या वाटेने ते गेले. रात्री नदीचे पाणी चढले होते. संध्याकाळी वरच्या तालावर बांधलेली आणि कोरडी करून ठेवलेली होडी आता लाटांवर हेलकावत होती.

'मला बूट काढायला हवेत !' नजरेने होडीपर्यंतचे अंतर मापीत ती सुस्कारा सोडून म्हणाली.

'मी तुला उचलून नेतो !' मितकाने सुचवले.

'नको ! मी बूटच काढून घेते !'

'तुला उचलून नेणं जास्त सोपं आहे !'

'नको नको ! !' तिच्या आवाजात संकोच होता.

आपल्या डाव्या हाताने मितकाने तिच्या जांघांना विळखा घातला. आणि तिला लीलया हातावर उचलून तो पाणी तुडवीत गेला. त्याची दणकट काळगेली मान गच्च पकडून ती खुदुखुदु हसली.

खेड्यातील बायका कपडे धुण्यासाठी वापरीत त्या दगडाला मितका अडखळता ना तर ते निसटते अपघाती चुंबन घडते ना ! तिने धपापत आपले मुख मितकाच्या निबर तडकलेल्या ओठांवर दाबले !

होडीपासून दोन पावलांवर तो थबकला. पाणी त्याच्या बुटांवरून गरगरत झ्रते आणि त्याची पावले थंडगार पडली होती.

होडी सोडवून त्याने ती पाण्यात ढकलली आणि आत उडी घेतली. उभ्या उभ्याच तो वल्हे मारीत होता. वरामीवर पाणी डहुळत, स्फुंदत होते. धार हळू हळू चेपीत होडी पैलतीराच्या दिशेने चालली होती. टांगुल उसळचा घेत होडीच्या तळाशी खडखडत होता.

'कुठं नेतोयस् तू मला ?' पाठीमागे दृष्टी टाकीत तिने विचारले.

'पैल तीराला !'

रेताड काठाला होडीचा कणा घसटला.

अनुमतीची वाट न पाहता त्याने त्या पोरीला हातावर उचलून घेतले. आणि काटेरी झुडुपांच्या गचपानात तो तिला घेऊन गेला. ती त्याच्या तोंडाला चावली. तिने त्याला बोचकारले. एक दोनदा अस्फूट किंकाळी मारली आणि आपली ताकद ओसरत चालल्याचे जाणवून ती संतापाने रडू लागली. मात्र तिच्या डोळ्यात पाणी नव्हते.

सुमारे नऊ वाजता ते परतले. तांबूस सोनेरी धुक्याने आकाश झाकून टाकले होते.

नदीवर सोसाट्याचा वारा नाचत होता. त्यामुळे लाटा पिंजत होत्या. होडी वाकड्या लाटांवर नाचत होती. थंडगार फेसाचे शितोडे लिझाच्या विवर्ण चेहऱ्यावर फवारले होते. तिच्या पापण्याना आणि वेण्याना चिकटले होते. गळून जाऊन तिने आपले शून्य डोळे मिटून घेतले. उडून होडीत आलेले एक फूल ती बोटानीं चुरगाळीत होती. तिच्याकडे न बघता मितका वल्हवीत होता. एक लहानसा कार्प आणि डायणासारखा मासा हे डोळे वटारून त्याच्या पायाशी पडले होते. त्यांच्यी तोंडे शेवटचे आचके देत होती. मितकाच्या चेहऱ्यावर अपराधीपणा समाधान आणि चिंतेचे मिश्रण झाले होते.

'सिम्योनोव पायउताराशी तुला सोडतो, तुला ते जवळ पडेल ! असे तिला सांगून त्याने होडी धारेत घातली.

'चालेल !' ती पुटपुटली.

निर्मनुष्य काठावर भाजीच्या ओफांड्याभोवती काट्यांच्या वई होत्या. त्यावर धुळीची पुटे बसली होती. जाळलेल्या झाडाझुडपांच्या वासाने आसमंत भरून टाकणाऱ्या वाऱ्याच्या झकारा आल्या की त्या वई करकरत होत्या. चिमण्यांनी टोचे मारलेली सूर्यफुलांची भारावलेली, परिपक्क बोंडे खाली झुकली होती आणि त्यांची पुंजकेदार बीजे भूमीवर विखुरली होती. दुसऱ्या फुटव्याच्या नव्हाळीने कुरणरान हिरवेकंच झाले होते. दूरवर शिंगरे हुंदडत होती. त्यांच्या गळ्यात बांधलेल्या घुंगरांच्या किणकिणाटांचे प्रतिध्वनी दक्षिणेचा तड्यावारा आपल्याबरोबर वाहून नेत होता.

लिझा होडीतून बाहेर पडत असताना मितकाने एक मासा उचलून तो तिच्यापुढे धरीत म्हटले, 'हा मासा घे !'

भयाने तिच्या पापण्या फडफडल्या. पण तो मासा तिने घेतला.

'जाते मी !'

'ठीक !'

माशाच्या कल्ल्यातून मितकाने डहाळी खुपसली होती. ती हातात धरून लिझा खिन्नपणे निघाली. तिचा आत्मविश्वास आणि अवखळपणा विरून गेला होता. त्याना काटेरो गचपानात ठेवून ती आली होती.

'लिझा !'

ती मागे वळली.

आश्चर्याने आणि चिडून तिने भुवया उंचावल्या.

'एक मिनिट इकडं ये !'

ती जवळ आली तसा स्वत:च्याच अवघडलेपणाने त्रासल्यासारखा तो म्हणाला,

'आपण थोडा निष्काळजीपणा केलाय ! तुझ्या झग्यावर मागच्या बाजूला... डाग पडलाय ! लहानसाच आहे !'

तिच्या मानेवर, चेहऱ्यावर उष्ण रक्तिमा पसरला. क्षणभर थांबून मितकाने सल्ला दिला,

'मागच्या दारानं जा !'

'काही झालं तरी मला चौकातून जावंच लागेल ! माझा काळा झगा घालण्यासाठी म्हणते मी !' खेदाने आणि अचानक वाटलेल्या द्वेषाने मितकाकडे बघत ती पुटपुटली.

'पान चोळून त्याचा रंग हिरवा करतो !'

मितकाने सहज सुचविले. तिच्या डोळ्यात पाणी आलेले पाहून त्याला आश्चर्य वाटले.

ग्रीष्म ऋतूतील वावटळीप्रमाणे बातमी सबंध खेड्यात पसरली.

'मितका कोर्शुनोव सेर्गेइ प्लातोनोविचच्या मुलीबरोबर रात्रभर बाहेर होता !'

सकाळी खेड्यातील कळपात आपली गुरे हाकून नेताना, आजुबाजूला करडी धूळ गिरक्या घेत्येय–बादल्यातून पाणी झिरपतंय अशा अवस्थेत फापाळ्याच्या टिचभर खोपट्यात उभ्या असताना किंवा नदीवरच्या शिळेवर धुणी बडवताना बायका ह्याबद्दल बोलू लागल्या.

'पोरीची आई मरून गेल्येय !'

'बापाला मिटाची फुरसत नाय ! सावत्र आईचं काय अडलंय ?'

'पहारेकरी सांगत होता. मध्यरात्रीस शेवटच्या खिडकीवर एकजण टकटक करीत होता ! आधी त्याला वाटलं की कुणीतरी घरफोडीच करतोय ! कोणाय ते बघायला 'पोलीस ! पोलीस !' म्हणून ओरडत तो धावत गेला ! बघतो तर मितका !'

'आजकालच्या पोरींनी ..मढी नेली त्यांची–बरीक ताळतंत्र सोडला हो !'

'माझ्या निकिताला मितका म्हणत होता की तो तिच्याशी लग्न करणारै म्हणून !'

'नाक पुसायला शीक म्हणावं आधी !'

'त्यानं बळजोरी केली म्हणे !'

'तुझा विश्वास बसतो असल्या गोष्टींवर–?'

हमरस्त्यावर, गल्लीबोळातून अफवा पसरल्या. स्वच्छ फाटकाला डांबर फासावे तसा त्या मुलीच्या नावाला काळिमा फासला गेला.

अखेरीस मोखोवच्या पिकत चाललेल्या मस्तकावर ह्या अफवा कोसळल्या ते पार भुईसपाट झाले. दोन दिवस ते दुकानातही गेले नाहीत किंवा गिरणीतही गेले नाहीत. खालच्या मजल्यावर राहणारे त्यांचे नोकर त्यांच्याकडे फक्त जेवणाच्या वेळी येत.

तिसऱ्या दिवशी सेर्गेइ प्लातोनोविचनी आपला अंजनी घोडा आपल्या टांग्याला जुंपला आणि वाटेत भेटणाऱ्या कझाकांना लांबून नमस्कार करीत ते खेड्याकडे गेले. टांग्याच्या मागोमाग अत्यंत चकचकीत रोगण लावलेली गाडी येत होती. दुडाण चालीने धावणारे दोन काळ्या रंगाचे घोडे जुंपलेली ही गाडी

तीरासारखी आवाडातून बाहेर पडली. एमिल्यान ह्या मोतद्दाराने लगामाचे निळे रेशीम झटकले, त्याबरोबर ते दोन श्याम वारू रस्त्यावरून उधळू लागले. एमिल्यान पाईप चोखीत होता. त्याच्या पिकत चाललेल्या दाढीला कायम चिकटलेली ती उपाधी होती !

एमिल्यानच्या राकट पाठीमागे फिकटलेल्या चेहऱ्याची एलिझावेता बसलेली दिसत होती. एक लहानशी पेटी तिने गुडघ्यांवर धरली होती. तिच्या चेहऱ्यावर खिन्न स्मित तरळत होते. फाटकापाशी तिने व्लादिमीरकडे आणि आपल्या आईकडे बघून हातमोजा हलविला.

त्याच वेळी पंतिलेय प्रोकोफिएविच लंगडत लंगडत दुकानातून बाहेर पडत होता. तिथल्या निकिता ह्या इस्वाटचाला त्याने थांबून विचारले,

'मालकांची मुलगी कुठं चालल्येय ?'

सामान्य मानवी दुबळिकीच्या पोटी निकिताने उत्तर दिले,

'मॉस्कोला...! अभ्यास करायला !'

दुसऱ्या दिवशी एक चित्तरकथा घडली ! नदीच्या घाटावर, फापाळ्याच्या सावलीत, गुरांचे कळप चरायला हाकारून नेत असताना, बरेच दिवस हा गप्पांचा विषय झाला होता. दिवे लागणीच्या थोडेसे आधी (खेड्याचे कळप कुरण रानातून नुक्तेच परतले होते) मितका सेर्गेइ प्लातोनोविचकडे गेला. कुणाच्या दृष्टीला पडू नये म्हणून संध्याकाळ होईतो तो थांबला होता. कारण सेर्गेइ प्लातोनोविच ह्यांच्या घरी त्याला उगाच जाऊन यायचे म्हणून जायचे नव्हते. मोखोव ह्यांची कन्या एलिझवेताला त्याला मागणी घालायची होती.

जास्त नाही तर किमान चार वेळा तो तिला भेटला होता. शेवटच्या भेटीत त्यांच्या संभाषणाने असे वळण घेतले,

'लिझवेता, तू माझ्याशी लग्न करशील ?'

'हा मूर्खपणा आहे !'

'मी तुझी काळजी घेईन ! तुझ्यावर प्रेम करीन ! आमच्या कामाला गडी-माणसं आहेत तु आपली खिडकीजवळ बसून तुझी पुस्तकं वाचीत रहा !'

'तू मूर्ख आहेस !'

मितकाला वाईट वाटले. तो काही बोलला नाही. त्या दिवशी संध्याकाळी तो लौकर घरी गेला. सकाळी आपल्या वडिलाना त्याने ह्याबद्दल सांगून चकित केले.

'बाबा, माझं लग्न लावून दे !'

‘ काय खूळ का काय ?’

‘ शप्पत बाबा ! चेष्टा नाय करीत !’

‘ घाई झाल्येय काय ? कुणावर भाळलास ?’

‘ त्या यडपट मार्फावर ?’

‘ मध्यस्ताला सेर्गेइ प्लातोनोविचकडे पाठव !’

खोगीराच्या सरंजामाची दुरुस्ती करणाऱ्या मिरोन ग्रिगोरिएविचची कोचीं आणि चातेपोचे काळजीपूर्वक खाली ठेवले आणि ते खदखदा हसत सुटले.

‘ थट्टामस्करी करायची लहर आली काय रे पोरा ?’

पण मितकाने आपला हट्ट सोडला नाही. अडील बैलासारखा तो हटून बसला तेव्हा त्याचे वडील भडकले.

‘ मूर्ख ! सेर्गेइ प्लातोनोविचजवळ लाखाचा विषय आहे ! तो व्यापारी आहे ! तू कोणायस ? चल निघ इथून ! नाहीतर ह्या पट्टयानं चामडी लोळवतो तुझी !’

‘ आपल्याकडं बैलांच्या चौदा जोड्या आहेत ! आपला जमीनजुमला केवढा तरी आहे ! शिवाय तो आहे नांगऱ्या ! आपण आहोत कझाक !’

‘ चल निघ !’ मिरोननी त्याला झटकून टाकले. त्यांना मोठाल्या चर्चा-बिर्चा आवडत नसत.

एकटे त्याचे आजोबाच मितकाला कनवाळू श्रोता भेटले.

मिरोनच्या मुलाची बाजू घेऊन त्यानी त्यांचे मन बळविण्याचा प्रयत्न केला.

‘ मिरोन !’

‘ उं ?’

‘ तुझी काय हरकत आहे ? पोराच्या डोक्यानं एकदा घेतलंय !’

‘ बाबा, तुम्ही म्हणजे . . . ! तुम्हाला म्हातारपणी पोरपण आलंय ! देवाशपथ. मितका एक उल्लू आहे. पण तुम्ही . . . . ’

‘ तोंड सांभाळ !’ ग्रिशाका जमिनीवर कुबडी आपटून ओरडले. ‘ आपण काय त्यांच्या योग्यतेचे नव्हत ? कझाकाचा पोर आपल्या पोरीशी लग्न करतोय हा मान वाटला पाहिजे त्याला ! तो हसत पोरगी देईल ! सगळ्या गावात आपला लौकिक आहे ! आपण काय शेतमजूर नव्हत ! आपण मालक लोक आहोत ! कशाची आडकाठी आहे तुला ? देऊ दे त्याला त्याची गिरणी हुंडा म्हणून !’

'हूं: !' असे करून आणि नाकपुड्या फुलवून मिरोन ग्रिगोरोविच अंगणात चालते झाले. तेव्हा मितकाने ठरवले की संध्याकाळपर्यंत थांबून आपण स्वतःच मोखोवकडे जावे. आपल्या वडिलांचा हट्टीपणा बद्धमूल एलम वृक्षासारखा आहे हे त्याला ठाऊक होते. एलमचे झाड वाकवता येतें. मोडता येत नाही. त्या प्रयत्नात काही अर्थ नव्हता.

शीळ वाजवीत तो मोखोवच्या फाटकापर्यंत गेला खरा पण मग तो भेदरुन गेला. क्षणभर तो गांगरला. पण अखेरीस आवाडातून बाजूच्या दरवाजापाशी गेला. कडक इस्त्रीचा, तुडतुडीत आवाज करणारा एप्रन घातलेल्या मोलकरणीला त्याने पायऱ्यांवरून विचारले, 'मालक घरी आहेत का ?'

'चहा घेतायत ! थांब जरा !'

मितका वाट बघत बसला. चुट्टा पेटवून धूर सोडू लागला. मग बोटावर थुका घेऊन त्याने चुट्टाचे थोटुक विझवले. आणि तें पायाखाली चुरगाळले.

आपल्या जाकिटावर उडालेले कण झटकीत मोखोव बाहेर आले. मितकाला पाहून त्यांच्या कपाळाला आठ्या पडल्या. पण ते म्हणाले,

'आत या.'

मितकाने मोखोवच्या शीतळ खाजगी दालनात प्रवेश केला. त्या दालनाला पुस्तकांचा आणि तंबाखूचा वास येत होता. आतापर्यंत आपल्याला भारून टाकणारे धैर्य शेटजींच्या उंबरठ्यापर्यंत पुरणारे होते असे त्याला जाणवले.

शेटजी मेजापर्यंत गेले आणि टाचेवर गर्रकन् वळून त्यानी विचारले,

'काय आहे ?' त्यांच्या पाठीमागे बांधलेल्या हाताची बोटे मेजावर खरवडत होती.

'मी असं विचारायला आलो होतो—!'

मोखोवच्या भेदक नजरेच्या थंडगार गाळात मितकाचे पाय फसल्यासारखे झाले. तो थरारून गेला.

'लिझावेता मला देता का ?'

निराशा, संताप, भय ह्या संमिश्र भावनांनी अवर्षण काळातील दहिवरासारखा घामाचा बारीक शिरवा त्याच्या चेहऱ्यावर तरारून आला.

मोखोवची डावी भ्रुकुटी थरथरली. वरचा ओठ मागे मुरडला जाऊन त्यांच्या लाल हिरड्या दिसू लागल्या. आपली मान उंचावून सबंध देह त्यानी पुढे झुकवला.

'काय ? काऽऽय ? बदमाश ! चालता हो ! अतामनपुढे खेचतो तुला रांडिच्या !'

ह्या आरडचा-ओरडचाने धीर घेऊन मितकाने मोखोवच्या गालावरून उसळून आलेल्या करडचा निळचा रक्तच्छटा न्याहाळून घेतल्या.

'रागावू नका ! पण मी जे केलंय त्याची भरपाई मला करायची होती !'

आपले लालभडक डोळे गरगर फिरवीत मोखोवनी एक दणदणीत लोखंडी रक्षापात्र मितकाच्या पायापाशी फेकले. उसळी घेऊन ते मितकाच्या गुडघ्यावर आपटले. पण त्याने निर्विकारपणे त्या वेदना सहन केल्या. त्याने धाडकन् दार उघडले आणि दात विचकीत तो चिडून आणि कळवळून ओरडला,

'जशी तुमची मर्जी ! ! सेर्गेइ प्लातोनोविच ! जशी तुमची मर्जी ! ! पण मी मनापासून विचारलं— कोण आता तिला पत्करणारै ? तिच्या बेअब्रूवर पडदा पाडायची माझी इच्छा होती ! पण आता ! उष्टचा हाडकाला कुत्रंदिखील तोंड नाय लावायचं !'

चुरगळलेला हातरुमाल ओठावर दाबून मोखोव मितकाच्या पाठोपाठ आले. मुख्य दरवाजाकडे जाणारा मार्ग त्यांनी रोखला. पण मितका आवाडात पळाला. इथे मालकाने मोतद्दार एमिल्यानला डोळा घालायचीच खोटी होती.

मितका फाटकाच्या भल्याभक्कम कोंबडचाशी झटू लागला.

मोकळे सोडलेले चार शिकारी कुत्री कोठीघराच्या कोपऱ्याशी तयारच होती.

नवखा मनुष्य पाहिल्या बरोबर त्या स्वच्छ आवाडातून त्यानी थेट त्याच्याकडे झपा घेतल्या...

इ. स. १९१० साली निझ्यनी नोवगोरदच्या जत्रेतून सेर्गेइ प्लातोनोविचनी काळचा कुरळचा केसांच्या कुत्र्यांच्या पिल्लांची जोडी आणली होती. त्यात एक कुत्रा आणि एक कुत्री होती. ती काळी कुरळचा केसांची, रुंद जबडचाची पिल्ले वर्षभरात वासराच्या उंचीएवढी उफाडली.

मोखोवच्या आवाडातून जाणाऱ्या बायकांच्या झग्याला ती आधी खेचीत नंतर अशा बायाना जमिनीवर लोळवायला आणि पायांचे लचके घ्यायला ती शिकली. फादर पानक्रातीचे वासरू आणि अत्योपीनची दोन डुकरे जेव्हां त्यानी ठार मारली तेव्हा मात्र प्लातोनोविचनी त्यांच्या गळचात साखळचा घालण्याचा हुकूम दिला.

आता फक्त रात्री ही कुत्री मोकळी सोडण्यात येत असत. वसंत ऋतूत काद्या जोडिदारणीच्या मागे त्याना जाऊ देण्यात येत असे.

मितका वळायच्या आत बयान नावाच्या सर्वात पुढे असणाऱ्या कुत्र्याने त्याच्या खांद्यावर झेप घेऊन त्याच्या जाकिटात दात घुसविले होते. लवलवणारी चार जनावरे त्याला चावीत आणि फाडीत होती. मितका त्याना दूर लोटण्याचा आणि तोल सावरण्याचा प्रयत्न करीत होता. एमिल्यान त्याच्या दृष्टीला पडला. त्याच्या तोंडातील पाईपमधून ठिणग्या उडत होत्या. तो सायवानात जाऊन अदृश्य झाला. त्याने धाडकन दार लावून घेतल्याचे मितकाने ऐकले.

पायऱ्यावर सांडपाण्याच्या नळाला रेलून सेर्गेइ प्लातोनोविच उभे होते. त्यांच्या केसाळ गोऱ्या मुठी आवळलेल्या होत्या. झोकांड्या खात लटपटत मितकाने धडाके देऊन फाटक उघडले. दात विचकून फुत्कारणाऱ्या कुत्र्यांचे लटांबर त्याच्या रक्ताळलेल्या पायाला फरफटत आले. एकाचा गळा त्याने करकचून आवळला. दारावरून जाणाऱ्या कझाकानी इतराना पिटाळून लावले !

३.

मेलेखोव मंडळीत नतालिया मिसळून गेली. तिचे वडील श्रीमंत होते आणि घरात नोकर माणसे होती तरी मुलाना त्यानी कामाची सवय लावलेली होती. कष्टाळू नतालियाने सासूसासऱ्यांची मने जिंकून घेतली. कपड्याची छानछोका करणारी दाऱ्या ही थोरली सून इलिनिचनाला मनातून आवडत नसे. नतालियावर मात्र तिची पहिल्या दिवसापासून मर्जी बसली.

'झोप बेटा झोप ! इतक्या पहाटे कशाला उठलीस ?'

आपल्या दणकट पायावर उभी राहून स्वयंपाकघरात कामाच्या धामधुमीत असलेली इलिनिचना आपुलकीच्या निषेधाने म्हणे, 'जा झोप जा ! मी करते काम एकटी !'

स्वयंपाकघरातील कामात मदत करावी म्हणून पहाटेच उठलेली नतालिया मग चाफेखणीत जाऊन उरलेली झोप काढीत असे.

घरकामाच्या बाबतीत नेहमी कडक असणारा पांतेलेयही आपल्या बायकोली म्हणायचा,

'बरं का ग ! नतालियाला उठवू नको ! आधीच ती अंग मोडून काम करत्येय. आज ग्रिशाबरोबर ती नांगरणी करायला जाणार आहे. पण त्या दाऱ्याला

लगाव चाबुक ! महा आळशी आणि नष्ट बाई आहे ती ! थोबाड काय रंगवते ! भुवया काय काळ्या करते ! रांडिची !'

'पहिलंच वर्ष आहे नतालियाचं ! जाऊ दे जरा आरामात !'

पाठ मोडणारं आपलं संसारी जीवन आठवून इलिनिचना सुस्कारा सोडून म्हणे.

आपल्या नूतन वैवाहिक जीवनात ग्रिगरी रुळत चालला होता, समरस होत होता. पण दोन तीन आठवड्यानंतर त्याला हे जाणवले की आक्सिनियाशी आपण संपूर्णपणे फारकत करून घेऊ शकलो नाही. हे जाणवून त्याला भीती वाटली. तो खट्टू होऊन गेला. काळजात एक शल्य डाचत होते आणि त्या वेदना लवकर संपणाऱ्या नव्हत्या. लग्नाच्या धुंदीत हाताच्या झटक्याने जी भावना झटकून टाकण्याचा त्याने प्रयत्न केला होता. तिची पाळेमुळे खोलपर्यंत रुजलेली होती. आपण विसरू असे त्याला वाटले. पण ती भावना त्याला विसर पडू देत नव्हती. जखम वहातच राहिली. ते एकत्र मळणी करीत असताना लग्नापूर्वीच पेत्रोने त्याला विचारले होते,

'ग्रिशा, पण आक्सिनियाचं काय ?'

'तिचं काय ?'

'तिला झटकून टाकल्याबद्दल तुला खंत नाही वाटणार ?'

'कुणीतरी दुसरा लावील तिला नादी.' ग्रिगरी हसून म्हणाला.

'तुलाच जास्त माहिती म्हणा !' तो चघळीत असलेले मिशीचे टोक चावीत पेत्रो म्हणाला,

'पण तुझ्या संसाराच्या ताटात मात्र माती कालवू नकोस !'

'पिरतीची नव्हाळीही विटते न् देहाची आगही विझते !' ग्रिगरीने थट्टेत उत्तर दिले.

पण तसे झाले नव्हते. आपल्या बायकोला कर्तव्यभावनेने कुरवाळताना आपल्या तारुण्यसुलभ मस्तीने तिला पेटवण्याचा प्रयत्न करताना त्याला तिच्याकडून मिळाला तो फक्त थंडपणा आणि अवघडून गेलेली शरणता. देहाच्या आनंदापासून नतालिया स्वत:ला आकसून घेई. आपल्या आईच्या मंद, प्रतिसाद-शून्यतेच्या वळणावर तिचे रक्त गेले होते. आक्सिनियाची विषयलोलुप उन्मत्तता आठवून ग्रिगरी सुस्कारा सोडायचा.

'तुझ्या बापानं तुला बर्फातून घडवल्येय नतालिया ! अगदीच बर्फाचा गोळा आहेस तू !'

तो भेटला की आक्सिनिया स्मित करायची. तिच्या डोळ्यांच्या भावल्यात जास्तच काळी छटा यायची. ओहळाच्या तळाशी असलेल्या चिखल गाळासारखे तिच्या शब्दांचे लेपाटे बसायचे.

'कसं काय ग्रिशा ? नव्या नवतीचा इष्क कसा काय आहे ?'

'ठीकाय !' ग्रिगरी उडवा उडवीचे उत्तर देई. आणि तिच्या कुरवाळत्या नजरेपासून निसटायला शक्य तेवढ्या लवकर धूम ठोकी.

बायकोबरोबरचे भांडण स्तिपानने मिटवल्याचे उघड दिसत होते. त्याचे गुत्त्यात जाणे कमी झाले होते.

भांडण झाल्यापासून प्रथमच एक दिवस संध्याकाळी मळणीच्या खळ्यात तो धान्य पाखडीत असताना त्याने सुचवले, 'चल गाणं म्हणू या, आक्सिनिया !'

ती दोघे मळलेल्या, धुळकट गव्हाच्या राशीला पाठ देऊन बसली. स्तिपानने एक फौजी गाणे सुरू केले. आपल्या खड्या लोलंगत आवाजात आक्सिनियाने त्याला साथ दिली. आपल्या संसाराच्या सुरवातीला ती म्हणत तसे दोघानी छानपैकी गाणे म्हटले.

मावळत्या सूर्याची किरमिजीकाठी प्रभा पसरली असताना त्यांची गाडी शेतावरून रखडत घरी येत असे. गाडीतील ओझ्यावर बसून स्तिपान एक जुनं गाणं म्हणायचा. उजाड मैदानातून गेलेल्या रानोमाळ आणि निर्मनुष्य रस्त्या-सारखे ते लांबलचक आणि व्याकूळ गाणे असायचे. नवऱ्याच्या छातीच्या उतरत्या वंगडीवर माथा विसावून आक्सिनिया त्याच्या सुरात सूर मिसळवी. करकरणारी गाडी घोडे खेचत असत. जुवाचा दांडा वरखाली वरखाली होत असे. दूरवर खेड्यातील म्हातारी माणसे ह्या गाण्याला कान द्यायची.

'त्या स्तिपानच्या बायकोचा आवाज झकास आहे !'

'वा, वा ! काय छान म्हणत्येय !'

'स्तिपानचाही आवाज काय आहे ! घंटेसारखा खणखणीत !!'

खोपटाभोवती उभारलेल्या अडाळीवर बसून सूर्यास्ताचे धूसर जांभळट रंग निरखणारी म्हातारी माणसे मग रस्त्याच्या अलिकडून पलीकडून त्या गाण्यावर चर्चा करीत.

आस्ताखोव जोडपे म्हणत असलेले गाणे ग्रिगरीच्या कानावर आले. तो मळणी करीत होता. (त्यांच्या मळणीची खळी एकमेकाला लागूनच होती.) त्याने तिकडे नजर टाकली. आक्सिनिया पूर्वीसारखीच ठाशीव होती. सुखात असलेली वाटत होती.

स्तिपानचें मेलेखोव कुटुंबाशी बोलणेचालणे नव्हते. आपल्या मळणीच्या खळ्यावर तो काम करताना त्याचे थोराड उतरते खांदे मागेपुढे होत. मधूनच तो आक्सिनियाची मस्करी करायचा. ती स्मितहास्य करून त्याला उत्तर द्यायची. तिचे डोळे चमकायचे. तिचा हिरवा झगा ग्रिगरीच्या डोळ्यांपुढे सतत भिरभिरायचा. कुठली तरी अज्ञात शक्ती त्याची मान पुन:पुन्हा स्तिपानच्या आवाडाच्या दिशेला वळवीत असे. पांतलेयला मळणीत मदत करताना नतालिया कणसाचे भारे जमिनीवर पसरायची, तेव्हा ग्रिगरीच्या आपोआप वळणाऱ्या 'त्या' प्रत्येक दृष्टीक्षेपाला ती आपल्या तळतळणाऱ्या मत्सरी नजरेने रोखण्याचा प्रयत्न करायची. त्याला हे दिसायचे नाही. मळणीच्या रिंगणावर घोडे धरलेला पेत्रो भावाकडे नाक मुरडून किंचित स्मित करीत बघतोय हेही त्याला दिसायचे नाही.

दगडी रुळाच्या चिरडल्या भाराखाली भूमी कण्हत होती. तो धडधडाट ग्रिगरीच्या कानात घुमत होता. त्याचे मन आतल्याआत काहीतरी चाचपडण्याचा प्रयत्न करीत होते. पण जाणिवेच्या पल्ल्यातून निसटून जाणाऱ्या विचारांचे पदर काही त्याला गवसत नव्हते.

जवळच्या आणि लांबच्या मळणीच्या खळ्यावरून झोडपणीचे आवाज येत होते. हाकारणाऱ्यांच्या गर्जना येत होत्या. आसुडाचे फडत्कार घुमत होते. चाळण्या खडखडत होत्या. अंगावर मणी असणाऱ्या सर्पासारखी सप्टेंबरची ऊब डॉनच्या काठावर पसरली होती. सुगीने पुष्ट झालेलें खेडे त्या उन्हात नहात होते. काटेकुंपण लावलेल्या प्रत्येक परसात, प्रत्येक 'कझाक-घरात' एकमेकापासून वेगळा, विभक्त कडूगोड असा जीवनाचा तुडुंब ओघ वहात होता !

ग्रिशाका आजोबाना पडसे झाले होते. दात दुखत होते. शरमेने लोळागोळा झालेला मोखोव एकांतवासात पंजाने स्वत:ची दाढी उपटीत, डोळ्यातून टिपे काढीत दात ओठ खात होता. स्तिपानच्या मनात ग्रिगरीबद्दलचा द्वेष धुमसत होता. झोपेतल्या झोपेत त्याची लोखंडी बोटे परांची रजई फाडू बघत.

नतालिया धावत नांगर घरात जाऊन गोवऱ्याच्या ढिगात देह लोटून द्यावयाची. थरथरत आणि अंगाचं मुटकुळे करून ती आपल्या सुखाची विटंबना झाल्याने मुसमुसून रडत बसे.

ख्रिस्तोनियाने एक वासरू जत्रेत विकून मिळालेले पैसे दारू पिण्यात उडवून टाकले होते. त्यामुळें त्याच्या मनाला पिराण्या लागून राहिल्या होत्या. अतृप्त तळमळीने आणि वेदनेवरची खपली उडून ग्रिगरी सुस्कारे सोडीत होता. नवऱ्याला कुरवाळणारी आक्सीनिया त्याच्याबद्दल वाटणारा तिटकारा अश्रूत बुडवून टाकीत

होती. दाविदला गिरणीतून डिच्चू मिळाला होता. गाड्यांच्या तबेल्यात 'गुड्डू' बरोबर तो रात्रीच्या रात्री बसून रहायचा. त्याच्या डोळ्यात संताप धगधगून तो म्हणायचा,

'थोडा थांब ! लौकरच त्याच्या मुंड्या पिरगळल्या जाणार आहेत. एका क्रांतीनं त्याचे डोळे उघडलेले नाहीत ! आणखी एक १९०५ होईपर्यंत दम धर ! मग त्याचे हिशेब चुकते करू !'

जखमेचे व्रण असलेले आपले बोट तो दटावल्यासारखा हलवायचा आणि मग खांदे उडवून पाठीवर टाकलेले जाकीट नीट करायचा.

खेड्यात दिवसामागून रात्री येत होत्या. आठवड्यामागून आठवडे लोटत होते. महिने पुढ सरकत होते. टेकड्यावर वारा घोंगावत होता, उद्याच्या वाईट हवेचा इशारा देत होता आणि शरदाचा प्रसन्न नीलिमा ल्यालेला डॉनचा ओघ निर्विकारपणे समुद्राकडे वाहत होता !

४.

आक्टोबर अखेर एका रविवारी फिदोत बोंदोवस्कोव काही कामानिमित्त घोडा गाडीतून खेड्यात गेला होता. बरोबर त्याने माजवलेल्या बदकांच्या चार जोड्या नेल्या होत्या. बाजारात त्या त्याने विकल्या. बायकोसाठी त्याने चिटाचे कापड खरेदी केले आणि तो गाडी घराकडे हाकण्याच्या बेतात होता.. (एक पाय चाकावर ठेवून तो घोड्यांच्या पट्टेकड्या आवळीत होता.) एवढ्यात एक नवखा माणूस त्याच्याजवळ आला. तो त्या मुलखातील नसल्याचे उघडच दिसत होते.

'नमस्ते !' आपल्या उन्हात रापलेल्या हातांचा काळ्या हॅटच्या कडाना स्पर्श करीत त्याने फिदोतला नमस्कार केला.

'नमस्ते !' फिदोत म्हणाला आणि आपले 'काल्मिक' नेत्र आकुंचित करीत तो कुतुहलाने थबकला.

'कुठल्या गावचे ?'

'इथल्याच एका खेड्याचा !'

'कोणतं खेडं ?'

'तातारस्की !'

त्या नवख्या माणसाने खिशातून चांदीची चुट्टा पेटी काढली आणि फिदोतला एक चुट्टा देऊ करीत त्याने विचारले,

'तुमचं खेडं मोठं आहे का ?'

'मेहेरबानी. मी आत्ताच ओढली ! आमचं खेडं म्हणता ? चांगलंच मोठं आहे. तीन-एकशे उंबरठा आहे.'

'गिरिजा घर आहे का ?'

'अर्थात आहे.'

'लोहार आहेत ?'

'आहेत तर ! लोहारसाळ आहे !'

'गिरणीत लोहारकामाचा कारखाना आहे ?'

फिदोतने घोडयाच्या तोंडात लगाम बसवला आणि त्या माणसाच्या काळचा हॅटकडे, काळचा दाढीची झालर लागलेल्या त्याच्या रुंदट गोऱ्या चेहऱ्यावरील सुरकुत्याकडे संशयाने पाहिले.

'कशासाठी ही सगळी माहिती हव्येय ?'

'मी तुमच्या खेडयात रहायला येणार आहे ! आताच मी जिल्हा—आतामानकडे जाऊन आलो. रिकामीच गाडी परत नेताय वाटतं ?'

'हो !'

'मला नेता का बरोबर ? मी एकटा नाही. माझी बायकोही बरोबर आहे! एकदोन पेटचा आहेत. तीनेकशे पौंड वजन असेल !'

'नेतो मी तुम्हाला !'

दोन रुबलचे भाडे ठरल्यावर ते फ्रोस्का ह्या पट्टेरणीकडे गेले. पाहुणा तिथे उतरला होता. त्या माणसाच्या सोनेरी केसांच्या, शेलाटचा बायकोला त्यानी घेतले. मागच्या बाजूला पेटचा ठेवल्या आणि त्यांचा प्रवास सुरू झाला. टाळचाला जीभ लावून हाकारण्याचे आवाज काढीत आणि पिळदार लगाम घोडयांच्या पाठीवर आपटीत फिदोत आपले डोके वळवून पुन्हा पुन्हा मागे बघत होता. त्याचे कुतूहल शिगेला पोहोचले होते. त्याचे गिऱ्हाईक मागे शांतपणे बसले होते. फिदोतने आधी चुट्टा मागून घेतला. नंतर चौकशीला सुरुवात केली.

'कुठले तुम्ही ?'

'रोस्तोवचा !'

'गावचेंच का ?'

'काय म्हटलंत ?'

'म्हटलं तिथंच जनमलेत का ?'

'आ...हो.'

आपल्या ताम्रवर्णी गालाला सुरकुत्या पाडून दूरवरच्या रानगवतांच्या बेटांकडे फिदोत बारीक नजरेने बघत होता. रस्ता चढणीला लागला होता. रस्त्यापासून सुमारे दोन अडीच फर्लांगावर कपिलरंगी झाडझुडुपात सहजासहजी दृष्टीला पडू न शकणारी माळढोक पक्ष्याच्या डोक्याची हालचाल फिदोतच्या सराईत डोळ्यांनी टिपली.

'अरेरे ! बंदुक नाही हातात ! नाहीतर त्या माळढोकांच्या मागं धावलो असतो ! ते पहा ते चाललेत !'

सुस्कारा सोडून त्याने अंगठा रोखून दाखवले.

'मला तर काही दिसत नाही.'

त्याच्या गाडीतील प्रवाशाने डोळे किलकिले करून बघण्याचा प्रयत्न करीत म्हटलं.

पंख फडफडवीत ते माळढोक एका घळीत शिरलेले पाहिल्यावर फिदोत मागं मुरडून आपल्या प्रवाशांकडे विशेष बारकाईनं बघू लागला. माणूस सुमार उंचीचा होता. पण हडकुळा होता. त्याच्या गजनेत्रात एक धूर्त चमक होती. बोलताना तो सारखा हसायचा. विणलेली शाल अंगावर पांघरलेली त्याची बायको डुलक्या घेत होती. तिचा चेहरा फिदोतला दिसू शकला नाही.

'आमच्या खेड्यात रहायला येण्याचं कसं काय ठरवलंत ?'

'मी यंत्र दुरुस्ती करतो. माझा स्वतःचा दुरुस्ती कारखाना उघडायचा विचार आहे. मला सुतारकामही येतं.'

त्या माणसाच्या थोराड हाताकडे फिदोत संशयाने पाहू लागला. त्याची नजर हेरून तो नवखा मनुष्य म्हणाला,

'शिवणाच्या सिंगर मशिन कंपनीचा मी एजंटपण आहे.'

'तुमचं नाव काय ?'

'स्तोकमन.'

'म्हणजे तुम्ही रशियन नव्हेत.'

'मी रशियनच आहे. पण माझे आजोबा लातवियान होते.'

थोड्याच वेळात फिदोतला समजले की ओसिप दाविदोविच स्तोकमन आधी एका कारखान्यात कामाला होता. मग कुठे कुबानमधे, कुठे अग्नेय रेल्वेच्या

कारखान्यात, अशी त्याने कामे केली होती. ह्या नवख्या माणसाच्या आयुष्याच्या आणखी बऱ्याच घटनांची माहिती चौकस फिदोतने त्याच्याकडून काढून घेतली.

जरा वेळाने संभाषण मंदावले. घामाने निथळलेल्या घोड्याना फिदोतने वाटेवरच्या ओहळावर पाणी दाखवलें. प्रवासाची सुस्ती आणि गाडीचें बसणारे हादरे ह्याने तो पेंगू लागला. तीन साडेतीन मैलावर खेडे राहिलें होते. गाडींतील खुंटीला लगाम बांधून ठेवून तो निर्धास्तपणे आडवा झाला. पण त्याला झोप मिळायची नव्हती.

'तुमच्या भागात कशी काय परिस्थिती आहे ?'

गाडीच्या हादऱ्याने उसळचा घेत मागे पुढे हिंदकळणाऱ्या स्तोकमनने विचारले.

'तशी वाईट नाही ! भाकर तुकडा मिळतो !'

'आणि एकूण कझाक मंडळी परिस्थितीवर खूष आहेत ?'

'कुणी आहे. कुणी नाही. सगळ्यानाच कुठं खूष करता येतंय काय ?'

'खराय !'

त्या माणसाने मान डोलावली. मग तो धूर्त बोटचेपे प्रश्न विचारीत राहिला.

'तुमचं मजेत चाललंय म्हणता ?'

'मस्त मजेत !'

'दरवर्षी लष्करी शिक्षण म्हणजे कटकटच असेल, नाही का ?'

'लष्करी शिक्षण ? त्याची आम्हाला सवय झाल्येय ! फौजेत असलं की कशाची फिकीर करावी लागत नाही !'

'पण सगळा जामानिमा पुरवायचा म्हणजे तुम्हा कझाकाना कठीणच जात असेल !'

'तर हो ! डुकरिणीच्या आईची साली !'

फिदोत एकदम चवताळून म्हणाला आणि डोळ्याच्या कोपऱ्यातून त्याने त्या बाईकडे नजर टाकली. तिने त्याचीं नजर चुकवली.

'आमचे साहेबलोक चावट आहेत ! मी फौजेत चाकरी करायला गेलो तेव्हा पदरचा बैल विकून घोडं घेतलं ! त्यानी ते नापास केलं !'

'नापास केलं ?'

स्तोकमनने आश्चर्याचा आव आणून विचारले.

'एकदम नापास ! पायात खोड आहे म्हणाले ! मी भांडलो ! खूप प्रयत्न केला ! शर्यतीच्या घोड्याचे पाय आहेत त्याला ' मी म्हटलं ! ' जरा पाय मजेदार टाकतो एवढंच.' पण नाही तर नाही पास केलंन्! झाला का सत्यानाश?'

संभाषणाला रंग चढला. फिदोतने गाडीबाहेर उडी टाकली. कुरणरानाची अन्याय्य वाटणी करणाऱ्या खेड्याच्या आतामानला त्याने शिव्या घातल्या. फौजी चाकरीत तो असताना त्याच्या रेजिमेंटचा जिथे मुक्काम होता त्या पोलंडमध्ये कशी आबादी आहे त्याचे गोडवे गायले. गाडीबरोबर चालत येणाऱ्या फिदोतकडे डोळे आकुंचित करून भेदक नजरेने पाहणारा स्तोकमन मवाळ चुट्टा ओढीत सतत स्मित करीत होता. पण गंडस्थळाप्रमाणे असलेल्या त्याच्या गोऱ्या कपाळावरच्या त्रासिक आठ्यांच्या रेषा, आत लपलेल्या विचाराने टोचल्यागत हळूच थरारत दाट होत होत्या.

ते खेड्यात पोहोचले तेव्हा दिवस अजून मावळावयाचा होता. फिदोतच्या सल्यावरून स्तोकमन ह्या लुकेशका विधवेकडे गेला आणि त्याने दोन खोल्या भाड्याने घेतल्या.

'कुणाला बरोबर घेऊन आलास येताना ?' फिदोतच्या शेजाऱ्याने त्याची गाडी दारावरून चालली असता विचारले.

'एजंटाला !'

'कसला टाला ?'

'मूर्खरे मूर्ख ! एजंट म्हणालो एजंट ! तो यंत्र विकतो ! देखण्या लोकांना तो फुकट देतो ! पण मरिया मावशी ! तुझ्यासारख्याना मात्र विकत हं. !

'तोंड बघ मेल्या आरशात ! तुझं ते कालमिक नाकाड बघून घोडं बुजायचं !'

'कालमिक आणि तातार ह्या माळरानावर आलेले मूळपुरुष आहेत ! त्यांची मस्करी करायचं काम नाही !'

जाता जाता फिदोतने हुलकावणी दिली.

चकण्या आणि तोंडाळ लुकेशाच्या घरी मेकॅनिक असलेल्या स्तोकमनने बिऱ्हाड मांडले. जेमतेम रात्र उलटली असेल, खेड्यातील बायकाच्या जिभा वळवळू लागल्या.

'शेजीबाई, वार्ता ऐकलीस का ?'

'कसली वार्ता ?'

'त्या कालमिक फिदोतनं बरोबर कुणी जर्मन माणूस आणलाय !'

'खरं ?'

'देवाच्या दयेनं ! डोक्याला हॅट घालतो ! नाव स्तेपल का स्तोकल असं बरंच काहीतरी आहे.'

‘ पोलिसाबिलिसातला आहे का काय ?’

‘ नाही अबकारी खात्याचा आहे !’

‘ सगळं खोटं माझ्या बायानो ! तो आहे दिवाणजी ! फादर पांक्रातीच्या मुलासारखा !’

‘ पाशका, माझा सोन्या तो ! पळत पळत त्या लुकेशकाकडं जा आणि हळूच विचार. ‘ मावशी कोण हो आलंय तुमच्या घरात रहायला ?’

‘ पळ पोरा पळ !’

दुसऱ्या दिवशी स्तोकमनने खेडयातील आतामनकडे हजेरी दिली.

पयोदोर मातित्सकोवचे ‘ आतमान ’ कीचे तिसरे वर्ष होते. त्याने ह्या नव्या माणसाचा पासपोर्ट हातात घेऊन बऱ्याच वेळा उलट सुलट करून पाहिला. मग तो कारकुनाकडे दिला. त्यानेही तो बराच वेळ उलट सुलट केला. त्यांची नेत्रपल्लवी झाली आणि मग पूर्वी सार्जंट मेजर असणाऱ्या आतामानने कुऱ्यात हात उडवून म्हटले,

‘ राहू शकतोस इथं !’

पाहुण्याने मान लववून अभिवादन केले आणि तो खोलीतून बाहेर पडला. बील सोडून न जाणाऱ्या सुसलिकप्रमाणे त्याने लुकेशकाच्या घराबाहेर एक आठवडाभर तोंड काढले नाही. त्याच्या कुऱ्हाडीची खडखड बाहेर ऐकू येत असे. मोडकलीला आलेल्या बाहेरच्या चूलघरात तो ‘ वर्कशॉप ’ बनविण्याच्या खटपटीत होता. त्याच्याबद्दल बायकाना वाटणारे कुतूहल हळू हळू मावळले. पोरेटोरे तेवढी दिवसभर कुंपणावरून डोकावीत आणि पाहुण्याला निःसंकोच कुतुहलाने न्याहाळीत.

५.

‘ कुमारी माता ’ प्रार्थनेच्या तीन दिवस आधी ग्रिगरी आणि त्याची बायको गाडी घेऊन नांगरणी करायला गेली. पांतेलेयला बरे नव्हते. त्या दोघाना जाताना पहावे म्हणून अंगणात उभा असताना त्याने देहाचा सारा भार काठीवर टाकला होता आणि वेदनेने तो गुरगुरत होता.

‘ लाल खोऱ्याच्या बाजूला खमाविशी पलीकडच्या दोन पट्टयांची नांगरणी कर बर ग्रिशा !’

‘बरं बरं ! आणि वाळुंजी–काठाच्या तिथला पट्टा ?’

ग्रिगरीने बसक्या आवाजात विचारले. मासे धरायला गेल्याने त्याला पडसे झाले होते. गळ्याभोवती त्याने कपडा गुंडाळला होता.

‘तिकडं मग सणानंतर बघू. हेच काम रगड आहे. फार हाव धरू नको. तिथं निदान पंधरा एकर तरी असतील !’

‘पेत्रो येणार आहे का मदतीला ?’

‘दाऱ्याबरोबर तो गिरणीत जातोय. लोकांची गर्दी व्हायच्या आत आपलं दळण झालं पाहिजे.’

नुकतेच भाजलेले बनपाव नतालियाच्या जाकिटात ठेवीत इलिनिचना कुजबुजली.

‘बैल हाकायला दुन्याला घेऊन जातेस का बरोबर ?’

‘दोघं जणं पुरे झाली !’

‘बरं बेटा ! देव तुला मदत करो !’

ओळसर धुण्याचा बोजा घेतल्याने दुन्याच्या नाजुक देहाला बाक आला होता. धुणे धुवायला ती डॉनवर चालली होती. जाता जाता नतालियाला हाक मारून ती म्हणाली,

‘नतालिया, लाल खोऱ्यात रगड चुका आहे! थोडासा उपटून आण घरी!’

‘ए वाचाळमावशे ! चल नीघ आपल्या कामाला !’ दुन्याकडं पाहून पांतेलेय म्हणाला.

उलटा करून ठेवलेला फाळ, बैलांच्या तीन जोडयानी अंगणातून खेचत आणला. उन्हाने हडकलेली जमीन त्याने उखणत गेली. रस्त्याच्या कडेने खोकत चाललेला ग्रिगरी गळ्याभोवती बांधलेला रुमाल सारखा नीट करीत होता. नतलिया त्याच्या बाजूने चालली होती. न्याहरीची पिशवी तिच्या पाठीवर हेलकावत होती.

माळरानावर एक बिलोरी निःस्तब्धता पसरली होती. खमाविशीच्या पलीकडे कुबडया डोंगराच्या दुसऱ्या बाजूला भूमी नांगराने विंचरली जात होती. नांगर चालवणारे शिट्टया ठोकीत होते. पण इथे हमसडकेच्या कडेला खुरटलेला निळसर, करडा कडू दवणा तेवढा होता, मेंढरानी कुरतडलेले गवत–वेल (क्लोवर)...

नांगरवाले रस्त्याला लागलेले पाहून पेत्रो आणि दाऱ्या गिरणीकडे जाण्याची तयारी करू लागले. पेत्रोने कोठीतील गहू पाखडून घेतला. दाऱ्याने तो

पोत्यात भरला आणि गाडीकडे वाहून नेला. पांतेलेयने काळजीपूर्वक घोडे गाडीला जुंपून काढण्या ठीकठाक केल्या.

'किती उशीर करणारेस !'

'आलोच !' पेत्रोने कोठीतून उत्तर दिले.

गिरणीपाशी ते आले तेव्हा अंगणात रेकल्यांची गर्दी उडालेली त्याना आढळली. वजनाच्या काटयाभोवती तोबा गर्दी उसळली होती. पेत्रोने लगाम दान्याकडे फेकले आणि गाडीतून त्याने खाली उडी मारली.

'माझा नंबर लागायला वेळ लागेल का ! तागडीवाल्या गुड्डूला त्याने विचारले.

'तिकडे उभा रहा जा !'

'आता कितवा नंबर चालू आहे ?'

'अडतीस !' पेत्रो पोती आणायला गेला. पोती काढीत असताना पाठीमागून त्याने कोणीतरी शिव्या देताना ऐकले. एक खरखरीत संतापलेला आवाज भुंकत होता.

'झोपा काढा ! मग पुढं घुसाघुसी करा ! चल हट साला खोखोल[1] ! नाहीतर देतो एक ठेवून !'

नालवाल्या याकोवचा आवाज पेत्रोने ओळखला. तो थांबून ऐकू लागला. वजनकाटयाच्या खोलीतली आरडाओरड उंचावली होती नंतर दण्कन गुद्दा मारल्याचा आवाज आला. डोक्याच्या मागे टोपी चुरगळून गेलेला एक वयस्कर दाढीवाला युक्रेनी झोकांडया खात दारातून बाहेर आला.

'काय म्हणून ?' गालफड हातात धरून तो किंचाळला.

'मुंडी मुरगाळून टाकीन !

'पण हे बघ... !'

'मिकिख्वोर धाव !'

नालवाला याकोव एक रगेल ठोसर बंधानी होता. तो फौजेत असताना घोडयाला नालबंदी करताना ते जनावर उसळले आणि याकोवच्या नाकावर त्याने टापर हाणली. त्यामुळे त्याचे नाकाड फुटले, ओठ फाटले आणि तोंडावर नाल उमटला. त्या अर्धवर्तुळाकृती व्रणावर केस उगवले होते आणि तो निळा पडला होता. नालमेखांचे काळे ठिपके दिसत होते. त्यामुळेच त्याला 'नालवाला' हे नाव पडले होते. हा 'नालवाला' याकोव वजनकाटयाच्य खोलीतून अस्तन्या सावरीत धावत आला. गुलाबी सदरा घातलेल्या एका उंच युक्रेनी माणसाने पाठीमागून त्याला जबरदस्त तडाखा लगावला. पण याकोवचा तोल गेला नाही.

टीप : १. युक्रेनी माणसाला उद्देशून दिलेली एक इरसाल शिवी.

'भाऊ, ते कझाकांना पिटताहेत !' तो ओरडला.

मोठ्या संख्येने गिरणीत आलेले कझाक आणि युक्रेनीं चारी बाजूनी धावत रेकल्यांची गर्दी झालेल्या आवाडात आले. मुख्य प्रवेशद्वाराशी मारामारी सुरू झाली. झोंबी घेणाऱ्या शरीरांच्या भाराने दार खाली कोसळले. पेत्रोने पोते खाली टाकले आणि डरकाळी फोडून त्याने त्या दंगलीकडे धाव घेतली. गाडीवर उभी राहून दाऱ्या बघत होती. इतराना धक्काबुक्की करीत तो त्या जमावाच्या मधोमध घुसलेला तिने पाहिला. लोकांचे ठोसे खात तो गिरणीच्या भिंतीकडे आदळलेला, मग खाली पडलेला आणि लोकांच्या पायदळी गेलेला त्याला पाहून ती आक्रंदू लागली.

यंत्रघरातून उड्या मारीत, लोखंडी कांब गरगर फिरवीत मितका कोर्शुनोव तिथे आला. याकोवला मागून तडाखा हाणणारा तोच तो युक्रेनी झोंबाझोंबी करणाऱ्या जमावातून उसळून बाहेर पडला. पाखराच्या तुटलेल्या पंखाप्रमाणे त्याच्या गुलाबी बाहीची धांदोटी त्याच्या मागे फडफडत होती. हात जमिनीला टेकेपर्यंत तो वाकला होता. तसाच धावत तो जवळच्या रेकल्यापाशी गेला आणि गाडीचा दांडा काडेपेटीची काडी काढावी असा त्याने उपटून काढला. सबंध अंगणात खरखरीत गर्जना घुमत होत्या. दात खाल्ल्याचे आवाज ठोसे—कण्हणं विव्हळणे–! आरडयाचा एकच कल्लोळ उडाला होता. तीन शामील बंधू आपल्या घरातून धावत आले जमिनीवर पडलेल्या लगामात थोटचा अलेक्सीचे पाय अडखळले आणि फाटकापाशीच तो धाडकन आपटला. ताडकन उठून आणि हस्तहीन बाही पोटावर दाबून तो तिथे उभ्या केलेल्या रेकल्यांच्या दांडयावरून उड्या मारीत धावला. पांढऱ्या मोज्यातून बाहेर पडलेला तुमानीचा पाय परत आत खोचण्यासाठी त्याचा भाऊ मार्तिन खाली वाकला. गिरणीतील कल्लोळ आता तारसप्तकाला भिडला होता. कुणीतरी एवढी कर्कश किंकाळी ठोकली की वाऱ्यावर उडून जाणाऱ्या कोळीष्टकासारखी ती गिरणीच्या छपराच्या पार वर रंगत गेली. मार्तिन ताठ झाला आणि आपल्या भावाच्या पाठोपाठ धावला.

धापा टाकीत, हातावर हात चोळीत दाऱ्या गाडीवर उभी राहून ते दृश्य बघत होती. तिच्या आजुबाजूला बायका किंचाळत आक्रोश करीत होत्या. घोडयानी धाबरून कान टवकारले होते. बैल डरकाळत गाडयांशी झटया घेऊ लागले. ओठ घट्ट आवळून मोखोव तोऱ्याने तिथून गेले. बंडीखालचे त्याचे दोंद एखादे अंडे ठेवल्यासारखे वरखाली उडत होते. सदऱ्याच्या धांदोटया झालेल्या त्या युक्रेनी माणसाने मित्का कोर्शुनोवला गाडीच्या दांडयाचा प्रहार करून खाली

लोळवलेले दाऱ्याने पाहिले. दुसऱ्याच क्षणी थोटचा अलेक्सीच्या वज्रमुष्टीने तो तीन ताड उडाला, रंगीत चिंध्यासारखी मारामारीची दृश्ये दाऱ्याच्या डोळ्यांपुढून सरकत होती. गुडघ्यावर बसलेल्या मितकाने हातातील लोखंडी कांबीने मोखोवच्या पायावर तडाखा दिल्याचे पाहून तिला आश्चर्य वाटले नाही. मोखोवने हात पसरले आणि खेकड्यासारखे वजन काट्याच्या खोलीकडे ते सरपटत गेले. तिथे परत त्यांच्यावर लाथांचा वर्षाव झाला. आणि लोकांच्या पायाखाली ते तुडवले गेले. दाऱ्या चळल्यासारखी हसत सुटली. हसून हसून तिच्या रंगवलेल्या भुवयाची काळी धनुष्ये मोडली. पण पेत्रोला बघितल्याबरोबर तिचे हसू चटकन थांबले. झोकांड्या खात तो कसाबसा त्या आंदोळणाऱ्या, किंचाळणाऱ्या गर्दीतून बाहेर पडला होता. आणि एका गाडीखाली बसून तोंडातील रक्त थुंकून टाकीत होता. किंकाळी फोडून दाऱ्याने त्याच्याकडे धाव घेतली. हातात दांडकी घेऊन खेड्यातील कझाक तिथे पळत आले. एकजण पहार गरगर फिरवीत होता. दंगलीला भयानक स्वरूप आले होते. ही केवळ गुत्त्यतील मारामारी किंवा सणाच्या दिवशी खेड्डुतात होणारे मुष्टीयुद्ध नव्हते. वजनकाट्याच्या खोलीच्या दाराशी डोके फुटलेला एक युक्रेनी जवान रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. रक्तात भिजलेल्या त्याच्या झिज्या तोंडावर पसरल्या होत्या. आपल्या सुखी जीवनापासून तो दूर दूर चाललेला दिसत होता.

मेंढरासारखा घोळका केलेल्या युक्रेनीना हळूहळू माल उतरवून घेण्याच्या खोलीकडे हाकलले जात होते. एका युक्रेनी माणसाला अचानक स्फूर्ति झाली नसती तर मामला चिघळला असता. ज्या खोलीत भट्टी पेटली होती त्या खोलीत तीरासारखा घुसून त्याने एक जळते कोलीत उपसले आणि दळलेले धान्य ठेवलेल्या खोलीकडे तो धावला. हजारोमण पीठ तिथे साचवलेले होते. मलमलीसारखा धूर त्याच्या खांद्यावरून वर उठत होता आणि दिवसाच्या उजेडात निस्तेज वाटणाऱ्या ठिणग्या आजूबाजूला उडत होत्या.

'सगळ्याला आग लावून देईन !'

तडतडणारे कोलीत गवताच्या छपराकडे त्याने उंचावले.

कझाक गडबडले आणि थबकले. पूर्वेकडून सोसाट्याचा कोरडा वारा वहात होता. वाऱ्याबरोबर अढ्यावरचा धूर युक्रेनींच्या घोळक्याकडे येत होता. एकच सुरेखशी ठिणगी कोरड्या कोइटात पडली असती तर सगळ्या खेड्याची राखरांगोळी झाली असती !

कझाकात दबलेल्या आवाजात कुजबुज सुरू झाली. त्यांच्यापैकी काहीजण

गिरणीच्या दिशेने काढता पाय घेऊ लागले. तो युक्रेनी कोलीत डोक्यावर नाचवीत आणि ठिणग्यांची बरसात करीत गरजला,

'जाळून टाकतो ! जाळून टाकतो ! व्हा बाहेर '

ज्याने मारामारी सुरू केली होती आणि ज्याच्या डागाळलेल्या चेहऱ्यावर नवीन जखमा झाल्या होत्या तो 'नालवाला' याकोव सर्वांच्या आधी अंगणातून चालता झाला. इतर कझाकांची त्याच्यामागे रांग लागली. युक्रेनींनी आपली पोती भरभरा रेकल्यातून भरली. रेकल्याला घोडे जुंपले. रेकल्याच्या धुरेवर ते उभे राहिले आणि चाबूक डोक्यावरून गरगर फिरवीत, घोड्यांच्या पाठी फोडीत ते अंगणा-बाहेर उधळले आणि खेड्यापासून दूरवर निघून गेले.

अंगणाच्या मधोमध थोटा अलेक्सी उभा होता. त्याची रिकामी गाठी गाठी दिलेली बाही त्याच्या पोटावर भराभर खालीवर होत होती. नेहमीप्रमाणे त्याच्या डोळ्यांचे आणि गालांचे स्फुरण चालू होते.

'कझाकानो, टाच मारा !'

'धावा त्यांच्या मागं !'

'फार लांब गेले नसतील !'

सगळ्यात हिरवट असलेल्या मितका कोर्शुनोवने अंगणाबाहेर धावल्यासारखे केले. सबंध गिरणीतील कझाकांच्या गर्दीत परत नवीन हुल्लड उठली. पण ह्याच सुमारास काळी हॅट घातलेली अेक अपरिचित व्यक्ति इंजिनाच्या खोलीतून बाहेर पडली आणि तरातरा त्या घोळक्यापाशी आली. त्याचे मिचमिचे डोळे जमावा-कडे भेदक नजरेने पाहत होते. हात उंचावून तो ओरडला,

'थांबा ! !'

'कोण रे तू ?' याकोवने डाफरून विचारले.

'कुठून उपटलास ?'

'पाडा त्याचं भुस्कुट !'

'खेडुतानो ! थांबा !'

'कुणाला खेडूत म्हणतोस रे बिनशेपटीच्या ?'

'नांगरमुठ्या ! दे ठेवून अेक याकोव !'

'खेटरीच्या !'

'गैदी गव्हार !'

'बरोबर ! बरोबर ! लगाव त्याच्या भोतरीत !'

संकोचून पण भयाचे चिन्ह न दाखवता त्या माणसाने स्मित केले. त्याने डोक्यावरची हॅट काढली आणि अेक अगदी साधा आविर्भाव म्हणून आपले कपाळ पुसले. त्याचे स्मित विलक्षण नामोहरम करणारे होते.

'काय झालं ?'

वजनकांटयाच्या दाराशी पडलेल्या रक्ताच्या दिशेने हॅट हलवीत त्याने विचारले.

'खोखोलांचा पिट्टा काढतोय !'

थोटा अलेक्सी जरा मवाळीने म्हणाला. त्याचा डोळा आणि गाल उडत होते.

'पण कशासाठी ?'

'ते घुसाघुशी करायला बघतात !'

याकोवने पुढे येत खुलासा केला. आणि नाकातून रक्ताची गुठळी शिंकरून टाकली.

'आमची आठवण राहीलशी अद्दल घडवली त्यांना !'

'त्यांचा पाठलाग करायला हवा होता ! माळरानात काय जाळणार आहेत?'

'आपण उगाच घाबरलो ! त्याची काय हिंमत होती आग लावायची ?'

'अरे, लावलीसुद्धा असती ! जीवावर उदार झाला होता !'

'खोखोल साले भलतेच भडकू !'

आफोनका ओझेरोव दात बिचकून म्हणाला. त्या माणसाने ओझेरोवच्या दिशेने हॅट हलवली.

'आणि तू कोण आहेस ?'

भगदाडे पडलेल्या दांतातून ओझेरोव तिरस्काराने पचकन थुंकला. वाऱ्यावर उडणाऱ्या थुंकीकडे बघत तो पाय फाकून उभा राहिला.

'मी कझाक आहे... ! पण तू... ? तू कोण आहेस ? जिप्सी ?'

'तू आणि मी... दोघे रशियन आहोत !'

'थापा मारतोय्स !'

आफोनकाने मुद्दाम आरोप केला.

'कझाक रशियनांच्याच कुळातले आहेत ! ठाऊक आहे तुला ?'

'मी तुला सांगतो ! कझाक कझाकांच्या कुळातले आहेत !'

'खूप पूर्वी वेठबिगार जमिनदाराकडून पळून आले आणि डॉनवर त्यांनी वस्ती केली. त्यानाच पुढं कझाक म्हणायला लागले.'

'अरे जा नऽ आपल्या वाटेनं !'

संताप आवरीत अलेक्सी म्हणाला. त्याच्या दणकट मुठी आवळल्या होत्या. पापणीची भराभरा फडफड चालू होती.

'हा आगाव खेड्यात आलाय !'

'आपल्याला नांगरमुठे बनवू बघतोय डुकरीचा !'

'कोण आहे रे तो ? ए अफानासी ऐकलंस का ?'

'चकण्या लुकेशकाकडं आलेला नवा माणूस आहे.'

पण युक्रेनींच्या मागावर जाण्याचा क्षण निघून गेला होता. तावातावाने मारामारीची चर्चा करत कझाक पांगले.

त्या रात्री खेड्यापासून सुमारे पाच साडेपाच मैलावर माळरानात ग्रिगरीने जाड, टोचणारे मेंढीकातडे अंगावर पांघरले होते. खिन्नपणे तो नतालियाला सांगत होता,

'तू कुणीतरी परकी आहेस ! त्या चंद्रासारखी आहेस. माणसाला धड गारठवीत नाहीस धड उबही देत नाहीस ! माझं तुझ्यावर प्रेम नाही ! नतालिया ! तू रागावता कामा नये ! ह्याबद्दल मी काही बोलणार नव्हतो पण बोलावं लागलं ! असं किती दिवस चालणार ? तुझ्याबद्दल मला वाईट वाटतं ! अलीकडे आपण एकमेकांच्या जवळ येतोय असं वाटत होतं ! पण माझ्या काळजात मला काही जाणवत नाही ! ते ओकंबोकंच आहे ! ह्या रात्री हे माळरान आहे ना ? तसंच !'

ताऱ्यांनी खचलेले ते अनंत कुरण, डोक्यावर तरंगणाऱ्या ढगांचे काळोखी भुतांसारखे पायघोळ अंगरखे इकडे टक लावून बघणारी नतालिया गप्प होती वरच्या निळ्याकाळ्या उजाड अवकाशात अवेळी उडणाऱ्या बगळ्यानी एकमेकाना घातलेली साद चांदीच्या घंटीकांसारखी किणकिणत होती. सुकलेल्या गवताला एक उदास, निर्जीव वास येत होता. टेकडीवर नांगऱ्यानी पेटवलेल्या झगरीची लालबुंद दीप्ती झगझगत होती.

पहाटेच्या सुमाराला ग्रिगरी जागा झाला. त्याच्या मेंढीकातड्याच्या पांघरुणावर हिमाचा तीन इंची स्तर जमा झाला होता. नुकत्याच पडून गेलेल्या हिमवृष्टीच्या चकाकत्या अक्षत निळाईत माळरान झाकून गेले होते. पहिल्या हिमवृष्टीत वाट चुकलेल्या सशाच्या पावलांचे सुस्पष्ट ठसे तो पडला होता तिथे जवळच उमटत गेले होते !

६.

गेली कित्येक वर्षे असे चालत होते की मिलेरोवाकडे जाणाऱ्या सडकेने एकटा दुकटा कझाक जर रेकला हाकीत प्रवासाला निघाला असेल आणि युक्रेनींची त्याच्याशी गाठ पडली तर त्याला नाक मुठीत धरून त्याना रस्ता देणे भाग पडे. (या बलोनोव्हस्कीच्या खालच्या अंगापासून युक्रेनी खेडयाची सुरुवात होऊन ती सुमारे पन्नास मैल म्हणजे पार मिलेरोवापर्यंत पसरली होती.) त्याने रस्ता करून दिला नाही तर युक्रेनी त्याचा काटा काढीत. म्हणून रेल्वे स्टेशनाकडे गटागटाने जाण्याची कझाकांची प्रथा होती. मग माळरानावर युक्रेन्यांना मागे टाकून गाडया हाकायला आणि शिवीगाळ करायला ते डगमगत नसत.

'ए खोखोल ! वाट दे. ए ! कझाकाच्या जमिनीवर गिळायला हवं आणि त्याना वाट तेवढी द्यायला नको काय रे डुकरानो ?'

डॉनवरील पारामोनोवो इथल्या धान्य उचलणाऱ्या यंत्राकडे आपले धान्य ज्या युक्रेनींना आणावे लागायचे तेही खमके होते. काहीं कारण नसताना मारामारी जुंपे. कारण म्हटले तर एवढेच की ते 'खोखोल' होतें. आणि मनुष्य एकदा 'खोखोल' असला की त्याने मार खाल्लाच पाहिजे !

अनेक शतकांपूर्वी मोठ्या जाणकार हातानी जातीद्वेषाचें बी कझाक भूमीत पेरलें होते. त्याची मोठ्या उस्तवारीने निगराणी केली होती आणि त्या बीजाला मोठी समृद्ध फळे आली होती. युक्रेन आणि रशियातून नव्याने येणारा कझाक ह्यांच्यातील कलागतीने रक्ताचें पाट वहात.

गिरणीत ती दंगल झाल्यानंतर सुमारे दोन आठवडयानी जिल्ह्याचा पोलीस अंमलदार आणि इन्स्पेक्टर खेडयात येऊन थडकले. पहिली चवकशी स्तोकमनची झाली. पोलीस अंमलदार कझाकी सरदार घराण्यातील होता. आपल्या 'ब्रीफकेस' मधील कागदपत्र धुंडाळीत त्याने विचारले,

'इथं यायच्या आधी कुठं रहात होता ?'

'रोस्तोवला,'

'१९०७ मधे तुरुंगवासाची शिक्षा कशासाठी झाली होती ?'

इन्स्पेक्टरच्या ब्रीफकेसवरून आणि डोक्यातील कोंडा दिसणाऱ्या भांगाच्या रेषेवरून स्तोकमनची नजर भिरभिरली.

'दंगलीत भाग घेतल्याच्या आरोपावरून!'

'हं! तेव्हा कुठं काम करीत होता?'

'रेल्वेच्या वर्कशॉपमध्ये!'

'काय म्हणून?'

'मेकॅनिक म्हणून!'

'तुम्ही ज्यू आहात का? का बाटलेले आहात?'

'नाही! मला वाटतं...!'

'तुम्हाला काय 'वाटतं' ते मला नकोय! हद्दपारी झाली होती?'

'होय झाली होती!'

इन्स्पेक्टरने मान वर केली आणि वर खाली स्वच्छ भादरलेल्या, आजुबाजूला पुटकुळया उठलेल्या ओठाना दातात आवळले.

'माझा सल्ला आहे की ह्या खेडयातून तुम्ही ताबडतोब चालू लागा! मी तुम्हाला इथून जायला लावीन!'

'का इन्स्पेक्टर?'

उत्तरादाखल आणखी एक प्रश्न इन्स्पेक्टरने विचारला,

'गिरणीत दंगल झाली त्या दिवशी कझाकाना काय म्हणालात!

'आ...आ...!'

'ठीक. तुम्ही जाऊ शकता!'

मोखोवच्या व्हरांडयातून स्तोकमन बाहेर पडला. (अंमलदार शेटजींच्या घरात नेहमी आपली कचेरी थाटत असत). त्या रंगवलेल्या दुहेरी दारांकडे त्याने वळून पाहिले आणि खांदे उडवले!

७.

हिवाळा मंदगतीने आला. 'कुमारी प्रार्थने'नंतर बर्फ वितळला आणि गुरांचे कळप परत कुरणाकडे जाऊ लागले. आठवडाभर दक्षिणेकडील वारा वहात होता.

त्याने आपल्या बरोबर जमिनीवर ऊब आणली. सरत्यावेळी उगवलेल्या चारकुटाने माळरान चमचमत होते. बर्फाची पाघळणी 'सेन्ट मायकेल' दिनापर्यंत टिकली. मग थंडीचा कडाका वाढू लागला. बर्फाचे थर इंचभराने उंचावले. हिमवृष्टी सुरू झाली आणि डॉनच्या काठचे भाजीचे वाफे कुंपणाच्या शिरवट टोकापर्यंत बर्फात बुडून गेले. वर सशाच्या पावलांच्या निशाण्या दिसू लागल्या. रस्ते ओस पडले.

शेणींच्या जळणाचा धूर खेड्याच्या डोक्यावर तरंगत होता. रस्त्याच्या कडेला टाकलेल्या राखड्यांतून कावळे चोंची खुपसू लागले. घसरगाडीच्या मुलायम चाकोरीची करडी–निळी, विरळ होत जाणारी फीत गावात वेढे घेत जात होती.

टाकळीची छाटणी आणि वाटणी करण्यासाठी गावकऱ्यांची सभा भरणार होती. मेंढकातडींचे कोट आणि फर्गोल घातलेले कझाक सरकारी कचेरीच्या पायऱ्याभोवती गोळा झाले होते. त्यांचे बूट त्यांच्या हालचालींनी करकरत होते. थंडीमुळे सगळेजण आत गेले. मेजाच्यामागे आतामन आणि कारकुनाच्या बाजूने खेड्यातील पिकलेल्या दाढ्यांची प्रतिष्ठित वडिलधारी मंडळी बसली होती. निरनिराळ्या रंगाच्या दाढ्या असलेले आणि अजिबात दाढ्या नसलेले कझाक गटागटाने उभे होते. उबदार कोटाच्या कॉलरी तोंडावर ओढून ते एकमेकात कुजबुजत होते. गिचमीड अक्षरात कारकून पानामागून पाने खरडत होता. आतामान त्याच्या खांद्यावरून डोकावून बघत होता आणि दबलेल्या आवाजातील गुणगुण त्या थंडगार खोलीत भरून गेली होती.

'यंदाची वैरण–!'

'हो...! कुरणरानातली वैरण चांगली निघाल्येय, पण माळरानावरची वैरण नुसतं माजरी आहे!'

'पूर्वी नाताळापर्यंत माळरानांवर गुरं चरायची!'

'कालमिकांची पोळी पिकत असेल मग!' घोगरा खोकला.

आतामानची गर्दन लांडग्यासारखी भरल्येय!

'असा माजलाय की मान इकडची इकडं करवेनासं झालंय!'

'डुकरासारखा चरत असतो सैतान!'

'कसं काय आजोबा? हिवाळ्यालाच पोबारा करायला लावताय म्हणा की! नामचंद मेंढेकातडी काढल्येय!'

'जिप्सीला त्याचा कोट फुंकायची वेळ आल्येय!'

'त्या जिप्सी पोराची गोष्ट ऐकली का? अंगावर पाग पांघरून अख्खी

रात्र त्यानं माळरानावर काढली ! थंडी त्याच्या कोथळ्यात शिरायला लागली तसा जागा झाला आणि पागाच्या फटीत बोटं खुपसून आईला कसा म्हणतो : इथनं वारं येतंय व्हय ? मला वाटलं थंडीबिंडी पडल्ये का काय !'

'घसराय पडायचा मोसम लौकर सुरु होणारसं दिसतंय !'

'बैलाना नाल ठोकून घेतले पाहिजेत !'

'सैतान–घळीतली वळुंजी छाटत होतो ! नंबरी माल आहे तिथं !'

'पाटलोणीचं बटण लाव झाखार ! बरफबाधा झाली तर बायको काढून लावेल घरातून !'

'तू काय पहिल्याचा बैल घेतोयस म्हणून ऐकलं ! खरं काय रे आवदेइच ?'

'नाही घ्यायचं ठरवलंय ! पाराशाची बायको घेणाराय म्हणे ! ती म्हणते, मी रंडकी ! जेवढे जास्त बैल तेवढं मला चांगलं ! मी म्हणीतलं, ठीकाय तुझी वंशेल वाढू दे !'

'हाः हाः हाः !'

'मग काय दादानूं ! काय करताय लाकुडकापणीचं ?'

'ए गप् बसा रे !'

'हा–हा ! म्हणीतलं, की वंशेल वाढवलीस तर धर्माचा बाप तर हवा का नाय ?'

'मेहेरबानी करून गडबड कमी करा पाहू !'

सभा सुरू झाली. हातातील अधिकार-दंडाशी खेळत आणि करंगळीने दाढीतील बर्फाच्या झिरमिळ्या काढीत आतामान नावे पुकारू लागला. मागचे दार मधून मधून धाडकन वाजत होते आणि त्यामुळे आतून वाफेचे लोट उसळत होते. लोक खोलीत रेटारेटी करीत होते. नाक शिंकण्याचे सुरेल आवाज मधून मधून येत होते.

'गुरुवारचा दिवस लाकुडतोडीसाठी तुम्हाला ठरवता येणार नाही !' आतामानच्या आवाजापेक्षा वरच्या आवाजात इमान तोमिलीन ओरडला. आपले जांभळे पडलेले कान त्याने चोळले आणि निळी बंधानी टोपी घातलेले आपले मस्तक एका बाजूला कलते धरले.

'का नाही ?'

'चोळून चोळून कानाचा भुगा होईल रे तोपच्या !' कुणीतरी ओरडले.

'त्याला बैलाच्या कानांची जोडी शिवून देऊ !'

'निम्मं खेडं काटवण काढायला गुरुवारीच जाईल ! ही काय काम करायची पद्धत झाली ?'

'रविवारपर्यंत पुढं ढकला ते काम !'

'दादानूं !'

'आता काय ?'

'त्याचं भलं होवो !'

चेष्टेचे आवाज जमावातून निघू लागले. म्हातारबुवा मातवेई काशुलिन त्या डगडगत्या मेजावरून पुढे वाकले आणि ॲश लाकडाची आपली गुळगुळीत काठी तोमिलीनकडे रोखून चवताळून कडाडले,

'काटवणीची काही घाई नाय ! चौचाकी पांढरीचा प्रश्न आहे तो सगळयांच्या विरुद्ध नेहमी जात असतोस तू ! तू एक महामूर्ख पोर आहेस समजलं ?'

'तुमची तरी अक्कल कुठं वाया चालल्येय ?' थोटा अलेक्सी आखाडयात उतरला ! त्याच्या विद्रूप गालाचे स्फुरण होत होते. जमिनीच्या एका पट्ट्यासाठी सहा वर्षे त्याचा म्हातारबुवा काशुलिनशी तंटा चालू होता. काशुलिनने बळकावलेला तुकडा ढेगभरसुद्धा नव्हता पण प्रत्येक वसंतऋतूंत अलेक्सी म्हाताऱ्याची हाडे खिळखिळी करायचा.

'चूप वाकडतोंडया !'

'तिकडं लांब आहेस म्हणून नाहीतर घुणाच फोडला असता नाकाचा !' अलेक्सीने दम भरला.

'अरे जा रे ! थोटया फेफरीच्या !'

'बस् झाली कंदाल !'

'बाहेर जा रग जिरवायची असेल तर !'

'अरे, दे सोडून अलेक्सी ! म्हातारा कसा कापायला लागलाय बघ ! टोपी पडायला आली त्याची !'

'नीट वागत नसले तर बर्फ थापा दोघांच्या अंगावर !'

आतामानने आपली जबरदस्त मूठ टेबलावर आपटली तशी ते करकरले,

'गप्प नाही बसला तर चौकीदाराला बोलवीन !' गलक्याची लाट शेवटच्या ओळीपर्यंत कमी होत गेली आणि ओसरली. तो पुढे म्हणाला. 'गुरुवारी पहाटेस लाकूडतोड सुरू होईल !'

'तुमचं काय म्हणणं आहे दादानुं !'

'आशीर्वाद आहेत !'

'देव यश देवो !'

'अलीकडे म्हाताऱ्याना विचारतो कोण ?'

'कसे नाही ऐकत बघू या ! मन चाहेल तसं आपण करू असं वाटलं का काय त्याना ? माशा अलेक्झांदर... त्याची वाटणी त्याला दिली तशी कलागत काढलीन् त्यानं ! माझ्या अंगावर हात टाकला ! पण मी त्याला बरोबर सरळ आणला ! मी म्हणीतलं–'आता जातो आतामानकडं.' मिजास उतरवली त्याची.'

'आणखी एक गोष्ट दादानूं ! जिल्हा–आतामानचा मला हुकूम आलाय !' आतामानने आवाज चढवून मान मुरडली. त्याच्या गणवेशाच्या भडक गळपट्टीतून त्याच्या हनुवटीच्या वळचा बाहेर पडल्या होत्या. 'पुढच्या शनिवारी पोरांनी जिल्हा–आतामान कचेरीत शपथ घ्यायला जायचंय, दुपारपर्यंत त्यानी तिकडे पोचायचंय.'

दाराच्या जवळच असलेल्या खिडकीजवळ आपला लंगडा पाय बगळ्यासारखा उचलून पांतेलेय प्रोकोफिएविच उभा होता. त्याच्या बाजूला खिडकीच्या चौथऱ्यावर बसून मिरोन ग्रिगोरिएविच आपल्या लाल दाढीतून स्मित करीत होते त्यांच्या छोटया सफेद पापण्यांवर दहिंवराचे बुरकूल आले होते. अंगावरचे पिवळे डाग थंडीने करडे झाले होते.

जवान कझाक जवळच दाटीवाटीने उभे होते. एकमेकाना डोळे घालीत ते खुसखुसत होते. त्यांच्या घोळक्याच्या मधोमध वर फुली असलेली रखवाली फौजेची निळी टोपी आपल्या गुळगुळीत टकलावरून मागे सरकावलेला, पायावर डुलणारा, पांतेलेयच्याच वयाचा पण नित्य टवटवीत चेहऱ्यावर तांबडया लाल हिवाळी सफरचंदाची लालम्लाली अवीटपणे उसळलेला–आवदेइच उभा होता. त्याला 'थापाडया' हे टोपण नाव पडले होते.

आवदेईचने आतामानच्या हुजुरात रखवाली फौजेत चाकरी केली होती. जाताना त्याने सिनलिन हे नाव लावले होते तरी थापाडया हे टोपण नाव मिळवून तो परतला होता. आतामान पथकात जागा मिळालेला खेडयातील तो पहिलाच जवान. पण पुढे काही चमत्कारिक घडले. आधी चारचौघांसारखा तो वाढत होता. डोक्याने तो लहानपणापासूनच तऱ्हेवाईक होता. पण जंग चाकरी करून तो जेव्हा परत आला तेव्हा काहीतरी सगळे तिरपागडे होऊन गेले. घरी आल्याच्या पहिल्या दिवसापासून त्याने खाजगीतील चाकरीचे आणि सेंटपिटर्सबर्गमध्ये त्याने गाजवलेल्या अलौकिक बहादुरीचे अफलातून किस्से सांगायला सुरुवात

केली होती. ऐकणारांनी थक्क होऊन तोंडाचा 'आ' करून त्याच्या सांगण्यावर सुरुवातीला विश्वास ठेवला. पण नंतर त्याना असे आढळून आले की त्या खेड्यात कधी झाला नाही असा तो एकमेवाद्वितीय बंडलबाज आहे. हे कळून चुकल्यावर माणसे त्याची टर उडवू लागली. त्याला शरमबिरम काही नव्हती! (पण त्याचा चेहरा नेहमीच इतका तांबारलेला असे की त्याला लाज वाटतेय किंवा नाही हे पाहणाराला कधी सांगता आले नसते!) खोटे बोलण्याची त्याची सवय काही गेली नाही. तो जसा वयाने वाढत गेला तसा खोटे उघडकीला आले तर चिडीला जाऊ लागला. गुद्दागुद्दीवर येऊ लागला. पण ऐकणाराने त्याचे सांगणे नुसतेच हसण्यावारी नेले तर त्याचे कथाकथन अधिकाधिक मैदानमाप होऊ लागायचे.

त्याच्या शेतीपुरते सांगायचे तर तो एक व्यवहारी आणि कष्टाळू कझाक होता. प्रत्येक गोष्टीत सुज्ञता दाखवायचा. कधीकधी धूर्तताही! पण हुजुरात–रखवालीमधील चाकरीचा विषय निघाला की ऐकणाऱ्या माणसाची हसून हसून मुरकुंडी वळायची.

टाचावर झुलत खोलीच्या मधोमध आवदेईच उभा होता. जमलेल्या कझाकांकडे नजर टाकून आपल्या वजनदार खर्जाच्या आवाजात त्याने सांगायला सुरुवात केली.

'फौजेच्या चाकरीची गोष्ट करायची तर पूर्वीसारखे कझाक राहिले नाहीत! झुडतर आहेत नुसते! काही आकारच नाही! त्यांच्यापैकी कुणाही कडे पाहून नुसते शिकलात तरी फॅ फॅ उडेल त्यांची! पण...!' एवढेच म्हणून तो तुच्छतेने हंसला. 'एकदा व्योशेनस्कायात मी कझाकांचें सापळे बघितले! पण त्या काळी ते जातीवंत कझाक होते!'

'सापळे खणायला कुठं गेला होता, आवदेइच?' शेजाऱ्याला कोपरखळी मारून गोंडाल चेहऱ्याच्या आनिकुशकाने विचारले.

'पवित्र दिवस यऊन ठेपलाय! तुझी नेहमीची थापेबाजी जरा बंद कर-आवदेइच!' नाक मुरडून आणि कानातली कोर चिमटीने ओढीत पांतेलेय म्हणाला. आवदेइचच्या फुशारक्या त्याला आवडत नसत.

'थापा मारणं आपल्या पिंडातच नाही भाऊ!' आवदेइचने खंबीरपणे उत्तर दिले आणि हिंव भरल्याप्रमाणे थडथडणाऱ्या आनिकुशाकडे टक लावून तो सांगू लागला.

'माझ्या मेव्हण्यासाठी घर बांधताना आम्ही पाया खणत होतो तो तो

सापळा मला दिसला ! खणता खणता एक थडगं लागलं ! तेव्हा इथं डॉनच्या खालच्या अंगाला गिरजाघराच्या जवळ जुन्याकाळी मसणवट असली पाहिजे !'

'अरे पण त्या सापळ्याचे काय ?' जाण्याच्या तयारीत असलेल्या पांतेलेंयने अधीरतेने विचारले.

'हात–! हे ऽऽ असले लांब !' असे म्हणून आवदेइचने आपले दोन सरळ सोट हात दोन्ही बाजूना फाकले.

'डोकं ! हे ऽऽ असलं ! कढईसारखं ! गळ्याशपथ !'

'सेंट पिटर्सबर्गमध्ये दरवडेखोराला कसा धरलास ते सांग पोराटोरांना !' खिडकीच्या चौथऱ्यावरून उठत आणि फर्गोलाची बटणे लावीत मिरोनने सुचविले.

'त्यात काही सांगण्यासारखे नाही !' विनयाचा आव आणीत आवदेइचने उत्तर दिले.

'सांगरे सांग आवदेइच !'

'सांग कीरे ! कर जरा मेहेरबानी !'

'त्याचं असं झालं' आवदेइचने खाकरून घसा साफ केला आणि तुमानीच्या खिशातून तंबाखूची चंची बाहेर काढली. चंची काढता काढता बाहेर पडलेली दोन तांब्याची नाणी त्याने परत खिशात ठेवली. तंबाखूची चिमूट हातावर घेत आपली लकलकती नजर श्रोतृवृंदावरून फिरवली.

'एक बदमाश तुरुंगातून पळाला ! त्याची खूप शोधाशोध झाली ! पण त्याना तो गवसला म्हणीता काय ? त्यांच्यानं ते शक्यच नव्हतं ! सगळ्या अंमलदारानी हात टेकले ! पण हा बेपत्ता झाला तो झाला !'

'एका रात्री रखवालीच्या अंमलदारानं मला बोलावून घेतलं, मी त्याच्याकडे गेलो. आ.. ! म्हणतो कसा, 'जा सरकारस्वारीच्या आरामखान्यात ! श्रीमंताच्या स्वारीला तुला भेटायचंय.' आपण जरा कचरलोच ! मग आत गेलो ! स्वारी पुढं मी ताठ उभा ! पण दयावंत स्वारीने माझा खांदा थोपटला ! म्हणीतात कसे 'रे इवान आवदेइच ! आमच्या राज्यात सगळ्यात मोठा बदमाश हातावर तुरी देऊन गेलाय ! त्याला शोधून काढ ! तो सापडेपर्यंत आमच्या नजरेला पडू नको !' 'जशी आज्ञा हुजूर' मी म्हणीतलं. खरं रे पोरानू, मोठा बाका वख्त होता ! तेव्हा झारच्या तबेल्यातली तीन तगडी घोडी घेतली !'

चुट्टा शिलगावून आवदेइचने श्रोत्यांची लवलेली डोकी पाहिली आणि सांगत असलेल्या गोष्टीनं स्फुरण चढून त्याने आजूबाजूच्या चेहऱ्यावर धुराचा ढग सोडला.

' अख्खा दिवस घोडा पिटाळला ! अख्खि रात्र घोडा पिटाळला ! तिसऱ्या दिवशी मॉस्कोजवळ तो बदमाश पाहिला ! ते पाखरू गाडीत घातलं आणि आणला त्याला खेचून. सेंट पिटर्सबर्गला ! सबंध चिखलाने लडबडलेला ! मध्यान रातीचा मी येऊन थडकलो ! सरळ स्वतः हुजूरस्वारीकडे गेलो ! सरदार दरकदारानी मला रोखण्याचे प्रयत्न केले ! पण खाड खाड टांगा टाकीत थेट गेलो ! हा !! दारावर टकटक केलं !

' हुजूर आत यायची इजाजत व्हावी !'

' कोण आहे ?'

' मी आहे इवान आवदेइच !' मी म्हणोतलं, आत एकदम गोंगाट उडालेला ऐकला !

' मरिना फ्योदोरोवना ! मरिना फ्योदोरोवना ! उठा उठा. चहाचं आधण ठेवा ! इवान आवदेइच आलेत !'

घोळक्याच्या पिछाडीला असणारे कझाक सात मजली हसले. हरवलेल्या आणि चुकलेल्या गुरांबद्दल सूचनापत्रक वाचून दाखवणारा कारकून ' गुडघ्या-पर्यंतचा रंग ' ह्या अर्ध्या वाक्यावरच थबकला. आणि आतामानने कादंबासारखी मान उंचावून त्या खिदळणाऱ्या कवचाळाकडे रोखून बघितले.

आवदेइचचा चेहरा काळवंडला. समोरच्या चेहऱ्यांकडे तो भिरीभिरी नजरेने बघू लागला.

' थांबा थांबा !'

' हाः हाः हाः !'

' खीः खीः खीः !'

' कुत्रं आहे सालं !! होः होः होः !!!'

' हा साला जीव घेणार हसवून !'

' चहाचं आधण ठेवा ! आवदेइच आलेत !! हाः हाः हाः !!'

जमाव पांगू लागला. कचेरीच्या इमारतीचा गारठलेला जिना अखंड करकरत राहिला.

बाहेरच्या तुडवलेल्या बर्फात स्तिपान आस्ताखोव आणि एक उंचाडचा लांबटांग्या कझाक— पवनचक्कीचा मालक— अंगात ऊब येण्यासाठी एकमेकांशी कुस्ती खेळत होते. आजूबाजूला कझाकांचा थवा उभा होता.

' उचल त्या धरमलंडाला !'

' मऊ कर हड्डी त्याची, स्त्योपका !'

'तिथं धरू नकोस त्याला ! दीडशहाणाच आहेस !'

चिमणीसारखा उडया मारीत म्हातारा कार्शुबिन ओरडला. तो रंगात आला होता. इतका की त्याला ह्याही गोष्टीचे भान उरले नव्हते की आपल्या निळचा पडलेल्या नाकाच्या बोंडीवरून मोठा थोरला दंवबिंदू बुजरेपणाने लोंबत होता !

८.

सभेहून परत आल्यावर पांतेलेय त्याची आणि त्याच्या बायकोची जी खोली होती तिकडे थेट गेला. गेले काही दिवस इलीनिचनाला बरे नव्हते आणि तिच्या फुगीर चेहऱ्यावर तिचा थकवा आणि तिच्या वेदना उमटल्या होत्या. पाठीखाली उशी घेऊन पराच्या पुष्ट गादीवर ती पडली होती. पांतेलेयच्या पावलांचा आवाज एकल्याबरोबर तिने आपले मस्तक वळवले. श्वासोश्वासाने दमट झालेली दाढी, फिस्कारलेल्या गालमिशा आणि तिच्या अंगवळणी पडलेली त्याची उग्र नजर यांकडे तिचे डोळे खिळून राहिले. पण म्हाताऱ्याच्या अंगाला फक्त गोठवत्या थंडीचा आणि उग्र मेंढेकातडचाचाच वास येत होता. 'आज शुद्धीवर आहे काय ! तिच्या मनात विचार आला आणि संतोषाने तिने विणकामाच्या सुया खाली ठेवल्या.

'काय झालं लाकूडतोडीचं ?'

'गुरुवारी सुरु करायचं ठरवलंय !' आपल्या मिशा थोपटीत पांतेलेय म्हणाला, 'गुरुवारी सकाळी !' पलंगाजवळ असणाऱ्या लाकडी पेटीवर बसत तो म्हणाला, 'कसं काय बरं वाटयंय का आता ?'

'आहे तसंच आहे ! सांध्यातून भयंकर चमका उठताहेत !'

'पाण्यात जाऊ नको म्हणून तुला बजावलं होतं ! मूर्ख कुठची ! ह्या पतझडीच्या मोसमात काय होईल ठाऊक आहे ?' आपल्या काठीने जमिनीवर मोठाली वर्तुळे काढीत पांतेलेय डाफरला, 'ताग भिजवायला बायाना काय तोटा गेला होता ? धन्य आहे ! धन्य आहे तुमच्यापुढं !'

'मी काय तो ताग वाया घालवू ? कुण्णी बाया नव्हत्या हाताशी ! ग्रिशा

आपली बायको घेऊन नांगरणीला गेला होता! पेत्रो न् दाऱ्या असेच कुठं तरी गेले होते!'

हाताची ओंजळ तोंडापुढं धरून म्हाताऱ्याने तीवर फुंकर मारली.

'नतालियाचं कसं आहे?'

इलींनिचनाने चिंतेच्या सुरात उत्तर दिले.

'काय करावं समजत नाही! परवा परत रडत होती. मी बाहेर अंगणात गेले, पाहते तर कुणीतरी कोठीचं दार सताड उघडं टाकलेलं! ते बंद करायला म्हणून गेले तर ही बाजरीच्या कणगीशी उभी! मी विचारलं, काय झालं? म्हणाली काही नाही! फक्त दुखतंय! तिच्या मनाचा काही थांग लागत नाही!'

'काही दुखत खुपत असेल!'

'मला नाही तसं वाटत! कुणाची दृष्ट तरी लागल्येय पोरीला किंवा ग्रिशाच...!'

'त्या बाईच्या मागं नाही ना पुन्हा लागला?'

'छे ग बाई! काय तरी बोलणं!' इलिनीचना घाबरून म्हणाली. 'स्तिपान काय मूर्ख वाटला! नाही हो–' मी तरी तसलं काही ऐकलं नाही!'

थोडा जास्तच वेळ पांतेलेय बायकोबरोबर बोलत बसला होता आणि मग तो बाहेर आला. ग्रिगरी मासेमारीच्या गळाना कानशीने धार लावीत बसला होता. नतालिया त्या गळाना डुकराची चरबी फासत होती. आणि काळजीपूर्वक त्यातला एकेक गळ वेगळ्या चिंधुकलीत गुंडाळून ठेवीत होती. लंगडत लंगडत तिच्या जवळून जाणाऱ्या पांतेलेयने तिच्याकडे चौकसपणे रोखून पाहिले. पतझडीच्या पानासारखे तिचे गाल पांढरे फटक पडले होते. एका महिन्यात ती खूपच हाडाडली होती. तिच्या डोळ्यात एक नवीनच करुण भाव आला होता. म्हातारा दाराशी थबकला. 'पोरीचा जीव घेतोय हा!' बाकावर वाकलेल्या नतालियाच्या तुकतुकीत मस्तकाकडे मागे वळून नजर टाकताना त्याच्या मनात विचार आला.

ग्रिगरी खिडकीजवळ बसला होता. कानशीच्या प्रत्येक फटाकऱ्यागणीक त्याची विस्कळीत झालेली काळीभोर बट हेलकावे खात होती.

'ठेवून दे ते सैताना!' एकाएकी तिरमिरीने काळानिळा होऊन म्हातारा ओरडला. काठी उगारण्याची अनीवार इच्छा दाबून टाकण्यासाठी त्याने काठी-वरची मूठ करकचून आवळली. ग्रिगरीने दचकून वर पाहिले.

'आणखी दोनच गळ घासायचेत, बाबा!'

'ठेवून दे म्हणतो ना ! लाकूड कापणीची तयारी कर !'

'आलोच आत्ता !'

'अजून घसरगाड्यांची काही व्यवस्था नाही न तू बसलायस गळाला धार लावीत !' त्याचा सूर जरा खाली आला होता. दाराजवळ तो जरा घुटमळल्या-सारखा झाला. त्याला काहीतरी बोलायचे आहे असे स्पष्ट दिसत होते. पण तो बाहेर गेला. उरलेला राग तो पेत्तोवर काढीत असलेला ग्रिगरीच्या कानावर आला.

'अजून गुराना पाणी दाखवलं नाहीस का रे--? आणि कुंपणाजवळच्या त्या भाळीत कोण कारभार करायला गेल ? तिला हात लावू नका म्हणून बजावलं होतं ना ? सगळं करपेल गवत उधळून टाकाल भोसडीच्यानो ! वसंतात बैलाना खायला रे काय घालाल ?'

गुरुवारी पहाटेस चांगल्या दोन घटका अवकाश असतानाच इलिनीचनाने दाऱ्याला उठवले,

'ऊठ ! चुलीत विस्तू घालायची वेळ झाली !'

दाऱ्या खमिसातच धावत चुलीपाशी गेली. कुठल्यातरी काटक्या शोधून तिने चूल पेटवली.

'खायचं कर लौकर !' खोकत खोकत चुट्टा शिलगवणाऱ्या आणि केस विस्कटलेल्या पेत्रोने आपल्या बायकोला तगादा लावला.

'त्या नतालियाला का नाही कुणी उठवायला जात ? लोळत पडलयेय बेशरम ! मी काय दोन तुकडे करू का काय माझे ?' अद्याप डोळ्यावर पेंग असलेली दाऱ्या कुरकुरली.

'जा न् तूच उठव तिला !' पेत्रोनें तिला सल्ला दिला. पण त्या सल्ल्याची आवश्यकता नव्हती. कारण नतालिया आधीच उठली होती. अंगात ब्लाऊज घालून ती चुलवणाचं सरपण आणायला गेली.

'थोडं पेटवण घेऊन ये !' जावेने हुकूम सोडला.

'दुन्याला पानी भरायला सांग ! ऐकलंस का ग दाऱ्या ?' कष्टाने स्वयंपाक-घरात इकडे तिकडे करीत इलिनीचनाने घोगऱ्या स्वरात सांगितले.

ताज्या शॅपचा, घोड्याच्या फरसावाच्या सामानाचा, मानवी शरीरांच्या उबेचा एकच वास त्या सायवानाला येत होता. नमदी बूट घातलेलें पाय जमिनीवर कटकटत दाऱ्या वावरत होती. भांड्यांचे खडखडाट करीत होती. गुलाबी खमिसा-खालून तिचे लहानसे उरोज हेलकावत होते, संसार पाठीशी लागला तरी ती

विटली वाळली नव्हती. उंच, नाजुक आणि वळुंजीच्या छडीप्रमाणे सडसडीत बांध्याची दाऱ्या लहान मुलीसारखी दिसायची. खांदे घुसळत ती चालायची. नवरा गरजला की हसायची. तेव्हा तिच्या लबाड ओठाआडून दाताची सान्द्र ओळ चमकायची.

'काल संध्याकाळीच गोवऱ्या आणून ठेवायला हव्या होत्या! आतापर्यंत चुलीत वाळल्या असत्या!'

'विसरले मी आई! त्याला काय करणार?' सगळयांच्या वाटचे दाऱ्याने उत्तर दिले.

जेवण तयार होईपर्यंत पहाट झाली. पांतेलेयने खीर फुंकून पीत भराभरा न्याहारी उरकली. ग्रिगरी हळूहळू आणि आपल्याच तंद्रीत असल्यासारखा खात होता. त्याचे दाभाड वरखाली होत होते. बापाची नजर चुकवून पेत्रो दुन्याला चिडवीत होता. दुन्याचा दात दुखत होता म्हणून तिने तोंडावरून रुमाल बांधला होता.

घसरगाड्या हाकणाराचे आवाज रस्त्यावरून येत होते. गडद पहाट असतानाच बैलाच्या घसरगाड्या खाली नदीच्या दिशेने निघाल्या होत्या. आपल्या घसरगाड्या जुंपायला ग्रिगरी आणि पेत्रो बाहेर पडले. बायकोने दिलेला रुमाल जाताजाता ग्रिगरीने गळयाभोवतीं गुंडाळला आणि सुक्या गोठवल्या हवेचे घुटके घेतले. डोक्यावरून एक डोंबकावळा कर्कश कावकाव करीत गेला. त्याच्या पंखांची फडफड त्या गोठल्या निवांततेत स्पष्ट ऐकू येत होती. त्याची भरारी बघून पेत्रो म्हणाला,

'दक्षिणेच्या गरम मुलुखाकडं निघालाय!'

एखाद्या किशोरीच्या स्मिताप्रमाणे आनंदविभोर दिसणाऱ्या गुलाबी ढगामागून चंद्राची चिमुकली कोर मंदपणे तळपत होती. धुराड्यातून उठणारे धुराचे खांब अफाट दूरवर असणाऱ्या चंद्राच्या पात्याकडे पोचू बघत होते.

मेलेखोव्हच्या घरासमोरचा प्रवाह अद्याप पुरता गोठला नव्हता. पाटलोटाच्या कडेचा बर्फ टणक आणि वाहून आलेल्या हिमस्तरांनी हिरवटला होता त्या बर्फाखाली कडेचे पाणी खळखळत होते. काळ्या समुद्रातील प्रवाह जिथून वाहात होते त्या मध्याच्या पलीकडे झिजलेल्या ढवळाईतून बर्फातील भगदाड कभिन्नपणे आणि दहशत दाखवीत फाकले होते. हिवाळ्याला आलेल्या जंगली बदकांचे पिवळे ठिपके पाण्यावर दिसत होते.

चौकातून गाड्या चालल्या होत्या. पांतेलेय आपल्या बडक बैलांची जोडी

घेऊन निघून गेला. त्यानंतर काही वेळाने पेत्रो आणि ग्रिगरी त्याच्या मागून निघाले. ओलांडणीकडे गेलेल्या दरडीच्या उतारावर पेत्रो आणि ग्रिगरीने आनीकुशकाला गाठले. त्याच्या घसरगाडीतून कुऱ्हाडीचा कोरा दांडा बाहेर डोकावत होता. रुंद हिरवा बस्ता गुंडाळून बैलांच्या बरोबरीने तो चालला होता. त्याच्या खुरट रोगट बायकोनें हातात बैलांचे पाग धरले होते.

'कसं काय शेजारी ? बायकोला पण नेतोयस का काय ?'

अंगात ऊब येण्यासाठी टणाटणा उड्या मारीत जाणाऱ्या आनीकुशकाने दात विचकले आणि तो ह्या बंधूजवळ आला.

'होय नेतोय ! अंगात जरा ऊब यायला !'

'ती कसली तुला ऊब देणार ? अंगावर मास तरी आहे का ?'

'खरांय ! रोज तिला ओट चारतो ! पण अंग काही धरत नाही !'

'एकाच पट्ट्यावर आपण तोडणी करायचीय का ?' घसरगाडीतून उडी मारून ग्रिगरीने विचारले.

'करू या ! चुट्टा दिलास तर !'

'तू लेका लाटचा गंगाजी आहेस अनिकेय !'

'जगातल्या सगळ्या मिठ्ठास चिजा भीक मागून किंवा चोरी करूनच मिळत असतात !' आपल्या निर्लोभ बायकी चेहऱ्याला सुरकुत्या पाडीत फिदीफिदी हंसत अनीकुशका म्हणाला.

तिघेजण बरोबर गाड्या हाकू लागले. दहिंवराची आणि अक्षत धवलतेची कलाबूत रानात पसरली होती. डोक्यावरील फांद्या चाबकाने झोडपीत आनीकुशकाने गाडी पुढे काढली. गोठलेल्या हिमाच्या सुयांसारख्या किलच्यांची त्याच्या बायकोच्या अंगावर बरसात होत होती.

'चावटपणा करू नको रे, सैताना !' अंगावरील बर्फ झटकून टाकीत ती ओरडली.

'बरफ जंबाळ्यात उभी कर तिला ! खाली डोकं वर पाय करून बैलानी पळावे म्हणून त्यांच्या पोटऱ्यात चाबकाने ढोशीत पित्रोने सुचविले.

रस्त्याच्या वळणावर त्याना स्तिपान अस्ताखोव भेटला. दुहेरी जूं घातलेले आपले बैल तो परत खेड्याकडे हाकारीत होता. त्याच्या नमदी बुटांचे रबरी तळ बर्फावर करम्‌करम् वाजत होते. पांढऱ्या द्राक्षांचा घोस लटकल्यासारख्या त्याच्या कुरळ्या बटा लोकरी टोपीतून लोंबत होत्या.

'ए स्तिपान ! वाटबीट चुकलास काय ?' तो जवळून जाताना अनिकुशकाने ओरडून विचारलं.

'च्यायला वाट चुकतोय म्हणे ! वळण घेताना गाडी एका बुंध्यावर आदळली न् चाकाचा पाटा निसटला ! तेव्हा परत जायला हवं !' असे म्हणून स्तिपानने एक कचकून शिवी घातली. पेत्रो पुढून जाताना त्याच्या उग्रट डोळ्यांची पाती आकुंचित झाली.

'गाडी मागच ठेवून चालला काय ?' मान मुरडून आनिकुशकाने विचारले.

त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत स्तिपानने चाकोरी सोडून जाणाऱ्या बैलावर काडकन चाबूक ओढला आणि ग्रिगरीच्या अंगावरून जाताजाता आपली अपलख नजर बराच वेळ त्याच्यावर रोखून धरली ! थोडे पुढे गेल्यावर ह्या मंडळींना रस्त्याच्या मधेच टाकून दिलेली घसरगाडी दिसली. तिच्या जवळ आक्सिनिया उभी होती. अंगावरच्या मेंढेकातडीचीं टोके डाव्या हातात गच्च पकडून त्यांच्या दिशेने ती रस्त्याकडे टक लावून बघत होती.

'अग ए ! बाजूला हाट ! नाहीतर घालतो गाडी अंगावर ! अरंतिच्या ! तू तर माझी बाईल !' आनिकुशका गरजला.

हसत हसत आक्सिनिया बाजूला झाली आणि उलथलेल्या गाडीवर बसली.

'तुझी अस्तुरी आहे नं तुझ्या संगती ?'

'खराय ! डुकराच्या शेपटीतल्या गोचिडीसारखी ती चिकटल्येय मला ! हीतर तुला सवारी दिली असती माझ्या गाडीत !'

'उपकारच आहेत माझ्यावर !'

तिच्या जवळ पोहोचला तशी पेत्रोने झटकन मागे वळून ग्रिगरीकडे नजर टाकली. ग्रिगरी कसनुसे हसत होता. त्याच्या सगळ्या हालचालीतून अवघडलेपणा आणि उत्सुकता प्रकटली होती.

'बरी आहेस ना शेजीबाई ?' हातमोज्यातून बाहेर आलेल्या बोटांनी टोपीला स्पर्श करीत पेत्रोने तिला सलाम करीत विचारले.

'देवाची कृपा.'

'काय गाडी मोडली वाटतं ?'

'हो. मोडली.' पेत्रोकडे न बघता तिने मंद स्वरात उत्तर दिले. उभी राहात ती ग्रिगरीकडे वळली.

'ग्रिगरी पांतेलेइविच ! तुमच्याशी बोलायचंय थोडं !' असे म्हणून ती त्याच्याजवळ आली.

ग्रिगरी तिच्याकडे वळला आणि पुढे जाणाऱ्या पेत्रोला म्हणाला, ' माझ्या बैलांकडं बघ जरा. '

' आ हां ! आ हां !! चुट्टयाच्या धुराने कडवटलेले मिशीचे टोक चघळीत पेत्रो फाजीलपणे हसला.

एकमेकांकडे बघत ती दोघे निःशब्द उभी होती. आक्सिनियाने सावध नजरेने आजूबाजूला पाहिले आणि आपली वितळती काळीकरंद दिठी परत ग्रिगरीच्या चेहऱ्यावर रोखली. लाजेने आणि आनंदाने तिची कानशिले तापून उठली आणि ओठाना कोरड पडली. तिचा श्वासोश्छ्वास वेगाने होऊ लागला.

रस्त्याच्या वळणावरून आनिकुशका आणि पेत्रो उदी रंगाच्या ओकच्या बुंध्यापलीकडे दिसेनासे झाले.

ग्रिगरीने आक्सिनियाच्या डोळ्यात खोलवर रोखून पाहिले. जिद्दी बेगुमानपणाने ते धगधगत होते.

' ग्रिशा ! काहीही कर पण तुझ्याशिवाय मला जगणं अशक्य आहे ! ' ती नग्रहाने म्हणाली आणि त्याच्या उत्तराच्या प्रतिक्षेने तिने ओठ घट्ट आवळून घेतले.

ग्रिगरीने काहीच उत्तर दिले नाही.

रानात कडेकोट निरवता होती. एक आरस्पानी सुन्नपणा त्याच्या कानात घुमत होता. रस्त्याचा पृष्ठभाग– गाडीच्या पाटचाखाली स्वच्छ, गुळगुळीत झालेला– आकाशाचे विटके वस्त्र, चिडीचिप.... मरणोन्मुख ग्लानीत असलेले रानमाळ.... अचानक जवळून कुठूनतरी कावळ्याची कावकाव कानावर पडून ग्रिगरी त्या क्षणैक तंद्रीतून भानावर आल्यासारखा झाला. त्याने मान वर करून निःशब्दपणे उडत जाणाऱ्या पाखराकडे टक लावून पाहिले. आपलेच बोलणे ऐकून त्याला आश्चर्य वाटले.

' त्याला ऊब मिळणार आहे ! उबेच्या दिशेनं निघालाय ! ' तो एकदम शहारल्यासारखा झाला आणि घोगऱ्या स्वरात हंसला.

' हं मग ! ' आपले धुंद नेत्र त्याने चोरट्यासारखे आक्सिनियाकडे वळवले आणि अकस्मात तिला मिठीत कवटाळले.

१.

हिवाळ्यातील संध्याकाळी खेडुतांचा एक लहानसा अड्डा लुकेशकाच्या घरातील स्तोकमनच्या खोलीत जमत असे. ह्यात क्रिस्तोनिया, तेलकट जाकीट खांद्यावरून घेतलेला गिरणीतील 'गुड्डू' सदा हसतमुख दावीद (गेले तीन महिने तो गटाळच्या घालीत होता), एंजिनवाला इवान अलेक्सिएविच कोतलियारोव हे होते. फिलका हा चांभार कधीकधी यायचा. मिशका पोशेवोई हा कझाक मात्र न चुकता येत असे. अजून त्याने नियमित फौजी चाकरी केलेली नव्हती.

प्रथम हा अड्डा पत्ते खेळायचा. मग स्तोकमनने सहजगत्या नेक्रासोवच्या कविताचे पुस्तक बाहेर काढले. त्यातल्या कविता ते मोठ्याने वाचू लागले. त्या त्याना आवडू लागल्या. मग त्यानी निकीतीन वाचला. नाताळाच्या सुमारास स्तोकमनने पाने दुमडलेले एक सुटे चोपडे वाचायची सूचना केली. कोशेवोई गिरणाघराच्या शाळेत शिकला होता. त्याला मोठ्याने वाचता येत असे. त्या चोपड्या कळकट पानांकडे त्याने तुच्छतेने पाहिले.

'ह्याच्या शेवया वळायला हरकत नाही इतकं तेलकट झालंय चोपडं!' तो किळस आल्यासारखा म्हणाला.

क्रिस्तोनियाने हास्याचा गडगडाट केला. दाविदच्या तोंडावर हास्य झळकले तो खकाणा खाली बसेपर्यंत स्तोकमन थांबून राहिला. मग म्हणाला,

'वाच हे मिशा! मजेदार आहे! सगळं कझाकांबद्दल लिहीलंय!'

मेजावर मुंडी खाली वाकवून कोशेवोईने परिश्रमाने अक्षरे लावीत वाचले.

'डॉन कझाकाचा संक्षिप्त इतिहास'

कोशेवोईने उत्सुकतेने आजूबाजूला नजर टाकली.

'वाच!' कोतलियारोव म्हणाला.

तीन दिवस रोज संध्याकाळी त्यानी ते पुस्तक मेटाकुटीने वाचले. गतकाळांतील स्वच्छंदी जीवन, पुगाचोव, स्तेन्का रेझिन आणि कोन्द्राती बुलाविन ह्यांच्याबद्दल त्यात सांगितलेले होते. अखेरीस ते आधुनिक काळापर्यंत येऊन ठेपले. त्या अनाम लेखकाने कझाकांच्या भिकार जीवनाची खरडपट्टी काढली होती. अंमलदार, त्यांचा कारभार, झार सरकार, बादशहाचे हुजरे बनलेली कझाक जमात ह्यांची त्याने टर उडवली होती. ऐकणारांची डोकी भणाणून गेली. आपसात ते तंडू लागले. आढ्याला डोके लागणारा क्रिस्तोनिया आपल्या घणघणत्या

आवाजात बोलू लागला. स्तोकमन दाराजवळ बसून नळीत चुट्टा घालून ओढत होता. त्याचे डोळे हसत होते.

'त्याचं बरोबर आहे ! हे सगळं खराय !' क्रिस्तोनिया गरजला.

'कझाकांची अशी बेअब्रू झाली हा आमचा दोष नव्हे !' कोशेवोईने गोंधळून गेल्यासारखे हात दोन्ही बाजूला पसरले. त्याच्या देखण्या चेहऱ्यावर आठ्या पडल्या.

तो ठोसर बांध्याचा होता. रुंद खांदे आणि रुंद कटिप्रदेश ह्यामुळे त्याला जवळजवळ चौकोनी आकार आला होता. त्याच्या देहाच्या ओतीव पोलादी तळावर भरलेली विटकरी गर्दन उभारली होती. त्याचा डौलाचा मूर्धन्यप्रदेश काहीसा आगळाच होता. गालाना बायकी मार्दव होते. तोंडाची लहानशी ठेवण रंगेल होती. काळेभोर डोळे आणि वरती कुरळ्या केसांचे सोनेरी शिल्प.
एंजिनवाला कोतल्यारोव उंच आणि बारीक चणीचा कझाक होता कझाक परंपरेत नखशिखान्त मुरलेला होता. कझाकांची बाजू उचलून धरताना त्याचे गोल वटबटीत डोळे धगधगत होते.

'कुणबट आहेस क्रिस्तोनिया ! कझाक रक्ताचा तुझ्यात नावाला थेंब आणि वादलीभर पाणी आहे ! तुझ्या आईला वोरोनेझच्या कुणबटापासून झालेली औलाद आहेस तू !'

'तू मूर्ख आहेस ! भाऊ, तू मूर्ख आहेस !' क्रिस्तोनियाने गडगडाट केला 'आपली बाजू खऱ्याची आहे !'

'मी काही हुजुरातीत नव्हतो !' कोतलियारोव हळूच म्हणाला, 'तिथे सगळेच मूर्ख आहेत !'

'उरलेल्या फौजेत तर तद्दन गहाळ प्रकर्ण आहेत !'

'चूप कुणबटा !'

'आणि कुणबटं झाली तरी तुमच्यासारखी माणसंच आहेत ना ?'

'ही कुणबटं आहेत ! फोलपटांचे देह आणि टाकळीचे पिंड बनवलेत ह्यांचे !'

'मी पीटर्सबर्गमधे चाकरीला होतो ना भाऊ तेव्हा खूप गोष्टी पाहिल्यात!' ख्रिस्तोनिया म्हणाला. त्याचे दक्षिणी उच्चार जास्तच ठाशीव झाले होते. 'एकदा काय झालं, झारच्या वाड्यावर आमचा आत बाहेर पहारा होता. आम्ही घोड्यावर बसून तटाच्या भोवतालनं फिरायचो ! दोन इकडून दोन तिकडून. आमनेसामने आलो की आम्ही विचारायचो, 'सब ठीक ? दगाफटका नाही

कुठं ?' एवढंच विचारून परत आपले चालले पुढं ! थांबून गप्पा मारायची इजाजत नव्हती ! आमच्या चेहऱ्यामोहऱ्यावरून आमची निवड व्हायची ! दरवाज्यावर आमची पहाऱ्याची पाळी आली म्हणजे अशी जोडी निवडायचे की ज्यांचा चेहरामोहरा आणि कद मिळता जुळता असेल ! काळयाला काळी आणि गोऱ्याला गोरा ! नुसते केस नाहीतर तोंडवळाही एकसारखा लागायचा ! ह्या आचरटपणापायी एकदा न्हाव्याला माझी दाढीही रंगवायला लागली ! आमच्या रिसाल्यातील एका कझाकाबरोबर माझी पहाऱ्याची पाळी होती. त्याचे केस धुरकट होते ! कसा काय त्याला रंग आला होता भगवान जाणे ! चुलह्यावर करपून घेतले होतेन् का काय कोण जाणे ! अख्खा रिसाला धुंडला तरी त्याला मिळता–जुळता मिळेना ! तेव्हा रिसालदारानं मला बोलावून घेतलं न् न्हाव्या-कडून माझ्या दाढीला डूब दिली ! नंतर जेव्हा मी आरशात पाहिलं तेव्हा जीव फाटून गेला. आग लागल्यासारखा दिसत होतो मी. शप्पथ ! तिथं बोट लावलं तर चटका बसेलसं वाटायला लागलं !'

'लागली ह्याची शिदोरी सुटायला ! पण आपण बोलत कशाबद्दल होतो ?' कोतल्यारोव त्याला मधेच थांबवून म्हणाला.

'लोकांबद्दल !'

'हां ! तर त्यांच्याबद्दल बोल की ! तुझ्या दाढीचं चऱ्हाट आमच्या पुढं कशाला वळतोय्स ?'

'हा . . . ! तर मी सांगत होतो की एकदा माझी गस्तीची पाळी होती ! आम्ही घोड्यावरून चाललो होतो ! मी आणि माझा साथीदार ! एवढ्यात पोरांची एक झुंड कोपऱ्यावर आमच्याकडं धावत आली ! माशांचा थवा यावा तशी आली ती ! आम्हाला पाहिल्याबरोबर त्यांनी गर्जना केली. 'होऽऽऽ !' मग परत 'होऽऽऽ !' काय होतंय ते आम्हाला कळायच्या आत त्यांनी आम्हाला घेराव घातला !'

'कशासाठी रपेट चालल्येय कझाकांनो ?' मी म्हणीतलं.

'आम्ही गस्त घालतोय ! घोड्याच्या ओढाळीचे हात काढ ए पोरा !' असं म्हणून मी तलवारीला हात घातला !

'कझाका ! मला असा तसा समजू नको ! मी स्वत: कामेनस्काया जिल्ह्यातला आहे ! मी इथल्या कालिजात किंवा कलिजात म्हणा शिकतोय !' त्यातला एकजण म्हणीतला. आम्ही पुढं जायला निघालो ! तशी फताड्या नाकाच्या एका पोरानं दहा रुबलची नोट काढली ! म्हणीतो कसा–

'माझ्या मेलेल्या बापाच्या नावानं ह्याची दारू प्या !' मग खिशातून एक फोटु काढून कसा म्हणतो,

'हा पहा माझा बाप ! राहू द्या तुमच्याजवळ आठवण म्हणून !' आम्ही घेतला ! नाही कसं म्हणायचं ? ती पोरं परत खिदळत निघून गेली ! मग आम्ही नेवस्की सडकेकडं निघालो ! तेवढ्यात वाड्याच्या मागच्या दरवाज्यातून एक जुमलेदार काही राऊत बरोबर घेऊन घोडा फेकीत आला !

'काय झालं ?' तो गरजला !

मी सांगितलं की कालीजातली पोरं येऊन आमच्या संग बोलायला लागली होती ! हुकमानुसार आम्ही त्यांच्यावर तलवार घालणार होतो ! पण त्यांनी आम्हाला सोडलं म्हणून आम्ही पुढं निघालो ! पुढं कामाची पाळी संपल्यावर आम्ही नाईकला दहा रूबल मिळाल्याचं सांगितल ! त्याला तो फोटो दाखवून 'ह्याच्या नावान आज पिणार' म्हणून सांगितलं ! संध्याकाळी नाईक व्होडका घेऊन आला ! दोन दिवस चंगळ केली ! पण नंतर आम्हाला त्यातली गोम कळली ! त्या पोरानं रांडीच्यानं आम्हाला जर्मनीतल्या सगळ्यात गाजलेल्या दंगलखोराच चित्र दिलं होतं ! मी आपलं ते माझ्या बिछान्यावर लावलं होतं ! त्या माणसाला पिकलेली दाढी होती ! मोठा खानदानी वाटत होता. [illegible] बिटजीसारखा दिसत होता ! जुमलेदारान ते पाहिल आणि विचारलं.

'काय रे ए भडव्या ! कुठनं आणलं हे चित्र ?'

मी त्याला सांगून टाकलं. तशी शिवीगाळ करीत माझ्या कानफटात द्यायला लागला.

'तुला ठाऊक आहे रे कोण आहे हा ? हा त्यांचा आतामन कार्ल–!' च्यायला विसरलो सालं नाव–! काय बरं होतं–?'

'कार्ल मार्क्स ?' रुंद हंसत स्तोकमनने सुचवले.

'अंगास्स ! कार्ल मार्क्स' क्रिस्तोनिया आनंदाने उद्गारला.

'त्यानं मला चांगलं गोत्यात आणलं होतं. छोटे सरकार अलेक्सेई आपल्या मास्तराला घेऊन पुष्कळदा रखवालीच्या खोलीत यायचे ! त्यांनी ते पाहिलं ही असतं ! अन् मग काय झालं असतं ?'

'आणि तू कुणबटांचे गोडवे गातोय्स ! तुला चांगला बनवला त्यांनी !' कोतल्यारोव हसून म्हणाला.

'अरे पण दहा रुबलची प्यालो ना ! त्या दाढीवाल्या कार्लच्या नावानं का होईना पण झोकली का नाय ?'

'त्याच्या नावानं ध्यात्री अशीच त्याची योग्यता आहे!' आपल्या सिगरेट होल्डरशी खेळत स्टॉकमन स्मित करून म्हणाला.

'का? त्यानं कोणतं सत्कृत्य केलंय?' कोशेवोईनं चौकशी केली.

'पुन्हा कधीतरी सांगेन. आज उशीर झालाय.' स्तोकमनने नळी बोटांच्या पकडीत धरली आणि दुसऱ्या हाताची थापटी मारून जळालेले थोटूक बाहेर उडवले.

बरेच दिवस चालण्या-चाखण्याचा घोळ घालून झाल्यावर ह्या दहा कझाकांचा अड्डा स्तोकमनच्या लोहारशाळेत नेमाने जमू लागला. स्तोकमन म्हणजे त्या अड्ड्याचा जीव आणि प्राण होता. फक्त त्यालाच ज्याची समज होती त्या ध्येयाच्या दिशेने तो कार्य करीत होता. लाकडात शिरलेल्या भुंग्याप्रमाणे त्याने त्यांच्या भाबड्या समजुती आणि संकल्पना पोखरून टाकल्या. त्यांच्या समाज-व्यवस्थेबद्दल त्याने चीड आणि तिरस्कार निर्माण केला. सुरवातीला त्याचा मुकाबला अविश्वासाच्या थंड पोलादाशीच झाला. पण तो हार खाणारा नव्हता. पोलादही पोखरता येतं!

१०.

डॉनच्या डाव्या कांठच्या बरड उतारावर व्येशेन्स्काया गाव वसलेला आहे. डॉनच्या वरच्या खोऱ्यातील हा सगळ्यात प्राचीन गाव. ह्याचे मूळचं नाव चिगोनाकी. पहिल्या पीटरच्या कारकीर्दीत इथलं गांवठाण उठवल्यानंतर नवीन जागेवर हा गांव वसवण्यात आला. आणि त्याला व्येशेन्स्काया हे नवीन नाव देण्यात आलं.

व्येशेन्स्कायाच्या समोर तातार. धनुष्यासारखे वाकण घेऊन डॉनचा प्रवाह जो सप्कन उजवीकडे वळला आहे तो बाझकी ह्या लहानशा खेड्याजवळ राजबिंड्या दिमाखाने ताठ झाला आहे. पश्चिम थडिव्यावर असलेल्या टेकड्यांच्या खडूळ तळवटीवरून वाहणारा तो हिरवट निळा जलौघ उजव्या काठी खेड्यांचे दाट पुंजके आणि डाव्या काठची मधून मधून लागणारी गावे मागे टाकीत समुद्राला निळ्या आझोव समुद्राला जाऊन भेटला आहे. अुस्त खोपेरस्काया इथे हा प्रवाह

अंग कमरेखाली लचकवीत चुलीजवळ गेली. सायवानात पसरून राहिलेली नि:शब्दता बकरीच्या व तिच्या नवजात वासराच्या जोरजोराने होणाऱ्या श्वासोश्छ्वासानेच काय ती भंग पावत होती.

सूप भुरकत असतानाच ग्रिगरीने नतालियाकडे नजर टाकली. पण तिचा चेहरा त्याला दिसू शकला नाही. त्याच्या आडव्या अंगाला ती बसली होती. हातातल्या विणकामाच्या सुयांच्या दिशेने तिने मान खाली घातलेली होती. त्या एकूण शांततेने बोलण्याची चेतावणी प्रथम पांतेलेयाला दिली. बळेच खोकत तो म्हणाला,

'नतालिया माहेरी जायचं म्हणत्येय.'

पावाच्या तुकड्यांचा गोळा करीत ग्रिगरी गप्पच बसून राहिला.

'असं का म्हणून ?' त्याच्या बापाने विचारले. त्याचा अधरोष्ठ थरथरत होता. येऊ घातलेल्या विवशतेच्या उद्रेगाची तो पहिली खूण होती.

'मला ठाऊक नाही.' उठून उभा रहात ग्रिगरीने उत्तर दिले आणि अंगावर क्रूसाची निशाणी केली.

'पण मला ठाऊक आहे नं ! त्याच्या बापाने आवाज चढवला.

'ओरडू नको ! ओरडू नको !' इलिनिचनामधे पडली.

'अरे पण मी जाणतोना !' पांनिलेय म्हणाला.

'खरंच ! आरडा ओरडा करायचं काही कारण नाही !' खिडकी सोडून खोलीच्या मध्यावर येत पेत्रो म्हणाला, 'तो तिचा प्रश्न आहे. तिला रहायचं असेल तर राहील ! नसेल रहायचं तर देवाची मर्जी !'

'मी तिला नाही दोष देत ! अर्थात नवऱ्याला टाकून देणं म्हणजे बेअब्रू आहे ! देवाच्या घरी पाप आहे ! पण मी तिला दोष देत नाही ! तिची काही चूक नाही ! चूक आहे ह्याच रांडिच्याची ! चुलीजवळ शेक घेत बसलेल्या ग्रिगरींवर पांतिलेयने बोट रोखले.

'मी कुणाचं काय वाईट केलं ?' ग्रिगरीने विचारले.

'माहीत नाय तुला ? माहीत नाही तुला सैताना ?'

'नाय माहीत !'

पांतिलेयने उडी मारली तसा बाक कोलमडला. तो ग्रिगरीच्या जवळ गेला. नतालियानं मोजा खाली टाकला. तिच्या हातातील सुया जमिनीवर खणखणल्या. तो आवाज ऐकून एका मांजराच्या पिलाने चुलीच्या ओटयावरून खाली उडी मारली आणि वळवळलेल्या डावलीने ते तो लोकरीचा गुंडा पेटीकडे थापटू लागले.

' मला तुला जे सांगायचंय ते हे !' म्हातारा हळू हळू विचारपूर्वक बोलू लागला. ' तुला जर नतालियाबरोबर रहायचं नसेल तर ह्या घरातून चालता हो ! आणि जा कुठं वाट फुटेल तिकडे ! हेच मला तुला सांगायचंय ! कुठं वाट फुटेल तिकडं जा !' थंड आवाजात त्याने पुन्हा सांगितले. आणि मागे वळून ते पडलेले बाकडे उचलून नीट केले.

दुन्या अंथरुणात बसली होती. तिचे विलोल भयभीत नेत्र इकडून तिकडे भिरभिरत होते.

' हे मी काही रागानं बोलत नाही बाबा ?' ग्रिगरीच्या आवाजात सकंप घोगरेपणा आला होता. ' मी काही माझ्या मनानं लग्न केलं नाही ! तुम्हीच माझं लग्न लावून दिलंत ! नतालियापुरतं बोलायचं तर मी काही तिला थांबवीत नाही ! तिला हवं असेल तर जाऊ दे तिला माहेरी !'

' तू स्वत:च चालता हो !'

' होतो !'

' जा–मसणात जा !'

' जातो–! जातो–! एवढी घाई करू नको !' बिछान्यावर पडलेल्या मेंढेकातडी कुडत्याची बाही पकडीत ग्रिगरी म्हणाला. त्याच्या नाकपुड्या फुगल्या होत्या. उकळत्या क्रोधाने त्याचा सबंध देह थरथरत होता. त्याचा क्रोध बापासारखाच होता. सरमिसळ झालेले तेच तुर्की आणि कझाक रक्त त्याच्या धमन्यातून वाहात होते आणि ह्या क्षणी तरी त्याचे एकमेकाशी साम्य अनन्यसाधारण होते.

' कुठं चाललास तू ?' ग्रिगरीचा दंड पकडीत इलिनिचना विव्हळली. तिला जोराने ढकलून देऊन त्याने आपली लोकरी टोपी उचलली.

' जाऊ दे त्याला–! गटारातल्या डुकराला ! जाऊ दे त्याला ! नष्ट होऊ दे ! जा ! जा !! जा !!! चालता हो !' दार सत्ताड उघडून म्हातारा कडाडला.

ग्रिगरी धावत पावलाण उतरून गेला. शेवटचा त्याने ऐकलेला आवाज नतालियाच्या अनिवार रुदनाचा होता. गोठवल्या रात्रीने खेड्याला मिठी घातलेली होती. कृष्ण आभाळातून बोचणारे हिम पडत होते. डॉनवरील तडकणाऱ्या बर्फाचे आवाज तोफेच्या बारासारखे घुमत होते. धापा टाकीत ग्रिगरी फाटकातून धावत बाहेर गेला. खेड्याच्या दूर टोकाला कुत्री बेसूर भुंकत होती. गोठलेल्या धुक्यातून उजेडाचे पिवळे ठिपके चमकत होते.

रस्त्यावरून शून्यपणे तो चालत होता. आस्ताखोवच्या खिडक्यांची काळोखी हिऱ्याच्या प्रभेसारखी चमकत होती.

'ग्रिशा !' फाटकातून नतालियाने मारलेली व्याकूळ हाक त्याच्या कानावर आली.

'खड्डयात गेलीस ! वैरिणी !' ग्रिगरीने दात खात आपल्या चालण्याचा वेग वाढवला.

'ग्रिशा, परत ये !'

पहिल्याच आडव्या गल्लीत तो झिंगल्यासारखा ठेचाळला. तिची दूरवरची व्यथित हाक त्याने शेवटी शेवटी ऐकली.

'ग्रिशा, लाडक्या !'

झपाट्याने चौक ओलांडून तो रस्त्या फाट्यावर थबकला. ओळखीच्या पोरांची नावे आठवीत कुणाकडे रात्र घालवावी असा तो विचार करू लागला. मिशा कोशेवाईकडे जायचे त्याने ठरवले. आपली आई, बहीण आणि दोन लहान भावंडांबरोबर मिशा कोशेवोई एका एकाकी झापाच्या घरात टेकडीजवळच रहात असे. ग्रिगरीने त्यांच्या अंगणात प्रवेश करून चिमुकल्या खिडकीवर टकटक केले.

'कोण आहे ?'

'मिशा आहे का ?'

'आहे ! कोण आलंय ?'

'मी आहे ! ग्रिगरी मेलीखोव !'

मिनिटभराने पहिल्या झोपेतून जागा झालेल्या मिशाने दार उघडले.

'ग्रिशा, तू ?'

'मीच !'

'ह्या अवेळ रात्रीचं काय काम काढलंस ?'

'मला आत घे ! आत बोलू या !'

पडवीत ग्रिगरीने मिशाचे कोपर पकडले आणि योग्य ते शब्द न सुचल्या-बद्दल स्वतःला शिव्या देत तो कुजबुजला, 'रात्र तुझ्या इथे काढायचीय मला ! घरच्या लोकांशी भांडून आलोय मी ! माझ्यासाठी खोली आहे का ? कुठंही चालेल !'

'कुठं तरी करतो सोय ! कशाबद्दल भांडण झालं ?'

'नंतर सांगेन तुला ! इथं दार कुठाय ? मला काही दिसत नाही !'

बाकावर त्यानी ग्रिगरीला अंथरुण घालून दिले. मिशकाची आई आपल्या

मुलींच्याच अंथरुणात निजली होती. तिची कुजबुज ऐकू येऊ नये म्हणून ग्रिगरीने मेंढेकातडी डोक्यावरून ओढून घेतली आणि तो विचार करीत पडून राहिला. घरी आता काय चालू असेल असा विचार त्याच्या मनात आला. नतालिया माहेरी जाईल का? काही असो. आयुष्याला एक वेगळी कलाटणी मिळाली होती. आपण आता कुठे जावे? प्रश्नाचे उत्तरही मागोमाग झपाट्याने आले. उद्या आपण आक्सिनियाला बोलावून घ्यायचे आणि तिच्याबरोबर इथून दूर दूर कुबानला जायचे— खूप खूप दूर!

पसरत गेलेले माळरान, खेडी, गावे— अनोळखी... निष्प्रेम... ग्रिगरीच्या मिटलेल्या डोळ्यांपुढे हे सारे तरळत होते. टेकड्यांच्या रांगापलीकडे. लांबलचक करड्या रस्त्याच्या पलीकडे....निळ्या आकाशाची, आक्सिनियाच्या प्रीतीची, परिकथेतील वाहणारी भूमी होती. अवेळी आलेल्या बहाराच्या बंडखोरपणाने ती प्रीती जास्तच आकर्षक बनलेली.

अज्ञाताच्या चाहुलीने त्याची झोप चाळवत होती. अखेरीस डोळा लागण्यापूर्वी आपल्या मनावर कशाचे दडपण आलेले आहे ह्याची तो आठवण करू लागला. त्या पेंगलेल्या अवस्थेत त्याचे विचारधारेबरोबर जाणाऱ्या जहाजासारखे सहज आणि संथपणे वाहात होते. पण एवढ्यात भाटीवर आदळणाऱ्या जहाजाप्रमाणे ते विचार कशावर तरी येऊन ठेचाळत होते. दिङ्मूढ करणाऱ्या त्या व्यवधानाशी तो झुंजत होता. त्याच्या मार्गात हे काय आडवे आले होते?

सकाळी उठल्यावर ते काय ते त्याला अचानक आठवले. त्याची फौजी नोकरी! आक्सिनियाबरोबर तो कसा जाणार? वसंतात शिबीर होईल. पतझडीच्या मोसमात फौजेत दाखल व्हावे लागेल.

त्याने थोडीशी न्याहारी केली आणि मिशाला बाहेर पडवीत बोलावले.

'मिशा, माझ्यासाठी अस्ताखोवच्या घरी जा. जातोस?'

त्याने विचारले. 'आक्सिनियाला म्हणावे की काळोख पडल्यानंतर पवनचक्कीपाशी ये.'

'आणि स्तिपानचं काय?' मिशाने चाचरत विचारले.

'सांग काहीतरी काम होतं म्हणून!'

'बरं! जातो!'

'नक्की ये म्हणावं तिला!'

'बरं बरं!'

संध्याकाळी ग्रिगरी चक्कीकडे गेला आणि तिथे चुट्टा ओढीत बसला. मनगटावरच्या बाहीत त्याने चुट्टा लपवून धरली होती. चक्कीच्या पलीकडे सुकलेल्या मक्याच्या दांडक्यावर वारा टकरत होता. साखळदंडाने बांधलेल्या निश्चल हवेच्या बंबावर फाटलेल्या कॅनव्हासची धांदोटी फडफडत होती. उडून जाऊ न शकणाऱ्या प्रचंड पक्षाने गिरणीभोवती पंखाची फडफड करावी तसा त्याचा आवाज येत होता. आक्सिनिया कुठे दिसत नव्हती. पश्चिमेला अंधुकत्या, सोनेरी मुलाम्याच्या जांभळाईत सूर्य बुडून गेला होता. पूर्वेकडून ताजे वारे वाहू लागले होते. वळुंजीत अडकून पडलेल्या चंद्राला काळोख गाठू लागला होता. पवनचक्कीच्या वरचे लालबुंद निळ्या–रंगछटांचे आकाश आता काळेकभिन्न झाले होते. दिवसाच्या गजबजीचे शेवटचे आवाज खेड्यावर तरंगत होते.

त्याने लागोपाठ तीन चुट्टे ओढले. शेवटचे थोटूक त्याने तुडविलेल्या बर्फात खुपसले आणि सचिंत उद्वेगाने तो आजुबाजूला पाहू लागला. चक्कीपासून खेड्या-कडे गेलेल्या अर्धवट पाघळत्या चाकोरीच्या काळवंडलेल्या खुणा बर्फात दिसत होत्या. दृष्टिपथात चिटपाखरू नव्हते. तो उभा राहिला. अंगाला आळोखेपिळोखे दिले आणि मिशाच्या खिडकीतून खुणावणाऱ्या लुकलुकत्या उजेडांच्या दिशेने तो निघाला. दाताच्या फटीतून शीळ घालीत तो अंगणाजवळ येत होता एवढ्यात आक्सिनियाच्या अंगावर तो आदळला. ती धावत आल्याचे दिसत होते. तिला धाप लागली होती. हिवाळी वाऱ्याच्या म्हणा किंवा माळरानातील ताज्या पर्येणाचा म्हणा– एक सूक्ष्म गंध तिच्या टवटवीत गारठलेल्या तोंडाला येत होता.

‘किती वेळ वाट बघत बसलो होतो ! वाटलं तू काही येत नाहीस !’

‘स्तिपानला वाटेला लावायचा होता !’

‘तुझ्यापायी गारठून गेलो चांडाळणी !’

‘मी गरम आहे ! तुला ऊब देते !’ लोकरीचे अस्तर लावलेला आपला ोट तिने उघडला आणि ओक वृक्षाला हॉपच्या लतेने वेढावा तसा त्याला पेटला.

‘का बोलावलंस ?’

‘हात बाजूला कर तुझे ! कुणीतरी येईल !’

‘घरच्यांशी भांडण झालं ?’

‘मी त्याना सोडलंय ! रात्र मिशाच्या घरी काढली ! आता बेघर कुत्रा झालोय !’

‘काय करणार आता ?’ आक्सिनियाने आपली मिठी सैल केली आणि शहारून कोट घट्ट लपेटून घेतला.

'तिकडं कुंपणाकडं जाऊ या ग्रिशा! रस्त्याच्या मधेच असं उभं नाही राहता यायचं.'

ते रस्त्यावरून बाजूला वळले. साचलेला बर्फ बाजूला लोटून ग्रिगरी थंडगार करकरत्या कुडाच्या कुंपणाला टेकला.

'नतालिया माहेरी गेली का काही ठाऊक आहे?'

'कुणास ठाऊक! मला वाटतं जाईल! इथं कशी रहाणार?'

आक्सिनियाचे गारठलेले हात ग्रिगरीने आपल्या कोटाच्या बाह्यात घेतले तिचे नाजुक मनगट दाबीत त्याने विचारले, 'आणि आपलं काय?'

'मला नाही ठाऊक राजा! तुला जे चांगलं वाटेल ते!'

'स्तिपानला सोडून देशील?'

'एका पायावर! म्हणशील तर आजच्या आज!'

'आपण कुठं तरी नोकरी बघू! कसेतरी राहू!'

'तू बरोबर असलास तर गाडीचं जूं सुद्धा खांद्यावर घ्यायला तयार आहे मी! तुझ्याबरोबर राहण्यासाठी काही वाट्टेल ते करेन!'

एकमेकांना ऊब देत ती दोघे लगटून उभी होती. ग्रिगरीला अंग चाळवावेसे वाटत नव्हते. वाऱ्याकडे तोंड करून तो उभा होता. त्याच्या नाकपुड्या थरथरत होत्या. पापण्या झाकलेल्या होत्या. आक्सिनियाने आपला चेहरा त्याच्या बगलेत खुपसला होता. त्याच्या घामाचा ओळखीचा धुंद करणारा गंध ती घेत होती आणि ग्रिगरीच्या नजरेपासून लपवलेले तिचे निलाजरे हावरे ओठ तृप्त सुखाच्या आनंदी स्मितात थरथरत होते.

'उद्या मी मोखोवला जाऊन भेटतो! तो एकादवेळी मला काम देईल!' आक्सिनियाच्या मनगटावरील पकड बदलीत ग्रिगरी म्हणाला.

त्याच्या आवळलेल्या बोटांनी ते घामेजले होते.

आक्सिनिया काहीच बोलली नाही. तिने मानही वर केली नाही. वाऱ्याची झुळुक निघून जावी तशी तिचे मुखावरचे स्मितहास्य ओघळून गेले आणि तिच्या विस्फारलेल्या डोळ्यात लकाकणारी चिंता आणि भीती ह्यामुळे तिचे तोंड भयभीत श्वापदासारखे दिसू लागले. 'ह्याला सांगू का नको?'

आपल्याला दिवस गेल्याचे आठवून तिच्या मनात हा प्रश्न उभा राहिला. 'ह्याला सांगितलंच पाहिजे!' तिने निश्चय केला पण अचानक भयाने थरारून तिने तो भयंकर विचार पिटाळून लावला. स्त्रीसुलभ प्रेरणेने तिने जाणले की त्याला हे सांगण्याचा हा क्षण नव्हे. ग्रिगरीला आपण कायमची मुकू हे तिने

ओळखले. काळजाच्या खाली उसळचा घेणारे बालक ग्रिगरीचे आहे की स्तिपानचे आहे ह्याबद्दल साशंक असणाऱ्या तिने स्वत:ची फसवणूक करून त्याला न सांगण्याचेच ठरवले.

'तू थरथरतेस का ? थंडी वाजत्येय ?' आपला कोट तिच्या अंगाभोवती लपेटीत ग्रिगरीने विचारले.

'थोडीशी वाजत्येय ! मला जायला हवं ग्रिशा !'

'स्तिपान परत येईल आणि मी बाहेर गेलेली कळेल त्याला !'

'कुठं गेलाय तो ?'

'आनिकेईकाच्याकडे पत्ते खेळायला गेलाय !'

ती दोघे विलग झाली. तिच्या ओठांचा गंध ग्रिगरीच्या ओठावर रेंगाळत होता. हिवाळी वाऱ्याचा गंध किंवा कदाचित माळरानावर वासंतिक शिडकावा-झाल्यानंतर पर्येणातून येणारा तो दूरवरचा गंध !

आक्सिनिया आडगल्लीत वळली. पुढे झुकून ती जवळजवळ पळतच गेली. पतझडीच्या मोसमातील चिखल गुरांच्या पावलानी जिथे घुसळला गेला होता त्या विहिरीजवळ ती वेडीवाकडी अडखळली. एका गोठलेल्या ढेकळात तिचे पाऊल फसले आणि तिच्या पोटातून जीवघेणी कळ आली. तिने कुंपणाचा आधार घेतला. ती कळ हळूहळू गेली. पण जिवंत आणि फिरणारे असे काहीतरी संतापाने आणि आवेशाने पुन:पुन्हा पुन: पुन्हा तिच्या कुशीवर झटचा घेत होते !

११.

दुसऱ्या दिवशी सकाळी ग्रिगरी मोखोवला भेटायला गेला. मोखोव नुकतेच दुकानातून परतले होते आणि जेवायच्या खोलीत प्रात्योपीनशी बोलत बसले होते. त्या खोलीच्या भिंतींना उंची ओकरंगी कागद लावलेला होता. मदिरेसारखा लाल दिसणाऱ्या कडक चहाचे ते घुटके घेत होते. दिवाणखान्यात टोपी ठेऊन ग्रगरी आत गेला.

'आपल्याशी जरा बोलायचंय सेर्गेई प्लातोनोविच !'

'ओहो ? कोण पांतिलेय मेलिखोवचा मुलगा ना तू ? काय हंवय तुला ?'

'आपल्याकडे नोकरी मिळेल का ते विचारायला आलो होतो !'

ग्रिगरी बोलत असताना दार करकरले आणि लेफ्टनंटच्या हुद्याचे माकुल लावलेल्या, शेवाळी फर्गोल घातलेल्या एका तरुण अंमलदाराने तिथे प्रवेश केला. त्याच्या हातात वर्तमानपत्राची घडी होती. गेल्या उन्हाळ्यात मितका कोर्शुनोवने शर्यतीत हरवलेला हाच तो तरुण लिस्तनित्सकी हे ग्रिगरीने ओळखले. मोखोवने त्या अंमलदारापुढे खुर्ची सरकावली आणि ते परत ग्रिगरीकडे वळले,

'आपल्या पोराला नोकरीला लावायं एवढं तुझ्या बापाचं दिवाळं निघालं वाटतं ?' त्यानी चवकशी केली.

'मी त्यांच्या घरात आता राहात नाही !'

'त्याला सोडून दिला ?'

'होय !'

'तुला आनंदानं ठेवून घेतला असता ! तुझ्या घरच्या लोकाना मी ओळखतो ! कष्टाळू माणसं आहेत ! पण दुर्दैवानं माझ्याकडं देण्यासारखं कामच नाही !'

'काय प्रकार आहे ?' मेजाजवळ खुर्ची ओढून घेत लिस्तनित्सकीने चौकशी केली.

'हा पोरगा नोकरी शोधायला आलाय !'

'मोतद्दारी करायला येते ? एकावेळी चार पाच घोडी हाकू शकशील ?' चहा ढवळीत त्या अंमलदाराने विचारले.

'हाकू शकेन ! आमच्या सहा घोड्यांची मीच उस्तवारी करात होतो !'

'मला मोतद्दार हवाय ! तुझ्या अटी काय आहेत ?'

'फार काही मागणं नाही माझं !'

'तसं असेल तर उद्या आमच्या वाडीवर येऊन आमच्या वडिलाना भेट. ठाऊक आहे घर ? यागोदनोयेला– इथून सुमारे आठ मैल आहे.'

'होय माहीत आहे मला !'

'मग ये तर उद्या सकाळी ! ठरवून टाकू आपण !'

ग्रिगरी दाराकडे गेला. कोयंडा फिरवताना तो जरा अडखळला आणि म्हणाला, 'हुजूर, मला आपल्याशी जरा खाजगी बोलायचंय !'

बाहेरच्या अर्ध अंधाऱ्या पडवीत लिस्तनित्सकी ग्रिगरीच्या मागोमाग गेला. सज्जाच्या दरवाज्याच्या व्हिनीशन काचेतून गुलाबी प्रकाश मंदपणे झिरपत होता.

'हं ! काय म्हणणं आहे ?'

'मी एकटा नाहीय् ! ग्रिगरीचा चेहरा लालबुंद होऊन गेला. 'माझ्या बरोबर एक बाईमाणूस आहे ! तिच्यासाठीही आपल्याकडे काही काम मिळू शकेल का ?

'तुझी बायको ?' त्या प्रकाशात गुलाबी छटा आलेल्या आपल्या भुंवया उंचावीत लिस्तनित्सकीने हसून विचारले.

'दुसऱ्या कुणाचीतरी बायको आहे.

'अस्सं अस्सं ! ठीक आहे ! गडीमाणसांचा सैपाक करायला ठेवून देऊ तिला ! पण तिचा नवरा कुठाय ?'

'इथंच खेड्यात आहे !'

'म्हणजे दुसऱ्याची बायको पळवलीस तर !'

'तीच होऊन आल्येय !'

'गुलाबी भानगड आहे तर. ठीक ! उद्या ये जाऊ शकतोस आता !'

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता ग्रिगरी यागोदनोएला आला. घराला पडदीचे आणि गिलाव्याच्या भिंतीचे कुसू घातलेले होते. प्रशस्त चौपेटीत वेडीवाकडी पसरलेली कटघरे, कौलारू छपराचा एक पार्श्व रंगीबेरंगी खपरेलांनी १९१० हा इसवीसनाचा आकडा त्यावर तयार केलेला, गडी माणसाच्या बराकी, न्हाणीघर, तबेले, कोंबड्यांची खुराडी, गोठा, एक लांबलचक आगर आणि रथशाळा.

ते विस्तीर्ण आणि जुनाट घर एका राईत विसावले होते. राईच्या पलीकडे पारसडलेल्या हिवरचा कबरा तट आणि माळरानाची वळुंजी होती. त्याच्या पिंगट शेंड्यावर कावळ्यांची रिकामी घरटी हेलकावत होती. चौपेटीत पाऊल ठेवताच क्रायमियन शिकारी कुत्र्यांच्या घोळक्याने त्याचे स्वागत केले. डोळ्यावर तरंज आलेल्या एका म्हाताऱ्या कुत्रीने त्याला प्रथम हुंगले आणि मुंडी खाली घालून ती त्याच्या मागोमाग गेली. गडीमाणसांच्या बराकीत एक सैपाकीण एका तरण्या, तोंडावर पिवळे डाग असणाऱ्या मोलकरणीशी तणतणत होती. बाबरओठाचा एक मुकादम दरवाज्याच्या पवलाणावर चुट्टा ओढीत बसला होता. त्याच्या डोक्यावर धुराचा एक ढग तयार झाला होता. मोलकरीण ग्रिगरीला घरात घेऊन गेली. दिवाणखान्यात कुत्र्यांचा आणि बिनकमावलेल्या कातड्याचा भपकारा येत होता. मेजावर दुराटीचा एक झोळणा आणि हिरव्या नखीला दुस्ता आलेली पारधपडशी पडलेली होती.

'धाकटे सरकार तुला बोलावतायत !' बाजूच्या दरवाज्यातून मोलकरणीने ग्रिगरीला हाक मारली. आपल्या चिखल लागलेल्या बुटाकडे ग्रिगरीने अबरगतीने पाहिले आणि त्याने आत पाऊल टाकले. खिडकी जवळच्या पलंगावर लिस्तनित्सकी लोळत होता. परांच्या दुलईवर तंबाखूची पेटी आणि धूम्रपानाचा सरंजाम होता. त्या अंमलदाराने कागदात तंबाखू घालून चुट्टा वळून घेतला. आपल्या पांढऱ्या सदऱ्याची गुंडी लावली आणि तो म्हणाला, 'अगदी वेळेवर आलास ! थांब माझे बाबा एका मिनिटात इथे येतील !'

ग्रिगरी दारापाशी उभा होता. एवढ्यात पुढच्या खोलीतून पावलांचा आवाज आलेला त्याने ऐकला आणि दारातून एका घनगंभीर आवाजात कुणीतरी विचारले,

'झोपलायस काय यवगेनी ?'

'आत या ना !'

काळे नमदी बूट घातलेले एक वृद्ध गृहस्थ आत आले. ग्रिगरीने डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्यांच्याकडे पाहिले. पातळ बाकदार नाक आणि नाकाखाली तंबाखूने पिवळे डाग पडलेले पांढऱ्या मिशांचे छप्पर. ही वैशिष्टये त्याच्या डोळ्यात तत्क्षणी ठसली. म्हातारे लिस्तनित्सकी उंचेपुरे आणि रुंद खांदे असलेले पण कडकांगी होते. उंटाच्या केसांचा लांबलचक फर्गोल त्यानी घातला होता. त्याची गळपट्टी त्यांच्या सुरकुतलेल्या मानेभोवती ढिल्या फासासारखी पडली होती. त्याचे गढूळ डोळे नाकाच्या दांड्याला लागूनच होते.

'पपा, मी तुम्हाला बोललो होतो ना तो हा कोचमन ! पोरगा चांगल्या घराण्यातला आहे !'

'कुणाचा मुलगा ?' म्हातारबुवानी खणखणीत आवाजात पृच्छा केली.

'मेलेखोवचा !'

'कुठला मेलेखोव ?'

'पांतेलेय मेलेखोव !'

'मला प्रोकोफी ठाऊक होता ! पांतेलेय्ही आठवतो मला ! लंगडा आहे तोच ना ?'

'जी हुजूर !' ग्रिगरीनें उत्तर दिले. टाचेला टाच जुळवून तो एकदम ताठ उभा राहिला. रुसो-तुर्की युद्धात बहादुरी गाजवलेल्या आणि आता पेन्शन घेतलेल्या जनरल लिस्तनित्सकी ह्यांच्याबद्दल बापाने सांगितलेल्या कथा त्याला आठवल्या.

'नोकरी का बघतोयस ?' डोक्यावर ढग गडगडले.

'मी बापाघरी राहात नाही, हुजूर !'

'मोलमजुरी करणारा तू कसला रेकझाक ? बापाच्या घरातून बाहेर पडलास तेव्हा त्यानं काही सोय केली नाही का तुझी ?'

'नाही केली हुजूर'

'अस्सं ! मग वेगळी गोष्ट आहे ! तुझ्या बायकोलाही काम हवंय म्हणतोस ?'

धाकटचा लिस्तनित्सकीचा पलंग मोठचाने करकरला. ग्रिगरीने त्याच्या दिशेने नजर टाकली. तो अंमलदार डोळा घालीत मान हलवीत होता.

'जी हुजूर !'

'हे 'जी हुजूर बंद कर ! मला नाही आवडत ! महिन्याला आठ रुबलस् पगार मिळेल ! तुम्हाला दोघाना मिळून ! तुझ्या बायकोला गडीमाणसांचा आणि आल्यागेल्या मजुरांचा सैपाक करायला लागेल ! कबूल आहे ?'

'जी !'

'उद्या सकाळी रुजू हो ! पूर्वीच्या कोचमनच्या बराकीत रहायला लाग !'

'कालची शिकार कशी झाली ?' आपली निरुंद पावले गालिच्यावर ठेवीत लिस्तनित्सकीने वडिलाना विचारले.

'ग्रेम्यचिय् जवळच्या घळीतून आम्ही एक कोल्हा हुसकला. रानापर्यंत त्याचा पिच्छा केला ! पण बिलंदर होता ! कुत्र्यांना त्यानं हुलकावणी दिली !

'काझबेक अजून लंगडतोय ?'

'याचा पाय मुरगळला वाटतं. चल आटप येवगेनी नाष्टा निवून चाललाय.'

म्हातारा ग्रिगरीकडे वळला आणि आपल्या किडकिडीत बोटांच्या चुटक्या वाजवीत म्हणाला,

'चल पळ ! बरोबर आठला हजर हो !'

ग्रिगरी बाहेर गेला. कोठाराच्या पलीकडच्या टोकाला बर्फ नसलेल्या जमिनीच्या तुकडचावर कुत्र्यांचे टोळके ऊन खात बसले होते. डोळ्यांवर तरंज आलेली म्हातारी कुत्री तरातरा ग्रिगरीजवळ आली. त्याला तिने पछाडीला हुंगले आणि मुंडी तशीच दुःखाने खाली झुकवून ती थोडेसे अंतर त्याच्या मागोमाग चालत गेली आणि मग परत फिरली !

१२ :

आस्किनियाने स्वयंपाक लौकर आटोपला. विस्तव राखेखाली दडपला आणि धुरांडे बंद केले. बशा विसळल्या आणि खिडकीबाहेर अंगणात नजर टाकली. मेलेखोवच्या अंगणाला लागून असलेल्या कुपाटीजवळ रचलेल्या आवटचाशेजारी स्तिपान उभा होता. त्याच्या करारी ओठाच्या कोपऱ्यात अर्धा ओढलेला चुट्टा त्याने आवळून धरलेला होता. मांगराचा डावा कोपरा ढेपुसला होता. त्याची दुरुस्ती करण्यासाठी चांगलासा कांभेरा तो शोधीत होता.

दोन्ही गालावर गुलाबी लज्जा आणि डोळ्यात नवतीच्या चांदण्या घेऊनच आज आक्सिनिया जागी झाली होती. न्याहारी करताना तो बदल स्तिपानला जाणवला.

'तुला काय झालंय?' त्याने न राहवून विचारले.

'काय झालंय ?' त्याचाच प्रश्न आक्सिनियाने परत विचारला. तिचा चेहरा आरक्त होऊन गेला.

'तुझं तोंड कसं तेल चोपडल्यागत चकाकतंय !'

'आगीच्या धगीनं असेल !' असे म्हणून आक्सिनिया वळली. मिशा कोशेवोईची बहिण येत्येय का ते बघायला तिने खिडकीबाहेर चोरटा दृष्टिक्षेप टाकला.

पण ऐन दुपार टळून गेल्यानंतरच ती मुलगी आली. वाट बघत राहण्याने हैराण झालेल्या आक्सिनियाने एकदम विचारलं.

'माझ्याकडे काही काम आहे माशुतका ?'

'थोडावेळ बाहेर ये !'

सफेदा दिलेल्या चुल्हाणावर बसवलेल्या आरशाच्या तुकड्यापुढे स्तिपान उभा होता. बैलाच्या शिंगापासून बनवलेल्या लहानशा कंगव्याने तो आपली केसांची बट आणि भुऱ्या रंगाच्या मिशा विचरत होता.

'तू बाहेर जाणार आहेस ?'

त्यानें ताबडतोब उत्तर दिले नाही. कंगवा पाटलोणीच्या खिशात ठेवला चुल्हाण्याच्या ओटयावर असलेला पत्त्याचा कॅट आणि तिथेच पडलेली तंबाखूची

चंची उचलली. नंतर तो म्हणाला, 'मी थोडावेळ आनिकुशकाकडे जाऊन येणार आहे!'

'घरी कधी राहतोस का? रोज रात्री पत्ते चाललेत! रात्रीच्या रात्री नुसते पत्ते खेळणं!'

'बरं बरं! ऐकलंय मी हे तुझ्याकडून!'

'परत 'पोंटुन' खेळणार आहेस वाटतं?'

'अग दे न् सोडून आक्सिनिया! ते बघ कुणीतरी आलंय तुझ्याकडे!'

आक्सिनिया आदबशीरपणे पडवीत गेली. तोंडावर पिवळे डाग पडलेल्या गुलाबी चेहऱ्याच्या माशुतकाने तिच्याकडे पाहून स्मित केले.

'ग्रिशा परत आलाय!'

'मग?'

'काळोख पडल्याबरोबर आमच्याकडे त्यानं तुला बोलावलंय!'

मुलीचा हात धरून आक्सिनियाने तिला उजदाराकडे नेले.

'हळू बोल बाई! हळू बोल! आणखी काही निरोप सांगितलाय का?'

'त्यानं तुझं सगळं सामान बरोबर घेऊन यायला सांगितलंय!'

सर्वांग तापून उठलेल्या थरथरणाऱ्या आक्सिनियाचे पाय जागेवर ठरेनात. तिने वळून स्वयंपाकघराच्या दाराकडे नजर टाकली.

'अरे देवा! आता मी कशी! एवढ्या झटपट? बरं! थांब! त्याला म्हणावं मी शक्यतेवढ्या लौकर येतेच! पण तो कुठं भेटणार आहे मला?'

'तुला आमच्या घरी बोलावलंय!'

'अगबाई! नको नको!'

'बराय! त्याला बाहेर येऊन तुझी वाट पहायला सांगते!'

आक्सिनिया आत गेली. तेव्हा स्तिपान अंगावर कोट चढवीत होता. आणि वर टांगलेल्या दिव्याकडे टाचा उंचावून चुट्टा शिलगावीत होता.

'कशाला आली होती?' चुट्टयाच्या दोन झुरक्याच्या दरम्यान त्याने विचारले.

'कोण?'

'ती कोशेवोईकडची मुलगी!'

'हां हा! आपल्याला झगा फाडून दे म्हणून सांगायला आली होती!'

चुट्टयाच्या टोकावरची राख फुंकरीने उडवून लावीत स्तिपान दाराजवळ गेला.

‘ तू झोपून टाक ! माझी वाट बघू नको. !’

‘ बरं बरं !’

स्तिपान बाहेर पडला. खिडकीच्या तावदानावर बर्फ गोठलेला होता. त्या खिडकीजवळ ठेवलेल्या बाकाकडे धावत जाऊन आक्सिनिया गुडघ्यावर .बसली. बर्फ तुडवीत जाणाऱ्या स्तिपानचा फाटकापर्यंत होत गेलेला पदरव तिने ऐकला· वाऱ्याने त्याच्या चुट्टयामधून एक स्फुल्लींग उडाला आणि तो खिडकीपर्यंत आला. तावदानावरचा बर्फ जिथे वितळला होता त्या गोलाकारातून आक्सिनियाला त्याची लोकरी टोपी आणि रापलेल्या गालाची ठेवण ह्यांचे ओझरते दर्शन झाले.

मोठ्या संदुकीत ठेवलेली आपली जाकिटे, झगे, रुमाल, स्त्री धन हे सगळे तिने धांदल गडबडीने बाहेर काढले आणि एका मोठ्या शालीत ते कोंबले. धापा टाकणारी तारवटलेल्या डोळ्यांची आक्सिनिया एकदा शेवटची सासवानात जाऊन आली. दिवे घालवले आणि पावलाणावरुन धावत खाली गेली. गुरांकडे बघायला म्हणून मेलेखोवच्या घरातून कुणीतरी बाहेर डगवले. पावलांचा तो आवाज नाहीसा होईपर्यंत ती थांबली. नंतर तिने साखळी लावून फाटक बंद केले आणि डॉनच्या दिशेने ती धांवत सुटली. तिच्या डोक्यावरील रुमालाखालून निसटलेल्या बटा तिच्या गालांवर लोळत होऱ्या. बोचके उराशी आवळून आडगल्लीतून ती जेव्हा कोशेवोईच्या झोपडीच्या दिशेने चालू लागली तेव्हा तिचे त्राणच गेले. पायात मणामणाच्या बेड्या घातल्यासारखी ती पाऊल ओढू लागली.

तिची वाट बघत ग्रिगरी फाटकापाशी थांबला होता. तिचे बोचके त्याने आपल्या हातात घेतले आणि निःशब्दपणे तो तिच्या पुढे होऊन माळरानाकडे चालू लागला. मळणीच्या खळ्यापलीकडे गेल्यावर आक्सिनियाने चाल मंदावली. तिने ग्रिगरीची बाही पकडून म्हटले, ‘थांब जरा !’

‘ कशासाठी ? आज चंद्र उशीरा उगवणारै ! आपल्याला घाई करायला हवी !’

‘थांब ग्रिशा !’ ती थांबली आणि कळवळून ती ओणावली.

‘ काय झालं तुला ?’ तिच्याबरोबर ओणावत ग्रिगरीने विचारले.

‘ पोटात कसंतरी होतंय ! काहीतरी वजन उचलल्यानं असेल !’ आपल्या सुकलेल्या ओठांवरून तिने जीभ फिरवली. वेदनेने पिळवटून तिने डोळे इतके गच्च आवळून घेतले की तिला पुढे काजवे दिसू लागले. आपले तिने पोट हाताने आवळून धरले होते. क्षणभर ती उभी होती, कळवळून परत ओणावली. नंतर सुटलेल्या बटा रुमालाखाली सरकावून ती परत चालू लागली.

'बरं वाटतंय आता ! चल !

'मी तुला कुठं घेऊन जाणार आहे तेसुद्धा विचारलं नाहीस ! कदाचित जवळपासच्या डोंगराकपारीत नेऊन तुझा कडेलोटही करून देईन !' असे म्हणून त्या काळोखात ग्रिगरीने स्मित केले.

'माझ्या हिशेबी आता सगळं सारखंच आहे ! आता मी माघारी फिरू शकत नाही !'

त्या दिवशी स्तिपान नेहमीप्रमाणे मध्यरात्री परत आला. प्रथम तो तबेल्यात गेला. पसरलेल्या कडब्याचा गळगा गोळा करून त्याने तो परत गव्हाणीत ठेऊन दिला. घोड्याचे बागदोर काढले आणि तो घरात गेला. 'संध्याकाळी कुठंतरी बाहेर गेलेली दिसत्येय' फाटकाची साखळी काढताना त्याच्या मनात विचार आला. तो सायवानात गेला, दार घट्ट लावून घेतले आणि काडी उजळली. त्या दिवशी संध्याकाळपासून त्याची वृत्ती 'जितं मया' अशी होती. (काडे पेट्टयाचा जुगार ते खेळले होते) म्हणून तो निवांत आणि सूस्त होता. त्याने दिवा लावला. सायवानातील पसारा पाहून त्याने आ केला: त्या पसाऱ्याचे कारण त्याला उमगेना, जरा चकित होऊन तो चाफेखणीत गेला. संदुकीने काळतोंडचा 'आ' वासला होता. गडबडीत आक्सिनिया विसरून गेलेले जुने जाकीट जमिनीवर पडले होते. अंगावरचा मेंढेकातडी स्तिपानने ओरबाडून काढला आणि दिवा आणायला तो परत सायवानात धावला. चाफेखणीत त्याने चौबाजूला नजर टाकली आणि अखेरीस एकूण प्रकार त्याच्या ध्यानात आला. हातातला दिवा त्याने टाकून दिला. आणि आपण काय करतोय ह्याचे भान न राहवून त्याने भिंतीवर लटकावलेली तलवार खस्सकन् ओढून काढली आणि बोटांच्या शिरा तटतटून उभ्या राहीस्तो तिचा परज करकचून आवळला. आक्सिनियाचे निळे-पिवळे जाकीट त्याने तलवारीच्या टोकावर वर उचलून हवेत उडवले आणि ते खाली पडायच्या आत तलवारीचा सप्कन वार करून त्याचे दोन तुकडे केले.

हिंस्त्र शोकाने हिरवा निळा होऊन गेलेल्या स्तिपानने त्या जुन्या जाकीटाचे तुकडे पुन: पुन्हा आढ्यापर्यंत उडवले. हवेतल्या हवेत त्याच्या धांदोटया करणारे ते तिखट पाते 'सुईऽ' अशा नादाने घुमत राहिले !

मग मूठ उपसून काढून त्याने ती तलवार कोपऱ्यात भिरकावून दिली. स्वयंपाक घरात जाऊन तो मेजापाशी बसला. डोके खाली घालून आपल्या थरथरत्या पोलादी बोटानी तो त्या मेजाचा बिन धुतलेल्या पृष्ठभागावरुन हात फिरवीत बसला !

१३.

संकटे एकएकटी येत नसतात ! ग्रिगरी घर सोडून गेला त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी हेट–बाबाच्या निष्काळजीपणापायी मिरोन कोर्शुनोव्हच्या पिढीजात बैलाने त्याच्या सर्वोत्कृष्ट घोडीच्या गळयांत शिंग खुपसले. पांढराफटक पडलेला बेभान झालेला चळचळा कापणारा हेटबाबा धावत घरात आला आणि म्हणाला,

'मालक, घात झाला ! ते बैल ! त्याचं मढं नेलं ! त्या हलकट बैलानं !

'अरे, काय झालं काय बैलाचं ?' मिरोननी घाबरून विचारले.

'त्यानं घोडीला मारलं ! शिंग खुपसलं !'

अर्धवट कपडयांत मिरोन धावत अंगणात गेले. विहीरीजवळ मितका त्या तांबडया पाच वर्षाच्या बैलाना मेढक्याने बडवीत होता. मुंडी खाली घातलेल्या त्या बैलाच्या मानेचे पोळे जमिनीला घसटत होते आणि खुरानी बर्फ घुसळीत शेपटीला गोलंकार करून चंदेरी भुकणी तो उधळीत होता. त्या झोडपण्याने मऊ येण्याऐवजी तो खरखरीत डरकाळचा फोडीत होता आणि उधळून जाण्याच्या आवेशात असल्यासारखा जमिनीवर दुगाण्या झाडत होता. आकांताची डरकाळी त्याच्या कंठात दाटून आली होती. त्याच्या पट्टयाला धरून त्याला मागे खेचणाऱ्या मिखेईला न जुमानता तोंडाने शिव्यांचा भडीमार करीत मितका बैलाला नाकावर, कुशीत दणके घालीत होता.

'मागं हो मितका ! देवाची आण आहे ! तो शिंग भोसकील ! मालक त्याला सांगा ना !'

मिरोन धावत विहिरीकडे गेले. घोडी कुपाटीजवळ उभी होती. तिची मुंडी दुःखाने खाली लोंबली होती. तिचे काळेभोर वरखाली होणारे पुठ्ठे घामाने निथळत होते. मानेवरून छातीवर आणि छातीवरून खाली बर्फात रक्ताची धार लागली होती. तिची फिक्कट कस्तानी पाठ आणि कुशी थरथरत होत्या यामुळे तिचें फरे विलक्षण शहारत होते.

मिरोन धावत तिच्या पुढच्या बाजूला गेले. माणसाचा हात जाईल अशा गुलाबी रंगाच्या आणि आतील श्वासनलिका दाखवणाऱ्या जखमेने तिची मान

फाकली होती. तिची आयाळ धरून मिरोनने तिची गर्दन वर उचलली. त्या घोडीने आपले धुगधुगते पाटलरंगी डोळे धन्या ःर रोखले. ती जणू मुकपणे विचारीत होती 'पुढे काय?' जणूकाय तिच्या प्रश्नाला उत्तर म्हणून मिरोन किंचाळले, 'धावा! कुणाला तरी सांगा– ओकची साल उकलत्या पाण्यात भिजवून आणा! जलदी!'

हेट–बाबाच्या गळ्याची घाटी गलिच्छ कातडींवर थरथरत होती. झाडाची साल काढायला तो पळाला. मितका आपल्या वडिलांकडे आला. अंगणात गिरक्या घेणाऱ्या आणि डुरकणाऱ्या बैलावर त्याचा एक डोळा होता.

'घोडीला आयाळीत धरून ठेव!' त्याच्या वडिलांनी फर्मावले.

'कुणीतरी धावत जाऊन दोरा घेऊन या! जलदी! का देऊ एक लाफा ठेवून?'

घोडीला दुःख होऊ नये म्हणून त्यांनी तिच्या किंचित केसाळ मुलायम प्रपाणाला दोरा बांधला. म्हातारे ग्रिशाका लंगडत लंगडत आले. एका रंगीत वाडग्यात ओक–फळाच्या रंगाचा काढा कुणीतरी आणला.

'निवू दे!' ते डाफरले 'फार गरम आहे ना? मिरोन, ऐकतोयस का तू?'

'बाबा! तुम्ही आत जा! तुम्हाला बाहेरच्या हवेत सर्दी होईल!'

'मी म्हणतोय ते जरा निवू दे! त्या घोडीचा काय जीवबीव घ्यायचाय का काय?'

मिरोननी ती जखम धुतली. गारठल्या बोटांनी दाभणात दोरा ओवला आणि दोन्ही कडा शिवून सुरेख टाका घातला. ते घरात जायला वळतात न वळतात तोच त्यांची बायको सायवानातून धावत आली. तिचे सुजीर गाल भेदरल्याने विवर्ण झाले होते. नवऱ्याला एका बाजूला बोलावून ती म्हणाली,

'नतालिया आल्येय, मिरोन! अरे देवा रे देवा!'

'अग पण काय झालं काय?' मिरोननी विचारले. त्यांचा चेहरा पांढरा पडत चालला होता.

'ग्रिगरीची करणी! जावई घर सोडून गेलाय!'

भरारी मारण्याच्या तयारीत असलेल्या कावळ्यासारखे लुकिनिचनाने बाहू पसरले. आपल्या झग्यावर हाताच्या थापट्या मारल्या आणि तिने सूर काढला.

'सगळ्या गावात बेअब्रू झाली हो! देवा काय हा प्रसंग आणलास! आई ग...!'

सायवानात मधोमध उभी असलेली नतालिया मिरोनच्या दृष्टीला पडली.

तिच्या अंगावर शाल आणि आखूड हिवाळी कोट होता. तिच्या डोळ्यात दोन अश्रू डबडबले होते. गाल लालबुंद झाले होते.

'कशाला आलीस इकडं ?' धावत खोलीत येत तिच्या वडिलांनी डाफरून विचारले. 'नवऱ्यानं मारलंन ? तुमचं काय पटत नाही एकमेकांशी ?'

'तो निघून गेलाय !' कोरडे हुंदके देत नतालिया कळवळून म्हणाली. झोकांडी खात ती वडिलांसमोर गुडघे टेकून बसली.

'बाबा ! माझ्या आयुष्याचा सत्यानाश झाला ! मला परत घ्या ! त्या बाईबरोबर ग्रिगरी निघून गेलाय ! त्यानं मला सोडून दिली ! बाबा मी मातीला मिळाले हो !' हुंदके देत तुटकतुटक वाक्ये ती बोलत होती. वडिलांच्या लाल दाढीकडे ती आर्त नजरेने बघत होती.

'थांब ! थांब ! जरा थांब !'

'तिथं आता मला राहण्यासारखं काही उरलं नाही ! मला परत घ्या !' गुडघ्यावरच चालत ती लाकडी पेटाऱ्याजवळ गेली आणि आपल्या बाहुटयात तिने डोके खुपसले. डोक्यावरचा तिचा रुमाल खाली ओघळला होता आणि तिचा मऊ केशकलाप तिच्या फिकट कानांवर पडला होता. अशावेळी येणारे अश्रू वळवाच्या पावसासारखे असतात. आपल्या खपाटीला गेलेल्या पोटाशी नतालियाच्या आईने तिचे डोके दाबून धरले आणि सांत्वनाचे मातृसुलभ मूर्ख शब्द ती पुटपुटत होती. पण चवताळलेले मिरोन धावत पावलाणावर गेले.

'दोन घसर-गाड्या जुंप !' ते गरजले.

त्या पायरीवर एक कोंबडा कोंबडीच्या पाठीवर चढून दंग झाला होता. हा आरडा-ओरडा ऐकताच त्याने घाबरून चटकन उडी मारली आणि रागाने कुकुचकु करीत तो तुरुतुरु कोठाराकडे निघून गेला.

'दोन घसरगाड्या जुंप !' असे ओरडत पावलाणाच्या किरवलेल्या कठड्याला मिरोनने पुन्हा पुन्हा इतक्या लाथा मारल्या की त्याचे पार वाटोळे होऊन गेले. धावता धावता घोडे जुंपत हेट-बाबा लगबगीने तबेल्यातून जेव्हा बाहेर आला तेव्हाच ते घरात आले.

मितका आणि हेटबाबा नतालियाचे स्त्रीधन आणण्यासाठी गाडीतून मेलेखोवकडे गेले. आपल्या नादात असणाऱ्या हेटबाबाने रस्त्यात आलेल्या एका डुकराच्या पोराला जीव घेऊन पळायला लावले. 'मालक आता घोडीबद्दल सगळं विसरतील बहुतेक.' हा विचार मनात आला की त्याला आनंद होत होता. मग तो लगाम ढिले सोडायचा. 'पण तो असा खवीस म्हातारा आहे की कधी विसरायचा

नाही ' असा विचार आला की हेटबाबाचा चेहरा गंभीर होई. ओठ वेडेवाकडे होत आणि घोड्यावर तो खेकसायचा ' हैक . हैक...' आणि घोड्याच्या पोटाव्याच्या अत्यंत नाजूक भागावर तो चाबूक ओढू पहायचा !

१४.

आतामनच्या हुजुराती फौजेत येवगेनी लिस्तनित्स्कीला लेफ्टनंटचा हुद्दा मिळालेला होता. अंमलदाराच्या अडथळ्याच्या शर्यतीत कोलमडून खाली पड-ल्याने त्याचा उजवा हात मोडला होता. इस्पितळातून बाहेर आल्यावर हक्काची रजा घेऊन तो सहा आठवडे बापाजवळ रहावयास गेला.

हा वृद्ध सेनानी एकटाच यागोदनोयेला राहात असे. गेल्या शतकाच्या नवव्या दशकात त्याची बायको वॉर्साच्या उपनगरात ठार झाली. ह्या कझाक सेनानीवर झाडलेल्या गोळ्यातून तो निसटला. पण त्याच्या गाडीची चाळण झाली. त्यात त्याची बायको आणि गाडीवान मारले गेले. गोळ्यानी गाडीची चाळण केली पण सेनानी बचावला. लिस्तनित्सकीला येवगेनी हा दोन वर्षांचा मुलगा होता. हा प्रकार झाल्यानंतर लवकरच हा सेनानी निवृत्त झाला. १८१२च्या युद्धात त्याच्या पणजोबानी बजावलेल्या कामगिरीचे बक्षीस म्हणून त्याला सारा-तोव परगण्यातील दहा हजार एकर जमीन सरकारातून मिळाली होती. ती सोडून देऊन ह्याने यागोदनोयेला स्थलांतर केले. तिथे हा कडकडीत आणि तपस्वी जीवन जगू लागला.

पुरेसा मोठा झाल्यावर त्याने येवगेनीची जवानांच्या पथकात रवानगी केली आणि स्वतःला शेतीत गुंतवून घेतले. हुजुर-पागेतून त्याने जातीवंत घोडे खरेदी केले. इंग्लंडहून आणि प्रख्यात प्रोवालस्की पागेतून उत्कृष्ट पसाघोड्या आणल्या. ह्या दोन जातींचा संकर करून त्याने एक नवीन जातीची पैदास केली. त्याने स्वतःच गुरेढोरे जमा केली-वाढवली. जमीन विकत घेतली. मजूर भाड्याने लावून धान्य पेरले. पतझडीच्या आणि हिवाळ्याच्या मोसमात तो शिकारी कुत्री घेऊन शिकार करायचा. कधी कधी जेवणघरात कडीकुलपे लावून आठवडेच्या आठवडे पीत रहायचा. त्याला पोटदुखीचा विकार होता. कोणताही कठीण पदार्थ

खायला त्याला डॉक्टरानी मज्जाव केलेला होता. तेव्हा अन्नाचे सगळें सत्त्व चावून चावून तो पोटात घ्यायचा आणि त्याचा खास गडी असणाऱ्या बेन्यामिनने पुढं केलेल्या चांदीच्या तबकात चोथा थुंकून टाकायचा.

बेन्यामिन हा एक अर्धवट, रापलेल्या रंगाचा आणि डोक्यावर दाट काळ्या केसांच्या जटा वाढलेला माणूस होता. सहा वर्षे तो लिस्तनित्सकीच्या चाकरीत होता. सुरवातीला ह्या सेनानीपुढं तबक धरून उभे राहताना तो म्हातारा चावलेल्या अन्नाचा चोथा थुंकताना पाहून त्याला किळस यायची. पुढे त्याला संवय झाली वाड्यावरचे दुसरे रहिवाशी म्हणजे लुकेरिया ही स्वयंपाकीण, पुराणपुरुष साशका हा नफर आणि तिखोन हा धनगर. देवीचे वण तोंडावर असणारी ही फोफशी तिच्या अवाढव्य कुल्ल्यांमुळे पिवळ्या कणकेच्या गोळ्यासारखी दिसायची. अगदी पहिल्या दिवसापासूनच तिने आक्सिनियाला चुलीच्या आसपास फिरकू दिले नव्हते.

'उन्हाळ्यात मालक कामावर जादा गडी घेतील तेव्हा तू सैपाक कर ! सध्या माझं मी करते सगळं ! '

आठवड्यातून तीनदा जमीन धुणे, असंख्य कोंबड्याना दाणापाणी देणे, खुराडी स्वच्छ ठेवणे ही कामे आक्सिनियाला देण्यात आलेली होती. ती मनापासून काम करायची. सैपाकिणीसुद्धा सर्वांना खूष ठेवायचा प्रयत्न करायची. ग्रिगरीचा बहुतेक वेळ ओंडक्याने बांधलेल्या प्रशस्त तबेल्यात साशका ह्या मोतद्दाराबरोबर जायचा. ह्या म्हाताऱ्याचा केस न् केस पिकला होता. पण अजून प्रत्येकजण त्याला आपलेपणाने ' साशका '' असें म्हणायचा. मिरोन ग्रिगोरोविच अशी प्रतिष्ठित हाक त्याला कुणीच मारीत नसे. वीस वर्षे त्याने ज्याची चाकरी केली होती तो लिस्तनित्सकीही त्याचे आडनाव बहुधा विसरून गेला होता. तरुणपणी साशका मोतद्दार होता. पण तो जरा म्हातारा आणि कमजोर झाला आणि त्याची दृष्टी जशी मंद होऊ लागली तसा त्याला नफर करण्यात आला. ठोसर बांधा, हिरवट पिकल्या केसांचे आच्छादन, (त्याच्या हातावरील केसही पिकलेले होते) तरुणपणी सोट्याचा तडाखा खाल्ल्याने पसरट झालेले नाक, अशा ह्या माणसाच्या तोंडावर सदैव एक बालिश स्मित असायचे. मिचमिच्या, सुरकुतलेल्या आणि तांबूस छटा

टीपः– १) विशेष नामाच्या लघुरूपाला 'का' 'च्का' असा प्रत्यय जोडण्याची रशियन पद्धती असून हे संबोधन आपुलकीनिदर्शक असते. सर्वसाधारणपणे तरुण व्यक्तीला उद्देशून वापरले जाते.

असलेल्या निष्पाप डोळ्यानी तो जगाकडे बघायचा. त्याच्या मुखावरील हा प्रेषिताचा भाव त्याच्या बसक्या नाकाने आणि लोंबत्या व्रणित अधरोष्ठाने बिघडवून टाकलेला होता.

फौजेत असताना साशका एकदा दारू पिऊन झिंगलेला होता. तेव्हा व्होडकाच्या ऐवजी चुकून अम्लराजाची विसळणी प्यायला. त्या जलाल रसायनाने त्याचा अधरोष्ठ हनुवटीशी सांधून टाकला होता आणि त्याचा वेडावाकडा गुलाबी व्रण कायमचा मागे राहिला. जिथे ह्या अम्लराजाचा ओघळ गेला तिथे एकाद्या अद्‌भुत प्राण्याने आपल्या खरखरीत जिभेने चाटून ठेवल्यासारखा एक गुलाबी आणि निर्लोम व्रण मागे राहिला. साशकाला व्होडका आवडती होती आणि तो तर्र असला म्हणजे जसा काही मालक असल्यासारखा अंगणात तोऱ्यात चालत असे. जमिनीवर लत्ता प्रहार करून तो म्हाताऱ्या लिस्तनित्सकीच्या खिडकीखाली जाऊन उभा रहायचा आणि कर्कश करारी आवाजात ओरडायचा,–

'मिकोलाई' लेक्सिएविच'! मिकोलाई 'लेक्सिएविच !'

म्हातारा लिस्तनित्सकी आपल्या झोपायच्या खोलीत असला तर तो खिडकीपाशी यायचा.

'चढलेय तुला कुचकाम्या !' ते गर्जना करायचे. साशका आपली तुमान वर खेचायचा आणि डोळा मोडीत हसायचा. त्याच्या मुरडलेल्या डाव्या डोळ्यापासून ते ओठाच्या उजव्या कोपऱ्यातून गेलेल्या गुलाबी व्रणापर्यंत त्याचे ते हसू तिरप्या रेषेत त्याच्या सबंध चेहऱ्यावर नाचायचे. ते हसू वेडेवाकडे पण सुखद होते.

'मिकोलाई लेक्सेविच ! सरकार मी तुला ओळखतो !' आपले काटकुळे गलिच्छ बोट तो दम दिल्यासारखे हालवायचा.

'जा झोप जा !' त्याचे धनी समजूत काढल्यासारखे स्मित करीत आणि खाली पडू पाहणाऱ्या मिशाना तंबाखूने डागाळलेल्या पाची बोटानी पीळ भरीत.

'अरे सैतानसुद्धा मला फसवू शकतो ऽ ना ऽ !' तो नफर हसायचा आणि कुंपणाच्या लकडकोटाकडे जात म्हणायचा,

'मिकोलाय लेक्सिएविच ! तू माझ्याचसारखा आहेस ! मासा माशाला ओळखतो तसे आपण एकमेकाला ओळखत आहोत ! तू अन् मी रईस आहोत ! आहा !! ' किती रईस आहोत ते दाखवण्यासाठी तो आपले दोन्ही हात सताड

टीपः– १) वस्तुतः मिकोलाई अलेक्सिएविच असे संबोधन आहे परंतु नशेत असलेला साशका ह्यांतील 'अ' खाऊन टाकायचा.

फाकायचा. 'आपल्याला सगळे ओळखतात! सगळा डॉन मुलूख ओळखतो! आपण.. !' साशकाचा आवाज एकदम शोकाकुल आणि आर्जवी व्हायचा. 'तू आणि मी...! सरकार ..! आपलं सगळं मस्त आहे! फक्त आपली दोघांची नाकाडंच करंटी आहेत!'

'असं रे का? हसण्याची उबळ थेऊन काळानिळा पडलेला त्याचा धनी मिशाना पीळ भरीत विचारायचा. 'ही व्होडका बरं व्होडका!' डोळ्यांची झपाझप उघडझाप करीत, ओठ चाटीत साशका कडाडायचा.

'दारू पिऊ नको मिकोलाई लेक्सिएविच! नाहीतर आपलं दिवाळं निघेल! तुझं आणि माझं! आहे नाही ते पिण्यात फुंकून टाकून बसू!'

'हे घे! टाक फुंकून पिण्यात!' म्हातारा लिस्तनित्सकी वीस कोपेकचे नाणे खाली टाकून म्हणायचा.

ते झेलून आणि आपल्या टोपीत लपवून साशका जाता जाता सुस्कारा सोडी, 'अच्छा जनरलसाहेब!'

'घोड्याना अजून पाणी दाखवलंस की नाही?' उत्तर काय मिळणार ते आधीच ओळखून हसत हसत त्याचा धनी विचारायचा.

'तिच्या मारी साला कंबख्त! सैतानाची अवलाद! साला डुकरीच्या!' साशका लालबुंद पडायचा. संतापाने त्याचा आवाज फाटायचा, रागाने तो थरथरायचा.

'साशका घोड्याला पाणी दाखवायला विसरतो? आँ? अरे मेलो तरी घोड्याना पाणी पाजायला रांगत जाऊन बादली आणीन! अन् हा म्हणे...!'

आपल्याला मिळालेल्या अनाठायी टोमणा ऐकून साशका तणतणत शिव्या घालीत, मूठ परजीत तरातरा निघून जायचा. त्याचे सगळे काही क्षम्य असे. त्याचे नशापाणी आणि त्याची धन्याशी लगट हे ही क्षम्य असे. नफर म्हणून तो अद्वितीय होता. घोड्याची निगराणी करण्यात त्याला तोड नव्हती. हिवाळ्यात आणि उन्हाळ्यात तो रिकाम्या तबेल्यात रिकाम्या गोठ्यात झोपायचा. तो नफर होता आणि सालोत्रीही होता. वसंतऋतूत तो घोड्यांसाठी वनस्पती गोळा करायचा. माळरानातून आणि दऱ्याखोऱ्यांतून औषधी कंदमुळे उकरून आणायचा. तबेल्याच्या भितींवर उंच जागी वाळवलेल्या वनस्पतींचे झुबके लटकलेले असत. क्षीणानुरोधावर औषधी वनस्पती, सर्पदंशाला उतारा म्हणून शरपुंखी गवत, कमा, ताबक उपजंधा वगैरे रोगांवर कृष्णपर्ण, जाकब आणि जखमांवर औषध म्हणून वळुंजीच्या

मुळाशी वाढणारी एक पांढरी वनस्पती आणि घोड्यांचे आजार आणि दुखणी ह्यावर ऐकिवात नसलेले झाडपाले ह्यात होते.

साशका झोपत असे त्या गोठ्यात एक तरल नाकाला गुदगुल्या करणारा सुगंध सुरेख विणलेल्या कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे तरंगत असे. फळीसारखा टणकपणा आलेली जाम पक्की बांधलेली वैरण, त्याच्यावर चारज जाम्याचे आणि घोड्याच्या घामाचा वास येणाऱ्या त्याच्या कोटाचे आच्छादन हे त्याचे तक्तपोशीचे अंथरुणपांघरुण होते. तो कोट आणि मेंढीकुडता एवढीच ह्या म्हाताऱ्याची धनदौलत होती.

तिखोन हा प्रचंड अंगाचा मंदबुद्धि कझाक लुकेरियाबरोबर रहायचा. तिच्या बद्दल आणि साशकाबद्दल तो मनातल्या मनात अगदी विनाकारण मत्सर धरून होता. महिन्यातून एकदा तो ह्या म्हाताऱ्याला त्याच्या तेलकट सदऱ्याची गुंडी हातात धरून घराच्या मागच्या दारी घेऊन जायचा.

'ए म्हाताऱ्या ! माझ्या बाईवर नजर ठेवू नको हा !'

'नाही ठेवणार ! जर...!' साशका सूचक डोळा घालून म्हणायचा.

'तिच्या वाटेला जाऊ नको !' तिखोन काकुळतीला येऊन म्हणायचा.

'मला देवीचे वण असलेली बाई आवडते ! देवीचे वण असलेली छबेली मिळाली तर आपल्याला व्होडका नको ! जेवढे देवीचे वण जास्त तेवढी लवंडी बापाची जास्त लाडली !'

'तुझ्या वयाची तरी तुला लाज ! त्यातून तू वैदू ! घोड्यांची देखभाल करणारा ! तुला सगळ्या युक्त्या ठाऊक !'

'आपण सगळ्या प्रकारची वैदूगिरी करतो !' साशका जिद्दीने म्हणायचा.

'तिच्या वाटेला जाऊ नको हा आजोबा ! ते गैर आहे !'

'एक दिवस आपण लुकेरिया पटकावणार पोरा ! आपण तिला पटकावणार लेका ! तू लुकेरियाला निरोप देऊन टाक ! तिला तुझ्या हातातून काढून घेणार! बेदाण्याचं दिड आहे ती– दिड ! फक्त बेदाणा काढलेलं दिड ! आपल्याला असाच माल हवाय !'

'माझ्या तावडीत सापडू नको ! सांगून ठेवतोय ! नाहीतर जीव घेई तुझा' सुस्कारा सोडून आणि खिशातून काही तांब्याची नाणी काढून तिखोन म्हणायचा.

असे हे महिनोगणती चालले होते.

यागोदनोयेमधले जीवन सुस्त तंद्रीत सरत चालले होते. रहदारीच्या सर्व

रस्त्यापासून सुदूर एका खोऱ्यांत ही वाडी होती आणि पतझडीचा मोसम सुरु झाला की इथले आणि शेजारच्या खेड्यांचे दळणवळण तुटून जायचे. हिवाळ्याच्या रात्री लांडग्यांच्या टोळ्या जंगलातील आपल्या गाठणातून बाहेर पडत. घळीच्या डाव्या अंगाला असलेल्या खरपट डुंगीवर ते येत. आणि आपल्या आरोळ्यानी घोड्यांचा थरकाप उडवीत. त्याना भेवडवून पळवून लावण्यासाठी तिखोन आपल्या धन्याची दुराटी बंदुक घेऊन कुरणरानाकडे जायचा. आपल्या प्रशस्त पार्श्वभागावर एक धबले ब्लँकेट गुंडाळून लुकेरिया बंदुकीच्या बारांचा आवाज होण्याची वाट पहात ताणलेल्या अवस्थेत तिष्ठत रहायची. तेलकट देवीच्या डागांची टाकी दिलेल्या तिच्या गालात तिचे चिमुकले डोळे लुप्त झालेले असत. कुरूप आणि टकल्या तिखोनचे रूपांतर अशा वेळी तिच्या कल्पनासृष्टीत एका देखण्या आणि बेगुमान युवकात होऊन जाई आणि मग नोकरांच्या बराकीचे दार आपटल्याचा आवाज यायचा. वाफेच्या ढगातून तिखोन आत प्रवेश करायचा. मग ती बिछान्यात त्याला जागा करून द्यायची आणि लाडे लाडे कूजन करीत आपल्या गारठलेल्या सवंगड्याला उबदार मिठीत घ्यायची.

उन्हाळ्यात मध्यरात्र टळून जाईपर्यंत यागोदनोयेवाडी मजुरांच्या आवाजाने गजबजून गेलेली असायची. सुमारे एकशे आठ एकर जमिनीत धनी निरनिराळ्या पिकांची पेरणी करायचा. कापणीसाठी शेतमजूर भाड्याने लावायचा. कधी कधी येवगेनी घरी यायचा. रायातून आणि कुरणातून फेरफटका मारायचा. मग त्याला कंटाळा यायचा. सकाळचा वेळ तो तळ्यात मासे धरण्यात घालवायचा. भरदार छातीच्या, मध्यम उंचीच्या येवगेनीने कझाक शैलीची बट डोक्याच्या उजव्या बाजूला लोंबती सोडलेली होती. त्याचा अंमलदाराचा फर्गोल त्याच्या अंगाला नेटका बसत असे.

ग्रिगरीच्या वाडीवरच्या आयुष्यातील पहिले काही दिवस तो सतत धाकट्या मालकाच्या खिदमतीला होता. एक दिवस बेनियामिन हसत हसत नोकराच्या बराकीत आला आणि केसांच्या झिज्या झालेले मस्तक लववून म्हणाला, 'धाकटे धनी तुला बोलावतायत्, ग्रिगरी!'

इतर अनेक प्रसंगी जायचा तसा ग्रिगरी येवगेनीच्या खोलीकडे गेला आणि दारात उभा राहिला. दात विचकीत धन्याने खुर्चीकडे बोट केले. 'बैस!'

खुर्चीच्या अगदी कडेला ग्रिगरी बसता झाला.

'आमची घोडी कशी काय आहेत?'

'फार उमदी घोडी आहेत! कबरा तर जातिवंत आहे!'

'त्याला भरपूर कावा दे ! पण पिटाळू नको !'

'साशका आजोबानं सांगितलंय मला !'

'टांकण्या काय म्हणतोय ?'

'कोण ? कस्तानी ? ते मोठं मस्त जनावर आहे ! नाल तेवढा जरा ढिला झालाय ! त्याला नवीन नाल मारून घेईन मी !'

आपले भेदक पिंगट डोळे आकुंचित करून धाकटचा धन्याने विचारले, 'मे महिन्यात तुला शिबिराला जावं लागेल नं ?'

'होय !'

'मी आतामानला सांगतो त्याबद्दल ! तुला जावं नाही लागायचं !'

'मेहेरबानी सरकार !'

क्षणभर स्तब्धता होती. आपल्या गणवेशाच्या गळपट्टीचे बटण सोडवून येवगेनीने आपली बायकी गोरी छाती खाजवली.

'आक्सिनियाचा नवरा तिला तुझ्याकडून घेऊन जाण्याची तुला भीती नाही वाटत ?'

'त्यानं तिला सोडून दिल्येय ! तो तिला परत घेणार नाही !'

'तुला कसं ठाऊक ?'

'परवा नाल आणायला गेलो होतो तेव्हा खेडचातला एक माणूस मला भेटला होता ! स्तिपान चिक्कार दारू प्यायला लागल्याचं तो सांगत होता ! 'दमडी दिली तरी आक्सिनियाला मी घ्यायचो नाय आता ! तिच्यापेक्षा गरमागरम शोधीन, असं स्तिपान म्हणत होता !'

'आक्सिनिया मोठी देखणी बाई !' ग्रिगरीच्या डोक्यावरून पलीकडे बघत लिस्तनित्सकी म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर काहीसे रंगेल स्मित खेळत होते.

'बरी आहे !' ग्रिगरीने त्याचे म्हणणे मान्य करून म्हटले. त्याचा चेहरा काळवंडून गेला.

येवगेनीची रजा जवळ जवळ संपली होती. हाताचा झोळणा त्याने आता काढून टाकला होता. आपला हात त्याला आता हव तसा वाकवता येत असे.

आपल्या मुक्कामाच्या सरत्या दिवसात येवगेनी आपला बराच वेळ ग्रिगरीच्या खोलीवर घालवीत असे. पोपडे निघालेल्या भिंतीना आक्सिनियाने सफेदा दिला होता. खिडक्यांची तावदाने स्वच्छ पुसून काढली होती. विटकरीच्या खापराने जमीन घासून लखलखीत केली होती. त्या लहानशा रिकाम्या आणि उल्हसित खोलीत बाईचा हात फिरलेली ऊब आणि प्रसन्नता होती. चुल्हाण्याच्या गरम

झुळका खोलीत दाटत होत्या. आपला टुमदार शिवलेला आखुड कोट खांद्यावर टाकून हा अंमलदार तिथे येण्यासाठी अशी वेळ निवडायचा की जेव्हा ग्रिगरी घोड्यांची सरबराई करीत असेल. प्रथम तो स्वयंपाकघरात जायचा. लुकेरियाशी थोडावेळ उभ्या उभ्या थट्टामस्करी करायचा. मग पुढच्या खोलीत जायचा. तिथल्या स्टुलावर खांदे पुढे झुकवून बसायचा. आपली निसत हसणारी नजर आक्सिनियावर रोखून धरायचा. त्याच्या येण्याने ती अबघडून जायची. तिच्या हातातील विणकामाच्या सुया थरथरू लागत.

'हं ! मग काय आक्सिनिया ? कसं काय चाललंय ?' असे विचारीत तो चुट्टयाचे इतके झुरके घ्यायचा की ती खोली निळ्या धुराने तुडुंब भरून जायची.

'छान चाललंय ! मेहेरबानी आहे आपली ! आक्सिनिया नजर वर करून उत्तर द्यायची. निःशब्दपणे आपली वासना बोलून दाखवणाऱ्या त्याच्या पारदर्शक नजरेला तिची नजर भिडली की ती हिरवी निळी होऊन जायची. त्याची ती विवस्त्र नजर त्रासदायक आणि चीड आणणारी होती. त्याच्या प्रश्नांची ती काहीतरी असंबद्ध उत्तरे द्यायची. त्याची नजर चुकवण्याचा प्रयत्न करायची. त्या खोलीतून निसटण्याची संधी शोधत रहायची.

'मला गेलं पाहिजे ! बदकाना दाणापाणी द्यायचंय !'

'त्याची काय घाई आहे ? थांबतील बदकं !' तो हसून म्हणायचा. रपेटीच्या तंग तुमानीत आवळलेले त्याचे पाय थरथरत. तिच्या गतजीवनाबद्दलच नाना प्रश्न विचारून तो तिला छेडीत रहायचा. बापासारख्याच असणाऱ्या आवाजाचा खर्ज लावून तो बोलायचा. आणि आपल्या स्फटिक–स्वच्छ नजरेने तिची कामुक आर्जवं करायचा. ग्रिगरी तिथे आला की येवगेनीच्या डोळ्यातील आग विझून जायची. ग्रिगरीच्या पुढे तो चुट्टा धरायचा. थोड्या वेळाने निघून जायचा.

'कशाला आला होता तो ?' आक्सिनियाकडे न पाहता ग्रिगरी विचारायचा.

'मला काय माहीत कशाला आला होता ?' त्या अंमलदाराचा चेहरा आठवून आक्सिनिया बळेच हसायची. 'आत आला न् त्या तिथे हा असा बसून राहिला ग्रिशा ! (येवगेनी कसा पोक काढून बसायचा त्याची ती त्याला नक्कल करून दाखवायची.) इतका बसला इतका बसला की त्याचा अगदी वीट आला मला ! त्याचं गुडघं हे असं टोकावलं होतं !'

'तू त्याला आत बोलावलंस ?' ग्रिगरीचे डोळे रागाने आकुंचित होत.

'मला काय करायचंय त्याच्याशी ?'

'नीट संभाळून हं! नाहीतर त्याला लाथेच्या ठोकरीनं उडवून देईन पावलाणाखाली!'

ओठावर स्मित खेळवीत आक्सिनिया ग्रिगरीकडे टक लावून बघायची. तो थट्टेत बोलतोय का मनापासून बोलतोय ते तिला नीट समजायचं नाही!

१५.

'लेंट' च्या चौथ्या आठवड्यात हिवाळा वितळू लागला. डॉनच्या काठाला अनावृत्त जळाच्या चुण्या पडू लागल्या. वरून पाझरत जाणारा बर्फ करडा पडला आणि त्याला सच्छिद्र फुगवटा आला. संध्याकाळी टेकड्यांवरून मंद गोंगाट येऊ लागला. वर्षानुवर्षे चालत आलेल्या समजुतीनुसार ही खूण थंडीच्या गोठण्याची होती. पण प्रत्यक्षात वितळणी चांगलीच सुरू झालेली होती. सकाळी हवेत तरल गोठवणीची शिरशिरी असायची. पण दुपारपर्यंत भूमीवरील ठिगळे उघडी पडल्यासारखी दिसायची. मार्च महिन्याचा, गारठलेल्या झाडसालींचा, चेरी वृक्षाचा आणि कुजलेल्या गवताचा वास नाकपुड्यात शिरू लागला.

नांगरणीच्या मोसमाची तयारी मिरोन कोर्शुनोवनी हळूहळू सुरू केली. तिळातिळाने मोठा होत जाणारा दिवस ते कुळवाच्या दात्याना धार लावण्यात· खटाऱ्यांची चाके दुरुस्त करण्यात मांगरातच घालवू लागले. 'लेंट' च्या चौथ्या सप्ताहात म्हाताऱ्या ग्रिशाकाना नेहमी उपवास असायचा. गिरजाघरातून परत आले की ते थंडीने काळेनिळे पडलेले असत. मग ते आपल्या सुनेजवळ लुकिनिचनाजवळ कुरकुरत.

'तो उपाध्या मला वैताग आणतो! नालायक माणूस आहे! अंड्यांचं ओझं नेणारा छकडेवाला असतो ना तसं सुस्तपणे चाललेलं असतं त्याचं!'

'तुम्ही ईस्टरच्या आधीचा सप्ताह उपास करायला हवा होता. तेव्हा हवेत जरा ऊब, गरमी असते.'

'नतालियाला हाक मार! तिला माझ्यासाठी गरम मांडमोजे विणायला सांगतो' ते उत्तर देत 'एवढे पातळ तळाचे मोजे घालून लांडगाही गोठायचा!' असे वर म्हणत.

दोन दिवस पाहुणी आल्यासारखी नतालिया माहेरी रहात होती. ग्रिगरी आपल्याकडे परत येईल अशी श्रद्धा तिला अद्यापही वाटत होती. तिचे अंतःकरण त्यांच्यासाठी तळमळत होते, त्याची वाटुली बघत होते. सारासार विवेकाचा कुजबुजता इशारा ते मन ऐकायला तयार नव्हते. अकारण आणि अनपेक्षित बेअब्रूने चोळामोळा झालेली नतालिया ह्या कुशीवरून त्या कुशीवर होत रात्रीच्या रात्री तळमळताना शिणून जायची. आधीच्यात आणखी एका वेदनेची भर पडली होती. ह्यातून काय निष्पन्न होणार ह्याची भयाकुल प्रतीक्षा करीत ती आपल्या जनानी खोलीत येरझारा घालीत रहायची. उघडचा रानात फडफडणाऱ्या घायाळ टिटवीसारखी ! ती घरी आल्याच्या सुरुवातीच्या दिवसापासून तिचा भाऊ मितका तिच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहू लागला होता. एक दिवस तिला पडवीत गाठून त्याने खुल्लंखुल्ला प्रश्न केला.

'अजून ग्रिशासाठीच झुरत्येयस ?'

'तुला काय करायचंय ?'

'तुला जरा खूष करीन म्हणतो !'

नतालियाने त्याच्या डोळचात पाहिले. तिथे तिच्या जे दृष्टीस पडले ते पाहून तिचा थरकाप उडाला. त्या पडवीतील अंधुक प्रकाशात मितकाचे मांजरासारखे हिरवे डोळे चमकत होते. डोळचांच्या गर्तातून तेलकट चकाकी दिसत होती. धाडकन दरवाजा लावून घेऊन नतालिया पळत पळत आजोबांच्या खोलीकडे गेली आणि थाडथाड उडणाऱ्या आपल्या काळजाचे ठोके ऐकत उभी राहिली. दुसऱ्या दिवशी अंगणात मितका तिच्यापाशी आला. गुरांसाठी तो ताजी वैरण काढीत होता. गवताचे हिरवे डेख त्याच्या सरळ केसावरून आणि लोकरी टोपीवरून लोंबत होते. डुकरांच्या कोंठिब्यापासून नतालिया कुत्र्याना पिटाळून लावीत होती.

'स्वतःचा छळ करून घेऊ नको नतालिया !'

'मी पपाना सांगीन !' आपले हात आत्मसंरक्षणार्थ उंचावीत ती किंचाळली.

'तू मूर्ख आहेस !'

'माझ्या अंगाला हात लावू नको ! जनावरा !!

'आरडाओरडा करायला काय झालं ?

'चालता हो मितका ! आत्ताच्या आत्ता जाते न् बाबाना सांगते ! माझ्याकडं असल्या नजरेनं पहायची हिंमत कशी होते तुझी ! काही लाजलज्जा ?

धरणी दुभंग होऊन तुला गिळून कशी टाकीत नाही ?'

'नाही ना गिळून टाकीत ?' आपलं म्हणणं सिद्ध करण्यासाठी मितकाने जमिनीवर बुटाची लाथ मारली आणि तो तिच्याजवळ सरकला.

'माझ्याजवळ येऊ नको मितका !'

'आता नाही येत ! रात्री येईन ! देवाच्यान येईन !'

थरथरणारी नतालिया आवाडातून निघून गेली. त्या दिवशी रात्री तिने आपले अंथरुण पेटाऱ्यावर घातले आणि आपल्या धाकटया बहिणीला झोपायला सोबतीला घेतले. रात्री ती सारखी कुशीवरून इकडे तिकडे होत तडफडत होती. तिचे धगधगणारे नेत्र काळोखाला भेद करू पहात होते. 'खुट्' आवाजाकडेही तिने कान टवकारले होते. किंचाळून घर डोक्यावर घेण्याला ती सिद्ध होती. परंतु पलीकडच्या खोलीत झोपलेल्या ग्रिशकाच्या घोरण्याने किंवा तिच्या बाजूला अस्ताव्यस्त झोपलेल्या तिच्या बहिणीच्या मधून मधून झोपेत गुरगुरण्यानेच काय तो तिथल्या नीरवतेचा भंग होत होता.

दिवसांचें धागे अशा काही अखंड, सांत्वनातीत दुःखाने सुटत चालले होते की जे फक्त बायकांचे बायकाच जाणोत !

लग्नाच्या प्रयत्नात नुक्त्याच झालेल्या बेअब्रूतून मितका सावरला नव्हता. त्यामुळे तो उदास आणि कोपिष्ट बनला होता. रोज संध्याकाळी तो बाहेर पडायचा. पहाटेपूर्वी क्वचितच घरी परतायचा. नवरा लष्करात गेलेला पाहून रंगढंग करणाऱ्या साळकाया माळकायांशी त्याचे व्यवहार चालू होते. पत्त्याचा जुगार खेळायला तो स्तिपान आस्ताकोवच्याकडे जायचा. त्याची चालचलवणूक त्याचे वडील पहात होते पण सध्या ते काही बोलत नव्हते.

ईस्टरच्या सुमारास नतालियाला पांतिलेय प्रोकोफिएविच मोखोवच्या दुकानाबाहेर भेटला. तिला हाक मारून तो म्हणाला,

'थांब जरा!'

ती थांबली. ग्रिगरीची लांबून आठवण करून देणारा आपल्या सासऱ्याचा चेहरा पाहून तिच्या काळजात दुःखाची कळ आली.

'आम्हा म्हाताऱ्याना भेटायला का येत नाहीस कधी कधी ?' असे विचारून म्हाताऱ्याने तिच्याकडे ओझरता कटाक्ष टाकला. जसा काही तिच्याविरुद्ध काही गुन्हा केल्याबद्दल तोच दोषी होता. 'हिला तुझी आठवण येते–! तुझं कस चाललंय ह्याचा तिला घोर पडलाय ! कसं चाललंय तुझं ?'

अवघडलेल्या अवस्थेतून नतालिया भानावर आली.

'मेहरबानी–!' ती म्हणाली. क्षणभर घोटाळून ती म्हणाली ('बाबा' असे तिला म्हणायचे होते) 'पांतेलेय प्रोकोफिएविच–!'

'घरी का येत नाहीस आम्हाला भेटायला?'

'घरी खूप कामात असते!'

'आमचा ग्रिशा–! ओह्!' दु:खाने म्हाताऱ्याने मुंडी घुसळली. 'त्यानं आमच्या तोंडाला काळोखी फासली! बदमाश! कसं छान चाललं होतं सगळं!'

'बाबा अं!' नताशा घोगऱ्या आवाजात म्हणाली. तिचा कंठ दाटून आला होता.

'मला वाटतं असं व्हायला नको होतं!' नतालियाचे डोळे डबडबलेले पाहून पांतेलेयने अवघडल्यासारखी अंगाची चाळवाचाळव केली. अश्रू ओघळू नयेत म्हणून तिचे ओठ वेडेवाकडे झाले होते.

'बराय! जा माझे पोरी! त्या रांडिच्याचा शोक करू नको! तुझ्या करंगळीच्या नखाची सर नाही त्याला! एकादवेळी येईलही तो माघारी! त्याचा समाचार घ्यायचाय मला! चांगला खरमरीत समाचार घ्यायचाय!'

उरात मुंडी घालून नतालिया निघून गेली. जणू काही आत्ता धावत सुटणार अशा आविर्भावात ह्या पायावरून ह्या पायावर भार देत पांतेलेय उभा होता. नतालियाने मागे वळून पाहिले. काठीवर जोराने भार टाकीत म्हातारा चौकातून लंगडत चालला होता.

१६.

वसंतऋतु जसा जवळ आला तशा स्तोकमनच्या 'वर्कशॉप'मधल्या बैठका कमी कमी होऊ लागल्या. गावकरी शेतीच्या कामाच्या तयारीला लागले होते. एंजिनवाला इवान अलेक्सिएविच आणि गुड्डू काय ते गिरणीतून येत. येताना बरोबर दाविदलाही घेऊन येत. ईस्टरच्या आधीच्या गुरुवारी ते दिवस कलायच्या सुमारास वर्कशॉपमधे गोळा झाले. स्तोकमन आपल्या बाकावर बसून कानशीने एक अंगठी घाशीत होता. पन्नास कोपेनच्या नाण्यापासून त्याने ती बनवली होती. मावळत्या सूर्यकिरणांचे कवळे खिडकीतून ओघळते होते. त्यामुळे जमिनीवर

धुळकट पिवळा-तांबुस चौकोन तयार झाला होता. एंजिनवाल्याने तिथली पकड धरून हाताने तो तिच्याशी चाळा करू लागला.

'पिस्टिनीबद्दल विचारण्यासाठी परवा मालकाकडं जावं लागलं!' तो म्हणाला, 'ती मिलेरोवाकडंच न्यायला हवी. इथं दुरुस्त नाही व्हायची. हा एवढा तडा गेलाय!' इवान अलेक्सिएविचने करंगळीची लांबी दाखवली. कुणाला दाखवली कुणास ठाऊक!

'मिलेरोवोत वर्कशॉप आहे काय?' नाणे कानशीने घासत आणि चंदेरी झितरी इतस्ततः उडवीत स्तोकमनने विचारले.

'पोलादाची ओतारशाळा आहे. गेल्यावर्षी काही दिवस मी तिथं होतो.'

'बरेच कामगार आहेत?'

'मला वाटतं चारएकशे असतील.'

'कसे काय आहेत?' आपले डोके मागेपुढे हलवीत स्तोकमन आपले काम करीत होता. त्यामुळे त्याचे शब्द तोतऱ्यासारखे सुटे सुटे येत होते.

'चांगले मजेत आहेत! तुम्ही म्हणता तसले श्रमिक नाहीत ते. चघळ चोथा आहेत नुसते!'

'असं का?' गुडघ्याखाली आपली थोराड बोटे एकमेकात गुंतवून स्तोकमनच्या पलीकडे बसलेल्या 'गुडू' ने विचारले.

गिरणीत मजुरी करणाऱ्या दाविदच्या केसावर पीठ उडाल्याने ते पांढरे दिसत होते. वर्कशॉपमध्ये तो येरझारा घालींत होता. त्याच्या बुटाने चाळवल्या जाणाऱ्या भुशाची खरखरीत सळसळ ऐकताना तो हसत होता. त्याला वाटत होते की आपण जसे काही शेंदरी पाने गळून पडलेल्या खोल घळीतून चाललोय आणि ती पाने लीलया दडपली जाऊन त्या दमट गालिच्याची नव्हाळी पावलाखाली तरारून येत आहे.

'कारण त्याचं अगदी मजेत चाललंय! प्रत्येकाला आपलं घरकुल आहे! बायको आहे! सगळी सुखसोय आहे. त्यातल्या चांगल्या निम्म्याहून जास्तीनी सौदा करून तिथला बाप्तिस्मा घेतलाय! धनी स्वतःच त्यांचा धर्मगुरु आहे! एकमेकाची नाकं चाटणारे आहेत! आणि त्यांच्या अंगावर घाण तर इतकी घनदाट आहे की ती काढायला फावडंच हवं!'

'इवान अलेक्सिएविच 'बाप्तिस्मा' घेतलेले म्हणजे काय प्रकार आहे?' त्या अपरिचित शब्दावर झेपावत दाविदने विचारले.

'बाप्तिस्मा घेतलेले? ते आपल्या पद्धतीनं देवाची पूजा करतात. सनातन्यां-सारखाच तो एक पंथ आहे.'

प्रत्येक मूर्खाची चळण्याची आपली एक पद्धत असते !'

'तर मी काय म्हणत होतो ? मी सेर्गेई प्लातोनोविचना भेटायला गेलो होतो.' इवान अलेक्सिएविच आपली कथा पुढं सांगू लागला. 'आतियोपिन तिथं होते. मला त्यानं बाहेर बसायला सांगितलं. मी तिथं वाट बघत बसलो. दारातून आतलं बोलणं कानावर पडत होतं. मौखोव म्हणत होता की जर्मनीबरोबर लौकरच युद्ध होणार म्हणून. त्यानं ते पुस्तकात वाचलं होतं. पण आतियोपिन म्हणत होता की जर्मनी आणि रशियात युद्ध होणं शक्य नाही.' इवान अलेक्सिएविचने आतियोपिनच्या बोबड्या बोलण्याची इतकी झकास नक्कल केली की दाविदला खुदकन हसूच आले. पण गुड्डूच्या तोंडावरचा खवचट भाव बघून तो एकदम चूप झाला.

'जर्मनीबरोबर युद्ध होणं शक्य नाही कारण जर्मनी आपल्या अन्नावर जगतोय !' कानावर पडलेल्या संभाषणाचा वृत्तांत इवान अलेक्सिएविच पुढे सांग लागला. 'मग एक तिसराच आवाज माझ्या कानावर आला. नंतर मला समजलं की तो अंमलदार म्हाताऱ्या लिस्तनित्सकीचा मुलगा होता. 'युद्ध होणार' तो म्हणत होता 'द्राक्षाच्या मळ्यावरून तें जर्मनी आणि फ्रान्सचं होणार. पण आपला त्याच्याशी काही संबंध नाही.' तुला काय वाटतं ओसिप दाविदोविच ?' स्तोकमनकडे वळून इवानने विचारले.

'मला भविष्य बिवष्य येत नाही' आपल्या ताठ केलेल्या हातातील अंगठीकडे टक लावून बघत स्तोकमनने उत्तर दिले.

'त्यांनी एकदा युद्ध सुरू केलं की आपल्यालाही त्यात पडावंच लागणार. आपल्याला आवडो न आवडो आपल्या झिज्या धरून ते आपल्याला त्यात खेचणार.' गुड्डूने जाहीर केले.

'मित्रानो त्याचं असं आहे' एंजिनवाल्याच्या हातातील पकड हळूच काढून घेत स्तोकमन बोलू लागला. तो गंभीरपणे बोलत होता. एकूण बाब त्याला संपूर्णपणे समजून सांगायची होती. गुड्डू बाकावर नीट आरामात बसला. दाविदने तोंडाचा 'ओ' कार केला होता. त्यामुळे त्याचे बळकट दात प्रकट झाले होते. आपल्या समर्पक, सुस्पष्ट पद्धतीने स्तोकमनने खुलासा केला. बाजारपेठा आणि वसाहतींसाठी भांडवलशाही राष्ट्रात कसे कलह होतात ते सांगितले. त्याचे बोलून झाल्यावर इवान अलेक्सिएविचने त्वेषाने विचारले,

'खराय, पण ह्यात आपला काय संबंध ?'

‘इतर दारूबाजांच्या दंगलीत तुमची डोकी दुखायला लागतील.’ स्तोकमन हसून म्हणाला.

‘लहान पोरासारखं बोलू नको ! तुला म्हण ठाऊक आहे ना ? धन्याची जुंपली की शेतकऱ्यांच्या शेंड्या झुलायला लागतात !’

‘हुं !’ असा उद्‌गार काढून इवान अलेक्सिएविचने कपाळाला अशा काही आठ्या घातल्या की विचाराचे कुठलेतरी चिवट ढेकूळ फोडण्याचाच तो प्रयत्न करीत होता.

‘लिस्तनित्सकी नेहमी नेहमी मोखोवकडे कशासाठी येत असतो ? त्याच्या मुलीच्या मागं आहे की काय ?’ दाविदने विचारले.

‘कोर्शुनोवच्या कारट्यानं तिथं आधीच विचका करून ठेवलाय,’ गुड्डू मधेच खडूसपणे म्हणाला.

‘इवान अलेक्सिएविच तुला ऐकू येतंय का नाही ? तिथं तो अंमलदार कसली हुंगेगिरी करतोय ?’ दाविदने पुन्हा विचारले.

गुड्याच्या मागे चाबकाचा फटकारा बसल्यासारखा इवान अलेक्सिएविच दचकला.

‘आं ? काय म्हणालास ?’

‘काकाला डुलकी लागल्येय ! अरे, आम्ही लिस्तनित्सकीबद्दल बोलत होतो.’

‘तो स्टेशनावर चालला होता. अरे हां...! आणखी एक बातमी ! मी घराबाहेर पडलो तेव्हा काय नजरेला पडलं असेल ? कोण असेल असं वाटतं ? ग्रिगरी मेलेखोव ! हातात चाबूक धरून बाहेर उभा होता. ‘तू रे इकडं कुठं ग्रिगरी ?’ मी विचारलं.’

‘लेफ्टनंट लिस्तनित्सकीचा मोतद्दार आहे तो’ दाविदने खुलासा केला.

‘त्या मालदाराच्या टेबलावरचं खरकटं खातोय !’

‘तू म्हणजे गव्हाणीतला कुत्रा आहेस, गुड्डू ! कुणालाही पाहून दात विचकशील !’

संभाषण हळूहळू रेंगाळत गेले. इवान अलेक्सिएविच जायला निघाला.

‘चाकरीला जायची गडबड वाटतं ?’ गुड्डूने शेवटची कोपरखळी मारून घेतली.

‘रोज भरपूर चाकरी करत असतो मी !’

मंडळीना निरोप देण्यासाठी स्तोकमन फाटकापर्यंत गेला. नंतर वर्कशॉपला कुलूप घालून तो घरात गेला.

ईस्टर–रविवारच्या आदल्या रात्री काळ्या जलधरानी आभाळ भरून आले. पाऊस पडू लागला. सर्द काळोखाने खेडे भारावून गेले. संध्याकाळी डॉनवरचा बर्फ प्रदीर्घ गरजतें आक्रंदन करीत तडाडू लागला आणि विदीर्ण बर्फाच्या घन-राशीत चेंगरून गेलेली पहिली बर्फवती धारा पाण्यातून अवतीर्ण झाली. दोन अडीच मैलाच्या अंतरावर एकाएकी बर्फ पाघळून गेला आणि उताराकडे ओघ सुरू झाला. एकमेकीविरुद्ध आणि थडीवर बर्फवती धारा टकरत होत्या. पूजा प्रार्थनेच्या गिरजाघरातील घंटा ठोक्यात वाजत होत्या. डॉन जिथे डावीकडे मुसंडी मारते त्या पहिल्या वाकणावर बर्फाची तुंब झाली. हबकणाऱ्या बर्फ धोदाण्यांचा उद्घोष आणि झणाटा खेड्याच्या कानावर येऊ लागला. गिरजाघराच्या अंगणात ठाईठाई पाण्याची डबकी साचली. पोरांचे एक टोळके तेथे जमा झाले होते. उघड्या असलेल्या दारातून प्रार्थनेचे दबदबीत सूर येत होते. जाळीदार खिडक्यातून चमकणाऱ्या उजेडात उल्हासाची दीप्री होती. अंगणातल्या अंधारात जमलेली पोरे पोरींशी चेष्टा करीत त्यांचे मुके घेत होती. एकमेकाना चावट गोष्टी सांगत होती.

गिरजाघराच्या रखवालदाराचे अतिथीगृह सगळ्या जिल्ह्यातून लोटलेल्या कझाकानी भरून गेले होते. शीण खोलीतील कोंदटपणाला वैतागून लोक बाकावरच काय जमिनीवरही झोपत होते. डुगडुगत्या पावलाणावर बसून चुट्टा ओढीत माणसे हवापाण्याच्या आणि हिवाळ्यातील पीकपाण्याच्या गप्पा मारीत होती.

‘शेतीची कामं तुमची मंडळी कधी सुरू करणार ?’

‘मला वाटतं टॉमसदिनाला सुरू होतील !’

‘तुमच्या दृष्टीनं ते बरोबर आहे ! तुमच्या आसपासची जमीन बरड आहे.’

‘काही जमीन तशी आहे. इकडच्या दांडीत खारा झील आहे.’

‘धरणीला आता खूप ओल येईल.’

‘गेल्या वर्षी आम्ही नांगरणी केली. सगळीकडे कडकडीत चिवटपणा होता.’

‘दुन्या, तू कुठं आहेस ?’ अतिथीगृहाच्या पावलाणावरून उंच आवाजात कुणीतरी हाक मारली.

गिरजाघराच्या फाटकातून कुणीतरी घरघरीत आवाजात डाफरून बोलत होते. ‘मुके घ्यायला चांगली जागा शोधून काढली! चला चालते व्हा कारट्यानो! चळ भरलाय तुम्हाला !’

‘तुला सापडलं नाही वाटतं कुणी ? जा–! तुझ्या अंगणातल्या कुत्रीचा

घे मुका !' अंधारातून थरथरत्या कोवळ्या आवाजात कुणीतरी कुणालातरी झिडकारले.

'कुत्री ? तुला घडा द्यायला हवाय . . . . . .!'

दबदबा धावत जाणाऱ्या पावलांचा आवाज . . . . . . झग्याची सळसळ.

छपरावरून किणकिणत्या पागोळ्या गळत होत्या. काळ्या मातीच्या चिखलासारखा चिकटणारा तो धीमा आवाज परत आला.

'प्रोखोरकडून नांगर खरेदी करण्याचा प्रयत्न करतोय. बारा रुबल्स देऊ केले. तो स्वस्तात हातची गोष्ट जाऊ देणारा नव्हे– तो 'तो' आहे !'

चिनार वृक्षासारख्या उफाड्याच्या आणि धष्टपुष्ट पुरंध्रीने आपली महावस्त्रे सळसळवीत जावी तसा मुलायम शुत्कार आणि झुळझुळीत करकरता नाद डॉनवरून येत होता.

उपलाण्या घोड्यावर स्वार झालेला मितका कोर्शुनोव खडाड् खडाड् करीत त्या थप्प अंधारातून मध्यरात्रीचा गिरजाघरापाशी आला. घोडीच्या आयाळीला लगाम बांधून तिच्या वाफाळत्या पुठ्ठ्यावर त्याने थोपटले. खुरांचा रपरप आवाज त्याने थोडावेळ लक्षपूर्वक ऐकला आणि आपला पट्टा नीट करीत तो गिरजाघराच्या अंगणात गेला. पडवीत गेल्यावर त्याने टोपी काढून हातात घेतली, भाविकपणे मान झुकवली आणि बायकाना बाजूला लोटीत तो धक्काबुक्की करीत वेदीजवळ आला. कृष्णवेष परिधान केलेल्या कझाकांची डाव्या बाजूला दाटी झाली होती. उजव्या हाताला बायकाची चित्रविचित्र गर्दी उडाली होती. पहिल्या ओळीत असलेल्या आपल्या वडिलाना मितकाने पाहिले. क्रूसाची निशाणी करण्यासाठी उंचावलेला त्यांचा हात मधेच पकडीत तो त्यांच्या केसाळ कानात कुजबुजला, 'बाबा, बाबा, जरा बाहेर चला !'

संमिश्र वासांच्या दाट पडद्यातून धक्काबुक्की करीत गिरजाघराच्या बाहे पडताना मितकाच्या नाकपुड्या थरथरत होत्या. जळणाऱ्या मेणबत्तीची वाफ घामेजून गेलेल्या बायकांच्या शरिरांचे दर्प, फक्त नाताळात आणि ईस्टरला बाहेर पडणाऱ्या कपड्यांचे गलेफी कुबट वास, दमट चामडी, डांबरी गोळ्या, उपासाने खपाटी गेलेल्या पोटांचे अपानवायू ह्यानी त्याचे डोके भणाणून गेले.

पडवीत आल्यावर वडिलांच्या कानाजवळ तोंड नेऊन मितका म्हणाला ' नतालिया मरायला टेकल्येय !

१७.

स्टेशनापर्यंत येवगेनीबरोबर प्रवास करून 'पाम'च्या रविवारी ग्रिगरी परतला. पाझरणीने बर्फ वाहून गेलेला त्याला आढळला. रस्ता दोन दिवसात उखडून गेला होता. स्टेशनपासून सुमारे सोळा मैलावर असणाऱ्या एका युक्रेनी खेड्याजवळ एक नाला ओलांडताना त्याचे घोडे जवळ जवळ वाहून गेले होते. दिवस कलण्याच्या सुमारास तो त्या खेड्यात पोहोचला. आदल्या रात्री बर्फ पाघळून वाहू लागलेला होता. गढूळ आणि पिंगट हौराने फुगलेल्या आणि फेसाळ-णाऱ्या नाल्यात रस्ता वाहून जाण्याचा धोका निर्माण झाला होता. घोड्याना चारा वैरण देण्यासाठी ज्या खाणावळीत तो थांबला होता ती नाल्याच्या अरतीरा-वर होती. रात्री पाणी सहजच खूप वर चढले असते. तेव्हा ग्रिगरीने नाला पार करायचे ठरविले.

आल्या वाटेने त्याने जिथून बर्फ ओलांडला होता त्या जागेपर्यंत त्यान जेव्हा गाडी आणली तेव्हा त्याला असे आढळून आले की नाल्याचा ताण शिलतास फुगून वाहात होता. कुपाटीचा एक तुकडा आणि गाडीचे अर्धे चाक प्रवाहाच्या मधोमध उपडथवीत गरगरत होते. थडव्याच्या खुल्या रेतीत घसरगाडीच्या पाट्यांच्या ताज्या निशाण्या होत्या. घामाने निथळलेले आणि तंगड्यावर फेसाचे झुबके उडालेले घोडे त्याने थोपवले आणि त्या निशाण्या जवळून बघण्यासाठी त्याने खाली उडी मारली. नालव्याजवळ त्या निशाण्या किंचित डावीकडे बळून पोहट्यात लुप्त झाल्या होत्या. परतीरापर्यंतच्या अंतराचा त्याने नजरेने अदमास घेतला. जास्तीत जास्त पन्नास पावले असतील. घोड्यांजवळ जाऊन त्याने त्यांचे जोते तपासले. त्याच वेळी एक युक्रेनी म्हातारा जवळच्या झोपडीतून त्याच्याकडे आला.

'इथं चांगला पायाब आहे का?' हातातले लगाम खल्लाळत्या पिंगट पुराकडे उडवून ग्रिगरीने त्याला विचारले.

'सकाळी काही माणसं इथून पलीकडे गेली.'

'खोल आहे?'

'नाही ! पण तुमची गाडी भिजून जाईल.'

ग्रिगरीने लगाम हाती घेतले, आसुड उगारला आणि मोजका सक्त इशारा देऊन त्याने घोडी हाकारली. डावीकडील कस्तानी रुंद चौकाच्या घोडयाने मानेला हिसडा दिला. फुरफुरत आणि पाणी हुंगत घोडी अनिच्छेने पुढे जाऊ लागली, ग्रिगरीने आसुडाचा फडत्कार केला आणि आपल्या जागेवर तो उठून उभा राहिला. सुरुवातीला घोडी गुढघाठाव पाण्यात चालत होती. पण एवढयात ताण त्यांच्या उरापर्यंत चढला. ग्रिगरीने त्याना मागे वळण्याचा प्रयत्न केला पण ती लगामाला दाद न देता तरंगू लागली. घसरगाडीची पिछाडी ससेटयाने गर्रकन् फिरली आणि घोडयांची डोकी प्रवाहाच्या उलटया दिशेने झाली. पाण्याचे होलाळे त्यांच्या पाठीवरून वाहू लागले. घसरगाडी होलपाडू लागली आणि त्याना कसून माग खेचू लागली.

'ए- ए-! उजव्या हाताला घे !' थडव्यावरून धावत आणि आपली लोकरी टोपी हालवीत तो युक्रेनी ओरडत होता.

भयंकर चवताळलेला ग्रिगरी ओरडत घोडयाना हाकारीत होता. खेचणाऱ्या घसरगाडीमागे पाण्याचा भोवरा फेसाळत होता. रातोरात वाहून गेलेल्या पुलाचे अवशेष पाण्याबाहेर डोकावत होते. त्या ढिगाऱ्यावर गाडीचे पाटे झेपाटले आणि विलक्षण लीलया ती उपडी झाली. धापा टाकणारा ग्रिगरी डोक्यावर पाण्यात आदळला. हातातील लगामांची पकड मात्र त्याने सोडली नाही. होलपाडणाऱ्या घसरगाडीने तो वरखाली होत होता. त्याच्या पायाना आणि त्याच्या मेंढीकुडत्याच्या काठाना पाण्याची नाजूक ओढ खेचत होती. गाडीचा पाटा पकडण्यात अखेरीस त्याला यश आले. त्याने लगाम टाकून दिले. दोन्ही हात एक-मेकांवर आडवे टाकून स्वतःला खेचून घेत तो करोळीच्या दिशेने गेला. पत्रा ठोकलेली धुरखीळ पकडण्याच्या बेतात तो होता. एवढयात धारोश्याविरुद्ध झगडणाऱ्या कस्तानी घोडीने त्याच्या गुडघ्यावर दुगाणीची टाप हाणली. गटांगळया खाणाऱ्या ग्रिगरीने आपला हात लांब करून काढण्या पकडल्या. घोडयापासून आपण दूर खेचले जात असल्याचे त्याला जाणवले आणि त्याची पकड सैलावली. त्याच्या शरीराचा कण न् कण थंडीने बधिरला होता. कसाबसा तो घोडयांच्या डोक्यापर्यंत पोहोचला- त्या जनावराने आपली पिसाट, प्राणांतिक थरकाप उडालेली, लालबुंद नजर थेट त्याच्या विस्फारीत बुबुळात रोखली. ते निसरडे चामडी लगाम पकडण्याचा तो परत परत प्रयत्न करीत होता. पण त्याच्या बोटाना ते गवसत नव्हते. शेवटी त्याने ते कसेबसे पकडले. अचानक त्याचे पाय जमिनीवर खरचटले.

'हुर्रर .....!'

देह उंचावीत स्वतःला पाणथडीकडे खेचताना तो ठेचकाळला आणि घोड्याच्या छाताडाच्या धक्क्याने उथळवट पाण्यात कोसळला. त्याला तुडवून घोड्यानी ती घसरगाडी त्वेषाने पाण्याबाहेर खेचली. दमछाक झालेले ते घोडे थोड्या पावलांवर जाऊन कुडकुडत आणि वाफाळत उभे राहिले.

कोणत्याही वेदनेची जाणीव हरपलेला ग्रिगरी ताडकन उठून उभा राहिला. असह्य तापलेली कणिक सर्वांगाला लिपून बसावी तशी थंडी त्याला लिगटली होती. घोड्यांपेक्षाही तो जास्त कुडकुडत होता. आपले पाय तान्ह्या मुलासारखे दुबळे झाल्याचे त्याला जाणवत होते. हळूहळू तो भानावर आला.

पाट्यावर गाडी वळवून त्याने घोडी जाम पिटाळली. त्याना ऊब यावी म्हणून. गनिमावर हल्ला चढविल्यासारखा तो खेड्यातील रस्त्यावरून चौखूर उधळीत आला आणि वेग कमी न करता पहिल्याच उघड्या फाटकातून त्याने गाडी आत घेतली.

घरवाला एक अगत्यशील युक्रेनी निघाला. घोड्यांची सरबराई करण्यासाठी त्याने आपल्या पोराला पाठविले आणि त्याने स्वतः ग्रिगरीला कपडे बदलण्यात मदत केली. 'काय बिशाद कुणी नाही म्हणेल !' अशा आवाजात त्याने बायकोला चूल पेटवण्याचा हुकूम सोडला. आपले कपडे त्याने वाळत घातले आणि मालकाची तुमान चढवून चुलाणाच्या ओट्यावर तो आडवा झाला.

कोबीच्या अनामीष रश्शाचे जेवण झाल्यावर तो झोपी गेला. पहाटेपूर्वीच तो मार्गाला लागला. चांगला नव्वद मैलांचा रस्ता त्याला काटायचा होता आणि प्रत्येक मिनिट मोलाचे होते. वासंतिक पाणलोटात साऱ्या वाटा कालवून जाऊन माळरानाची पाहता पाहता खिचडी होणार होती. प्रत्येक जुतरी, प्रत्येक पोईड वितळत्या बर्फामुळे गरजता धोदाणा झालेला होता.

काळेजल्या उखणत्या रस्त्याने धावता धावता घोड्यांची दमछाक झाली. पहाटेच्या गोठलेल्या थंडीने रस्त्याना जे दाठरलेले कवच निर्माण केले होते त्यावरून गाडी पिटाळीत तो आपल्या मार्गापासून आड बाजूला सुमारे अडीच मैलावर असलेल्या खेड्यांत आला आणि फाट्यावर थांबला. घामाने निथळलेल्या घोड्यांच्या अंगातून वाफा निघत होत्या. त्याच्या मागे त्याच्या घसरगाडीच्या पाट्याची चकाकती चाकोरी दिसत होती. त्याने घसरगाडी तिथेच सोडून दिली. घोड्यांच्या शेपट्या गुंडाळून बांधल्या. एका उपलाण्या घोड्यावर तो स्वार

झाला. दुसऱ्याची ओठाकी त्याने पकडली. पामरविवारच्या सकाळी तो यागोदनोएला येऊन पोहोचला.

त्याच्या प्रवासाची कथा म्हाताऱ्या लिस्तनित्सकीने लक्षपूर्वक ऐकून घेतली आणि तो घोडीं बघायला गेला. त्याना अंगणात पुढेमागे फिरवीत साशका त्यांच्या ओढावलेल्या पुठ्ठ्यांकडे रागाने बघत होता.

'काय म्हणतायत घोडी ?' धन्याने विचारले.

'दिसतंयच् डोळ्यांना !' चालायचा न थांबता आपली पिकलेली हिरवट वाटोळी दाढी हलवीत साशकाने उत्तर दिले.

'बेसुमार पिटाळली गेलीत ना ?' धन्याने विचारले.

'नाय ! कस्तानीला उराटी घासल्यानं फोड आलेत, पण त्यात काय विशेष नाय.' घोडी न थांबवता साशकाने उत्तर दिले.

'जा ! थोडा आराम कर !' ग्रिगरीकडे हात करून लिस्तनित्सकी म्हणाला, ग्रिगरी आपल्या खोलीकडे गेला पण एकच रात्र त्याला विश्रांती मिळाली.

दुसऱ्या दिवशी वेनियामिन त्याच्या खोलीत आला. नवीन साटिनचा सदरा त्याने घातलेला होता. त्याचा बोजड चेहरा उजळला होता. ग्रिगरीला तो म्हणाला.

'ग्रिगरी ! धन्यानं बोलावलंय ताबडतोब !'

पायात नमदी स्लिपर्स घातलेला जनरल खोलीत येरझारा घालीत होता. ग्रिगरी एकदा खोकला. दिवाणखान्याच्या दारात एका पायावरून दुसऱ्या पायावर भार देत तो उभा राहिला. दुसऱ्यांदा तो खोकला तेव्हा धन्याने त्याच्याकडे नजर टाकली.

'काय काम आहे ?'

'वेनियामिनानं वर्दी दिली.'

'अरे खरंच ! माझ्या तबरंगूवर आणि कस्तानीवर जीन चढव ! लुकेरियाला म्हणावं–कुत्र्याना खायला घालू नको. ती शिकारीला जाणार आहेत.'

ग्रिगरी खोलीतून जायला निघाला. त्याच्या धन्याने ओरडून त्याला थांबवले.

'अरे ऐकलंस का ? तू पण माझ्याबरोबर येणार आहेस.'

आक्सिनियाने ग्रिगरीच्या खिशात एक केक कोंबला आणि ती फिस्कारली, 'माणसाला तो धड खाऊपण द्यायचा नाही ! मढं नेलं त्याचं ! निदान तुझा गळपट्टा तरी घाल, ग्रिशा !'

तंगबार घोडी ग्रिगरीने कुपाटीजवळ आणली आणि कुत्र्याना उद्देशून शिट्टी मारली.

लिस्तनित्सकी बाहेर आला. निळ्या कापडाची कुडती घालून त्यावर जडावकाम कलेला कातडी कमरपट्टा त्यानी आवळला होता. निकेलचे पाणी दिलेले डेचके बुचाच्या खोळीत त्याच्या पाठीवर लटकत होते. त्याच्या दंडातून लोंबलेल्या चाबकाची वादी एखाद्या सर्पासारखी त्याच्या मागोमाग येत होती,

धनी स्वार होण्याची वाट बघत ग्रिगरी घोड्याचे कायदे हातात धरून उभा होता. म्हाताऱ्या लिस्तनित्सकीच्या कृश देहाने इतक्या लीलया खोगीरावर मांड घेतली की ते पाहून ग्रिगरी चकित झाला. आपल्या दस्तकी हातात घोड्याचे कायदे प्रेमळपणे सावरून घेत जनरलनी करडेपणाने फर्मावले, ' माझ्या अगदी मागोमाग ये ! '

ग्रिगरीने तबरंगुवर मांड घेतली. तो चार वर्षाचा घोडा कोंबड्यासारखी मान उंचावीत तिरका तिरका जाऊ लागला. त्याच्या खुरांना नाल ठोकलेले नव्हते. तेव्हा बर्फाच्या कवच्यांवरून जाताना तो घसरला आणि दांडीवर खाली बसला. म्हातारा जनरल पुढे झुकून पण खोगीरात मांड घट्ट रोवून बसला होता.

' कुठं चाललोत आपण ?' त्याला गाठीत ग्रिगरीने विचारले.

' ओलशान्स्की घळीकडं ! ' खोल खर्जात जनरलने उत्तर दिले.

घोडी गामचालीने चालत होती. तबरंगु तोंडातील लगाम ताणीत होता आणि गर्दन फिरवून तिरप्या नजरेने आपल्या स्वाराकडे बघत त्याचे गुडघे चावायला बघत होता, टापटेप्याच्या आडवणावर पोहोचल्यावर लिस्तनित्सकीने आपल्या घोड्याला टाच मारली. शिकारी कुत्र्यांची साखळी ग्रिगरीच्या मागोमाग येत होती. तबरंगूच्या शेपटीला नाकाड भिडवून म्हातारी काळी कुत्री पळत होती. आपल्या दांडीवर बसकण घेत घोड्याने तिला पकडू पाहिले. पण ती कुत्री मागे सरकली. मागे वळून पाहणाऱ्या ग्रिगरीकडे तिने एखाद्या म्हातारीच्या करुण नजरेने पाहिले.

आपल्या इष्ट स्थळी म्हणजे ओलशान्स्की घळीत ते अर्ध्या तासात पोहोचले. उतरणीच्या घारशाजवळ असणाऱ्या रानझुडपातून लिस्तनित्सकीने घोडा चालवला होता. तिथली असंख्य टोवे सावधगिरीने चुकवीत धारा–धूत घळीत ग्रिगरी उतरला. पुन्हापुन्हा तो वर नजर टाकीत होता. वेड्यावाकड्या पसरलेल्या अनावृत्त आल्डरराईच्या मोरपंखी निळाईतून लिस्तनित्सकीची रेखीव आकृती त्याला दिसत होती. तो म्हातारा पुढे झुकून रिकिबीत उभा राहिला. तेव्हा त्याच्या कमरपट्टा आवळलेल्या निळ्या कुडतीला पाठीवर चुण्या पडल्या. त्याच्या मागोमाग चढत्या उतरत्या कांडाळ्यातून शिकारी कुत्र्यांची झुंड धावत होती.

सरळसोट हुडकी ओलांडून गेल्यावर ग्रिगरी खोगिरात मागे झुकला. ‘चुट्टा ओढायला हरकत नाही- लगाम सोडून द्यावे आणि चंची काढावी’ असा विचार करून त्याने हातमोजे ओढून काढले. चुट्टयाच्या कागदासाठी ग्रिगरीने खिसा शोधला.

‘धर त्याला !’ कांडाळयाच्या पलीकडून पिस्तुलाच्या गोळीसारखी हाळी आली.

ग्रिगरीने तीक्ष्ण नजरेने वर पाहिले. चाबूक उगारून उराठीवर घोडा पिटाळणारा लिस्तनिस्तकी त्याला दिसला. . . . .

‘धर त्याला !’

झडलेल्या केसांचा एक गलिच्छ, मळचा लांडगा धरणीला आपला देह लगटून घळीच्या गर्तेतील दलदलीचे बेंदाड आणि कळकरान ओलांडून पळून चालला होता. एका मोढयावरून झेप घेऊन तो थांबला. कुत्र्यांकडे नजर टाकण्यासाठी त्याने गर्रकन मोहरा वळवला. घळीच्या टोकाला असलेल्या रानात जाणारी त्याची वाट तोडण्यासाठी अर्धचंद्राकृति कडे करून कुत्री त्याच्या पाठीवर येत होती.

झटक्याचे टिपण साधून लांडग्याने एका लहानशा टेंभीवर झेप घेतली. आपली शक्ती कसाला लावून तुरूतुरू धावत त्या म्हाताऱ्या कुत्रीने त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. त्या टोळक्यातील एक अव्वल आणि अत्युग्र दुसरा शिकारी कुत्रा पाठोपाठ येत होता. लांडगा क्षणभर गोंधळला.

ग्रिगरी घळीतून बाहेर पडला. तेव्हा तो त्याच्या दृष्टीआड झाला होता.

नंतर टेंभीवरून नजारा दृष्टीला चांगला दिसू लागला. तोपर्यंत लांडगा माळरानात दूरवर गेला होता आणि शेजारील घळीच्या दिशेने पळत होता. त्याच्या मागोमाग झाडोऱ्यातून धावणारी कुत्री आणि किंचित कडेला घोडयावरून जाणारा म्हातारा लिस्तनित्सकी त्याच्या दृष्टीला पडला. हातातील चाबकाच्या दांडक्याने म्हातारा घोडयाला पिटत होता. लांडगा घळीपाशी पोहोचला तेव्हा कुत्र्यांनी त्याला गांठला होता. त्यातील ‘बहिरीससणा’ नावाचा करडया रंगाचा कुत्रा लांडग्याच्या कमरेतून पांढरे फडके लोंबावे असा त्याला लगटला होता.

‘धर त्याला !’ ती हळी ग्रिगरीकडे आली.

ग्रिगरीने घोडयाला टांच दिली. आपल्यासमोर काय घडतंय ते पाहण्याचा तो विफल प्रयत्न करीत होता. त्याच्या डोळयांना पाण्याची धार लागली होती. सुंसाट वाऱ्याने कानाला दडे बसले होते. शिकारीच्या सनसनाटीने तो एकाएकी पेटल्यासारखा झाला. घोडयाच्या गर्दनीवर झुकून त्याला बेफाम उधळत तो

घळीजवळ येऊन थडकला. तेव्हा लांडगाही दिसत नव्हता आणि कुत्रेही दिसत नव्हते. एक दोन मिनिटात लिस्तनित्सकीने त्याला गाठले. खसकन लगाम खेचीत घोडा थोपवीत तो ओरडला,

'कोणत्या बाजूनं गेले ते?'

'मला वाटतं घळीत शिरले.'

'डाव्या हातानं तू त्याना गांठ! धर त्याला!'

म्हाताऱ्याने घोड्याला टाच दिली आणि उजव्या हाताला तो भरधाव निघून गेला. ग्रिगरीने लगाम खेचले आणि खालच्या तबकात त्याने घोडा उतरवला.

'हैक एऽ!' असे ओरडत दुसऱ्या तालीने तो वर आला.

चाबूक उडवत, आरोळ्या देत त्याने मैलभर घोडा दौडवला. घोड्यांच्या खुराखालून उधळणारी दमट चिकणमाती त्याच्या तोंडावर हबकत होती. ती लांबच लांब घळ उजव्या अंगाला मुरडली होती. तिथून तिला फाट्यांचे त्रिदळ फुटले होते. पहिला फाटा ग्रिगरीने ओलांडला आणि माळरानावर लांडग्याच्या पाटीवर धावणारी कुत्र्यांची गर्दमाळ त्याला दिसली. ओक आणि आल्डरचे घनदाट रान माजलेल्या घळीतून ते जनावर हुसकले गेले होते आणि आता त्या त्रिदळातील उताराच्या वाटेने टाकळी आणि उंटकटाऱ्याच्या तराईच्या दिशेने ते धावत होते.

आपल्या रिकिबीत उभा राहून आणि वारा बसलेल्या डोळ्यातील पाणी बाहीने पुसत ग्रिगरी त्याना न्याहाळू लागला. त्याने डाव्या हाताला दृष्टी टाकली; तत्क्षणी त्याच्या लक्षात आले की आपल्या गावाला लागूनच असणाऱ्या खड्यारानात आपण आलो आहोत. पतझडीच्या मोसमात त्याने आणि नतालियाने नांगरलेल्या भूमीचा वेडावाकडा कसा जवळच होता. त्याने मुद्दामच आपला तबरंगु नांगरलेल्या जमिनीवरून चालवला. तेथील ढेकळातून ते जनावर घसरत अडखडत चालत असताना थोडावेळ त्याच्या शिकारीच्या उत्साहाची पार राखुंडी होऊन गेली. घामाने निथळून गेलेल्या घोड्याला तो शांतपणे चुचकारीत होता. लिस्तनित्सकी आपल्याला बघतोय का काय हे चौफेर न्याहाळीत होता. त्याचा घोडा दुडक्या चालीने चालला होता.

थोड्या अंतरावर नांगरमुठ्यांचे निर्मनुष्य पडण त्याच्या दृष्टीस पडले. आणखी पलीकडे बैलाच्या तीन जोड्या नव्हाळीच्या मुलायम मातीत नांगर खेचत होत्या.

'नक्की आमच्याच गावचे आहेत. ही कुणाची जमीन? आनिकुशकाची तर नाही?' नांगरामागे येणाऱ्या माणसाची ओळख पटण्यासाठी ग्रिगरीने डोळे किलकिले केले.

'धर–!'

दोन कझाकानी नांगर सोडून दिल्याचे आणि जवळच्या घळीकडे जाणाऱ्या लांडग्याची वाट रोखायला ते आडवे गेल्याचे त्याने पाहिले. एकाच्या डोक्यावर ढापणाची आणि तांबडी फीत बांधलेली टोपी होती. हनुवटीखालून त्याने ती पट्टी आवळली होती. हातातील लोखंडी पहार गरगर फिरवीत तो धावत होता. त्या लांडग्याने एकाएकी एका खोलगट फोंडवळीत बसकण घेतली. सर्वात पुढे असलेला कुत्रा थेट त्या फोंडवळीवरुन तीरासारखा चालला होता, पण त्याचे पुढचे पाय त्या खड्डयात जाऊन तो कोलमडला. त्याच्या मागोमाग येणाऱ्या म्हाताऱ्या कुत्रीने थांबायचा प्रयत्न केला. पण तिचा पार्श्वभाग ढेकळांच्या, नांगरलेल्या भूमीवरून घसपटत गेला, वेळेवर वेग आवरता न आलेली ती कुत्री लांडग्यावर जाऊन आदळली. पारध झालेल्या त्या जनावराने आपली मुंडी आवेशाने झिंजाटली. त्या बरोबर ती कुत्री त्याच्या अंगावरून सटकन उडाली. आता कुत्र्यांचा झुंड त्या लांडग्याला भिडली होती. नांगरलेल्या भूमीवरून ते काही पावले फरफटत गेले. धनी यायच्या अर्धा मिनिट आधी ग्रिगरी घोडयावरून पायउतार झाला होता. तो गुडघ्यावर बसला आणि त्याने करौली सुरा काढला.

'तिथं– तिथं– गळयावर!' लोखंडी पहार घेतलेला कझाक ओरडला. तो आवाज ग्रिगरीच्या चांगल्याच परिचयाचा होता. जोराने धापा टाकीत तो धपकन ग्रिगरीच्या बाजूला बसला. पारध झालेल्या जनावराच्या पोटात दात खुपसलेल्या कुत्र्याना त्याने ओढून बाजूला काढले. लांडग्याच्या पुढच्या पायाना एका हाताच्या पकडीत त्याने धरले, जनावराची श्वासनलिका शोधण्यासाठी त्या जनावराची केसाळ कातडी ग्रिगरीने चाचपडली आणि त्यावरून सुरा चालवला!

'कुत्री! कुत्री! त्याना पिटाळा.' पायउतार होत लिस्तनित्सकी गरजला.

मोठ्या मुष्किलीने ग्रिगरीने कुत्र्यांना पिटाळून लावले. आणि आपल्या धन्याकडे नजर टाकली.

थोडया अंतरावर बाजूला उभा होता स्तिपान आस्ताखोव! हनुवटीवर बंद आवळलेली टोपी त्याने घेतली होती. त्याचा चेहरा चमत्कारिक दिसत होता हातातील पहार तो वरखाली करीत होता.

'कुठला रे तू पाव्हण्या?' स्तिपानकडे वळून लिस्तनित्सकीने विचारले.

'तातारस्कीचा !' थोडावेळ घोटाळून स्तिपानने उत्तर दिले आणि ग्रिगरीच्या दिशेने तो पाऊलभर पुढे सरकला.

'नाव काय तुझं ?'

'आस्ताखोव !'

'घराकडं कधी जाणारैस पोरा ?'

'रात्री !'

लांडग्याच्या दिशेने लिस्तनित्सकीने आपले पाऊल उडवून दाखवले. मरणांतिक वेदनेने त्या जनावराच्या जबड्याची क्षीण उघडझाप होत होती. पिंगट केसांचा पुंजका चिकटलेली त्याची एक मागची तंगडी ताठ उभारली होती.

'ते मढं घेऊन ये आमच्याकडं; काय पडेल ती मजुरी देईन' असे म्हणून लिस्तनित्सकीने आपल्या लालबुंद पडलेल्या तोंडावरील घाम गळपट्ट्याने पुसला परत जायला तो वळला आणि पाठीवरच्या डेचक्याचा पट्टा सोडवला.

ग्रिगरी आपल्या तबरंगूकडे गेला. रिकिबीत पाय टाकता टाकता त्याने मागे वळून पाहिले.

आपल्या थोराड दांडग्या मुठी छातीशी आवळून विलक्षण थरथरणारा स्तिपान त्याच्या दिशेने येत होता !

१८.

कोर्शुनोवच्या शेजारी राहणाऱ्या पेलागेया मैदानिकोवाच्या घरी गुडफ्रायडेच्या रात्री बायका गप्पा मारायला जमल्या होत्या. तिच्या नवऱ्याने गाव्हरिलने लोदूझहून लिहिले होते की इस्टरसाठी हक्काची रजा घेण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. पेलागेयाने भिंतींना सफेदा दिला होता आणि आवराआवर करून ठेवली होती. गुरुवारपासून ती त्याच्यां वाटेकडे डोळे लावून बसली होती. पळत पळत ती फाटकाजवळ जाऊन कुपाटीशी उभी रहायची. डोक्याला रुमालबिमाल न बांधलेल्या,सुकलेल्या पेलागेयाच्या तोंडावर गर्भारपणाच्या खुणा उमटल्या होत्या. डोळ्यावर पालथ्या तळव्याचा आडोसा धरून तो येतोय का काय हे रस्त्यावर दुरवर बघत ती उभी रहायची. तिचे गर्भारपण कायदेशीरच होते. कारण गेल्या

वर्षी गाव्हरिल पथकातून परतला होता. येताना त्याने बायकोसाठी रंगीत चिटाचे पोलिश कापड आणले होते. चार रात्री त्याने तिच्याबरोबर घालवल्या. पाचव्या दिवशी तो दारू पिऊन तर्र झाला आणि पोलिश आणि जर्मन भाषेत शिव्या घलू लागला. मग डोळ्यातून टिपे गाळीत एक गाणे म्हणत बसला. १८३१ पासून पोलंडबद्दलचे हे गाणे कझाक म्हणत असत. जेवणापूर्वी गात आणि व्होडका पीत त्याचे मित्र आणि भाऊ त्याच्या बरोबर बसले होते.

आमी ऐकलंया बरकतिचा मोठ्या
पोलंड, देश एक हाय म्हनं
आमी पायलंया, भिकार त्यो तर
हाये हे स्वताच्या डोळियानं
पोलंडात हाय म्हनं खानावळ
पोलंडच्या राजाची खाणावळ
खानावळीत आली तीन पोरं चलाख
प्रशियन, पोल आनि डॉनचा कझाक
त्यांनी घेतली हो, प्रशियननं व्होडका घेऊन
पैसं दिलं म्हनं

पोलंडच्या पोरानं घेतली व्होडका
व्होडक्याचा मोजला रोकडा पैका
कझाकाचं पोर पोटभरून प्याला
पिऊन प्याला नाय चव्वल दिला
अन् खानावळीला, दळिदर आलं ते कायमचं
आलं ते आलंच म्हचं.

कझाकाचं पोर चालं टेचाचं
खनान् नाल वाजं टाचेचं
खानावळवालीला घातला डोळा
चल म्हन माझ्या संगट रहायला
आमच्या डॉनवरती, निवांत डॉन हाय सजनी
पोरगं तिला म्हन.

डॉनच्या मानसाची अशी हाय रीत
विनीत शिवीत नाय गवत कापीत

विनीत नाईत शिवीत नाईत तण नाय कापीत
झक्पक पोशाखाचं त्याचं गुपीत
चल डॉनवरती, निवांत तिथं हाय सजनी
पोरगं तिला म्हून.

जेवण खाणं झाल्यावर गाव्हरिलने आपल्या घरादाराचा निरोप घेतला आणि घोड्यावर बसून तो निघून गेला.

त्या दिवसापासून पेलागियाची नजर पायाची नखे निरखू लागली!

आपण गर्भार कशा झालो त्याचा तिने नतालियाजवळ खुलासा केला. ती म्हणाली, ' गाव्हरिल यायच्या एकदोन दिवस आधी मला स्वप्न पडलं. मी कुरण-रानातून चालल्येय. गेल्या सणाला आम्ही विकली ती गाय माझ्या पुढं चाललेली मला दिसत्येय. ती चालता चालता तिच्या आचळातून दूध ठिबकत होतं. मला वाटलं अरे माझ्या देवा! अशी कशी बाई हिची अर्धवट धार काढली मी? दुसऱ्या दिवशी म्हातारी द्रोझदिखा ' हॉप ' च्या डहाळ्या मागायला आली. मी मला पडलेलं स्वप्न तिला सांगितलं. तेव्हा तिनं मला सांगितलं की मेणबत्तीचं थोडसं मेण काढून घे. त्याचा गोळा कर आणि तो कुठं तरी गाईच्या शेणात नेऊन पुरून टाक. कारण काहीतरी अलाबला दाराशी आल्याचं हे स्वप्न होतं. ती म्हणाली तशी मी पळाले. पण मेणबत्तीच कुठं सापडेना. घरात एक होती. मला ठाऊक होतं पण पोरानी कोळी धरायला ती घेतली असावी. मग गाव्हरिल आला. आला न् हे संकट घेऊन आला. तीन वर्षं कशी बिनघोर काढली. आता बघू माझ्याकडे! ' असे म्हणून तिने आपले पुढें आलेले पोट जास्तच उंचावून दाखवले.

नवऱ्याची वाट पाहता पाहता पेलगेया चिडीला आली होती. तिला एकटीला करमेना तेव्हा तिने शुक्रवारी आपल्या मैत्रिणींना संध्याकाळ तिच्या घरी घालवण्यासाठी बोलावून घेतले. अर्धवट विणलेला मांडमोजा घेऊन नतालिया आली होती. वसंतऋतु सुरु झाला की ग्रिशाका आजोबाना जास्तच थंडी वाजू लागायची म्हणून तिने तो विणायला घेतला होता. ती वाजवीपेक्षा जास्त खुषीत दिसत होती. कुणी चेष्टामस्करी केली की सर्वापेक्षा ती उगीचच फाजील हसत होती. अंतर्यामीची लागलेली कंथाची तळमळ ती त्यांच्यापासून लपवू बघत होती. पेलागेया चुलाणाच्या ओटयावर बसली होती. तिचे अनावृत्त निळ्या जांभळ्या शिरा दिसणारे पाय खाली लोंबकळत होते. कजागमावशी असलेल्या फ्रोसयाची तिनं टिंगल चालवली होती.

'नवऱ्याला तू कसं गं पिटून काढलंस फ्रोसया ?'

'तुला माहीत नाही ? पाठीवर पिटलं ! डोक्यावर पिटलं ! जिथं हाताला लागलं तिथं पिटून काढला !'

'तसा नाही ग माझ्या विचारण्याचा अर्थ. सुरवात कशी झाली ?'

'झाली अशीच !' अनिच्छेने ती म्हणाली.

'नवरा दुसऱ्या बाईबरोबर असलेला पकडलात तर काय मिठाची गुळणी धरून बसाल ?' मात्वेय काशूलिनच्या उंच ढंकाळपार्वती असणाऱ्या सुनेने विचारले.

'आम्हाला सगळं सांग ना फ्रोसया !'

'अग सांगण्यासारखं तसं काही नाही.'

'चल चल ! सांग ! अग आपण सगळ्या सख्या मैत्रिणी तर आहोत इथं!'

सूर्यफुलाच्या बियाची फोलपटं हाताच्या तळव्यात थुंकीत फ्रोसयाने स्मित केले, 'बरेच दिवस त्याची ही भानगड मी पहात होते. मग एक दिवस कुणीतरी मला सांगितलं की डॉनच्या परतीरावर राहणाऱ्या कुणा सटवीला घेऊन तो चक्कीत बसालाय. म्हणून तिथं गेले आणि चक्कीत दोघाना पकडलं.'

'तुझ्या नवऱ्याची काही बातमी कळली का ग नतालिया ?' नतालियाकडे वळून त्याच ढंकाळमायेने मधेच विचारले.

'यागोदनोयेला आहे तो' ती पुटपुटली.

'त्याच्याबरोबर नांदायचा विचार आहे का नाय ?'

'ती खूप नांदेल ! पण त्यानं नांदवून घेतलं पाहिजे ना ?' तिथल्या घरवालीने मधेच तोंड घेतले.

गरम रक्त चेहऱ्यावर उसळून येत आहे असे नतालियाला वाटले. आपली मान हातातल्या मोज्याकडे वाकवून तिने भुवयाखालून बायकांकडे नजर टाकली. इतरापासून आपली शरम लपवणं शक्य नाही हे ओळखून लोकरीचा गुंडा मुद्दामच तिने गुडघ्यावरून खाली लोटून दिला. आणि खाली वाकून त्या थंड फरशीवर ती लोकर चाचपडू लागली. पण तिचे हे नाटक इतके ओढून ताणून आणलेले होते की सगळ्याजणींच्या ते लक्षात आले.

'थुंक बये त्याच्या तोंडावर ! अग मान धड आहे तोपर्यंत जोखड ग काय? मिळतंच कुठं ना कुठं !' एका बाईनं अगदी कळवळ्यानं उपदेश केला.

वाऱ्यावर ठिणगी उडून जावी तसा नतालियाचा उसना उत्साह पळून गेला.

त्या बायकांची बोलणी मग ताज्या लफड्या–कुलंगड्याकडे, काहीतरी

वचवच गावगप्पांकडं वळली. नतालिया निःशब्दपणे विणत बसली होती. ती बैठक उठेपर्यंत ती बळेच तिथे बसून राहिली.

आपल्या अनिश्चित परिस्थितीची तिला जी लज्जा वाटत होती त्या लज्जेपोटी तिने पुढचे एक पाऊल उचलले ('अनिश्चित परिस्थिती' म्हणायचे कारण असे की, ग्रिगरी आपल्याला कायमचा सोडून गेला ह्या गोष्टीवर विश्वास ठेवायला तिचे मन अद्यापही तयार नव्हते. झाल्यागेल्याची त्याला माफी करून त्याला परत पत्करायला ती तयार होती.) तो कायमचा आपल्याला सोडून चालता झाला की तो आपला विचार बदलू शकेल हे जाणून घेण्यासाठी त्याला गुपचुप एक पत्र पाठवायचा तिने निश्चय केला.

पेलागेयाकडून ती घरी उशीरा परतली. ग्रिशाका आपल्या लहानशा खोलीत बसून 'पवित्रशास्त्रा'ची कातडी बांधणीतील जीर्ण तेलकट पोथी वाचीत होते. तिचे वडील सायवानात पगजाळ्याची दुरुस्ती करीत बसले होते. नुकत्याच पडलेल्या खुनाची गोष्ट मिखेई त्याना सांगत होता. ती ते ऐकत होते. तिची आई पोराना झोपवून स्वतः चुल्हाण्याच्या ओट्यावरील फळीवर झोपली होती. तिच्या पायाचे काळे पडलेले तळवे दारातून दिसत होते. आपले जाकीट नतालियाने काढले आणि ती घरात उगीच इकडे तिकडे फिरत राहिली. पुढच्या खोलीतील एका कोपऱ्यात फळ्या मारलेल्या होत्या, त्याच्या आड तागाच्या बियांची रास रचून ठेवलेली होती. तिथे उंदराची खुडबुड आणि चिं चिं ऐकू येत होती. आपल्या आजोबांच्या खोलीत ती क्षणभर थांबली. देवपुतळ्याखाली ठेवलेल्या पोथ्यांच्या गठ्ठ्याकडे ती शून्य दृष्टीने बघत होती.

'आजा ! तुझ्याजवळ एकादा कागद आहे ?'

'कसला कागद ?' कपाळाला आठ्या घालून ग्रिशाकाने चिडून विचारले.

'लिहायचा कागद !'

पोथी म्हातारबुवानी शोधली आणि एक चुरगळलेला ताव बाहेर काढला त्याला धुपाचा उग्र वास येत होता.

'पेन्सिल आहे ?'

'तुझ्या बापाला विचार ! जा पोरी ! मला सतावू नको.'

बापाकडून तिने पेन्सिलीचे थोटुक मिळवले आणि ती मेजापाशी बसली. इतके दिवस तिचा छळवाद करणाऱ्या विचारांशी काळजाला सुन्न करणारी, कुरतडणारी वेदना निर्माण करणाऱ्या विचारांशी ती झुंजत होती. तिने लिहिले,

ग्रिगरी पंतोलिएविच्,

मी कसं जगू तें आणि माझ्या आयुष्याचा खरंच सत्यानाश झाला की काय ते मला कळव. तू घरातून निघून गेलास, मला एका शब्दानंही विचारलं नाहीस. मीं तुझं काही वाईट केलेलं नाही. माझा हात हातात घेऊन 'मी कायमचा जातो' असं तरी मला तू सांगशील ह्याची मी वाट पाहिली. पण तू चालता झालास आणि एकाद्या थडग्यासारखा चूप बसलायस्.

मला वाटलं घटकेच्या तिरमिरीत तू गेलास. तू परत येशील म्हणून मी वाट पाहिली. पण मला तुझ्या वाटेत यायचं नाही. दोघीही जाण्यापेक्षा एकच कुणीतरी मातीत तुडवली गेलेली चांगली. एकदा तरी माझ्यावर दया कर आणि पत्र पाठव. मग काय विचार करायचा ते मला कळेल, पण आज मी रस्त्याच्या मधोमध उभी राहिल्येय.

ग्रिशा, माझ्यावर रागावू नको. तुला येशूची शपथ आहे.

—नतालिया

दुसऱ्या दिवशी सकाळी तिने हेटबाबाला व्होडका द्यायचे आश्वासन दिले आणि तें पत्र घेऊन घोड्यावरून यागोदनोएला जाण्यासाठी त्याचे मन वळवले. आपल्या नशापाण्याच्या आशेत मश्गुल झालेल्या हेटबाबाने अंगणात घोडा आणला आणि धन्याला न कळवता तो दुडक्या चालीने यागोदनोएकडे गेला.

कझाक घोडेस्वरात कुणीही नवखा माणूस दिसावा तसे घोड्यावरचें त्याचे ध्यान चमत्कारिक वाटत होते. दुडक्या चालीने जाताना हेटबाबाची ठिगळे लावलेली कोपरे हिसकत होती. रस्त्यावर खेळणाऱ्या कझाक पोरानी त्यांच्या टवाळीच्या आरोळ्या ठोकून भंडावले.

'खोखोल'! खोखोल!'

'घाणेरडा युक्रेनी!'

'ए! पडशील एऽ खाली!'

'कुंपणावर जसं कुत्रं बसलंय!'

दुपारी तो परत आला. आपल्या बरोबर त्याने साखरेची पुडी बांधून देतात त्या निळ्या कागदाचे चिठोरे आणले होते. खिशातून तो बाहेर काढून त्याने नतालियाकडे पाहून डोळे मिचकावले.

'रस्ता भयंकर होता! असे हिसके बसलेत की जवळ जवळ आतडीच बाहेर पडली!'

टीप:– १) युक्रेनी माणसाला उद्देशून दिलेली एक इरसाल शिवी.

नतालियाने ती चिठ्ठी वाचली आणि तिचा चेहरा काळवंडून गेला. त्या चिठोऱ्यावर जे चार शब्द खरडलेले होते ते तीक्ष्ण सुळक्यांसारखे तिच्या काळजात घुसले.

'एकटीं रहा–ग्रिगरी मेलेखोव.'

आपल्या शक्तीवरचा विश्वास उडून गेल्यासारखी नतालिया धांवत घरात शिरली आणि आपल्या पलंगावर जाऊन पडली. ईस्टर रविवारच्या पहाटेलाच घर आवरलेले असावे आणि ईस्टरचा केक वेळेवर तयार करावा म्हणून तिची आई रात्रीची चूल पेटवीत होती.

'नतालिया ! इकडं ये माझ्या मदतीला' तिने मुलीला हाक मारली.

'माझं डोकं दुखतंय आई ! मी जरा पडते !'

तिची आई दारातून डोकावून म्हणाली, 'थोडा खारवलेला रस्सा घे. आत्ता बरं वाटेल.'

नतालियाने काहीच उत्तर न देता आपली कोरडी थंडगार जीभ ओठावरून फिरवली. गरम लोकरी शाल डोक्यावर ओढून घेऊन ती संध्याकाळपर्यंत पडून राहिली होती. मुटकुळे वळलेल्या तिच्या शरीरातून उठणाऱ्या मंद शहाऱ्याने ती थरथरत होती. मिरोन आणि ग्रिशाका गिरजाघराकडे निघाले तेव्हा ती उठली आणि स्वयंपाकघराकडे गेली. तिच्या नितळ विंचरलेल्या केसाखाली कानशीलावर घर्मबिंदू तरारले होते. रुग्ण, तेलकट तवंगाने तिचे डोळे गढूळले होते.

विजारीची बटणे लावता लावता मिरोननी आपल्या मुलीकडे नजर टाकली.

'चांगला मुहूर्त शोधलास आजारी पडायला ! चल पोरी आमच्या बरोबर प्रार्थनेला !'

'तुम्ही जा ! मी मग येते.'

'आम्ही घरी यायची वेळ होईपर्यंत येशील मला वाटतं !'

'नाही नाही ! मी कपडे करते न् येते !'

ती दोघं बाहेर पडली. लुकिनिचना आणि नतालिया ह्या दोघीच स्वयंपाक घरात राहिल्या. पेटाऱ्याकडून पलंगाकडे आणि पलंगाकडून पेटाऱ्याकडे अशी नतालिया विमनस्कपणे येरझारा घालीत होती. पेटाऱ्यातील कपड्याच्या सरमिसळ ढिगाकडे ती शून्यपणे टक लावून बघायची. मनातले तेच व्याकूळ करणारे विचार तिचे ओठ पुटपुटत होते. लुकिनिचनाला वाटले की कोणते कपडे घालावेत ह्याबद्दल पोरीच्या मनाचा निश्चय होत नसावा. तेव्हा आईच्या प्रेमाने तिने

सुचविले, 'माझा निळा झगा घाल बाळ. तुला अगदी छान बसतो तो. घेऊन येऊ का ?'

ईस्टरसाठी नतालियाला नवे कपडे शिवलेले नव्हते. आपला पायघोळ गर्द निळा झगा घालायला लग्नाआधी नतालियाला किती आवडायचे ते लुकिनिचनाला एकाएकी आठवले. कोणता झगा घालावा ह्याची पोरीला काळजी पडलेली असावी असे वाटून तो झगा घालण्याचा तिने नतालियाला आग्रह केला.

'नको ! हाच घालून जाते मी !' नतालियाने आपला हिरवा झगा काळजीपूर्वक बाहेर काढला. ग्रिगरीची पहिली भेट झाली तेव्हा हाच झगा आपण घेतला होता हे तिला एकाएकी आठवले. कोठाराजवळ तिच्या वाग्दत्त पतीने तिचे पहिले ओझरते चुंबन घेऊन तिला लाजबावरी करून टाकले होते तेव्हा हाच झगा तिच्या अंगावर होता.

हुंदक्याने गदगदत ती पेटाऱ्याच्या उघड्या झाकणावर कोसळली.

'नतालिया ! काय झालं ग ?' हाताची टाळी मारून आईने विचारले.

जोराने किंचाळण्याची इच्छा नतालियाने दाबून टाकली. स्वत:ला आवर घालून ती वेड्यासारखी कर्कश हसली.

'आज काय झालंय कुणाला ठाऊक !'

'नतालिया...! माझ्या लक्षात आलंय–!'

'काय–? काय तुमच्या लक्षात आलंय आईसाहेब ?' अकल्पितपणे चिडून जाऊन तिने विचारले आणि त्या हिरव्या झग्याचा बोटानी चोळामोळा केला.

'तुझा जीव रमेनासा झालाय ! तुला गरज आहे ती नवऱ्याची !'

'एकानं पोट भरलं माझं !' ती आपल्या खोलीत गेली आणि चटकन कपडे करून परत सायवानात आली. अल्लड शेलाटा बांधा असलेल्या नतालियाचे गाल दु:खाच्या आवेगाने निळसर दिसत होते.

'तू हो पुढं. माझं अजून झालं नाही.' तिच्या आईने तिला सांगितले.

बाहीत रुमाल खुपशीत नतालिया बाहेर पडली. तरंगत्या बर्फाची धडाडती गाज आणि बर्फ वितळणीचा उत्तेजक उग्रगंध हे वाऱ्यावर तरंगत तिच्यापाशी आले. डाव्या हाताने स्कर्टचे टोक वर उचलून आणि मोतिया निळ्या डबक्यातून वाट काढीत ती गिरजाघरात पोहोचली. सणाचे, सटरफटर गोष्टींचे अंधुक फुटकळ विचार डोक्यात आणीत ती चालत होती. आजच्या मानाने पूर्वी निवांत असलेली मन:स्थिती परत आणण्याचा प्रयत्न करीत होती. पण वक्ष:स्थळापाशी लपवलेले कागदाचे ते निळे चिठोरे, ग्रिगरी आणि तिच्याकडे पाहून संतुष्टपणाने हास्य

करणारी–कदाचित तिची कीवही करणारी–ती सुखी बाई, इकडे तिचे विचार हट्टीपणाने वळतच होते !

तिने गिरजाघराच्या आवाडात प्रवेश केला तेव्हा काही पोरटी तिच्या वाटेत उभी होती. त्याना वळसा घालून ती पुढे गेली तशी त्यांची कुजबुज तिच्या कानावर पडली.

'कोण रे ती ? बघितलंस तू ?'

'नतालिया कोर्शुनोवा !'

'तिच्यात काहीतरी खोड आहे म्हणे ! म्हणून नवऱ्यानं टाकलीन् तिला.'

'ते खरं नाय ! लंगड्या पांतिलेयशी आपल्या सासऱ्यांशी तिनं सूत जमवलं म्हणतात !'

'असा प्रकार आहे होय ? तरीच ग्रिगरी घरातून पळून गेला !'

'तर काय ? अजून तिचं ते लफडं चालूच आहे...!'

वेड्यावाकड्या दगडांना ठेचकाळीत पाठीमागून येणारी ती लाजलावणी गलिच्छ कुजबुज ऐकत ती गिरजाघराच्या पडवीत पोहोचली होती. तिथून तशीच मागे वळून ती पुढच्या फाटकाकडे निघाली तेव्हा पडवीत उभ्या असलेल्या मुली फिदीफिदी हसू लागल्या. दारु प्यालल्यासारख्या झोकांड्या खात ती धावत घरी आली. अंगणातील फाटकापाशी आल्यावर तिने जोराने श्वास घेतला. झग्याच्या काठावरून अडखळत रक्त फुटेपर्यंत ओठ करकचून चावीत ती आत शिरली. जांभळट अंधारात मांगराचे उघडे दार कभिन्न वासलेले होते. भयानक निर्धाराने तिने आपली उरलीसुरली ताकद एकवटली. त्या दाराकडे तिने धाव घेतली आणि घाईघाईने उंबऱ्याच्या आत पाऊल टाकले. मांगर थंड कोरडे होते. कातडी जुवाचे आणि कुबट गवताचे वास तिथे दाटले होते. तेथील कोपऱ्याच्या दिशेने चाचपडत जाणाऱ्या नतालियाच्या मनात कोणताही विचार नव्हता की कोणतीही भावना नव्हती. शरमेने चूर झालेल्या तिच्या हताश मनावर केवळ एक विषण्ण, तळतळाटाची पकड होती. तिथल्या एका कोयत्याची मूठ तिने उचलली मुठीतून पाते उचकटले. (तिच्या सगळ्या हालचाली कशा आधी ठरवल्यासारख्या धीम्या आणि अचूक होत्या !) निर्धाराच्या अकल्पित, हर्षोन्मत्त तिरीमिरीने तिने मान मागे फेकली आणि त्या कोयतीने गळा कापून घेतला !

त्या जळजळीत विदारक वेदनेने कोसळून पडावी तशी ती खाली पडली परंतु आपला बेत आपण पुरता अंमलात आणलेला नाही ही अस्पष्ट जाणीव होऊन ती दोन हात आणि गुडघ्यावर धडपडत ओणवी झाली.

मग कशीबशी गुडघ्यावर बसली. (छातीवर वाहणारे रक्त पाहून ती भेदरून गेली!) थरथरत्या बोटांनी तिने आपल्या जाकीटाची बटणे फाडून काढली. एका हाताने तिने आपला घट्ट आणि टणक स्तन बाजूला केला. दुसऱ्या हाताने तिने कोयतीचे टोक नेमक्याजागी आणले. गुडघ्यावर चालत ती भिंतीजवळ गेली. कोयतीचे बोथट टोक भिंतीत घुसवले. आपले दोन्ही हात डोक्यामागे नेले आणि छाती नेट लावून ती पुढे नेऊ लागली. पुढे, पुढे...!

कोबी चिरावी तसा मांस चिरीत जाणारा घृणास्पद आवाज तिने स्पष्टपण ऐकला, तिला तो जाणवला, तिच्या स्तनांतून घशापर्यंत तीव्र वेदनेची लाट चढत गेली आणि तिच्या कानात घणघणत्या सुया खुपसल्या गेल्या.

सायवानाचे दार खरखरले. लुकिनिचना चाचपडत पावलाण उतरून आली. घंटेच्या मनोऱ्यावरून गिरजाघराच्या घंटेचे लयबद्ध डोल घुमत होते.

धारेवर आरुढ झालेला वितळता बर्फ अखंड, रगडत्या गर्जना करीत डॉन-वरून वहात चालला होता. हर्षनिर्भर, तुडुंब आणि विमुक्त नदी आपल्या बर्फ शृंखला नाचवीत खाली दूरवर असलेल्या आझोव समुद्राकडे धोंधावत चालली होती !

१९.

स्तिपान ग्रिगरीजवळ आला आणि रिकाबसोट घट्ट पकडून घामाने डबडब-लेल्या घोड्याच्या पुठ्ठ्यावर चेपून रेलला.

'काय, कसं काय ग्रिगरी ?'

'देवाच्या दयेनं ठीकाय !'

'काय विचार चाललाय ? आँ ?'

'काय विचार चालायचायं ?'

'दुसऱ्याची बायको तू पळवल्येय ! वापर चालू आहे ना ?'

'रिकीब सोड !'

'भिऊ नको रे ! तुला हाणीत नाही मी !'

'मी भीत नाही ! कळ काढू नकोस !' आरक्त होऊन आवाज चढवीत ग्रिगरी म्हणाला.

'आज नाय तुझ्याशी लढत घेत ! इच्छा नाही माझी ! पण माझे बोल ध्यानात ठेव ग्रिगरी ! कधी ना कधी तुझा जीव घेईन.'

'आंधळा म्हणतो ' बघू या... त्यातलाच प्रकार !'

'माझे बोल चांगले ध्यानात ठेव ! तू माझं वाटोळं केल्येयस ! हे पाहिलंस ?' हात लांव करून आपले धुळीची पुटे बसलेले तळवे त्याने दाखवले. 'नांगरणी करतोय ! देवाला माहीत कशासाठी करतोय ! मला स्वतःला काय गरज पडल्येय ? उगाच इकडं तिकडं केलं तरी हिंवाळा निघून जाईल. पण रिकामपण खायला उठतंय ! तू माझं फार वाटोळं केलंस ग्रिगरी !'

'माझ्याकडं तक्रार करण्यात काय मतलब ? भरल्या पोटाला उपाशी माणसाचं दुःख काय कळणार ?'

'खराय !' स्तिपानने मान उंचावून ग्रिगरीच्या चेहऱ्याकडे रोखून पाहिलं. एकाएकी त्याच्या तोंडातून पोरगेले हसू फुटले आणि त्याच्या डोळ्यांच्या कोपऱ्याना सुरकुत्या पडल्या. 'मला एकाच गोष्टीचं दुःख होतं पोरा !–फार दुःख होतं–! तिगस्ताची आठवण आहे का ? व्रतमासाच्या सणात झालेल्या खेड्यातल्या दंगलीची ?'

'नाही आठवण !'

उपास करणाऱ्यानीं जेवणारांचा जीव घेतला ते' ?

ब्रह्मचाऱ्यांनी लग्न झालेल्यांशी लढत दिली ते नाही आठवत ? तुझा मी कसा पाठलाग केला होता ते आठवतं ? तेव्हा तू पोरगेला होतास ! दुबळा होतास ! माझ्यापुढं कोवळं रोपटं होतास ! तेव्हा तुझी गय केली. पण तू पळून जात होतास, तेव्हा जर तुला हाणला असता तर उभा चिरला गेला असतास ! जोरानं पळालास तू ! पाय लावून पळालास ! तिथंच तुझ्या बरगडीत अेक हाणला असता तर आज तू जिता नसतास !'

'काळजी करू नको ! अजून होऊन जाऊ दे आपली !'

काहीतरी आठवण्याचा प्रयत्न केल्यासारखे स्तिपानने कपाळ चोळले. हातात घोड्याचे कायदे धरून जाणाऱ्या म्हाताऱ्या लिस्तनित्सकीने ग्रिगरीला हाक मारली. अजून डाव्या हातात रिकाबसोट धरलेला स्तिपान तबरंगुच्या

टीप : (१) व्रतमासात (शोवेटाइड) सर्वसाधारणपणे विवाहित माणसे उपास करतात. अविवाहित करीत नाहीत.

बाजूने चालत होता. त्याची प्रत्येक हालचाल ग्रिगरी न्याहाळीत होता. स्तिपानच्या खाली झुकलेल्या सोनेरी मिशा, हजामत न केलेल्या त्याच्या हनुवटीवरचा दाट झुबका, त्याच्या टोपीचा तुटलेला कातडी पट्टा ह्या गोष्टी त्याच्या नजरेने टिपल्या. घामाच्या ओघळाच्या सुकलेल्या रेषा उमटलेला त्याचा गलिच्छ चेहरा दुःखी आणि विलक्षण अपरिचित असा वाटत होता. त्याच्याकडे पाहता पाहता ग्रिगरीला वाटले की पर्जन्य धुक्यात गुरफटलेले दूरवरचे माळरानच आपण टेकडीच्या माथ्यावरून बघत आहोत. कबरट थकिस्तपणा आणि रितेपणा ह्यानी स्तिपानचा तोंडवळा राखोडा झाला होता. निरोपाचे अवाक्षर न बोलता तो मागे रेंगाळला.

ग्रिगरी घोड्याला घेऊन चालला होता. 'थांब जरा ! आक्सिनिया ! कशी आहे ?'

बुटाला लागलेला चिखलाचा रपका चाबकाच्या काठीने खाली पाडीत ग्रिगरीने उत्तर दिले, 'ती ? छान आहे ती !' त्याने तबरंगुला थांबवून मागे नजर टाकली.

पाय लांब फाकून स्तिपान उभा होता. दातात एक गवताचा देठ चावीत होता. क्षणभर ग्रिगरीला त्याच्याबद्दल विलक्षण वाईट वाटले. पण मत्सराने कुरघोडी केली. खोगीरावरची मांड वळवीत तो ओरडला,

'तुझी आठवण काढीत नाही ! काळजी करू नको !'

'असं म्हणतोस ?'

घोड्याच्या दोन कानाच्या मधोमध ग्रिगरीने चाबुक ओढला आणि स्तिपानच्या प्रश्नाचे उत्तर न देता तो चौखुर उधळला.

२०.

सहावा महिना लागल्यानंतर इतःपर ते ग्रिगरीपासून लपवणे अशक्य आहे हे समजल्यावरच आक्सिनियाने आपल्या गभारपणाची त्याच्याजवळ कबुली दिली. इतके दिवस ती चूप बसली होती कारण तिला अशी भीती वाटत होती की पोटातील हे मूल आपले आहे ह्यावर त्याने विश्वास ठेवला नसता. भयाने आणि चिंतेने विवर्ण झालेली आक्सिनिया कसली तरी प्रतिक्षा करीत होती. चिंतातूर

अपेक्षेच्या पहिल्या काही महिन्यात तिला लागलेले डोहाळे ग्रिगरीच्या दृष्टीस पडले नव्हते; आणि दृष्टीला पडलेच तर हे डोहाळे आहेत हे त्याला समजले नव्हते.

एक दिवस संध्याकाळी तिने भीत भीत त्याला हें सांगितले आणि त्याच्या चेहऱ्यावरील भाव कसे बदलतात ते ती सचिंतपणे न्याहाळू लागली. पण खिडकी-कडे वळून त्रासिकपणे तो खेकसला.

'आधी का नाही सांगितलंस ?'

'मला भय वाटलं ग्रिशा ! मला वाटलं तू मला हाकलून देशील !'

पलंगाखाली बोटे आपटीत त्याने विचारले,

'केव्हा होशील ?'

'ऑगस्टच्या सुरुवातीला होईन मला वाटतं.'

'पोर स्तिपानचं ना ?'

'नाही ! तुझं !'

'असं तू म्हणतेस !'

'तूच मोज ना दिवस ! लाकूडतोडीच्या त्या दिवसापासून आजपर्यंत–!

'बनवाबनवी करू नको आक्सिनिया ! समज स्तिपानचं असलं तरी तुझा काय इलाज ? मला खरं उत्तर दे !'

डोळ्यातून संतप्त टिपे गाळीत आक्सिनिया बाकावर बसली आणि खालच्या आवाजात भडाभडा बोलू लागली, 'इतकी वर्षं त्याच्याबरोबर होते, पण कुठं काय झालं ? तूच विचार कर ! मला तेव्हा काय रोग आला नव्हता ! तुझ्या पासूनच मला दिवस गेले असले पाहिजेत ! आणि तू–!'

हा विषय ग्रिगरीने परत काढला नाही. आक्सिनियाकडे बघण्याच्या त्याच्या वृत्तीत एक श्रांत अलिप्तपणा आणि किंचित चेष्टेची कणव हे धागे मिसळून गेले, तीही कशाची वाच्यता न करता अंतर्मुख झाली. उन्हाळ्यात तिच्या चेहऱ्यावरचे सौंदर्य हरपले. गर्भारपणामुळे तिच्या डौलदार सौष्ठवाला बाध मात्र आला नाही. तिच्या एकंदर पुष्टतेने तिची अवस्था झाकली गेली. तिचा चेहरा जरी ओढल्या-सारखा झाला तरी डोळ्यात तेवणाऱ्या दीप्तीने त्या मुखाला एक नवीनच सौंदर्य लाभलं. सैंपाकिणीचे आपलं काम ती सहजगत्या पार पाडीत होती. त्या वर्षी वाडीवर शेतमजुरांची संख्याही कमी होती. त्यामुळे तिला काहीच जड गेलं नाही.

म्हातारपणच्या लहरी लडिवाळपणाने म्हाताऱ्या साशकाला आक्सिनिया आवडू लागली. लेकीने घ्यावी तशी ती त्याची काळजी घेत असे म्हणूनही कदाचित

असेल. त्याचे कपडे धुणे, सदऱ्याना शिवण घालून देणे, जेवताना त्याला खुसखुशीत वाढणे असे ती त्याचे करीत असे. आपल्या घोडयांची व्यवस्था लावून झाली की म्हातारा साशका सैपाक घरात यायचा. पाणी भरायचा. डुकरासाठी बटाटयाचा लगदा करायचा. नाना किरकोळ कामे करायचा. तिच्याभोवती पिंगा घालीत आणि आपल्या हिरडया दाखवीत तो म्हणायचा,

'तू माझी काळजी वाहतेस ! मी तुझे पांग फेडीन ! तुझ्यासाठी वाटेल ते करीन आक्सिनिया ! काळजी घ्यायला बाई नसती तर माझी वाट लागली असती ! उवा लागल्या होत्या माझ्या अंगाला ! काही लागलं तर मला फक्त तू सांगायची खोटी !

आपल्या मोतद्दाराची वासंतिक-शिक्षण-शिबीरातून सुटका करण्याची व्यवस्था येवगेनीने केली होती. ग्रिगरी गवत कापणीचे काम करीत होता. प्रसंगोपात्र म्हाताऱ्या लिस्तनित्सकीना जिल्हयाच्या गावी गाडीतून घेऊन जात होता. उरलासुरला वेळ त्यांच्याबरोबर माळढोकांची शिकार करण्यात घालवीत होता. सुखासीन, आरामशीर जीवनाने त्याची रया जाऊ लागली. तो आळशी बनला. त्याचे अंग सुटू लागले आणि वयाच्या मानाने तो निबर दिसू लागला. एकाच विचाराने त्याला काळजी वाटायची. तो विचार म्हणजे त्याच्या आगामी फौजी चाकरीचा ! त्याच्याजवळ घोडा नव्हता का इतर काही सरंजाम नव्हता. बापाकडून काही मिळण्याचीही त्याला आशा नव्हती. स्वतःच्या आणि आक्सिनियाच्या मिळकतीतून तो पैसा वाचवीत होता. तंबाखू ओढण्याच्या आपल्या व्यसनालाही त्याने आळा घातला होता. बापाकडे भीक न मागता आपल्याला असे करून घोडा विकत घेता येईल अशी त्याला आशा वाटत होती. म्हाताऱ्या लिस्तनित्सकीनेही त्याला मदतीचे आश्वासन दिले होते. बाप आपल्याला काहीही देणार नाही ही जी अबरगत ग्रिगरीला वाटत होती, तिला लौकरच पुष्टी मिळाली.

जूनच्या अखेरीस पेत्रो आपल्या भावाला भेटायला आला आणि संभाषणाच्या ओघात त्याने असा उल्लेख केला की त्याच्या बापाचा राग अजून तसाच आहे. घोडा घेण्यासाठी त्याला आपण कोणत्याही प्रकारची मदत देणार नाही असे त्याने जाहीर करून टाकले होते. 'गावच्या लष्करी कचेरीतून घे म्हणावं घोडा' असे त्याने सांगून टाकले होते.

'त्याला काळजी करायचं कारण नाही ! माझा स्वतःचा घोडा घेऊन जाईन चाकरीवर !' 'माझा स्वतःचा' ह्या शब्दांवर जोर देत ग्रिगरीने सांगितले.

'तुला कुठनं घोडा मिळणार ? काय नाचकाम करणारेस घोडा मिळवायला?' मिशा चावीत पेत्रोने विचारले.

'नाचकाम करीन, नाहीतर भीक मागेन ! तीही मागून नाहींच मिळाला तर चोरी करेन !'

'शाब्बास रे पठ्ठे !'

'माझ्या पगारातून मी घोडा विकत घेणार आहे !' ग्रिगरी थोडा गंभीर होत म्हणाला.

ग्रिगरीचे काम, त्याचे जेवणखाण, पगार ह्यांची चौकशी करीत पेत्रो पावलाणावर बसला होता आणि ग्रिगरीची उत्तरे ऐकताना मिशा चावीत संमतीची मान डोलावीत होता सगळी वास्तपुस्त करून झाल्यावर तो जायला निघाला. जाता जाता भावाला म्हणाला,

'तू परत यावंस हे चांगलं ! आपलाच हेका चालवणं बरं नाही. अशा मार्गानं काही जास्त मिळकत होईलसं वाटतं ?'

'मी पैशाच्या मागं नाही लागलो !'

'तिच्याबरोबर रहायचा विचार आहे तुझा ?'

'कुणाबरोबर ?'

'ह्या ... हिच्याबरोबर !'

'हो ! का काय हरकत आहे ?'

'काही नाही ! मी आपलं विचारलं !'

भावाला पोहोचवायला बाहेर गेल्यावर ग्रिगरीनें अखेर शेवटी विचारले, 'घरचं सगळं कसं काय आहे ?'

पावलाणाच्या कठड्याला बांधलेले घोड्याचे लगाम सोडवीत पेत्रो हसून म्हणाला, 'सशाच्या बिळासारखी सतरा घरं झालीत तुझी ! सगळं ठिकाय. आई, तुझी आठवण काढते. वैरण काढलीय आम्ही, तीन गाड्या भरून झाली.'

आपल्या भावाची म्हातारी घोडी ग्रिगरीने काळजीने न्याहाळली, 'यंदा घोडी व्याली नाही ?'

'नाही भाऊ. ती वांझोटी आहे. पण क्रिस्तोनियाकडून आपल्याला जी कस्तानी मिळाली ती व्यालेय्.'

'काय झालं ?'

'शिंगरू ! झकासाय ! तंगड्या लांबसोट आहेत. तेवर दणकट आहेत. ऊर जोरदार आहे. जनावर चांगलं होईल.'

ग्रिगरीने सुस्कारा टाकला. ' खड्याची मला आठवण येते पेत्रो ! डॉनची आठवण येते. इथं कुठं वाहातं पाणीही दिसत नाही ! रखरखीत बीळ आहे हे !'

' आम्हाला भेटायला येत जा !' घोडीच्या हाडावलेल्या पाठीवर मांड घेत पेत्रो म्हणाला.

' येईन कधी तरी !'

' अच्छा, येतो मी !'

' नीट जा !'

पेत्रो अंगणातून बाहेर गेला. एवढ्यात काहीतरी आठवून त्याने ग्रिगरीला हाक मारली. तो अजून पावलाणावरच उभा होता.

' नतालिया ! मी विसरलो ! भयंकर गोष्ट !'

वाडीवर गिधाडासारखा घोंघावणाऱ्या वाऱ्यात त्याच्या वाक्याचे अखेरचे शब्द ग्रिगरीच्या कानावरून निसटून गेले. पेत्रो आणि त्याची घोडी मखमली धुरोळ्यात झाकून गेली होती. ग्रिगरीने खांदे उडवले आणि तो तबेल्याकडे चालता झाला !

उन्हाळा अती रखरखीत होता. पाऊस तुरळक पडला. धान्य लवकर पिकावर आले. राय कोठारात भरीभरी तो बार्ली पिकून पिवळी झाली, चार दिवसांचे शेतमजूर आणि ग्रिगरी कापणीला गेले

त्या दिवशी आक्सिनियाने काम लवकर संपवले आणि आपल्याला बरोबर न्यायला तिने ग्रिगरीला सांगितले.

' कशाला येत्येस ? बस घरीच !' तिला परावृत्त करण्याचा ग्रिगरी प्रयत्न करीत होता. तरी तेवढ्यात तिने डोक्यावर रुमाल बांधला आणि माणसे ज्यात बसून चालली होती तो रेकला तिने धावत धावत गाठला.

हुरहुरीने आणि अधीऱ्या आनंदाने आक्सिनिया ज्याची प्रतीक्षा करीत होती आणि सूक्ष्म भयाने ग्रिगरी जे घडण्याची वाट पहात होता ती घटना कापणीच्या वेळी घडली. चिन्हं ओळखून आक्सिनियाने हातातील दाताळे फेकून दिले आणि एका भाळीखाली जाऊन ती पडली. तिच्या वेणा एकावर एक येत होत्या. आपली काळेजली जीभ चावीत ती भुईसपाट पडली होती. कापणी यंत्रे हातात घेऊन जाणारे मजूर तिच्या अंगावरून जाताना ओरडले. त्यातल्या एका तरुण माणसाच्या नाकावर पिकलेले गळू होते. त्याच्या पिवळ्या चेहऱ्याला असंख्य घड्या पडल्या होत्या. त्यामुळे तो चेहरा लाकडात किरवल्यासारखा दिसत होता. तो आक्सिनियाला ओरडून म्हणाला,

'अग ए! उठ! नाहीतर वितळशील बघ!'

आपल्या हातातील यंत्र ग्रिगरीने एकाच्या हाती दिले आणि तो तिच्यापाशी आला. 'काय झालं?'

तिचे ओठ अनिवार थरथरत होते घोगऱ्या स्वरात ती म्हणाली, 'वेणा लागल्यात!'

'चांडाळणी! तुला म्हटलं होतं की येऊ नको म्हणून! आता काय करणार?'

'माझ्यावर रागावू नको ग्रिशा–! आई ग–! आई ग-! ग्रिशा, घोडं जुंप रेकल्याला! घरी गेलंच पाहिजे–! मी इथं कशी–हे सगळे कझाक–!' ती विव्हळली. तिच्या वेदनेच्या लोखंडी पट्टीत ती पिळवटून गेली.

ग्रिगरी घोडा आणण्यासाठी धावत गेला. घोडा पलीकडे दूर खबदाडात चरत होता. घोड्यावर बसून येईपर्यंत आक्सिनिया धडपडत हाता-गुडघ्यांवर ओणवी झाली होती. धूळभरल्या बालींच्या ढिगाऱ्यात तिने डोके खुपसले होते· वेदनेच्या भरात तोंडात घेऊन चघळलेली बोचणारी कणसे ती थुंकून टाकीत होती. आपली विस्फारीत शून्य नजर तिने ग्रिगरीवर रोखून धरली आणि आपला भयंकर चिरत जाणारा आक्रोश मजुरांच्या काना पडू नये म्हणून एप्रनच्या बोळ्यात आपले दात घट्ट रुतवले.

ग्रिगरीने तिला उचलून रेकल्यात ठेवले आणि वाडीच्या दिशेने घोडा जाम पिटाळला.

'आई ग! धावडवू नको..! मेले ग मेले! तू...माझी हाडं...खिळखिळी...! रेकल्याच्या साटीवर डोके आदळताच आक्सिनिया किंचाळली

मागील बाजूने ऐकू येणाऱ्या तिच्या खरखरीत किंचाळ्यांकडे लक्षही न देता किंवा तोंडातून चकार शब्द न काढता लगाम डोक्यावर गरगरा फिरवीत ग्रिगरीने घोड्यावर चाबूक चालवला. त्या उंचसखल, फारशा वापरात नसणाऱ्या रस्त्यावरून जाणारा रेकला डावी उजवीकडे झोकांड्या खात होता. आक्सिनियाने हाताच्या तळव्यात गाल दाबून धरले होते. तिचे टवकारलेले बेभान डोळे गरगरा फिरत होते. ग्रिगरीने घोड्याना चौखूर पिटाळले होते. आसकूड त्यांच्या डोळ्यांपुढे असे काही वर खाली नाचत होते की आकाशात चकचकीत स्फटिकासारखा लोंबलेला तळपणारा ढगही नजरेआड जात होता. क्षणभर आक्सिनियाचे किंचाळते आक्रंदन थांबले. चाके खडखडत गेली आणि साटीच्या फळीवर तिचे डोके धाडकन आपटले. प्रथम तिच्या निःशब्दपणाचा ग्रिगरीवर काही परिणाम झाला नाही. पण

नंतर त्याने वळून मागे नजर टाकली. तोंड भयंकर वेडेवाकडे करून आक्सिनिया पसरली होती. रेकल्याच्या तारशावर तिने गाल घट्ट दाबून धरले होते. काठाव फेकलेल्या मासळीसारखे तिचे दाभाड थडाथड उडत होते तिच्या भुवयावरून घामाच्या धारा तिच्या डोळयांच्या खोल खोबणीत लोटल्या होत्या. मागे वळून ग्रिगरीने तिचे डोके उचलले आणि आपली चुरगळलेली टोपी तिच्या उशाला दिली. तिरप्या नजरेने त्याच्याकडे बघत ती ठासून म्हणाली, 'मी मरणार ग्रिशा! दुसरं काय नाय !'

ग्रिगरी थरारून गेला. त्याच्या डोक्यापासून पायापर्यंत एक थंड चमक गेली. धीराचे, दिलाशाचे शब्द तो शोधू लागला, पण ते त्याला सापडेनात आणि तो खेसकला,

'आचरटासारखं बोलू नको ! मूर्ख कुठली !' नंतर त्याने मुंडी हलवली आणि मागे झुकून तिचे पाऊल आवळले. 'आक्सिनिया, माझ्या कबुतरा.. !'

आक्सिनियाची वेदना क्षणभर विरून गेली आणि मग दुप्पट जोराने परत आली. आपले पोट फाडीत काहीतरी जात आहे, ह्या जाणिवेने तिने फोडलेली भयानक कर्कश किंकाळी ग्रिगरीच्या कानात चिरत घुसली.

ग्रिगरीने बेभानपणे घोड्याना चाबकाने फोडून काढले. मग चाकांच्या खडखडाटावर उंचावलेला तिचा पातळ क्षीण आवाज ग्रिगरीने ऐकला.

'ग्रिशा !'

त्याने घोड्यांचे लगाम खेचले आणि मान मागे वळवली. हात दोन्ही बाजूला पसरून आक्सिनिया रक्ताच्या थारोळ्यात पडली होती.

तिच्या झग्याखाली काहीतरी, चळवळणारा सजीव पदार्थ केकाटत होता.

ग्रिगरीने बेभानपणे रेकल्यातून खाली उडी घेतली आणि गोंधळून ठेचकाळत तो मागच्या बाजूला आला.

आक्सिनियाच्या धपापत्या जळजळत्या तोंडाकडे बघताना तिचे शब्द त्याने ऐकल्यापेक्षा जाणलेच.

'नाळ दातानं तोड...! तुझ्या सदऱ्याच्या सुतानं बांधून टाक !'

आपल्या सुती सदऱ्याच्या बाहीतून सुताचे धागे त्याने उपसून काढले. कळ लागेपर्यंत डोळे घट्ट आवळून त्याने दाताने नाळ तोडली आणि ते रक्ताळते टोक सुताने बांधून टाकले !

२१.

त्या विस्तीर्ण निपराळ खोऱ्याला यागोदनोएची वाडी शेवाळ्यासारखी लगटली होती. वारा चंचळपणे कधी उत्तरेकडून तर कधी दक्षिणेकडून वाहायचा. आकाशाच्या निळसर धवलाईतून सूर्य तरंगत जायचा. उन्हाळ्याच्या पाठोपाठ पतझडीची सळसळ यायची. गोठवणी आणि हिम घेऊन येणाऱ्या हिवाळ्याची पकड आवळली जायची. पण योगोदनोए आपल्या काष्ठवत जाड्यतेत बुडून गेलेलेच रहायचे. जुळ्या भावंडांसारखे दिवस एका मागोमाग एक चालले होते आणि ही वाडी बाहेरच्या दुनियेपासून नित्याचीच वेगळी पडली होती.

चष्मा लावल्यासारखी डोळ्यांभोवती तांबडी कडी असलेली काळी गुजगुजी बदके अजून आवाडात डुलत डुलत चालत होती. गावठी कोंबड्या चौबाजूला पावसाच्या थेबांसारख्या विखुरल्या होत्या. भडक पिसाऱ्यांचे मोर तबेल्याच्या छपरावरून मांजरासारखा मेयों मेयों आवाज काढीत होते. म्हाताऱ्या सेनानीला सर्व प्रकारच्या पक्ष्यांची हौस होती. त्याने एक अधू क्रौंचपक्षीही पाळलेला होता. नोव्हेंबर महिन्यात दक्षिणेकडे उडत जाणाऱ्या जंगली क्रौंच पक्ष्याची अस्पष्ट साद ऐकू आली की अंतःकरण पिळवटून टाकणारा तळमळींचा लोलंगत आक्रोश हा करू लागे. पण तो उडू शकत नसे. कारण त्याचा एक पंख बाजूला लोळागोळा लोंबत होता. त्या पक्ष्याला न्याहाळीत हे सेनानी खिडकीत उभे असत. आपली मान उंचावून उड्या मारणारा, फडफडत उडून जाऊ पाहणाऱ्या त्या पक्ष्याला पाहून ते आपल्या पिकलेल्या मिशांच्या छपराखालील थोराड जबडा उघडून हसू लागत. सफेद भिंतींचा रिकामा दिवाणखाना त्यांच्या हास्याच्या घननादाने दणाणून जाई.

कुरळ्या केसांच्या झिज्या असलेले आपले मस्तक वेनियामिन तसेच ताठ वागवीत होता. पडघरात एकटाच पत्ते खेळत तो दिवस घालवायचा.

टाकी दिलेल्या तोंडाच्या आपल्या बायकोचा साशकाचा शेतमजूर ग्रिगरीचा न्याचा एवढेच नव्हे तर त्या क्रौंच पक्ष्याचाही तिखोन अजून तसाच हेवा करत

होता. कारण आपल्या दुःखी मनात उचंबळून येणाऱ्या हळुवारपणाने लुकेरिया त्या पक्ष्याची सेवा करीत होती.

म्हातारा साशका पुन्हा पुन्हा दारू पिऊन झिंगत होता आणि म्हाताऱ्या लिस्तनित्सकीच्या खिडकीखाली उभा राहून वीस कोपेकसची भीक मागत होता.

ग्रिगरीच्या तेथील एकूण वास्तव्यात यागोदनोएच्या तंद्राळू कंटाळवाण्या जीवनाची बुरसलेली सुस्ती चाळवणाऱ्या दोनच घटना घडल्या. एक आक्सिनियाच्या बाळाचे आगमन आणि तेथील लाडक्या कलहंसाचे मरण. ह्या तान्ह्या मुलीची यागोदनोएच्या रहिवाशांना तावडतोब सवय होऊन गेली. कुरणात त्या कलहंसाची विखुरलेली काही पिसे पाहून त्यांनी असा निष्कर्ष काढला, कोल्ह्याने त्याला पळवून नेले खरे ! पण त्यांच्या प्रशांत जीवनात तो कलहंस परतही आला होता.

सकाळी जागे झाल्यावर धनी वेनियामिनला हाक मारीत.

'काल रात्री तुला काही स्वप्नं पडलं ?'

'वा ! पडलं ना ! मस्त स्वप्नं पडलं !'

'मला सांग बघू ते !' लिस्तनित्सकी चुट्टयाची गुंडाळी करीत करडा हुकूम सोडीत.

वेनियामिन स्वप्नाची कथा सांगायचा. स्वप्न रटाळ किंवा भयप्रद असले की लिस्तनित्सकींना राग यायचा.

'टोणग्या ! मूर्खाला नेहमी मूर्खासारखीच स्वप्नं पडायची !'

एकादे आनंदी मजेदार स्वप्नं शोधून काढायचा वेनियामिन प्रयत्न करायचा. पण त्याला ते बिकट होऊन बसायचे ! खूप दिवस आगाऊच तो आनंदी स्वप्न 'रचू' लागला. आपल्या ट्रंकेवर बसून पत्ते पिसता पिसता तो ते रचायचा प्रयत्न करीत असे. पत्तेही त्याच्या गालासारखेच फुगीर तेलकट दिसत. एकटक नजर लावून तो मेंदूला ताण द्यायचा. ताण देता देता एक अवस्था अशी यायची की त्याला नीट स्वप्न पडणेच बंद होऊन जायचे. सकाळी जागा झाला की तो स्मृतीला ताण द्यायचा. काय स्वप्न पडले ते आठवू पहायचा. पण काळ्याकुट्ट काळोखाखेरीज त्याला काहीच दिसायचे नाही. त्याला स्वप्नच पडलेले नसे. एक चेहराही झोपेत दिसलेला नसे.

वेनियामिनचा नीरस कल्पित कथांचा साठा लवकरच संपून गेला. तीच ती गोष्ट सांगताना तो सापडल्यावर धनी रागेजले.

'गेल्या गुरूवारी घोड्याबद्दलचं हे स्वप्न तू मला सांगितलं होतंस ! तुझं मढं उचललं लेका !'

'परत मला हे स्वप्न पडलं निकोलाई अलेक्सिएविच ! देवाशप्पथ हे स्वप्न पडलं !' वेनियामिनने निर्विकारपणे थाप मारली.

डिसेंबर महिन्यात व्येशेनस्कायाच्या जिल्हाकचेरीचे ग्रिगरीला बोलावणे आले. घोडा विकत घेण्यासाठी तेथे त्याला शंभर रुबल्स देण्यात आले. नाताळ संपल्यावर दोन आठवड्यांनी लष्करभरतीसाठी मानकोवो खेड्यात हजर राहण्याची त्याला सूचना देण्यात आली. बऱ्याच क्षुब्ध मनःस्थितीत तो यागोदनोएला परतला नाताळ जवळ आला होता आणि त्याची अजून काहीच तयारी नव्हती. अधिकाऱ्यांकडून मिळालेले पैसे अधिक स्वतःची बचत असे करून त्याने एकशे चाळीस रुबल्स देऊन एक घोडा विकत घेतला. साशकाला बरोबर घेऊन तो गेला होता. त्यांनी पुरेसे कामचलाऊ जनावर विकत घेतले. तो सहा वर्षांचा कस्तानी घोडा होता. त्याला एक छुपी खोड होती. बोटांनी दाढी विंचरीत म्हातारा साशाका म्हणाला, 'ह्याहून सस्त्यात मिळायचा नाही. त्याची खोड अंमलदाराच्या लक्षात यायची नाही. त्यांना तेवढी अक्कल नाही !'

निरनिराळ्या चालीवर दौडवीत ग्रिगरी त्या उपलाण्या घोड्यावर बसून यागोदनोएला आला.

नाताळाला एक आठवडा उरला असता पांतेलेय अचानक यागोदनोएला आला. त्याने गाडी आवाडात आणली नाही. घोडी आणि गाडी त्याने फाटकाला बांधली. त्याच्या मेंढीकोटाच्या गळपट्टीवर काळ्या लोढण्यासारख्या लोंबलेल्या दाढींतील बर्फाचे लोलक चुरगळीत तो नोकरांच्या बराकीकडे लंगडत लंगडत गेला. ग्रिगरी खिडकीतून बाहेर बघत उभा होता. बापाला घराकडे येताना त्याने पाहिले.

'अरे बापरे ! बाबा !'

का कोण जाणे पण आक्सिनिया पाळण्याकडे धावली आणि पोरीला तिने कपड्यात गुंडाळले.

पांतेलेय लंगडी चालीत खोलीत आला. तो आत आल्याबरोबर बाहेरच्या थंड हवेचा झोत आत शिरला. आपली लोकरी टोपी हातात काढून घेऊन आणि देवपुतळ्यासमोर उभे राहून त्याने अंगावर क्रुसाची निशाणी केली. नंतर धीम्या नजरेने खोलीत चारी बाजूंना बघितले.

'ट्रास्त्वुई "१

'द्रोबई द्यीन२ बाबा !' बाकड्यावरून उठून ढांगा टाकीत खोलीच्या मधोमध्य येत ग्रिगरीने उत्तर दिले.

आपला काल्यासारखा हात पांतेलेयने ग्रिगरीच्या हातात दिला आणि मेंढीकातडीचा कोट अंगाभोवती गुरफटून घेत तो बाकड्याच्या कडेला बसला. पाळण्याजवळ उभ्या असलेल्या आक्सिनियाकडे त्याने पाहिल्या न पाहिल्यासारखे केले.

'चाकरीची तयारी चाललयेय ?'

'अर्थात !'

पांतलेय बराच वेळ प्रश्नार्थक नजरेने ग्रिगरीकडे बघत गप्प बसला.

'बाबा कोट काढ ! गारठला असशील !'

'काही हरकत नाही !'

'चहाचं आधण ठेवतो !'

'मेहरबानी !' कोटावरचा जुना चिखलाचा डाग म्हाताऱ्याने नखान खरवडून काढला आणि तो पुढे म्हणाला, 'मी तुझं सामान घेऊन आलोय ! दोन कोट, खोगीर आणि तुमानी ! गाडीत आहे. जा बघ !'

ग्रिगरी बाहेर गेला आणि गाडीतून त्याने सामानाच्या दोन थैल्या बाहेर काढल्या.

तो परत आला तसा त्याचा बाप बाकड्यावरून उठला.

'कधी निघणार आहेस ?' त्याने पोराला विचारले.

'नाताळाच्या दुसऱ्या दिवशी. तू निघालाससुद्धा बाबा ?'

'मला लौकर परत गेलं पाहिजे.' त्याने ग्रिगरीचा निरोप घेतला. अजूनही आक्सिनियाची नजर टाळूनच तो दाराकडे गेला. कोयंडा उचलून मागे पाळण्याच्या दिशेने नजर टाकीत तोम्हणाला,

'तुझ्या आईने आशीर्वाद कळवलत. पायाच्या दुखण्यानं ती अंथरुणात पडून आहे.' क्षणभर थांबून तो भारावलेल्या स्वरात म्हणाला, 'तुझ्याबरोबर मानखोवोला येईन मी. मी यायच्या सुमाराला तयार रहा.'

विणलेल्या उबदार मोजात हात खुपशीत तो बाहेर गेला.

अपमानाने गोरीमोरी झालेली आक्सिनिया काहीच बोलली नाही.

टीप : १–२ अभिवादनाचे रशियन शब्द.

ग्रिगरी खोलीत येरझारा घालू लागला. तिच्या अंगावरून जाताना तो तिरप्या नजरेने तिच्याकडे बघायचा. जाता येता तक्तपोशीतील करकरत्या लाकडावर तो पाऊल टाकीत होता.

नाताळच्या दिवशी ग्रिगरीने धन्याला गाडीतून व्येशेनस्कायाला नेले. लिस्तनित्सकी प्रार्थनेला हजर राहिले. तिथली जमीनदारीण त्यांची चुलत बहीण होती. तिच्याकडे त्यानी न्याहरी केली आणि लगेच परतीच्या प्रवासासाठी गाडी जोडायला ग्रिगरीला हुकूम सोडला. डुकराचे मांस आणि कोबी घातलेल्या चमचमीत रश्शाचा वाडगा ग्रिगरीने पुरता संपवलेलाही नव्हता. पण तो तत्क्षणी उठून उभा राहिला आणि तबेल्याकडे चालता झाला. दुडक्या चालीने जाणारा अबलख घोडा हलक्या घसरगाडीला जुंपण्यासाठी त्याने त्याची ओठाळी खेचत त्याला तबेल्यातून बाहेर काढला.

मुलायम गुदगुल्या करणाऱ्या हिमशलाका वाऱ्यावर चालल्या जात होत्या. आवाडातून चंदेरी फेसाचे सित्कार उठत होते. कुपाटीपलीकडे असलेल्या झाडांवरून थिजलेल्या दंवबिंदूची मृदु किनार लोंबली होती. वाऱ्याने ते दंवबिंदू खाली ओघळले की पडताना त्यावर पडणाऱ्या उन्हाने समृद्ध रंगाचे इंद्रधनुष्य त्यातून प्रकट होत होते. गारठलेल्या डोमकावळयांचा छपरावरील धुराड्याजवळ मोठ्याने कलकलाट चालला होता. पावलांचा आवाज येताच ते दचकले आणि उडाले. कबुतररंगी हिमशलाकेप्रमाणे त्यानी घराभोवती मंडले घेतली. सकाळच्या जांभळट आकाशात गिरजाघराचा शेंडा ठसठशीत उठून दिसत होता तिकडे पूर्वेकडे ते उडून गेले.

'धन्याला म्हणावं आम्ही तयार आहोत !' घराच्या पावलाणावर आलेल्या मोलकरणीला ग्रिगरीने ओरडून सांगितले.

लिस्तनित्सकी बाहेर आले आणि घसरगाडीत चढून बसले. त्यांच्या राकुन लोकरीच्या कोटाच्या गळपट्टीत त्यांच्या गालमिशा बुडून गेल्या होत्या.

ग्रिगरीने आपले पाय कापडात गुंडाळून घेतले आणि मखमली अस्तर लावलेला लांडग्याच्या कातड्याचा कोट सारखा केला.

'गरमी आणव त्यांच्या अंगात !' घोड्याकडे नजर टाकून लिस्तनित्सकी म्हणाले.

ग्रिगरी आपल्या जागेत मागे रेलला. थरथरणाऱ्या लगामावर त्याने हात आवळून धरले होते. हिवाळ्याच्या सुरुवातीला घसरगाडी वेडीवाकडी हाकारल्याबद्दल धन्याने त्याच्या चांगलीच कानशिलात भडकावली होती. समोरची चाकोरी न्याहाळणाऱ्या ग्रिगरीला त्याची सभय आठवण होती. डॉनच्या खालच्या अंगाला

लागल्यावर ग्रिगरीने लगामाची पकड ढिली सोडली आणि वाऱ्याने कडकडीत झालेले गाल हातमोज्यानी चोळले.

दोन तासात ते यागोदनोएला पोहोचले. सबंध प्रवासात लिस्तनित्सकी गप्प होते. चुट्टयाची गुंडाळी वळून पेटवायच्या वेळीच मधून मधून ते ग्रिगरीच्या पाठीवर बोटांचा आघात करीत त्याला थांबण्याचा इशारा करीत. बराकडे जाणारी टेकडी ते उतरू लागले तेव्हाच त्यानी विचारले,

'उद्या पहाटेच निघणार ?'

ग्रिगरी आपल्या जागचा किंचित बाजूला वळला आणि मुष्किलीने त्याने आपले गोठून गेलेले ओठ ताणून विलग केले. थंडीने ताठरलेली त्याची जीभ फुगून टाळ्याला चिकटल्यासारखी झाली होती.

'होय !' त्याने कसेबसे उत्तर दिले.

'सगळे पैसे मिळाले ?'

'होय !'

'बायकोची काळजी करू नको ! आमच्याकडे तिचं नीट होईल ! चांगला शिपाई गडी हो ! तुझा आजोबा बहादुर कझाक होता ! शाही कवायतीत तुझ्या बापाला कसरतीच्या रपेटीचं पहिलं बक्षीस मिळालं होतं ! होतं का नाही ?'

'होय !'

'मग . मग !' ग्रिगरीची खरडपट्टी काढल्यासारखा करडा सूर काढून त्यानी बोलणे थांबवले आणि आपले तोंड परत एकदा लोकरी कोटात झाकून घेतले.

आवाडात आल्यावर ग्रिगरीने घोडा साशकाच्या ताब्यात दिला आणि तो नोकरांच्या बराकीकडे वळला.

'तुझा बाप आलाय ! घोडयांच्या पाठीवर चाजरजामा टाकीत पाठमोऱ्या ग्रिगरीला साशकाने ओरडून सांगितले.

मांसाची जेली खात पांतेलेय मेजापाशी बसलेला ग्रिगरीला आढळला. बापाच्या तांबारलेल्या चेहऱ्याकडे पाहून ग्रिगरीने हेरले, 'चढलयेय चांगली !'

'आलास रे शिपाईगडया !'

'गारठून गेलोय !' हाताने टाळ्या वाजवीत ग्रिगरीने उत्तर दिले.

आक्सिनियाकडे वळून तो म्हणाला, 'माझ्या टोपीचा बंद काढ ! माझी बोटं फारच आखडलीत !'

'तोंडावर वारं बसलं असेल !' तोंडातील घास चावीत चावीत त्याचा बाप रेकलेल्या आवाजात म्हणाला.

ह्या खेपेला त्याच्या बापाची वृत्ती जरा कनवाळू झाली होती. स्वतःच्या घरात असल्यासारखा तो आक्सिनियाला हुकूम सोडीत होता.

'पाव द्यायला इतका हिंमटेपणा करू नको! आणखी काप थोडा!' त्याने तिला सांगितले.

खाऊन झाल्यावर तो मेजाजवळून उठला आणि आवाडात चुट्टा ओढायला जावे म्हणून दारापाशी गेला. पाळण्याजवळून जाता जाता त्याने पाळण्याला एक दोन झोके दिले पण असे भासवीले की आपण हे जणू यदृच्छयाच केले. त्याने विचारले, 'कशाक?'

'मुलगी आहे!' ग्रिगरीच्या वतीने आक्सिनियाने उत्तर दिले. म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर तरळून गेलेले नाखुषीचे भाव ओळखून ती लगबगीने म्हणाली, 'अगदी ग्रिशाच्या वळणावर गेल्येय!'

कपड्यातून बाहेर डोकावणारे चिमुकले काळे डोके पांतेलेयने लक्षपूर्वक न्याहाळले आणि अहंकाराचा वास न येऊ देता तो म्हणाला, 'आमचंच रक्त आहे!'

'कसा आलास तू बाबा?' ग्रिगरीने विचारले.

'घोडी आणि पेत्रोचा घोडा घेऊन!'

'एकच जनावर आणायचं होतंस. म्हणजे माझा घोडा जुंपून गेलो असतो.'

'कशाला उगाच? त्याला तसाच येऊ दे! तसं चांगलं आहे घोडं!'

'पाहिलंस?'

'जाता जाता पाहिलं!'

एकच विचार त्या दोघानाही त्रस्त करीत होता. पण निरनिराळ्या वायफळ गोष्टींवरच बोलत होते. त्या संभाषणात भाग न घेता आक्सिनिया पलंगावर बसली होती. तिचे पुष्ट स्तन पोलक्यातून तटतटून उभारले होते. मूल झाल्यापासून ती चांगलीच सुटली होती. तिच्या वृत्तीत एक नवीन निर्धास्त सुखदता आली होती.

रात्री झोपायला त्याना उशीर झाला. ग्रिगरीच्या कुशीला बिलगून आक्सिनियाने त्याचा सदरा आपल्या आसवानी आणि स्तनातून ठिबकणाऱ्या परिसमृद्ध दुधाने भिजवून टाकला.

'झुरून जीव जाईल माझा! तुझ्याविना काय करू मी?'

'तुझं सगळं ठीक होईल!' ग्रिगरी पुटपुटला.

'लांबच लांब रात्री! पोर जागणार! विचार कर ग्रिशा! चार वर्षं!'

'जुन्या काळी फौजीचाकरी पंचवीस वर्षं चालायची म्हणतात !'

'मला काय करायचंय जुन्या काळाशी ?'

'बरं बरं ! पुरे आता !'

'जळ्ळी तुझी फौजी चाकरी म्हणते मी !'

'हक्काची रजा घेऊन घरी येईन मी !'

'हक्काची रजा घेऊन !' आक्सिनिया कळवळून म्हणाली. हुंदके देत आपल्या खमीसाला तिने नाक पुसले. 'तोपर्यंत डॉनचं पाणी शंभरदा समुद्राला भेटेल !'

'इतकी काही रडारड करायला नको ! पतझडीच्या पावसासारखी आहेस तू ! सतत आपली झिमझिम चालूच !'

'माझ्या वंशाला यायला हवा होतास !'

पहाटे पहाटे ग्रिगरीला झोप लागली. आक्सिनियाने उठून पोरीला पाजले. परत ती अंथरुणात पडली. कोपरावर रेलून अपलख नजरेने ती ग्रिगरीचा चेहरा न्याहाळू लागली. त्याचा खूप खूप वेळ ती निरोप घेत होती. आपल्याबरोबर कुबानला निघून जाण्याबद्दल त्याचे मन वळवण्याचा तिने प्रयत्न केला होता, ती रात्र तिला आठवली, आजही तसेच होते. फक्त तेव्हा खिडकी बाहेरचा आवाड पिठूर चंद्रप्रकाशात बुडून गेला होता. असेच ! ग्रिगरीही असाच ! पण तरी ते 'तसेच' नाही !

गतकाळात तुडवलेली एक मोठी वाट त्या दोघांनी मागे टाकली होती !

तो कुशीला वळला आणि ओलशान्स्की खेड्याबद्दल काहीतरी बरळला आणि गप्प झाला.

आक्सिनियाने झोपी जाण्याचा प्रयत्न केला. पण वाळक्या गवताची उडवी वाऱ्याने रानोमाळ उडून जावी तशी नाना विचारांनी तिची झोप उडवून लावली. त्याच्या असंबद्ध वाक्यांचा अर्थ लावीत ती उजाडेपर्यंत तशीच पडून राहिली. बर्फ गोठलेल्या खिडक्यांच्या तावदानावर दिवसाचा उजेड फेसाळू लागताच पांतलेंय जागा झाला.

'ग्रिगरी ! उठ ! उजाडले !'

बिछान्यात गुडघ्यावर बसून आक्सिनियाने अंगावर झगा ओढून घेतला आणि एक सुस्कारा टाकून ती काड्याची पेटी शोधू लागली.

त्यांची न्यारी आटोपून सामानाची बांधाबांध होईपर्यंत चांगलेच फटफटले होते. पहाटेचा सुर्मई प्रकाश झुरमुरत होता. कुपाटीचे काळे खुंट बर्फात कोरून

काढल्यासारख ठसठशीत दिसत होते. आकाशाच्या जांभळफूल निळाईला तबेल्याच्या काजळलेल्या छपराचा आडोसा आला होता.

पांतेलेय घोडे जुंपायला गेला.

इकडे ग्रिगरीने स्वतःला आक्सिनियाच्या विवश चुंबनवर्षावातून सोडवून घेतले. साशकाचा आणि इतर नोकरांचा निरोप घेण्यासाठी तो गेला.

आक्सिनियाने पोरीला गरम कापडात गुंडाळले आणि तिला खांद्यावर टाकून ती त्याचा निरोप घेण्यासाठी बाहेर आली.

आपल्या लेकीच्या लहानशा दमट कपाळाला ग्रिगरीने ओठाचा ओझरता स्पर्श केला आणि तो आपल्या घोड्याकडे गेला.

'गाडीत बैस !' आपल्या घोड्याला स्पर्श करून त्याच्या बापाने त्याला हाक मारली.

'नको ! मी माझ्या घोड्यावर बसतो !'

घोड्याचे पेशबंद बांधण्यात ग्रिगरीने मुद्दाम वेळ घालवला. मग घोड्यावर मांड घेऊन लगाम हाती घेतले. रिकाबसोटाला हात लावून आक्सिनिया परत परत म्हणत होती.

'ग्रिशा ! थांब जरा ! मला तुला काहीतरी सांगायचंय !'

भुवया मुरडून थरथरत, धास्तावलेल्या मनःस्थितीत ती काय सांगायचे ते आठवू लागली.

'बरं बरं येतो मी ! पोरीची काळजी घे ! मला निघायला हवं. बाबा बघ किती पुढं गेला सुद्धा !

'थांब रे राजा !' आपल्या डाव्या हाताने आक्सिनियाने काल्यासारखी थंडगार लोखंडी रिकीब पकडली. उजव्या हाताने तिने पोरीला उराशी कवटाळून धरले होते. तिच्या विस्फारलेल्या, एकटक बघणाऱ्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू पुसण्यासाठी तिचा हात रिकामा नव्हता.

वेनियामिन घराच्या पायऱ्यांवर आला.

'ग्रिगरी ! धन्यानी बोलवलंय !'

ग्रिगरीने शिवी देऊन चाबूक नाचवला आणि फाटकाबाहेर त्याने घोडा पिटाळला.

बर्फाचे ढिगारे आवारभर पसरले होते. जड नमदीबूट घातलेली आक्सिनिया त्यातून कष्टाने पाय ओढीत त्याच्यामागे धावू लागली.

टेंभ्याच्या माथ्यावर त्याने बापाला गाठले. निर्धाराचा प्रयत्न करून त्याने मागे वळून पाहिले.

पोरीला उराशी तशीच कवटाळून आक्सिनिया फाटकापाशी उभी होती. तिच्या किरमिजी शालीची टोकें वाऱ्यावर फडफडत होती.

आपला घोडा त्याने बापाच्या घसरगाडीला समांतर चालवला. घोडी दुडक्या पावलाने जाऊ लागली. थोडचा वेळाने म्हाताऱ्याने आपल्या घोडचाकडे पाठ वळवून विचारले,

'मग ? बायकोबरोबर रहायचा विचार नाही तुझा ?'

'परत तीच ती कहाणी ? सगळं झालंय बोलून !'

'नाही रहाणार म्हण की !'

'नाही राहणार !'

'तिनं जीव द्यायचा प्रयत्न केला ते ऐकलंस ?'

'हो ऐकलं !'

'कोणाकडून ?'

'धन्याला गावाकडं नेलं तेव्हा खेडचातली माणसं भेटली होती !'

'देवाची काही भय भीती ?'

'पण बाबा, मी म्हणतो झाल्या गेल्याचा शोक करून काय उपयोग ?'

'ही सैतानाची भाषा माझ्या पुढं बोलू नको ! तुला मी जे सांगतोय ना ते तुझ्याच भल्यासाठी सांगतोय !' पांतेलेय चिडून म्हणाला.

'तिथं माझी पोर आहे ! बोलून काय फायदा ? आता आणखी एकजण माझ्या उरावर लादायला !'

'दुसऱ्याची पोर आपण वाढवीत नाही एवढी खात्री आहे का ?'

ग्रिगरी गोरामोरा होऊन गेला.

त्याच्या बापाने नाजुक जागेची खपली काढली होती. पोर जन्माला आल्यापासून त्याच्या मनाला तो संशय छळत होता. आक्सिनियापासून आणि स्वतःपासूनही तो ते लपवीत होता. आक्सिनियाला झोप लागली की रात्री तो एकदा नव्हे अनेकदा पाळण्यापाशी गेला होता. पोरीकडे टक लावून बघत त्या काळगेल्या गुलाबी चेहऱ्यात आपला तोंडवळा शोधण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पण पूर्वी एवढचाच अनिश्चित अवस्थेत परत बिछान्यावर येऊन पडला होता. स्तिपानचा रंग गर्द तांबुस पिंगट होता. त्याच्याएवढाच तो मळचारंग होता. तेव्हा पोरीच्या धमन्यांतून कुणाचे रक्त वहात आहे ते त्याला कसे समजावे ? कधी कधी त्याला

वाटे पोरीचा तोंडवळा आपल्यासारखा आहे; कधी कधी तो स्तिपानसारखा आहे असं वाटून त्याला वेदना होत. तिच्याबद्दल ग्रिगरीला कोणतीही भावना वाटत नव्हती. वाटत असलीच तर ती कदाचित शत्रुत्वाचीच असेल. आक्सिनियाला वेणा लागलेल्या असताना तिला माळरानातून रेकल्यात घालून नेत असताना ज्या क्षणाचा अनुभव घेतला ते त्याला अशा वेळी आठवे.

एकदा आक्सिनिया स्वयंपाकघरातील कामात असताना पोरीने भिजवलेले दुपटे बदलण्याचा त्याला प्रसंग आला. ते बदलताना त्याच्या मनात एक तीक्ष्ण जळजळीत भावना उचंबळून आली होती. हळूच तो पाळण्यावर वाकला आणि त्या अर्भकाचा गुलाबी कडक चौडा आपल्या दाताखाली त्याने दाबला होता!

त्याचा बाप निष्ठूरपणे ती जखम टोकरीत होता. खोगिराच्या मुदीवर तळवा ठेवलेल्या ग्रिगरीने जड स्वरात उत्तर दिले.

'कुणाची का असेना! मी पोरीला सोडू देणार नाही!'

मोहरा न वळवताच पांतेलेयने घोड्याच्या दिशेने चाबूक उडवला.

'नतालियाच्या रूपाची नासाडी झाल्येय! वारं गेल्यासारखी मान अशी एका बाजूला कलल्येय! तिनं बहुधा नस कापून घेतली असावी!' एवढे बोलून तो चूप होऊन गेला

बर्फ कापीत जाताना गाडीचे पाटे खडखडत होते एकमेकांवर आपटून ग्रिगरीच्या घोड्याचे खूर वाजत होते.

'आता कशी आहे तिची तब्येत?' घोड्याच्या आयाळीतून एक गोचीड लक्षपूर्वक उपसून काढीत ग्रिगरीने विचारले.

'कशीबशी सुधारल्येय आता! सात महिने अंथरुणाला खिळून होती! 'ट्रिनिटी'च्या रविवारी जवळ जवळ आटोपलीच होती! फादर पांक्राती प्रार्थना म्हणायलाही आला होता! मग ती सुधारायला लागली. कोयतीनं भोसकून घेण्याचा प्रयत्न केला तिनं! पण हात थरथरल्यानं काळजाचा नेम थोडक्यात हुकला! नाहीतर संपलीच असती ती!'

'उतारावर पळवू या!' असे म्हणून ग्रिगरी रिकिबीत उभा राहिला आणि त्याने चाबूक चालवला. घोड्याने पुढे झेप घेतली आणि त्याच्या खुरांनी बर्फाच्या चुऱ्याची बरसात घसरगाडीवर उधळली. नंतर तो तुरकी चालीवर धावू लागला.

'आम्ही नतालियाला परत घरात घेणार आहोत!' पांतेलेय ओरडत आणि त्याच्या जवळ येत म्हणाला.

'त्या बाईला माहेरी रहायचं नाहीं! परवा तिला मी भेटलो होतो! तिला आपल्या घरी यायला सांगितलंय मी!'

ग्रिगरीने उत्तर दिले नाही. एकमेकांशी एक शब्दही न बोलता ते वाटतील पहिल्या खेड्यापर्यंत आले.

ह्या विषयाचा उल्लेख त्याच्या बापाने पुनश्च केला नाही.

त्या दिवशी त्यानी जवळ जवळ सेहचाळीस मैल अंतर कापले. दुसरे दिवशी दिवस कलण्याच्या सुमारास ते मानकोवाला येऊन पोहोचले.

'व्येशेनस्कायाची माणसं कुठल्या बराकीत आहेत ?' भेटलेल्या पहिल्याच माणसाला पांतिलेय प्रोकोफिएविचने विचारले.

'मोठ्या रस्त्यानं जा.'

त्या बराकीत पाच रंगरूट आणि त्याना पोचवायला आलेले त्यांचे बाप उतरले होते.

'कुठल्या गांवचं ?' घोडी मांगराकडे नेत पांतिलेय प्रोकोफिएविचने विचारले.

'चीरचे ' काळोखोतून कुणीतरी दमदमीत आवाजात उत्तर दिले.

'पण गाव कुठलं ?'

'कुणी कारगिनचे, कुणी नापोलोव्‌चे, कुणी लिखाविदोव्‌चे. तुम्ही कुठचे ?'

'कुकुल कडचं !' घोड्याचे जीन उतरवून त्याच्या घामाळलेल्या पाठीला खरारा करीत ग्रिगरी हसला.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिल्हा आतामानने व्येशेनस्कायाच्या रंगरूटाना वैद्यकीय आयोगापुढे नेले. आपल्या खेड्यातून आलेल्या इतर पोरांच्या ओळीत ग्रिगरी उभा राहिला. सकाळी आपल्या बराकीच्या दारात ग्रिगरी उभा होता तेव्हा मितका कोर्शुनोव त्याच्यापुढून गेला. एका उंच कस्तानी घोड्यावर तो स्वार झाला होता. त्याच्या घोड्याचे खोगीर आणि वछाड पाखर, शिरोबंदाने शृंगारलेले होते. ग्रिगरीला नमस्कारसुद्धा न करता डोईची वाकडी टोपी डाव्या हातात पकडून तो तसाच त्याच्या अंगावरून सटकन पुढे गेला.

नंतर स्थानिक मुलकी कचेरीच्या थंडगार खोलीत त्या पोरानी अंगावरचे कपडे उतरवले. लष्करी कारकून इकडे तिकडे धावत होते. जिल्हा आतामनचा अॅडजुटंट रंगीत चामड्याचे बूट चढवून धाईगर्दीने जात येत होता. हातातील काळ्या खड्याची अंगठी, काळ्याकरंद सुंदर डोळ्यांच्या गुलाबी कवड्या ह्यांच्या पार्श्वभूमीवर त्याची गोरीपान कातडी आणि पांढरे शुभ्र माकुल हे उठून दिसत होते. आतल्या खोलीतून डॉक्टरांनी सोडलेले हुकूम आणि संभाषणाचे तुकडे ऐकू येत होते.

'एकूणसत्तर !'

'पावेल इवानोविच ! कॉपिंग पेन्सिल द्या इकडे !' दाराजवळून जड धुंद आवाजात कुणीतरी रेकले.

'छातीचं माप !'

'हां हां . ! उघडच आनुवंशिक आहे !'

'गरमी म्हणून नोंद करा !'

'हात काढ ! काय पोरगी आहेस काय ?'

'मस्त अंगलट आहे !'

'सगळ्या गावाला बाधा ! खास उपाय योजायला हवेत ! हुजुरांकडं मी आधीच रिपोर्ट दिलाय.'

'पावेल इवानोविच ! गड्याची काय अंगलट आहे पहा !'

'ओहो !'

दुसऱ्या एका खेड्यातील उंच, तांबड्या केसांच्या मुलाच्या शेजारी ग्रिगरीने अंगावरचे कपडे उतरवले. दारातून एक कारकून बाहेर आला. आपले खांदे त्याने ताठ केले. त्याबरोबर त्याच्या फर्गोलाला पाठीवर चुण्या पडल्या. करड्या आवाजात त्याने ग्रिगरीला आणि त्या दुसऱ्या पोराला तपासणी खोलीत येण्यासाठी पुकारलें.

'चल लौकर !' धापा टाकीत तो तांबड्या केसांचा पोरगा म्हणाला. ऑरक्त होऊन त्याने एक मोजा काढला.

ग्रिगरी आत गेला.

त्याच्या सबंध पाठीवर थंडीने काटा उभा राहिला होता. त्याचा सावळा देह ओक वृक्षाच्या वर्णाचा होता. आपल्या केसाळ पायाकडे नजर जाताच त्याला अवघडून गेल्यासारखे झाले.

कोपऱ्यात वजनाच्या काट्यावर एक दुहेरी हाडाचा पोरगा नागडा उभा होता. कुणीतरी बहुधा डॉक्टरच्या मदतनिसानेच वजनाच्या दांडीवरचा गोळा डावी उजवीकडे सटासट्ट सरकावला. एक आकडा ओरडून सांगितला आणि त्या पोराला खाली उतरायला सांगितले.

वैद्यकीय तपासणीची ती अपमानास्पद पद्धती पाहून ग्रिगरीला चीड आली. पांढरा कोट घातलेल्या पिकलेल्या केसाच्या डॉक्टराने त्याला स्टेथॉस्कोप लावून तपासले. त्याच्यापेक्षा तरुण असणाऱ्या एका डॉक्टराने त्याच्या पापण्या उचकटून पाहिल्या. त्याची जीभ पाहिली. शिंगाच्या फ्रेमचा चष्मा घातलेला तिसरा एकजण हातावर हात चोळीत धावपळ करीत होता,

'काटयावर उभा रहा !' अंमलदाराने हुकूम सोडला. वजनाच्या त्या थंडगार पाटयावर ग्रिगरी उभा राहिला.

'पांच पूडस्' ... साडेसहा पौंड.'

'काऽय ! तसा तो उंचही नाही !' ग्रिगरीचा दंड धरून त्याला पाठमोरा फिरवीत पिकल्या केसाचा डॉक्टर उद्गारला.

'आश्चर्य आहे !' तो तरुण मनुष्य खोकत म्हणाला.

'किती ?' मेजापाशी बसलेल्या अंमलदाराने आश्चर्याने विचारले.

'पाच पूडस्–साडे सहा पौंड' पिकल्या केसांच्या डॉक्टराने उत्तर दिले.

'त्याला हुजुरातीकडं पाठवलं तर ?' आपले काळे तुकतुकीत मस्तक मेजा-जवळ बसलेल्या शेजाऱ्याकडे झुकवीत जिल्हा लष्करी कमिसारने विचारले.

'एकाद्या वाटमाऱ्यासारखा चेहरा आहे ! भलताच हिरवट आहे दिसायला!'

'ए...मागं वळ ! तुझ्या पाठीवर ते काय आहे ?' कर्नलच्या हुद्याचे माकुल लावलेला अंमलदार मेजावर अधिरपणाने बोटे वाजवीत खेकसला. पिकल्या केसांचा डॉक्टर काहीतरी पुटपुटला आणि आपल्या देहाची थरथर आवरण्याचा, प्रयत्न करीत ग्रिगरीने मेजाकडे पाठ करून उत्तर दिले.

'वसंतऋतूत मला सर्दी झाली होती ! ते गळू आहे !'

परीक्षा संपल्यावर मेजापाशी बसलेल्या अंमलदाराने ठरविले की सामान्य रेजिमेन्टमधेच ग्रिगरीला भरती करायला हवे.

'बारावी रेजिमेन्ट ! मेलीखोव ! ऐकू आलं का ?' त्याला जायला सांगण्यात आले. दाराकडे जात असताना त्याच्या कानावर हेटाळणीच्या स्वरात चाललेली कुजबुज पडली.

'अशक्य आहे ! कल्पना तरी करा ! सरकार स्वारीनं असं थोबाड पाहिलं तर ! त्याचे नुसते डोळेच ... !'

'भेसळ अवलाद आहे ! त्यातली एक पूर्वेची आहे ह्यात शंकाच नाही !'

'त्याचं शरीरही स्वच्छ नाही ! ती गळवं ... !'

आपली पाळी येण्याची वाट बघत थांबलेल्या खेडयातील इतर पोरानी ग्रिगरीला वेढले.

'कसं काय झालं ग्रिगरी ?'

'कुठली रेजिमेन्ट मिळाली ?'

टीप :– १) वजनाचे रशियन माप. १ पूड = ३६ पौंड.

'हुजुरातीची, आँ ?'

'वजन किती भरलं ?'

तुमानीत पाय घालताना एका पायाची लंगडी घालत ग्रिगरी खेकसला, 'मार गोळी साल्याना ! कुठली रेजिमेंट म्हणे ! बारावी !'

'कोरशुनोव ! दिमित्री ! कारगिन ! इवान !'

दाराबाहेर मुंडके काढून कारकून पुकारीत होता.

जाता जाता ग्रिगरीने कोटाची बटणे लावली. पावलाणावरून तो धावतच गेला.

उबदार वाऱ्यात बरफ पाघळणीची झुळुक होती. रस्त्यावर ठिकठिकाणी बर्फ वितळल्याने जमीन उघडी पडून वाफाळत होती. कलकलणाऱ्या कोंबड्या रस्त्याच्या इकडे तिकडे फडफडत होत्या. कादंब डबक्यातून पाण्याचे फवारे झाडीत होते. पाण्याखालचे त्यांचे पाय थंडीच्या कडाक्याने गळून पडणाऱ्या शारदीय पर्णासारखे नारिंगी गुलाबी दिसत होते.

दुसऱ्या दिवशी अश्वपरीक्षा झाली. गिरजाघराच्या भिंतीसमोर चौकात त्याची लांबच लांब ओळ खडी करण्यात आली. अंमलदारांची धावपळ चालू होती. शालोत्री आणि त्याचा मदतनीस आपले कोट उडवीत जनावरांची ती लांब पहुळ बघत गेले. व्येशेनस्कायाचा आतामन वजनाच्या काट्यापासून चौकाच्या मधोमध मांडलेल्या मेजाकडे धावत होता. परीक्षेच्या निकालाची तिथे नोंद होत होती. एक लष्करी पोलीस अंमलदार तिथून गेला. एका तरुण कॅप्टनशीं बोलण्यात तो गढला होता. रागाने त्याच्या पायाची चाळवाचाळव चालू होती.

ग्रिगरीची पाळी आली. त्याचा क्रमांक एकशे आठवा होता. त्याने घोडा काट्याकडे नेला. शालोत्रीने आणि त्याच्या मदतनिसाने जनावराचा भाग न् भाग तपासला. नंतर त्याचे वजन करण्यात आले. वजनाच्या पाट्यावरून तो परत जायला निघाल्याबरोबर शालोत्रीने चपळाईने त्याचा प्रपाण पकडला आणि त्याचे दात बघितले. त्याच्या उराचे स्नायू चाचपून बघितले. आपली दणकट बोटे एकाद्या कोळ्यासारखी त्याच्या अंगावरून फिरवीत त्याच्या तंगडीपर्यंत आणली. गुडघ्याचे सांधे चाचपून बघितले. घोंडशिरा थापटल्या. नेवरावरचे हाडुक पिरगळून पाहिले. परीक्षा संपवल्यावर तो निघून गेला. त्याचा पांढरा एप्रन वाऱ्यावर फडफडत होता. आणि त्या बरोबरच कारबोलिक आम्लाचा दर्प उधळला जात होता.

ग्रिगरीचा घोडा फेटाळण्यात आला !

साशकाच्या आशा खोट्या ठरल्या होत्या ! त्या म्हाताऱ्याने सांगितलेली गुप्त खोड त्या मुरब्बी शालोत्रीने चाणाक्षपणे ओळखली होती. ग्रिगरीने तात्काळ

बापाशी क्षुब्ध अवस्थेत सल्लामसलत केली आणि अर्ध्या तासाच्या आत त्यान प्योत्रचा घोडा वजनाच्या काटच्यावर आणला. त्याची परिक्षासुद्धा न करत शालोत्रीने तो पास केला !

ग्रिगरी घोडा घेऊन जरा पलीकडे गेला. त्यातल्या त्यात कोरडी जागा त्याने शोधून काढली आणि आपले उडतक तिथे पसरले. त्याचा बाप घोडा हाती धरून दुसऱ्या एका म्हाताऱ्याशी बोलत उभा होता. तो माणूसही आपल्या मुलाला पोहोचवायला आला होता. त्यांच्या बाजूने एक पिकलेल्या केसांचा सेनानी तरतरा गेला. फिकट करड्या रंगाचा फर्गोल आणि डोक्यावर चंदेरी आस्त्राखान टोपी त्याने घातलेली होती. त्याची डावी ढांग उजव्यापेक्षा जास्त लांब पडत होती. दस्तकी घातलेला हात हलवीत तो निघून गेला. अंमलदारांचा एक घोळका त्याच्या मागोमाग गेला.

'हा प्रांताचा आतामन !' ग्रिगरीच्या मागून ढोसत पांतेलेय कुजबुजला.

'सेनानीसारखा दिसतोय !'

'मेजर जनरल माकीएव ! मोठा कडक इब्लिस आहे !'

निरनिराळ्या फलटणींचे आणि तोफखान्याचे अंमलदार आतामनच्या मागोमाग आले. पार्श्वभाग आणि खांदे हे दोन्ही थोराड असलेला तोफखान्यातील एक मेजर आतामनच्या रखवालीच्या फलटणीतील एका उंच देखण्या अंमलदाराशी मोठ्यामोठ्याने बोलत होता.

'...च्या मारी सालं ! तोंडात बोट घालावं अशी दोन टोकं ! इस्तोनियाचं खेडं ! बहुतेक लोकांचे केस सोनेरी रंगाचे आणि ही पोरगी एकदम वेगळी रे ! नाना तर्क आम्ही लढवले ! नंतर कळलं की वीस वर्षांपूर्वी...!' चारजाम्यावर आपला बाडबिस्तारा ग्रिगरी जिथं मांडीत होता त्या जागेजवळून ते अंमलदार गेले. हास्याच्या खकाण्यात वाऱ्याबरोबर त्याच्या कानावर त्यांचे शेवटचे शब्द तरंगत आले,

'तुमच्या रखवालीच्या एका काफील्याचं ठाणं त्या खेड्यात असायचं हे उघड आहे !'

शाईचे डाग पडलेल्या बोटानी जाकिटाची बटणे लावीत एक कारकून जवळून पळत गेला. जिल्ह्याच्या पोलीस नायब अधिकाऱ्याने त्याच्या मागोमाग फोडलेली डरकाळी ऐकू आली.

'तीन नकला सांगितल्या होत्या ! आग लागो तुला !'

अंमलदारांचे आणि अधिकाऱ्यांचे अपरिचित चेहरे ग्रिगरी कुतुहलाने न्याहाळीत होता. एक अॅडजुटंटने त्याच्याकडे त्रासिक नजरेनें रोखून पाहिले. पण ग्रिगरीच्या

तल्लख डोळ्याला डोळे भिडताच तो निघून गेला. एक म्हातारा कॅप्टन कशाने तरी क्षुब्ध होऊन आपला वरचा ओठ पिवळ्या पडलेल्या दाताने चावीत धावल्यासारखा झपाझप चालत गेला. त्या कॅप्टनच्या कपाळावरची पिवळट तांबडी शीर थडाथड उडत असलेली ग्रिगरीला दिसली.

आपल्या नवीन उडतकावर ग्रिगरीने खोगीर लादले. खोगिराची मूद हिरवी होती. मागे पुढे दुलंग्या होत्या. दोन फौजी फर्गोल, दोन तुमानी, उंच बुटांचे दोन जोड, आतून घालावयाचे कपडे, दीड पौंड 'सुखारी', मांसाचा बंद डबा, भरडलेले थोडे धान्य आणि नियमाबरहुकूम प्रमाणांत इतर काही सिधेधा हे त्याचे सामान होते. खुल्या दुलंगीत घोड्याचे चार नाल, तेलकट चिंधीत गुंडाळून ठेवलेल्या नालमेखा, दोन सुया, दोरा वगैरे असलेले एक जुगदान आणि अंग पुसण्याचे रुमाल हे सामान ठेवलेले होते.

आपल्या सरंजामावरून त्याने एकदा शेवटची नजर फिरवली आणि दोऱ्यांच्या टोकाला लागलेला चिखल बाहीने पुसून काढण्यासाठी तो उकीडवा बसला. चौकाच्या पलिकडच्या टोकावर कझाकानी आपापला सरंजाम उडतकावर मांडून त्याच्या मागे रांगा धरल्या होत्या. त्या रांगांपुढून फौजी परीक्षकांचे मंडळ हळूहळू चालले होते. अंमलदार आणि आतामन तो सरंजाम बारकाईने तपाशीत होते. दुलंग्या ढुंढाळण्यासाठी आपल्या फिकटरंगी फर्गोलांची टोके हातात धरून ते खाली वाकत जुगदानातील सामान वरखाली करून बघत. सुखारीच्या पिशव्या हातात पेलून त्याच्या वजनाचा अंदाज घेत.

'तो तिकडचा उंचाडचा बघा रे पोरांनु !' ग्रिगरीच्या शेजारी उभा असलेला एक तरुण कझाक लष्करी पोलीसांच्या प्रांतअधिकाऱ्याकडे बोट दाखवीत म्हणाला,

'केसाळ मांजराच्या मागं लागलेल्या कुत्र्यासारखा—!'

'तो सैतान पहा ! दुलंगी उलथी पालथी करतोय !'

'काहीतरी गैर असणार ! त्याखेरीज तो असं करायचा नाही !'

'नालमेखा मोजून तर नाही बघत ?'

'कुत्राच म्हणायचा -'

परिक्षक मंडळ जवळ आले तशी त्यांची बोलणी थांबली. आणखी थोड्या माणसांनंतर ग्रिगरीची पाळी होती. प्रांतिक-आतामनने डाव्या हातात मोजा घातला होता. उजव्या हातातील मोजा कोपर ताठ ठेऊन तो हलवीत चालला होता. ग्रिगरी ताठ उभा राहिला. त्याच्या मागे उभा असलेला त्याचा बाप खोकला.

वाऱ्याबरोबर घोड्यांच्या मुताचा आणि चौकात वितळलेल्या बर्फाचा वास येत होता. पिण्याचा जल्लोष ओसरल्यावर व्हावे तसा सूर्य उदास झालेला दिसत होता.

अंमलदारांचा घोळका ग्रिगरीच्या शेजारील माणसापाशी थबकला. नंतर एक एक जण त्याच्यापाशी आले.

'तुझं आडनाव नाव काय ?'

'मेलीखोव, ग्रिगरी !'

पोलीस अधिकाऱ्याने पट्ट्याला धरून फर्गोल उचलला. घाईघाईने त्याची बिरडे मोजली. रिसालदाराचा माकुल लावलेल्या दुसऱ्या एकाने तुमानीचा उत्तम कपडा बोटात चाचपून पाहिला. तिसऱ्याने थांबून दुलंगी ढुंढाळली. ती ढुंढाळताना तो इतका ओणवा झाला होता की वाऱ्यामुळे त्याच्या फर्गोलाचा काठ उडून त्याच्या पाठीवर आला. नालमेखांचे फडके पोलिस अधिकाऱ्याने आपल्या अंगठा आणि तर्जनीने इतक्या सावधपणे चाचपले की ते जणू काही गरम तापलेले आहे अशीच त्याला भीती वाटली असावी. पुटपुटत त्याने नालमेखा मोजल्या.

'फक्त तेवीसच का ? काय प्रकार आहे ?' रागाने त्याने फडक्याचे टोक खेचले.

'मुळीच नाही हुजूर ! चोवीस आहेत !'

'माझे काय डोळे फुटलेत ?'

ग्रिगरीने घाईघाईने फडक्याचा मुडपलेला कोपरा सरळ केला. चोवीसावी नालमेख दृष्टीला पडली. असे करताना त्याच्या राकट काळसर बोटांचा अंमलदाराच्या शर्करा–धवल बोटाना ओझरता स्पर्श झाला. धक्का बसल्यासारखा अंमलदाराने आपला हात झटकन मागे घेतला. विचक्षणपणे कपाळाला आठ्या घालून बोटाचे टोक फर्गोलाला पुसले आणि हातमोजा चढवला.

त्याची कृती ग्रिगरीच्या लक्षात आली. छद्मी स्मित करीत तो ताठ झाला. त्यांची नजरानजर झाली. लालबुंद होऊन अंमलदाराने आवाज चढवला.

'कै बघत्योयस कै बघत्योयस ?' दाढी करताना कापल्याच्या खुणा असलेले त्याचे गाल लालेलाल होऊन गेले. 'हा कै प्रकारै ? कै प्रकार आहे रे कझाका ? तुझ्या आवळदोऱ्या का नीट नैत ? सुतळ्या का धड नैत ? अन् ह्याचा कै अर्थ ? कोण कझाक आहेस का नांगऱ्यायस ? बाप कुठाय ?'

घोड्याच्या लगामाला खेच देऊन पांतेलेय एक पाऊल पुढे आला. लंगडा पाय दुसऱ्या पायाच्या टाचेवर त्याने आपटला.

'कझाक नियम तुला ठाऊक नैत ?'

सकाळी पत्ते खेळताना हरल्यामुळे तो अंमलदार भडकला होता. आपला सगळा संताप त्याने त्याच्यावर काढला.

प्रांतिक आतामन आल्यावर अंमलदार निवळला. आतामनने आपल्या बुटाचा चौडा खोगिराच्या गाशात खुपसला. एक उचकी दिली आणि पुढच्या माणसाकडे तो गेला. ग्रिगरीला जी फलटण देण्यात आलेली होती, त्या फलटणीच्या भरती-अधिकाऱ्याने नम्रतापूर्वक त्याची जुगदानापर्यंत सगळी चीजवस्त काढून घेतली. चुट्टा पेटवताना पेटती काडी विझू नये म्हणून तो मागे मागे सरकत सगळ्यांच्या मागून गेला.

दुसऱ्या दिवसानंतर घोडे, कझाक आणि दाणावैरण घेतलेले रेल्वेचे लाल डबे वोरोनेझकडे निघाले. त्यातील एका डब्यात ग्रिगरी उभा होता.

उघड्या दारातून अपरिचित, सपाट निसर्गदृश्य सरकन जात होते. वनराईचा नाजुक निळा धागा दूर अंतरावर गरगरत होता. त्याच्या मागे घोडी वैरण रवंथ करीत होती. खालची जमीन सरकल्याच्या जाणिवेने ह्या खुराची त्या खुरावर होत होती. कडू दवणा, घोड्यांचा घाम, वासंतिक पाघळणी हे सगळे वास डब्यात कोंडले होते. वनराईचा दूर दूर गेलेला धागा क्षितिजावर रेंगाळला होता. एक निळा उदास धागा—मंद चमचमणाऱ्या सायंताऱ्यासारखाच हाती न गवसणारा !

★★

पर्व तिसरे

१.

१९१४ च्या मार्च महिन्यातील तो एक उबदार प्रसन्न वासंतिक दिवस होता. ह्या दिवशी नतालिया आपल्या सासरी परत आली. बैलाने मोडलेले कुडाचे कुंपण झुबकेदार कबुतररंगी डहाळ्यानी पांतेलेय दुरुस्त करीत होता. छपराला लोंबलेल्या बर्फाच्या चंदेरी झिळमिळत्या ठिबकत होत्या. एकेकाळी वाहणाऱ्या सांडपाण्याच्या मागे उरलेल्या खुणा वळचणीखाली काळ्या डांबरी डागांसारख्या दिसत होत्या. अधिक आरक्त आणि मंदोष्ण झालेली उन्हे पाझरत्या टेकड्याना कुरवाळू लागली होती. धरणीला फुगवटा येऊ लागला होता. डॉनच्या पलीकडे असलेल्या टेकडीपासून धोदारलेल्या बोडक्या, खडूळ तबकात उगवलेले आगस गवतचार हिरव्या बिरोजासारखे दिसत होते.

नतालिया हाडाडली होती. खूप वेगळी दिसत होती. पाठमोऱ्या उभ्या असलेल्या आपल्या सासऱ्याजवळ ती आली. आपली व्रणित, किंचित वाकडी मान वाकवून ती म्हणाली,

'बाबा ! प्रकृती ठीक आहे ना !'

'नताल्यूशका ! वा बेटा वा !' तिला पाहून गडबडून गेलेला पांतिलेय ओरडला, त्याच्या हातातील डहाळ्या गळून पडल्या आणि त्या वाकलेल्या डहाळ्या परत ताठ झाल्या.

'आम्हाला भेटायला कधीच का नाय ग येत ? चल ये ! आत चल ! तुला पाहून आईला आनंद होईल !'

'बाबा मी आल्येय...!' एवढे बोलून नतालियाने चलबिचल झाल्यासारखे हात पसरले आणि तोंड फिरवले. 'मला जर घालवून देणार नसाल तर तुमच्याच घरी मला कायमचं रहायचंय !' ती म्हणाली.

'त्यात काय झालं बेटा ? तू कुणी परकी का आहेस ? हे बघ, ग्रिगरीनं आपल्या पत्रात तुझ्याबद्दल लिहलंय, तुझी चौकशी करायला आम्हाला सांगितलंय.'

ते सायवानात गेले. हरवून गेलेला पांतेलेय लंगडत लंगडत इकडे तिकडे करू लागला. नतालियाला मिठीत घेऊन इलिनिचना टिपे गाळू लागली.

'तुला पोर झालं पाहिजे !' ती कुजबुजली.

'म्हणजे मग तो वळणावर येईल ! बैस ! तुला थोडी धिरडी करून देते खायला ! करू ना ?'

'देव दयाळू आहे ! परत आल्येय मी–!'

आरक्त होऊन गेलेली दुन्या हसत हसत धावत सायवानात आली आणि तिने नतालियाच्या गुडघ्याना विळखा घातला.

'का ग मेले निर्लाजरे ! विसरलीस होय आम्हाला !'

'अग ए खुळे' तिचा बाप लटक्या रागाने खेकसला.

दुन्याचे हात हातात घेऊन दोन्ही बाजूला पसरीत तिच्या नजरेत नजर मिसळवून नतालिया कुजबुजली,

'केवढी मोठी झालीस !'

ती सगळी गप्पा मारू लागली. कुणाचे बोलणे सुरू झाले की दुसरे कुणी-तरी मधेच बोलू लागे. तळव्यावर गाल टेकवून इलिनिचना नतालियाकडे बघत होती. मनात हळहळत होती, 'किती ही बदलून गेल्येय !'

'तू आता कायमची इथं राहणार ?' नतालियाचे हात हातात पकडून दुन्याने विचारले.

'कुणास ठाऊक–!'

'कुणास ठाऊक काय ? माझी सूनबाई दुसरीकडं कुठं राहणार ? आमच्याच घरी रहायचंस तू !' धिरडयांची थाळी मेजावरून सरकावीत इलिनिचनाने निर्णय घेऊन टाकला.

कित्येक दिवस दोलायमान अवस्थेत काढल्यानंतरच नतालिया सासरी आली होती. प्रथम तिचे वडील तिला जाऊ देईनात. जाण्याची गोष्ट तिने काढताच ते तिच्यावर रागाने खेकसले. तिने असे काही करू नये म्हणून तिचे मन वळ-विण्याचा त्यानी प्रयत्न केला.

पण आपल्याच लोकांच्या डोळ्याला डोळा देणे तिला मुष्किल होऊन बसले होते. जीव देण्याचा प्रयत्न तिने केल्यापासून आपल्या स्वतःच्याच कुटुंबात आपण कुणीतरी उपरे असल्यासारखे तिला वाटू लागले होते. ग्रिगरीला फौजेत पोहचवून आल्यानंतर पांतेलेयनं तिची घरी चलण्याबद्दल सारखी मनधरणी चालवली होती. कारण तिला परत आणून ग्रिगरीचे अन् तिचे जमवून देण्याचा त्याचा निर्धार झालेला होता.

मार्च महिन्यातील त्या दिवसापासून नतालिया मेलीखोव कुटुंबात राहू लागली. पित्रोची वागणूक एकाद्या मित्रासारखी आणि भावासारखी होती. दाऱ्या आपल्या नाखुषीच्या काही खुणा प्रकट करून दाखवीत होती, पण मधून मधून ती जे ते तिरपे कटाक्ष टाकीत होती, त्याची पुरेपूर भरपाई दुन्याच्या लाघवी-पणाने आणि म्हातारा-म्हातारीच्या वत्सलतेने होत होती.

नतालिया त्यांच्याकडे आली त्याच दिवशी ग्रिगरीला पत्र लिहिण्याचा हुकूम पांतेलेयने दुन्याला सोडला.

आमचा लेक ग्रिगरी पांतिलिएविच ह्याला अनेक आशीर्वाद,

आम्ही हे पत्री तुला आमचे– बापाच्या अंतःकरणापासूनचे शुभचिंतन कळवित आहोत. आमच्याबरोबर तुझी आई वासिलिसा इलीनिचना हिनेही तुला आईचे म्हणून शुभचिंतन कळविले आहेत. तुझा भाऊ पित्रो पांतिलिएविच आणि त्याची बायको दाऱ्या मातविएवना ह्यानीही तुला शुभेच्छा पाठविल्या असून तुला आरोग्य आणि स्वास्थ्य लाभो असे म्हटले आहे. तुझी बहीण येवदोकेया[१] आणि घरातील सर्व मंडळी तुला हेच पत्री शुभेच्छा कळवीत आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या पाचव्या तारखेस तू पाठविलेले पत्र पोचले. त्याबद्दल आमचे मनःपूर्वक धन्यवाद. घोडा ठेचकाळत असल्याचे तू लिहिले आहेस तरी त्याच्या तंगडयांना थोडी डुकराची चरबी फासणे. ती कशी फासावी हे तू जाणतोसच. जमीन जोपर्यंत घसरडी नाही किंवा आसपास खुला बर्फ जोपर्यंत नाही तोपर्यंत त्याच्या मागच्या खुराना नाल मारू नयेत. तुझी बायको नतालिया मिरोनोवना आमच्या घरी रहात आहे. तिची प्रकृती उत्तम असून ती सुखात आहे. तुझ्या आईने तुला थोडया सुक्या चेरी, गरम मोजांचा एक जोड, थोडा 'बेकन' आणि इतर काही वस्तू पाठविल्या आहेत. आम्हा सर्वांच्या तब्येती धडधाकट आहेत. पण दाऱ्याची पोर मेली. अलिकडेच मी आणि पित्रोने मांग-राची शाकारणी केली. घोडयाची नीट काळजी घे आणि तो नीट ठेव असे त्याचे तुला सांगणे आहे. गाईना पाडसे झाली आहेत. म्हातारी घोडी गाभण असावीसे वाटते. सरकारी तबेल्यातला घोडा आणून आम्ही तिला फळवून घेतली.

तुझी चाकरी आणि तुझे अंमलदार तुझ्यावर खूष आहेत हे ऐकून आनंद वाटला. नीट मन लावून चाकरी कर. झारची केलेली चाकरी वाया जाणार नाही आणि नतालिया आता आमच्याच घरी राहील. ह्याबद्दल तू पुन्हा विचार कर. एक व्याद सांगायची राहिली. 'लेंट'च्या आधी थोडेच दिवस लांडग्याने

टीप : १ दुन्याचे संपूर्ण नांव– अनुवादक

तीन मेंढरे मारली. तेव्हा प्रकृतीस सांभाळून ऐस. देवाचे स्मरण करीत जा. तुझ्या बायकोचा विसर पडू देऊ नकोस. तशी माझी तुला आज्ञा आहे. ती चांगली बाई आहे आणि तुझी कायदेशीर बायको आहे. तासाचा सत्यानाश करू नको. बापाचे ऐक.

तुझा बाप, वरिष्ठ सार्जन्ट
पांतेलेइ मेलिखोव

ग्रिगरीच्या रेजिमेंटचा मुक्काम रादझ्यविलोवा इथं होता. हे ठिकाण रूसो-ऑस्ट्रियन सीमेपासून सुमारे अडीच पावणेतीन मैलावर होते. तो घरी क्वचितच पत्र पाठवायचा. नतालिया त्याच्या बापाच्या घरी रहायला असल्याचे कळविणाऱ्या पत्राचे उत्तर त्याने शब्द तोलून मापून पाठवले. आपल्याकडून तिला नमस्कार कळवायला बापाला लिहिले. शब्दात गुंतणार नाही अशीच त्याची सगळी पत्रे असत. त्या पत्रांचा अर्थ संदिग्ध असायचा. दुन्या किंवा पित्रोकडून पांतिलेय ती पत्रे पुन:पुन: वाचून घ्यायचा. त्यातल्या गर्भित अर्थावर चिंतन करीत बसायचा. ईस्टरच्या आधी थोडे दिवस त्याने ग्रिगरीला पत्र लिहून असे स्पष्टपणे विचारले की फौजेतून परत आल्यावर तो आपल्या बायकोबरोबर राहणार आहे का पूर्वीसारखा आक्सिनियाबरोबर राहणार आहे ?

ग्रिगरीने उत्तर देण्याला उशीर लावला. त्रयीचा रविवार झाल्यानंतरच त्याना त्याचे त्रोटक उत्तर आले. शब्दांची शेवटची अक्षरे खात दुन्याने ते पत्र भराभरा वाचले. अनेक चौकशा आणि नमस्कार चमत्कारामधून त्यातील मूळ मुद्दा लक्षात येणे पातेलेयला कठीण गेले. पत्राच्या अखेरीस ग्रिगरीने नतालियाच्या प्रश्नाबद्दल लिहिले होते,

'तुम्ही विचारले आहे की मी नतालियाबरोबर राहीन किंवा नाही. पण बाबा, मी तुम्हाला असे सांगतो की एकदा तुटल्यानंतर परत जोडता येत नसते आणि मला मूल आहे हे तुम्ही स्वत:च जाणता. तेव्हा नतालियाशी माझे कसे जमावे ? मी कोणतेही वचन देऊ शकत नाही. ह्याबद्दल बोलण्यान मला कष्ट होतात. अलीकडेच एका माणसाला सरहद्दीपलीकडून चोरून माल आणताना पकडण्यात आले. त्याला भेटण्याचा आम्हाला प्रसंग आला. तो म्हणत होता की लौकरच ऑस्ट्रियाबरोबर युद्ध होईल. युद्ध कुठून सुरू करायचे आणि स्वत:साठी कोणता मुलूख बळकवायचा ते पाहण्यासाठी त्यांचा झार सरहद्दीवर आला होता म्हणे. युद्ध सुरू झालेच तर कदाचित मी जिवंत राहणार नाही आणि कोणतीही गोष्ट आधी ठरवणं शक्य नाही.'

नतालिया आपल्या सासू-सासऱ्यांसाठी राबत होती. आपला नवरा परत येईल ह्या अखंड आशेवर ती जगत होती. तिने ग्रिगरीला कधीही पत्र लिहिले नाही. पण त्याच्याकडून पत्र यावे म्हणून ती घरातील इतर कुणाही पेक्षा जास्त वेदनेने आणि इच्छेने तळमळत होती.

खेड्यातील जीवनाचा अबाधित क्रम चालू होता. फौजेतील चाकरीची मुदत संपवलेले कझाक घरी परत येत होते. कामाच्या दिवशी निरस श्रमांत वेळ नकळत निघून जात होता. रविवारी सकाळी खेड्यातील कुटुंबाचे थवे गिरिजा-घरांत लोटत होते. कझाकानी डगले आणि सणासुदीच्या तुमानी चढवलेल्या असत. बायकांच्या अंगावर धूळ झाडीत येणारे पायघोळ रंगीत झगे आणि फुगीर बाह्यांची बुट्टीदार पोलकी असत.

चौकात रिकामे रेकले उभे असत. त्यांचे जुवांचे दांडे उंच हवेत तरंगत असत. घोडी खिकाळत उभी असत आणि नानाप्रकारच्या लोकांची ये जा चालू असे. तिथे स्थाईक झालेले बळगार आगीच्या बंबाजवळ भाजीपाला विकत. त्यांनी हा भाजीपाला हारीने मांडून ठेवलेला असे. त्यांच्या मागच्या बाजूला पोरांच्या टोळक्यांचा धुडगूस चाले. मोकळे सोडलेले उंट बाजारपेठेच्या चौकाकडे आढ्यतेने बघत उभे असत आणि ही पोरे ते उंट न्याहाळीत उभी असत. तांबड्या वादीच्या टोप्या घातलेले पुरुष आणि भडक रंगाचे रुमाल डोक्याना बांधलेल्या बायका ह्यांचे घोळके जिकडे तिकडे दिसत. पाण-चक्कीवर अखंड राबून थकलेले उंट विश्रांती घेत रवंथ करीत उभे असत आणि त्यांच्या हिरवट डोळ्यात एक सुस्तपणा चमकत असे.

संध्याकाळी पावलांच्या दणदणाटाने, ॲकॉर्डियनच्या तालावरील नाच-गाण्यानी रस्ते विव्हळू लागत आणि प्रहर रात्र होऊन गेल्यावरच खेड्याच्या वेशीवरचे शेवटचे आवाज विरून जात.

नतालिया संध्याकाळच्या मेळाव्याना कधी जात नसे. दुन्याच्या निरस गोष्टी ती आनंदाने ऐकत बसे. नकळत दुन्याच्या अंगलटीला सौष्ठव येत चालले होते आणि आपल्या परीने ती देखणी होत चालली होती. अकाली पक्व होणाऱ्या सफरचंदाप्रमाणे तिची वाढ फार लौकर झाली होती. तिच्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या मैत्रीणीना त्या वर्षी हा विसर पडला की तिच्यापेक्षा आपण यौवनात आधी पदार्पण केलेले आहे आणि त्यानी तिला आपल्या कंपूत घेतले. दुन्या बापासारखीच सावळी आणि दणकट होती. तिला आता पंधरावे चालू होते. अजून तिची अंगलट पोरगेलीशी आणि कृश होती. तिला

पाचपोच अगदीच नव्हता. बाल्य आणि बहरत यौवन ह्यांच तिच्यात जवळ-जवळ अनुकंपनीय मिश्रण होऊन गेले होते. तिची लहानशी वक्ष:स्थळे भरीव होऊन तिच्या पोलक्यातून दृष्टीत भरण्यासारखी तटतटून दिसू लागली होती. तिचे लांबट काहीसे चिंचोळे होत गेलेले नेत्र लाजरेपणाने आणि खोडकरपणाने अजून चमकत होते. संध्याकाळ बाहेर काढून घरी आली की आपली निष्पाप गुपिते ती फक्त नतालियालाच सांगायची.

'नतालिया मला तुला काही सांगायचंय–!'

'सांग तर मग!'

'गावातल्या कोठाराजवळ, ओंडक्यावर काल मिशा कोशेवोई सगळी संध्याकाळ माझ्याबरोबर बसून होता!'

'लाजल्येयस का तू?'

'हट्! मी काही लाजत नाही काही!'

'आरशात बघ! पायापासून डोक्यापर्यंत जशी आग पेटल्येय!'

'तूच मला लाजायला लावलंस!'

'बरं बरं! पुढं सांग! मी काही म्हणत नाही!'

दुन्याने आपल्या पिंगट तळव्यांनी आपले जळजळणारे गाल चोळल. आपली बोटे कानशिलांवर दाबली. तिचे यौवनसुलभ आणि अकारण हास्य खळखळून आले.

'तो म्हणत होता की मी एक लहानसे अस्मानी फूल आहे!'

'बरं बरं! पुढं बोल!' दुसऱ्याच्या आनंदाने आनंदित होणारी, स्वत:चा भूतकाळ, पायदळी तुडवलेले सौख्य विसरणारी नतालिया तिला उत्तेजन देऊ लागली.

मी म्हणाले, 'खोटं नको बोलू मिशा! तशी त्यानं 'खरं!' म्हणून शपथ घेतली.'

मान हालवीत दुन्या खो खो हसू लागली. त्या हास्यध्वनीने ती खोली भरून गेली. तिचे काळे, जाड शेपटे सरड्यासारखे तिच्या खांद्यावरून मागे पुढे आंदोळत होते.

'आणखी काय म्हणाला तो?'

'माझा रुमाल आठवण म्हणून ठवायला मागत होता!'

'मग दिलास का तू?'

'छट् ! मी म्हटलं मी नाय द्यायची. तुझी कोण असेल तिच्याकडून घे जा.' अस्सं म्हटलं मी त्याला ! येरोफिएवच्या सुनेबरोबर तो सापडला होता ! ती वाईट्ट बाई आहे ! पुरुषाना खेळवत असते !'

'तू त्याच्यापासून दूर रहावंस हे वरं !'

'राहणारच आहे मी दूर !' दुन्या आपली कथा पुढे सांगू लागली. आपल्या ओठावर येऊ पाहणारे स्मित दवडण्याचा ती प्रयत्न करीत होती

'आणि आम्ही तिघी– मी आणि दुसऱ्या दोन मुली घरी येत होतो. तशी मिखेई आजोबा आमच्या मागोमाग आला. ओरडून म्हणतो कसा 'माझ्या लाडल्यानो, माझा मुका घ्या. मी प्रत्येक मुक्याला दोन कोपेक देईन.' तशी न्यूराने त्याच्या थोबाडावर डहाळीचा फटका मारला आणि आम्ही पळून आलो !'

उन्हाळा कोरडा होता. खेड्याजवळ डॉनचा प्रवाह उथळ झाला. जिथून जिथून तुफान ओघ झपाट्याने वहात असे तिथे पायउतार तयार करण्यात आला. शेपटीही न भिजता बैलं त्यावरून परतीरावर जाऊ लागली. रात्रीच्या वेळी टेकड्यांच्या दांड्यांवरून कोंदटपणा, गजमज वहात यायची आणि उन्हाने करपलेल्या कुस्कटाचा खरपूस वास वाऱ्याने सगळीकडे दाटून जायचा. माळरानातील वाळलेल्या झाडाझुडपानी पेट घेतला होता आणि डोके उठवणाऱ्या वासाचा धूर डॉनच्या दरडीवर तरंगत होता. रात्री नदीवर मेघराशी दाटून येत आणि अभद्र गडगडाट कानावर पडत. वीज आभाळ चिरीत त्याच्या वेड्यावाकड्या निकाळ्यानिळ्या धांदोट्या करीत होती, पण करपून गेलेल्या धरित्रीला टवटवी आणणारा पाऊस काही पडत नव्हता.

घंटेच्या मनोऱ्यावरून रोज रात्री एक घुबड आक्रंदत होते. थरकाप उडवणारे ते घुत्कार खेड्यात निनादत होते. घंटेच्या मनोऱ्यावरून ते घुबड उडत उडत मसणवटीकडे जायचे, तिथल्या गवत माजलेल्या पिंग्या थडग्यांवर बसून विव्हळू लागायचे.

'काहीतरी अरिष्ट येणार !' मसणवटीतून घुबडाचे आक्रंदन ऐकणारी म्हातारी माणसे भविष्य सांगत.

'युद्ध होणार ! तुर्की मोहिमेच्या आधी एक घुबड असंच ओरडत होतं !'

'कदाचित परत पटकी येईल !'

'गिरजाघरातून मसणवटीकडे घुबड गेलं की चांगल्याची आशाच सोडा !'

मार्तिन शामिल मसणवटीच्या जवळच राहत असे. त्या नतद्रष्ट घुबडासाठी दोन रात्री तो दबा धरून बसला होता. पण तो अदृश्य गूढ पक्षी त्याच्या

डोक्यावरून नि:शब्दपणे उडत जात मसणवटीच्या दुसऱ्या टोकाला खाली उतरला आणि पेंगलेल्या खेड्यांत आपला भयभीत करणारा आक्रोश घुमवू लागला. मार्तिनने आर्वाच्य शिव्या घालून एका ढगाच्या काळ्या लोंबत्या पोटात गोळ्या झाडल्या आणि तो घरी निघून गेला. त्याची बायको एक भित्रट आणि दुखणेकरी बाई होती. सशाच्या मादीसारखी तिची कूस वाहती होती. घरी आल्यावर ती त्याच्यावर तणतणली.

'तू मूर्खायस ! पुरता मूर्खायस ! ते पाखरू काय तुझ्या वाटेला जातंय सांग ना ! देवानं शिक्षा केली की भोगशील का ? माझे दिवस इकडे भरत आलेत, तुझ्यामुळे काय वेडंवाकडं झालं तर !'

'बये चूप बस !' मार्तिनने फर्मावले. 'तुला काय धाड भरत नाय ! काळजी करू नकोस ! त्या पाखरानं सगळ्यांना इथं भीतीची सणक आल्येय ! अरिष्टला आमंत्रण देतंय सालं सैतान ! युद्धाला तोंड लागल तर धरून नेतील मला आणि माझ्या बोडक्यावर तू ही वीण घालून ठेवल्येयस ना !' पोरे झोपली होती तिकडे हात करीत तो ओरडला.

बाजारपेठेत म्हाताऱ्या माणसांशी बोलताना पांतिलेयने गंभीरपणे सांगितले, 'आमच्या ग्रिगरीनं लिहिलंय ऑस्ट्रियन झार म्हणे सरहद्दीवर आलाय ! आपला सगळा फौजफाटा एका जागी जमा करून मॉस्को न् पिटर्सबर्गवर चालून जाण्याचा त्यानं हुकूम सोडलाय म्हणे !'

मागची युद्धे म्हाताऱ्या माणसाना आठवत होती. आपले भय ते एकमेकाना बोलून दाखवीत होते.

'पण आता युद्धबिद्ध होणार नाय !' एकाने हरकत घेतली 'पीक बघा !'

'पिकाचा ह्याच्याशी काय संबंध नाय. मला वाटतं चळवळवाल्यांचे दंगे असावेत हे !'

'काय झालं तरी आपल्याला बातमी सगळ्यांच्या मागून कळणार.'

'जपानी युद्धासारखी.'

'पोराला घोडं घेतलं का ?'

'त्याचं काय विशेषाय ? बघताईल !'

'सगळ्या थापा !'

'अरे पण युद्ध होणार तरी कुणाशी ?'

'तुर्कांबरोबर—दर्यासाठी. दर्या वाटून कसा घ्यायचा ह्याबद्दल त्यांचं काय घटत नाय.'

'एवढं काय कठीणाय त्यात ? आपण कुरणरानाची करतो तशी दोन पट्टयात घ्या म्हणावं वाटणी करून.'

मग ती बोलणी जशी चेष्टेवर जाऊ लागली तशी म्हातारी माणसे आपल्या कामाला निघून गेली.

कुरणरानातील पहिल्या भराचे पयेण कापणीची वाट बघत होते. डॉनच्या पलिकडे सुकून चाललेले गवत माळरानातील गवताच्या पासंगाचेही नव्हते. परतीरावरील त्या रोगट गवताला काही वासघ्राण नव्हती. धरित्री तीच होती पण गवताला प्यायला मिळणारे रस वेगवेगळे होते. माळरानात काळी माती होती. ती इतकी जबर आणि ठोस होती की त्यावरून जाणाऱ्या गुरांच्या खुरांच्या निशाण्याही उमटत नसत. तिथले गवत दणकट आणि सुगंधी होते. पण डॉनच्या काठची माती दमट कुजट होती. त्यावर भिकार खुरटे पंधे गवत उगवत होते. गुरे तिकडे सहसा ढुंकून बघत नसत.

गवतकापणीला सुरुवात होणार होती त्या सुमारास अशी एक घटना घडली की ज्यामुळे ते खेडे ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत हादरून गेले. जिल्हा पोलिस प्रमुख एका इन्स्पेक्टरबरोबर येऊन दाखल झाला. त्यांच्याबरोबर एक गिड्डा, दात काळे पडलेला गणवेशातील अंमलदार होता. त्याला खेड्यात पूर्वी कुणीही कधी पाहिले नव्हते. त्यानी आतामानला सांगोवा धाडला, साक्षीदार गोळा केले आणि ते थेट चकण्या लुकेशकाच्या घराकडे गेले.

बिल्ला लावलेली आपली टोपी इन्स्पेक्टरने हातात धरली होती. डाव्या हाताला असणाऱ्या कुपाटीच्या बाजूने ते चालले होते. आतामान जवान कोंबड्यासारखा पुढे धावत होता. धुळीने भरलेल्या आपल्या बुटाची पावले उन्हाच्या कवडशावर टाकीत इन्स्पेक्टर त्याला विचारीत होता.

'स्तोकमन घरी आहे का ?'

'जी हुजूर !'

'त्याचा पोटापाण्याचा उद्योग काय ?'

'तो आपला एक कारागीर आहे ! लाकडं ताशीत असतो !'

'त्याच्याबद्दल संशयास्पद काही आढळलं का ?'

'मुळीच नाय !'

हातात टोपी घेऊन चालणाऱ्या त्या मुख्य पोलीस अंमलदाराने नाकाच्या दांडीवरील एक पुटकुळी पिरगळली. भरड गणवेश घातल्याने त्याला धाप लागली होती गवताच्या काडीने आपले काळे दात कोरीत आणि डोळ्याभोवतालच्या लालसर सुरकुत्याना चुण्या पडीत गिड्ड्या अंमलदाराने आपले डोळे किलकिले केले.

'त्याला भेटायला कोण येत असतं ?' आतामानला मागे खेचत इन्स्पेक्टरने विचारले.

'जी हुजूर ! भेटायला येतात ! कधी कधी पत्त्यांचा डाव मांडून तिथं लोक बसलेले असतात !'

'कोण लोक ?'

'बहुतेकजण गिरणीतले मजूर असतात !'

'कोण कोण ?'

'एंजिनवाला, तागडीवाला, रुळवाला दाविद ! कधी कधी आमचे कझाक असतात !'

इन्स्पेक्टर अंमलदार येण्याची वाट बघत थबकला. हातातील टोपीने त्याने नाकावरचा घाम पुसला. अंमलदार मागे पडला होता. आपल्या डगल्यावरचे बटण बेडेवाकडे ओढीत तो स्वतःशीच काहीतरी पुटपुटला. मग त्याने आतामानला खूण करून बोलावले. दम कोंडून आतामान चौड्यावर पळत आला. त्याच्या मानेवरच्या गाठ्याळ शिरा उडत, थरथरत होत्या.

'कामावर असलेल्या दोघाना घेऊन जा आणि मघा नावं घेतलीस त्या लोकाना अटक कर ! त्याना फरासखान्यांत घेऊन ये ! आम्ही एक दोन मिनिटात आलोच. कळलं का ?'

आतामान असा काही ताठ पवित्र्यात उभा राहिला की त्याच्या उंच गळपट्टीतून शिरा तटतटून फुगल्या. घोगरासा आवाज काढून तो हुकुमाची तामिली करण्यासाठी मोहरा वळवून निघून गेला.

टांकणीने फर्दी लाकडावर नक्षी कापीत स्तोकमन दाराकडे पाठ करून बसला होता. त्याच्या अंगातील बंडीच्या गुंड्या सुटलेल्या होत्या.

'मेहरबानीकरून उभे रहा ! तुम्हाला अटक करण्यात येत्येय !'

'कशासाठी ?'

'तुमच्या ताब्यात दोन खोल्या आहेत ?'

'होय !'

'आम्हाला त्यांची झडती घ्यायचीय !'

दाराजवळच्या हातरीवर अंमलदाराच्या टाचेचा खिळा अडकला. तो मेजाकडे चालत गेला. आणि कपाळाला आठ्या घालून तिथे हाताला लागले ते पहिले पुस्तक त्याने उचलले.

'मला त्या ट्रंकेची चावी हव्येय !'

'आपण मला भेट देण्याचं कारण काय ?'

'मग आपण त्यावर सावकाशीनं बोलू या!'

दुसऱ्या खोलीतून स्तोकमनच्या बायकोने दारवटचाकडे डोकावून पाहिले आणि ती आत गेली. इन्स्पेक्टर आणि त्याचा कारकून तिच्या मागोमाग दुसऱ्या खोलीत गेले.

'हे काय आहे ?' पिवळे वेष्टन घातलेले एक पुस्तक हातात धरून अंमलदाराने शांतपणे स्तोकमनला विचारले.

'पुस्तक!' खांदे उडवून स्तोकमनने उत्तर दिले.

'तुझा विनोदीपणा वेळप्रसंगाला राखून ठेव! प्रश्नाचं नीट उत्तर दे!'

येणारे छद्मी स्मिताला आवरीत स्तोकमनने आपली पाठ चुलाण्यावर रेलली. जिल्हा-पोलीस-प्रमुखाने अंमलदाराच्या खांद्यावरून त्या पुस्तकाकडे दृष्टि टाकली आणि तो स्तोकमनकडे वळला.

'ह्याचा अभ्यास करता ?'

'मला ह्या विषयाची आवड आहे!' लहानशा कंगव्याने आपल्या दाढीचे दोन दिशेने दोन समान पेड विंचरीत स्तोकमनने कोरडे उत्तर दिले.

'अस्सं!'

त्या अंमलदाराने पुस्तकाच्या पानांवरून नजर टाकली आणि ते परत मेजावर फेकून दिले. दुसरे पुस्तक चाळून त्याने बाजूला ठेवले. तिसऱ्या पुस्तकाचे मुखपृष्ठ वाचल्यानंतर तो परत स्तोकमनकडे वळला.

'असल्याच प्रकारचं बाकीचं साहित्य कुठं ठेवलंयस् ?'

नेम धरल्यासारखा एक डोळा स्तोकमनने घट्ट आवळला आणि उत्तर दिले.

'माझ्याजवळ जे काही आहे ते तुम्हाला दिसतंय!'

'खोटं बोलतोयस्!' त्याच्या दिशेने पुस्तक नाचवीत अंमलदार सटकने म्हणाला,

'माझी मागणी आहे-!'

'झडती घ्या!'

तलवारीची मूठ हातात पकडून पोलीसप्रमुख त्या ट्रंककडे चालत गेला. तिथे उभा असलेला कझाक रखवालीसैनिक एकूण परिस्थिती पाहून हबकून गेलेला दिसत होता. कपडे आणि कपड्यांची अस्तरे धुंडाळणे त्याने आधीच सुरू केले होते.

'मला सौजन्याची वागणूक मिळावी अशी माझी मागणी आहे!' डोळा

घट्ट मिटून त्या अंमलदाराच्या नाकाच्या दांडीचा नेम धेत स्तोकमनने अखेरीस सांगून टाकले.

'बकवास बंद करा हो सौजन्यवाले !'

सामानाची जेवढी उलथापालथ करणे शक्य होती तेवढी त्यानी केली. वर्कशॉप' चीही झडती घेण्यात आली. त्या उत्साही इन्स्पेक्टरने भिंतीवरही वाकडया बोटानी ठकठक करून पाहिले.

झडती आटोपल्यावर स्तोकमनला फरासखान्यात नेण्यात आले. रस्त्याच्या मधोमध कझाक रखवालदाराच्या पुढयात तो चालला होता. एक हात त्याने आपल्या जुन्या कोटाच्या पंख्यात खुपसला होता आणि दुसरा हात बोटांचा चिखल झाडावा तसा हालवीत तो चालला होता. बाकीचे भिंतीच्या कडेने रस्त्याच्या उन्हे पडलेल्या बाजूने चालले होते. इन्स्पेक्टर परत किरणांच्या कवडशांवर पाय आपटीत चालला होता. त्याचे बूट गवतामुळे आता हिरवे झाले होते. आता त्याने टोपी हातात धरलेली नव्हती. आपल्या पांढऱ्याफटक पडलेल्या कान-काठापर्यंत ती त्याने घट्ट दाबून घातली होती.

तपासणी करण्यात आलेला स्तोकमन हा शेवटचा कैदी होता. अजून वंगण लागलेले हात असलेला इवान अलेक्सिएविच, हसतमुख दाविद, खांद्यावर जाकीट टाकलेला 'गुड्डू' आणि मिशा कोशेवोई ह्यांची जबानी होऊन त्याना बाहेरच्या खोलीत दावणीला बांधल्यासारखे ठेवले होते. पहाऱ्याला कझाक उभे होते.

आपली 'फाईल' चाळीत इन्स्पेक्टरने मेजापलीकडे उभ्या असलेल्या स्तोकमनला विचारले, 'गिरणीत हत्या झाली होती त्यावेळी मी तुमची तपासणी केली होती तेव्हा रशियन डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीचे सभासद असल्याचं तुम्ही का लपवून ठेवलंत ?'

तपासनीसाच्या डोक्यावरून पलीकडे टक लावून बघत स्तोकमन न बोलता उभा होता.

'तेवढं तर शाबित झालंय ! तुमच्या कामाला साजेसं बक्षीस मिळेल तुम्हाला !' कैद्याच्या मुग्धतेने चिडलेला इन्स्पेक्टर ओरडून म्हणाला.

'मेहरबानी करून आपली तपासणी सुरू करा !' कंटाळलेल्या सुरात स्तोकमन म्हणाला. एका रिकाम्या स्टुलाकडे बघत त्याने बसण्याची परवानगी मागितली. इन्स्पेक्टरने काही उत्तर दिले नाही पण स्तोकमन शांतपणे खाली बसलेला पाहून तो त्याच्याकडे डोळे वटारून बघू लागला.

'इथं कधी आला ?'

'गेल्या वर्षी !'

'तुमच्या संघटनेच्या सूचनेवरून आलात ?'

'कोणत्याही सूचनेशिवाय आलो !'

'किती वर्षं पक्षाचे सभासद आहात ?'

'कशाबद्दल बोलताय तुम्ही ?'

'मी तुम्हाला विचारतोय की रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीचे किती वर्षं तुम्ही सभासद आहात ?'

'मला वाटतं...!'

'तुम्हाला काय वाटतं त्याच्याशी मला मुळीच कर्तव्य नाही ! विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर द्या ! नाकारण्यात मतलब नाही ! एवढंच नाही तर त्यात धोका आहे !' इन्स्पेक्टरने फाईलीतून एक कागद काढला आणि आपल्या तर्जनीने तो मेजावर दाबून धरला.

'हा रोस्तोवहून आलेला रिपोर्ट आहे ! मी म्हणालो त्या पक्षाचे तुम्ही सभासद आहा ह्याला ह्यात दुजोरा दिलेला आहे.'

स्तोकमनने आपले डोळे चटकन त्या कागदाकडे वळवले. क्षणभर त्यावर नजर स्थिर केली. मग गुडघ्यावर हाताने ठोकीत त्यान ठासून सांगितले,

'१९०७ पासून !'

'असं ! तुम्हाला पक्षानं इथं पाठवलं हे तुम्ही नाकारताय ?'

'होय !'

'तसं असेल तर इकडे का आला ?'

'इथं मेकॅनिक्सचा तुटवडा आहे असं मला वाटलं !'

'पण विशेषत: हाच जिल्हा निवडायचं काय कारण ?'

'कारण तेच !'

'सध्या किंवा तुमच्या इथल्या मुक्कामाच्या काळात केव्हाही तुमचे तुमच्या संघटनेशी काय संबंध होते ?'

'नव्हते !'

'तुम्ही इथं आहात हे त्याना ठाऊक आहे ?'

'कदाचित !'

इन्स्पेक्टरने मोतिया रंगाची मूठ असलेल्या चाकूने आपल्या पेन्सिलीला धार केली आणि ओठ आवळले.

'तुमच्या पक्षातील कुणा सभासदाशी तुमचा पत्रव्यवहार चालू आहे ?'

'नाही'

'मग झडतीत उघडकीला आलेलं पत्र कुणाचं होतं ?'

'ते एका मित्राचं होतं ! त्याचे कोणत्याही क्रांतिकारक संघटनेशी काहीही संबंध नाहीत !'

'रोस्तोवहून तुम्हाला काही सूचना मिळाल्यात ?'

'नाही !'

'गिरणीतले मजूर तुमच्या खोलीत कशासाठी गोळा होत होते ?'

त्या प्रश्नातील मूर्खपणाने जणू चकित झाल्यासारखे स्तोकमनने आपले खांदे उडवले.

'हिवाळ्यात संध्याकाळी वेळ घालवायला ते यायचे ! आम्ही पत्ते खेळायचो .. !'

'आणि कायद्यानं बंदी घातलेली पुस्तकं वाचायचो ?' इन्स्पेक्टरने सुचवले.

'नाही ! त्यातला प्रत्येकजण जवळजवळ निरक्षर होता !'

'तरीसुद्धा गिरणीतला एंजिनवाला आणि बाकीचेसुद्धा ही गोष्ट नाकारीत नाहीत !'

'ते खरं नाही !'

'मला असं वाटतं की तुम्हाला ह्याची अगदी प्राथमिक समजूतसुद्धा नाही की...!'

ते ऐकून स्तोकमन हसला तेव्हा आपण काय म्हणणार होतो ते विसरून इन्स्पेक्टरने सांगून टाकले.

'तुम्हाला मुळी अक्कलच नाही ! ज्यानं तुमचं नुकसानच होईल असा नकारांचा हट्टीपणा चालवलाय तुम्ही ! कज्ञाकांची मनं पोखरायचं काम करण्यासाठी, सरकारविरुद्ध त्याना फितवण्यासाठी तुम्हाला पक्षानं इथं पाठवल्याचं अगदी स्पष्ट आहे ! तुम्ही हे ढोंगी नाटक का चालवलंय ते मला समजत नाही! तुमचा गुन्हा त्यानं कमी होणार नाही ...!

'आपलं हे सगळं कुभांड आहे. मी चुट्टा ओढू का ? मेहरबानी ! ह्या कुभांडाला काहीही आधार नाही !'

'तुमच्या खोलीत येणाऱ्या कामगाराना तुम्ही हे पुस्तक वाचून दाखवलं ?' इन्स्पेक्टरने हात एका चोपड्यावर ठेवून त्याचा मथळा झाकला. त्याच्या हाताच्या वर 'प्लेखानोव' हे नाव दिसत होते.

'आम्ही कविता वाचत होतो !' स्तोकमनने उत्तर दिले आणि अस्थींचा होल्डर बोटात घट्ट पकडून चुट्टयाचा झुरका घेतला.

दुसऱ्या दिवशी आकाश ढगाळलेले होते. पावसाची पिरपिर चालू होती. सकाळीच पोष्टाची घोडागाडी त्या खेड्यातून बाहेर पडली. मागच्या बाजूला स्तोकमन डुलक्या घेत होता. त्याची दाढी कोटाच्या गळपट्टीत बुडून गेली होती. त्याच्या दोन्ही अंगाला एकेक समशेरधारी कझाक रेटून बसला होता. त्यातला एक जो कुरळ्या केसांचा, देवीचे वण तोंडावर असलेला कझाक होता त्याने आपल्या खडबडीत गलिच्छ बोटात स्तोकमनचा दंड करकचून धरला होता. डोळ्याच्या कोपऱ्यातून तो भेदरटपणे परत परत स्तोकमनकडे तिरध्या नजरेने बघत होता. डाव्या हाताने त्याने आपल्या समशेरीचे खडबडीत म्यान पकडले होते. घोडागाडी खडखडत वेगाने रस्त्यावरून धावत होती. अंगावर शाल पांघरलेली एक ठेंगणी बाई मेलोखोवच्या वाडीजवळ त्या गाडीकडे डोळे लावून उभी होती. तिची पाठ कुडाच्या कुंपणाकडे होती.

घोडागाडी झपाट्याने तिच्या पुढून दौडत गेली. उरावर हात दाबीत ती बाई त्या गाडीमागे तीरासारखी धावत सुटली.

'ओसिप ! ओसिप दाविदोविच ! बाई ग ..! काय करू मी ?'

तिच्याकडे पाहून स्तोकमनने हात हालवण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात देवीचे व्रण असलेला तो कझाक ताडकन उठून उभा राहिला आणि घोगऱ्या क्रूर आवाजात ओरडला,

'बस खाली ! नायतर छाटून टाकीन !'

खुद्द झारच्याविरुद्ध जाण्याची हिंमत दाखवलेला मनुष्य आपल्या अख्ख्या भाबड्या आयुष्यात त्याने प्रथमच पाहिला होता !

२.

मानकोवोपासून राजिविलोवा ह्या चिमुकल्या गावापर्यंत गेलेला लांबलचक रस्ता एखाद्या करड्या स्पर्शातीत धुक्याप्रमाणे त्याच्या मागे कुठेतरी पडला होता. मधूनमधून आठवण्याचा प्रयत्न ग्रिगरीने केला, पण स्टेशनांच्या इमारती, हादरत्या तक्त्याखाली खडाड खडाड खडाड खडाड वाजणारी चाके, घोड्यांचे आणि वैरणीचे दर्प, खालून वाहत गेलेल्या रुळांचे न संपणारे धागे, इंजिनातून उधाणणारा

धूर आणि वोरोनेझ म्हणा किंवा कीव्ह म्हणा कुठल्या तरी स्टेशनावर पाहिलेल्या सशस्त्र पोलिसाचा दाढीवाला चेहरा एवढेच त्याला अंधूक स्मरत होते.

ज्या ठिकाणी ते गाडीतून खाली उतरले तिथे अंमलदारांचे आणि करड्याशा रंगांचे लांबकोट घातलेल्या, तुळतुळीत हजामती केलेल्या माणसांचे घोळके होते. त्याला न समजणाऱ्या भाषेत ते बोलत होते. घोड्याना खाली उतरवून घेण्याला बराच वेळ लागला, पण एकदा हे काम पूर्ण झाल्यानंतर एक असिस्टंट (आशलोन) कमांडर तीनशे किंवा त्याहून जास्तच कझाकांना गुरांच्या इस्पितळात घेऊन गेला. अश्व तपासणीशी संबंधित ते एक लांबलचक खटले होते. मग सैनिकाना त्यांचे वाटप. 'एनसीओज' ची धावपळ. मळहिर घोड्यांचे पहिले पथक बनवण्यात आले. दुसरे पथक सारंगी घोड्यांचे आणि तिसरे मुगदुमी घोड्यांचे बनवण्यात आले. ग्रिगरीला चौथ्या पथकात पाठवण्यात आले. हे पथक घनसावळ्या किंवा विगट रंगी घोड्यांचे होते. पाचवे पथक सर्वस्वी तांबटबोर घोड्यांचे आणि सहावे मुषकी घोड्यांचे होते. सैनिकाना सार्जंटमेजरच्या हुकमतीखाली देण्यात आले. हे सार्जंटमेजर रिसाल्याच्या निरनिराळ्या तुकड्याना घेऊन जवळपासच्या खेड्या-वाड्यांकडे गेले.

सुस्वभावी बटबटीत डोळ्यांचा सार्जंट मेजर ग्रिगरीजवळून गेला. दीर्घकाळ चाकरी केल्याचे बिल्ले त्याने लावले होते. ग्रिगरीला त्याने विचारले.

'कुठल्या खेड्याचा रे तू ?'

'वेशेनस्काया'

'लांड्या शेपटीचा आहेस ?' [१]

दुसऱ्या खेड्यातून आलेले कझाक खसखसले. ग्रिगरीने निमूटपणे अपमान गिळून टाकला.

ग्रिगरीचे पथक ज्या रस्त्याने निघाले होते ती हमसडक होती. नेटकी हमसडक डॉनच्या घोड्यानी पूर्वी कधी पाहिलेली नव्हती. तेव्हा गोठलेल्या नदीवरुन जावे तशी ती जपूनच पावले टाकीत होती. पण थोड्या वेळाने त्यांना रस्त्याचा अदमास आला आणि ती पुढे जाऊ लागली. कोरे नाल ठोकलेल्या त्यांच्या टापा रस्त्यावर खणाणू लागल्या. तुरळक जंगलाच्या तुकड्यांनी त्या अनोळख्या पोलीश भूमीच्या अंगावर उभे आडवे पट्टे ओढलेले होते. दिवस उबदार होता.

टीप– (१) प्रत्येक खेड्याचे एक टोपण नाव होते. वेशेनस्काया 'कुत्रा' म्हणून ओळखले जायचे.

मळभ आलेल होते. ढगांच्या दाट पडद्याआड लोंबकळणारा सूर्यदेखील परका आणि अपरिचित वाटत होता. रादझिव्हिलोवा वाडी स्टेशनापासून सुमारे अडीच पावणेतीन मैलांवर होती. अर्ध्या वाटेवर गेल्यावर असिस्टंट कमांडर आणि सार्जंट मेजर घोडी फेकीत पुढे गेले. अर्ध्या तासातच ते तिथे जाऊन पोहोचले.

'काका, कोणतं खेडं आहे हे?' एका बागेतील बोडक्या झाडमाथ्याकडे बोट करीत एका तरुण कझाकाने सार्जंट मेजरला विचारले.

'कुठलं खेडं? इथं तुझं कझाकी खेडं विसर पोरा! हा काय डॉन प्रदेश नाय!'

'काका, मग हे कायाय?'

'मी तुझा काका? चांगला पुतण्या भेटलास मला, पोरा! ती प्रिन्सेस उरुसोवाची वाडी आहे. आपल्या चौथ्या कंपनीचा तिथे तळाय!'

सुरेख बांधणीचे दुमजली घर, लाकडी कुसू आणि पडघरांची अनोखी घाटणी इकडे टक लावून बघत ग्रिगरी खिन्नपणे घोडयाची गर्दन थोपटीत होता. पण राईच्या पुढून ते जात असताना त्याच्या कानावर त्या निष्पर्ण झाडांची जी कुजबुज आली ती भाषा दूरवर राहिलेल्या डॉन देशाचीच भाषा होती.

जीवनाची अत्यंत रटाळ, गुंग करून टाकणारी बाजू कझाकांच्या पुढे प्रकटली होती. कामाला मुकलेली ती तरुण मंडळी ताबडतोब घरच्या आठवणीने बेचैन होऊन गेली आणि आपला बहुतेक फावला वेळ गप्पाटप्पात घालवू लागली. त्या घराच्या थोराड, कौलारू पाखांत ग्रिगरीच्या सैन्याचा मुक्काम होता. खिडकीखाली तृणशय्येवर ते झोपत होते. खिडक्यांच्या फटींना लावलेल्या कागदातून रात्रीच्या वेळी वाऱ्याने दूरवर धनगराचे शिंग वाजावे असा नाद येई. घोरणारांच्या आवाजातून हा आवाज लक्षपूर्वक ऐकताना ग्रिगरीच्या मनात अशी अनिवार इच्छा उफाळून येत असे की आत्ताच्या आत्ता उठावे, तबेल्याकडे जावे, घोडयावर जिन घालावे आणि अशी दौड मारावी–अशी दौड मारावी की परत घरी पोहोचेपर्यंत थांबूच नये!

पहाटे पाच वाजता उठण्याचा 'इशारा' घुमत असे आणि दिवसाची पहिली 'ड्यूटी' म्हणजे घोडयाना खरारा करून त्यांना पाणी, दाणा वैरण वगैरे देणे. घोडी चरत असताना अर्ध्या तासाची थोडीशी उसंत मिळे, ती म्हणजे शिळोप्याच्या गप्पांची संधी असे.

'दळभद्र जिणाय हे गड्यानु!'

'आपल्याच्यान् नाय निभायचं.'

'अन् तो सार्जेन्ट मेजर! सुव्वर साला! घोड्याची सुंभी धुवायला लावतो!'

'आत्ता घरी तव्यावर घिरडी चुरचुरत असतील. आज उपवासमासातील मंगळवार.'

'एखाद्या पोरीला आवळली असती जरा!'

'पोरानु, काल मला स्वप्न पडलं! मी न् बाबा कुरणरानात गवत कापतोय. मळणीच्या खळ्यात चौबाजूला गाववाले डेझीच्या फुलागत विखुरलेत.'

वासरासारखे स्निग्ध डोळे असलेला अबोल प्रोखोर झीकोव सांगू लागला, 'आम्ही आपले गवत कापतोय! कापतोय! माझी तब्येत एकदम खुष होऊन गेलेली!'

'मी पैजेवर सांगतो, बायको म्हणत असेल 'माझा निकोलाई आता काय बरं करत असेल?'

'हाः हाः हाः! सासऱ्याला अंगाबर घेऊन पडली असेल?'

'ए! हे बोलणं–!'

'अरे नवरा दूर गेल्यावर दुसऱ्या पुरुषाला धरणार नाय अशी बाईच नाय दुनियेत.'

'त्याची कशाला फिकीर? बाई म्हणजे काय दुधाचा खुजा नाय संपून जायला! आपण परत गेलो की भरपूर मिळल!'

येगोर झारखोव त्या 'कंपनीत' सर्वात स्वच्छंदी, रंगेल माणूस होता त्याला कुणाबद्दलच आदरभाव नव्हता. शरम तर त्याहूनही नव्हती. डोळे मारीत आणि सूचक हास्य करीत तो मधेच सांगू लागला,

'अरे मामला अगदी उघडाय. तुझा बाप काही सुनेला सोडत नाय. तो मस्त माजाला आलेला कुत्रा आहे. एक गोष्ट सांगतो.' श्रोत्यांकडे आपली चमकती, धावती नजर टाकून तो सांगू लागला,

'असाच एक म्हातारा होता! आपल्या सुनेच्या मागं लागला होता! तिला उसंत म्हणून घेऊ द्यायचा नाय! पण त्याचं पोरगं नेहमी मधे कडमडायचं! तेव्हा म्हाताऱ्यानं काय केलंसेल? रात्री तो आवाडात गेला न् फाटक उघडलं! सगळी गुरं बाहेर पडली! तेव्हा पोराला कसा म्हणतो, 'काय रे आळशा, काय केलंस हे? फाटक का नाय लावून घेतलंस? बघ सगळी गुरं बाहेर निघून गेलीत. जा त्याना हाकारून आण माघारी.' लक्षात आलं का? म्हणजे ह्याचा बेत असा की पोरगा गेला की सुनेला धरायला वेळ मिळंल! पण पोरगं आळशी! ते

बायकोच्या कानात कुजबुजलं, 'जा घेऊन ये गुरं माघारी !' तशी ही गली. हा तिथं झोपलेला ! बाप चुल्हाण्यावरून खाली उतरला न् हातापायावर रांगत बिछान्याकडे आला. पण पोरगं काय दुश्खुळं नव्हतं ! फळीवरचं लाटणं हातात घेऊन तो वाट बघत बसला. बाप रांगत अंथरुणात आला न् त्याच्यावर त्यानं हात टाकल्याबरोबर पोरानं त्याच्या टकलात ऐसा तडाखा दिला अन् ओरडला, 'चल हट् ! खबरदार. माझं पांघरुण चचळायला आलास तर ! मढं उचललं तुझं.'

'त्याचं काय होतं की, त्या घरात एक वासरू होतं ! त्याला वाटेल ते चघळायची खोड होती ! तेव्हा आपण जसं काही वासरालाच म्हणतोय असं पोरानं ढोंग केलं ! म्हातारा कसाबसा रांगत चुल्हाण्याकडे गेला न् बदकाचश्या अड्याएवढं टेंगूळ कुरवाळीत आडवा झाला ! शेवटी कसा म्हणतो, 'इवान, आत्ता कुणाला रे हाणलंस ?' 'कुणाला नाय, वासराला' इवान उत्तर देतो. 'असला कसला रे तू मालक ? गुराना असं बडवलंस तर कसं व्हायचं ?' म्हातारा रडकुंडीला येऊन म्हणतो !'

'तू साल्या जाम थापाड्या आहेस !'

'अरे काय आहे रे हे ? काय मंडई आहे ? चला निघा इथून !' त्यांच्याकडे येत सार्जंट-मेजर ओरड, खिदळत मस्करी करीत कझाक आपल्या घोड्यांकडे जात.

चहापाणी झाल्यावर ते कवायतीला जात. कझाकांच्या अंगातील घर्वास सुस्ती अंमलदार उतरवीत.

'ढेरी आत घे ए डुकरीच्या !'

'एक कतार फैल जाव ! आगे बढो !'

'ठैरो !'

'एक-दो-एक-दो-'

'ए, डावीकडच्या ! कसा उभायस ? तुझ्या आयला-!' कवायतीच्या वेळी अंमलदार आवाडाच्या कडेला धूम्रपान करीत. आणि कझाकाना कसे मागेपुढे धावडवले जात्येय ते बघत उभे असत. लेफ्टनंटने कझाकाना दिलेल्या हुकूमात ते मधून मधून आपल्या हुकूमांची भर घालीत.

देखणे करडे फर्गोल आणि चुस्त गणवेश घातलेले चमकदार आणि झकपक अंमलदार पाहून ग्रिगरीला वाटे की त्यांच्यात आणि आपल्यात एक दुर्लंघ्य भिंत खडी आहे. चिखल, उवा किंवा सार्जंट-मेजरचे ठोसे ह्या कझाकाना वाटणाऱ्या भयभीतीचा जाच नसलेले त्यांचे जीवन अगदीच वेगळे होते. त्या आरामशीर, सुविहित जीवनाचा ओघ शांतपणे वहात होता.

रादझिविलोवाला त्यांचे आगमन झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी घडलेल्या प्रसंगाचा ग्रिगरीच्या मनावर आणि वस्तुतः सर्वच तरुण कझाकांच्या मनावर– विदारक ठसा उमटून गेला.

प्रोखोर झीकोव हा एक स्निग्ध डोळ्यांचा पोरगा होता. दूरवरच्या कझाक खेड्याचे स्वप्न नेहमी त्या डोळ्यांपुढे तरळत असे. रिसाल्याची कवायत चालू असताना त्याना धडे देण्यात येत होते. प्रोखोर झीकोव ज्यावर बसला होता तो घोडा म्हणजे तेज, अचपळ जनावर होते. सार्जंट मेजरच्या घोड्याजवळून चालला असता. ह्या जनावराने त्याच्या घोड्याला दुगाणी मारली. प्रहार काही विशेष जोराचा नव्हता. त्या घोड्याच्या डाव्या तंगडीच्या कातडीला तो फक्त घसटूनच गेला इतकेच, पण सार्जंट मेजरने प्रोखोरच्या तोंडावर आपला चाबूक काडकन मारला आणि त्याच्या अंगावर घोडा घालीत तो किंचाळला.

'च्या मारी कुत्तरडीच्या ! कुठं चाललाय ते बघायला काय धाड भरली काय ? थांब तुला दाखवतो–! पुढचे तीन दिवस 'ड्यूटी' वर काढ आता !'

हा देखावा कमांडरच्या नजरेला पडला होता. पण त्याने तिकडे आपली पाठ फिरवली. आपल्या समशेरीच्या पडदाळ्याशी बोटानी चाळा करीत त्याने कंटाळून जांभई दिली. प्रोखोरचे ओठ थरथरू लागले. आपल्या सुजलेल्या गालावरील रक्ताचा ओघळ त्याने चोळला.

आपला घोडा कतारीत घेताना ग्रिगरीने अंमलदाराकडे दृष्टिक्षेप टाकला पण जणू काहीच गैर घडलेले नाही अशा प्रकारे त्यांच्या गप्पा चालू होत्या.

पाच दिवसानंतर ग्रिगरीच्या हातून एक बादली विहीरीत पडली. बहिरी-ससाण्यासारखा सार्जंट मेजर त्याच्या अंगावर धावून गेला. आणि त्याने गुद्दा उगारला.

'अंगाला हात लावू नको !' खालच्या चाळवलेल्या पाण्याकडे बघत ग्रिगरी गुरगुरला.

'काय ? खाली उत्तर न् काढ ती. रांडीच्या ! थोबाड फोडून टाकीन ह्या बद्दल !'

'काढतो मी ! पण अंगाला हात लावू नको !' आपले डोके वर न करता ग्रिगरी धीमेपणाने म्हणाला,

विहिरीजवळ कुणी दुसरे कझाक असते तर सार्जंटमेजरने ग्रिगरीवर निःसंशय हात टाकला असता, पण ते कुपाट्याजवळ आपल्या घोड्यांची सरबराई करीत होते आणि काय चाललंय ते त्यांच्या कानी पडले नाही. मागे कझाकांकडे दृष्टिक्षेप

करीत सार्जंट-मेजर ग्रिगरीच्या जवळ आला. त्याचे बटबटीत डोळे संतापाने पागल झाले होते, तो खेकसून म्हणाला,

'स्वतःला कोण समजतोस ? वरिष्ठाबरोबर असं बोलायची हिंमत करतोस ?'

'अंगाशी येईल सिम्योन येगोरोव !'

'मला धमकवायला बघतोस ? मी-!'

'हे बघ !' विहिरीतून डोके वर काढून ग्रिगरी म्हणाला, 'मला हात लावलास तर जीव घेईन तुझा !' समजलं ?'

सार्जंट-मेजरच्या कार्पमुखाने आ वासला, पण त्याने उत्तर दिले नाही. शिक्षा करण्याचा क्षण हुकला होता. ग्रिगरीच्या करड्या चेहऱ्यावर 'शकून' चांगला नव्हता. सार्जंट-मेजर दिङ्मूढ होऊन गेला. त्या विहिरीपासून तो निघून गेला. जाता जाता चिखलात घसरला. थोड्या अंतरावर गेल्यावर तो वळला आणि त्याने आपलीं प्रशस्त मूठ हलवली.

'स्क्वाड्रन कमांडरकडे तुझा 'रिपोर्ट' करतो !' तो ओरडला, 'हो हो ! रिपोर्ट करतो तुझा !'

पण कोणत्या तरी अगम्य कारणाने त्याने ग्रिगरीचा रिपोर्ट केला नाही. पण त्यानंतर दोन आठवडे तो त्याच्या नेहमी चुका काढायचा आणि पाळी नसूनही त्याला संत्रीची ड्यूटी द्यायचा. ग्रिगरीच्या डोळयाला तो कधी डोळा देत नसे.

त्या नीरस कंटाळवाण्या जीवनक्रमाने तरुण कझाकांचा हुरूप चोळामोळा झाला दिवस मावळेपर्यंत त्याना अखंड पायावर उभे ठेवण्यात येई. घोड्यांच्या कवायतीत राबवण्यात येई. संध्याकाळी घोड्यांची सरबराई करावी लागे.' त्याना दाणा, वैरण द्यावी लागे. हजेरी झाल्यानंतर आणि पहारेकरी नेमून झाल्यावर दहा वाजता त्याना प्रार्थनेसाठी गोळा केले जाई. समोर उभ्या असलेल्या रांगांवरून डोळे फिरवीत सार्जंटमेजर परमेश्वराची प्रार्थना हेल काढून म्हणे. सकाळी हेच रहाटगाडगे परत सुरू व्हायचे. वाटाण्यासारखे सगळे दिवस एकसारखे होते.

सबंध वाडीभर इन्यागिन्या दोन बायका होत्या. कारभाऱ्याची म्हातारी बायको आणि कारभाऱ्याची सुंदर तरुण मोलकरीण. ह्या पोलिश मुलीचे नाव होते फ्रानया. फ्रानया घरातून बबर्जीखान्याकडे सतत धावत असायची. तिथला ताबा एका म्हाताऱ्या बिनभुवयाच्या बबर्जीकडे होता. ही मुलगी आवाडातून इकडे तिकडे धावत असताना तिच्या करड्या झग्याची बारीकसारीक हालचाल

परेड मैदानावर कवायत करणारे सैनिक निरखून बघायचे, डोळे घालायचे. लांबच लांब सुस्कारे टाकायचे. कझाकांच्या आणि अंमलदारांच्या नजरा आपल्यावर खिळल्याचे जाणवून ही मुलगी शेकडो डोळ्यातून वाहणाऱ्या कामुकतेच्या ओढयात न्हाऊन निघत असे. बबर्जीखाना आणि घर ह्यांच्या दरम्यान इकडून तिकडे धावताना ती आपले नितंब उन्मादकपणे हालवायची आणि आळीपाळीने प्रत्येक सैनिकाकडे बघून– विशेषत: अंमलदाराकडे बघून हसायची. तिचं लक्ष वेधून घेण्यासाठी सगळयांचीच अहमहमिका लागली होती तरी अशी अफवा होती की फक्त स्क्वाड्रन कमांडरनेच तिचे लक्ष जिंकून घेतले होते.

वसंतऋतूच्या सुरुवातीला एक दिवस ग्रिगरीची घोडसाळेत 'ड्यूटी' होती. आपला बहुतेक वेळ त्याने एका टोकाशी काढला. कारण तिथे एका घोडीच्या उपस्थितीने अंमलदारांचे घोडे चेकाळले होते. स्क्वाड्रनकमांडरच्या घोडयाला त्याने नुकतीच चाबकाची चुणूक दाखवली होती आणि तो स्वत:च्या घोडयाचा परामर्श घेत होता. धन्याकडे वळून तिरपी नजर टाकीत घोडा मचामचा वैरण खात होता. त्याचा खरचटलेला मागचा सुंभ त्याने अधांतरी उचलून धरला होता. त्याचे बागदोर सारखे करीत असताना घोडसाळेच्या दूरच्या कोपऱ्यातून ग्रिगरीच्या कानावर झटापटीचा आवाज आणि दबलेली किंकाळी आली. ती अपरिचित गडबड ऐकून तो दचकला, घोडयांच्या अंगावरून तो झपाटयाने गेला. घोडसाळेचा दरवाजा कुणीतरी धाडकन आपटल्याने त्याच्या नजरेपुढे एकाएकी काळोखी आली. दबलेल्या आवाजातील हाक त्याच्या कानावर आली.

'जलदी ! जलदी, पोरानु !'

ग्रिगरीने चाल वाढवली आणि ओरडून विचारले,

'कोणाय ?'

दुसऱ्याच क्षणी दाराकडे चाचपडत येणाऱ्या सार्जंटच्या अंगावर तो आदळला.

'तू रे मेलीखोव ?' ग्रिगरीच्या खांद्यावर हात ठेवून सार्जंट कुजबुजला.

'थांब ! काय प्रकाराय ?'

सार्जंटच्या तोंडातून ओशाळलेले हसू फुटले. ग्रिगरीची बाही पकडून तो म्हणाला, 'आम्ही   अरे एऽऽ ! तू कुठं चाललास ?'

त्याचा हात झटकून टाकून ग्रिगरी धावत गेला आणि त्याने दार सताड उघडले. निर्मनुष्य आवाडात चिखलात पिसे लडबडलेली एक कोंबडी होती. दुसऱ्या दिवशी कारभाऱ्यासाठी आपला रस्सा करण्याचा बबर्जीचा डाव आहे ह्याची

तिळमात्र जाणीव नसलेली ती कोंबडी अंडे घालण्यासाठी जागेच्या शोधात पायाने शेण उकरीत होती.

प्रकाशाने क्षणभर ग्रिगरीला काही दिसेनासे झाले. डोळ्यांवर हाताचा आडोसा धरून तो वळला. घोडसाळेच्या कोपऱ्यातील गोंगाट वाढल्याचे त्याने ऐकले. आवाजाच्या दिशेने तो धावत गेला, तिथं त्याला तुमानीची बटणे लावीत असलेला झारखोव दिसला.

'काय चाललंय ? तिकडं तुम्ही सगळे काय करताय ?'

'जलदी !' झारखोव कुजबुजला. त्याच्या तोंडाची घाण ग्रिगरीच्या नाकात शिरली.

'बहोत मजा ! त्या फ्रानयाला त्यानी तिकडं खेचून आणल्येय ! झोपवल्येय खाली !' त्याचे ओशट हसू एकाएकी खंडित झाले. ग्रिगरीने त्याला असा तडाखा लगावला की घोडसाळच्या लकड भिंतीवर तो होलपाडत गेला.

त्या अंधाराला ग्रिगरीचे डोळे सरावले. गोंगाटाच्या दिशेने तो धावत जाताना त्या डोळ्यात भय होते. कोपऱ्यात ग्रिगरीला पहिल्या फौजेतील कझाकांचा घोळका दिसला. त्या गर्दीत रेटारेटी करीत तो पुढे गेला. जमिनीवर निश्चळ पडलेली फ्रानया त्याला दिसली. तिचे डोके चारजजाम्यात गुरफटलेले होते. तिचे कपडे फाटून गेले होते आणि स्तनाच्या वरती ते खेचून घेतलेले होते. काळोखात गोरेपान दिसणारे तिचे पाय भयंकर निर्लज्जपणे फाकलेले होते. एक कझाक तिच्च्या अंगावरून नुक्ताच उठला होता. भेकड हास्य करीत मागे सरकून तो दुसऱ्याला वाट करून देत होता. ग्रिगरी त्या गर्दीतून धक्काबुक्की करीत बाहेर आला आणि सार्जंट मेजरच्या नावाने हाका मारीत दरवाज्याकडे त्याने धाव घतली. पण बाकीचे कझाक त्याच्या मागोमाग धावले आणि दारात त्यानी त्याला पकडला. त्याच्या तोंडावर हात दाबून त्यानी त्याला मागे खेचला. एका माणसाचा फर्गोल त्याने शिवणीपासून गळपट्टीपर्यंत टरकावला. दुसऱ्याच्या पोटात लाथ घातली. पण इतरानी त्याला खाली पाडून दाबून धरले. फ्रानयाप्रमाणे त्याच्याही डोक्याभोवती त्यानी चारजजामा गुंडाळला. त्याचे हात पाठीमागे बांधून टाकले. आपले आवाज त्याने ओळखू नयेत म्हणून चकार शब्द न बोलता त्यानी त्याला रिकाम्या गव्हाणीत फेकून दिले. कुबट चारजजाम्यात गुदमरताना त्याने किंकाळण्याचे प्रयत्न केले. लाकडी तक्त्याला चवताळून लाथा हाणल्या. कोपऱ्यातील कुजबुज त्याला ऐकू येत होती. कझाक आत बाहेर करीत असताना दाराची कर-

करही ऐकू येत होती. त्यानंतर सुमारे वीस मिनिटानी त्याची सुटका करण्यात आली. सार्जन्ट मेजर आणि दुसऱ्या फौजेतील दोन कझाक दाराशी उभे होते.

'तू फक्त आपलं तोंड बंद ठेव ! त्याच्याकडे बघून डोळे मिचकावीत आणि त्याच्या खांद्यावरून पलिकडे बघत सार्जन्टमेजर त्याला म्हणाला,

'खबरदार बडबडलास तर ! कान कापून टाकू !' दुसऱ्या एका फौजेतील दुबोक हा कझाक हसून म्हणाला.

ते दोन कझाक आत गेले आणि फ्रानयाचे निश्चल गाठोडे त्यांनी उचलले. (तिचे पाय झग्याखाली ताठच्या ताठ तसेच फाकलेले होते) गव्हाणीवर चढून त्याने ते ढिल्या झालेल्या एका तक्त्याने पडलेल्या भोकातून ढकलून दिले. ही भिंत मळयाला लागून होती. प्रत्येक ठाणावर एक लहानसे किटून गेलेले साहने होते. फ्रानया आता काय करते ते बघण्यासाठी काही कझाक ठाण्याच्या तक्तावर चढले, तर काही धावत घोडसाळेच्या बाहेर गेले. ग्रिगरीलाही पाशवी उत्सुकतेने झपाटले. एका फलांडीला पकडून आणि स्वतःला साहन्यापर्यंत उंचावून त्याने खाली नजर टाकली. भिंतीखाली पडलेल्या मुलीकडे त्या घाणेरड्या सहान्यातून कित्येक डोळे रोखून बघत होते. ती उताणी पडली होती. कात्रीच्या पात्याप्रमाणे तिचे पाय मिटत आणि फाकत होते. तिची बोटे भिंतीजवळचा बर्फ खरवडत होती. ग्रिगरीला तिचा चेहरा दिसू शकला नाही. पण सहान्याशी असलेल्या इतर कझाकांचा दबलेल्या श्वासोश्वासांचा आणि त्यांच्या पावलाखाली होणारा वैरणीचा मृदु सुखद आवाज त्याला ऐकू येत होता.

बराच वेळ ती तेथे पडली होती. अखेरीस ती धडपडत हातागुडघ्यावर ओणवी झाली. तिचे बाहू तिचा भार सहन करू शकत नव्हते. ते थरथर कापत होते. झोकांड्या खात ती कशीबशी उभी राहिली. केस विस्कटून गेलेल्या, चमत्कारिक दिसणाऱ्या त्या मुलीने शत्रुत्वाने त्या सहान्यांच्या दिशेने संथ, एकटक नजर फिरवली. नंतर एका हाताने पंगूळवेलींचे निकुंज पकडून दुसऱ्या हाताने भिंतीला चाचपडत ती झोकांड्या खात निघून गेली.

तक्त्यावरून ग्रिगरीने खाली उडी मारली. आपला जीव गुदमरणार अशा भावनेने त्याने गळा चोळला. दारापाशी कुणीतरी सुस्पष्ट आणि निःसंदिग्ध सुरात त्याला बजावले,

'चकार शब्द तर काढ–! ख्रिस्ताची आण खाऊन तुझा जीव घेतला नाय तर सांग !'

कोण हे म्हणाले ते नंतर त्याला आठवेना.

परेड मैदानावर फौजेच्या कमांडरच्या लक्षात आले की ग्रिगरीच्या फर्गो-लाचे बटण तुटलेले आहे. तेव्हा त्याने विचारले, ' कुणाशी कुस्ती खेळत होतास ? ही कसली फॅशन म्हणायची ?'

तुटलेल्या बटणाच्या जागी पडलेल्या गोल छिद्राकडे ग्रिगरीने नजर टाकली. त्या सर्व आठवणींनी त्याच्या भावना उचंबळून आल्या आणि कित्येक वर्षानंतर त्याला असे वाटले की मनसोक्त रडावे !

३.

माळरानावर प्रखर उन्ह रणरणत होते. निवसलेल्या माजलेल्या गव्हावर पिवळा धुरोळा तरंगतो आहे असे वाटत होते. हात लावला तर चटका बसेल असे कापणीयंत्राचे पत्रे तापले होते. तर नजर वर करून बघवत नव्हते. प्रज्वळीत निळसर अस्मानाचा घमट धगधगून तापला होता. गहू संपला होता तिथून क्लोवरचे केशरी गचपान सुरू झाले होते.

रायची कापणी करण्यासाठी अवड गावठाण माळरानात लोटले होते. उकाड्याने आणि जळजळीत धुळीने घोडे घाबरे होत होते. कापणीयंत्रे ओढताना ते बिथरल्यासारखे झाले होते. नदीकडून पुन्हा पुन्हा येणाऱ्या वाऱ्याच्या झोता-बरोबर माळरानावर धुळीची किनारपट्टी उसळत होती. आणि रखरखीत सूर्य त्यात लपेटला जात होता.

कापणीयंत्राच्या चबुऱ्यावरून गहू खुरपणाऱ्या पित्रोने उजाडल्यापासून वादलीभर पाणी पोटात रिचवले होते. ती कोमट बेचव ' द्रव ' प्याल्यानंतर थोड्याच मिनिटात त्याचा घसा पुन्हा कोरडा पडत होता. चेहऱ्यापासून वाहणाऱ्या घामाच्या ओघळांनी त्याचा सदरा भिजून गेला होता. त्याच्या कानात अखंड सराटे घुमत होते. दाऱ्या धान्याचे बुचेडे बांधीत होती. डोक्यावर आणि तोंडावर तिने रुमाल बांधला होता. तिच्या सदऱ्याची बटणे सुटली होती. तिच्या सावळ्या स्तनांमधून घामाचे मोठाले मातकट थेंब ओघळत होते. नतालिया घोडे हांकीत होती. तिच्या तापलेल्या गालाना बीटमुळांचा रंग चढला होता. तिचे डोळे पाणावत होते. पांतेलेय धान्याच्या कवेळातून पुढेमागे करीत होता. त्याचा

भिजलेला सदरा त्याचे शरीर भाजत होता. वितळत्या वंगणाच्या ओघळासारखी त्याची दाढी छातीवर पाघळली होती.

'घाम फुटला का ?' जवळून गाडीत बसून जाणाऱ्या ख्रिस्तोनियाने ओरडून विचारले.

'पुरता ओलाचिंब झालोय !' घामाने डबडबलेले पोट सदऱ्याच्या टोकाने पुसत पांतेलेय दीड पायावर चालत म्हणाला.

'पित्रो !' दाऱ्याने हाळी दिली 'पुरे करू या !'

'थोडा वेळ थांब ! एवढा तास पुरा करू या !'

'उन्हं निवळेस्तो थांबू या ! माझा पिट्टा पडलाय !'

नतालियाने घोडे थांबवले. जणू काही तीच कापणीयंत्र ओढीत होती असे तिचे ऊर धपापत होते. कापलेल्या धान्यातून निगूतपणे वाट काढीत आपली काळेजली आणि फोडाळलेली पावले दाऱ्याने त्यांच्या दिशेला वळवली.

'प्येत्रुशका, तळं इथून फार दूर नाही ना रे ?'

'फार दूर नाय ! फक्त चार चाडेचार मैलाय '

'पोहायला काय मस्त वाटल !'

'तिथं चालत जाऊन परत येईपर्यंत म्हणजे !' नतालिया सुस्कारा टाकून बोलू लागली.

'चालत कशाला मरायला ? आपण घोडी सोडवू न् त्यावरून जाऊ.'

पेढ्या बांधीत असलेल्या बापाकडे पित्रोने संकोचून पाहिले आणि खांदे उडवले.

'ठीक ! सोडवा बायानु घोडी !

दाऱ्याने पाठबंद सोडवले आणि घोडीच्या पाठीवर चापल्याने उडी घेतली- भेगाळलेले ओठ स्मिताने विलग करीत नतालियाने आपला घोडा कापणीयंत्रार पर्यंत नला आणि पंख्यातून ती घोड्यावर चढण्याचा प्रयत्न करू लागली. पित्रो तिच्या मदतीला गेला. 'पाय दे इकडं !' असे म्हणून तिचा पाय त्याने घोड्यावर चढवला. दोघींनी घोडे पिटाळले. कझाकी ढंगाने घोड्यावर मांड आवळलेली दाऱ्या पुढे दौडत होती. तिचा झगा गुडघ्याच्या वर गोळा झाला होता. डोक्याचा रूमाल डोक्यामागे सरकला होता.

'जपून ! अंग चोळवटेल !' तिच्या मागोमाग घोडा फेकणाऱ्या पित्रोला ओरडल्याखेरीज राहवले नाही.

'काही काळजी करू नको !' दाऱ्याने बेफिकिरीने ओरडून उत्तर दिले.

बावराची हद्द ओलांडून गेल्यावर पित्रोनं डावीकडे नजर टाकली. खेड्यातून आलेल्या दूरवरच्या हमसडकेवरून झपाट्याने उठत येणारा धुळीचा लहानसा ढग त्याच्या दृष्टीस पडला.

'वरून कुणीतरी दौडत येतंय !' डोळे किलकिले करून तो नतालियाला म्हणाला.

'अन् मोठ्या झपाट्यानं येतंय ! ती धूळ बघ केवढी उडाल्येय!' नतालिया चकित होऊन उत्तरादाखल म्हणाली.

'च्या मारी ! असावं तरी कोण ? दाशका[1] !' पित्रोने पुढे दौडणाऱ्या वायकोला हाकारले, 'लगाम खेच मिनिटभर ! कोण स्वार आहे बघू या !'

धुळीचा ढग खालच्या घळीत राईएवढा होऊन विरून गेला. नंतर परत वर उसळला. धुळीतून आता स्वाराची आकृती दिसू लागली होती. पांच मिनिटानंतर तो जास्त स्पष्टपणे दिसू लागला. आपल्या गवती टोपीच्या काठावर गलिच्छ तळव्याचा आडोसा धरून पित्रो न्याहाळीत बसला होता.

'असली दौड कोणत्याही घोड्याला पेलणारी नाय. जीव घेईल तो जनावराचा !' कपाळाला आठ्या घालून त्याने हात बाजूला केला. भ्रूमध्यावर उमटलेल्या आठ्यांची खूण मागे ठेवून त्याच्या चेहऱ्यावरून क्षुब्ध भाव तरळून गेले.

आता तो घोडेस्वार सुस्पष्टपणे दिसू लागला होता. चारगाम दौडीने तो घोडा पिटाळीत होता. डाव्या हातात त्याने आपली टोपी धरली होती आणि उजव्या हातात एक धुळकट लाल बावटा फडफडत होता. पाऊल वाटेने तो त्यांच्या इतक्या जवळून दौडत गेला की त्या घोड्याचा धपापता श्वासोश्छ्वास पित्रोच्या कानावर पडला. वाटेतून बाजूला सरकलेल्या पित्रोकडे पाहून तो माणूस आपला फत्तरी जबडा वासून ओरडला,

'हुश्शार !'

पिवळट साबणी फेसाचा एक पुंजका त्या घोड्याच्या तोंडातून उडत एका खूर-निशाणीत पडला. दौडत जाणाऱ्या घोडेस्वारावर पित्रोचे नेत्र खिळून राहिले. त्या घोड्याचे खणखणीत खिंकाळणे आणि दृष्टिआड होत जाणाऱ्या आकृतीकडे टक लावून बघताना दिसलेला त्या घोड्याचा थबथबलेला आणि पोलादासारखा चकाकता चौक ह्यांचा ठसा त्याच्या स्मृतीवर उमटून राहिला.

टीप : १) दाऱ्याचे प्रेमळ संबोधन.

त्यांच्यावर कोसळलेल्या अरिष्टाचे स्वरूप पित्रोला अद्याप जाणवले नव्हते. त्याने धुळीत उडणाऱ्या फेसाकडे मठ्ठासारखी टक लावून बघितले आणि मागे पडत जाणाऱ्या माळरानावरुन दृष्टी फिरवली. कवेळांचे पिवळे पट्टे तुडवीत कझाक चौबाजूने गावठाणाकडे दौडत होते. माळरानाच्या पलीकडे पार दूरवरच्या पठारावर घोडेस्वारांचा इशारा देणारा धुळीचा लहानसा ढग दिसत होता. गावठाणाकडे जाणाऱ्या रस्त्यावर लांबचलांब अंतरापर्यंत धूळ लोटांची निशाणी उमटत गेली होती. जंग–चाकरीच्या यादीत ज्यांची नावे होती त्या कझाकानी हातातले काम सोडले. धूर खिळेतून घोडी बाहेर काढली आणि गावठाणाकडे ते चौखूर दौडत गेले. ख्रिस्तोनियाने आपला हुजुरातीचा लढाऊ घोडा रेकल्यातून सोडवला आणि खांद्यावरून मागे बघत उडाण चालीने तो त्याने फेकला.

'कायाय ?' अर्धविव्हळ आवाजात आणि भयभीत नजरेने पित्रोकडे बघत नतालियाने विचारले. तिच्या नजरेने–सापळ्यात अडकलेल्या सशाच्या नजरेने–पित्रो दचकून कार्यप्रवृत्त झाला. घोडा फेकीत तो कापणीयंत्रापाशी गेला. घोडा थांबे थांबेतो त्याने खाली उडी झोकली. काम करताना फेकून दिलेल्या आपल्या तुमानीत त्वरेने पाय खुपसले. घोड्यावर मांड घेतली. त्या रणरणलेल्या माळरानावर आधीच जे धुळीचे लोट उठले होते त्यात आणखी एका धुळी–ढगाची भर घालीत बापाकडे बघून हात हालवीत तो वायुवेगाने चौखूर उधळला !

४.

चौकात दाट करड्या रंगाचा गलोल उसळलेला त्याला आढळला. अनेकानी आपले लष्करी गणवेश आणि सरंजाम अंगावर चढवलेही होते. गावडी बदकाने कोंबड्यात उंच कादंब उठून दिसावेत तशा आतामान रेजिमेन्टच्या सैनिकाच्या निळ्या फौजी टोप्या इतरांपेक्षा बोटभर उंचावल्या होत्या.

खेड्यातील गुत्ता बंद झाला होता. लष्करीपोलीस अंमलदारांचे चेहरे खिन्न आणि काळजीने ओढल्यासारखे दिसत होते. सणासुदीचे कपडे घातलेल्या बायकांची पहळ रस्त्यावर कुपाटीजवळ उभी होती. प्रत्येकाच्या ओठावर एकच शब्द होता 'लष्कर भरती !' तर्र आणि क्षुब्ध मुद्रा ! सर्वसाधारणपणे वाटणारी

अबरगत घोड्यांपर्यंतही जाऊन पोहोचली होती. ते रागाने खूर हाणीत होते, मुसंड्या मारीत होते, खिकाळत होते. रिकाम्या बाटल्यांचा आणि सवंग चॉकलेटाच्या वेष्टणाचा चौकात खच पडला होता. हवेत धुरळ्याचा ढग खालपर्यंत तरंगत होता.

जीन कंठाळी चढवलेला आपला घोडा पित्रोने ओठाळीला धरून चालवला होता. गिरजाघराच्या कुपाटीजवळच आतामान रेजिमेन्टमधील रापलेल्या रंगाचा एक प्रशस्त कझाक आपल्या तुमानीला बटणं लावीत उभा होता. त्याच्या वासलेल्या हास्यवदनातून त्याचे शुभ्र दात दिसत होते. त्याची बायको किंवा प्रेमपात्र असलेली एक दणकट ठेंगणी बाई त्याला लाखोली वाहत होती.

'त्या सटवीबरोबर जातोस ? तुला चांगली भोसडते मेल्या !'

ती दारू पिऊन धुंद झालेली होती. तिच्या विस्कटलेल्या केसात सूर्यफुलाच्या बियांची टरफले विखुरलेली होती. तिचा डोईस बांधायचा फुलाफुलांचा रुमाल ढिला होऊन लोंबत होता. हुजुरातीच्या त्या सैनिकाने आपला पट्टा आवळला आणि रुंद हास्य करीत तो उकिडवा बसला. त्याच्या तुमानीच्या प्रशस्त दरियाखालून एक वर्षाचे वासरू सहज जावे एवढी रिकामी जागा होती

'माशका बाजूला हो !'

'मेल्या निलाजऱ्या जनावरा ! शिदळीच्या !'

'अग पण का ?'

'तुझ्या नजरेला काही शरम !'

त्याच्या जवळच लाल दाढीचा एक सार्जन्टमेजर एका बांधानी सैनिकाशी वाद घालीत होता.

'काहीही व्हायचं नाय !' तो त्याला आश्वासन देत होता. 'थोडे दिवस आपली लष्करभरती होईल आणि मग परत घरी येऊ !'

'पण समजा युद्ध झालं तर ?'

'हुडुत मित्रा ! आपल्याबरोबर उभा राहील असा कोणता देशाय ?'

शेजारच्या घोळक्यात असंबद्ध वडबड चालू होती. एक रुबाबदार प्रौढ कझाक तावातावाने आपले म्हणणे मांडीत होता, 'ह्याचा आपला काही संबंध नाय ! त्याना लढू द्या एकमेकांशी ! आपली अजून धान्याची कापणी व्हायच्येय!'

'ही बलाच आल्येय !'

'शरमेची गोष्टाय ! इथं आपण असे उभे राहिलोत ! आजच्यासारख्या दिवशी वर्षभर पुरेल एवढी कापणी केली असती !'

'गुरं कवेळचात घुसायची !'

'आत्तां कुठं बार्लींची कापणी सुरु झाली होती !'

'ऑस्ट्रियन झारचा खून पडला म्हणे !'

'त्याचा नाय ! त्याच्या वारसाचा !'

'काय गाववाले, कुठलं रेजिमेंट ?'

'काय गड्या ? चांगला गब्बर झालायस ?'

'अरे स्तेशका तू इकडं कुठं ?'

'पण आतामान म्हणतो की जरुर लागलीच तर असावेत म्हणून आपल्याला बोलावणं आलंय !'

'आपण ह्यात आता पुरते गुंतलो पोरानु !'

'आणखी वर्षं गेलं की राखिवाच्या तिसऱ्या यादीतून आपली सुटका होणार !'

'तुझी तिथं काय गरज पडल्येय आजोबा ?'

'फिकीर करू नको ! एकदा सैन्याची कत्तल सुरू झाली की म्हातारे पण लागतील त्यांना.'

'गुत्ता बंदाय !'

'मार फुतकाकडं जाऊ या का ? ती एक पिंप विकेल आपल्याला.'

तपासणी सुरू झाली. तीन कझाक एका चौथ्या कझाकाला सरकारी कचेरीत घेऊन आले. ह्याच्या अंगावर रक्ताचे डाग पडले होते. तो पुरता धुंद झालेला होता. त्याने गर्दन मागे फेकली. सदरा टरटरा फाडून छाती उघडी केली. आपले कालमिक डोळे गरगरा फिरवीत तो गरजला, 'साल्या नांगरमुठ्याना दाखवतो ! त्याचं रगत पितो ! डॉनचा कझाक म्हणजे काय ते कळेल त्याना !'

त्याच्या भोवती जमलेल्या कोंडाळ्याने शाबासकीचे हास्य केले.

'हाणा साल्याना !'

'ह्याला का धरलाय ?'

'नांगरमुठ्याना ह्यानं हाणलं !'

'त्याची तीच लायकी !'

'आणखी हाणू भडव्याना !'

'पाच साली त्याच्या नाकात वेसणी घातल्या तेव्हा मी त्यात होतो ना ? पाहायला हवी होती गंमत !'

'युद्ध होणार ! त्यांच्या नाकात वेसणी घालायला आपल्याला पुन्हा पाठवणार !'

'बस्स झालं ! भाड्यानं आणा म्हणावं माणसं ! नायतर पोलीसाना सांगा ते करायला. आपण हे करायचं म्हणजे शरमेची गोष्टाय !'

मोखीवच्या दुकानात थाप गर्दी उसळली होती. गर्दीच्या मधोमध उभा असलेला, झिंगलेला इवान तोमिलीन मालकाशी हुज्जत घालत होता. मोखोव त्याला चुचकारण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचे भागीदार आतियोपिन दरवाज्याकडे धावले होते.

'हा काय प्रकार आहे सगळा ?' त्यानी खडसावले,

'स्वच्छ सांगायचं म्हणजे हा अत्याचार आहे ! ए पोरा, पळ ! आतामानला वर्दी दे !'

आपले घामेजलेले हाताचे तळवे तुमानीवर चोळीत तोमिलीन चिडलेल्या मोखोवच्या अंगावर चाल करून गेला.

'आम्हाला पिळून काढलंस ! तुझ्या व्याजानं पिळून–पिळून काढलंस. डुकरा ! आणि आता बोबडी वळली काय ? थोबाड फोडून टाकीन ! कझाकाचे हक्क लाटतोस होय रे माजलेल्या पोळा !'

आपल्या भोवती गर्दी केलेल्या कझाकांच्या भल्यासाठी खेड्याचा आतामान गडबडीने गोड गोड शब्दाची खैरात करीत होता.

'युद्ध ? छे छे ! युद्धबिद्ध काहीही होणार नाय ! हूजुरानी–लष्करी पोलीसप्रमुखानी म्हटलंय की लष्कर भरती म्हणजे फक्त एक कवायताय. घाबरून जायचं मुळीच कारण नाय.'

'झकास ! घरी आलो की परत शेतीच्या कामाला लागू !'

'काम खोळंबतंय !'

'अधिकारी, कसला विचार करताहेत ? मला दोनशे सत्तर एकराची कापणी करायचीय !'

'तिमोशका ! आमच्या घरच्या लोकाना म्हणावं आम्ही उद्या घरी येतो !'

'नोटीस लागलेली दिसत्येय ! चला बघू या काय आहे ती.'

उशीर रात्रीपर्यंत चौक गजबजलेला होता. खळबळून गेलेल्या जमावांचा गोंगाट चालू होता.

चारेक दिवसानंतर लष्करी गाड्याच्या लाल डब्यांतून कझाक रेजिमेंट आणि तोफखान्याची रवानगी रूसी–ऑस्ट्रियन आघाडीवर करण्यात आली.

'युद्ध . !'

ठाण्यांवरून घोडयांची खिंकाळणी आणि लीदीचे भपकारे येत होते.

आगगाडीच्या डब्यातून तीच बोलणी ! गाणी बहुधा ही अशी,

डॉनचा नद जागा आहे
आणि उसळचा घेत आहे
शांत इसाई डॉनचा आहे
हाकेला ओ देत आहे
राजाची ही हाक आहे
डॉन तिकडे जात आहे !

स्टेशनावरून चौकस, कनवाळू नजरा कझाकांना न्याहाळीत होत्या. कझाकांच्या तुमानीवरील पट्टे, आतापर्यंत शेतात केलेल्या काबाडकष्टाने अजून रापून राहिलेले त्यांचे चेहरे इकडे लोक कुतुहलाने बघत होते.

'युद्ध....!'

वर्तमानपत्रातून आक्रोशाचे आउर लोटले होते. स्टेशनावर बायका आपले हातरुमाल हालवीत होत्या; सिगरेटी आणि चॉकलेटे फेकीत होत्या. फक्त एकदाच असें घडले की वोरोनेजला पोहोचण्याच्या आधी थोडाच वेळ अर्धवट झिंगलेल्या एका म्हाताऱ्या रेल्वे कामगाराने, पित्रो मेलिखोव इतर एकोणतीस कझाकांबरोबर दाटीवाटीने बसला होता त्या डब्यात तोंड घालून विचारले,

'तुम्ही चाललायत ?'

'आजोबा, बैस आमच्याबरोबर !' एका कझाकाने सर्वांच्या वाटचे उत्तर दिले.

'अरे लेका.... कत्तलखान्याकडं गुरं चाललीत !' म्हाताऱ्याने प्रत्युत्तर दिले आणि तुच्छतेने मान उडवली.

५.

चौदा सालच्या जून महिन्याच्या चौथ्या आठवड्यात 'डिव्हिजनल स्टाफ' ने कारवायात भाग घेण्यासाठी ग्रिगरी मेलिखोवच्या रेजिमेन्टची बदली रोवनो गावाला केली. जवळच पायदलाच्या दोन डिव्हिजन्स आणि रिसाल्याची पथके ठेवलेली होती. चौथ्या स्क्वाड्रनचा मुक्काम व्लादिस्लावका खेड्यात होता. पंधर

वड्यानंतर ग्रिगरी आणि चौथ्या स्क्वाड्रनचे इतर कझाक आपल्या तंबूत पहुडले होते. सतत चाललेल्या कारवायानी ते थकून गेले होते. एवढ्यात स्क्वाड्रन कमांडर जुनिअर कॅप्टन पोलकोवनिकोव रेजिमेन्ट स्टाफकडून भरधाव घोडा फेकीत तेथे येऊन थडकला.

आपल्याला परत चालाणापालाणा करायला लागणार मला वाटतं !' प्रोखोर झीकोवने मोघम अंदाज केला आणि बिगुलाच्या आवाजाची वाट बघत तो गप्प झाला.

ट्रूप सार्जंट आपली तुमान शिवीत बसला होता. टोपीच्या अस्तरात सुई खुपसून तो म्हणाला,

'तसाच रंग दिसतोय ! मिनिटाचा विसावा घेऊ द्यायचे नाहीत साले !'

'ब्रिगेड कमांडर आपल्याला भेटायला येणार असल्याचं सार्जंट मेजर सांगत होता !'

त्यानंतर एक दोन मिनिटातच बिगुलाचा भयसूचक इशारा झाला. कझाक ताडकन उभे झाले.

'माझी चंची कुठं टाकली मी ?' सैरावैरा शोधीत प्रोखोर उद्गारला.

'बूट आणि जीन !'

'खड्ड्यात गेली तुझी चंची !' बाहेर धावत जात ग्रिगरी ओरडला.

सार्जंट मेजर धावत आवाडात आला. समशेरीचा परज पकडून तो थेट तयारीच्या मेखांकडे धावला. अगदी नेमल्या वेळेत त्यानी घोड्यावर जीनकंठाळी घातली. ग्रिगरी मेखा उपसून काढीत असताना तो सार्जंट त्याच्यापाशी पुटपुटला,

'पोरा, ह्या खेपेला युद्ध !'

'चेष्टा करतोयस !'

'शप्पत ! सार्जंट मेजरनं मला सांगितलं.'

त्यानी तंबू उतरवले.

रस्त्यावर स्क्वाड्रन शिस्तवार उभी राहिली. अस्वस्थ झालेल्या घोड्यावर मांड घेतलेला कमांडर आघाडीला इकडे तिकडे फिरत होता.

'प्लतून कतार !' त्याचा हुकूम शेवटपर्यंत पोचता झाला.

घोडे खेडे सोडून दुडाणचालीने जात असताना हमसडकेवरून त्यांचे नाल खडखडत होते. शेजारील खेड्यातून स्टेशनाकडे दौडत चाललेली पहिली आणि पाचवी स्क्वाड्रन दिसत होती.

ऑस्ट्रियन आघाडीपासून सुमारे बावीस-तेवीस मैलावर असणाऱ्या स्टेशनावर एक दिवसानंतर रेजिमेंट गाडीतून खाली उतरवण्यात आले. स्टेशनातील बर्च वृक्षामागून पहाट फुटत होती. प्रभातकाळचे वायुमान प्रसन्न असेल ह्याची साक्ष पटत होती. रुळावर एंजिन फुसफुसत होते. दहिंवराच्या रोंगणाने रूळ चकाकत होते. डब्यांना टेकवलेल्या उतार फळ्यावरून घोडी फुरफुरत उतरत होती. पाण्याच्या पंपामागे हजेरीचे पुकार येत होते. खर्जाच्या सुरात हुकूम सुटत होते. चौथ्या स्क्वाड्रनच्या कझाकांनी घोड्याच्या ओठाळ्या पकडून त्याना डब्यातून खाली उतरवले फाट्यावरून जाताना त्यानी घोड्यावर मांड घातली आणि रांगा धरून ते बाहेर पडले. खरत चाललेल्या नाफरमानी अंधारातून येणारे त्यांचे आवाज भेसूर वाटत होते. अंधारातून चेहरे आणि घोड्याच्या रेषाकृती अस्पष्टपणे उमटत होत्या.

'कोणतं स्क्वाड्रन ?'

'अन् तू कोण ? कुठून उपटलास ?'

'दाखवतो भडव्या मी कोणाय ते ! अंमलदाराशी बोलायच्ची ही हिंमऽऽत !'

'माफ करा हुजूर ! आपल्याला ओळखलं नाय !'

'हाकल पुढं ! हाकल... पुढं !'

'चेंगटपणा काय चालवलाय-? हला पुढं चला !'

'सार्जंट मेजर, तुझं तिसरं प्लटून कुठाय ?'

'स्क्वाड्रन, पिछाडी ! आगे बढो. जलदी !'

सवार पहाऱ्यातून कुजबुज सुरू झाली.

'पिछाडी आगे बढो म्हणे ! मढं नेलं त्याचं, दोन रात्री झोपा नायत् !'

'घोडा धर तुझा !'

'पेशबंदात चोळवटलाय सैतान !'

'माझ्या जनावराचा पुढचा नाल पडलाय !'

जरा पुढे गेल्यावर चौथं स्क्वाड्रन थोपले गेले. त्यांच्या आधी गाडीतून उतरलेल्या पहिल्या स्क्वाड्रनने वाट अडवली होती. पुढे असणाऱ्या घोडेस्वारांच्या आकृती निळसर कबऱ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर रव्याच्या शाईने रेखाटल्या-सारख्या स्पष्ट दिसत होत्या. बोडक्या सूर्यफुलाच्या ताटांसारखे त्यांचे भाले हेलकावत होते. मधूनच रिकिबी खणखणत होत्या. जिने कुरकुरत होती.

'अरे ए भाऊ, कुठं निघाला ?'

'धरममातेकडं बारसं करून घ्यायला !'

'हा : हा : हा : !'

'चूप ! काय बडबड चालल्येय ?'

खोगिराच्या मुठीवर पंजा आवळून प्रोखोर झीकोव ग्रिगरीच्या तोंडाकडे रोखून बघत होता. तो कुजबुजला,

'मेलीखोव, तुला भय वाटत नाय ?'

'भिण्यासारखं कायाय ?'

'आज कदाचित आपला जंग सुरू होईल !'

'बरं मग ?'

'पण मला भय वाटतं !' प्रोखोरने कबुली दिली. दवाने ओल्या झालेल्या लगामाशी त्याची बोटे घाबरटपणे चाळा करीत होती. 'रात्रभर माझा डोळचाला डोळा लागला नाय !'

स्क्वाड्रनचे आगेकूच परत सुरू झाले. लयबद्ध चालीवर घोडी पुढे सरकत होती. भाले ठेक्यात आंदुळत पुढे चालले होते. लगाम सोडून देऊन ग्रिगरी पेंगू लागला. त्याला असे वाटत होते की, लचकत पुढे पाय टाकून जिनावर आपल्याला जोजवणारे आहेत ते घोडे नव्हत, तर आपण स्वतःच एका उबदार गर्द रस्त्यावरून चाललो आहोत. असाधारण सहजतेने आणि अनिवार्य आनंदाने चालली आहोत. त्याच्या बाजूने प्रोखेरची वटवट चालू होती. पण जिनाची करकर, नालांचा खडखडात ह्यात त्याचा आवाज मिसळून गेला होता. त्याच्या निर्विकार झोपेत त्याचा व्यत्यय येत नव्हता.

स्क्वाड्रन एका गल्लीत वळले. नीरवता त्यांच्या कानात घुमत होती. वाटथडीवर निवसलेले ओटस् लोंबले होते. त्यांची कणसे दवधूसर झाली होती. खाली झुकलेल्या त्यांच्या कणसाला घोडी तोंडे भिडवू बघत होतो आणि त्यासाठी स्वाराच्या हातून लगाम हिसकावू बघत होती. ग्रिगरीच्या फुगीर पापण्यांखाली दिवसाचा राजस प्रकाश रांगत आला. त्याने मान वर केली आणि कुरकुरणाऱ्या गाडीच्या चाकासारखा प्रोखोरचा भुणभुणता आवाज त्याच्या कानावर पडला.

ओटशेताच्या पलिकडून आलेल्या दणदणीत घनगंभीर गर्जनेने तो ताडकन भानावर आला.

'आग्येल !' प्रोखोर जवळजवळ ओरडलाच. वासरासारख्या दिसणाऱ्या त्याच्या डोळचात भयाचे सावट आले होते. ग्रिगरीने मान वर केली. त्याच्यासमोर ट्रूपसार्जंटचा करडा फर्गोल घोडचाच्या पुटाबरोबर लय साधून वर उठत

खाली पडत होता. दुतर्फा निवसलेले शेतरान पसरले होते. तारेच्या खांबाएवढ्या उंचीवर आकाशात एक चंडोल पक्षी नाचत होता. सबंध स्क्वाड्रन जागे झाले. भडीमाराचा आवाज विजेच्या प्रवाहासारखा त्या पहाळीतून वहात गेला. सटकन तयार झालेल्या कॅप्टन पलकोव्‌निकोवने स्क्वाड्रनला तेज दौडीचा हुकूम सोडला. फाटयाच्या पलीकडे एक निर्मनुष्य गुत्ता होता. तेथे त्याना शरणार्थींच्या गाड्या भेटू लागल्या. तल्लख दिसणाऱ्या करावलांचे एक स्क्वाड्रन त्यांच्याजवळून गेले. त्यांचा कॅप्टन एका अस्सल तांबडबोर जनावरावर स्वार झाला होता. कझाकांकडे कुत्सितपणे बघून त्याने घोड्याला टाच मारली. एका रेंदाळ ङेऱ्यात फसलेल्या एका जबरजंग दमदम्याशी ते आले करावल घोड्याना पिटीत होते. गोलंदाज अराबीच्या चाकाशी झटापट करीत होते. देवीचे वण असलेला एक धिप्पाड बाधानी जवळून गेला. त्याच्या हातात फळ्यांचा गट्टा होता. गुत्याच्या कुपाटीतून त्यानं बहुधा त्या काढून घेतल्याचे दिसत होते.

थोडे पुढे गेल्यावर त्यानी पायदळ रेजिमेंटला गाठले. जवान झपाट्याने चालत होते. त्याच्या फर्गोलाच्या वळकट्या त्यानी पाठीला बांधल्या होत्या. त्यांच्या स्वच्छ घासलेल्या टमरेल भांड्यावरून आणि बागनटावरुन उन्हं चमकत होती. शेवटच्या कंपनीतील एका ठेंगण्या उत्साही शिपायाने ग्रिगरीकडे एक मातीचे ढेकूळ फेकले.

'झेल ! मार हे ऑस्ट्रियनना !'

'मस्करी करू नको ए तट्टा !' असे म्हणून ग्रिगरीने आपल्या चाबकाने हवेतल्या हवेतच ते ठेकूळ फोडले.

'आमचा नमस्कार कळवा त्याना, कझाकानो !'

'तुम्हाला मिळेल त्यांना भेटायला !'

पहाळीच्या आघाडीला कुणीतरी बीभत्स गाणे सुरु केले. लठठ् बायकी कुल्ले असणारा एक सैनिक पहाळीच्या बाजूने आपल्या थोटया पोटऱ्यावर थापट्या मारीत चालला होता. अंमलदार हसत होते. जवळ येणाऱ्या धोक्याच्या जळजळीत जाणिवेने त्याना जवानाच्या अधिक निकड आणले होते. त्याना जास्त सहिष्णू बनवले होते.

सुरवंटासारखी सरपटत जाणारी पायदळ रेजिमेंटस, बतारी, जिनसान्याच्या गाड्या, रेडक्रॉसच्या गाड्या ह्या पुढेह्या पहाळीला सतत भेटत गेल्या. जवळ येऊन ठेपलेल्या धुमरचक्रीचे विखारी श्वास हवेत तरंगू लागले होते.

थोडचा वेळानंतर चौथी स्क्वाड्रन एका खेडचात प्रवेश करीत होतो. एवढचात रेजिमेंटचा कमांडर लेफ्टनंट कर्नल कालेदिन आणि त्याचा दुय्यम अधिकारी ह्यांनी त्यांना गांठले. ते अंगावरून जाताना तो दुय्यम अधिकारी क्षुब्धपणे म्हणाल्याचे ग्रिगरीच्या कानावर आले ‘ वासिली माक्सिमीविच, आपल्या नकाशात हे खेडं दाखवलेलं नाही ! आपली अवस्था चमत्कारिक होणाराय !’

कर्नलने दिलेले उत्तर ग्रिगरीला ऐकू आले नाही.

त्याना मागे टाकीत अॅडजुटंट वेगाने दौडत गेला. त्याचा घोडा डाव्या दुगाणीवर जबर लंगडत होता. त्याचे सूक्ष्म बारकावे ग्रिगरीने यांत्रिकपणे टिपले.

उतरत्या शेताच्या खालच्या अंगाला दूरवर खेडचातील घराची छपरे दिसू लागली. आपल्या वेगात रेजिमेन्ट सतत बदल करीत होते. घोडी घामाने डबडबू लागली होती.

हलक्याशा उताराखाली लहानशा खेडयातील झोपडचा दूर अंतरावर दिसत होत्या. खेडयाच्या दुसऱ्या बाजूला रानझाडी होती. तेथील हिरवी वृक्षाग्रे आकाशाच्या निळचा घुमटात घुसली होती. रानझाडीपलीकडून तोफखान्याचा घुधा आणि त्यात मिसळलेला गोळीबाराचा दुरटा ऐकू येत होता.

प्रत्येक आवाज ग्रिगरी टवकारून ऐकत होता. त्याच्या ताणलेल्या नसा म्हणजे क्षुब्धतेची लहान लहान बोचकीच झाली होती.

‘ ग्रिगरी, हृया गोळीबाराचा आवाज म्हणजे पोरानी कठडचाशी काठी तुड-तुडत न्यावी असा वाटतो नाय ?’

‘ चूप बस्स वटवटचा ! ’

स्क्वाड्रनने खेडक्षात प्रवेश केला. आवाडातून जवानाची धूम उसळली होती घराघरातून गोंधळ उडून गेला होता. लोक घरे सोडून पळून चालले होते. त्या झोपडचांच्या रहिवाश्यांच्या चेहऱ्यावर घबराट आणि गोंधळ स्पष्टपणे दिसत होता. तेथून पळून जाण्यासाठी ते आपली चंबूगबाळी आवरीत होते. जाता-जाता ग्रिगरीच्या दृष्टीस पडले की, जवान मांगराच्या छपरावर गोळचा झाडीत होते. तिथला मालक उंच पिकल्या केसांचा बेलोरशियन होता. दुर्दैवाच्या तडाख्याने तो धुळीला मिळाला होता तरी त्या गोळीबाराकडे यत्किंचितही लक्ष न देता त्यांच्या अंगावरून तो निघून गेला. तांबडचा खोळी घातलेल्या उशा आणि मोडकळीला आलेले फर्निचर त्या माणसाचे कुटुंब एका गाडीत भरत होते. स्वत: तो माणूस चाकाचा मोडलेला पाटा काळजीपूर्वक वाहून नेत होता. त्या पाटचाची कुणाला काही किंमत नव्हती आणि अनेक वर्षे तो बहुदा आवाडात पडून राहिलेला असावा.

ग्रिगरीने हे दृश्य पाहिले. आपल्या घरातील जरुरीच्या मौल्यवान वस्तू मागे ठेवून फुलदाण्या आणि देवपुतळ्या ह्यांचा ढीग गाडीत रचणाऱ्या त्या बायकांचा मूर्खपणा पाहून ग्रिगरी चकित झाला. चिमुकले हिमवादळ व्हावे त्याप्रमाणे रस्त्यावरून पराच्या गादीतील परे उडत होती. जळक्या काळजीचा उतोव आणि कुबट तळ-घरांचा भपकारा हवेत कोंदला होता. खेड्याच्या अखेरीला त्यांच्याकडे धावत येणारा एक यहुदी त्याना भेटला. त्याच्या तोंडाची अरुंद फट त्याच्या रडण्याने वेंगाडली होती.

'कझाकसाहेब.... कझाकसाहेब ! अरे माझ्या देवा !'

एक ठेंगणा, गोल डोक्याचा कझाक दौडत त्याच्या पुढे गेला. त्याच्याकडे मुळीच लक्ष न देता तो आपला चाबूक गरगर फिरवीत गेला.

'थांब !' दुसऱ्या स्क्वाड्रनमधील जुनिअर कॅप्टन त्या कझाकाकडे पाहून ओरडला. खोगिराच्या मुदीवर तो कझाक झुकला आणि बाजूच्या गल्लीत त्याने आपला घोडा पिटाळला.

'थांब ए बदमाश ! कुठल्या रेजिमेन्टचा तू ?'

त्या कझाकाचे गोल डोके घोड्याच्या गर्दनीजवळ जास्तच झुकले. एका उंच कुपाटीकडे तो पिसाटासारखा दौडत गेला. घोड्याला मागच्या पायांवर उभा करून त्याने कुपाटीवरून सफाईदार उड्डाण केले.

'इथं नवव्या रेजिमेंटचा मुक्कामाय हुजूर ! तो तिथलाय !' सार्जंटने सांगितले.

'खड्ड्यात गेला तो !' जुनिअर कॅप्टन त्रासून म्हणाला आणि त्याच्या घोड्याच्या रिकिबी घट्ट पकडलेल्या यहुद्याकडे तो वळला.

'तुझं काय घेतलं त्यानं ?'

'अंमलदार साहेब– माझं घड्याळ अंमलदार साहेब.' जवळ येणाऱ्या अंमल-दाराकडे तोंड करून यहुद्याने आपल्या पापण्यांची फडफड केली.

पायाने आपले रिकीब सोडवून घेत जुनिअर कॅप्टन पुढे निघाला.

'नाय तरी जर्मन आल्यावर त्यानी ते घेतलच असतं.' मिशीतल्या मिशीत हसत तो म्हणाला.

तो यहुदी कावराबावरा होऊन रस्त्याच्या मधोमध उभा होता. त्याचे तोंड वेंगाडलेले होते.

'वाट सोड, ए यहुद्या !' स्क्वाड्रन कमांडर चाबूक उगारून करड्या आवाजात ओरडला.

चौथे स्क्वाड्रन पुढे जाऊ लागले. नाल खडखडत होते. जिने कुरकुरत होती. कझाक त्या भेदरलेल्या यहुद्याची टिंगल करीत होते. आपसात ते बोलत होते.

'चोरी केल्याशिवाय आपल्या जातीला चैन पडायचं नाय !'

'कझाकाच्या हाताला सगळं चिकटतं.'

'आपल्या चीजवस्तूची नीट काळजी घ्या म्हणावं.'

'पोरगं बरीक चलाख होतं हां !'

'कुपाटीवरुन कशी 'बोरझोई'' गत झेप घेतली.'

सार्जंट मेजर कारगिन स्क्वाड्रनच्या मागे रेंगाळला होता. इतर कझाक खिदळून साथ देत असताना आपला भाला खाली करून तो गरजला,

'पळ ए यहुदीच्या ! नायतर घालतो-!'

यहुद्याने तोंड वासले आणि धूम ठोकली. सार्जंट मेजरने त्याला गाठले आणि त्याला चाबूक लगावला. ग्रिगरी बघत होता. तो यहुदी कोलमडला आणि तळव्यात तोंड झाकून सार्जंट मेजरकडे तो वळला. त्याच्या कृश बोटातून रक्त ठिबकत होते.

'का मारलंत ?' तो हुंदके देऊ लागला.

सार्जंट मेजरचे तीक्ष्ण गुंडीगत डोळे ओशट हसत होते. घोडा पुढे नेता नेता तो ओरडला,

'अनवाणी हिंडू नको ए च्युत्या !'

खेड्याच्या पलीकडे असलेल्या एका खबळीत केंदाळ आणि पाणलिली माजल्या होत्या. त्यावरून रुंद पडणपूल बांधण्याचे काम इंजिनिअरांचा एक गट पूर्ण करीत होता. जवळच एक धडधडणारी आणि घुमणारी मोटार गाडी उभी होती. तिचा ड्रायव्हर तिच्याशी काहीतरी झटापट करीत होता. स्पॅनिश धर्तीची दाढी राखलेला, केस पिकलेला, थुलथुलीत गालाचा एक जाडेला जनरल मागच्या बाजूला अर्धवट बसलेला–अर्धवट पहुडलेला–होता. लेफ्टनंट कर्नल कालेदिन आणि एंजिनिअरिंग बटालिअनचा कमांडर गाडीजवळ 'हुश्शार' च्या पवित्र्यात खडे होते. आपल्या नकासदानीचा पट्टा घट्ट पकडून तो जनरल एंजिनिअरवर संतप्त होऊन खेकसत होता. 'तुम्हाला हुकूम दिला होता की कालच हे काम संपलं पाहिजे म्हणून ! चूप ! आधीच सामग्रीच्या पुरवठ्याचा बंदोबस्त करणं तुमचं काम होतं.'

आपले थरथरते ओठ उघडायचाही अंमलदाराने प्रयत्न केला नव्हता तरी ह्यानं पुन्हा गर्जना केली.

टीप– (१) रशियन शिकारी कुत्रा.

'चूप ! मी पायउतार कसं व्हावं अशी तुमची कल्पनाय ? कॅप्टन, मी तुम्हाला विचारतोय मी पायउतार क–सं–व्हा–य -चं ?'

गाडीत एक तरुण काळ्या मिशांचा जनरलही बसला होता. चिरुट ओढीत तो स्मित करीत होता. एंजिनिअर कॅप्टनने वाकून पुलाच्या एका बाजूकडे बोट दाखवले.

पुलाजवळ स्क्वाड्रन खबळांत उतरले. त्या पिंगट काळ्या रेंदाडात घोड्यांचे पाय गुडघ्यापर्यंत बुडाले आणि पुलावरून पिसागत पांढऱ्या ढलप्या त्याच्या अंगावर उधळल्या गेल्या.

दुपारी स्क्वाड्रनने ऑस्ट्रियन आघाडी पार केली. सरहद्दठाण्याच्या काळ्या पांढऱ्या खांबांवरून घोड्यांनी उड्या मारल्या. उजवीकडून तोफखान्याची घन-गर्जना येत होती. दूरवर उन्हाच्या लंबकिरणात वाड्यांची कौलारू छपरे दिसत होती. कडवट चवीचा धुळीचा ढग आसमंतात उतरला होता. बिनीचे गस्ती हशम काढून त्यांना आगेकूच करण्याचा हुकुम रेजिमेंटच्या कमांडरने दिला. चौथ्या स्क्वाड्रनमधले लेफ्टनंट सिम्योनोवच्या हाताखालचे प्लतून पुढे पाठवण्यात आले. दोन स्क्वाड्रनमध्ये विभागलेलें रेजिमेंट धुळकट रखरखीत उन्हात मागे ठेवण्यात आले सुमारे वीस कझाकांची तुकडी मळलेल्या वाटेने वाडीवरून दौडत गेली.

सुमारे दोन मैल अंतरापर्यंत लेफ्टनंटने टेहळणी हशम नेले. नंतर नकाशा बघण्यासाठी तो थांबला. धूम्रपान करण्यासाठी कझाक गोळा झाले. आपला तंग सैल करण्यासाठी ग्रिगरी घोड्यावरून खाली उतरला. पण तो सार्जंट मेजर खेकसला,

'काय विचाराय ? चढ घोड्यावर !'

लेफ्टनंटने चुट्टा शिलगवला आणि दुर्बिणीच्या काचा काळजीपूर्वक पुसल्या. भर दुपारच्या लाहीत एक तराई पुढे पसरली होती उजव्या हाताला रानझाडीची दातेरी रेषाकृती उमटली होती आणि त्यात रेल्वेच्या रुळाचे तीक्ष्ण फाळ घुसले होते. त्याच्या पलीकडे एका ओढ्याची मातीची पन्हळ ताल आणि जळाचा शीतळ आरस्पानी पृष्ठभाग दिसत होता. खेड्यांतील रस्त्यांची भेसूर निःस्तब्धता न्याहाळीत तो अंमलदार दुर्बिणीतून एकाग्रतेने बघत होता. पण तिथे मसणवटी-सारखा शुकशुकाट होता. जळाची निळी फीत काय ती आव्हानपूर्वक खुणावत होती.

'ते करात्योवकाच असलं पाहिजे.' खेड्याकडे डोळे उडवून तो अंमलदार म्हणाला.

सार्जन्ट मेजरने आपला घोडा लेफ्टनंटच्या जवळ नेला. त्याने तोंडाने काही उत्तर दिले नाही पण त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बोलकेपणाने सांगत होते; 'तुम्हाला माझ्यापेक्षा चांगलं ठाऊक ! माझा संबंध फक्त मामुली गोष्टीपुरता!'

'तिथं जायचं आपण !' तो अंमलदार गुळमुळीतपणे म्हणाला. आपली दुर्बिण ठेवून देत त्याने जसा काही दंतशूळ उपटल्याप्रमाणे चेहरा त्रासीक केला.

'त्यांच्या आपण हाती सापडू हुजूर !'

'आपण खबरदारी घेऊ या !' चला

प्रोखोर झीकोव ग्रिगरीला चिकटून चालला होता. त्यांचे घोडे बरोबरच पाय टाकीत होते, त्या निर्मनुष्य रस्त्यावर ते सावधगिरीने गेले. प्रत्येक खिडकीतून कुणीतरी दबा धरल्याचा भास होत होता. प्रत्येक उघडचा बदलामुळे एकाकीपणाची भावना जागृत होऊन पाठीतून थंड शहारे उठत होते. लोहचुंबकाने खेचून घेतल्यासारखे सगळ्याचे डोळे कुपाटी आणि खंदकाकडे वळत होते. हिंस्त्र पशूप्रमाणे, गर्द निळचा हिवाळी रात्रीच्या वेळी माणसांच्या वस्तीकडे येणाऱ्या लांडग्यांप्रमाणे, ते घोडयावरून चालले होते. पण रस्ते रिकामे होते. तेथील नीरवता मती गुंग करणारी होती. एका घराच्या उघडचा खिडकीतून घडयाळाच्या टोलांचा निष्पाप आवाज आला. पिस्तुलाच्या बारासारखे ते टोल घुमले. तो अंमलदार थरथरल्याचे आणि सटकन् त्याचा हात पिस्तुलाकडे गेल्याचे ग्रिगरीने पाहिले.

खेडयात चिटपाखरू नव्हते. टेहळणी हशमानी नदी पायउतार केली. पाणी घोडयांच्या पोटाना लागत होते. घोडी खुषीने पाण्यात शिरली होती. पाणी पिण्याचा प्रयत्न करीत होती पण त्याचे लगाम ओढून त्यांच्या स्वारांनी त्याना पुढे दामटली. जवळ असूनही दुष्प्राप्य असणाऱ्या त्या गढूळ पाण्याकडे ग्रिगरी तहानल्या नजरेने बघत होता. ते पाणी त्याला अनिवार्यपणे स्वत:कडे ओढून घेत होते. शक्य असते तर त्याने जीनातून खाली उडी घेतली असती आणि त्याची घामाने भिजून गेलेली पाठ आणि छाती गारठून जाईपर्यंत त्या झुळझुळत्या ओढचात कपडेसुद्धा न काढता तो डुंबत राहिला असता.

खेडयाच्या पलीकडे असणाऱ्या टेंब्यावरून दूरवर असलेले एक गाव त्याच्या दृष्टीला पडले. घराचे चौकोनी ठोकळे, विटाच्या इमारती, गिरजाघराचे मनोरे. अंमलदार टेंब्याच्या माथ्यावर घोडयावरून गेला आणि त्याने दुर्बिण डोळ्याना लावली.

'तिथायत ते !' तो ओरडला. त्याच्या डाव्या हाताच्या बोटांचा घाबरट चाळा चालला होता.

उन्हात तळणाऱ्या त्या शिखर माथ्यावर सार्जंट मेजरने घोडा नेला. त्याच्या मागोमाग इतर कझाक एकाच ओळीत आले आणि निरखून पाहू लागले. गावातून धावपळ करणाऱ्या चिमुकल्या आकृती त्याना दिसत होत्या. रस्त्याच्या कडेला रेकल्यांचे बांध उभे होते घोडेस्वार इकडून तिकडे दौडत होते. तळव्याचा आडोसा धरून डोळे किलकिले करून पाहणाऱ्या ग्रिगरीला त्यांच्या गणवेशाचा अपरिचित करडा रंग ही लक्षात आला. गावाच्या पुढे नवीन खणलेल्या पिंगट खंदकाची रांग लागलेली होती. जवानांची तिथे दाटी झाली होती.

'किती माणसायत ?' प्रोखोर धापा टाकीत म्हणाला. 'एका' भावनेच्या पकडीत सांपडलेले सगळे चुपचाप होते. आपल्या काळजाची वाढलेली धडधड ग्रिगरी ऐकत होता. (त्यांच्या छातीत डावीकडे एक चिमुकले अवजड काहीतरी जागच्या जागी धावत होते) आणि त्याच्या हे लक्षात आले की आलाणा पालाणा करताना 'गनिमा'च्या पुढे जी भावना वाटली होती त्यापेक्षा ह्या परदेशी लोकाना पाहून अनुभवाला येणारी भावना अगदी वेगळीच होती.

सार्जंट-मेजरने टेंब्याच्या उतारावरून त्वरेने कझाकांना उतरवले. आपल्या 'जंग-वहीत' लेफ्टनंटने पेन्सिलीने काही टिपणे केली आणि खूण करून ग्रिगरीला जवळ बोलावले.

'मेलीखोव !'

'हुजूर !'

ग्रिगरी पायउतार होऊन अंमलदाराकडे गेला. खूप वेळ रपेट झाल्याने त्याचे पाय जडशीळ झाले होते. अंमलदाराने घडी केलेला कागद त्याच्या हाती दिला.

'तुझ्या जवळ सगळ्यात चांगला घोडाय ! हा कागद रेजिमेन्ट कमांडरला पोचता कर ! दौडते जाना !'

ग्रिगरीने तो कागद आपल्या वरच्या खिशात ठेवला आणि आपल्या घोड्याकडे तो परत गेला. जात जात टोपीचा बंद त्याने हनुवटीखाली केला. तो घोड्यावर मांड घेईपर्यंत अंमलदार त्याच्याकडे पहात होता. नंतर त्याने मनगटा-वरील घड्याळाकडे बघितले.

तो 'रिपोर्ट' घेऊन ग्रिगरी त्यांच्याकडे येईपर्यंत रेजिमेन्ट कोरोलीयोवका खेड्यापाशी जवळ जवळ येऊन ठेपले होते. तो 'रिपोर्ट' वाचल्यावर कर्नलने आपल्या अॅडजुटंटला हुकूम सोडला. अॅडजुटंटने पहिल्या स्क्वाड्रनकडे घोडा पिटाळला.

चौथ्या स्क्वाड्रनचा लोंढा करोल्योवकातून बाहेर आला आणि परेड मैदानावर असल्याप्रमाणे पलीकडच्या वावरावर त्यानी बुरुजबंदी केली. लेफ्टनंट सिम्योनोवने आपले जवान बरोबर घेऊन घोडा पिटाळला. गोमाशा झटकण्यासाठी घोडी मुंडकी हालवीत होती. स्क्वाड्रन रांगेत येत होती. जिनांची अखंड खुळखुळ चालू होती. खेड्यातून जाणाऱ्या पहिल्या स्क्वाड्रनचा गोंगाट दुपारच्या निरवतेत दणदणत होता

दुडाण चालीने जाणारा आपला घोडा ज्युनिअर कॅप्टन पोलकोवनिकोवने संपदाच्या अग्रभागी पिटाळला. एका हातात लगाम घट्ट गोळा करून दुसरा हात त्याने पडदाळ्यावर टाकला. श्वास रोखून ग्रिगरी हुकुमाच्या शब्दाची वाट बघत होता. पहिलं स्क्वाड्रन तयारीचा पवित्रा घेत असताना डाव्या फळीवर टापांचा खडखडाट चालू होता.

अंमलदाराने खसकन म्यानातून समशेर उपसली. निळ्या दीप्तीप्रमाणे त्या समशेरीचे पाते झळकले. 'स्क्वाड्र ऽऽन !' त्याने समशेरीला उजवीकडे झोका दिला; मग डावीकडे दिला आणि अखेरीस आपल्या पुढ्यात ती खाली आणली 'फैलावून हल्ला करा' (ग्रिगरीने त्या मूक हुकुमाचा मनातल्या मनात अर्थ लावला) घोड्याच्या ताठरलेल्या कानांच्या किंचित वर त्याने ती समशेर पेलली.

'भाले तय्यार ! समशेरी बाहेर ! एल्गार . सुरू !' अंमलदार गरजला आणि त्याने घोड्याला टाच दिली.

हजारो टापांच्या चेचत्या धडाक्याखाली धरणी मंदपणे विव्हळत होती. ग्रिगरी बिनीच्या रांगेला होता. आपला भाला तो 'तय्यार' पावित्र्यात पेलतोय न् पेलतोय एवढ्यात इतर घोड्यांच्या तडाखेबंद होलाळ्याने फेकला गेलेला त्याचा घोडा अचानक वेगाने दौडू लागला आणि भर वेगाने चौखूर उधळला. त्याच्यापुढे दौडणाऱ्या कमांडिंग अंमलदाराची आकृती वावराच्या करड्या पार्श्वभूमीवर खालीवर डचमळत होती. नांगरलेल्या जमिनीची त्रिकोणपट्टी अनिवार्यपणे त्याच्या अंगावर कोसळत होती. पहिल्या स्क्वाड्रनने उसळती कंपित गर्जना केली. चौथ्या स्क्वाड्रनने ती तशीच उचलली घोड्यांच्या ताणलेल्या पोटाला लागूनच धरणी विद्युत् वेगाने मागे झुंझाटत होती. कानात गरजणाऱ्या कर्कश शिट्ट्यातून ग्रिगरीने दूरवरच्या गोळीबाराचा आवाज टिपला. पहिले काडतूस त्यांच्या माथ्यावरून उंच सुंसाटत आकाशाच्या आरस्पानी घुमट चिरीत गेले. आपल्या भाल्याचा गरम दांडा ग्रिगरीने कळ येई तो बगलेशीं दाबून धरला होता. त्याच्या मुठी घामजलेल्या होत्या. उडत्या काडतुसांच्या शिट्ट्यांनी त्याला आपले मुंडके

घोडयाच्या भिजलेल्या गर्दनीशी खालवर झुकवून धरावे लागत होते. त्यामुळे त्या जनावराच्या घामाचा उग्र दर्प त्याच्या नाकपुडयात घुसत होता. दुर्बिणीच्या अंधुक काचेतून दिसावे तसे त्याला खंदकाचे पिंगट कांडाळे आणि गावाकडे पळत सुटलेले करडया कोटातील सैनिक दिसले. सणकारत जाणाऱ्या काडतुसांचा पंखा मशिनगनमधून कझाकावर अविश्रांतपणे आदळत होता. त्यांच्या पुढयात आणि घोडयाच्या खुरांखाली आदळणाऱ्या काडतुसानी धुळीच्या मुलामय चिळकांडया फाटत होत्या.

एल्गार सुरू होण्यापूर्वी ग्रिगरीच्या ज्या 'भागाने' त्याच्या नसातील रक्ताला वेगाने धावडवले होते. तो 'भाग' त्याच्या अंतर्यामी पाषाणवत झाला होता, कानातील घणघणता नाद आणि डाव्या चौडयाची कळ ह्या खेरीज त्याला काहीही जाणवत नव्हते. भयाने खच्ची केलेली त्याची विचारशक्ती म्हणजे त्याच्या डोक्यात एक थिजलेला अवजड गोळा होता.

घोडयावरून सर्वात आधी कोसळला तो कॉर्नेट लियाखोवस्की. ग्रिगरीने मागे दृष्टीक्षेप टाकला आणि त्याने जे पाहिले त्याची काचेवर हिरकणीने ओढावी अशी खूण त्याच्या स्मृतीवर ओढली गेली. कोसळलेल्या कॉर्नेटच्या अंगावरुन झेप घेता घेता प्रोखोरच्या घोडयानें दात विचकले आणि तो अडमडला. प्रोखोर जिना-बाहेर भिरकावला गेला आणि थेट डोक्यावर आदळून मागाहून येणाऱ्या घोडयांच्या टापाखाली चुरडला गेला. ग्रिगरीला कोणतीही किंकाळी ऐकू आली नाही, पण पिळवटलेले तोंड आणि खोबणीबाहेर उडी मारणारे वासरागत डोळे अशी त्याची मुद्रा पाहून त्याने एवढे जाणले की प्रोखोर अमानुष किंकाळी ठोकीत असावा. इतरही कोसळले, घोडेही कोसळले, कझाकही कोसळले. वाऱ्याने डोळयात येणाऱ्या पाण्याच्या पापुद्रयातून ग्रिगरीने समोर रोखून पाहिले. ऑस्ट्रियनसचा करडया रंगातील खदखदता संमर्द खंदकातून धूम ठोकीत होता.

शिस्तबद्ध लोटाप्रमाणे खेडयातून बाहेर उसळलेले स्क्वाड्रन आता विखरून त्याचे वेगवेगळे तुकडे झाले होते. ग्रिगरी ज्यांच्याबरोबर होता ते आघाडीचे स्वार जवळ जवळ खंदकापर्यंत पोचले होते. बाकीचे मागे पडले होते.

डोळयापर्यंत टोपी ओढलेल्या एका उंच पांढऱ्या भुवयांच्या ऑस्ट्रियनने अगदी नेम धरून ग्रिगरीवर गोळी चालवली. त्या काडतुसाच्या धगीने त्याचा गाल होरपळला. आपली सर्व ताकद पणाला लावून लगाम खेचीत त्याने भाल्याचा प्रहार केला. तो प्रहार इतका दणकट होता की, निम्म्या दांडयापर्यंत भाला ऑस्ट्रियनच्या देहात घुसला. भाला उपसून घेण्याची तातडी ग्रिगरीला जमली

नाही. हाताला थरथरता पेटका आल्याचे त्याला जाणवले. तो ऑस्ट्रियन इतका मागे झुकला की त्याच्या हजामत न केलेल्या हनुवटीचे टोक तेवढे ग्रिगरीला दिसू शकले. भाल्याचा दांडा गच्च आवळून त्याला तो नखाने ओरखाडीत होता. ग्रिगरीने भाला टाकून दिला आणि आपल्या बधीर बोटानी समशेरीची मूठ चाचपडली.

गावाच्या रस्त्यात ऑस्ट्रियन्सनी धूम ठोकली. त्या गणवेशांच्या करड्या गाठीचा कझाकांचे घोडे पीछा करू लागले.

आपला भाला टाकून दिल्यानंतर पहिल्या क्षणी का कुणास ठाऊक पण ग्रिगरीने आपला घोडा वळवला तेव्हा त्याला सार्जंट मेजर बाजूने दौडत गेलेला दिसला. ओठ मुडपून त्याने दात विचकले होते. समशेरीच्या पन्हळीने ग्रिगरीने घोड्याला तडाखा दिला, त्याबरोबर गर्दनीची कमान करून ते जनावर रस्त्यावर उधळले.

एक ऑस्ट्रियन एका बगीच्याच्या कटंजनाजवळून धावत होता. त्याच्या हाती बंदुक नव्हती. टोपी हातात घट्ट पकडून तो झोकांड्या खात पळत होता. त्याच्या खोपडीची मागची बाजू आणि फर्गोलाची भिजट गळपट्टी ग्रिगरीने पाहिली. ग्रिगरीने त्याला गाठला आणि क्षणैक उन्मादाने भडकून आपली समशेर त्याच्या माथ्यावरून गर्रकन फिरवली.

डाव्या हाताच्या कटंजनाला अगदी चिकटून ऑस्ट्रियन धावत होता. त्यामुळे त्याला कापून काढणे ग्रिगरीला अडनडीचे झाले होते. पण जिनावर झुकून आणि समशेर तिरपी धरून त्याने त्या माणसाच्या कानशीलावर प्रहार केला. न आरडता ऑस्ट्रियनने आपले हात जखमेवर दाबून धरले आणि कुंपनाला पाठ देऊन तो गर्रकन फिरला. लगाम खेचता खेचता ग्रिगरी त्याच्या पुढून, दौडत गेला, परत मागे वळला आणि दुडक्या चालीने परत फिरला. भयाने वेडाविद्रा झालेला ऑस्ट्रियनचा चौकोनी चेहरा ओतीव लोखंडागत काळाठिक्कर पडला होता. त्याचे हात दोन्ही बाजूला लोंबत होते आणि राखी रंग आलेले ओठ थरथरत होते. समशेरीने त्याच्या कानशिलावर तिरपा वार केला होता. आणि जांभळट चिंधीप्रमाणे मास त्याच्या गालावर लोंबत होते. रक्त त्याच्या गणवेशावर ओघळत होते. ग्रिगरीची नजर ऑस्ट्रियनच्या भयभीत नजरेला भिडली. त्या माणसाचे गुडघे लटपटत होते. त्याच्या घशातून गुळणी केल्यासारखी घरघर आली. डोळे किलकिले करून ग्रिगरीने समशेर सर्रकन खाली आणली. त्या प्रहाराने त्याच्या कवटीची दोन शकलें झाली. आपले हात लांब करून तो

माणूस कोसळला. त्याची विच्छिन्न कवटी रस्त्यावरील दगडावर धाडकन आदळली. तो आवाज ऐकून ग्रिगरीचा घोडा मागच्या पायावर उभा राहिला आणि खिकाळत त्याने ग्रिगरीला रस्त्याच्या मधोमध आणले.

रस्त्यावर गोळीबाराचा धमामा ऐकू येत होता. फेसाळत्या तोंडाचा एक घोडा एका ठार झालेल्या कझाकाला घेऊन ग्रिगरीजवळून दौडत गेला. त्याचा एक पाय रिकिबीत अडकला होता आणि त्याचा घायाळ छिन्नविछिन्न देह घोडा दगडधोंड्यावरून फरफटत नेत होता. तुमानीवरचा तांबडा पट्टा आणि डोक्यावर बोचक्यागत गोळा झालेला फाटलेला हिरवा फर्गोल एवढेच ग्रिगरीला दिसले.

शिसे भरल्यासारखे आपले डोके जड झाल्याचे ग्रिगरीला जाणवत होते. त्याने घोड्यावरून उडी घेतली आणि डोके गदगदा घुसळले. तिसऱ्या स्क्वाड्रनचे कझाक जवळून दौडत गेले एका फर्गोलावर घालून एका घायाळ सैनिकाला बाजूने नेण्यात आले. ऑस्ट्रियन कैद्याच्या घोळक्याला दुडक्या चालीवर हाकलून नेण्यात येत होते. माणसांचा दाट करडा कळप धावत होता. नाला ठोकलेले त्याचे बूट दगडावरून विषण्ण खडखडाट करीत होते. ग्रिगरीला वाटले की तो चिखलरंगी एक श्लेष्ममय गोळाच आहे. आपल्या घोड्याचे लगाम सोडून देऊन तो त्याने छाटलेल्या ऑस्ट्रियन सैनिकाकडे गेला. कुसर केलेल्या लाटीव लोखंडी कंटजना-जवळ तो जिथे कोसळला होता तिथेच पडला होता. त्याचे घाणेरडे तळवे भीक मागावेत असे पसरले होते. ग्रिगरीने त्याच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. त्या चेहऱ्यावर मिशा लोंबल्या होत्या. शारिरीक वेदनेने म्हणा किंवा विषण्ण गत-काळामुळे म्हणा पण त्या पिळवटलेल्या उग्र चेहऱ्यावर व्यथित भाव होते. तरीसुद्धा तो चेहरा लहानसा—पोरगेलाच दिसत होता.

‘ ए तू ऽ!’ एक अनोळखी कझाक अंमलदार रस्त्याच्या मधून घोडा पिटाळताना ओरडला.

त्या अंमलदाराच्या धूळभरल्या पांढऱ्या टोपीकडे ग्रिगरीने नजर टाकली आणि अडखळत तो घोड्याकडे जाऊ लागला. खांद्यावरून प्रचंड बोजा घेतल्या-सारखा तो जड पावलाने वेडावाकडा जात होता. एका अनाकलनीय भावनेने त्याचे अंत:करण विदीर्ण करून टाकले होते. त्याने घोड्याचे कायदे हाती घेतले पण त्याचे जड पाऊल खूप वेळ त्याच्याने उचलवेनाच !

६.

आपल्या घरून कूच केल्यानंतर तातारस्की आणि आसपासच्या खेड्यातील कझाकांच्या पहिल्या राखीव फौजानी दुसरी रात्र एका लहानशा खेड्यात काढली. तातारस्कीच्या खालच्या आखरीतील सैनिकानी वरच्या आखरीपासून आपला वेगळा गट बनवला. त्यामुळे पित्रो मेलीखोव, इवान तोमिलीन आणि इतराना एका घरात वस्ती हुकूम देण्यात आला. कझाकानी सायवानातून आणि चाफेखणीतून ब्लँकिटे पसरली आणि ते झोपायला पहुडले. झोपण्याआधी त्यांचे शेवटचे धूम्रपान चालू होते. घराचा धनी एक उंच जरत्कारू होता. तुर्की युद्धात त्याने फौजेत चाकरी केलेली होती. कझाकाशी तो बोलत बसला होता.

'शिपायानो, म्हणजे तुम्ही लढाईवर निघालात म्हणायचं ?'

'होय आजोबा ! लढाईवर निघालोय !'

'ही काय तुर्की युद्धासारखी नसणार ! आता हत्यारं वेगळी आहेत !'

'तसंच सगळं असणार ! तेवढंच खतरनाक ! तेव्हा जशी माणसं मारीत तशीच आताही मारणार !' तोमिलीन गुरगुरत म्हणाला, तो कुणावर रागावला होता ते कुणालाच कळले नाही.

'हे बोलणं मूर्खपणाचाय पोरा ! आता युद्ध वेगळ्या प्रकारचं होणारे !'

'अर्थात वेगळ्या प्रकारचंच होणार !' ख्रिस्तोनियाने पुष्टी दिली आणि आळसाने जांभई देऊन त्याने नखानी चट्ट्याचे थोटूक विझवले.

'आम्ही थोडी हाणामारी करू !' पित्रो मेलिखोवने जांभई दिली आणि तोंडावर क्रुसाची निशाणी करून डोक्यावर फर्गोल ओढून घेतला.

'लेकानुं, तुम्हाला एक गोष्ट सांगतो ! मनापासून सांगतो ! मी काय म्हणतो ते नीट ध्यानात ठेवा !'

डोक्यावरचा फर्गोल बाजूला करून पित्रो ऐकू लागला.

म्हातारा म्हणाला, 'हे लक्षात ठेवा ! ह्या जीवघेण्या लढाईतून जर जिवंत आणि हातीपायी धड परतायच असेल तर माणूसकीचा कायदा तुम्ही पाळलाच पाहिजे !'

‘कोणता ?’ कईला झोपलेल्या स्तिपान आस्ताखोवने अविश्वासाने स्मित करीत विचारले. युद्धाची वार्ता कानावर आल्या दिवसापासून तो परत हसूविसू लागला होता. युद्धाची त्याला ओढ लागली होती आणि सगळ्यांची चिंता आणि दुःख ह्यामुळे त्याच्या स्वतःच्या दुःख-चितेवर खपली धरली होती.

‘कायदा हा असा:– दुसऱ्या माणसाची चीजवस्तू घेऊ नका ! हे एक ! देवाला जसे तुम्ही भिता तसेच कोणत्याई बाईवर हात टाकू नका. हे दुसरं !’ आणि तुम्हाला काही खास प्रार्थनाही ठाऊक असायला हव्यात !

कझाक उठून बसले आणि सगळे एकदम बोलू लागले.

‘दुसऱ्याची घेण्यापेक्षा आमचीच चीजवस्त जायचा संभव जास्त !’

‘आणि बाईच्या अंगावर का हात टाकू नका ? जबरी तुम्ही करू शकत नाय. पण समजा तीच राजी असली तर ?’

‘बाईशिवाय राहणं कठीणच !’

‘पैज लावतो !’

‘वरं ! प्रार्थनेचं काय ?’

’त्यांच्यावर म्हताऱ्याने करारीपणाने नजर रोखली आणि उत्तर दिले. ‘बाईला तुमी हात लावता कामा नये ! चुकूनसुद्धा नाही ! स्वतःवर ताबा ठेवला नाही तर डोकं गमवाल ! नाहीतर घायाळ व्हाल ! मग वाईट वाटेल ! पण मग फार उशीर झालेला असेल !

‘मी तुम्हाला प्रार्थना सांगतो. तुर्की युद्धात मी शेवटपर्यन्त होतो. मरण दुलंगीसारखं पाठीला लागलं होतं. पण सहीसलामत परत आलो तो ह्या प्रार्थनेमुळे !’

तो उठून दुसऱ्या खोलीत गेला. देवपुतळ्याखाली त्याने वाचकरावाचरक केली आणि एक जीर्ण विटलेला कागदाचा तुकडा घेऊन तो परतला.

‘आता उठा ! आणि ह्या लिहून घ्या !’ त्याने फर्मावले.

‘उद्या कोंबड्याची बांग झाली रे झाली की तुमचा मुक्काम हलणार ! होय ना ?’

त्याने तो कागद मेजावर पसरला आणि तिथेच ठेवून दिला. पहिल्या प्रथम उठला तो आनिकुशका. थरथरत्या दिव्याने पडलेल्या त्याच्या सावळ्या नितळ गुलजार चेहऱ्यावर नाचत होत्या. स्तिपान सोडून बाकी सर्वांनी बसून त्या प्रार्थना उतरवून घेतल्या. आनिकुशकाने आपल्या कागदाची सुरनळी करून ती छातीवर

लटकणाऱ्या क्रुसाच्या दोऱ्याला बांधून टाकली. स्तिपान त्याची टर उडवीत म्हणाला,

'उवाना चांगलं बीळ केलंस ! क्रुसाची ऊब पुरेशी नव्हती वाटतं ?'

'पोरा, तुझा एक विश्वास नसेल तर जीभ आवर !' म्हाताऱ्याने त्याला तंबी दिली. 'दुसऱ्याच्या वाटेत अडथळा आणू नको ! आणि श्रद्धेची टिंगल करु नको ! ते पाप आहे !'

स्तिपानने स्मित केले आणि गप्प होऊन गेला. आपला संकोच आवरीत आनिकुशकाने म्हाताऱ्याला विचारले,

'ह्या प्रार्थनेत धनुष्यबाणाबद्दलाय. ते कशासाठी ?'

'ही 'हत्याराविरुद्धची प्रार्थना' आपल्या काळातली नाही माझ्या आजोबाला ही त्याच्या आजोबाकडून मिळाली. त्याच्याही आधी ती करीत असतील. पूर्वीच्या काळी कोंत आणि .. घेऊन लढाईला जात.

कझाकानी ज्याला जी आवडली ती ती प्रार्थना लिहून घेतली.

हत्याराविरुद्ध प्रार्थना

देव आम्हाला आशिर्वाद देवो. पर्वतावर एकाद्या घोड्याप्रमाणे एक पांढरी शिळा आहे. ह्या शिळेत पाणी ज्या प्रमाणे शिरू शकत नाही त्याचप्रमाणे देवाचा बंदा असणाऱ्या माझ्या शरीरात किंवा माझ्या साथीदाराच्या शरीरात किंवा माझ्या घोड्याच्या शरीरात काडतूस आणि बाण न शिरो. ऐरणीवरून हातोडा ज्याप्रमाणे मागे उशी घेतो त्याप्रमाणे काडतूस माझ्यापासून परत मागे उशी घेवो. जात्याचा पेड ज्याप्रमाणे फिरतो त्याप्रमाणे बाण फिरो आणि मला स्पर्श न करो. सूर्य आणि चंद्र ज्याप्रमाणे तेजस्वी आहेत त्याप्रमाणेच मी ईश्वराचा बंदा, बलदंड होवो. ह्या पर्वताच्यामागे एक कोट आहे, ह्या कोटाला मी टाळे लावीन आणि त्याची किल्ली समुद्रात फेकून देईन. आल्तोर नावाच्या पांढऱ्या शिळेखाली मी ती ठेवून देईन. म्हणजे जादूटोणे, करणाराना चेटकिणींना, महंताना किंवा जोगिणीना ती दिसू शकणार नाही. सागराचे पाणी ज्याप्रमाणे वाहून जात नाही आणि रेतीचे पिवळे कण ज्याप्रमाणे गिनता येत नाहीत त्याचप्रमाणे देवाचा बंदा असलेल्या मला कोणतीही इजा न होवो. पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्याची शपथ. आमेन.

लढाईतील प्रार्थना

एक महासागर आहे आणि ह्या महासागरात एक पांढरी शिळा आहे. त्या

शिळेवर प्रचंड उंचीचा शिळा पुरुष आहे. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत, धरतीपासून अस्मानापर्यंत देवाचा बंदा असलेल्या मला आणि माझ्या साथीदाराना शिळेने झाकून टाक. लखलखीत तलवार आणि समशेरीपासून, पोलादी पात्यापासून आणि नागव्या कोंतापासून, पाणी दिलेल्या आणि न दिलेल्या खंजिरापासून, सुऱ्यापासून आणि कुऱ्हाडीपासून, तोफेच्या आग्येलापासून, शिशांच्या गोळ्यांपासून आणि जीवघेण्या शस्त्रांपासून, गरूड, हंस, कादंब, क्रौंच आणि डोंबकावळ्याची पिसे लावलेल्या सर्व तिरांपासून, तुर्क, क्रिमीयनस्, ऑस्ट्रियन तातार, लिथुआनिअन, जर्मन आणि कालमिकांबरोबरच्या सर्व लढायातून माझे रक्षण कर. पवित्र बापानो आणि स्वर्गीय शक्तींनो, देवाचा बंदा असलेल्या माझे रक्षण करा. आमेन.

हल्ल्याच्या वेळची प्रार्थना

सर्वश्रेष्ठ नियंत्या, देवाच्या पवित्र माते आणि आमच्या प्रभू येशूख्रिस्ता, प्रभो, लढाईत प्रवेश करणाऱ्या तुझ्या सेवकाला आणि माझ्याबरोबर असलेल्या माझ्या साथीदाराना आशीर्वाद दे. त्यांच्यावर ढगाचे आवरण घाल, तुझ्या स्वर्गीय पत्थरी गारेने त्यांचे रक्षण कर. सालोनिकाच्या पवित्र दिमित्री देवाचा बंदा असलेल्या माझे आणि माझ्या साथीदाराचे आसमंतापासून रक्षण कर. दुष्ट माणसाची गोळी लागू देऊ नको. कोंत्याने विदीर्ण होऊ देऊ नकोस. परशूचा आघात होऊ देऊ नकोस. कुऱ्याडीच्या दांड्याने प्रहार होऊ देऊ नकोस, कुऱ्हाडीने चिरफाळ होऊ देऊ नकोस. समशेरीने तोडला जाऊ किंवा विदीर्ण होऊ देऊ नकोस. सुऱ्याने भोसकला किंवा काटला जाऊ देऊ नकोस (म्हाताऱ्याकडून किंवा तरण्याकडून, पिंग्याकडून किंवा काळ्याकडून, पाखंड्याकडून किंवा जादूटोणेवाल्याकडून किंवा छू: मंतरवाल्याकडून) देवाचा बंदा असलेल्या, पोरक्या झालेल्या आणि न्यायनिवाडा झालेल्या माझ्यापुढे सर्व काही आहे. समुद्रात, महासागरात, बूयान बेटाबर एक लोहखांब उभा आहे. त्या खांबावर लोहदंडावर विसावलेला एक लोहपुरुष आहे आणि तो लोह, पोलाद, शिसे, जस्त आणि वज्राच्या सर्व प्रकाराना आज्ञा करतो; 'देवाच्या बंद्यापासून, माझ्या साथीदारापासून आणि घोड्यापासून लोहा निघून जा धरणीमातेच्या पोटात जा. तीर जंगलात जावोत. पिसे माता पक्षिणीकडे जावोत आणि खळ माशाकडे जावी.' पोलादापासून, काडतुसापासून आणि तोफेचा भडिमार आणि गोळ्यापासून, कोंता आणि सुऱ्यापासून सोनेरी ढालीने माझे, देवाच्या बंद्याचे रक्षण कर. चिलखताहून माझा देह बलिष्ट होवो. आमेन.

• • •

आशीर्वाद देताना त्याच्या आयानी ज्या देव पुतळ्या दिल्या होत्या आणि जन्मदात्या मातीच्या ज्या पुरचुंड्या बांधून दिल्या होत्या त्याला ह्या प्रार्थना बांधून कझाकानी त्या सदऱ्याखाली लपवून ठेवल्या. पण ज्याच्या जवळ प्रार्थना होत्या आणि ज्याच्याजवळ त्या नव्हत्या त्या सर्वांना मरण मात्र सारखेच आले. युद्धाच्या लालबुंद ज्वाळा जेथे नाचत होत्या आणि ज्या मातीवर कझाकांच्या घोड्यांच्या टापा उमटल्या होत्या त्या गालीशिया, पूर्व प्रशिया, कारापाथिअन प्रदेशात आणि रूमेनियातील शेतातून त्यांचे मुडदे कुजून चालले होते !

७.

व्येशेनस्कायासुद्धा डॉनच्या वरच्या खोऱ्यातील खेड्यातील कझाकांची भरती नेहमी अकराव्या आणि बाराव्या कझाक रेजिमेंटातून आणि आतामानच्या हुजुराती पथकातून होत असे. पण काही कारणाने १९१४ ची दाखिली तिसऱ्या डॉन कझाक रेजिमेन्टमधे करण्यात आली. ह्या रेजिमेन्टमधे मुख्यत्वेकरून उस्त-मिदवेदित्स्काया गावातील कझाक होते. अशा तऱ्हेने भरती केलेल्यात मितका कोर्शूनोव होता.

तिसऱ्या रिसाला डिव्हिजनच्या काही पथकाबरोबर तिसऱ्या डॉन कझाक रेजिमेन्टचे ठाणे विलनो येथे होते. जून महिन्यात एक दिवस निरनिराळे स्क्वाड्रनस् शहरातून खेडेगावातील कुरणात घोडी चरवायला गेले.

दिवस सुस्त पण उबदार होता. तरंगत्या ढगानी आभाळात कळप करून सूर्यबिंब झाकून टाकले होते. रेजिमेन्ट कुचाच्या पहळीत दौडत होते. पहळीच्या आघाडीला रेजिमेन्टचा बँड दणाणत होता. हलक्या उन्हाळी टोप्या घातलेले आणि कवायती गणवेश चढवलेले अंमलदार घोड्यावर बसून घोळक्याने मागच्या बाजूने येत होते. त्यांच्या डोक्यावर सिगरेटचा धूर तरंगत होता.

रस्त्याच्या दुतर्फा शेतकरी आणि रंगीबेरंगी कपडे केलेली त्यांची बायका-मंडळी गवत कापीत होती. अंगावरून जाणाऱ्या कझाकांच्या पहाळीकडे कपाळावर आडवा हात धरून ते बघत होते. उकाड्यात घोडी घामाने डबडबली होती.

पिवळसर फेस त्यांच्या तंगड्यात दिसत होता आणि आग्नेयकडून येणारी हलकी झुळूक त्याना निववत नव्हती. उलट त्यांची वाफाळती गदमद वाढवीत होती.

निम्म्या वाटेवर ते गेले असतील आणि एक लहानसे खेडे फारसे दूर राहिले नसेल एवढ्यात एक वरिस वयाचे शिंगरू कुपाटीमागून दुडाण चालीने आले आणि घोड्यांची ती प्रचंड दाटी पाहून खिंकाळत आणि उसळ्या घेत पाचव्या स्क्वाड्रनपुढे आले. त्याची केसाळ कवळीशेप एका अंगावर चळवळत होती आणि त्याच्या सुबक सुंभ्यावरील धूळ तुडवलेल्या गवतात उधळत होती. उसळ्या घेत ते पहिल्या जुमल्याकडे गेले आणि आपले प्रोथ त्याने त्या सार्जंट-मेजरच्या घोड्याच्या फऱ्यात आचरटासारखे खुपसले. तो घोडा अडखळला पण त्या शिंगराची कींव करून त्याने टापर मात्र हाणली नाही.

'हट् ए बाजूला पागल !' चाबुक नाचवीत सार्जंट मेजर ओरडला. पण ते शिंगरू इतके स्नेहाळ आणि निःसंकोच दिसत होतें की इतर कझाक हसू लागले. मग काहीतरी अनपेक्षित घडले. कतारीतून घट्टपणे ते शिंगरू आत घुसले. त्यामुळे प्लतून मोडून गेले आणि त्यांची रचना विस्कळीत झाली. घोडी अडली आणि स्वाराना ती जुमानीत नाहीशी झाली. त्यांच्यामधून रेटत जात शिंगराने शेजारच्या घोड्याला चावायचा प्रयत्न केला.

स्क्वाड्रन कमांडर तेथे घोडा फेकीत आला.

'काय चाललंय इथं ?'

घोडी खिंकाळत त्या ताज्या गैरसावध शिंगराकडे तिरप्या नजरेने बघत होती आणि हसणारे कझाक आपल्या चाबकानी त्याला पिटाळून लावण्याचे प्रयत्न करीत होते. मागचे पुढच्याना येऊन भिडले होते आणि जुमल्यात पुरता गोंधळ उडून गेला होता. पहाळीच्या मागून चिडलेला जुमलेदार घोडा फेकीत येताना दिसत होता.

'काय प्रकाराय हा ?' गर्दीत घोडा घालीत स्क्वाड्रन कमांडर गरजला.

'शिंगरू आहे—!'

'आमच्यामधेच ते घुसलंय—'

'तुमच्यानं हाकलता नाय येत तो सैतान ?'

'लगाव चाबूक त्याला. काय लाड करू नका त्याचे.'

खुळ्यागत हसणारे कझाक आपल्या चेकाळलेल्या जनावरावर मांड आवळण्याचा प्रयत्न करीत होते.

'सार्जंट-मेजर–! स्क्वाड्रन कमांडर, काय साला प्रकार चाललाय? जुमले शिस्तीत लावा. बापजन्मी कधी हे असलं ऐकलं नाय.'

स्क्वाड्रन कमांडर त्या गोंधळापासून बाजूला झाला आणि त्याच्या घोडयाचे मागचे पाय रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खळग्यात घसरले. त्याने घोडयाला टाचा मारल्या आणि ते जनावर धडपडत एका बांधावर चढले. तिथे सगळीकडे चाकव-ताच्या जातीची वनस्पती आणि पिवळघाडेझी माजलेल्या होत्या. दूर अंतरावर अंमलदारांचा थवा थांबलेला होता. लेफ्टनंट कर्नल डोके मागे फेकून डेचक्यातून पाणी पीत होता. पितृप्रेमाने ठेवल्यासारखा त्याने खोगिराच्या मुठीवर एक हात टेकला होता.

सार्जंट मेजरने जुमला तोडला आणि चिडून शिव्या घालीत त्या शिंगराला रस्त्यावरून पिटाळून लावले. जुमला परत सफ्यावर उभा राहिला. शिंगरू हुसकावन लावण्यासाठी रिकिबीवर उभा राहून त्याच्यामागे दौडणाऱ्या सार्जंट मेजरला दीडशे नेत्रद्वय न्याहाळू लागले. पण ते शिंगरु मधेच थांबायचे आणि सार्जंट मेजरच्या उंचाफेर घोडयाला लगटू लागायचे आणि मधेच हुंदडत दूर.पळून जायचे. त्यामुळे सार्जंट मेजरचा एकही तडाखा त्याच्या अंगावर बसेना. बसलाच तर तो त्याच्या कुत्र्यासारख्या शेपटीवर बसे. त्या तडाख्यापुरती ती शेपटी खाली पडे पण दुसऱ्याच क्षणी उभारी घेऊन वाऱ्यावर धीटपणे नाचू लागे. अंमलदारसुद्धा सगळे स्क्वाड्रन हसू लागले. कॅप्टनच्या उदास चेहऱ्यावरही स्मिताची वक्र सुरकुती उमटल्यागत झाली.

आघाडीच्या जुमल्यात तिसऱ्या ओळीत मितका कोर्शुनोव घोडयावरुन चालला होता. डॉनवरील गावातील मिखाईल इवानकोव आणि कुझमा क्रुचकोव त्याच्याबरोबर होते. रुंद खांदे आणि चेहरेपट्टीचा इवानकोव गप्प होता. किंचित माताचे वण असलेला गोल खांद्याचा क्रुचकोव हा कझाक (त्याला सगळे उंट म्हणायचे) मितकाचे सतत उणेदुणे काढीत होता. क्रुचकोव 'जून' कझाक होता. म्हणजे असे की त्याच्या चाकरीचे हे शेवटचे वर्ष होते. रेजिमेंटच्या अलिखित कायद्यानुसार इतर 'जून' कझाकां-बरोबर तोही पोरगेल्या कझाकांचा पिच्छा पुरवण्याचा, त्याना हुकूम फर्मावण्याचा आणि एवढया तेवढया चुकीवरून त्याना 'फटके' देण्याचा आपला हक्क उगवून घेत होता. तेरा साली भरती झालेल्या कझाकाना तेरा 'फटक्यांची' शिक्षा आणि चौदा साली भरती झालेल्यांना चौदा 'फटक्यांची' शिक्षा प्रस्थापित होती. ह्या पद्धतीला सार्जंट आणि अंमलदार ह्या सबबीवर प्रोत्साहन देत की त्यामुळे कझाकात केवळ हुद्याबद्दलच नव्हे तर वयाबद्दलही आदर रुजतो!

क्रुचकोवला नुकतेच 'कारपोरल' करण्यात आले होते. एखाद्या पाखराप्रमाणे तो जिनात पोक काढून बसला होता. एका फुगीर करड्या ढगाकडे किलकिल्या नजरेने बघत आणि स्क्वाड्रन कमांडर कॅप्टन पोपोवच्या उच्चारांची नक्कल करीत त्याने मितकाला विचारले,

'ए...कोर्शुनोव अॅश्श् मला शँग की आपल्या स्क्वाड्रन कॅम-आ-न्-डरचं नॅव कैय ?'

हट्टीपणा आणि आज्ञाधारकतेची नावड ह्याबद्दल वारंवार फटक्यांची चंब घेतलेल्या मितकाने तोंडावर मोठा आदरभाव आणून म्हटले,

'कॅप्टन पोपोव, श्रीयुत बुजुर्ग कझाक !'

'कैय ?'

'कॅप्टन पोपोव, ! श्रीयुत बुजुर्ग कझाक !'

'मॅला ते नॅक्कोय ! तू मॅला हे सांग की अॅप्पण कॅझॅक त्याला आपल्या तुपल्यात कॅय म्हणीतो ?'

इवानकोवने मितकाला सावधगिरीचा डोळा घातला आणि रुंद हास्य केले. मितकाने आजूबाजूला नजर टाकली. कॅप्टन मागून घोड्यावरून येत असलेला त्याने पाहिला.

'हॅं ! मॅग ? सॅंग सॅंग !'

'त्याना कॅप्टन पोपोव म्हणतात, श्रीयुत बुजुर्ग कझाक !'

'च्यॅंवदा फटके तुलॅं ! सॅंग ए, ए रॅंडिच्या !'

'मला माहीत नाय, श्रीयुत बुजुर्ग कझाक !

'तळावर आपण परत गेलो की, तुझी पट्ट्याखाली चामडी लोंबवतो ! माझ्या प्रश्नाचं उत्तर दे !' आपल्या नेहमीच्या आवाजात क्र्यूचकोव म्हणाला.

'मला माहीत नाय.'

'त्याला आपण काय म्हणीतो ते तुला माहीत नाय काय रे भडविच्या !'

मागून येणारा कॅप्टनच्या घोड्याच्या टापांचा अस्पष्ट आवाज मितकाने ऐकला आणि तो गप्प बसला.

'हं मग ?' क्रयुचकोवने डोळे रागाने आकुंचित केले.

पिछाडीच्या रांगांतून दबलेली खुसखुस फुटली. कशासाठी ते हसणे होते हे न समजून आणि आपल्यालाच कझाक हसतायत असे वाटून क्रयुचकोव खेकसला,

'जपून कोर्शुनोव ! तळाकडे परतलो की तुला ठेवणीतले पन्नास लगावतो!'

मितकाने शरणागती दिल्यासारखे खांदे उडवले.

'काळा कादंब !'

'अस्सं !'

'क्यू ऽ चको ऽ व !' पाठीमागून एक आवाज आला.

'श्रीयुत बुजुर्ग कझाक' जीनावर बसल्या बसल्या दचकला आणि एकदम सावधानच्या पवित्र्यात ताठ झाला.

'कॅसले चॅळे चॅलल्येत बॅदमॅश ?' क्युचकोवच्या घोडयाला घोडा भिडवीत कॅप्टन गरजला. 'ह्या कॅझॅक पोराला क्यॅ शिकॅवतोय्‌स ?'

क्युचकोवने पापण्याची उघडझाप केली. लाजेने त्याचा चेहरा काळानिळा पडला. पिछाडीच्या रांगातून हसण्याचे आवाज येत होते.

'गेल्या वर्षी कुणाला धंडा शिकवलॅ होता ? हे नॅख कुणावर तोडून घेतलॅ होतॅं मी ?' आपल्या करंगळीचे लांब तीक्ष्ण नख क्युचकोवच्या तोंडाजवळ आणीत कॅप्टनने विचारले, 'पॅरत हे माझ्या कानावर येता कॅमा नये ! समजलॅस मॅर्दा ?'

'जी हुजुर !'

कॅप्टन पहाळीतून बाहेर पडला आणि त्याणे स्क्वाड्रनला पुढे जाऊ दिले.

चौथे आणि पाचवे स्क्वाड्रन दुडक्या चालीने पुढे गेले.

'स्क्वाड्रन ! चॅरगाम चॅलो !'

क्युचकोवने आपल्या खांद्यावरील फिती नीट केल्या आणि कॅप्टनच्या परत जाणाऱ्या आकृतीकडे दृष्टीक्षेप टाकला. आपला भाला नीट सावरीत त्याने रुष्टतेने मान हलवून म्हटले,

'हे म्हातारडं कादंब सालं कुठनं टपकलं ?'

हसून हसून घाम फुटलेल्या इवानकोवने त्याला सांगितले,

'आपल्या मागूनच तो येत होता ! त्यानं सगळं एकलं. तू काय बोलत असशील ते त्यानं ओळखलं असावं !'

'तू मला डोळा घालायला हवा होतास, चुत्या !'

'डोळा घालायला हवा होता ?'

'नको होता असं म्हणणांय काय ? तुला ठेवणीतले चौदा !'

मुक्कामाला पोचल्यावर स्क्वाड्रननं रेजिमेंटची वाटणी त्या प्रदेशातील निरनिराळ्या वाडयातून केली. दिवसा कझाक जमीनदारासाठी क्लोवरची आणि कुरणातील गवताची कापणी करीत. त्याना नेमून दिलेल्या मोहटळीत आपले घोडे ते रात्री चरायला सोडीत आणि झगाग्री पेटवून पत्ते खेळत, चकाटया पिटीत चुट्टे ओढीत बसत. सहाव्या स्क्वाड्रनला एका पोलीश जमीनदाराच्या प्रशस्त वाडीवर वस्ती हुकूम मिळालेला होता. अंमलदार घरात राहत. पत्ते खेळत नशापाणी करीत

आणि कारभाऱ्याच्या पोरीकडे लक्ष पुरवीत. घरापासून मैल सव्वा मैल अंतरावर कझाकानी आपल्या राहुट्या उभारल्या होत्या. रोज सकाळी कारभारी 'द्रोझकी'[१]त बसून त्याच्या तळावर जायचा. हा तुंदिलतनु सज्जन माणूस द्रोझकीतून बाहेर पडायचा आणि आपली चकचकीत ढापणाची पांढरी टोपी हालवून कझाकाचे स्वागत करायचा.

'साहेब, आमच्याबरोबर गवत कापायला या! तुमची चरबी झडेल जरा!' कझाकानी त्याला हाक मारून बोलावले. कारभाऱ्याने मंद स्मित केले. आपल्या हात रुमालाने टक्कल पुसले आणि गवत कापण्याचा दुसरा भाग दाखवून देण्यासाठी तो सार्जंट–मेजरबरोबर निघून गेला.

मध्यान्हीला न्याहारी आली. कझाकानी हाततोंड धुतले आणि ते जेवायला गेले.

न बोलता त्यानी जेवण केले. पण जेवण झाल्यानंतर उरलेल्या वेळात संभाषणाचा हा अभाव भरून काढला.

'इथलं गवत भिकार वाणाचंय! आपल्या माळरानाची तोड नाय ह्याला.'

'भिकार असलं तरी ते ही पुरेसं नाय.'

'कवडी फोकसुद्धा काय नाय.'

'तिकडं घराकडं गवत कापणी आतापर्यंत संपली असंल.'

'आपणपण लौकरच संपवू. काल प्रतिपदा होती! पाऊस पडल!'

'ते 'पोल' म्हणजे दरिद्री म्हातारं आहे! एवढ्या आपल्या कष्टासाठी एक बाटली द्यायला हवी होती खरं तर!'

'हां हां! स्वतःसाठी गिरजाघरात बाटली चोरायला कमी नाय करायचा.'

'पाहिलंत पोरानु कसं होतं? माणसाजवळ जेवढं जास्त असेल तेवढा जास्त त्याला लोभ सुटतो!'

'झारला विचार त्याबद्दल!'

'मालकाची पोर कुणी पाह्यलेय?'

'तिचं काय?'

'लवंडीच्या अंगावर गच्च मास आहे!'

'माजवलेली मेंढीच!'

'हाय हाय–!'

'चट्टामट्टा करला असता!'

टीप– १) बगीसारखी घोडागाडी.

‘खरं खोटं आपल्याला माहीत नाय. पण शाही घराण्यातून तिला मागण्या आल्यात म्हणे !’

‘तिच्यासारखा रसाळ माल अलबत्या गलबत्याच्या हाती लागतोय होय ?’

‘पोरानु, मी एक अफवा ऐकल्येय ! लौकरच आपली शाही फौजपाहणी होणार आहे !’

‘मी काय म्हणीतलं ? रिकामा न्हावी न्...’

‘अरे सोडून दे नं तारास !’

‘तुझी बिडी काढ ना लेका !’

‘तू साल्या लाटचा गंगाराम ! गिरजाघराच्या दारात बसणाऱ्या भिकाऱ्यासारखा तुझा हात लांबोडा आहे !’

‘बघारे पोरांनु, फेदोतच्या तोंडात नुसतीच आग आहे. खेचायला धुराचा पत्त्याच नाय !’

‘राखुंडी होईस्तो फुंकलेय त्यानं.’

‘परत बघ गड्या ! बाईसारखं रसरसलंय !’

आपल्या पोटावर पालथे पडून ते चुट्टा ओढीत होते. त्यांच्या उघड्या पाठी उन्हात खरपूस भाजलेल्या होत्या. शेताच्या कोपऱ्यात पाच ‘जून’ कझाक एका नवीन रंगरूटाला प्रश्न विचारीत होते.

‘कुठचा रे तू ?’

‘चेलान्स्कायाचा.’

‘मिठाच्या खाणी आहेत तिथला ? ऑं ?’

‘होय कार्पोरल !’

‘तुमच्याकडं मिठाच्या गोण्या कशा रे आणतात ?’

जवळच क्र्युचकोव चारजजाम्यावर पडून आळसटल्यासारखा आपल्या टिचभर मिशाना पीळ भरत होता.

‘घोड्याच्या गाड्यानी !’

‘आणखी कशानं ?’

‘बैलगाडीनं कारपोरल.’

‘आणि क्रिमियाहून मासळी कशी आणतात रे ? तुला ठाऊकाय का ? एका जातीचे पाठीवर कुबड असलेले बैल उंटकटारा खातात! त्याना काय रे म्हणतात?’

‘उंट !’

‘हाः हाः हाः !’

क्र्युचकोव सुस्तपणे उठला आणि त्या अपराधी रंगरूटाकडं चालत गेला. आपल्या उंटासारख्या खांद्याना त्याने पोक काढले होते थोराड गळघाटी असणारी आपली केशरी काळसर मान त्याने उचावली होती.

'हो ओणवा !' आपला पट्टा काढून घेत जाता जाता त्याने फर्मावले.

जून महिन्याच्या उकडत्या सायंकाळी कझाक झगरीभोवती गाणे म्हणत होते.

'कझाक दूरच्या गेला मुलखाकडं
खड्या रानावर फेकीत घोडं
कायम ठेवून मागं खेडं
परत यायचा पुन्हा न इकडं'

लोचदार मध्यमाच्या स्वरात शोकार्त हुंदका होता तर खर्जातून प्रगाढ मृत्तमय दुःख प्रकटले होते.

मध्यमाने शोकाची तीव्र पट्टी आता गाठली होती.

'त्याची होती कझाक नवरी नव्या नवतीची उषा
उरी फोल ही घेऊन आशा निरखी उत्तर दिशा
सांज सकाळी वाट पाहते येईल साजण घरी
कझाक दिलवर कधी न माझा जाईल सोडून दुरी'

अनेक आवाजानी गाण्याचा भरणा केला आणि घरी बनवलेल्या 'बीअर' प्रमाणे ते समृद्ध झाले आणि भिनू लागले.

कडे पठारा पल्याड तेथे घुमताती वादळे
धरणी गोठून बर्फाखाली तडतडुनी तळमळे
देवदारू फिर राने झुकती खिन्नपणे तेथली
कझाक हाडे पडली, वरती हिमचादर ओढली'

कझाकाची साधी कहाणी आवाज सांगत होते आणि एप्रिल महिन्यातील पाघळत्या धरणीवरील आकाशात चंडोलाने भरारी घ्यावी त्याप्रमाणे आपल्या कंपित स्वरानी मध्यमाने ती कहाणी पेलली होती.

मरणादारी कझाक पडला ज्योत विझत चालली
काकुळतीने परी आर्जवे करितो शेवटली
थडग्यावरती माझ्या बांधा सान एक चौथरा
वरी वृक्ष अन् गावाकडला ढाळो धवल फुलोरा.'

दुसऱ्या एका झगरीजवळचा गट लहान होता आणि तो गाण्याचा सूर वेगळा होता.

‘त्या खवळून गेल्या गेल्या आझोव दरियातून
गलबते चालली डॉन प्रवाहावरुन
देशाला आपुल्या आला हो परतून
अहो ज्वादा आला तरणा आतामान’

दुसरीकडे स्क्वाड्रनचा कथेकरी ध्रुपाने खोकत गोष्टीचे चऱ्हाट वळत होता. एकाग्र चित्ताने कझाक ऐकत होते. दृष्टाने रचलेल्या कारस्थानातून कथानाक शिताफीने निसटायचा तेव्हाच एखादा हात बुटाच्या पायावर थापटी मारताना झगरीच्या उजेडात शुभ्र चमकायचा किंवा जाड धूरग्रस्त आवाजात कुणीतरी आनंदाने दाद दिल्याचा कंठस्वर उमटायचा.

‘काय गोष्ट !’

मग कथेकऱ्याचा ओघवता अखंडित सूर चालू रहायचा.

खेड्यातील मुक्कामावर त्या रेजिमेंटचे आगमन झाल्यानंतर एका आठवड्याने स्क्वाड्रन कमांडरने लोहाराला आणि सार्जंट मेजरला बोलावून घेतले.

घोड्यांची हॅलत कॅश्याय ?’

‘तशी वाईट नाही हुजुर. ठणठणीतैत तें. सगळ्यांच्या चोळवटल्या पाठींना खरारे झालेत. सुधारतायत ते.’

कॅप्टनला ज्यामुळे टोपण नाव मिळालं होतं त्या आपल्या काळ्या मिशाना त्याने पीळ भरला आणि कर्कश आवाजात तो म्हणाला, ‘सॅगळ्या रिकिबी आणि तॅज्याना कॅल्हई देण्याचा रेजिमेंट कॅमांडरनँ हुकूम सोड्लॅय ! रेजिमेंटची शॅही पाहणी व्हायच्येय. जिनबंदी जॅरबंद सॅगळा जॅमानिमा झॅळकल अॅसा लखलखीत करा. कॅझाकाना पाहून डोळ्याना खुषी झली प्पॅहिजे. कॅव्हा होईल तॅयारी ?’

सार्जंट मेजरने लोहाराकडे पाहिले. लोहाराने सार्जंट मेजरकडे पाहिले. मग दोघानी मिळून कॅप्टनकडे पाहिले. सार्जंटमेजरने सूचना मांडली,

‘रविवार ठरवला तर चालेल का हुजुर ?’ असे विचारून त्याने आपल्या तंबाखूग्रस्त मिशीच्या टोकाला आदबीने स्पर्श केला.

‘रॅव्वारी होईल हे लॅक्षात ठेवॅ !’ कॅप्टनने धमकावून सांगितले आणि त्या दोघांनाही तेथून हाकलून दिले.

‘पाहणी’ ची तयारी त्याच दिवशी सुरू झाली. स्क्वाड्रनच्या लोहाराचा मुलगा आणि स्वत: उत्तम लोहार असणाऱ्या इवानकोवने रिकिबी आणि ताज्याना कल्हई देण्यात मदत केली. कझाकानी घोड्याचा दर्लसिंगार केला. लगाम स्वच्छ केले. कायदे, जेरबंद आणि जिनबंदीचे पट्ट्याचे इतर भाग बायविटीने घासून पुसून

लख्ख केलें. आठवडाअखेर रेजिमेन्ट नवीन वीस कोपेकच्या नाण्यासारखे झळकू लागले. घोड्याच्या नालबंदीपासून ते कझाकांच्या चेहऱ्यापर्यंत लकाकीने सगळा चकचकाट दिसू लागला. शनिवारी रेजिमेन्ट कमांडरने रेजिमेन्टची तपासणी केली आणि अंमलदाराचे आणि कझाकाचे त्यांच्या तळमळीच्या तयारीबद्दल आणि त्यांच्या फैनेबाज रूपरंगाबद्दल आभार मानले.

जुलै महिन्यातील दिवसाचा अस्मानी धागा रिळावर गुंडाळला जात होता. कझाकांचे घोडे तंगबार होते. फक्त कझाकांना तेवढे अनिश्चिततेच्या किडीने अस्वस्थ आणि बेचैन केले होते. शाही पाहणीबद्दल चकार शब्दही ऐकू येत नव्हता. अखंड बोलण्यात, सतत तयारीत तो आठवडा संपला, नंतर आकाशातून वज्र कोसळावे तसा विलनोला रेजिमेन्टने परत जाण्याचा हुकूम आला.

संध्याकाळपर्यंत ते शहरात परत आले. स्क्वाड्रनसना दुसरा हुकूम तात्काळ देण्यात आला. कझाकांच्या पेटचा गोळा करून वखारीत ठेवून द्यायच्या होत्या आणि पुढच्या संभाव्य हलवाहलवीची तयारी करायची होती.

'हुजूर, हा सगळा काय प्रकाराय ?' सत्य जाणून घेण्यासाठी कझाकांनी आपल्या जुमलेदारांना काकुळतीने विचारले, अंमलदारांनी आपले खांदे उडवले. काय प्रकार आहे ते जाणून घेण्याला तेही विलक्षण उत्सुक होते.

'मला ठाऊक नाय.'

'सरकारस्वाऱ्यांच्या हजेरीत डावपेच व्हायचेत का ?'

'अजून कुणाला काहीच कल्पना नाय.' कझाकांच्या समाधानार्थ अंमलदार अशी उत्तरे देत होते.

पण जुलैच्या एकोणीस तारखेला[1] रेजिमेन्ट कमांडरच्या अडलीने आपल्या एका मित्राच्या कानात सांगितले, 'युद्धाय लेका.'

'थापा मारतोयस.'

'देवाशप्पत ! पण कुठं काय बोलू नको.'

दुसऱ्या दिवशी रेजिमेन्टला बराकीबाहेर स्क्वाड्रनवारी उभे करण्यात आले. बराकीच्या खिडक्यांच्या धुरकट काचा उदासवाण्या दिसत होत्या. कमांडरची ते वाट पाहू लागले.

सहाव्या स्क्वाड्रनच्या आघाडीला एका उमद्या जनावरावर बसून कॅप्टन पोपोव चालला होता. सफाईदार दस्तकी चढवलेल्या डाव्या हातात त्याने लगाम धरले होते. त्याचा घोडा आपली गर्दन लांब करून नव्या पडलेल्या उराच्या स्नायूंना मुस्कट घासू बघत होता.

टीप :- १) नवीन कॅलेंडरप्रमाणे एक ऑगस्ट—

बराकींच्या इमारतींच्या कोपऱ्यापाशी कर्नल आला आणि रेजिमेन्टच्या आघाडीला घोडा चालवीत त्याने जनावर बाजूला वळवले. अँडजुटंटने डौलाने करंगळी लांब करून नाक पुसण्यासाठी हातरुमाल बाहेर काढला. पण ही कारवाई तडीला नेण्याला त्याला फुरसतच मिळाली नाही. तंग निःशब्दतेत कर्नलने आपला आवाज फेकला.

'कझाकांनू !'

सगळ्यांचे लक्ष त्याने वेधून घेतले.

'आता आलं बरं का !' प्रत्येकाच्या मनात विचार आला. त्या तणावाने एखाद्या पोलादी स्प्रिंगसारखे त्याना जखडून टाकले होते. मितका कोर्शुनोवचा घोडा ह्या सुभ्याचा त्या सुभ्यावर करीत होता. तेव्हा चिडून त्याने त्याच्या कुशीत टाच लावली. त्याच्या शेजारी इवानकोव आपल्या घोड्यावर निश्चळ मांड घेऊन बसला होता. त्याचे फाटक्या ओठाचे तोंड उघडे होते आणि त्यातून विषम दातांची काळीकुट्ट ओळ दिसत होती. त्याच्या माग खांद्यांत पोक काढलेला आणि कपाळाला आठ्या घातलेला क्युचकोन होता. पलीकडे घोड्या-सारखे कान टवकारलेला लापिन होता. त्याच्या मागे श्शेगोलकीवच्या स्वच्छ तासलेल्या गळ घाटीची कातीव रेषाकृती दिसत होती.

'जर्मनोनं आपल्या विरूद्ध युद्ध पुकारलंय !'

निसवलेल्या पुष्ट कणसाच्या ओट शेतातून वाऱ्याची झुळुक लहरत जावी तशी त्या रांगातून कुजबूज धावत गेली. घोड्यांची खिंकाळणी त्यातून सपापत गेली.

कर्नल आणखी बरेच बोलला. राष्ट्राभिमानाची भावना जागृत करण्यासाठी त्याने मोठ्या काळजीपूर्वक शब्दांची निवड केली होती. पण त्या हजार कझाकांच्या डोळ्यापुढे जे चित्र उभे राहिले ते सळसळत आपल्या पायाशी लोळण घेणाऱ्या परक्याच्या रेशमी ध्वजाचे नव्हे तर विचका होऊन गेलेले नित्याचे जीवन, आपली बायको पोरे, प्रियकरणी, कापणी राहून गेलेले धान्य आणि अरिष्ट कोसळलेली पोरकी खेडी ह्यांचेच चित्र त्याना दिसू लागले.

'दोन तासात आपण गाडीत चढायचं !' सगळ्या मनाना विदीर्ण करणारा एवढाच एक विचार होता.

जवळच घोळका करून उभ्या असलेल्या अंमलदाराच्या बायका तोंडाला हातरुमाल लावून रडत होत्या. सोनेरी केसाच्या आणि गर्भवती असलेल्या आपल्या पोलीश बायकोला लेफ्टनंट खोप्रोवला जवळजवळ हातात उचलूनच न्यावे लागल.

रिसाला रेजिमेन्ट गाणी म्हणत स्टेशनाकडे गेले. कझाकाच्या आवाजात बँडचा आवाज लुप्त होऊन गेला आणि त्याने दिङ्मूढ शांतता धारण केली.

अंमलदाराच्या बायका द्रोझकीत बसून चालल्या होत्या. फरसबंदीवरून चित्रविचित्र थवे फेसाळले होते. घोड्याच्या टापानी धुळीचे लोट उठत होते.

आपल्या आणि इतरांच्या दु:खाची चेष्टा करीत, खांद्यावरची निळी फीत थयथया नाचावी असा डाव्या खांद्याला झटका देत जो गाणारा म्होरक्या पुढे चालला होता, त्याने एक चावट कझाक गाणे सुरू केले होते.

'मी वेल्हाळी माझ्या जाळयाला लागली मासोळी' शब्दात शब्द मुद्दाम गुंतवीत आणि कोऱ्या टापांच्या ठेक्यावर स्क्वाड्रन स्टेशनातील लाल डब्यापर्यंत हे गाणे गात गेले.

'जाळयाला लागली जाळयाला लागली
जाळयाला लागली मासोळी—
मी वेल्हाळी कालवणाला आली माझ्या उक्कळी
कालवणाला आली कालवणाला आली
कालवणाला आली बाई उक्कळी—!'

हसण्याने आणि शरमेने तोंड लालबुंद झालेला अॅडजुटंट गाणारांकडे घोडा फेकीत आला. त्याना पोचवायला आलेल्या बायकांच्या घोळक्याकडे बघून एका कझाकाने निर्लज्जपणे घोडा घातला आणि त्याच्या 'ब्राँझ' गालापासून ते मुखाच्या काळ्या कडेपर्यंत ओघळत आला तो घाम नव्हता तर कडू दवण्याचा कडू जहर अर्कच होता.

'वेल्हाळी बाळी मुरळी जेवाया घातली
मुरळी हो मुरळी मुरळी हो मुरळी
मुरळी जेवाया घातली'

वाफ साठवीत रुळावरील इंजिनाने इशाऱ्याची शिट्टी दिली.

गाड्या...गाड्या..असंख्य गाड्या!

करड्या फर्गोलातील रक्त देशाच्या धमन्यातून, रेल्वे मार्गावरून, पश्चिम आघाडीकडे खदखदता भांबावलेला रशिया खेचत होता!

८.

रेल्वे मार्गावरील तोरझ्योक ह्या लहानशा गावात रेजिमेंट आपापल्या स्क्वाड्रनवारी विभागण्यात आले. डिव्हिजनल स्टाफ' च्या हुकुमावरून सहावे

स्क्वाड्रन तिसऱ्या पायदळ फलटणीच्या हवाली करण्यात आले. त्यानी पुढे पेलिकालिएकडे कूच केले आणि आघाडीवर मोर्चे बाधले.

सीमेवर अद्याप सरहद्द फौजांची राखण चालू होती. नवीन पायदळ आणि रिसाला पथके तिकडे नेण्यात येत होती. चोवीस जुलैला संध्याकाळी एकशे आठावी ग्लेबोव्स्की रेजिमेंटची बटालियन आणि तोफखाना हे आले. जवळच्याच अलेक्सांद्रोव्स्की वाडीत ट्रूपसार्जंटच्या हाताखाली नऊ कझाकांचा मोर्चा होता. सत्तावीस जुलैला स्क्काड्रन कमांडरने सार्जंट मेजर आणि पहिल्या जुमल्यातील आस्ताखोव नावाच्या कझाकाला बोलावून घेतले. आस्ताखोव दुपार कलण्याच्या सुमारास जुमल्याकडे परतला. त्याचवेळी मितका कोर्शुनोव आपल्या घोड्याला पाणी दाखवून परत आणीत होता.

'तू रे आस्ताखोव ?' त्याने हाक मारली.

'होय ! मीच ! ऋयुचकोव आणि पोरं कुठायत ?'

'तिकडायत झोपडीत.'

धिप्पाड काळेजलेला आस्ताखोव हा कझाक झोपडीत आला आणि काहीच दिसू न शकल्यागत त्याने डोळे किलकिले केले. मेजाजवळ चिमणीच्या उजेडात श्चेगोलकोव तुटलेल्या लगामाला टाके घालीत बसला होता. ऋयुचकोव हात मागे बांधून चुल्हाण्याजवळ उभा होता. इवानकोवला डोळा घालीत झोपडीच्या मालकाच्या दिशेने तो खुणा करीत होता.

झोपडीचा मालक पोलीश होता. जलोदराने फुगून तो बिछान्यावर पडला होता.

त्यांच्यात नुक्तीच काहीतरी मस्करी होऊन गेली होती आणि इवानकोवचे गाल हसण्याने अजून स्फुरण पावत होते.

'पोरांनु, उद्या पहाटेला सरहद्द ठाण्याकडं आपण जायचं.'

'कुठं ?' श्शेगोलकोवने विचारले. त्याचे अवधान सुटल्याने त्याच्या हातातील सुतळीचे शिवण खाली ओघळले.

'ल्युबोवला.'

'कोण जाणारे ?' त्याचक्षणी आत येऊन दाराशी हंडा ठेवणाऱ्या मितकाने विचारले.

'श्शेगोलकोव, ऋयुचकोव, श्राचेव, पोपोव, आणि इवानकोव.'

'आणि माझं काय ?'

'तू रहा इथं मितका.'

‘ असं असेल तर जा लेको तुम्ही सगळे खड्ड्यात. ’

‘ ऋयुचकोव कष्टाने चुल्हाण्यापासून बाजूला गेला आणि पाठीची हाडे कडाकडा मोडून आळस देत त्याने घरधन्याला विचारले, ‘ इथून ती जागा किती लांबाय ?’

‘ अडीच तीन मैल असेल. ’

‘ अगदी जवळाय ’ असे म्हणत आस्ताखोव खाली बाकावर बसला आणि त्याने पायातून बूट काढले.

‘ वाळायला ? कुठं टांगू ?’

पहाटेला त्यानी कूच केले. खेड्याच्या आखरीस एक अनवाणी पोर विहिरीतून पाणी शेन्दीत होती. ऋयुचकोवने घोड्याचे लगाम खेचले.

‘ पोरी, प्यायला दे ! ’

घरी शिवलेला आपला झगा वर उचलून ती पोर अनवाण्या पायाने डबक्यातून चालत आली. तिच्या दाट पापण्यांखालचे डोळे लकाकत होते. तिने बादली पुढे धरली. त्या अवजड बादलीचे काठ पकडून ऋयुचकोव पाणी प्याला. त्या भाराने त्याचे हात लटलटत होते. पाणी खाली ओघळून त्याच्या तुमानीच्या तांबड्या पट्ट्यावर सांडले.

‘ घारे डोळेवाली, येशू तुझं रक्षण करो. ’

‘ देवाची जय हो ! ’

हातात बादली घेऊन ती बाजूला झाली. मागे मुरडून ती हसत होती.

‘ हसत्येस ग का ? येत्ये का घोड्यावरून फिरायला ?’ तिच्यासाठी जागा करून दिल्यासारखा ऋयुचकोव जिनातून मागं सरकला.

‘ पुढं चला ! ’ जवळून घोडा फेकीत जाणारा आस्ताखोव ओरडला.

वांचिवने ऋयुचकोवकडे बघून स्मित केले.

‘ तिच्यावरून नजर काढवत नाय ना ?’

‘ कबुतरागत गुलाबी पायायत ! ’ ऋयुचकोव हसून म्हणाला. हुकूम कानी पडल्यागत सर्वांनी मान वळवून बघितले.

ती मुलगी विहिरीवर वाकली होती. तिच्या तंग झग्यात तिच्या नितंबाची विभागती रेषा आणि फाकलेल्या पायाच्या गुलाबी जांघा दिसत होत्या.

‘ आपल्याला लग्न करायला मिळालं तर काय बहार होईल ! ’ पोपोवने सुस्कारा टाकला.

'समज माझ्या चाबकाचं तुझ्यांशी लग्न लावलं तर कसं ?' आस्ताखोवने सुचवले.

'त्याचा काय उपयोग नाय...!'

'अगदी एवढी खाज आली काय ?'

'त्याला धरून बैलासारखा 'बडवायला' हवा.'

आपसात हसत खिदळत कझाक चौक चालीने चालले होते. संथपणे काही वेळ दौड केल्यानंतर ते एका टेंब्याच्या माथ्यावर आले. नदीच्या खोऱ्यात पसरलेले विस्तीर्ण ल्यूबोव खेडे त्यांच्या दृष्टीस पडले. त्याच्या पाठीमागे सूर्योदय होत होता. एका तारेच्या खांबावर बसून एक चंडोल मत्तपणे गात होता.

आस्ताखोवने 'सेक्शन कमांडर' चा अभ्यासक्रम नुक्ताच पूर्ण केला असल्याने त्याला ह्या गटावर नेमण्यात आले होते. टेहळणीचे ठाणे म्हणून त्याने खेड्यातील शेवटच्या वाडीची निवड केली. कारण सरहद्दीला ती जास्तीत जास्त जवळ होती. वाडीचा मालक एक स्वच्छ हजामत केलेला, डोक्यात पांढरी फेल्टहॅट घातलेला पोलीश होता. घोडी बांधण्यासारखे एक मांगर त्याने कझाकाना दाखवले. मांगराच्या मागे क्लोवरचे हिरवे शेत होते. उतारवाटा शेजारील रानात घरंगळत गेल्या होत्या. धान्याच्या पांढऱ्या पट्ट्याचा एका रस्त्याने छेद घेतलेला होता आणि पलीकडे गवतरान पसरले होते. मांगराच्या मागे असणाऱ्या खंदकातून ते आळीपाळीने दुर्बिणी घेऊन टेहळणी करीत. बाकीचे शीतळ सावलीत पडून रहात. खूप दिवस साठवून ठेवलेले धान्य, धूळ भरले तूस, उंदीर ह्यांचे वास आणि दमट मातीचा खरत जाणारा गंध तिथे दाटले होते.

नांगराच्या पलीकडे सावलीचा कोपरा पाहून इवानकोवने हातपाय ताणले आणि संध्याकाळपर्यंत तो झोपून राहिला. सूर्यास्ताच्या वेळी क्रयुचकोव त्याच्याकडे आला आणि इवानकोवच्या मानेवरचे मास चिमटीत धरून सौम्यपणे म्हणाला,

'फौजेचं अन्न गिळून तणावून देतोस होय रे डुकरा ? चल ऊठ ! जा न् जर्मनांवर नजर ठेव !'

'थट्टा पुरे झाली, कोझमा !'

'उठ आधी !'

'अरे, अरे ! थांब की पण ! मी हा उठतोच.'

धडपडत तो पायावर उभा राहिला. त्याचा चेहरा लालेलाल आणि सुजीर दिसत होता. खांद्यावर खंबीर बसलेली आपली थिटी गर्दन त्याने डावीउजवीकडे मोडली, नाक सुंकारीत हुंगल्यागत केले. (दमट मातीत झोपल्याने त्याला सर्दी

झाली होती.' आपली गोलदानी त्याने नीट केली आणि झोळण्याने बंदूक ओढीत त्या मांगराकडे तो निघून गेला. सबंध दुपारभर ' ड्यूटी ' केलेल्या श्शेगोलकोवला त्याने ' सुटी ' दिली आणि दुर्बिण नीट लावून रानाकडची वायव्य दिशा तो न्याहाळू लागला.

वाऱ्यावर हलणारे गव्हाचे दुधी बावर आणि फिर-रानाच्या हिरव्या कड-पट्टीला न्हाऊ घालणारे सूर्य प्रकाशाचे लालबुंद आऊर त्याला दिसू शकत होते. खेड्याच्या पलीकडे असलेल्या टुमदार निळ्या बाकणातील ओढ्यात पोरे पाणी उडवीत आरडाओरड करीत होती.

एका बाईनं जनानी खर्जात साद घातली, ' स्तास्स्या, स्तास्स्या ! इकडं ये! '

श्शेगोलकोवने चुट्टा शिलगावला आणि मांगराकडे परत जाता जाता तो म्हणाला, ' मावळतीचं तेज बघ ! वारं सुटणारसं दिसतंय !'

' तसा रंग दिसतोय खरा !' इवानकोवने मान डोलावली.

त्या रात्री घोडी उपलाणीच उभी होती. खेड्यातील सगळे दिवे बिझले होते. सगळे आवाज विरून गेले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी क्र्युचकोवने इवानकोवला मांगरातून बोलावून घेतले.

' चल गावात जाऊ या !'

' कशासाठी ?'

' काहीतरी नायला मिळेल ! थोडी झोकायला मिळेल !'

' मिळेल ?' इवानकोव साशंक दिसत होता.

' नक्की मिळेल ! मी घरवन्याला विचारलं ! त्या तिथं त्या घरात मिळतं ते कौलारू छप्पर दिसतंय का ?' आपल्या काळ्या नखाची बोटे रोखून क्र्युचकोवने सांगितले. ' तिथल्या यहुदीच्याकडं बीअराय. चल जाऊ या!'

ते निघाले. आस्ताखोवने पाठीमागून त्याना हटकले, ' कुठं निघाला रे तुम्ही ?'

हुद्याने आस्ताखोवला वरिष्ठ असणाऱ्या क्र्युचकोवने त्याला झाडून टाकले, ' आम्ही आत्ता येतो !'

' लौकर या पोरानू !'

' भुंकणं बंद कर तुझं !'

सुरकुतलेल्या पापण्या असलेल्या एका म्हाताऱ्या यहुद्याने त्यांचे लवून स्वागत केले.

' बीअर आहे का ?'

'मुळीच शिल्लक नाही कझाक साहेब !'

'आम्ही दाम देतो त्यासाठी !'

'येशू–मरीया–! जसे काही, मला–! कझाक साहेब, सचोटीच्या यहुद्यावर विश्वास ठेवा ! माझ्याजवळ आणखी बीअर नाही !'

'खोटं बोलतोयस् यहुद्या !'

'कझाक साहेब, खरंच सांगतो ...!'

'हे बघ !', चिडून त्याला मधेच अडवीत क्रयुचकोव म्हणाला, तुमानीच्या खिशातून त्याने एक कळकट कसा बाहेर काढला.

'आम्हाला थोडी बीअर दे नायतर मी रागाला येईन !'

यहुद्याने ते नाणे आपल्या तळहात आणि करंगळीत दाबले. आपली वेडीवाकडी पापणी खाली झुकवली आणि तो बोळकंडीत गेला.

एका मिनिटाने तो व्होडकाची बाटली घेऊन आला. बाटली दमट आणि वार्ली तुसाचे पलिस्तर लावलेली होती.

'अन् म्हणे माझ्याकडं काय नाय ! हत तुझी थेरड्या–!'

'मी म्हणालो बीअर नाही म्हणून !'

'खायला दे काहीतरी !'

बूच उडवण्यासाठी क्रयुचकोव बाटलीच्या बुडाला थापट्या हाणू लागला. स्वतःसाठी कपभर व्होडका त्याने ओतून घेतली.

अर्धवट झिंगून ते बाहेर पडले. क्रयुचकोव नाचत उडत चालला होता. खिडक्यांच्या काळोख्या रिकाम्या खोबणांच्या दिशेने आपला गुद्दा हालवीत होता.

मांगरात आस्ताखोव जांभया देत बसला होता. भिंतीच्या मागे घोडी दमट वैरण रवंथ करीत होती.

दिवस सुस्तीत निघून गेला. दुपारी पोपोवला स्क्वाड्रनकडे रिपोर्ट घेऊन पाठवण्यात आले.

सायंकाळ रात्र. कावळ्या चंद्राची पिवळी कोर खेड्याच्या डोक्यावर आली होती बागेतील झाडावरून मधून मधून पिकलेले सफरचंद आली पडले की मऊ रप्‌कनसा आवाज घुमत होता.

इवानकोव पहारा देत असताना मध्यरात्रीच्या सुमारास त्याने खेड्यातील रस्त्यावर घोड्यांच्या टापा ऐकल्या. बघण्यासाठी तो सरपटत खंदकातून बाहेर आला. पण चंद्र ढगात गुरफटला गेला होता आणि अभेद्य अंधारातून त्याला

काही दिसू शकत नव्हते. त्याने जाऊन दारापाशी झोपलेल्या क्रयुचकोवला उठवले.

'कोझमा ! घोडेस्वार येतायत् ! उठ !'

'कुठून ?'

'गावातून !'

ते बाहेर आले. सुमारे शंभर यार्डावर रस्त्यावरून टापांचा खडखडाट स्पष्टपणे ऐकू येत होता.

'आपण बागेत जाऊ या ! तिथून आपल्याला जास्त चांगलं ऐकायला येईल !'

झोपडीच्या अंगावरून ते पुढील दारच्या परसबागेकडे धावत गेले आणि कुपाटीजवळ दबून बसले. रिकिबींची खणखण आणि जिनची करकर जवळ जवळ येत होती. एका ओळीत चाललेल्या चार स्वारांच्या रेषाकृती आता त्याना दिसू लागल्या.

'कोणाय ?'

'तुला काय करायचंय ?' पुढच्या रांगेतून एका आवाजाने रशियनमध्ये उत्तर दिले.

'कोणाय ? गोळी घालीन !' क्रयुचकोवने बंदुकीचा बोल्ट खडखडवला.

त्यापैकी एका स्वाराने घोड्याचा लगाम खेचला आणि त्याला कुपाटीच्या दिशेला वळवला.

'आम्ही सरहद्द हशम आहोत. तुम्ही कोण ? मोर्च्याचे ठाणेकर ?'

'होय !'

'कुठलं रेजिमेन्ट ?'

'तिसरं कझाक...!'

'कुणाशी बोलतोयस रे मिशीन ?' अंधारातून एका आवाजाने पृच्छा केली.

कुपाटीजवळच्याने उत्तर दिले, 'इथं कझाकांचं मोर्चा ठाणाय हुजूर !'

दुसऱ्या स्वाराने कुपाटीजवळ घोडा आणला.

'कझाकानू नमस्ते !'

'नमस्ते !' इवानकोवने सावधपणे उत्तर दिले.

'बरेच दिवस इथं आहात काय ?'

'कालपासून आहोत !'

दुसऱ्या स्वाराने काही ओढून चुट्टा पेटवला. त्या क्षणभरच्या उजेडात क्र्युचकोवला सरहद्द रखवालीचा अंमलदार दृष्टीला पडला.

'आमचं रेजिमेन्ट मागं घेतलं जातंय. अंमलदार चुट्टा ओढीत म्हणाला, 'नीट लक्षा ठेवा की आता तुमचं ठाणं म्हणजे सर्वांत दूरचं मोर्चाठाणं आहे! उद्या गनिम बहुधा पुढ येईल!' त्याने वळून आपल्या स्वाराना पुढे चलण्याचा हुकूम दिला.

'तुम्ही कुठं चाललात हुजूर?' बंदुकीच्या घोडयावरील बोट तसेच ठेवून क्र्युचकोवने विचारले.

'इथून कोस सव्वा कोस असणाऱ्या आमच्या स्क्वाड्रनला जाऊन आम्ही मिळणार आहोत. चला रे पोरानू! पुढं घेऊ या! कझाकानो यशवंत व्हा!'

'यशवंत व्हा!'

त्याच क्षणी वाऱ्याने चंद्रावरचा ढगाचा झगा निष्ठूरपणे ओरबाडून काढला आणि ते खेडे, बागा. झोपडीचे चौढाळ छप्पर आणि टेकडीवर चढणारे सरहद्द रखवालीचे ते पथक ह्याच्यावर विषण्ण पिवळया प्रभेचे क्षाडर लोटले.

दुसऱ्या दिवशी वर्चोव मागे स्क्वाड्रनकडे रिपोर्ट घेऊन दौडत गेला. रात्री घोडी तंगबार उभी होती. गनिमाशी मुकाबला करण्याला आपण मागे राहिल्याच्या विचाराने कझाक थराहून गेले. आपल्या पुढे सरहद्द रखवालीचे सैनिक आहेत. हे ठाऊक होते तोपर्यंत त्याना बिलगतेची किंवा एकाकीपणाची भावना जाणवली नव्हती. पण आता सरहद्द उघडी पडलेली आहे ह्या बातमीचा त्यांच्यावर चांगलाच परिणाम झाला.

आस्ताखोवने त्या पोलीस शेतकऱ्याशी बोलणे केले आणि लहानशा रकमेच्या बदली त्याना घोडयांसाठी क्लोवरची कापणी करून देण्याला तो माणूस राजी झाला. त्या पोलीश माणसाचे कुरण मांगरापासून फारसे दूर नव्हते. आस्ताखोवने इवानकोव आणि श्शेगोलकोवला कापणी करण्यासाठी पाठवले. घोक्यावर पांढरी गवती हॅट घातलेल्या मालकाने त्याना आपल्या कुरणाकडे नेले. श्शेगोलकोवने कापणी केली आणि इवानकोवने ओलसर अवजड गवत दाताळयाने लोटून त्याचे भारे बांधले होते.

ते हे काम करीत असताना आस्ताखोव दुर्बिणीतून सरहद्दीकडे गेलेल्या रस्त्याचे निरीक्षण करीत होता. नैऋत्येला असणाऱ्या शेतापलीकडून एक पोरगा धावत येत असलेला त्याने पाहिला. एकाद्या उदी ससाप्रमाणे ते पोर टेकडीवरून खाली धावत येत होते. काही अंतरावर आल्यावर त्याने ओरडून आपल्या कोटाची

लांब बाही हलवली. धापा टाकीत तो आस्ताखोवपाशी आला डोळे गरागरा फिरवीत तो धपापत बोलू लागला,

'कझाक ! कझाक ! जर्मन ! जर्मन येतायत !' आपल्या हाताची लांब बाही हलवीत त्याने खूण करून दाखवले. डोळ्याला दुर्बिण लावलेल्या आस्ताखोवला दूरवर तुरुपांचा एक पुंजका दिसला. डोळ्यावरची दुर्बिण दूर न करता तो ओरडला, 'क्रयुचकोव.'

इकडे तिकडे बघत क्रयुचकोव मांगारातून अवतीर्ण झाला.

'पळ पोरांना हाक मार ! जर्मन गस्तीहशम येतायत.'

क्रयुचकोव झपाट्याने पळाल्याचे त्याने ऐकले. गवत रानाच्या करडलाशा पट्ट्यापलीकडून तुरुपाचा एक गट आता त्याला स्पष्ट दिसू लागला होता. त्यांच्या घोड्यांचा उदी रंग आणि त्यांच्या गणवेशाची गर्द निळी झाक हे सुद्धा त्याला आता स्पष्ट दिसत होते. त्यांची संख्या विसाहून जास्त होती आणि बंदिस्त जुटीने ते त्याच्या अपेक्षेप्रमाणे बायव्येकडून नव्हे तर नैऋत्येकडून येत होते. त्यानी रस्ता पार केला आणि ते खेडे ज्या खोऱ्यात होते त्याच्या दांडीने ते पुढे येऊ लागले.

जोरजोराने धापा टाकीत आणि घट्ट आवळलेल्या ओठातून जिभेचे टोक बाहेर काढून कवेत मावेल एवढे गवत इवानकोव वैरणीच्या पोत्यात दामटून भरत होता. फेंगड्या पायांचा तो पोलीश माणूस जवळच पाईप चोखीत उभा होता, आपले हात त्याने पट्ट्यात खुपसले होते आणि टोपीच्या काठाखालून तो गवत कापणी करणाऱ्या श्शेगोलकोवकडे बघत होता.

'ह्याला काय कोयता म्हणतात काय ?' खेळण्यातील वाटावी अशी ती कोयती घेऊन जोरजोरात हातवारे करीत श्शेगोलकोव गुरगुरला, 'ह्यानं गवत कापणी करतोस होय ?'

'मी गवतकापणी करतो !' पोलने उत्तर दिले आणि पट्ट्यातून एक बोट बाहेर काढले.

'ही कोयती म्हणजे बाईची भादरायच्या कामाची आहे !'

'हां हां !' पोलने मान डोलावली.

इवानकोव फिदीफिदी हसला. तो काहीतरी बोलणार होता, पण त्याने आजुबाजूला पाहिले तर त्या खडबडीत नांगरटीवरून क्रयुचकोव धावत येत होता. त्याचा हात त्याच्या तलवारीवर होता.

'ठेवून द्या !' येता येता तो ओरडला.

'काय भानगडाय ?' कोयतीचे टोक जमिनीत खुपसत श्शेगोलकोवने विचारले.

'जर्मन !'

इवानकोवने गवताची पेंड खाली टाकून दिली. आताच जणू काय गोळ्या डोक्यावरून सुसाटत चालल्यागत त्या पोलने खाली वाकून घराकडे धूम ठोकली.

ते मांगराकडे पोचून आपल्या घोड्यावर उड्या घेतात न घेतात तोच त्याना रशियन सैनिकांची एक कंपनी नजरेला पडली. पेलिकालिएच्या दिशेने ती खेड्यात शिरत होती. कझाक भरधाव दौडत त्याना गाठायला गेले. टेकडीमार्गे जर्मनांची तुकडी खेड्याकडे येत असल्याची वर्दी आस्ताखोवने कंपनी कमांडरला दिली.

त्याच्या बुटाच्या धूळ भरल्या चवड्याचे भेदक निरीक्षण करीत कॅप्टनने विचारले ' किती आहेत ते ?'

' विसाहून जास्त !'

'त्यांची पिछाडी तोडा ! इथून आम्ही त्यांच्यावर गोळी चालवतो !' आपल्या कंपनीकडे वळून त्याने बुरूजबंदीचा हुकूम सोडला आणि झपाट्याने त्याना आपल्या मागोमाग त्याने पळविले.

कझाक टेकडीच्या माथ्यावर पोचेपर्यंत जर्मन त्यांच्या आणि पोलिकालिए च्या मधोमध आले होते. अवगी चालीवर ते पुढे जात होते आणि बिनीला एका लांड्या शेपटीच्या तुर्कीलाखोरीवर मांड घेतलेला अंमलदार होता.

'पिछा करा ! आपल्या दुसऱ्या मोर्चेठाण्याकडं त्याना हाकलायचं !' आस्ताखोवने हुकूम दिला.

खेड्यात त्याना येऊन मिळालेले तुरूप सरहद्द रखवाल मागे रेंगाळले.

'काय झालं ? आम्हाला सोडून जाताय का रे भाऊ ?' जिनातून मागे मुरडून बघत आस्ताखोव ओरडला.

सहहद्द रखवालानी निष्काळजीपणे हात झटकले आणि पैदळ चालीने ते खाली खेड्यात गेले. कझाकानी घोड्याना टांचा मारल्या. जर्मन रिसाल्याचे निळे गणवेश स्पष्ट दिसत होते. आपल्या मागून येणारे कझाक त्याच्या दृष्टीला पडले होते आणि चौक चालीने ते दुसऱ्या रशियन मोर्चेठाण्याच्या दिशेने दौडत होते. ल्यूबोव खेड्याच्या मागे कोसभर अंतरावर ते ठाणे होते. दोन पक्षातील अंतर खूपच घटले होते.

'त्यांच्यावर गोळी चालवायची.' जिनावरून उडी घेत आस्ताखोव ओरडला.

लगामाचा फासा दंडाभोवती घेऊन कझाक उभे राहिले आणि गोळ्या

चालवू लागले. बाराच्या आवाजाने इवानकोवचे घोडे मागच्या पायावर उभे राहिले आणि तो डोक्यावर खाली आदळला. पडता पडता त्याने पाहिले की त्यातला एक जर्मन प्रथम एका बाजूला कळला. नंतर आपले हात सताड पसरून तो जीवनातून खाली कोसळला. इतर थांबलेही नाहीत का आपल्या जेजाली त्यानी खांद्यावर लटकावलेल्या झोळण्यातून काढल्याही नाहीत. ते तसेच बेतर-तिबीने चौखूर उधळत होते. त्यांच्या भाल्यावरील बावटे वाऱ्यावर फडफडत होते. सर्वांत आधी घोडयावर मांड घेतली ती आस्ताखोवने. कझाक आपले चाबूक चालवीत होते. जर्मनानी डावीकडे पलटा घेतला आणि त्यांच्या पाठीवर येणारे कझाक खाली कोसळलेल्या त्या तुरुपाच्या जवळून गेले. पलिकडे मधून मधून उथळ घळी असलेला उंच सखल प्रदेश होता. प्रत्येक घळीच्या पलिकडे जर्मन गेलेले पाहून कझाक पायउतार झाले आणि त्यानी गोळी चालवायला सुरुवात केली. जरा पुढे आणखी एक जर्मन कोसळला.

'कोसळला !' रिकिबीत पाय टाकीत क्रयुचकोव ओरडला.

'तिकडच्या वाडीतून आमचे कझाक एका मिनिटात येतील. तो दुसरा मोर्चाय !' आपल्या तंबाखूने डागळलेल्या बोटानी बंदुकीच्या शिलेखणीत गुलसानीचा हूक कोंबीत अस्ताखोव कुजबुजला.

जर्मन आता दुडक्या चालीने चालले होते. वाडीच्या जवळून दौडत जाताना कझाकानी त्या दिशेला पाहिले. पण तेथे शुकशुकाट होता. कौलारू छपरावर उन्ह हावऱ्यासारखे चटमटत होते. नंतर त्याना समजले की सुमारे सहाशे यार्डावर टेलिग्रफच्या तारा कापल्याचे लक्षात येऊन आदल्या रात्री हा मोर्चा काढून घेण्यात आला होता.

जर्मनाच्या दिशेने आस्ताखोवने आणखी एक गोळी झाडली आणि त्यांच्यापैकी जो एकजण किंचित मागे पडलेला होता त्याने मान हलवली आणि घोड्याला टाच मारली.

आपल्या मागून येणाऱ्यांच्याकडे मुरडून बघत आस्ताखोव गरजला, 'त्याना पहिल्या मोर्चाकडं पिटाळायचं !' त्या हुकमाची तामिली करताना एवानकोवच्या लक्षात आले की, आस्ताखोवचें नाक सोलले गेलेले असून कातडयाचा एक तुकडा त्याच्या नाकपुडीतून लोंबत आहे.

'मागं वळून त्यानी स्वतःचा बचाव का नाय केला ?' पाठीवरची बंदूक सावरीत त्याने चिंतेने विचारले.

'दम धर न बघ !' उरी फुटलेल्या घोड्यागत धापा टाकीत श्शेगोलकोव गुरगुरला.

जर्मन घळीत शिरले आणि दिसेनासे झाले. पलीकडच्या बाजूला नांगरलेली जमीन होती. अलीकडच्या बाजूला झाडीझुडुप आणि मधुन मधून निकुंज होते. आस्ताखोवने घोड्याचे लगाम खेचले. आपली टोपी मागे सरकावली आणि पालथ्या हाताने घाम पुसला. इतरांच्याकडे त्याने पाहिले. तो पचकन थुंकून म्हणाला, ' इवानकोव तू घोडा खाली ने आणि ते कुठं गेले बघ!'

तोंड लालबुंद होऊन गेलेल्या, पाठीत घामाने भिजलेल्या इवानकोवने पापुद्रा सुटलेल्या ओठावरून तृषार्त जीभ फिरवली आणि तो दौडत गेला.

'सालं चुट्टा प्यायला मिळायला पाहिजे !' चाबकाने गोमाशा हाकलीत क्रयुचकोव पुटपुटला.

इवान कोवने संथपणे कपारीत घोडे घातले. रिकिबीत उभा राहून तो तळापल्याड निरखू लागला. एवढ्यात भाल्याची चकाकती टोके त्याच्या दृष्टीस पडली. मग जर्मन दृष्टीपथात आले. त्यांनी घोडी वळवली होती आणि हल्ला चढवण्यासाठी ते परत उंटक चढून येत होते. त्याचा अंमलदार बिनीवर होता. आपला भाला त्याने दिमाखात उंचावला होता. घोडे फिरवताना जे काही सेकंद लोटले असतील तेवढ्या वेळात त्या अंमलदाराचा तंद्री लागलेला, स्वच्छ हजामत केलेला चेहरा आणि जिनात त्याने घेतलेली ऐटबाज मांड ह्या गोष्टी इवानकोवच्या स्मृतीत कोरल्या गेल्या. जर्मन घोड्यांच्या टापांच्या गर्जितांनी त्याचे मन फटकारले. काळाच्या थंड बोचऱ्या सणकेची त्याच्या पाठीला अगदी क्लेशदायक जाणीव झाली. आरडा ओरडा न करता त्याने घोडा फिरवला आणि इतरांच्या दिशेने मागे तो दौडत गेला.

आपली तंबाखूची चंची खिशात ठेवायलाही आस्ताखोवला पुरती फुरसत झाली नाही. इवानकोवच्या पाठीवर जर्मन येताहेत हे पाहून त्यांना भिडायला सर्वात आधी क्रयुचकोव खाली दौडत गेला.

उजव्या फळीचे तुरूप इवानकोवला छाटण्यासाठी बाजूने घोडी फेकीत येत होते आणि विलक्षण झपाट्याने त्यांनी त्याला गाठले. इवानकोव घोड्याला चाबकाने फोडीत होता. त्याच्या चेहऱ्यावरून वेड्यावाकड्या रेषांचा थरकाप उडत होता. डोळे बाहेर उसळी घेऊ बघत होते. खोगिराच्या मुदीवर वाकून आस्ताखोव झपाट्याने पुढे आला. घोड्याच्या मागोमाग उदी धुरळा उकळ्या घेत उडाला. 'कोणत्याही क्षणी ते मला पकडणार !' ह्या बधीर करणाऱ्या विचाराने इवानकोवच्या मनाची पकड घेतली. प्रतिकार दाखवण्याचेही त्याला सुचले नाही.

आपल्या धिप्पाड देहाचे त्याने मुटकुळे वळले आणि त्याचे डोके घोड्याच्या आयाळीला भिडलें होते.

एका धिप्पाड लालतोंड्या जर्मनाने त्याला गाठले आणि त्याच्या पाठीत भाळा खुपसला. भाल्याचे कांत इवानकोवचा कातडी पट्टा फाडून बाजूला सरकले आणि इंचभर त्याच्या शरीरात घुसले.

'भाऊ, मागं फिरा!' तलवार उपशीत तो पागलपणे ओरडला. कुशीचा नेम धरून आलेला दुसरा वार त्याने चुकवला आणि डाव्या अंगाने त्याच्या अंगावर चालून येणाऱ्या जर्मनाला त्याने खांडला. दुसऱ्याच क्षणी तो वेढला गेला. एका दणकट जर्मन घोड्याने त्याच्या जनावराच्या कुशीत टक्कर घेतली आणि ते त्याच्या मांडीखालून जवळ जवळ निसटलेच. गनिमाच्या तोंडाचे भयानक, सारवलेले लगटते, दृश्य इवानकोवच्या दृष्टीस पडले.

त्या गर्दीत पहिला पोचला तो आस्ताखोव. त्याला त्यानी पिटाळून लावलं. त्याने आपली तलवार गरगरा नाचवली. आणि जिनात एकाद्या वामेसारखा तो मुरडला. त्याचा चेहरा पालटून रुद्र झाला. इवानकोवच्या गर्दनीत भाल्याच्या कोंत्याचा वार झाला. डाव्या बाजूने एक तुरूप त्याच्या अंगावर आला. त्याच्या डोळ्यात पोलादाची भयंकर चमक होती. आपल्या तलवारीने त्याने प्रत्याघात केला. पोलाद पोलादावर खणखणले. मागून आलेला भाला त्याच्या खांद्याच्या पट्टीत अडकला आणि जीव खाऊन दाबला गेला. त्यामुळे ती पट्टी फाटून निघाली. त्याच्या घोड्याच्या डोक्यापलीकडे एक प्रौढ जर्मनाचे घामाने डबडबलेले आरक्त डागाळलेले तोंड दिसत होते. आपला भाला इवानकोवच्या छातीत नेण्याला तो झटत होता. पण तो भाला काही पोचेना. तेव्हा तो टाकून देऊन तो जर्मन पिवळ्या खोगीराच्या चामडी पिशवीतून कडाबीन उपसू लागला. त्याचे किलकिले डोळे इवानकोवच्या चेहऱ्यावर खिळले होते. पण कडाबीन सोडवणे काही त्याला जमले नाही. कारण त्याच्या घोड्यापलीकडून क्र्युचकोवने त्याला भाल्याने टिपला. आपल्या छाताडातून भाला उपसून काढीत तो जर्मन मागे कोसळला. भयाने आणि आश्चर्याने असे तो रेकला. 'माइनगोट!'

क्र्युचकोवला जित्ता पकडण्यासाठी आठ पुरुषांनी त्याला वेढला. पण आपल्या घोड्याला मागच्या पायावर उभा करून तो त्याच्या हातातील तलवार त्यानी खाली पाडेपर्यंत झुंजत राहिला. एका जर्मनाच्या हातातील भाला त्याने हिसकावून घेतला आणि जणू कवायतीच्या मैदानावर असल्यासारखा तो तो भाला नाचवू लागला. मागे हटलेले जर्मन त्या भाल्यावर आपल्या तलवारींचे घाव

घालीत होते. त्या भयाण शेडाच्या नांगरल्या मातीत त्यांची दाट जूट झाली होती. त्या धुमश्चक्रीत वाऱ्याने हलवल्यागत ती जूट खदखदत आंदोळत होती

अरबगतीने पिसाट झालेले कझाक आणि जर्मन रेटारेटी करीत होते. सापडेल त्याच्यावर पाठीवर, दंडावर, घोड्यावर आणि शस्त्रांवर घाव घालीत होते. प्राणांतिक भयाने घोडी एकमेकाना भिडली होती, लाथा झाडीत होती. आत्मविश्वास काही अंशी परत मिळवलेल्या इवानकोवने मघा त्याच्या अंगावर कोसळलेल्या लांबोड्या तोंडाच्या, पिंगट केसांच्या जर्मनावर घाव घालायचे अनेकदा प्रयत्न केले, पण त्याची तलवार त्या माणसाच्या शिरस्त्राणावर आदळून घसरून जाई.

रक्ताने निथळणाऱ्या आस्ताखोवने ते कडे फोडले आणि घोडा फेकीत तो मोकळा झाला. जर्मन अंमलदार त्याच्या पाठीवर दौडू लागला. खांद्यावरील बंदूक ओरबाडून काढून आस्ताखोवने अगदी सरळ निशाणावर गोळी घालून त्याला ठार मारले. ह्यामुळे त्या हातघाईला कलाटणी मिळाली. आपला कमांडर गमावलेले आणि अवघड घावानी जखमी झालेले जर्मन पांगले आणि पळू लागले. कझाकानी त्यांचा पीछा केला नाही. त्यांच्या पाठीवर त्यानी गोळयाही झाडल्या नाहीत. पेलिकालिए इथे असणाऱ्या आपल्या स्क्वाड्रनकडे ते थेट मागे दौडत गेले.

जर्मनानी आपला एक घायाळ साथी उचलला आणि सरहद्दीकडे त्यानी पलायन केले.

सुमारे सहाशे यार्ड गेल्यावर इवानकोव जिनावरून डळमळू लागला.

'मी-! मी-! पडणार!' त्याने घोडा उभा केला, पण आस्ताखोव आपल्या घोड्याचे लगाम खेचीत ओरडला, 'चल चल!'

क्र्युचकोवने तोंडावरील रक्त फासल्यासारखे केले आणि छाती चाचपली. त्याच्या सदऱ्यावर दमट किरमिजी ठिपके दिसू लागले होते. दुसऱ्या मोर्च्याचे ठाणे जिथे होते, तिथे ह्या मंडळींचे कोणत्या वाटेने जायचे ह्याबद्दल मतभेद झाले.

'उजवीकडे!' आल्डर रानाच्या हिरव्या दलदलीच्या जमिनीकडे खूण करीत आस्ताखोव म्हणाला,

'नाय! डावीकडे!' क्र्युचकोवने आग्रह धरला.

त्यांची फाटाफूट झाली. क्र्युचकोव आणि श्शेगोलकोवच्या नंतर आस्ताखोव आणि इवानकोव रेजिमेन्टच्या ठाण्यावर आले. त्या स्क्वाड्रनचे कझाक आपली वाट बघताहेत असे त्याना आढळून आले इवानकोवने लगाम टाकून दिले आणि

जिनातून खाली उडी घेतली. त्याचे झोकांड गेले आणि तो खाली पडला. त्याने गच्च आवळलेल्या बोटातून त्याच्या तलवारीची मूठ इतरानी मोठ्या प्रयासाने सोडवली.

तो जर्मन अंमलदार पडला होता त्या जागी अर्ध्या तासात जवळ जवळ अख्खे स्क्वाड्रन जाऊन पोचले. कझाकानी त्याचे बूट, कपडे आणि हत्यारे काढून घेतली. त्या मयताच्या रागेजल्या पिवळट चेहऱ्याकडे बघत ते घोळका करून उभे राहिले. त्यातील एकाने हिकमतीने त्या अंमलदाराचे चंदेरी झाकणातील घड्याळ ताब्यात घेतले आणि तिथल्या तिथेच आपल्या ट्रूप सार्जंटला विकून टाकले. त्याच्या जवळच्या थैलीत त्याना काही सापडले. थोड्या चलनी नोटा, एक पत्र, पिंग्या केसांची एक बट आणि एका दिमाखदार हसऱ्या मुलीचा फोटो !

९.

पुढे ह्या चकमकीचे रूपांतर शर्थीच्या पराक्रमात करण्यात आले. स्क्वाड्रन कमांडरच्या मर्जीत असणाऱ्या क्र्युचकोवला सेंट जॉर्ज पदक मिळाले. त्याचे साथी अंधारातच राहिले. ह्या वीराची डिव्हिजनल स्टाफच्या मुख्य ठाण्याकडे बदली करण्यात आली. युद्ध संपेपर्यंत तिथे हा ख्याली खुशालीत राहिला. त्याला भेटायला पिटर्सबर्ग आणि मॉस्कोहून वजनदार महिला आणि अंमलदार येत होते म्हणून त्याला आणखी तीन पदके मिळाली.

ह्या महिला 'अय्या !' 'अगबाई !' करीत आणि ह्या डॉन कझाकाला महागड्या सिगरेटस् आणि चॉकलेटच्या चटकदार भेटी देत. सुरुवातीला त्या सर्वाना तो सैतानाच्या नावाने शिव्या घालायचा पण अंमलदाराचे गणवेश परिधान केलेल्या पदस्थ हलकटांच्या प्रभावाचा कृपाप्रसाद मिळाल्यावर त्याने त्याचा किफायतशीर धंदा केला. आपल्या 'पराक्रमाची' कथा तो गडद रंग भरून सांगू लागला. विवेकाची त्याला यत्किंचितही टोचणी जाणवत नसे. ती कथा ऐकताना ह्या महिला तल्लीन होत आणि ह्या कझाक वीराच्या देवीने डागाळलेल्या पुंड चेहऱ्याकडे कौतुकाने टक लावून बघत. सगळेजण संतुष्ट आणि सुखी होते.

झारने मुख्य ठाण्याला भेट दिली. त्याला 'दाखवण्या' साठी क्र्युचकोवला

त्याच्याकडे नेण्यात आले. डोळ्यावर झापड आलेल्या बादशहाने कचुचकोवकडे एकाद्या घोड्याकडे पाहावे तसे पाहिले. आपल्या जड पापण्यांची उघडझाप केली आणि त्या कझाकाच्या खांद्यावर शाबासकी दिली.

'उमदा कझाक पोर आहे !' असा अभिप्राय व्यक्त करून तो आपल्या लव्वाजम्याकडे वळला आणि त्याने सोडावॉटरची मागणी केली.

वर्तमानपत्रे, मासिकातून कचुचकोवच्या केसाची झुपकेदार बट सतत छापून येत होती. कचुचकोव छापाच्या सिगरेटी निघाल्या. निझनीनव्हगोरदच्या व्यापाऱ्यानी त्याला सुवर्णमंडित तलवार भेट म्हणून दिली.

आस्ताखोवने ठार मारलेल्या जर्मन अंमलदाराचा काढून घेण्यात आलेला गणवेश एका देवदारी फळीला ठोकण्यात आला. जनरल वॉन रेनेनकांफने तो आपल्या गाडीत ठेवला. इवानकोव आणि जनरलचा अॅडजुटंट ही फळी हातात धरून बसत. मग आघाडीवर निघालेल्या कवायत करणाऱ्या सैनिकांपुढून ती गाडी नेण्यात येई. जनरल लॉन रेनेनकांफ सरकारी भाषेतील अंगवळणी पडलेली उद्दीपक भाषणे करीत.

आणि खरोखर घडले होते काय? आपल्यासारखाच एक असणाऱ्या दुसऱ्या माणसाला ठार मारण्याचे कसब ज्यानी अद्याप संपादन केलेले नव्हते ते सैनिक मृत्युक्षेत्री कवटाळत्या प्राणांतिक भयापोटी एकमेकांवर तुटून पडले होते. परस्परावर त्यानी आंधळेपणाने घाव घातले होते. एकमेकाना झोडपून काढले होते. एकमेकाना आणि एकमेकांच्या घोडयाना त्यानी घायाळ केले होते आणि नंतर आपल्यातील एकाचा जीव घेणाऱ्या गोळीचा आवाज ऐकून ते मोहरा वळवून पळून गेले होते ! नैतिकदृष्टया लुळे होऊन ते घोड्यावरून पसार झाले होते !

आणि ह्याला म्हटले जात होते शर्थीचा पराक्रम !

१०.

एका अनावर सर्पाचे रूप आघाडीला अद्याप यावयाचे होते. सरहद्दीवर रिसाल्यांच्या चकमकी आणि लढाया पेटत होत्या. युद्ध घोषीत झाल्यानंतरच्या

आणि सुरुवातीच्या दिवसात जर्मन लष्करी अधिकाऱ्यानी बुलन्द रिसाले पथकाच्या रुपाने खडे टाकून पाहिले. सरहद्द ठाण्यावरून झपाटयाने निघून जाऊन ती पथके रशियन सैन्यात घबराट निर्माण करीत आणि त्यांच्या सैन्याचा रागरंग आणि संख्येबद्दल बातम्या काढीत. जनरल कालेदिनच्या अधिपत्याखालील बाराव्या रिसाला डिव्हिजनचे संरक्षण आठव्या रशियन सेनादळाला देण्यात आलेले होते. त्यांच्या डाव्या फळीवरील अकराव्या रिसाला डिव्हिजनने ऑस्ट्रियन सरहद्द ओलांडून आगेकूच केले होते. परंतु लेशनुव आणि ब्रोदी सर केल्यानंतर त्याना रोखण्यात आले होते. कारण त्यावेळेपर्यंत ऑस्ट्रियनाना हंगेरियन रिसाल्याची कुमक आलेली होती. हंगेरियन रिसाला रशियन पथकावर तुटून पडला आणि ब्रोदीच्या दिशेने ह्या पथकाना त्यानी मागे रेटले.

त्याच्या पहिल्या लढाईपासून ग्रिगरी मेलिखोवला अंतरीची एक भयाण वेदना छळत होती. तो खूपच हाडाडला. संचलनाच्या वेळी, विश्रांती घेताना झोपलेला असताना किंवा जागा असताना त्याला कटंजनाजवळ त्याने ठार मारलेल्या ऑस्ट्रियनचा चेहरा आणि आकृती अनेकदा दिसत असे. झोपेत तो त्या पहिल्या लढाईचा अनुभव पुन: पुन्हा घेत होता. एवढेच काय पण भाला गच्च पकडलेल्या आपल्या उजव्या हाताच्या थरथरत्या पेटक्याची भावनाही त्याला जाणवत असे. तो जागा होऊन रग लागेपर्यंत गच्च मिटून घेतलेल्या डोळ्यांवर हाताचा आडोसा धरून आवेशाने हे स्वप्न पिटाळून लावी.

निसवलेले धान्य रिसाल्याने मातीत तुडवले. शेतांवर घोड्यांच्या टापांच्या तप्तमुद्रा ठोकल्या. जणूकाही झोडपत्या गारांच्या वादळात गॅलिशिया धुवून गेले होते. सैनिकांच्या अवजड बुटांखाली रस्ते तुडवले गेले. खडी ओरबाडून निघाली. ऑगस्ट महिन्यातील चिखल घुसळला गेला. धरणीचे उदासवाणे मुख गोळ्यानी मातांच्या वणांसारखे डागाळून गेले. लोखंडाचे आणि पोलादाचे तुकडे तिथे गंजत पडले. माणसाच्या रक्तासाठी ते तळमळत होते. रात्री लालबुंद ज्वाळा-प्रकाशाने क्षितिज प्रदीप्त व्हायचे. झाडे, खेडी, गावे वळवातील विद्युल्लतेप्रमाणे झगमगत. फळे जेव्हा पाडाला येतात आणि धान्य जेव्हा तयार होते त्या ऑगस्ट महिन्यात आकाशाला स्मितहीन करडेपणा आला होता. दुर्मिळ निरभ्र दिवस बेचैन आणि गदमदलेले होते.

ऑगस्ट महिना संपत आला होता. रायातील पाने पिवळी पडली. त्यांच्या देठांपासून एक शोकार्त जांभळटपण पसरले. दुरून पाहणाराला असे भासत होतें

की झाडे जणू जखमानी घायाळ झालेली आहेत त्यांना मरणातीक रक्तस्त्राव होतोय.

आपल्या साथीदारात पडलेले फरक ग्रिगरी कुतुहलाने निरखीत होता. गालावर नालाची निशाणी घेऊन प्रोखोर झीकोव इस्पितळातून परतला होता. वेदना आणि अबरगत त्याच्या ओठांच्या कोपऱ्यांत रेंगाळत होती. त्याचे वासरागत डोळे पूर्वीपेक्षा जास्तच उघडमीट करू लागले होते. येगोर झारकोव शिवीगाळीची एकही संधी सोडत नव्हता. तो जास्तच अर्वाच्य बनला होता आणि जगातील यच्चयावत गोष्टीवर चिडून गेला होता. ग्रिगरीच्याच खेड्यातील गंभीर आणि कार्यक्षम असणारा येमीलियान ग्रोशेव वरमल्यागत दिसत होता. त्याचा चेहरा काळवंडला होता तो कसनुसे आणि खिन्न हसायचा. प्रत्येक चेहऱ्यावर बदल दिसत होते. युद्धाने पेरलेल्या शोकबीजाना प्रत्येकजण आतून खतपाणी घालून जोपासीत होता.

तीन दिवसांच्या विश्रांतीसाठी रेजिमेन्ट आघाडीवरून मागे घेण्यात आले आणि डॉनवरून आलेली कुमक त्यांच्या जागी पाठवण्यात आली. ग्रिगरीच्या स्क्वाड्रनमधील कझाक जवळच्या तळ्यात पोहायला निघाले होते. त्याच सुमारास सुमारे कोसभर अंतरावर असणाऱ्या ठाण्यावरून आलेल्या मोठ्या रिसाला दलाने खेड्यात प्रवेश केला.

तळ्याच्या बांधावर हे सैनिक पोचेपर्यंत ह्या रिसाल्याची घोडी टेकडी उतरून येत होती. प्रोखोर झीकोव अंगावरून आपला सदरा ओढून काढीत होता. त्यावेळी वर नजर जाताच तो तसाच टक लावून बघू लागला आणि उद्गारला,

‘ते कझाक आहेत. डॉन कझाक.’

चौथ्या स्क्वाड्रनचा मुक्काम होता त्या वाडीत हळूहळू शिरणारी पहळ ग्रिगरी न्याहळू लागला.

‘नक्की राखीव फौजेचे लोक.’

‘आपल्याला कुमक आल्येय.’

‘दुसरी शिबंदी दिसत्येय.’

‘अरे, ते पहा पोरानू! तो नक्की स्तिपान आस्ताखोवाय! होय का नाय? पुढून तिसऱ्या रांगेत! तो पहा!’ असे ओरडून ग्रोशेव खरखरून तुटक हसला.

‘न् तो पहा आनिकुशका!’

‘ग्रिशा! मेलिखोव! तो बघ तुझा भाऊ! दिसला का?’

‘दिसला!’

‘मी पहिलं ओळखलं! बाटली काढ आता!’

डोळे किलकिले करून ग्रिगरी न्याहळू लागला. पित्रोने मांड घेतलेल्या घोड्याला ओळखायचा तो प्रयत्न करीत होता. 'नवीन घेतलेला दिसतोय' त्याच्या मनात विचार आला. भावाच्या चेहऱ्याकडे त्याने नजर वळवली. उन्हात खरपूस भाजलेला, मिशा छाटलेला आणि उन्हाळी उन्हात भुवया रुपेरी झालेला तो चेहरा त्याची भेट झाल्यापासून विलक्षण बदलून गेला होता.

टोपी काढून ती यांत्रिकपणे हलवीत ग्रिगरी त्याला भेटायला धावत गेला. त्याच्या मागे अर्धवस्त्र कझाकांचा लोंढा जमिनीवर माजलेले अंजेलिका आणि बुरदोक तुडवीत धावत सुटला.

स्वच्छ भादरलेल्या, अधिकारयुक्त चेहऱ्यावरील रेषात लाकडी काठिण्य असलेल्या एका प्रौढ दणकट कॅप्टनच्या मागोमाग ते पथक राईला वळसा घालून वाडीत उतरले.

'चिव्वट !' भावाकडे पाहून स्मित करताना ग्रिगरीच्या मनात विचा र आला. त्याचबरोबर त्याने कॅप्टनच्या दणकट देहावरून आणि उघड कालमिक जातीच्या दिसणाऱ्या गोल नाकाच्या त्याच्या जनावरावरून नजर फिरवली.

'स्क्वाड्रन !' कॅप्टनच्या स्वच्छ पोलादी आवाज खणखणला.

'दोनाच्या रांगेत आगे बढो !'

'नमस्ते भाऊ !' पित्रो ओरडला,

'जय हो ! आपण एकत्र राहणार ! कसं काय चाललंय ?'

'ठीकाय !'

'अजून जिवंतायस् तर !'

'आहे अजून !'

'घरच्या लोकानी विचारलय !'

'कशी आहेत सगळी ?'

'ठीकायत् !'

पित्रोने आपल्या दणकट तांबडट घोड्याच्या चौकावर तळवा टेकला आणि जीनातून सबंध देह वळवून ग्रिगरीला त्याने स्मितपूर्वक निरखले. मग तो पुढे गेला आणि इतर ओळखीच्या अनोळखीच्या कझाकांच्या मागाहून येणाऱ्या रांगानी झाकला गेला.

'नमस्ते मेलिखोव ! खेड्याचे नमस्कार !'

'आम्हाला येऊन मिळतोयस तर !' मिखाईल कोशेवोईच्या सोनेरी बटांची चीप ओळखून ग्रिगरी हसत म्हणाला.

'बरोबर ! दाण्यामागं कोंबडी जायचीच !'

'तुझ्या मागनं टोच मारायला कुणी येत नाहीसं बघ म्हणजे झालं !'

'आपण ते बघून घेऊ !'

अंगावर फक्त सदरा घालून येगोर झारकोव तळ्याकडून आला. त्याचा एक पाय विजारीत होता आणि दुसऱ्यात पाय खुपसण्यासाठी तो लंगडी घालत होता.

'सलाम गाववाले !'

'अरे ए ऽ ! हा पहा झारकोव !' रांगातून एक आरोळी आली.

'नमस्ते रे घोड्या ! तुझ्या पायात खोडा घातला म्हण की !'

'माझी आई कशी आहे ?'

'जिवंताय अजून ! तिनं आशीर्वाद कळवलेत ! पण तिनं दिलेलं मात्र नाही आणलं ! आमचं स्वतःचंच सामान भरपूर होतं !'

भलत्याच गंभीरपणे येगोर ऐकत होता. नंतर तसाच उघड्या बुडावर तो गवतात बसला. आपला हिरमुसला चेहरा लपवण्याची आणि डगमगता पाय विजारीत घालण्याची फोल धडपड तो करीत होता.

अर्धवस्त्र कझाक निळ्या रंगाने रंगवलेल्या कटंजनामागे उभे होते· पलीकडच्याबाजूला डॉनच्या राखीव स्क्वाड्रनचा ओघ दुतर्फा चेस्टनट वृक्ष असलेल्या रस्त्याने आवाडात वाहत होता.

'कसं काय गाववाले ?'

'तू रे अलेक्सांदर ?'

'होय ! मीच !'

'आन्दियान ! काय रे ए लोंबत्या कानाच्या सैताना ! मला ओळखत नाहीस ?'

'बायकोनं विचारलंय शिपाईगड्या !'

'येशू तुझं रक्षण करो !'

'बोरिस बिलाव कुठाय ?'

'कुठल्या स्क्वाड्रनमध्ये होता ?'

'मला वाटतं चौथ्या.'

'कुठचा तो ?'

'व्येशेनस्काया खेड्याचा ! झतोन !'

'तुला कशाला हवाय तो ?'

ह्या तुटक संभाषणात एक तिसरा आवाज उमटला.

'याच्यासाठी पत्र आणलंय म्हणून हवाय !'

'काही दिवसामागं राईब्रोदीच्या लढाईत तो मारला गेला !'

'खरं ?'

'माझं ऐक ! माझ्या स्वतःच्या डोळयांनी मी पाह्यलंय ! छातीत डाव्या बोंडीखालीच काडतूस घुसलं !'

'च्योरनाया नदीवरचं इथं कुणी आहे का ?'

'कुणी नाय ! पुढं चला !'

आवाडात स्क्वाड्रनला ओळीत उभे करण्यात आले. इतर कझाक परत आंघोळी करायला गेले. लौकरच नवीन आलेले त्याना येऊन मिळाले.

ग्रिगरी भावाच्याजवळ खाली बसला. बांधाच्या दमट ढिसाळ चिखलाचा एक उग्र वास येत होता. काठाशी पाणी चकचकीत हिरवे होते. आपल्या सदऱ्याच्या शिवणीतील उवा मारीत ग्रिगरी भावाशी बोलत बसला होता.

'पित्रो, मला अगदी ढासळल्यागत झालंय ! आणखी एक तडाखा दिला की प्राण जातील अशा माणसागत अवस्था झाल्येय माझी ! जसा जात्यात भरडला गेलोय ! माझा भुगा करून त्या जात्यानं बाहेर थुंकलाय !' त्याचा आवाज फाटलेला आणि रडवेला झाला होता. त्याच्या कपाळावर तिरकस पडलेली खोल अठी (आत्ताच ती पित्रोच्या लक्षात येऊन त्याला चिंता वाटू लागली) बदलांचे आणि 'उठून' गेलेल्या मनाचे भयावह दर्शन घडवीत होती.

'का ? काय झालं ?' त्याला प्रश्न विचारीत पित्रोने अंगातला सदरा ओढून काढला. त्याचे अनावृत्त गोरे शरीर आणि मानेभोवती उन्हात रापलेली सुस्पष्ट रेघ प्रकट झाली.

'हे असं घडलं !' ग्रिगरी गडबडीनं सांगू लागला. त्याच्या आवाजातली कटुता जास्तच बळावली, 'आपल्याला त्यानी एकमेकाशी झुंजायला लावलंय ! लांडग्यांच्या टोळी पेक्षाही भयंकर आहे सगळं ! जिकडं-तिकडं द्वेष ! कधी कधी मला असं वाटतं की मी एकाद्या माणसाला चावलो तर तो पिसाळेल !'

'तुला कुणाला .. ठार मारावं लागलं का ?'

'हो !' ग्रिगरी जवळजवळ किंचाळून म्हणाला. आपल्या सदऱ्याचा त्यानं चोळामोळा करून तो पायाशी फेकून दिला. श्वास गुदमरवणारा शब्द खाली रेटल्यागत तो गळयाभोवती बोटे घट्ट आवळून बसला आणि त्याने नजर बाजूला वळवली.

'सांग मला सगळं!' आपल्या भावाची नजर टाळील पित्रोने आज्ञा केली.

'माझं मन माझा जीव घेतंय! एका माणसाच्या अंगात मी आरपार भाला घातला...! तिरमिरीत! एरवी मी असं केलं नसतं–! पण दुसऱ्याला मी का खांडला?'

'आं?'

'हे चांगलं नाय! मी एक माणूस खांडला न् माझं मन त्यानं–त्या डुकरी-च्यानं पोखरून टाकलंय! स्वप्नात सुद्धा रांडीचा मला झपाटतो! हा काय माझा दोष होता?'

'तुला अजून सवय झालेली नाय! पडल तुझ्या अंगवळणी!'

'तू आमच्या स्क्वाड्रनबरोबर थांबणार आहेस?' ग्रिगरीने मधेच विचारले.

'नाय! आमची भरती सत्ताविसाव्या रेजिमेन्टात झाल्येय.'

'मला वाटलं की आमच्या मदतीला आलात.'

'आमचं स्क्वाड्रन कोणत्या तरी पायदळ डिव्हिजनला जोडतील. त्याना आम्ही गाठायला निघालोय. पण आम्ही तुम्हाला बदली पाठवण्याचा विचार केलाय. तरुण पोरांची तुकडी आहे.'

'बरं! चल पोहू या.'

ग्रिगरीने घाईने तुमान काढून टाकली आणि बांधाच्या कडेला तो गेला. त्याचे खांदे पुढे झुकले होते, तरी अंगलट उत्तम होती उन्हात रापलेली होती. ह्याआधी एकमेकाना भेटलो होतो. त्यापेक्षा तो अधिक मोठा दिसतोय असे पित्रोला वाटले. हात उंच करून त्याने पाण्यात सूर मारला. एक भारी हिरवी लाट त्याच्या डोक्यावर आली आणि मग फुगून दूर निघून गेली. तळ्याच्या मध्यभागी डुंबणाऱ्या कझाकांच्या गटाच्या दिशेने तो हात मारीत गेला. त्याचे हात पाण्याला प्रेमाने थापटीत होते. खांदे सुस्तपणे हलत होते.

प्रार्थनेचा कागद शिवलेला गळ्यातील क्रॉस काढून ठेवण्याला पित्रोने वेळ लावला. ती दोरी त्याने कपड्याच्या ढिगाखाली ढकलली आणि बुजऱ्या सावध-त्याने पाण्यात प्रवेश केला. आपली छाती आणि खांदे ओले केले. नंतर कुंथत तो पुढे झेपावला आणि ग्रिगरीला गाठायला पोहू लागला.

ते पलीकडच्या काठाकडे पोहू लागले. तो काठ रेताड आणि झुडुपांनी झाकलेला होता. पाण्यातील हालचालीने थंड आणि निवल्यासारखा होऊन ग्रिगरी जास्त धीमेपणाने बोलू लागला. त्याचा मधाचा आवेग ओसरला होता.

'इतका विटून गेलोय की, अंगावरच्या उवानासुद्धा खुशाल चरायला देतो मी!' तो म्हणाला, 'आता घरी असायला हवा होतो! पंख असते तर

भरारी मारली असती ! नुस्तं डोकावून तरी आलो असतो ! कशी आहेत सगळी ?'

'नतालिया आपल्या घरी राहत्येय !'

'आँ ?'

'हो हो ! राहत्येय !'

'आई-बाबा कसे आहेत ?'

'ठीकायत ! पण नतालिया अजून तुझी वाट बघत्ये ! तू तिच्याकडं परत येशील असं अजून तिला वाटतंय !'

ग्रिगरीने फुर्रर्र आवाज करून उत्तर न देता तोंडातून चूळ टाकली. पित्रो मान वळवून भावाच्या डोळ्यात बघण्याचा प्रयत्न करू लागला.

'तुझ्या पत्रात तिला काहीतरी निरोप पाठव ! ती बाई फक्त तुझ्यासाठी जगत्येय !'

'म्हणजे तुटलेलं तिला अजून जोडायची इच्छा आहे ?'

'अरे, ती आशेवर जगत्येय ! फार चांगली बाई आहे ! कडकाय ! कुणाला आपली थट्टा मस्करी करू देत नाय !'

'पाट लावून टाकावा तिनं !'

'चमत्कारिकच बोलणं आहे तुझं !'

'काय चमत्कारिक नाय ! हे असंच झालं पाहिजे !'

'पहा बुवा ! तुझा प्रश्नाय ! मी काय ढवळाढवळ करीत नाय !'

'दुन्या कशी काय ?'

'बाई झाल्येय आता भाऊ ! ह्या वर्षी एवढी उफाडल्येय की ओळखू नाय यायची तुला !'

'खरंच ?' ग्रिगरी आश्चर्याने आणि थोडयाशा आनंदाने म्हणाला.

'देवाच्यान् ! आता तिचं लग्न होईल. आपल्या मिशाही व्होडकात भिजायच्या नाहीत ! मारूनही टाकतील रांडिचे आपल्याला ! हत्तीच्या आयला !'

'तितकं सोपं दुसरं कैच नाय !'

सौम्य उन्हात न्हात ते शेजारीशेजारी रेतीत पडले होते. मिशा कोशेवोई जवळून पोहत गेला.

'ये ग्रिशा ! उतर पाण्यात !'

'नको ! मी जरा आराम करतोय !'

एक भुंगारा रेतीत दडपीत ग्रिगरीने विचारले,

'आक्सिनियाचं काही कळलं ?'

'युद्ध सुरू व्हायच्या आधीच मी तिला खेड्यात पाहिली !'

'तिथं ती काय करीत होती ?'

'नवऱ्याकडून स्वतःचं घेऊन जायला आली होती !'

'ग्रिगरी खोकला आणि हाताने रेती लोटून देत तो भुंगोरा त्याने गाडून टाकला.

'बोललास तू तिच्याशी ?'

'फक्त नमस्कार केला ! तब्येतीत दिसत होती ! खुषीत होती ! वाडीवर दिवस मजेत चाललेले दिसतायत !'

'स्तिपान काय म्हणतोय ?'

'तिची बारीक सारीक चीजवस्त त्यानं देऊन टाकली ! भल्या माणसागत वागला ! पण तू जपून ऐस ! माझ्या कानावर आलंय की एकदा झिंगलेला असताना त्यानं आण घेतल्येय, पहिल्याच लढाईत तुझ्या छातीत गोळी चालवीन म्हणून ! तो तुला माफ करायला तयार नाय !'

'मला ठाऊकै !'

'मी नवीन घोडा घेतलाय !' पित्रोने संभाषणाचा विषय बदलला.

'बैलं विकली ?'

'एकशे ऐंशीला विकली! घोड्याला दीडशे पडले. तरी काही वाईट नाय!'

'पीक पाणी कसंय ?'

'छानाय ! पण कापणीच्या आधीच आमची उचलबांगडी झाली !'

संभाषण घरगुती गोष्टींकडे वळले. मग भावनांची तीव्रता ओसरली. पित्रोने सांगितलेल्या घराकडील वार्ता ऐकून ग्रिगरी सुखावत होता. क्षणभर तो जणू घरीच राहत होता. आणि पूर्वीप्रमाणेच तो एक साधा धडपड्या पोर झाला होता.

'चल ! आणखी एक बुडी मारू या न् मग कपडे करू !' आपल्या ओल्या पोटावरील रेती झटकीत पित्रोने सुचवले. त्याच्या पाठीवर आणि दंडावर काटा उभा राहिला होता.

कझाकांच्या घोळक्याबरोबर ते आवाडाकडे परतले. राईच्या कटंजनाजवळ स्तिपान आस्ताखोवने त्याना गाठले. चालता चालता टोपीच्या ढापणाखालील केस तो विंचरून मागे वळवीत होता.

ग्रिगरीच्या बरोबर येत तो म्हणाला, 'नमस्ते मित्रा !'

'नमस्ते !' ग्रिगरी थबकला आणि किंचित संकोचाने आणि ओशाळलेल्या चेहऱ्याने त्याने त्याच्याकडे वळून पाहिले.

'मला विसरला नाहीस ना ?'

'जवळजवळ विसरलोच होतो !'

'पण आपल्याला तुपली आठवण आहे ना !' स्तिपान कुत्सितपणे हसला आणि पुढे जाऊन त्याने आपल्या पुढे चाललेल्या कारपोरलच्या गळयात हात टाकला.

सूर्यास्तानंतर मुख्य लष्करी ठाण्याकडून टेलिफोनवरून संदेश आला. ग्रिगरीच्या रेजिमेंटला आघाडीकडे परतण्याचा हुकूम झाला होता.

पंधरा मिनिटात स्क्वाडनची जुळवाजुळव करण्यात आली आणि इंगेरीच्या रिसाल्याने आघाडीला पाडलेले भगदाड बुजवण्यासाठी त्यांनी गाणी गात कूच केले.

एकमेकाचा निरोप घेताना पित्रोने भावाच्या हातात एक घडी केलेला कागद कोंबला.

'हे काय ?' ग्रिगरीने विचारले.

'तुझ्यासाठी एक प्रार्थना उतरवून काढल्येय. ही घे.'

'काय कामाची आहे का ?'

'हसू नको ग्रिगरी !'

'मी हसत नाय !'

'अच्छा भाऊ ! इतराना मागं टाकून पुढं धावू नकोस ! तिखट माणसं काळाला आवडतात ! जिवाला संभाळून ऐस !' पित्रो ओरडून म्हणाला.

'मग प्रार्थना कशालाय ?'

पित्रोने हात हालवला.

कोणतीही सावधगिरी न बाळगता काही वेळ स्क्वाड्रन घोडयावरून पुढे जात होते. नंतर सार्जंटानी बिलकूल आवाज न करण्याचे आणि सगळे चुट्टे विझवून टाकण्याचे हुकूम सोडले. दूरच्या रानावर जांभळया धुरांच्या शेपटयानी सजवलेले अग्निबाण उंच उसळले होते.

११.

पिंगट मोरोक्कोलेदरचे वेष्टण असलेली एक लहानशी वही. तिचे कोपरे घसटलेले आणि तुटलेले होते. बराच काळपर्यंत ती आपल्या धन्याच्या खिशात पडून राहिलेली असली पाहिजे. कोरून काढलेल्या उतरत्या हस्ताक्षराने त्या वहीची पाने भरलेली होती.

कागदाला टाक लावण्याची ही आवश्यकता आज बरेच दिवस मला जाणवत्येय. एक प्रकारची ' कॉलेज डायरी ' ठेवण्याची माझी इच्छा आहे. सर्वांत आधी तिच्याबद्दल.

फेब्रुवारीत. तारीख आठवत नाही. तिच्या एका शेजाऱ्यामार्फत माझी तिची ओळख झाली. हा शेजारी होता बोयारिशकिन नावाचा विद्यार्थी. एका सिनेमा थेटराबाहेर ती दोघे मला भेटली. तिची ओळख करून देताना बोयारिशकिन म्हणाला, ' लीझा ही व्येशेनस्काया गावची आहे. तिची नीट काळजी घे, तिमोफेई. ती अतिशय उत्तम मुलगी आहे.' काहीतरी असंबद्ध वाक्य पुटपुटल्याचं आणि तिचा मऊ घामेजलेला हात हाती घेतल्याचं मला आठवतं. माझी येलीझावेता मोखोवाशी ही अशी भेट झाली. ती बिघडलेली आहे हे मी तत्क्षणी ओळखलं. अशा बायकांचे डोळे नको एवढं सांगून जातात. कबूल करतो की तिनं माझं जे मन बनवलं ते काही फारसं अनुकूल नव्हतं. पहिली गोष्ट म्हणजे चिकचिकलेला हात. हाताला एवढा घाम येणार मी कधी कुठं पाहिलेलं नाही. आणि ते डोळे ! खरं सांगायचं तर अतिशय सुंदर डोळे. तळपती बदामी छटा असलेले. पण तरीही न सुखवणारे.

वास्या, दोस्ता, जाणीव पूर्वक माझी शैली मी फुलवतोय असं दिसतय एवढंच काय पण प्रतीकांचाही अवलंब करतोय. कारण सेमीपालातिन्स्क इथे ही डायरी जेव्हा तुझ्या हाती पडेल तेव्हा काय घडलं त्याची तुला सुस्पष्ट कल्पना यावी असं मला वाटतं. (येलीझावेता मोखोवाबरोबर मी सुरू केलेलं प्रकरण संपल्यानंतर हे तुला पाठविण्याचा माझा विचार आहे. ह्यानं तुझी बरीच करमणूक व्हावी.) कालानुक्रमानं मी सगळं वर्णन करीन. तेव्हा मी मघा म्हटल्या-

प्रमाणे माझी तिच्याशी ओळख करून देण्यात आणि आम्ही तिघेजण कुठलातरी भिकार रडका चित्रपट बघायला गेलो. बोयारिशकिन गप्प होता. (त्याचा दात दुखत होता त्यानं म्हटल्याप्रमाणे ती 'दाढदुखी' होती) आणि मला संभाषण करणे अवघड वाटत होते. आम्ही एकमेकांचे शेजारी असल्याचं निष्पन्न झालं. शेजारी म्हणजे आमची गावे एकमेकाना लागून होती. पण माळरानाच्या निसर्ग सौंदर्याबद्दल वगैरे एकमेकाना आठवणी सांगून झाल्यावर आमचे संभाषण संपुष्टात आले. तसं सांगायचं तर मी अनिर्बंध मुग्धता टिकवली आणि तिनं संभाषणाचा अभाव यत्किंचितही गैरसोयीविना सहन केला! ती मेडिकलच्या दुसऱ्या वर्षाला आहे, ती एका व्यापारी कुटुंबांतील आहे, तिला कडक चहा आणि आस्मोलोव तपकीर ह्यांची आवड आहे वगैरे गोष्टी मला तिच्या तोंडून समजल्या. तुला कल्पना येईलच की बदामीरंगाचे डोळे असलेल्या मुलीचा परिचय करून घेण्याच्या दृष्टीनं ही माहिती कमालीची तुटपुंजी होती. आम्ही जेव्हा एकमेकांचा निरोप घेतला (आम्ही तिला 'ट्राम स्टॉप' पर्यंत पोचवलं) तेव्हा तिनं मला घरी येण्याचं आमंत्रण दिलं मला वाटतं २८ एप्रिलला मी तिच्या घरी जाईन. मी पत्ता लिहून घेतला.

२९ एप्रिल

आज तिच्या घरी गेलो. तिनं मला चहा आणि हलवा दिला. खरं खरं म्हणजे तिच्यात 'काहीतरी' आहे. तिखट जीभ, सुमार हुशार, पण 'मन चाहेल तसं वागा' ह्या आर्त्सीबाशेवच्या सिद्धांतावर तिची पकड आहे. पाच फर्लांगावरून त्याचा वास येतो. उशीरानं घरी परतलो. सिगरेट तयार केली आणि तिच्याशी काडीमात्र संबंध नसलेल्या गोष्टीचा विचार केला. मुख्यत: पैशाचा. माझ्या सुटाची अवस्था. भयावह आहे पण माझ्या जवळ 'भांडवल' नाही. एकंदरीत वैताग आहे.

१ मे

थोडी महत्त्वाची घटना हे आजच्या दिवसाचं वैशिष्टच. 'सोकोलनिकी' पार्कमधे अगदी निरुपद्रवीपणे वेळ घालवीत असताना एका लफड्यात सापडलो. कामगाराची एक मे ची सभा पोलीस आणि सुमारे वीसएक कझाकाचं पथक पांगवीत होते. एका झिंगलेल्यानं एका कझाकाच्या घोड्यावर काठीचा प्रहार केला आणि कझाकानी हंटर चालवायला प्रारंभ केला. (का कुणास ठाऊक पण काही लोक हंटरला चाबूक म्हणण्याचा आग्रह धरतात. पण 'हंटरला' एक डौल आहे. तोच

शब्द का नये वापरू ?) मी तिकडं गेलो आणि खरं सांगतो, अत्यंत उदात्त भावनेच्या आवेगानं मी मधे पडायचं ठरवलं. मी त्या कझाकाला म्हटले की तू आडमुठचा आहेस. आणखी काहीबाही बोललो. तो माझ्या अंगावर हंटर फडकवणार होता पण त्याला मी अगदी ठासून बजावले की, मी स्वत: कामेनस्कायाचा कझाक आहे आणि असा घुसळीन की त्याला आई आठवावी! तो कझाक सुस्वभावी माणूस निघाला. तरुण आंबून जाण्या इतपत फौजेत अजून राहिलेला नव्हता. आपण उस्त-खोपेरस्कायाचा कझाक असल्याचं आणि मुष्टीच्या दृष्टीनं उपयुक्त माणूस असल्याचं त्यानं उत्तर दिलं. आम्ही निमूटपणे दूर झालो. त्यानं माझ्याविरुद्ध काही केलं असतं तर लढत जुंपली असती आणि मला स्वत:ला ह्यापेक्षा काहीतरी वाईट झालं असतं. माझ्या हस्तक्षेपाचा खुलासा एवढाच की, लिझा माझ्याबरोबर होती आणि तिच्या संगती मी असलो की काहीतरी पराक्रम करण्याच्या निव्वळ पोरकट इच्छेनं मी वाहवून जातो. मला अगदी चक्क असं दिसतंय की माझं रूपांतर एका तरण्याबांड कोंबडचात होतंय आणि असं वाटतंय की माझ्या टोपीखाली एक अदृश्य लाल तुरा उगवतो... कुठं चाललोय मी!

३ मे

माझ्या सध्याच्या मन:स्थितीत एकच गोष्ट करण्यासारखी आहे ती म्हणजे पिऊन धुंद होणं. सगळचावर कळस म्हणजे माझ्याजवळ मुळीच पैसा नाही. डॉन काठचे परिपक्व कलिंगड उलावं तशी माझी पॅन्ट अत्यंत महत्वाच्या ठिकाणी-परखडपणे सांगायचं तर 'बुडातच' उसवल्येय आणि रफू टिकून राहण्याच्या शक्यता अगदी दुरंत आहेत. कलिंगडच शिवण्यागत आहे. वलोदका स्मेझनेव येऊन गेला. उद्या मी लेक्चरला जाईन.

७ मे

वडिलांकडून पैसे पावले. तिरसटपणे लिहिलेलं पत्रही. मला काडीची शरम वाटत नाही. आपल्या मुलाच्या नैतिक अधिष्ठानाला ही अशी कीड लागल्याचं बाबाना कळलं तर कळू दे. सूट विकत घेतला. माझा नवीन टाय गाडीवानाचंही लक्ष वेधून घेतो. गावातील सर्वोत्कृष्ट सलूनमधे जाऊन दाढी घोटली आणि कपडेवाल्याच्या दुकानातील मदतनीस दिसतो तसा टवटवीत होऊन बाहेर पडलो. दुतर्फा वृक्षराजी असलेल्या रस्त्याच्या कोपऱ्यावरील पोलिसाने माझ्याकडे पाहून स्मित केले. बदमाश थेरडा! ह्या वेशात असणारा मी आणि तो ह्यात काहीतरी साम्य आहे. अन् तीन महिन्यापूर्वी ? पण इतिहासाचं बोचकं कशाला उपसा ? पण झालं ते झालं... ट्रामच्या खिडकीतून अगदी योगामोगानं लिझा दिसली. आपला हातमोजा हलवून तिनं स्मित केलं. हे कसं काय वाटतंय !

८ मे

'सगळीच वयं असतात प्रेमशरण...' तोफेच्या तोंडासारखे माझ्याकडं पाहून वासलेलं ततियानाच्या नवऱ्याचं तोंड अजून मला दिसतंय, गॅलरीतील माझ्या खुर्चीतून त्यात थुंकण्याची अनिवार इच्छा मला झाली होती. मी त्या वाक्यावर जेव्हा जेव्हा विचार करतो. विशेषत: ते शेवटचं प्रे–म–श–र–ण. तेव्हा जांभईच यायला लागते. बहुधा नसांची कांही तरी खोड असावी.

पण मुद्दा असा आहे की मी, माझ्या ह्या वयात प्रेमात पडलोय. हे लिहिताना माझे केस जरी ताठ उभे रहात आहेत. लिझाकडं गेलो, प्रदीर्घ आणि जडजंबाल प्रस्तावनेनं प्रारंभ केला.

आपल्याला काहीच न समजल्याचं तिनं ढोंग केलं आणि विषयांतर करण्याचा प्रयत्न केला. सध्याच फार लौकर होईल काय ? आग लागो ह्याला. ह्या नव्या सुटाने सगळा घोटाळा करून टाकलाय. मी स्वत:ला आरशात बघतो तेव्हा मला असं वाटतं की माझा मोह पडणं अगदी अनिवार्य आहे. हीच वेळ आहे मला वाटतं ! वस्तुत: माझ्याबाबत सरळसोट हिशोबीपणाच फत्ते मिळवून जातो. आताच मी मागणी घातली नाही तर दोन महिन्यात वेळ टळून जाईल. माझी पॅन्ट विरून जाईल आणि अशा ठिकाणी उसवेल की तशा परिस्थितीत मागणी घालणे अशक्यच !

हे लिहीत असताना आत्मगौरवानं मी सचैल भिजलोय. आधुनिक काळातील सर्वोत्कृष्ट लोकांच्या सर्वोत्कृष्ठ गुणांचा कोण तेजस्वी मिलाफ ! हळुवार तरीही धगधगीत वासना. तशीच– 'विवेकवाणी पुरती खंबिर !' सगळ्या गुणांची खिचडीच ! इतर कौतुकास्पद गुणांचा समुच्चय आहे तो वेगळाच.

जुजबी तयारीच अजून संपायच्येय. तिच्या घरमालकिणीनं आमच्यात मधेच अडथळा आणला तिला पडवीत बोलवून तिने हिच्याजवळ उसने पैसे मागितले. हिच्याजवळ पैसे होते तरी हिने नकार दिला. ही गोष्ट मला पक्की ठाऊक आहे. आपल्या अगदी खरेपणाच्या आवाजात आणि त्या बदामी रंगाच्या डोळ्यात एवढी कळकळ आणून ती सांगत होती. त्यानंतर प्रेमाबद्दल बोलायची माझी इच्छाच मेली.

१२ मे

मी चांगलाच आणि खरोखरीच प्रेमात पडलो आहे. ह्यात तिळमात्र संशय नाही. प्रत्येक गोष्ट मला हे सांगते आहे. उद्या मी मागणी घालीन. अद्यापपर्यंत माझी भूमिका पक्की झालेली नाही.

१४ मे

ती गोष्ट अत्यंत अनपेक्षित प्रकारे घडून आली. पाऊस पडत होता. चांगला उबदार कोसळत होता. मोखोवायावरून आम्ही चाललो होतो. वाऱ्याने फसरबंदीवरून पाऊस लोटला जात होता. मी बोलत होतो आणि ती गप्प होती. विचार करीत असल्यासारखे तिने डोके खाली घातले होते. पावसाचे पाणी तिच्या हॅटच्या काठावरून तिच्या गालावर ओघळत होते आणि ती सुंदर दिसत होती. मी आमचं संभाषण उधृत करतो.

'येलिझावेता सेर्गिएवना, मला काय वाटतं ते मी तुम्हाला सांगितलंय आता सगळं तुमच्यावर अवलंबून आहे.'

'तुमच्या भावनांच्या प्रामाणिकपणाबद्दल मला शंका वाटते.

बावळटासारखे मी खांदे उडवले आणि शुष्कपणे मी 'शपथबिपथ घ्यायला तयार आहे' किंवा असेच काहीतरी म्हणालो.

ती म्हणाली, 'हे पहा तुम्ही तुर्गेनेवच्या नायकांसारखं बोलत आहात तुम्हाला जरा सोपं करून सांगता येणार नाही का?'

'इतकं सोपं काहीच नाही. माझं तुमच्यावर प्रेम आहे.'

'मग पुढं?'

'आता तुमच्यावर अवलंबून आहे,'

'माझं तुमच्यावर प्रेम आहे, असं मी म्हणावं अशी तुमची इच्छा आहे का?'

'मला उत्तर हवंय.'

'हे पहा तिमोफेई इवानोविच—कसं सांगू मी? मला तुम्ही किंचितसे आवडता—तुम्ही फार उंच आहात.'

'मी ह्याहून उंच होईन!' मी खात्रीपूर्वक सांगितलं.

'पण आपली एकमेकाना इतकी थोडी माहिती आहे! आपण...!'

'दहा वर्षाच्या काळात आपल्याला एकमेकांची भरपूर माहिती होईल.'

गुलाबी हाताने तिने आपला भिजलेला गाल चोळला आणि ती म्हणाली, 'बरं, ठीक आहे तर. एकत्र राहू या आपण. काळाबरोबर कळेलच. पण माझं पूर्वीचं प्रकरण तुम्ही मला तोडून टाकू दिलं पाहिजे.'

'कोण आहे तो?' मी चौकशी केली.

'तुम्हाला तो ठाऊक नाही. तो एक डॉक्टर आहे. गुप्तरोगतज्ञ आहे.'

'तुम्ही कधी मोकळ्या व्हाल?'

'शुक्रवारपर्यंत होईन मला वाटतं !'

'आपण एकत्र राहायचं ? म्हणजे एकाच घरात ?'

'होय ! मला वाटतं ते जास्त सोईचं होईल ! तुम्ही माझ्या घरात रहायला या !'

'का ?'

'माझ्याकडं मोठी सोईस्कर खोली आहे. अगदी स्वच्छ आहे ती. घर मालकीणही भली बाई आहे.'

मी काही हरकत घेतली नाही. त्वेरस्कायाच्या कोपऱ्यापाशी आम्ही ऐकमेकांचा निरोप घेतला. आम्ही एकमेकांचे चुंबन घेतले तेव्हा जवळून जाणारी एक स्त्री अतिशय आश्चर्यचकित झाली.

भविष्याच्या पोटात काय आहे ?

२२ मे

मधाळ जीवन जगतो आहे. आज माझ्या मधुवृत्तीवर ढग आल्यासारखा झाला. माझी अंतर्वस्त्रं मी बदललीच पाहिजेत असे लिझानं सांगितलं. खरंच माझ्या अंतर्वस्त्राचं भयानक पोतेरं झालंय. हे अर्थातच खर आहे. पण पैसा...पैसा आम्ही माझेच पैसे खर्च करीत आहोत आणि आता फारसे शिल्लक उरलेले नाहीत. काम शोधायला लागेल.

२४ मे

आज नवीन अंतर्वस्त्रे विकत घेण्याचे ठरवले. पण लीझाने मला अनपेक्षित खर्चात टाकले. एका उत्तम रेस्तोराँमधे जेवण करण्याची आणि स्वत:ला रेशमी स्टॉकिंग विकत घेण्याची तिला अचानक अनिवार इच्छा झाली. आम्ही जेवण केले आणि खरेदी केली. मला काही अंतर्वस्त्रे नाहीत !

२७ मे

ती शोषून माझे चिपाड करते आहे. शारीरिकदृष्टया सूर्यफुलांच्या दांडयापेक्षा माझ्यात जास्त काही उरलेले नाही. ही बाई नव्हे, धुमसती आग आहे !

२ जून

आज आम्ही नऊ वाजता जागे झालो. चवडे मोडायच्या माझ्या करंटया संवयीचा पुढील प्रमाणे परिणाम झाला.

तिने पांघरुण दूर करून बराच वेळ माझ्या पायाची पाहणी केली. नंतर आपल्या निरीक्षणाचा निष्कर्ष तिने हा असा सांगितला.

'तुझं हे पाऊल नाही तर घोडयाचा सुंब आहे. सुंबापेक्षाही खराब ! आणि

ते तुझ्या चवड्यावरचे केस-आईग !' कमालीची किळस आल्यासारखा तिने खांद्याना झटका दिला. डोके पांघरुणात गुरफटून घेतले आणि कुशीला ती भिंतीकडे वळली.

मी गोंधळून गेलो. मी माझी पावले दृष्टीआड केली आणि तिच्या खांद्याना स्पर्श केला.

'लिझा !'

'माझ्या वाटेला जाऊ नका !'

'लिझा, हे मुळीच चालायचं नाही. माझ्या पावलांचा आकार काही मला बदलून घेता येणार नाही. माझ्या इच्छेप्रमाणे ते काही बनवून घेतलेले नाहीत. समजलीस ? आणि लोमवृद्धीचं म्हणशील तर केव्हां कुठं केस उगवतील हे काही सांगता येणार नाही. ते सगळीकडं वाढतात. तू मेडिकलला आहेस, निसर्गाचे नियम तुला कळायला हवेत.'

तिने कूस वळवली. तिच्या बदामरंगी डोळ्यात छद्मी छटा होती.

'कृपा करून कोणतीतरी दुर्गंधीनाशक पावडर वापरत जा. तुझ्या पायाला मढ्यासारखी घाण येते.'

तिचे हात नेहमी घामेजलेले असतात असा अभिप्राय मी चिकित्सकपणे व्यक्त केला. ती गप्प राहिली आणि 'उदात्त' भाषेत सांगायचे तर माझ्या आत्म्यावर एका उदास ढगाची काळोखी दाटून आली. पाय आणि केस एवढंच ह्याचं कारण आहे असं नाही !

४ जून

आज मस्कवा नदीतून आम्ही नौकापर्यटणाला गेलो होतो. डॉनच्या निसर्ग प्रदेशाची आठवण झाली. लिझाचे वर्तन तिला शोभणारे नव्हते. माझ्याबद्दल ती सतत कुत्सित अभिप्राय देत असते. आणि कधीकधी हे अभिप्राय मोठे उर्मट असतात. तिच्या भाषेत तिला उत्तर द्यायचे म्हणजे आमचे संबंध तोडण्यासारखे आहे आणि हे मला नको आहे. हे सगळं असं असूनही मी तिच्यावर अधिकाधिक आसक्त होत चाललो आहे. ती पुरती शेफारलेली आहे. पण मला भय वाटते की तिच्या चारित्र्यात काही मूलभूत बदल घडवून आणण्याइतपत माझा प्रभाव खंबीर नाही. हवीहवीशी वाटणारी एक बिघडलेली लहान पोर. विशेषत: अशी लहान पोर की जिने मला ज्याची केवळ ऐकीव माहिती आहे ते प्रत्यक्ष पाहिलेले आहे. घरी जाताजाता वाटेत तिने मला एका केमिस्टच्या दुकानात ओढून नेले. तोंडावर

स्मित खेळवीत तिने टालकम पावडर आणि दुसऱ्या काहीतरी अरबट चरबट गोष्टी विकत घेतल्या.

'ह्यानं घाण मरेल !'

मी दिमाखात तिला अभिवादन करून तिचे आभार मानले.

हास्यास्पद पण हे असं आहे.

७ जून

तिला डोके फारच कमी आहे. पण इतर सगळ्या गोष्टी ठाऊक !

रोज रात्री झोपण्यापूर्वी मी गरम पाण्याने पाय धुतो. त्यावर ओ-द-कोलन ओततो आणि दुसऱ्या कसल्यातरी किळसवाण्या पदार्थाची पावडर त्यांना लावतो.

१६ जून

दिवसेंदिवस ती जास्तच जास्त असह्य होत चालल्येय. काल तिला उन्मादाचा झटका आला. अशा बाईबरोबर जगणे मोठे कठीण आहे.

१८ जून

आमच्यात काही म्हणता काहीही सारखेपणा नाही. आम्ही बोलतो ती भाषाही एकसारखी नाही.

आज सकाळी बेकरीत जाण्यासाठी तिने माझे खिसे पाहिले. तिला लहानशी वही सापडली. तिने त्या वहीकडे बघितले.

'हे काय बरोबर घेऊन हिंडत असतोस ?'

मला घाम फुटला. समजा तिने ती वही चाळली तर ? मी इतक्या सहज आवाजात उत्तर दिले की ते ऐकून माझे मलाच आश्चर्य वाटले.

'हिशेबाची वही आहे इतकंच.'

बेफिकिरीने तिने ती माझ्या खिशात कोंबली आणि ती बाहेर पडली. मला जास्त काळजी घेतली पाहिजे. दुसऱ्या माणसाला त्यातले काहीही ठाऊक नसते तेव्हाच असले प्रत्यक्ष कथन ठीक असते.

माझा मित्र वास्याच्या करमणुकीचे हे एक साधन ठरेल.

२१ जून

लिझाने मला थक्क करून टाकले आहे. ती एकवीस वर्षाची आहे. एवढे अनैतिक होण्याला तिला केव्हा सवड मिळाली ? तिच्या घरची माणसे कोणत्या प्रकारची आहेत ? मला तीव्र कुतूहल वाटणारे हे प्रश्न आहेत.

ती भयंकर सुंदर आहे. आपल्या सौष्ठवाच्या पूर्णत्वाचा तिला अभिमान वाटतो. हा निव्वळ आत्मपूजेचा सांप्रदाय आहे. दुसरे काहीही तिच्या हिशेबी

अस्तित्वात नाही. तिच्याशी गंभीरपणे बोलण्याचा मी अनेकदा प्रयत्न केला आहे. देव अस्तित्वात नाही अशी कर्मठ सनातन्याची खात्री पटवून देणे लिझाला पुनः शिक्षित करण्यापेक्षा जास्त सोपे आहे.

एकत्रित जीवन अशक्य आणि हास्यास्पद आहे. तरीही तोडून टाकायला मी कचरतो आहे. मला कबूल केलंच पाहिजे की काही असले तरी ती मला आवडते. तिने मला झपाटून टाकलेले आहे.

२४ जून

ते पटकन् घडून गेले. आज आम्ही एकमेकांशी मनमोकळेपणाने बोललो आणि तिने मला असे सांगितले की, मी तिची शारीरिक दृष्टया तृप्ती करू शकत नाही. अद्याप अधिकृतरीत्या फाटलेले नाही. कदाचित थोडयाच दिवसात फाटेल.

२६ जून

तिला जर कशाची जरुरी असेल तर ती म्हणजे एका वळूची ! अगदी खऱ्या खुऱ्या वळूची !

२८ जून

तिला सोडून देण मला अतिशय मुष्कील आहे.

चिखलाप्रमाणे ती मला ओढून घेत आहे. आज आम्ही वोरोबियोवी टेकडयांवर रपेट केली. हॉटेलांतील खिडकीजवळ ती बसली होती. 'किरवलेल्या छपरांतून उन्ह तिच्या कुरळया बटांवर झिरपत होते. तिच्या केसाना शुद्ध सोन्याचा रंग आहे.' तुझ्यासाठी ही एक काव्याची झलक !

४ जुलै

मी माझे काम सोडून दिले आहे. लिझाने मला सोडून दिले आहे. आज स्मेझनेवबरोबर मी बिअर प्यालो. काल आम्ही व्होडका प्यालो. सुशिक्षित माणसांनी व्हावे तसे मी आणि लिझा परस्परांपासून वेगळे झालो. व्यावहारिक प्रकारे मूर्खपणा वगैरे काही नाही. आज थीत्रोवकावर मी तिला 'जॉकी बूट' घातलेल्या एका तरुण माणसाबरोबर पाहिली. माझ्या अभिवादनाला तिने संयमाने उत्तर दिले. ही टिपणे थांबवण्याची वेळ आता झाल्येय. झरा आटलाय.

३० जुलै

अगदी अनपेक्षितपणे टाक हाती घ्यावा लागतोय युद्ध पाशवी उत्साहाचा स्फोट. 'कुत्र्याच्या मढयाला मैलभर घाण' तशी प्रत्येक टॉपहॅटला देशभक्तीची घाण मारत आहे. इतर जण चिडलेत. पण मला संतोष झालाय. माझ्या– 'हरपलेल्या नंदनवनाच्या' तळमळीने मी पोखरून गेलो आहे. काल मला लिझाबद्दल

एक कामुक स्वप्न पडले. माझ्या तळमळीवर तिने खोल ठसा उमटवलेला आहे. काहीतरी थारेपालट झाला तर मला आनंद वाटेल.

१ ऑगस्ट

ह्या गोंगाटाला आणि उठाठेवींना मी विटून गेलोय. व्याकुळतेची जूनी भावना परत आले. अर्भकाने रबराची बोंडी चोखावी तसा मी ती भावना चोखतोय.

३ ऑगस्ट

सुटकेचा मार्ग ! मी युद्धावर जाईन. मूर्खपणा ? कमालीचा. लाज लावणेपणा ?

पण मी दुसरे काय करू शकतो ? दुसऱ्या एकाद्या अभिरुचीचा कण तरी असावा ! पण दोन वर्षापूर्वी असली तृप्ततेची भावना नव्हती. माझे वय होत चालले नाही हे नक्की ना ?

७ ऑगस्ट

गाडीत मी लिहितोय, नुकतेच आम्ही वोरोनेझ सोडले. उद्या मी घरी असेन. मी मनाची तयारी केल्येय. धर्म, झार आणि पितृभूमी ह्यासाठी मी लढेन.

१२ ऑगस्ट

काय पण माझा ' निरोप समारंभ ' केला त्यानी ! आतामानने एक दोन ग्लासे झोकली आणि तळमळीचे भाषण केले. नंतर मी त्याच्या कानात कुजबुजलो ' मूर्ख आहात तुम्ही आन्द्रेय् कार्पोविच.' तो अगदी चकित होऊन गेला. आणि इतका काही दुखावला की त्याचे गाल हिरवे पडले. मग तुच्छतेने फिस्कारला, ' आणि तुम्ही स्वतःला शिकलेले म्हणवता ! पाच साली आम्ही फटकारून काढले त्यातलेच तुम्ही एक नव्हत ना !' मी उत्तर दिले की ' खेदाची गोष्ट की मी ' त्यातला ' नव्हे !' वडिलानी अश्रू ढाळले. शेबडया नाकाने माझा मुका घेण्याचा प्रयत्न केला. बिचारे प्रिय बाबा ! माझ्या जागी हवे होते. माझ्याबरोबर चला असे मी थट्टेत सुचवले तरी एकदम घाबरून उद्‌गारले, ' पण मग शेतीचं काय ?' उद्या मी स्टेशनाकडे निघणार.

१३ ऑगस्ट

इकडे तिकडे न कापलेली गव्हाची शेते. टेकडयांवर गोंडस मारमोत. कोझमा ऋचुचकोवच्या भाल्यावर कुलचिन्ह म्हणून चढवलेल्या सचित्र कार्डातील जर्मनात आणि त्यांच्यात विलक्षण साम्य आहे. कोणा एकेकाळी मी गणित आणि इतर यथार्थ शास्त्रांचा विद्यार्थी होतो. तेव्हा मी असा ' युद्धखोर ' होईन असा विचारही मला शिवला नाही. रेजिमेन्टमध्ये गेलो की कझाकांशी मी बोलून बघेन.

२२ ऑगस्ट

मार्गावरील एका स्टेशनात युद्धकैद्यांचा पहिला गट मी पाहिला. खेळाडूचा ढंग असलेल्या एका देखण्या ऑस्ट्रियन अंमलदाराला बंदोबस्तात स्टेशनाच्या इमारतीकडे चालवले होते. प्लॅटफॉर्मवर फेरफटका करणाऱ्या दोन तरुण स्त्रीयानी त्याच्याकडे पाहून स्मित केले. न थांबता त्यांच्याकडे पाहून तो लवून नेटके अभिवादन करू शकला आणि त्यांचा त्याने उडता मुका घेतला.

कैदी असला तरी स्वच्छ दाढी केलेली होती. ऐटदार होता. त्याचे तपकीरी बूट चमकत होते. तो निघून जात असताना मी निरखून पाहिले. तरुण देखणा गडी, मोहक स्नेहाळ चेहरा. लढाईत भेटला तर त्याच्यावर प्रहार करायला हात उचलणार नाही.

२४ ऑगस्ट

निर्वासित, निर्वासित, निर्वासित... निर्वासितानी आणि सैनिकानी प्रत्येक मार्गावरील गाड्या गच्च भरून गेल्यात.

पहिली इस्पितळाची गाडी नुक्तीच निघून गेली. ती थांबली तेव्हा एक तरुण सैनिक उडी मारून बाहेर आला. त्याच्या चेहऱ्यावर पट्टी बांधलेली होती. आम्ही एकमेकांशी बोलू लागलो. कुलपी गोळ्याने तो जखमी झाला होता. इत:पर आपल्याला बहुतेक फौजेत चाकरी करावी लागणार नाही ह्याचा त्याला भयंकर आनंद झाला होता. त्याच्या डोळ्याला इजा झाली होती. तो चक्क हसत होता.

२७ ऑगस्ट

मी माझ्या रेजिमेन्टमधे आहे. रेजिमेन्टचा कमांडर मोठा उमदा म्हतारा गडी आहे. डॉनच्या खालच्या खेड्यातील कझाक. इथे रक्ताचा वास अगदी जाणवू शकतो. परवाचे दिवशी आम्ही आघाडीवर जाऊ अशी वदंता आहे. माझा तिसऱ्या स्क्वाड्रनचा तिसरा जुमला आहे. कानस्तंतिनोव्हस्की खेड्यातील हे कझाक आहेत. रटाळ मंडळी आहेत. एकच गमत्या आणि गाणारा आहे.

२८ ऑगस्ट

आम्ही कूच करतोय. आज बाहेर बराच गोंगाट उडालाय. दूरवर मेघगर्जना चालल्यासारखी वाटतेय. पावसाचा अंदाज करण्यासाठी मी हवा सुद्धा हुंगून पाहिली. पण आकाश निळ्या साटिनसारखे आहे. फौजी रसोई-गाडीच्या चाकाला घोड्याचा पाय घसटला आणि तो लंगडू लागला. सगळंच नवं आणि नवखं आहे. कशापासून प्रारंभ करावा, कशाबद्दल लिहावं ? काही कळत नाही.

३० ऑगस्ट

काल लिहायला वेळच मिळाला नाही. आत्ता मी जिनावर मांड घेतल्या घेतल्याच लिहीत आहे. गचक्यांमुळे माझ्या पेन्सिलीला काही भयंकर कसरतींचे प्रयोग करावे लागत आहेत. आम्ही तिघेजण गवताच्या वैरणीच्या गाडीबरोबर चाललो आहोत.

बाकीची पोरे आता गवताचे भारे आवळून बांधीत आहेत आणि पोटावर उपडा पडून मी काल काय घडलं त्याची उशीरानं नोंद करीत आहे. काल सार्जंट तलोकोन्निकोवने आम्हा सहा जणाना टेहळणीवर पाठवले. (हा सार्जंट मला तिरस्काराने 'कॉलेज कुमार' म्हणून हाक मारीत असतो. 'अरे ए कॉलेजकुमार, तुझ्या घोड्याचा नाल निसटलाय. दिसतंय का नाय?') एक दोन बेचिराख खेड्यातून आम्ही फेरफटका मारला. अतिशय उकाडा होत होता. घोडी घामानं डबडबली होती. तसेच आम्हीही. उन्हाळ्यात कझाकाला सर्जची तुमान घालायला खरं म्हणजे लावू नये. खेड्याच्या बाहेरील खंदकात मी माझ्या आयुष्यातला पहिला मुडदा पाहिला. एक जर्मन खंदकात पाय सोडून पाठीवर उताणा पडला होता. एक हात अंगाखाली मुडपलेला. दुसऱ्या हातानं बंदुकीची शिलेखणी आवळलेली. जवळपास कुठेही बंदूक नव्हती. भयानक दृश्य! त्याचा विचार केला की माझ्या मणक्यातून थंड सणक जाते. तो असा दिसत होता की जणू काही खंदकात पाय सोडून बसला होता आणि विश्रांती घेण्यासाठी त्यानं जणू आपली पाठ टेकली होती. करड्या रंगाचा गणवेश आणि पोलादी शिरस्त्राण. आतलं कातडी अस्तरही दिसू शकत होतं. ह्या पहिल्या अनुभवानं मी इतका सुन्न होऊन गेलो की त्याचा चेहरा काही मला आठवत नाही. त्याच्या पिवळ्या कपाळावर चाललेल्या मोठाल्या पिवळ्या मुंग्या आणि अर्धोन्मीलीत निस्तेज डोळे एवढच लक्षात आहे. तिथून घोड्यावरून जाणारे येणारे कझाक अंगावर क्रूसाच्या निशाण्या करीत होते. त्याच्या गणवेशाच्या उजव्या भागातील रक्ताच्या लहानशा ठिपक्याकडे मी पाहिलं. उजव्या कुशीत काडतूस घुसून आरपार गेले होते. घोडा पुढं नेता नेता माझ्या लक्षात आलं की, काडतूस जिथून बाहेर आलं होतं तिथं गणवेशावरील डाग आणि जमिनीवर गोठलेले रक्त ह्यांचे आकार खूपच मोठे होते आणि गणवेशाच्या फाटून चिंध्या झाल्या होत्या.

शहारून मी तिथून घोडा पुढं नेला. तेव्हा हे असं घडलं.

'टवाळ' म्हणून ज्याचं टोपण नाव पडलेलं आहे, त्या वरिष्ठ सार्जंटने एक

घाणेरडी गोष्ट सांगून आमचं ' नैतिक धैर्य ' सावरण्याचा प्रयत्न केला पण त्याचे स्वत:च ओठही थरथरत होते.

खेड्यापासून दोन अडीच फर्लांगावर आम्ही एका जळालेल्या कारखान्यापाशी आलो. वरती धुरानं काळवंडलेल्या विटांच्या भिंती तेवढ्या होत्या. ह्या रस्त्यानं सरळ जाण्याला आम्हाला भीती वाटली. कारण रस्ता राखेच्या ढिगाऱ्यातून पलीकडे गला होता. तेव्हा आम्ही त्याला वळसा घालून जायचं ठरवलं. रस्ता सोडून आम्ही बाजूला होताच कारखान्यातून कुणीतरी आमच्यावर गोळीबार सुरू केला. हे कबूल करायला मला शरम वाटते. पण त्या पहिल्या बाराच्या आवाजाने मी जिनातून जवळ जवळ कोसळलोच. मी खोगिराची मूद हातात पकडली आणि आंतरिक प्रेरणेनं डोकं खाली झुकवून लगामाला झटका दिला. आम्ही घोडी पिटाळीत तो जर्मन पडला होता त्या खंदकावरून दौडत गेलो आणि खेडं मागे पडेपर्यंत आमच्या जिवात जीव नव्हता. नंतर आम्ही घोडी मागं वळवली आणि पायउतार झालो. दोघाना घोड्यांजवळ ठेवून आम्ही इतर चौघेजण परत त्या खंदकाकडे गेलो. खंदकातून जाण्यासाठी आम्ही अंगाची मुटकुळी खाली वाकवली. दूर अंतरावरून मला त्या जर्मनाचे पिवळ्या आखुड बुटातील पाय बांधावरून लोंबताना दिसत होते. त्याच्या जवळून जाताना मी श्वास कोंडून धरला. जणू काही तो झोपी गेला होता आणि माझ्या चाहुलीने तो जागा होण्याची मला भीती वाटत होती. त्याच्या अंगाखालचे गवत ओले आणि हिरवे होते.

आम्ही त्या खंदकात दबा धरून बसलो आणि थोड्याच मिनिटात त्या जळालेल्या कारखान्याच्या पडझडीमागून नऊ जर्मन भालाईत घोड्यावर बसून बाहेर पडले. त्यांच्या गणवेशावरून ते भालाईत असल्याचं मी सांगू शकत होतो. त्यापैकी एकजण अंमलदार असल्याचं उघड होतं. घरघरीत आवाजात तो काहीतरी ओरडला. आणि ती सबंध तुकडी आमच्या दिशेनं घोडी फेकीत निघाली.

गाडीत गवत भरण्यासाठी पोरं मला हाका मारताहेत. मला जायला हवं.

३० ऑगस्ट.

प्रथमच मी माणसावर कशी गोळी झाडली त्याचं वर्णन मला पूर्ण करायचंय. ते जर्मन भालाईत आमच्यावर चाल करून आले, हिरव्या पालीसारखे त्यांचे गणवेश, त्यांच्या शिर:स्त्राणांचे चकाकते घंटाकृती घाट, टोकांवर पताका फडफडणारे त्यांचे भाले हे मला अजून दिसतंय.

गर्द कुमायती घोड्यावर ते स्वार झालेले होते. कोणत्या तरी कारणान माझी नजर फिरत खंदकाच्या बांधाकडं गेली आणि एक हिरवा कंच भुंगेरा माझ्या

दृष्टीस पडला. माझ्या डोळ्यादेखत त्याचा आकार वाढत वाढत गेला आणि तो अवाढव्य दिसू लागला. एकाद्या दैत्याप्रमाणे गवताची पाती बाजूला झुगारीत तो माझ्या कोपराच्या दिशेने झोकांड्या घेत आला. बांधाच्या कोरड्या भुसभुशीत चिखलावर मी कोपर टेकलं होतं. माझ्या फर्गोलाच्या बाहीवर तो चढला आणि झरझरा सरपटत बंदुकीवर चढला तिथून तो झोळण्याकडं गेला. त्याचं मार्गक्रमण मी न्याहाळीत होतो. एवढ्यात 'टवाळा' चा गरजता आवाज माझ्या कानी पडला, 'फायर ! काय झालंय काय तुला ?'

मी कोपर अधिक ठामपणे रोवलं. डावा डोळा गच्च मिटून घेतला आणि मला असं जाणवलं की माझं दिल फुगत फुगत त्या हिरव्याकंच भुंगोऱ्याएवढं अजस्त्र झालं आहे. करड्या हिरव्या फर्गोलाच्या पार्श्वभूमीवर माझ्या बंदुकीच्या माशीतील नेम निशाणं हेलकावत होती. मी घोडा दाबला आणि माझ्या काडतुसांची विव्हळ झेप माझ्या कानी पडली. माझ्या शेजारी 'टवाळ' गोळी चालवत होता· बंदुकीची माशी मी खूप खाली धरली असली पाहिजे कारण काडतूस एका गवताच्या झुबक्याला चाटून गेलं आणि धुळीची पांसाळी उठली. माणसाचा नेम धरून मी झाडलेली ती पहिलीच गोळी होती. नेम निशाण न धरता मी शिलेखणी रिकामी केली. आणि मी घोडा दाबला तरी जबाब जेव्हा येईना. तेव्हाच मला वर नजर करून जर्मनांकडे पहावे लागले. त्याच शिस्तवारीनं ते परत दौडत चालले होते. अंमलदार पिछाडीला घोडा फेकीत जात होता. ते नऊ जण होते. अंमलदाराच्या घोड्याचा कुमायती चौक आणि त्याच्या भालायती शिरस्त्राणाचे पोलादी तकटही मला दिसत होती.

२ सप्टेंबर

टॉलस्टॉयच्या 'युद्ध आणि शांतता' ह्या कादंबरीत एकमेकांविरुद्ध ठाकलेल्या सैन्यांदरम्यानच्या रेषेबद्दल सांगणारा एक परिच्छेद आहे. ही अज्ञाताची रेषा असते. मृतापासून सजीवाना विभागणारी अशी ही रेषा असते. निकोलाय रोस्तोव जिथं चाकरी करीत आहे ते स्क्वाड्रन चाल करून जातं आणि रोस्तोवला मनःश्चक्षूपुढं ही रेषा दिसते. हा परिच्छेद आज मला विशेष ठळकपणे आठवत आहे कारण आज पहाटे जर्मन हुस्सारांच्या एका तुकडीवर हल्ला चढवला.

पोख्त तोफखान्याच्या पाठबळावर त्यांच्या सैनिकानी आमच्या पायदळाला भंडावून सोडले होते. आमचे काही लोक– २४१ व्या आणि २७३ व्या पायदळ रेजिमेन्टचे लोक– मी पाहिले. मला वाटतं ते घबराट होऊन धूम ठोकत होते. तोफखान्याचे मुळीच पाठबळ नाही अशा अवस्थेत हल्ल्यावर दामटल्यानं ते

अक्षरशः गलितधैर्य झाले होते. गनिमाच्या आग्येलानं त्यातले एक तृतीयांश टिपले होते आणि जर्मन हुस्सार उरलेल्यांच्या पाठीवर येत होते. नंतर रानातील मोकळ्या तळ्यांत राखीव म्हणून उभं असलेलं आमचं रेजिमेन्ट त्या धुमाळीत सोडण्यात आलं. ते प्रकरण माझ्या हे असं लक्षात आहे.

पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान आम्ही तिशविची खेडयातून कूच केलं, पहाट होत होती. गर्द काळोख होता. ओट आणि देवदाराच्या सूचीपर्ण गंधान हवा भारावलेली होती. स्क्वाड्रनवारी रेजिमेन्टचं आगेकूच चालू होतं. आम्ही रस्ता सोडून शेतात घुसलो. ओटवरचे दाट दहिंवर आपल्या टापानी उधळीत जाताना घोडी फुरफुरत होती.

अंगावर फर्गोल असूनही गारठा जाणवत होता. रेजिमेन्टला त्यानी बराच वेळ शेतातून चालवत ठेवलं होतं. एक तास उलटल्यावर घोडा फेकीत एक अंमलदार आला आणि रेजिमेन्टच्या कमांडरच्या हाती त्यानं एक हुकूम दिला. आमच्या म्हाताऱ्यानं नाखूष स्वरात तो हुकूम रेजिमेन्टकडं पोचता केला आणि काटकोन करून आमचं रेजिमेन्ट रानात घुसलं. अरुंद वाटेवर आमची पहळ दाट जुटीनं जात होती. डावीकडं कुठं तरी मारामारी चालू होती. आवाजावरून पाहता मोठ्या संखेचा जर्मन तोफखाना सरबत्ती करीत होता.

तोफेच्या धमाम्यानं हवा कंपित होत होती. आणि असं भासत होतं की आमच्या डोक्यावरील त्या गंधित देवदार वनालाच आग लागली आहे. उजाडेपर्यंत आम्ही फक्त ऐकत होतो. जयजयकाराचा एक आवाज वर उठला. शबल विदीर्ण प्रकारचा जयजयकार आणि नंतर मशीनगनच्या स्वच्छ घणाघातात ओवलेली नीरवता ! त्या क्षणी माझं डोकं गरगरत होतं. एकाच गोष्टीचा मी विचार करू शकत होतो आणि ते चित्र सर्वथैव आणि दुःखदपणे सुस्पष्ट होतं. ही गोष्ट म्हणजे आगेकूच करणाऱ्या आमच्या पायदळाचे चेहरे.

सपाट फौजी टोप्या घातलेल्या त्यांच्या भोंगळ करड्या आकृत्या आणि शारदीय धरणीला त्राहाटीत जाणारे त्यांचे बेढब सैनिकी उंच बूट माझ्या मनःचक्षूपुढे मला दिसत होते आणि त्या सजीव घामेजणाऱ्या देहाचे रूपांतर मुडद्यात करण्यासाठी उद्युक्त झालेल्या जर्मन मशीनगनसचे भेदक खरखरीत 'हास्यध्वनी' मला ऐकू येत होते. त्या दोन रेजिमेन्टची पार निखदणी होऊन त्यानी धूम ठोकली. नंतर जर्मन हुस्साराचे रेजिमेन्ट त्यांच्यावर तुटून पडले. सातशे किंवा त्याहून कमीच यार्डावरून आम्ही त्यांच्या बगलेवर आलो. हुकूम देण्यात आला. आम्ही चटकन सफाबंदी केली. एकच थंड हुकूम मला ऐकू आला 'आगे बढो !'

लगाम बसल्यासारखं क्षणभर त्यानं जणु आम्हाला मागं खेचलं. नंतर आम्ही चौखूर पुढे उधळलो. माझ्या घोड्याचे कान डोक्याला इतके सपाट चिकटले होते की बोटं घालूनही ते उचकटता आले नसते. मी मागं वळून पाहिलं. माझ्या मागं रेजिमेंटचा कमांडर आणि दोन अंमलदार होते. होय हीच ती रेषा. सजीवांना मृतांपासून विभागणारी रेषा. इथंच होती ती पागलपणाची महान घटिका !

हुस्सार गडबडले आणि मागे फिरले. माझ्या डोळ्यादेखत आमच्या स्क्वाड्रन कमांडर चेर्नित्सोकन एक जर्मन हुस्सार खांडला. सहाव्या स्क्वाड्रनच्या एका कझाकानं एका जर्मनाला गाठलेला आणि बेभानपणे त्याच्या घोड्याच्या चौकावर घाव घातलेला मी पाहिला. वर उठून खाली कोसळताना त्या तलवारीवरून कातडीच्या धांदोटच्या ओघळत होत्या. हे अतर्क्य होतं ! त्याला कोणतंही नाव नव्हतं ! परत येताना मी पाहिलं की चेर्नित्सोवचा चेहरा तंद्रीत आणि आनंद आवरून धरलेला होता. माणसाचा नुकताच खून पाडून आल्यानंतर जीना ऐवजी पत्ते खेळायच्या मेजापाशीही तो असाच बसला असता, स्क्वाड्रन कमांडर चेर्नित्सोव फार उंचावर चढेल ! एक लायक माणूस !

४ सप्टेंबर

आम्ही विश्रांती घेतोय. दुसऱ्या सैन्यदळाची चौथी डिव्हीजन आघाडीवर आणली जात आहे. कोबीलिनो ह्या लहानशा गावात आमचा मुक्काम आहे. आज सकाळी अकराव्या रिसाला डिव्हिजनची आणि उराल कझाकांची झपट्यानं पथकं गावातून गेली. पश्चिमेला धुमश्चक्री चालू आहे. अखंड धमामा. जेवण झाल्यावर मी आघाडीवरील इस्पितळाकडे गेलो. जखमींची गाडी नुक्तीच आली होती. स्ट्रेचर वाहणारे एक मोठी गाडी खाली करीत खिदळत होते. मी त्यांच्या जवळ गेलो. एक उंच भगव्या केसांचा सैनिक एका अडलीच्या मदतीने नुक्ताच खाली उतरला होता.

'हे कसं काय वाटतं कझाका ?' मला उद्देशून तो म्हणाला, 'माझ्या गांडीत वाटाणं घातले त्यांनी ! फवाऱ्याचे चार बार घुसलेत !'

'पिछाडी गोळा उडाला की काय ?' त्याच्या अडलीनं त्याला विचारलं.

'कसली डोंबलाची पिछाडी ? मीच पिछाडीला आगेकूच करीत होतो !'

एका झोपडीतून एक नर्स बाहेर आली. मी तिच्याकडं नजर टाकली आणि माझ्या हातापायातील त्राण एकदम इतकं गेल्यासारखं झालं की, एका गाडीचा मला आधार घ्यावा लागला. तिचं लिझाशी असलेलं साम्य अनन्यसाधारण होतं· तेच डोळे, तसाच लांबट चेहरा, नाक, केस तिचा आवाजसुद्धा तसाच होता का

माझ्या कल्पनेचे खेळ चालू होते ? आता मला असं वाटतं की भेटेल त्या बाईचं तिच्याशी मला साम्य आढळेल.

५ सप्टेंबर

ठाण्याला बांधलेल्या घोड्यानी दिवसभराची चारावैरण खाल्लेय आणि आम्ही पुन्हा आघाडीकडं निघालोय. शारीरिकदृष्टया मी कोसळण्याच्या बेतात आहे. शिंगवाला घोड्यावर मांड घेण्याचा हुकूम बाजवतोय. गोळी घालून ज्याचा जीव घेण्याला मला आनंद वाटेल असा हा एकच माणूस आहे !

रेजिमेन्टच्या मुख्य ठाण्याकडं संदेश घेऊन स्क्वाड्रन कमांडरने ग्रिगरी मेलिखोवला पाठवला होता. लढाई नुक्तीच झाली होती. त्या भागातून घोडा फेकीत जाणाऱ्या ग्रिगरीला हमसडकेच्या कडेला एक मेलेला कझाक पडलेला दिसला. टापांचे खळगे पडलेल्या रस्त्याजवळ आपले पिंगट कुरळ्या केसांचे मस्तक टेकवून तो पडला होता.

ग्रिगरी पायउतार झाला आणि नाक मुठीत धरून त्यानं प्रेताची तपासणी केली. (मयत इसमाला कुजून घाण सुटलेली होती) तुमानीच्या खिशात त्याला ही वही, कॉपिंग पेन्सिलचं थोटूक आणि एक पसा मिळाला. त्यानं गोलदानीचा पट्टा काढून घेतला आणि आधीच सडायला लागलेल्या त्या फटफटीत भिजट चेहऱ्याकडे नजर टाकली. कानशीले आणि नाकाची दांडी काळी पडू लागली होती. पिळवटल्या व्यग्रतेने कपाळावर तिरकस उठून राहिलेल्या आठीत धुळीची पुटे जमू लागली होती.

मयताच्या खिशात सापडलेल्या तलम हातरुमालाने ग्रिगरीने त्याचा तो चेहरा झाकून टाकला आणि मधून मधून थांबून मागे वळून बघत तो मुख्य ठाण्याकडे निघून गेला. मुख्य ठाण्यावर असलेल्या कारकुनांच्या हाती त्याने ती वही दिली. ती वाचण्यासाठी कारकुनांनी कोंडाळे केलें. त्या माणसाचे आयुष्य आणि त्या आयुष्यातील पार्थिव इच्छा ह्यांची त्यानी हसून टर उडवली !

१२.

ऑगस्ट महिन्यात अकराव्या रिसाला डिव्हिजनने मुसंड्या मारून गावा मागून गाव सर केला आणि महिनाअखेर कामेनका–स्त्रुमिलोवा गावाभोवती

त्यानी बुरुजबंदी उभारली. त्यांच्या पाठोपाठ दळभार येत होता. महत्त्वाच्या मोक्याच्या क्षेत्रांवर पायदळ पथकांची जमवाजमव करण्यात आली. अंमलदारांची पथके आणि बाडबिस्तराच्या गाड्या रेल्वे जंक्शनवर जमा झाल्या होत्या.

बाल्टिक समुद्रापासून आघाडी चाबकाच्या जीवघेण्या फटकाऱ्याप्रमाणे पसरली होती. लष्कराच्या मुख्य ठाण्यावर एका प्रचंड चढाईचा मनसुबा शिजत होता. सेनानी नकाशे पुढे मांडून डोळेफाड करीत होते जासूदस्वार लढाईचे हुकूम घेऊन घोडी फेकीत ये जा करीत होते. लक्षावधी सैनिक आपल्या मरणाकडे पावले टाकीत चालले होते

गनिमाच्या रिसाल्याची प्रचंड फौज गावाच्या वाटेने येत असल्याची वर्दी टेहळणी हशमानी आणली. रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या रानातून कझाकांच्या तुकड्या आणि गनिमाचे रखवाली हूलस्वार ह्यांच्या चकमकी चालू होत्या.

आपल्या भावाची भेट झाल्यापासून ग्रिगरी मेलिखोवने दुःखद विचार संपुष्टात आणण्याचा आणि चित्ताची पूर्वीची निवांतता परत मिळवण्याचा प्रयत्न केला होता. पण त्याचा काही उपयोग नव्हता. राखीवदळाच्या दुसऱ्या सफयांतून जी कुमक मजबुती घेण्यात आली त्यात अलेक्सेई उऱ्युपिन नावाचा कझाक ग्रिगरीच्या जुमल्यात भरती करण्यात आला. उऱ्युपिन उंच, काहीशा गोल खांद्याचा, अरेरावी दाभाडाचा आणि छपरी काल्मिकी मिशाचा होता. त्याचे आनंदी निर्भय डोळे नेहमी हसत असत. तो टकल्या होता. त्याच्या कोनदार कवटीच्या काठानेच काय ते तुरळक गुलाबी केस होते. त्याच्या आगमनाच्या पहिल्याच दिवशी त्याचे 'झुबक्या' हे टोपण नाव पडून गेले.

ब्रोदीच्या भवताली लढाई झाल्यानंतर ह्या रेजिमेन्टला एक दिवसाची उसंत मिळाली. ग्रिगरी आणि उऱ्युपिनचा मुक्काम एकाच झोपडीत होता. त्याचे लौकरच संभाषण सुरू झाले.

'तुला ठाऊकाय मेलिखोव ? तुझा पिसारा झडत चाललाय !'

'पिसारा झडत चाललाय म्हणजे ?' ग्रिगरीने आठ्या घालून विचारले.

'वरपासून खालपर्यंत तू निर्जीव झालायस ! जसा आजारातून उठल्यागत !'

आपल्या घोड्याना ते वैरण देत होते आणि शेवाळे माजलेल्या डुगडुगत्या कुपाटीकडे पाठी करून ते धूर सोडीत उभे होते. चारा चाराच्या रांगानी हुस्सार रस्त्यावरून घोडी घेऊन चालले होते. कुपाटीपाशी मुडदे पडलेले होते. कारण ऑस्ट्रियनानी माघार घेतली तेव्हा खणाखणी झाली होती. जळालेल्या यहुदी

देवळाच्या पडझाडीतून जळालेला वास येत होता. कलत्या दिवसाच्या समृद्ध रंगावलीत ते गाव म्हणजे संहार आणि विषादजनक रितेपणाचे एक प्रचंड चित्र होते.

'मला काय धाड भरलेली नाय!' असे म्हणून ग्रिगरी उन्युपिनकडे न बघता थुंकला.

'तू खोटं बोलतोयस्! मला डोळे आहेत बघायला!'

'बरं! काय दिसतंय तुझ्या डोळ्यांना?'

'तू घाबरून गेलायस! मरणाला तू घाबरलायस!'

'मूर्खायस् तू!' आपल्या बोटांची नखे किलकिल्या नजरेने न्याहाळीत ग्रिगरी तिरस्काराने म्हणाला.

'मला सांग! तू कुणाला तरी ठार मारलंयस का?' उन्युपिन छडा लावीतच होता.

'हो! त्याचं काय?'

'त्या भारानं मन दबून गेलंय का?'

'मन दबून गेलंय?' ग्रिगरी कडवटपणे हसला. उन्युपिनने म्यानातून तलवार बाहेर काढली.

'तुझी मुंडी छाटली तर आवडेल?'

'पुढं काय?'

'काडीची खंत न वाटता मी तुला ठार मारीन! मला दयामाया काय नाय!' उन्युपिनचे डोळे हसत होते पण त्याचा आवाज आणि त्याच्या नाकपुड्यांची आधाशी थरथर ह्यावरून ग्रिगरीने हे जाणले की तो मनापासून बोलतो आहे.

'तू चमत्कारिक आहेस..! तू रानटी आहेस!' उन्युपिनचा चेहरा एकटक न्याहाळीत ग्रिगरी म्हणाला.

'हुडुत! तुझं दिल पातळ आहे! हा वास ठाऊकाय तुला? बघ!' वईतील एक जुने बर्चचे झाड उन्युपिनने निवडले आणि नजरेने अंतराचा अंदाज घेत तो थेट त्या झाडाकडे गेला. आगळी रुंद मनगटे असलेले त्याचे लांब पिळदार बाहू निश्चळ खाली लोंबले होते.

'बघ!' त्याने सावकाश तलवार वर उचलली आणि भयंकर शक्तिनिशी तिला अचानक तिरपा झटका दिला. भूमीपासून चार फूट अंतरावर संपूर्ण विलग होऊन झोपडीच्या खिडक्या खरवडत आणि भिंती ओरबाडत ते बर्चचे झाड कोसळून पडले.

'बघितलंस हे ? शिकून घे ! बाकलानोब नावाचा एक आतामान होऊन गेला. कधी ऐकलंयस् का त्याचं नाव ? त्याच्या तलवारीच्या पात्यात पारा भरलेला होता ! उचलायला अवजड ! पण तिनं तो एका घोडयाचे दोन घोडे करायचा ! हे असे !'

नवीन वाराचे कठीण तंत्र शिकायला ग्रिगरीला बराच वेळ लागला. 'तू आहेस दणकट ! पण तलवार पेलायला मूर्खायस ! हे असं हवं !' भयानक शक्तीनिशी तलवारीचा तिरपा वार करीत उन्युपिनने त्याला धडा दिला. 'बेडर-पणानं माणूस खांड ! माणूस कणकेगत मऊ असतो !' त्याच्या डोळयात हास्य आले. 'का ? न् कशाला ? ह्याचा घोळ घालत बसू नको ! तू कझाकायस ! प्रश्नांच्या फंदात न पडता माणूस खांडायचं तुझं काम ! लढाईत गनिम ठार मारणं हे पवित्र काम आहे ! मारलेल्या प्रत्येक माणसागणिक देव तुझं एकेक पाप-साप मारला तर पुसतो-तसं पुसत जाईल ! जरुर पडल्याखेरीज प्राण्याला मारू नको ! पण माणूस नाहीसा कर ! तो जंगली आहे ! गलिच्छाय ! धरत्री तो विखारी करतो ! कुत्र्याच्या मुतागत जगतो !'

ग्रिगरीने हरकती घेतल्या तेव्हा उन्युपिनने कपाळाला आठ्या घातल्या आणि हट्टीपणाने तो गुळणी धरून बसला

ग्रिगरीला हे पाहून आश्चर्य वाटले की सगळी घोडी उन्युपिनला भिऊन असत. तो त्यांच्या जवळ गेला की घोडी कान टवकारीत आणि माणूस नव्हे तर जणू कुणी श्वापद येतंय अशा प्रकारे एकमेकाना चिकटून उभी रहात. एकदा एका रानमाजल्या दलदलीच्या जागेवर पायउतार होऊन हल्ला चढवायचा स्क्वाड्रनला प्रसंग आला. घोडी बाजूला मोकळ्या रानात नेण्यात आली. घोडयाचा ताबा घेण्याची कामगिरी ज्याच्यावर सोपवण्यात आली त्यात उन्युपिन होता. पण त्याने साफ नकार दिला.

'उन्युपिन ! तुझी घोडी का नाय नेत रे भडव्या ?'

'ती मला भितात ! देवाच्यान भितात !'

उन्युपिनने उत्तर दिले. त्याचे डोळे नेहमीप्रमाणे लकाकत होते.

घोडयाची उस्तवारी करायची आपली पाळी तो कधीही करायचा नाही. स्वतःच्या जनावराबाबत त्याला ममता होती. पण ग्रिगरीच्या असे लक्षात आले की, तो जवळ येताना दिसला की त्याच्या घोडयाची पुटे थरथरत आणि अस्वस्थ-पणे तो चाळवाचाळव करू लागे.

'मला हे सांग की घोडीं तुला का भितात ?' ग्रिगरीने त्याला एकदा प्रश्न केला.

'मला माहीत नाय !' खांदे उडवून त्याने उत्तर दिले. 'त्यांच्या बाबतीत मी तसा दयाळू आहे !'

'ती झिंगलेल्या माणसाला ओळखतात आणि त्या घाबरतात. पण तू तर नेहमी ताळ्यावर असतोस !'

'माझं दिल कठीणाय ! त्याना ते जाणवतं मला वाटतं.'

'तुझं दिल लांडग्याचं आहे. किंवा तुला दिल नायच ! आहे तो एक फत्तर.'

'शक्याय !' उऱ्युपिनने खुषीने मान्य केले.

टेहळणीच्या कामावर जुमल्याची रवानगी करण्यात आली होती. ऑस्ट्रियन सैन्यातून पळून आलेल्या एका चेकने रशियन लष्करी अधिकाऱ्याला माहिती-दिली होती की, गनिमाच्या फौजेने पवित्रा बदललेला आहे. त्याने रशियन लष्कराला प्रतिहल्ल्याची आणि वैऱ्याची रेजिमेन्ट जिथून गेलीच पाहिजेत त्या रस्त्यावर सक्त नजर ठेवण्याची सूचना दिली.

रानाच्या कडेकाठावर जुमलेदाराने एका सार्जंटच्या हाताशी चार कझाकाना ठेवले आणि तो स्वत: पुढच्या टेंबल्यापलिकडे असलेल्या गावाकडे इतराना घेऊन दौडत गेला. ग्रिगरी, उऱ्युपिन, मिशा कोशेवोई आणि आणखी एक कझाक ह्यांना सार्जंटाजवळ ठेवण्यात आले.

तुटलेल्या देवदारापाशी हे कझाक धूर काढीत पडले होते आणि सार्जंट डोळ्याला दुर्बीण लावून मुलूख न्याहाळीत होता. शिळोप्याच्या गप्पा मारीत अर्धा तास ते तिथे पडले होते. उजवीकडून कुठूनतरी भडीमाराचा अखंड धमामा कानी येत होता. थोड्या पावलांच्या अंतरावर कापणी राहून गेलेले, कणसातून दाणे झडलेले रायचे शेत वाऱ्यावर डुलत होते. ग्रिगरी सरपटत रायच्या शेतात शिरला. अजून जी भरलेली होती अशी कणसे त्याने निवडली आणि ती सोलून तो दाणे दातात रगडू लागला.

दूरवर असलेल्या मळ्यातून घोडेस्वारांचा एक घोळका बाहेर पडला आणि खुला मुलूख न्याहाळीत थबकला. थोड्या वेळाने तो घोळका परत ह्या कझाकांच्या दिशेने निघाला.

'बहुधा ऑस्ट्रियन !' सार्जंट श्वास रोखून उद्गारला.

‘कुठं ?’ सिलान्तेव्हने दचकून विचारले.

‘ते काय रानांतून येतायत. उजवीकडं बघ !’

घोडेस्वारांची एक टोळी दूरच्या विरळ रानझुडुपातून बाहेर पडली. जंगलातील कडपट्टीवरील शेताची ते टेहळणी करीत होते. नंतर ते त्या कझाकांच्या दिशेने येऊ लागले.

‘मेलिखोव !’ सार्जंटने हाक मारली.

ग्रिगरी सरपटत त्या झाडापर्यंत गेला.

‘ठीक ! त्याना जरा जवळ येऊ द्या अन् मग धरा त्यांच्यावर फैर. पोरानु, बंदुका तयार ठेवा.’ सार्जंटने धांदलीने पुढे म्हटले.

उजवी धरून स्वार चालले होते. चौघेजण श्वास रोखून झाडाखाली पडले होते.

‘आउस्त काप्राल !’ वाऱ्यावर एक तरणा खणखणीत आवाज ऐकू आला.

ग्रिगरीने मुंडी वर उचलली.

सहा हंगेरियन हुस्सार घोळका करून होते. उरावर पांढऱ्या फांसडचा असलेले देखणे फर्गोल त्यानी धारण केले होते. एका समंद काळचा देवजादावर मांड घेतलेला आणि हातात काडबीन धरलेला त्यांचा नाईक शांतपणे हंसत होता..

‘शुरु !’ सार्जंट दबक्या आवाजात म्हणाला. झाडातून फैर दुमदुमत सुटली.

‘काय झालं ?’ देवदारामागून कोशेवोईने दचकून मारलेली आरोळी आली.

‘अरे ए ए ऽ रांडिच्यानू गप् ! गप् रहा !’ त्याचा आवाज रुक्ष कर्कश होता. हुस्सारानी एका रांगेत घोडी शेतात पिटाळली. त्यांच्यापैकी एकाने त्यांच्या नायकाने–हवेत बार काढला. घोडयांच्या गंडखोलाला मिठी मारून डाव्या हाताने टोपी दाबून धरणारा शेवटचा हुस्सार मागे पडला.

सर्वांच्या आधी उऱ्युपिन ताडकन् उडी मारून उठला. रायच्या शेतातून धडपडत तो धावत सुटला. आपल्या मागोमाग तो बंदूक फरफटत नेत होता. सुमारे शंभर एक यार्डावर त्याला तंगडचा झाडीत धडपडणारे कोसळलेले घोडे आढळले. जवळच एक हंगेरियन हुस्सार खाली पडल्याने दुखावलेला गुडघा चोळीत उभा होता. उऱ्युपिनकडे पाहून तो काहीतरी ओरडला आणि शरणांगतीची निशाणी म्हणून त्याने माघार घेत जाणाऱ्या आपल्या साथींकडे बघत दोन्ही हात हवेत उंचावले.

हे सगळे इतक्या झटपट घडले की उऱ्युपिन आपला कैदी घेऊन माघारी येईपर्यंत काय घडत आहे त्याचे आकलन होण्याला ग्रिगरीला फुरसतच झाली नाही.

'ए भाद्र चल ! काढ ते !' हुस्साराची समशेर धसमुसळेपणाने खेचीत उऱ्युपिन त्या हंगेरियनावर खेकसला.

तो कैदी घाबरटपणे हसला आणि आपली समशेर खुशीने हवाली करण्यासाठी चाचपडत पट्टा सोडवू लागला. पण त्याचे हात थरथरत होते आणि ते बक्कल त्याला सोडवता येईना. ग्रिगरीने सावधगिरीने त्याला मदत केली. तो हुस्सार म्हणजे भादरलेल्या वरच्या ओठाच्या कोपऱ्यात तीळ असलेला गुबगुबीत गालाचा तरुण पोरगा होता. ग्रिगरीकडे पाहून त्याने आभारादाखल स्मित केल आणि मान हलवली. आपले हत्यार काढून घेण्यात आल्याबद्दल त्याला आनंद झालेला दिसत होता. खिसे चाचपडत त्याने कातडी चंची बाहेर काढली आणि काहीतरी पुटपुटत त्याने कझाकांच्या पुढे तंबाखू केली.

'आपला पाहुणचार करतोय !' सार्जंट स्मित करून म्हणाला आणि सिगरेटचा कागद शोधू लागला.

'परदेशी तमाखू ओढून घ्या !' सिलान्तिएव खिदळत म्हणाला.

त्या हुस्साराची तंबाखू घेऊन कझाकानी सिगरेटी वळल्या आणि ते धूर सोडू लागले. ती कडक काळी तंबाखू चटकन त्याच्या डोक्यात शिरली.

'त्याची बंदूक कुठाय ?' आधाशीपणे सिगरेटचा दम मारीत सार्जंटाने विचारले.

'ही पहा !' आपल्या पाठीमागे असलेला टांके घातलेला पिवळा झोळणा उऱ्युपिनने दाखवला.

'त्याला स्क्वाड्रनकडं नेलेलं बरं ! त्याला काय म्हणायचंय ते त्याना ऐकायचं असेल !'

'पोरानु, कोण घेऊन जाईल ह्याला ?' आपल्या गड्यांवरून नजर फिरवीत सार्जंटने विचारले.

'मी घेऊन जातो !' उऱ्युपिनने चटकन उत्तर दिले.

'ठीक ! चल नीघ इथून !'

आपले काय होणार ते त्या कैद्याने ओळखल्याचे उघड होते कारण तो कसनुसे हसला. आपले खिसे उलटे करून त्याने कझाकाना काही तुकडे पडलेली मऊ चाकलेटे देऊ केली.

'रुसिन इरव...रुसिन...निख्त आवास्त्रित्स !' चाकलेटे पुढे करून अजागळासारखे अविर्भाव करीत तो तत–पप करू लागला.

'हत्यारं आहेत का काही ?' सार्जंटने विचारले,

'तसलं काही अकडं तकडं करू नको ! तुझी भाषा नाय समजत आम्हाला! पिस्तुलाय ? ठो.. ठो...ठो ?' सार्जंटने पिस्तुलाचा काल्पनिक घोडा दाबला कैद्याने जोराने मान हलवली

'नाय हाय ! नाय हाय !

त्याने खुषीने स्वतःची झडती घेऊ दिली. त्याचें गोबरे गाल थरथरत होते. त्याच्या फाटलेल्या गुडघ्यातून रक्त ओघळत होते. त्याच्या गुलाबी कातडीवर मुक्या माराचे हिरवे निळे वळ होते. अखंड बडबड करीत चेहरा पिळवटून त्याने हातरुमालाने रक्त टिपले. त्याची टोपी घोड्यापाशी पडली होती ती आणण्यासाठी आणि त्याचे ब्लँकेट, त्याच्या कुटुंबाचे फोटो ठेवलेली वही आणण्यासाठी तिकडे 'जाऊ का ?' असे त्याने विचारले. तो काय म्हणतोय ते समजावून घेण्याची सार्जंटने शिकस्त केली. शेवटी त्याने हताश होऊन हात झाडला.

'चल नीघ ह्याला घेऊन !'

उन्युपिननं आपला घोडा धरला आणि वर मांड घेतली. पाठीवर बंदूक नीट आडवी बसवीत त्याने कैद्याला जवळ येण्याची खूण केली.

'चल ए शेंदाड शिलेदार ! तुझी आई घातली भडव्या !'

त्याचे स्मित पाहून प्रोत्साहन मिळालेल्या त्या हंगेरियनानेही स्मित केल आणि घोड्याच्या बाजूकडे तो येऊ लागला. घसट करण्याचा प्रयत्न म्हणून त्याने उन्युपिनचा गुडघा थोपटला. पण त्या कझाकाने त्याचा हात उग्रपणे झटकून टाकला आणि लगाम खेचले.

'चल ! चालायला लाग ! नखरे नाय पायजेत !'

तो कैदी ओशाळून बाजूला झाला आणि गंभीर चेहरा करून बाजूने चालू लागला. पुनः पुन्हा तो मागे वळून इतर कझाकांकडे बघत होता. त्याच्या पिंग्या केसांचा तुरा टाळूवर उत्साहाने उभा राहिला होता. त्यामुळे ग्रिगरीच्या आठवणीत त्याची प्रतिमा उमटून राहिली ती अशी– खांद्यावरून उडणारा त्याचा फर्गोल त्याचा पिंगट केसांचा तुरा, त्याची आत्मविश्वासयुक्त धीमी चाल.

'मेलिखोव, जा ! त्या घोड्याची जीन कंठाळी उतरव !' सार्जंटने हुकूम सोडला आणि बोटे भाजेपर्यंत ओढलेल्या सिगरेटचे टोक खेदाने थुंकून टाकले. ग्रिगरी त्या पडलेल्या जनावराकडे गेला. त्याचे जीन त्याने उतरवले आणि मग कोणत्यातरी अनिश्चित कारणाने जवळ पडलेली टोपी त्याने उचलली, टोपीचे अस्तर त्याने हुंगले. सवंग साबणाचा आणि घामाचा गंध त्याला जाणवला.

त्या हुस्साराची टोपी डाव्या हातात निगूतपणे धरून त्याने घोड्याचा तो सरंजाम झाडाकडे नेला. उकिडवे बसून कझाक दुलंग्या ढुंढाळू लागले, जिनाची अपरिचित धाटणी न्याहाळू लागले.

'त्याच्या जवळची ती तंबाखू छान होती ! त्याच्याकडून आपण आणखी मागून घ्यायला हवी होती !' सिलान्तेव हळहळला.

'हा हा ! हे बरीक खराय ! तंबाखू मस्ताय !'

'मिठाईच्या लाळेगत घशातून उतरलंय–!' त्या आठवणीने सार्जंटने सुस्कारा सोडला आणि तोंडातील थुंकी गिळून टाकली.

थोडीच मिनिटे उलटली असतील एवढ्यात देवदारातून घोड्याचे मस्तक अवतीर्ण झाले आणि उन्युपिन दौडत आला.

'आ ? पळाला काय ?' घाबरून उडी मारत सार्जंट उद्‌गारला.

चाबूक नाचवीत उन्युपिननं घोडा पुढे आणला. मग पायउतार होऊन त्याने खांद्याना आळोखे पिळोखे दिले.

'त्या ऑस्ट्रियनचं काय केलंस ?' त्याच्या जवळ येत सार्जंटने विचारले.

'काय हवंय ?' उन्युपिन त्याच्यावर खेकसला आणि म्हणाला, 'पळून गेला ! पळून जायचा प्रयत्न करीत होता !' दात विचकीत उन्युपिन म्हणाला. 'आम्ही खुल्या रानात आलो न् त्यानं–! तेव्हा चिरफाळून टाकला !'

'खोटं बोलतोयस् !' ग्रिगरी ओरडला, 'काही कारण नसता तू त्याला ठार मारलंस !'

'ओरडायला काय झालं ? तुझा काय संबंध ?' आपली थंड नजर ग्रिगरीच्या चेहऱ्यावर रोखून उन्युपिननं विचारलं.

'का ऽ य ?' ग्रिगरी हळू हळू उठत होता. त्याचा हात जमिनीवर काहीतरी चाचपडत होता.

'जरुर नाय तिथं तुझं नाकाड खुपसू नको ! कळलं ?' उन्युपिन उग्रपणे म्हणाला.

ग्रिगरीने झटकन् बंदूक उचलली आणि खांद्यावर टेकली. घोडा शोधणारी त्याची बोटे थरथरत होती आणि त्याचा राखी चेहरा क्षुब्ध होऊन गेला होता.

'ए ! थांब ए !' त्याच्या दिशेने धाव घेत सार्जंट दरडावून ओरडला. गोळी उडण्याआधी त्याने बंदुकीला धक्का दिला. झाडावरची फांदी छाटून काडतुस सुंसाटत निघून गेले.

'इथं काय चाललंय ?' कोशेवोईने फुसफुसत विचारले.

सिलांतिएवचे दाभाड लोंबू लागले आणि तोंड वासून तो निश्चल बसून राहिला.

सार्जंटाने ग्रिगरीच्या छातीला हात लावून ढकलले आणि त्याच्या हातातील बंदूक हिसकावून घेतली. फक्त उन्युपिन मात्र आपला पवित्रा न बदलता उभा होता. त्याचे पाय फाकलेले होते. डावा हात पट्टयावर ठेवलेला होता.

'परत झाड !'

'जीव घेईन तुझा !' त्याच्या अंगावर धावून जात ग्रिगरी ओरडला.

'हा हा ! पुरे ! काय तमाशा आहे ? कोर्टमार्शल होऊन गोळी खायच्येय ? हात खाली घे !'

ग्रिगरीला मागे ढकलून आणि हात आडवे पसरून तो ह्या दोन गड्याच्या मधोमध उभा राहिला.

'खोटे बोलतोय्स ! तू काय माझा जीव घेतोय्स ?' असे म्हणून उन्युपिनने स्मित केले.

सांजवेळी घोड्यावरून परत येताना वाटेत पडलेला त्या हुस्साराचा मुडदा सर्वांच्या आधी ग्रिगरीने पाहिला. इतरांच्या पुढे त्याने घोडा पिटाळला आणि भेदरलेल्या घोड्याचे लगाम खेंचीत तो टक लावून खाली बघू लागला. मख्मली शेवाळावर सताड हात पसरून तो गडी पडला होता. चेहरा पालथा होता. पत-झाडीच्या पानासारखे पिवळे तळवे वर वळून उघडले होते. पाठीमागून पडलेल्या भयंकर घावाने खांद्यापासून पट्टयापर्यंत त्याची दोन खांडोळी झाली होती.

'दोन तुकडे केलेत !' मुडपलेल्या डोक्यावरून एकीकडे झुकलेल्या त्या मयताच्या केसाच्या सोनेरी झुबक्याकडे घाबरून दृष्टी टाकीत जवळून घोड्यावरुन जाता जाता सार्जंट पुटपुटला.

मुड्याच्या अंगावरून कझाक निमूटपणे स्क्वाड्रनच्या मुख्य ठाण्याकडे घोडी हाकीत गेले.

संध्याकाळच्या सावल्या गडद झाल्या होत्या. एक काळा फुलारलेला ढग पश्चिमेकडून वाऱ्यावर वाहत चालला होता. जवळपासच्या रेवणातून केदाळ बाशेरा दमटपणा आणि कुजलेला वास येत होता. एक लाल बगळा घुमत होता. घोड्याच्या वछाड सामान्याची खुळखुळ, समशेरीची रिकिबीवर मधेच होणारी खणखण, किंवा घोड्याच्या टापाखाली येणाऱ्या देवदाराच्या फळांची करकर

ह्यानीच काय तो त्या पेंगुळलेल्या नीरवतचा भंग होत होता. खुल्या रानातून मावळल्या सूर्याची लालबुंद दीप्ति देवदारूंच्या बुंध्यावर ओघळली होती.

उऱ्युपिन अखंड सिगरेटी ओढीत होता. चुट्टा खंबीरपणे पकडून धरलेली त्याची थोराड बोटे आणि काळेजलेली नखे तरल स्फुल्लिंगात उजळत होती.

जमिनीवरील विरळ होणाऱ्या सायंच्छायांच्या अनिर्वचनीय शोकार्त छटा उठावदार आणि गहिऱ्या करून ढग रानाच्या डोक्यावरून निघून गेला !

१३.

दुसऱ्या दिवशी सकाळी गावावरील हल्ला सुरू होणार होता. दोन्ही फळ्यांवर रिसाला घेऊन आणि काही रिसाला पथके राखीव ठेवून पायदळाने पहाटे आगेकूच करायचें होते, पण कुठेतरी कुणीतरी घोडचूक केली; दोन पायदळ रेजिमेन्टस् वेळेवर येऊ शकली नाहीत. दोनशे अकराव्या बंदुकधारी रेजिमेन्टला डाव्या फळीकडे सरकण्याचा हुकूम देण्यात आला आणि दुसऱ्या एका रेजिमेन्टने चालू केलेल्या घेराव डावात हे बंदूकधारी रेजिमेन्ट स्वत:च्याच बतारीच्या आगवर्षावात साफ झाले. ह्या बेहद्द गोंधळात मनसुबे उधळले गेले आणि हल्ल्याची इतिश्री फज्ज्यात जरी नव्हे तरी अपेशात होण्याचा धोका उद्भवला. पायदळाचे अशाप्रकारे धुरदळण चालू असता आणि कुणाच्या तरी हुकमावरून खबळीत घातलेल्या तोफा बांधानी बाहेर खेचून आणीत असताना अकराव्या रिसाला डिव्हिजनला आगेकूच करण्याचा हुकूम देण्यात आला.

परंतु त्यांना ज्या जागी हुश्शार पवित्र्यात ठेवण्यात आलेले होते ती सगळी रानजमीन आणि दलदलीची जागा असल्याने लंब्याचौड्या आघाडीनिशी हल्ला चढवणे शक्य नव्हते आणि काही ठिकाणी कझाकाना जुमले बांधूनच आगेकूच करावे लागले. बाराव्या रेजिमेन्टच्या चौथ्या आणि पाचव्या स्क्वाड्रनना रानात राखीव म्हणून ठेवण्यात आले होते आणि एकंदर आगेकूच झाल्यानंतर थोड्याच मिनिटात धुमश्चक्रीचा धमामा आणि विदीर्ण करणारा कल्लोळ त्यांच्या कानी आला.

प्रदीर्घ थरथरता जयनाद चालू होता. मधून मधून कझाक बोलत होते.

'सुटले आपले !'

'निघाले !'

'मशिनगनचा काय धडाका आहे !'

'आपल्या जवानाना खूप मारतायत !'

'आपल्या गर्जना ऐकू येत नैत !'

'म्हणजे जवळ येतायत !'

'थोडा वेळ उरलाय !'

'आपल्यालाही उतरावं लागणार !'

दोन स्क्वाड्रनना उघड्या रानात हारीने उभे करण्यात आले होते. देवदाराच्या दणकट बुंध्यात ते गुरफटले गेले होते आणि त्यामुळे जंगजोड कशी चालू आहे, ते त्याना समजत नव्हते.

एक पायदळ कंपनी तरातरा गेली. एक तरतरीत चलाख दिसणारा 'एन्. सी. ओ.' पिछाडीच्या रांगात रेंगाळत घरघरीत आवाजात ओरडला,

'रांगा संभाळा !'

आपला सरंजाम खणखणवीत ती कंपनी दणादणा तिथून गेली आणि आल्डरच्या झाडीत दिसेनाशी झाली.

आता दूरवरून झाडातून तो सकंप जयनाद ऐकू येत होता. मधेच तो खंडित होत होता. गाढ शांतता पसरली.

'पोचले बहुतेक तिथवर !'

'हा हा ! भिडले बहुधा ! खांडतायत् एकमेकाना !'

कझाकानी कान ताणून टवकारले पण त्यांना जास्त काही ऐकूच येईना. उजव्या फळीवर ऑस्ट्रियन तोफखान्याने चालून येणाऱ्या फौजेवर धडाका धरलेला होता. त्या धमाक्यात मधून मधून मशीनगनचा दुरटा ऐकू येत होता.

ग्रिगरीने आपल्या जुमल्याकडे वळून नजर टाकली. कझाक घाबरटपणे चाळवाचाळव करीत होते, घोडी गोमाशांनी सतावल्यागत बेचैन होती. उऱ्युपिननं आपली टोपी खोगीर मुद्दीवर अडकवली होती आणि तो आपले टक्कल पुशीत होता.

ग्रिगरीच्या बाजूला असणारा मिशा कोशेवोई आपल्या परसदारच्या तंबाखूच्या सिगरेटचे तावातावाने झुरके घेत होता. रात्रभर जागरण केल्यानंतर दिसावे तसे आजूबाजूचे वस्तुमात्र अगदी सुस्पष्ट आणि अतिशयच खरेखुरे होते.

ह्या स्क्वाड्रनना तीन तास राखीव ठेवण्यात आले.

आगमार आत्ता थांबत होती तर आत्ता जास्तच वरच्या टिपेत उठत होती. डोक्यावरून एक विमान घरघरत गेले खूप उंचीवरून त्याने थोडावेळ घिरट्या घातल्या आणि अधिक उंचीवर झेप घेत ते पूर्वेच्या दिशेने निघून गेले. विमानविरोधी तोफानी भडीमार सुरू करताच फुटणाऱ्या गोळ्यांचे दुधी फुलारे आकाशाच्या निळाईत ठिपके काढीत गेले.

दुपारी त्याना लढाईवर पाठवण्यात आले. तंबाखूचे सगळे साठे खलास होऊन गेले होते. सगळे गडी उत्सुकतेने व्याकुळ झाले होते तेव्हा भर दुपार होण्याआधी थोडावेळ एक अडली हुकूम घेऊन घोडा फेकीत आला. चौथ्या स्क्वाड्रनच्या कमांडरने आपले गडी चटकन बाजूला काढले. ग्रिगरीला असे भासले की ते आगेकूच करीत नसून माघारच घेत आहेत. त्याचें स्वतःचे स्क्वाड्रन सुमारे वीस मिनिटे रानातून बेतरतिबिने घोडी पळवीत होते रणधुमाळीचा आवाज अधिकाधिक जवळ येत चालला होता.

त्यांच्यापासून फारसा मागे नसलेला तोफखाना झपाट्याने भडीमार करीत होता. कानठळ्या बसवणाऱ्या गर्जना करीत गोळे अडवत्या हवेतून धडाडत चालले होते. अरुंद रानवाटेमुळे स्क्वाड्रनची सफाबंदी मोडली गेली आणि सदरेवर ते बाहेर पडलें ते विस्कळीत होऊन. सुमारे दोन अडीच फर्लांगावर हंगेरीयन हुस्सार रशियन तोफखान्याच्या बांधानीना खांडीत होते.

'स्क्वाड्रन, सफेबस्त हुश्शार!' कमांडर गरजला. कझाकानी हुकमाची पुरती तामिलीही केली नाही एवढ्यात पुढचा हुकूम आला.

'स्क्वाड्रन, समशेर तय्यार! एल्गार–! शुरू–!!'

तारपटींची एक निळी बिजली झळकली. चपळ दौडीतून कझाकानी चौखूर दौड सुरू केली.

तोफखान्याच्या पार उजव्या बगलेवर जबरजंग वाहणाऱ्या घोड्याना आवरायला सहा हंगेरियन हुस्सार गुंतले होते. तोफखान्याच्या चवताळलेल्या घोड्याचे कायदे एक खेचत होता, दुसरा आपल्या भाल्याच्या काठीने त्याना बडवीत होता. तर इतर अराब्याच्या चाकांचे आरे ओढत खेचत होते आखूड शेपटीच्या आमसुली घोडीवर मांड घातलेला एक अंमलदार हुकूम सोडीत होता. कझाक दृष्टीला पडताच हुस्सारानी पटापट घोड्यांवर उड्या घातल्या.

'आणखी जवळ! आणखी जवळ!' आपल्या उधळलेल्या घोड्याची लय ग्रिगरी मोजीत होता. चौखूर दौडत असताना क्षणभर त्याचा एक पाय रिकबीतून निसटला आणि जिनात असुरक्षित वाटून आंतरिक भयाने तो पुढे वाकला आणि

ती लोंबती रिकीब पायाने शोधू लागला. पायाची पकड गवसल्यावर त्याने वर पाहिले तो त्याला आपल्यासमोर जबरजंग तोफेचे सहा घोडे दिसले. सर्वात पुढच्या घोड्यावरील गाडीस्वाराच्या सदऱ्यावर रक्त आणि मेंदूचा शिडकावा झालेला होता. त्या जनावराच्या गंडस्थळावर तो त्याला मिठी मारून पडला होता. अंगावर शहारे आणणारा टापांचा खरखरीत आवाज करून ग्रिगरीच्या घोड्याने त्या मेलेल्या तोपचीवर आपले खूर घातले, उलथलेल्या किराची जवळ आणखी दोघेजण पडले होते. चौथा तोंड खाली घालून आराब्यावर पालथा पडला होता. सिलातिएव नुक्ताच ग्रिगरीच्या पुढे होता. हंगेरियन अंमलदाराने नेम धरून गोळी घातली. वाऱ्याला मुठीने पकडीत कवळीत तो कझाक कोसळला. ग्रिगरीने लगाम खेचले आणि तलवार जास्त चांगली चालवता यावी म्हणून डावी घालून त्याने अंमलदाराजवळ येण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा कावा अंमलदाराने ओळखला आणि कोपरात हात मुडपून त्याच्यावर गोळी चालवली. पिस्तुलातील भांडार संपल्यावर त्याने समशेर काढली. कसलेल्या दांडपट्टेवाल्या-प्रमाणे त्याने तीन कडाक्याचे प्रहार चुकवले. ग्रिगरीने करकरा दांत खात त्याच्यावर चौथ्यादा झेप घेतली.

त्याची घोडी आता जवळजवळ शेजारीशेजारी दौडत होती. आणि ग्रिगरीने त्या हंगेरियनाचा घोटून दाढी केलेला राखी गाल आणि त्याच्या गळ-पट्टीवर शिवलेला त्याच्या रेजिमेंटचा नंबर बघून घेतला. हुलकावणी दाखवून त्याने त्या अंमलदाराचे लक्ष चाळवले आणि आपल्या वाराची दिशा बदलून तलवारीची पुतळी त्या हंगेरियनाच्या खाद्याच्या पात्यात खुपसली. नेम धरून त्याने दुसरा घाव त्याच्या मणक्याच्या किंचित वर मानेवर घातला. त्या अंमलदाराने हातातून समशेर आणि लगाम सोडून दिले. मागे कुणीतरी चावल्यागत त्याने छाताड पुढे फेकले आणि खोगीरमुदीवरून तो खाली कोसळला. भयंकर हायसे वाटून ग्रिगरीने त्याच्या डोक्यावर प्रहार चढवले आणि त्याच्या कानावरील हाडाचा तलवारीने चुराडा केला.

पाठीमागून डोक्यावर बसलेल्या भयानक प्रहाराने ग्रिगरीची शुद्ध छिनावली गेली. तोंडात रक्ताची जळजळीत खारट चव त्याला जाणवली आणि आपण कोसळत असल्याचे त्याने ओळखले एका बाजूने कापलेल्या पिकाचे चवडे राहिलेली धरती गरगरत त्याच्या अंगावर उसळून आली. जमिनीवर त्याच्या देहाचा जो जबर आघात झाला त्याने क्षणभर त्याला भानावर आणले. त्याने डोळे उघडले. त्या डोळ्यात रक्ताचे लोट वहात आले. पायाचा दणदणाट आणि

घोडयांचे घोर निःश्वास त्याच्या कानावरुन जात होते. शेवटचे त्याने डोळे उघडले तेव्हा त्याला घोडयाच्या फुललेल्या नाकपुडया आणि कुणाचे रिकीबीतील पाय दृष्टीस पडले. 'संपलं!' हा शामक विचार त्याच्या मनातून सापागत वळवळत गेला. एक गर्जना आणि मग काळीकुट्ट शून्यता !

१५.

ऑगस्टच्या मध्याला येवगेनी लिस्तनिस्तकीने असे ठरविले की, आतामानच्या हुजुरातीच्या रेजिमेन्टमधून कझाकांच्या खडया फौजेच्या एकाद्या रेजिमेन्टकडे बदलीसाठी अर्ज करायचा. त्याने औपचारिक अर्ज सादर केला आणि तीन आठवडयात त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे नेमणूक मिळाली. सेंट पीटर्सबर्गहून प्रयाण करण्यापूर्वी त्याने वडिलांना लिहिले,

पपा,

आतामान रेजिमेन्टकडून खडया फौजेकडे बदली होण्यासाठी मी अर्ज केला आहे. आज माझ्या नेमणुकीचा हुकूम मला मिळाला असून दुसऱ्या पलटणीच्या कमांडरपुढे दाखल होण्यासाठी मी आघाडीकडे जाण्याला निघत आहे. माझ्या निर्णयाने तुम्हाला बहुदा आश्चर्य वाटेल. पण मला माझ्या कारणांचा खुलासा करायचा आहे. माझ्या आजुबाजूच्या परिस्थितीचा मला उबग आलेला आहे. कवायती, खिजमतगारी, छबिना ह्या सगळ्या वाडाचाकरीने माझे दात शिवशिवू लागतात. मला त्याचा पुरता वीट आलाय. मला जिवंत काम हवंय. आणि वाटले तर असे म्हणा की, शौर्य गाजविण्याची माझी इच्छा आहे. १८१२ च्या युद्धापासून ज्यांनी रशियन शस्त्रांचे वैभव वाढवले आहे त्या लिस्तनित्स्कीच्या खानदानी रक्ताचा हा आवाज आहे असे मला वाटते. मी आघाडीवर जात आहे. मला तुमचे आशीर्वाद द्यावेत.

बादशहाच्या स्वारीने मुख्य ठाण्याकडे प्रयाण करण्याआधी गेल्या आठवडयात मी त्यांना पाहिले. त्या पुरुषाची मी पूजा करतो. मी वाडयात हुजुर रखवालीवर उभा होतो. माझ्या अंगावरून जाताना त्यानी स्मित केले आणि माझ्याकडे डोळयानी खूण करीत त्यांच्याबरोबर असणाऱ्या रोद्झियानकोना ते

इंग्रजीत म्हणाले, ' माझा पराक्रमी रखवाल ! असला भिडू घेऊन मी विलहेल्मचा हात सर करीन ! '

शाळकरी मुलीसारखी मी त्यांची पूजा करतो. माझ्या वयाला अठ्ठावीस वर्षं उलटून गेली असली तरी हे कबूल करायला मला लाज वाटत नाही. बादशहांच्या उज्वल नावाला काळीमा फासणाऱ्या वाड्यावरील कंड्यांनी मी भयंकर क्षुब्ध होऊन गेलोय माझा त्यावर विश्वास नाही. माझा विश्वास बसूच शकत नाही माझ्यादेखत मलिकाजानबद्दल कुचाळकीचे शद्ब काढल्याबद्दल अलिकडेच एक दिवस कॅप्टन ग्रोमोवला मी जवळ जवळ गोळीच घातली होती. मी त्याला म्हणालो की हा अधमपणा आहे आणि वेठबिगाराचं रक्त ज्यांच्या नसातून वाहत आहे असल्याच माणसांचा ही गलिच्छ बदनामी करण्यापर्यंत अधःपात होऊ शकतो. इतर अनेक अंमलदारांसमोर हा प्रसंग घडला. बेभान होऊन मी माझे पिस्तूल काढले आणि त्या हलकटापायी मी एक काडतूस वाया घालवणार होतो. पण माझ्या साथींनी माझे हत्यार काढून घेतले. ह्या गटारात माझे आयुष्य दिवसेंदिवस अधिकाधिक करंटे होत चालले आहे. हुजुरातीच्या रेजिमेन्टमधे–विशेषतः अंमलदारात अस्सल देशप्रेमच नाही. आणि हे उच्चारण्यानं कुणीही भयचकित होईल पण राजघराण्याबद्दलही प्रेम उरलेले नाही.हे कुळवंत नव्हेत तर कंगाल आहेत. ह्या रेजिमेन्टमधून निघून जाण्याचा हाच खरोखरी माझा खुलासा आहे. ज्यांच्याबद्दल मला आदर नाही अशा लोकांशी मी संबंध ठेवू शकत नाही.

तर हे सगळे असे आहे. माझ्या असंबद्धतेबद्दल मला कृपा करून क्षमा करा. मी गडबडीत आहे. माझ्या सामानाची बांधाबांध करून मला निघाले पाहिजे. पपा, प्रकृतीला जपा. आघाडीवरून मी तुम्हाला सविस्तर पत्र पाठवेन.

तुमचा
येवगेनी

सकाळी आठ वाजता वॉर्साच्या गाडीने पेत्रोग्राद ' सोडले. लिस्तनित्स्की ' द्रोझकी ' करून स्टेशनावर गेला. लुकलुकत्या पारव्या निळ्या दिव्यांचे पेत्रोग्राद त्याने मागे टाकले होते.

स्टेशनात सैनिकांची गर्दी आणि गोंगाट उडाला होता. हमालाने लिस्तनित्स्कीची सूटकेस आत आणली आणि थोडी नाणी हातावर पडल्यावर त्याने ' ह्या तरुण सभ्यगृहस्थाचा प्रवास सुखाचा होवो ' असे अभिष्टचिंतन केले

टीप–१) इ. स. १९१४ त सेंट पिटर्सबर्गचे पेट्रोग्राड असे नामकरण करण्यात आले.

लिस्तनित्स्कीने आपला समशेर पट्टा आणि कोट काढून ठेवला आणि आपल्या जागेवर एक फुलाफुलांची रेशमी कॉकेशियन दुलई पसरली. खिडकीजवळ जोगी माणसाचा खप्पड चेहरा असलेला एक पाद्री बसला होता. त्याने घरुन आणलेले खाद्य पदार्थ एका लहान टेबलाबर ठेवलेले होते. आपल्या अंबाडीसारख्या दाढीत अडकलेले खरकटे तुकडे झटकीत त्याने आपल्या समोर बसलेल्या, शाळेचा गणवेश घातलेल्या कृश काळगेल्या मुलीला ताकंपोळे देऊ केले.

'घे थोडसं बेटा !'

'मेहरबानी ! नको मला !'

'अग, लाजू नको ! तुझ्यासारख्या बारीक मुलीनं खूप खायला हवं !'

'मेहरबानीं ! नको मला !'

'कदाचित आपण थोडंसं घ्याल साहेब ! घेता ?'

लिस्तनित्स्कीने त्याच्याकडे कटाक्ष टाकला,

'तुम्ही मला उद्देशून म्हणताय ?'

'हो हो, आपल्यालाच !' त्या पाद्र्याचे उदास डोळे भेदकपणे पहात होते आणि त्याच्या झुकलेल्या मिशांआडून त्याचे पातळ ओठ तेंवढे स्मिताने विलग झाले.

'नको ! धन्यवाद ! मला काही खायची इच्छा नाही !'

'आपण चूक करता आहात. खाण्यात काही पाप नाही. आपण सैन्यात आहात काय ?'

'होय !'

'प्रभू आपल्याला सहाय्य करो !'

येवगेनीचा डोळा लागत असताना त्या पाद्र्याचा रसाळ आवाज कुठूनतरी दूरवरून आल्यासारखा त्याला वाटत होता आणि त्याला असा भास होत होता की निमकहराम कॅप्टन ग्रमोवच बोलतोय.

'माझ्या कुटुंबाला मिळणारं उत्पन्न अगदी तुटपुंज आहे बघा ! तेव्हा लष्करात उपाध्याय म्हणून चाललोय. रशियन लोक श्रद्धेशिवाय लढू शकत नाहीत ! आणि तुम्हाला ठाऊक आहे वर्षोवर्षी श्रद्धा वाढत चालल्येय ! अर्थात काही चुकार लोक आहेत. पण ते शिकलेल्या वर्गात आहेत ! शेतकरी देवाला घट्ट धरून आहे !'

त्या पाद्र्याचा खर्ज येवगेनीचा जाणीवतेचा ह्याच्यापुढे भेद करू शकला नाही. येवगेनीचा डोळा लागत होता. लाकडी छपराला दिलेल्या रंगाचा वास

त्याला जाणवला. बाहेरून कुणीतरी ,ओरडरले ' लगेज गेलं ! मला सोयर काही नाही ' ' कसलं लगेज गेलं ?' येवगेनीच्या मनात विचार आला आणि जाणिवेची दोरी तुटून गेली. दोन रात्रीच्या जागरणानंतर उत्तेजक झोप लोटली होती.

गाडी पेट्रोग्राड पासून जेव्हा चांगली पंचवीस सव्वीस मैल पुढे आली तेव्हा ाा झाला. चाकांची लयबद्ध खडखड चालू होती. डबा हालत डुलत होता. ्च्या डब्यात कुणीतरी गात होते. दिव्याने लांबट जांभळट सावल्या पडल्या

लिस्तनित्स्कीला जे रेजिमेन्ट देण्यात आले होते, त्याची जबर हानी झालेली त्यामुळे आघाडीवरून ते काढून घेऊन त्यांची जनावरे बदलणे आणि गमा- र सरंजाम भरून काढणे जरूर होते. रेजिमेन्टची मुख्य लष्करी कचेरी ्यागी ह्या मोठ्या बाजारपेठ असलेल्या खेड्यात होती. लिस्तनित्स्की या तरी अनाम स्टेशनावर खाली उतरला. ह्याच स्टेशनात रणांगणावरील ो लोक खाली उतरवण्यात येत होते. ते काम ज्याच्या अखत्यारीत होते त्या रजवळ ह्या जखमींच्या मुक्कामाच्या ठिकाणाची त्याने चौकशी केली. र असे समजले की हे जखमी लोक नैऋत्य आघाडीवरून त्याचं स्वत:चं ान्ट जिथे लढत होते त्या रणांगणाकडे बदली करण्यात येत होते. त्याला र समजले की, जखमींची इस्पितळगाडी बेरेझन्यागी–इवानोवुका– ्व्हिनस्कोये ह्या मार्गाने जाणार आहे. तो धिप्पाड लालबुंद डॉक्टर आपल्या ्च्या वरिष्ठांबद्दल अत्यंत नाराजीने बोलत होता. डिव्हिजनल स्टाफच्या ्दाराना शिव्या देत होता. आपली दाढी तो हाताने हिसकत होता. चापाच्या ाच्या आडचे त्याचे डोळे धगधगत होते आणि यदृच्छया ओळख झालेल्या ाच्या कानात तो आपला काविळी क्रोध ओतीत होता.

' तुम्ही मला बेरेझन्यागीला घेऊन जाल का ?' लिस्तनित्स्कीने त्याला मधेच ्रून विचारले.

' होय ! बसून घ्या इस्पितळ गाडीत लेफ्टनंट !' त्याने मान्यता दर्शवली र लिस्तनित्स्कीच्या कोटाचे बटण सलगीने पिरगाळीत आपल्या तक्रारीचा ्का चालू केला.

' कल्पना करा लेफ्टनंट ! सव्वाशे मैलावर आम्ही गुरांच्या डब्यात प्रवास ा तो इथं येऊन उंडारायला ! कोणत्या वेळी ? तर माझ्या इस्पितळाची जिथनं

बदली झाली त्या भागात रक्ताचे पाट वहातायत अशा वेळी ! आमच्या मदतीची सक्त जरूर असलेले शेकडो जखमी तिथं आहेत.'

'रक्ताचे पाट' हा शब्द डॉक्टर द्वेषाने तोंडी लावल्यासारखा परत परत घोळून उच्चारीत होता.

'ह्या तऱ्हेवाईक पणाचं काय कारण असावं असं आपल्याला वाटतं ?'

'काय कारण ?' आपल्या चापाच्या चष्म्यावरील भुवया डॉक्टराने तुच्छतेने उंचावल्या आणि तो गरजला, 'बेबंदशाही, अनागोंदी, कमांडिंग स्टाफचा मूर्खपणा ! हेच कारण ! बदमाश वरच्या जागांवर जाऊन बसतात आणि सगळा बट्ट्याबोळ करून टाकतात ! नालायक ! साधी अक्कल सुद्धा नाही ! रुसो–जपानी युद्धाच्या वेरेसाएवन लिहिलेल्या आठवणी लक्षात आहेत ? तर तेच सगळं परत चाललंय फक्त त्यापेक्षा दुपटीनं खराब !'

लिस्तनित्स्कीने त्याला सलाम केला आणि तो रेकल्यात जाऊन बसला. गोबरे लाल गाल थरथरणारा तो क्रोधाविष्ट डॉक्टर त्याच्या मागोमाग केकाटत येत होता.

'आपण युद्ध हरणार लेफ्टनंट ! जपान्यांबरोबर एक युद्ध आपण हरलो पण शहाणपण काही शिकलो नाही ! आपण फक्त फुशारक्या माराव्या ! बस्स !' रुळाच्या कडेने तेलाच्या तवंगाचे इंद्रधनुष्य उठलेल्या लहान लहान डबक्यांवरून उड्या मारीत निराशेने मान परोपरीने हलवीत तो चालला होता.

ती आघाडीवरील इस्पितळ गाडी बेरनियागीच्या जवळ येईपर्यंत सांजावले होते. जमीनीत राहिलेले पिकांचे चवडे वाऱ्यावर गदगदत होते. पश्चिमेला ढगाची दाटी होऊ लागली होती. अगदी वरच्या उंचीवर त्यांचा रंग गर्द नाफरमानी काळा होता. खालच्या बाजूला त्यांचा तो भयानक रंग जाऊन बदलत्या छटानी त्यांचे गुलजार जांभळधूम परावर्तन वरच्या नभस्तरावर उमटले होते. नदीच्या बांधाजवळ साचलेल्या पाघळत्या बर्फाळ जळाप्रमाणे मधोमध जमा झालेल्या मेघराशी बाजूला पडल्या होत्या. त्याच्या फटीतून सूर्यास्ताच्या किरणाचे कुसुंबी आडर लोटले होते त्यामुळे दीप्तिचा उचंबळता पंखा उलगडला जाऊन खाली रंगांची यक्षमाळ गुंफली गेली होती.

रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खंदकात एक मेलेला घोडा पडला होता. चमत्कारीकपणे वर फेकलेल्या त्याच्या एका खुबावरचा नाल चमकत होता. त्याच्या अंगावरुन इस्पितळ गाडी रखडत गेली तेव्हा लिस्तनित्स्कीने टक लावून

त्या मढ्याकडे पाहिले. त्याच्याबरोबर जाणारा अडली त्या घोड्याच्या पोटावर थुंकून उद्गारला.

'हादडल्येय वैरण ! खाल्लेय भसाभसा !' त्याने स्वत:ला सावरून घेतले. तो परत थुंकण्याच्या बेतात होता पण सौजन्यापोटी त्याने थुंकी गिळून टाकली आणि बाहीला तोंड पुसले. 'हे इथं पडून राहिलंय पण त्याला पुरून टाकायची कुणाला फिकीर नाही ! रशियनांचा स्वभावच असला ! जर्मन वेगळे आहेत !'

'त्यांचं तुला काय ठाऊक ?' येवगेनीने गैरवाजवी रागाने विचारले. अहंमन्यता आणि तुच्छता दर्शविणाऱ्या त्या अडलीच्या निवांत चेहऱ्याबद्दल त्याचे मन द्वेषाने काठोकाठ भरून गेले होते. सप्टेंबर महिन्यात शेतात उरलेल्या पिकांच्या चवड्यांगत तो माणूस भुरा आणि रुक्ष होता. आघाडीकडे येताना येवगेनीने ज्यांचा उल्लेख केला होता त्या हजारो शेतकरी सैनिकात आणि ह्यात काहीही फरक नव्हता. ते सगळे विटलेले आणि मलूल वाटत होते. त्यांच्या घाऱ्या, निळ्या, हिरव्या किंवा ज्या कोणत्या असेल त्या रंगाच्या डोळ्यात सुस्तपणा दाटलेला होता. त्याना पाहून त्याला पार झिजून गेलेल्या तांब्याच्या प्राचीन नाण्यांची तीव्रतेने आठवण होत होती.

'युद्धाआधी तीन वर्षं मी जर्मनीत रहात होतो !' अडलीने संथपणे उत्तर दिले. त्याच्या चेहऱ्यावर जी अहंमन्यता आणि तुच्छता होती त्याचीच छटा त्याच्या आवाजातही होती. 'केनिग्जबर्ग' मध्ये एका चिरुटांच्या कारखान्यात मी नोकरीवर होतो !' गाठचाळ लगामाचा झटका घोड्यावर आपटीत तो अडली सुस्तपणे सांगू लागला.

'तोंड आवर !' लिस्तनित्स्कीने उग्रपणे फर्मावले. आणि तो परत त्या घोड्याच्या डोक्याकडे पाहू लागला: त्याच्या शेंडीची बट त्याच्या डोळ्यांवर विस्कटून पडली होती आणि उन्हाने पिवळ्या पडलेल्या दातांची रांग त्याने विचकली होती.

त्याची एक तंगडी उंचावून कमानीसारखी वाकली होती. सुंब किंचित चिरफाळला होता पण मदिऱ्यात मुलायम उदी-निळसर चमक होती. त्याची तंगडी आणि सुरेख ताशीव नेवर ह्यांवरून घोडे ताज्या दमाचे आणि उत्तम वाणाचे असल्याचे त्या लेफ्टनंटने जाणले.

त्या खाचखळग्याच्या रस्त्यावरून त्यांची गाडी पुढे गेली. पश्चिमेकडील रंग विटून गेले. वाऱ्याचा झोत उसळून त्याने ढग विखरून टाकले. कळस ढळलेल्या बाटथडीच्या गिरजाघराच्या मनोऱ्याप्रमाणे त्या मृत घोड्याच्या तंगडीची कृष्णरेषा

त्यांच्या मागे उंचावली होती. येवगेनीने मागे वळून परत तिकडे नजर टाकली. एवढ्यात किरणाचा पिसारा अचानक त्या घोड्याच्या अंगावर पडला आणि कुमेंती रोमावलीची ती तंगडी एखाद्या निष्पर्ण फांदीला अद्भुत पालवी फुटावी तशी दिसू लागली.

ही इस्पितळ गाडी बेरेझनियागीत शिरली तेव्हा तिला जखमी सैनिकांच्या गाड्या भेटल्या. पहिल्या रेकल्याचा धनी एक प्रौढ बेलोरशियन होता. लगामांची अंबाडी हाती धरून तो घोड्याच्या डोक्याजवळून चालला होता. बोडक्या डोक्याला पट्टी बांधलेला एक कझाक रेकल्यात पडला होता. आपल्या कोपरावर तो रेलला होता. पण पावाचे तुकडे चावत आणि तोंडातून काळे चरबट थुंकून टाकीत त्याने शांतपणे डोळे झाकून घेतले होते. त्याच्या बाजूला एक सैनिक पडला होता. त्याची फाटलेली तुमान भिजलेल्या रक्तामुळे ढुंगणावर भयंकर आक्रसून तटतटली होती. डोके न उचलता तो भयंकर शिवीगाळ करीत होता. त्या माणसाचा सूर ऐकता ऐकता लिस्तनित्स्की भयभीत होऊन गेला. कारण तो सूर अगदी काकुळतीने आळवणी करणाऱ्या एकाद्या भक्तासारखाच होता. दुसऱ्या रेकल्यात पाच सहा सैनिक एकमेकांशेजारी पडले होते. त्यातला एक जण हर्षोन्मादाने झपाटल्यागत दिसत होता. त्याचें डोळे अस्वाभाविकपणे तेजस्वी आणि धगधगलेले दिसत होते. तो एक गोष्ट सांगत होता. '...असं दिसतंय की त्याच्या बादशहाचा वकील इकडं आला होता आणि त्यानं सुलुखाची तयारी दाखवल्येय ! गोष्ट अशी की एका सचोटीच्या माणसानं मला हे सांगितलं. मला वाटतं की तो काही बंडल मारीत नव्हता !'

'मला वाटतं बंडलच होतं !' दुसऱ्या एकानं शंकेखोरपणे सांगून टाकले. नुकतेच खवडे होऊन गेल्याची साक्ष देणारे आपले व्रणीत डोके त्याने हलवले.

'पण कदाचित खरंच तो इकडं आला असेल !' घोड्याला पाठ देऊन बसलेल्या तिसऱ्या एका माणसाने वोलगा काठच्या 'मृदु' बोलीत म्हटले.

पाचव्या रेकल्यात तीन कझाक आरामात बसले होते. लिस्तनित्स्की त्यांच्या अंगावरून जात असताना त्यानी त्याच्याकडे शांतपणे रोखून पाहिले. त्यांच्या उग्र धुळकट चेहऱ्यावर अंमलदाराविषयीच्या आदराची नावनिशाणी नव्हती.

'नमस्ते कझाकानू !' लेफ्टनंटने त्याना अभिवादन केले.

'नमस्ते हुजूर !' गाडीवानाच्या अगदी जवळ बसलेल्या चंदेरी मिशांच्या कझाकाने मर्गळून उत्तर दिले.

'कुठलं रेजिमेन्ट ?' त्या कझाकाच्या खांद्यावरील निळ्या फितीचा नंबर वाचण्याचा प्रयत्न करीत लिस्तनित्स्कीने बोलणे चालू ठेवले.

'बारावं !'

सध्या कुठाय तुझं रेजिमेन्ट ?'

'आम्हाला ठाऊक नाय !'

'अस्सं ! जखमी कुठं झाला ?'

'त्या खेड्याजवळ-! इथून जवळच आहे !'

कझाक आपसात काहीतरी कुजबुजले आणि कशीतरीच पट्टी गुंडाळलेला आपला हात दुसऱ्या हाताने धरीत एकाने रेकल्यातून खाली उडी टाकली.

'एक मिनिट हुजूर !' अनवाणी पायाने तो रस्ता ओलांडून आला. काड-तुसानी फाडलेला हात चांगल्या हाताने जपत तो येत होता. त्याच्या हाताची जखम पिकायला लागल्याच्या खुणा दिसत होत्या.

'आपण व्येशेनस्काया गावचे ना ? आपण लिस्तनित्स्कीच ना ?'

'होय !'

'आम्हाला वाटलंच ! हुजूर, आपल्या जवळ काही विडीकाडी आहे का ? ख्रिस्ताच्यान् आम्हाला काहीतरी द्या ! तलफेनं मरायला लागलोत !' तो रेकल्याबरोबर त्याची रंगीत बाजू हातात पकडून चालत होता. लिस्तनित्स्कीने सिगरेटची डबी काढली.

'एक डझन द्याल का आम्हाला ? आम्ही तिघेजण आहोत, बरं !' कझाकाने काकुळतीचे स्मित करून म्हटले.

त्या गड्याच्या रुंद पिंगट तळव्यावर लिस्तनित्स्कीने आपली डबी रिकामी केली आणि विचारले, 'रेजिमेंटचे बरेच जखमी झाले का ?'

'दोन डझन !'

'भारी नुकसानी ?'

'आमच्यापैकी बरेच मारले गेले ! जरा माचिस द्या हुजूर ! फार फार मेहरबानी !' कझाकाने सिगरेट शिलगावली आणि मागे थांबून रहात तो ओरडला,

'तुमच्या वाडीजवळच्या तातारस्कीचे तीन कझाक मारले गेले ! आमचे बरेच कझाक मारले त्यानी !' आपला शाबूत हात त्याने हलवला आणि आपला रेकला गाठायला तो निघून गेला. पट्टा सुटलेला त्याचा फर्गोल बाऱ्यावर उडत होता.

लिस्तनित्स्कीच्या नवीन रेजिमेंटच्या कमांडरचे ठाणे एका पाद्र्याच्या घरात होते. इस्पितळाच्या गाडीत उदारपणे जागा दिलेल्या डॉक्टराचा चौकात आल्यावर लिस्तनित्स्कीने निरोप घेतला आणि चालता चालता गणवेशावरील धूळ झटकीत तो रेजिमेंटचे ठाणे शोधायला निघाला. पहारा बदलण्यात गढलेला एक अगदी लाल दाढीचा सार्जंट मेजर संत्र्याना घेऊन त्याच्या जवळून पावले टाकीत गेला. त्याने लडफदार सॅल्यूट ठोकला आणि लिस्तनित्स्कीच्या प्रश्नाचे उत्तर म्हणून ते घर खुणेने दाखवले. आघाडीपासून दूरवर असणाऱ्या सर्वच लष्करी ठाण्यांप्रमाणे ती जागा अगदी निवांत आणि सुस्त होती. कारकून मंडळी मेजावर वाकली होती. एक प्रौढ कॅप्टन 'फील्ड टेलिफोन'वर हसत होता. खिडक्यांजवळ माशा गुणगुणत होत्या. एक अडली यवगेनीला रेजिमेन्ट कमांडरच्या खाजगी खोलीकडे घेऊन गेला. हनुवटीवर व्रण असलेला एक उंच कर्नल उंबरठ्यापाशी त्याला भेटला.

'मी रेजिमेंटचा कमांडर!' त्याने लिस्तनित्स्कीच्या प्रश्नाचे उत्तर देऊन थंडपणे त्याचे स्वागत केले. आणि त्याला आत खोलीत येण्याची खूण केली. दार बंद करून कर्नलने शब्दातील श्रांत आविर्भावाने आपल्या केसांवरून हात फिरवला आणि मृदु एकसुरी आवाजात तो म्हणाला,

'तुम्ही निघाल्याचं ब्रिगेड स्टाफनं मला काल कळवलं. खाली बसा!'

ह्या आधीच्या चाकरीबद्दल त्याने यवगेनीला प्रश्न विचारले. राजधानीची ताजी बातमी विचारली. प्रवासबिवास कसा झाला ह्याची विचारपूस केली. पण त्यांच्या अल्प संभाषणात त्याने आपले श्रांत डोळे लिस्तनित्स्कीच्या डोळ्यांवरून एकदाही हलवले नाहीत.

'आघाडीवर बरंच सोसल्यासारखं दिसतंय ह्यानं. अगदी पार थकून गेलाय.' यवगेनीच्या मनात सहानुभूतीने विचार आला. त्याचा मुद्दाम भ्रमनिरास करण्या-साठीच की काय त्या कर्नलने आपल्या तलवारीच्या परजाने नाकाची दांडी खाजवली.

'हं! लेफ्टनंट, तुम्ही तुमच्या बांधव अंमलदाराशी ओळखी करून घेतल्या पाहिजेत! मला माफ करा! गेल्या तीन रात्री मी झोपलेला नाही! ह्या अंधार कोठडीत पत्ते खेळणं आणि झिंगणं ह्याखेरीज उद्योगच नाही!

लिस्तनित्स्कीने 'सॅल्यूट' केला आणि आपला तिरस्कार स्मिताखाली लपवीत तो दाराकडे वळला. कमांडिंग अंमलदाराच्या बरोबर झालेल्या पहिल्या भेटीबद्दल नाराजीचे विचार घोळवीत तो बाहेर पडला. त्या कर्नलची श्रांत मुद्रा

आणि त्याच्या हनुवटीवरील व्रण ह्यांनी आपल्या मनी आदरभाव निर्माण केला ह्याची त्याला कुत्सीत मौज वाटली !

१५.

स्तीर नदी उतरून जाऊन शत्रूला पिछाडीकडून गाठण्याची कामगिरी त्या डिव्हिजनवर सोपविण्यांत आली होती.

थोड्याच दिवसात रेजिमेन्टच्या अंमलदाराचा लिस्तनित्स्कीला सराव झाला आणि लढाईच्या वातावरणात तो चटकन खेचला गेला. त्यामुळे त्याच्या अंतर्यामी शिरून बसलेली आराम आणि संतुष्टतेची भावना निघून गेली.

नदी उतरून जाण्याची कारवाई तडफेने उरकण्यात आली. आपल्या जरं-धरावर गनिमाने केलेल्या दरोबस्त मजबूतीचा ह्या डिव्हिजनने बराचसा धुव्वा उडवला आणि मुख्य दळभाराच्या पिछाडीला ते येऊन थडकले. मादियार रिसाल्याच्या सहाय्याने ऑस्ट्रियनानी प्रतिचढाई सुरु करण्याचा प्रयत्न केला पण कुलुपी गोळ्यांचा भडीमार करून कझाक तोफखान्याने त्याना उधळून लावले. बेतकतीबीने माघार घेणाऱ्या मादियास स्क्वाड्रनाची कमरग्याच्या मशीनगनच्या करोळीत ससेहोलपट होऊन कझाकानी त्यांचा पाठलाग सुरु केला.

आपल्या रेजिमेन्ट बरोबर लिस्तनित्स्की प्रतिचढाईवर गेला होता. माघार घेणाऱ्या गनिमाला त्याचे डिव्हिजन जास्तच रेटत होते. त्याच्या हाताखालच्या जुमल्यातील एक कझाक मारला गेला आणि चार जखमी झाले. त्यापैकी एक तरुण चोचदार नाकाचा गडी आपल्या मेलेल्या घोड्याच्या अंगाखाली चेंगरला. वरकरणी शांत असणाऱ्या ह्या लेफ्टनंटने त्याच्या जवळून घोडा नेताना त्या कझाकाचे मंद खरखरीत विव्हळणे न ऐकण्याचा प्रयत्न केला.

तो खांद्यात घायाळ झाला होता आणि जवळून घोडी नेणाऱ्या कझाकांची काकळूत भाकत होता.

'भावानु, मला सोडून जाऊ नका ! मला घोड्याखालून बाहेर काढा—! भावांनु——!'

त्याच्या मंद व्यथित आवाजाची अस्पष्ट साद ऐकू येत होती. पण इतर

कझाकांच्या उसळत्या मनात दयेची एवढीही ठिणगी पडत नव्हती किंवा पडलीच तर त्याला निष्ठूरपणे पुढे हाकलणाऱ्या, पायउतार होण्याला मज्जाव करणाऱ्या इच्छाशक्तीने ती चुरगळून टाकली जात होती. तो जुमला पाच मिनिटे दुडक्या चालीने पुढे जात घोड्यांना दम खाऊ देत होता. सुमारे चारेक फर्लांगावर विस्कळीत मादयार स्क्वाड्रन्स संपूर्ण माघार घेत होती. त्यांच्यात मधून मधून गनिमाच्या पायदळाचा करडा निळा गणवेश दृष्टोत्पत्तीस पडत होता. ऑस्ट्रियन सामानसुमानाची गाडी एका टेकडीच्या माथ्यावरून रखडत चालली होती. फुटलेल्या गोळ्याचा मागे राहिलेला धूर त्या गाडीच्या डोक्यावर तरंगत होता. डावीकडून एक तोफखाना त्या गाडीवर भडीमार करीत होता आणि त्याचा ढम्म धमामा शेतावर पसरून जंगलातून प्रतिध्वनित होत होता.

बटालियनचे नेतृत्व करणाऱ्या सार्जंटमेजरने चौकचालीचा हुकूम सोडला आणि ती तीन स्क्वाड्रने तुफान दौडीने उसळली. स्वारांच्या मांडीखालची घोडी हेलकावत होती आणि पिवळट गुलाबी फुलोऱ्यागत त्यांच्या तोंडचा फेस उधळला जात होता.

रेजिमेन्टने रात्रीचा एका खेडेगावात मुक्काम केला. त्या बारा अंमलदारांची एकाच खोपटात गर्दी झालेली होती. शिणवटा आणि भूक यांनी गलितगात्र झालेले ते अंमलदार झोपण्यासाठी आडवे झाले. फौजी रसोई आली ती मध्यरात्रीला. कॉर्नेट चुबोव रश्शाचे गाडगे घेऊन आला. त्या चमचमीत वासाने अमलदारांना उठवले. झोपेने सुजीर झालेले चेहरे घेऊन लढाईत दोन दिवस पडलेल्या फाक्यांचे उट्टे काढीत ते आधाशी निःशब्दपणे जेवू लागले. उशीरा झालेल्या जेवणानंतर त्यांची पूर्वीची झापड निघून गली आणि वाळक्या गवतावर फर्गोल पसरून ते गप्पा मारीत धूर काढीत पडून राहिले.

ज्युनिअर कॅप्टन कालमिकोव एक गुबगुबीत ठेंगणा अंमलदार होता. त्याचा तोंडवळा आणि नाव त्याच्या मंगोल वंशाची साक्ष देत होते. तावातावाने हातवारे करीत तो म्हणाला,

'हे युद्ध आपल्यासाठी नाय ! मी चारशे वर्ष उशिरा जनमलो. प्येतर ठाऊकाय ?' स्क्वाड्रन कमांडर तेर्सित्सेवला तो सांगत होता. 'प्यो' तर ऐवजी तो 'प्ये' तर असे ठासून म्हणत होता. 'ह्या युद्धाचा शेवट पहायला काही मी जगत नाय !'

'तुझं ज्योतिष राहू दे.' आपल्या कॉकेशन चुग्यांखालून तो बोलला.

'ह्या ज्योतिषाच्या गोष्टी नव्हत ! माझा हा शेवट आधीच ठरलेलाय ! मी कुळकर आहे ! इथं मी फालतू आहे ! आज आपल्यावर भडीमार चालू असताना मी श्रमिष्टपणे थरथरत होतो. गजीम दिसत नाय हे आपल्याला सहनच होत नाय. मला वाटणारी दळभद्री भावना हे एक प्रकारचं भयचाय ! कित्येक मैलांवरून त्यांनी तुमच्यावर भडीमार करायचा आणि माळरानावर शिकारी मागं लागलेल्या माळढोकासारखं तुम्ही घोडी फेकीत रहायचं !'

'कुपालकात मी एक ऑस्ट्रियन गर्नाळतोफ बघितली. सभ्यगृहस्थहो, तुमच्यापैकी कुणी पाहयलेय का ?' इंग्रजी पद्धतीने छाटलेल्या आपल्या तांबूस पिवळ्या मिशीवर अडकलेले डब्यातील मांसाचे खरकटे चाटीत कॅप्टन आतामान चुकोवने विचारले.

'काय कमालीचं 'काम' आहे ! त्या मख्ख्या, सगळी यंत्रणा बिलकूल लाजबाब !' रश्शाचा दुसरा डबा आतापर्यंत रिकामा केलेल्या कॉर्नेट चुबोवने उत्साहाने उत्तर दिले.

'मी पाहयलेय ! पण आपल्याला काही सांगता यायचं नाय. तोफखान्याचा संबंध येतो तिथं मी अगदी ठोंब्या आहे ! मला आपली ती इतर तोफेसारखीच मोठी वाटली ! नळा जरा मोठा आहे इतकच !'

'जुन्या काळी पुरातन पद्धतीन लढले त्यांचा मला हेवा वाटतो !' कालमिकोव लिस्तनित्स्कीकडे वळून सांगू लागला. 'धर्मयुद्धात आपल्या प्रतिस्पर्ध्यावर घाव घालायचा आणि तलवारीनं त्याचे दोन तुकडे करायचे, असलं युद्धतंत्र आपल्याला समजतं ! पण हे जे काय आहे ते सैतान जाणे !'

'पुढं जीं युद्धं होतील त्यात रिसाल्याला काही काम नसेल ! रिसाल्याला डिच्चू मिळेल !'

'तो मुळी राहणारच नाय !'

'काही सांगवत नाय !'

'त्यात मुळीच शंका नाय !'

'पण माणसाच्या जागी तुम्हाला यंत्र नाय आणता येणार ! तू आपला उगीच दुसऱ्या टोकाला जातोयस् !'

'मी माणसांचं सांगत नाय ! घोड्यांचं सांगतोय. त्यांची जागा मोटार सायकली किंवा मोटारगाड्या घेतील !'

'मोटारीचं 'स्क्वाड्रन' म्हणे !'

'हा सगळा मूर्खपणा आहे !' कालमिकोव मधेच तावातावाने म्हणाला,

'एक आचरट कल्पना ! अजून खूप वर्ष सैन्य घोड्याचाच वापर करतील दोन तीनशे वर्षांनी युद्ध कशी होतील कुणास ठाऊक ! पण आज रिसाला !'

'सबंध आघाडीवर अलंग खणलेले असल्यावर रिसाला घेऊन काय करणार ? सांग ! ना !'

'तो अलंग पार करेल ! अलंग ओलांडून जाईल ! आणि गनिमाच्या पिछाडीला छापे घालील ! हे असेल रिसाल्याचं काम !'

'बेवकुफ !'

'तेव्हा बघून घेऊ !'

'झोपा आता !'

'ए पुरे आता. जाणीव आहे का नाय ? दुसऱ्यांना झोपायचंय !'

वादविवाद राहून गेला आणि घोरण्यांनी त्याची जागा घेतली. कुबट वताचा उग्र वास घेत लिस्तनित्स्की आपल्या पसरलेल्या फर्गोलावर उताणार पडला होता.

'बुनचुक नावाच्या स्वयंसेवकाशी तुम्ही बोलून पहायला हवं.' त्याच्याजवळ आडवा होत येवगेनीच्या कानात कालमिकोव कुजबुजला. 'तो तुमच्या जुमल्यात आहे. मोठा विलक्षण माणूस आहे'

'कोणत्या अर्थानं ?' कालमिकोवकडे पाठ वळवित लिस्तनित्स्कीने विचारले.

रशियनकरण झालेला तो कझाक आहे. मॉस्कोत रहात होता. साधा कामगाराय ! पण यंत्राच्या कामात रस घेणाराय ! अव्वल दर्जाचा मशीनगन चालवणाराय !'

'झोपू या !' लिस्तनित्स्कीने सुचवले.

'झोपू या !' दुसऱ्याच कोणत्या तरी गोष्टीचा विचार करीत कालमिकोवनं त्याचे म्हणणे मान्य केले. आणि ओशाळगतीने चेहऱ्याला घड्या पाडून तो म्हणाला, 'लेफ्टनंट, माझ्या पावलांना येणाऱ्या वासाबद्दल मला माफ करा हं ! गेले पंधरा दिवस मी मोजे बदललेले नाहीत ! घामानं नुसते कुजायला लागलेत ! अत्यंत गलिच्छाय हे ! कुणाकडून तरी पायमोज्यांची जोडी घ्यायला हवी !'

'काही हरकत नाही !' झोपी जाता जाता लिस्तनित्स्की पुटपुटला.

कालमिकोवने केलेला बुनचुकचा उल्लेख लिस्तनित्स्की पूर्णपणे विसरुन गेला होता. पण दुसऱ्याच दिवशी योगायोगाने त्याची ह्या स्वयंसेवकाशी गाठ पडली. पहाटेला टेहळणी गस्तीवर जाण्याचा आणि शक्य झाल्यास डाव्या कमरग्यावर आगेकूच करीत राहिलेल्या पायदळ रेजिमेन्टशी संपर्क प्रस्थापीत करण्याचा

हुकूम त्याला रेजिमेन्टच्या कमांडरने दिला. अर्ध उजेडातून आवाडातून ठेचकाळत आणि झोपलेल्या कझाकांच्या देहाना अडखळत लिस्तनित्स्कीने जुमल्याचा सार्जंट शोधून काढला आणि त्याला उठविले.

'माझ्याबरोबर टेहळणीवर जायला मला पाच गडी हवेत. माझा घोडा तयार कर. चलदी !'

पाच मिनिटानंतर एक ठोसर बाध्यांचा कझाक खोपटाच्या दाराशी आला. लिस्तनित्स्की चुट्टापेटीत चुट्टा ठेवीत असताना तो माणूस म्हणाला,

'हुजूर ! सार्जंट मला आपल्याबरोबर सोडत नाय कारण माझी पाळी नाहीय. आपण जायला परवानगी द्याल का ?'

'तुझी बढतीची वेळ झाल्येय का काय ? का तुझ्या हातनं काहीं चूक झाल्येय ?' अंधारात त्या माणसाचा चेहरा बघून घेण्याचा प्रयत्न करीत लिस्तनित्स्कीने विचारले.

'तसं काहीच नाय !'

'ठीकाय ! तू येऊ शकतोस' लिस्तनित्स्कीने निर्णय दिला. तो कझाक जाण्यासाठी वळला तेव्हा त्याला त्याने हाक मारली,

'अरे ए ! सार्जंटाला म्हणावं...!'

'माझं आडनाव बुनचुक आहे !' तो कझाक मधेच म्हणाला.

'स्वयंसेवक ?'

'होय !'

आपल्या गोंधळातून स्वतःला सावरून घेत लिस्तनित्स्कीने त्याच्याशी बोलण्याचा ढंग बदलला.

'ठीक ! बुनचुक, सार्जंटला कृपा करून सांगा...! ओह ठीक आहे ! मी स्वतःच सांगेन !'

काळोख विरू लागला होता. संत्री आणि मोर्चे ओलांडून आपल्या सैनिकाना पाठीवर घेऊन लिस्तनित्स्की नकाशावर दाखविलेल्या खेड्याच्या दिशेने बाहेर पडला. थोडे अंतर कापल्यानंतर त्याने हाक मारली,

'स्वयंसेवक बुनचुक !'

'हुजूर !'

'कृपा करून तुमचा घोडा माझ्या बाजूला आणा !'

'आपले गावठी जनावर बुनचुकने लिस्तनित्स्कीच्या जातिवंत घोड्याच्या बाजूला आणले.

'तुम्ही कुठल्या खेड्याचे ?' त्या माणसाच्या चेहऱ्याची बाजू न्याहाळीत लिस्तनित्स्कीने विचारले.

'नोवोचेर्कासस्काया '

'स्वयंसेवक म्हणून सामील होण्याला तुम्हाला असं कोणतं निकडीचं कारण घडलं ते सांगाल का ?'

'जरूर !' अगदी किंचित स्मित करीत बुनचुकने उत्तर दिले. त्याच्या हिरवट डोळ्यांची अपलख नजर कडवी आणि खिळली होती.

'युद्धाच्या कलेबद्दल मला कुतुहल आहे. त्या कलेवर मला प्रभुत्व मिळवायचंय.'

'त्यासाठी लष्करी विद्यालयं स्थापलेली आहेत.'

'आहेत ना !'

'मग ? तुमचं कारण काय ?'

'मला आधी प्रत्यक्षात त्याचा अभ्यास करायचाय ! पुस्तकी रीत मग शिकता येईल !'

'युद्ध सुरू व्हायच्या आधी काय करीत होतात ?'

'कामगार होतो !'

'कुठं काम करीत होता ?'

'पिटर्सबर्ग, रोस्तोव आणि तुलाच्या शस्त्रकारखान्यात ! मशिनगन तुकडीकडं माझी बदली करावी म्हणून अर्ज करायचा माझा विचार आहे !'

'मशिनगनची तुम्हाला काही माहिती आहे ?'

'बर्टिअर, मॅडसेन, मॅक्झिम, हॉचकिस, व्हायकर्स, लुईस आणि इतर अनेक मशिनगन्स मी हाताळू शकतो.'

'ओहो ! मी रेजिमेन्टच्या कमांडरला सांगतो ह्याबद्दल.'

'कृपा करून सांगावं !'

बुनचुकच्या ठोसर बांध्याकडे लिस्तनित्स्कीने परत नजर टाकली. तो पाहून त्याला बुचाच्या झाडाची आठवण झाली. त्या माणसात खास असे काही नव्हते, फक्त खंबीरपणे आवळलेले दाभाड आणि थेट आव्हान देणारी नजर ह्या गोष्टी त्याच्या भोवतालच्या सर्वसामान्य कझाकांच्या घोळक्यातून त्याचे वेगळेपण सूचित करीत होत्या. तो स्मित करायचा पण अगदी क्वचित. ओठाच्या फक्त कोपऱ्यात ते स्मित असे आणि तेंव्हासुद्धा त्याचे डोळे निवळत नसत. त्यातील विलगपणाची सूक्ष्म चमक तशीच कायम असे. डॉन काठच्या तुसड्या, करड्या,

ढिसाळ मातीत एक उग्र पोलादी दणकटपणा असलेले बुचाचे वाढले, अगदी तसाच निर्विकार, संयमी !

थोडावेळ न बोलता ते पुढे जात होते. बुनचुकने आपला रुंद तळवा खोगीराच्या सोलवटलेल्या मुदीवर ठेवला होता. लिस्तनित्स्कीने एक चुट्टा निवडला आणि बुनचुकच्या काडीवर तो शिलगवताना त्या माणसाच्या हाताला येणारा घोड्याच्या घामाचा चिकट वास त्याच्या नाकात शिरला. त्याच्या तळव्याची मागची बाजू पिंगट केसानी झाकून गेली होती. ते हात थोपटावेत अशी आकस्मिक इच्छा लिस्तनित्स्कीला झाली.

कडक तंबाखूचा धूर गिळून तो म्हणाला, 'आपण रानापर्यंत पोचलो की तुम्ही आणि एक कझाक डावीकडच्या वाटेनं जा ! कळलं ?'

'होय !'

'चारेक फर्लांग जाऊनही आपलं पायदळ भेटलं नाही तर मागं फिरा !'

'ठीकाय !'

त्यानी दौड सुरू केली.

रानवाटेच्या वळणावर कोवळी बर्चची झाडे हारीन उभी केली होती. त्यांच्या पलिकडे खुरटलेल्या देवदारांचा पिवळटपणा, मधून मधून उमटलेली जंगली झाडंझुडपं आणि ऑस्ट्रियनच्या सामानसुमानाच्या गाड्याखाली चिरडलेली झाडझाडरु हे पाहून नजर थकून जात होती. दूरवरच्या तोफखान्याच्या धमाम्याने उजवीकडची धरणी थरकापत होती. पण बर्चच्या झाडापाशी अनिर्वचनीय शांतता होती. गुलाबी छटेचे गवत झपाट्याने होणाऱ्या रंगास्ताचा उमाळा आलेल्या शारदीय रंगात न्हाऊन निघाले होते. लिस्तनित्स्की बर्च जवळ थांबला आणि दुर्बीण काढून रानापलिकडे असणारे टेंबले त्याने न्याहाळले. त्याच्या तलवारीच्या मधुरंगी परजावर एक मधमाशी येऊन बसली.

आपल्या डोळ्यानी बुनचुकाने ती मधमाशी दाखवली आणि लिस्तनित्स्कीने स्मित केले.

'तिचा मध कडू असेल नाही का ?'

त्याला उत्तर दिले ते बुनचुकने नव्हे. दूरवरच्या देवदारूंच्या राईतून एका दयाळ पक्षाच्या भेदक तीतऱ्या टाहोने नीरवता उध्वस्त झाली आणि बर्चच्या झाडातून काडतुसांचे कारंजे उसळले. त्याने एक फांदी कडकडत लिस्तनित्स्कीच्या घोड्याच्या मानेवर कोसळली.

त्यांनी मोहरे फिरवले आणि आरडाओरड करून चाबूक ओढीत त्यानी घोडी पिटाळली. ऑस्ट्रियन मशिनगनने आपला उरला सुरला दारूगोळा त्यांच्या पाठीवर झाडला.

ह्या पहिल्या भेटीनंतर लिस्तनित्स्कीचे स्वयंसेवक बुनचुकबरोबर अनेकदा बोलणे झाले. त्या माणसाच्या डोळ्यात तळपणाऱ्या दुर्दम्य इच्छाशक्तीने तो प्रत्येक वेळी भारल्यागत झाला. एवढ्या सामान्य दिसणाऱ्या माणसाच्या चेहऱ्याआड कोणते अगम्य रहस्य लपवलेले आहे. त्याचा काही त्याला शोध लागेना. आपल्या करारी ओठांच्या कोपऱ्यात दाबलेल्या स्मिताने बुनचुक नेहमी बोलायचा आणि त्याने लिस्तनित्स्कीचा असा ग्रह झाला की एका जिकिरीच्या मार्गाचा शोध घेत जाताना तो काहीतरी निश्चित नियम अंमलात आणीत आहे. बुनचुकची बदली मशिनगन कंपनीकडे झाली. एका आठवड्यानंतर आघाडीच्या मागच्या बाजूला हे रेजिमेंट विश्रांती घेत असताना लिस्तनित्स्कीने स्क्वाड्रन कमांडरकडे जाताना त्याला गाठले. एका जळालेल्या मांगराच्या भिंतीजवळून डाव्या हाताचा पंजा हलवीत बुनचुक चालला होता.

'अरे ! स्वयंसेवक !'

त्या कझाकाने डोके वळवले आणि सॅल्यूट केला.

'कुठं निघालात ?' लिस्तनित्स्कीने विचारले.

'माझ्या कमांडरकडे !'

'म्हणजे आपली वाट एकच आहे तर !'

'खराय !'

त्या उध्वस्त खेडेगावातील रस्त्याने ते काहीवेळ न बोलता चालत होते.

अद्याप शाबूत राहिलेल्या इमारतीभोवती लोकांची ये जा चालू होती. घोडेस्वार अंगावरुन येत जात होते. रस्त्याच्या मधोमध फौजी-रसोईचा धूर निघत होता. तिच्या जवळ कझाकानी रांग लावली होती. हवेत झुरुमुरु पाऊस होता.

'हं मग ? युद्धाची कला शिकताय का नाही ?' आपल्या किंचित मागे चालत असलेल्या बुनचुककडे तिरप्या नजरेने बघत लिस्तनित्स्कीने विचारले.

'होय ! शिकतोय !'

'युद्धानंतर काय करायचा विचार आहे?' बुनचुकच्या हाताकडे कोणत्यातरी कारणाने नजर टाकीत लेफ्टनंटने विचारले.

'काही जणांच्या बाबतीत ते पेरतील तसं उगवेल...! पण मी बघेन...!' बुनचुकने उत्तर दिले.

'ह्या बोलण्याचा काय अर्थ समजावा ?' डोळे आकुंचित करीत तो पुढे म्हणाला,

'तुम्हाला म्हण ठाऊक आहे ना ? 'वाऱ्याची पेरणी करणाराना वादळाचं पीक लागतं. हे असंचाय !'

'पण हे कोडं सध्या बाजूला ठेवून बोललं तर ?'

'हे तर अगदी स्पष्टाय ! माफ करा ! मी इथून डावीकडं वळतोय !'

टोपीच्या ढापणाला त्याने बोटांचा स्पर्श केला आणि तो वळून चालता झाला. खांदे उडवून लिस्तनित्स्की त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत उभा राहिला.

'आपण जगावेगळे आहोत असं दाखवण्याचा हा मनुष्य प्रयत्न करतोय का हा कुणी छंदिष्ट आहे ?' उद्वेगाने त्याने स्वतःला प्रश्न केला आणि कमांडरच्या शानदार राहुटीत प्रवेश केला.

१६.

राखीवांचा दुसरा आणि तिसरा सफा एकत्र बोलावून घेण्यात आला. खेड्यांतील सगळेजण गवत कापणीला किंवा सुगीच्या ऐन हंगामात पिकाची कापणी करायला जावेत तसा डॉन काठच्या खेड्यात शुकशुकाट होता.

परंतु त्या वर्षी सरहद्दीवर जहरी पीक आले होते. मरण माणसाच्या पावलांचा मागोसा घेत येत होते. अनेक कझाकांच्या बायका आपल्याला सोडून कंथासाठी बोडक्या माथ्याने आक्रोश करीत होत्या, 'अरे माझ्या लाडक्याऽऽ! आता मी कुणाकडं रे पाहू ?'

ह्या लाडक्यांची शिरे चौफेर उडवली जात होती कझाकांचे रक्त सांडत होते. निर्जिव डोळ्यांचे कझाक चिरनिद्रा घेत कुजत पडले होते आणि त्यांच्या अंत्ययात्रेची शोकगीते ऑस्ट्रिया, पोलंड, प्रशिया इथले तोफखाने किंचाळत होते. त्यांच्या बायकांची आणि आयांची आक्रंदने पूर्वेकडील वारा त्याच्या कानापर्यंत पोचवीत नव्हता.

कझाक समाजाचा बहर खेडी सोडून निघून गेला होता. रणांगणाची कीड आणि भयानकतेत तो झडून चालला होता.

सप्टेंबर महिन्यातील एका सुखद दिवशी मुलायम कापसाळ धाग्याच्या दुधाळ उन्हाचे कोळिष्टक तातारस्की खेड्यावर लोंबले होते. वैधव्य कोसळलेल्या स्त्रीने करावे तसे पांढऱ्या फटफटीत पडलेल्या सूर्याचे स्मित वाटत होते. उग्र आणि अक्षत नीलाकाश तुसड्यासारखे निर्लेप आणि गर्विष्ठ दिसत होते. डॉनच्या पलिकडच्या रानावर काविळी पिवळपण चढले होते. चिनार वृक्षावर निस्तेज लकाकी होती. ओकचे वृक्ष किरविलेली पाने ढाळत होते. फक्त आल्डरच्या झाडानेच भपकेदार हिरवेपण टिकवले होते. त्यातील दणकटपणा दयाळ पक्ष्यांच्या तीक्ष्ण नजरेला सुखवीत होता.

त्या दिवशी जंगजोड लष्करी कचेरीतून पांतिलेय प्रोकोफिएविचला पत्र आले. दुन्या ते पोस्टात जाऊन घेऊन आली. पोस्टमास्तरने ते तिच्या हाती देताना आपले म्हातारे टक्कल पुढे झुकवून खेदाने दोन्ही हात फाकले.

'हे पत्र उघडल्याबद्दल देवाच्या नावानं मला माफ करा. तुमच्या वडिलाना म्हणावं की फिर्स सिदोरोविचने पत्र उघडलं. युद्ध कसं चाललंय ते जाणून घेण्याची माझी अतिशय इच्छा होती. मला माफ करा आणि मी काय म्हणालो तें पांतिलेय प्रोकोफिएविचना सांगा.' तो भांबावून गेलेला दिसत होता आणि नाकाला लागलेल्या शाईच्या डागाचेही त्याला भान नव्हते. काहीतरी अगम्य पुटपुट करीत तो दुन्याबरोबर पोस्टातून बाहेर आला. 'माझ्यावर रागावू नका. आपली ओळख आहे म्हणून मी असं केलं.'

मनात आशंका दाटून आलेली दुन्या घरी परतली आणि उराजवळ ठेवलेले ते पत्र बराच वेळ चाचपडत शोधू लागली.

'जलदी जलदी!' आपली दाढी उपटीत पांतिलेय खेकसला.

ते बाहेर काढून ती घपापत सांगू लागली,

'पोस्टमास्तरनं मला सांगितलं की, त्यानं हे पत्र वाचलं. तुम्ही त्याच्यावर रागवायचं नाही असं म्हणाला.'

'मरु दे त्याला! ग्रिगरीचं आहे का?' म्हाताऱ्याने विचारले. त्याचा क्षुब्ध श्वास तिच्या चेहऱ्याला जाणवत होता. 'ग्रिगरीचं आहे का पित्रोचं आहे?'

'नाय बाबा... अक्षर माझ्या ओळखीचं नाय!'

'वाच ते!' बाकाकडे मुष्किलीने तुरुतुरु येत इलिनिचना ओरडली. अलीकडे तिच्या पायाना सूज येत होती. म्हणून चाके लावल्यासारखी ती ढकल चालीने चाले.

नतालिया अ वाडातून धावत आली आणि मान कलती करून चुल्हाण्याशी उभी राहिली आपले कोपरे तिने उरावर दाबून धरले होते, तिच्या ओठातून एक स्मित उन्हासारखे थरारले. आपल्या कुत्र्यासारख्या सेवेबद्दल आणि निष्ठेचे बक्षिस म्हणून ग्रिगरीकडून निरोप येण्याची किंवा पत्रात आपल्याबद्दल ओझरता तरी उल्लेख असण्याची तिला आशा वाटत होती.

'दान्या कुठाय ?' इलिनिचना कुजबुजली.

'चूप !' पांतेलेय खेकसला. दुन्याकडे वळून तो म्हणाला, 'वाच!' (रागाने त्याचे डोळे वटारलेले होते)

'मला आपल्याला असे कळविणे आहे ' ती वाचू लागली नंतर बाकावर बसलेली ती खाली घसरली आणि किंचाळली, 'बाबा! आई..! अग आई ग...! ग्रिशा . मारला गेला !'

अर्धमेल्या जरेनिअमच्या पानात गुरफटून गेलेला एक भुंगा आवेशाने गुं गुं करीत खिडकीवर धडाका घेत होता. आवाडात एक कोंबडी संतुष्टपणे कलकलत होती. दारातून एक खणखणीत बालिश हास्याचा आवाज आला.

नतालियाच्या ओठावर अजूनही ते थरथरते स्मित होते पण ती नखशिखान्त थरथरून गेली. पांतेलेय उठून उभा राहिला. त्याच्या मानेला अंगावरून वारे गेल्यागत झटके येत होते. बेभान दिङ्मूढतेने तो दुन्याकडे टक लावून बघत होता.

त्या पत्रात लिहिले होते–

मला आपल्याला असे कळविणे आहे की, आपला मुलगा ग्रिगरी पांतिलिएविच मेलिखोव, बाराव्या डॉन कझाक रेजिमेन्टमधील कझाक, दिनांक १६ सप्टेंबर रोजी कामेनका– स्त्रुमिलोवो गावाजवळ झालेल्या लढाईत ठार झाला. आपल्या मुलाला शूराचे मरण आले. भरून न येणाऱ्या आपल्या हानीत एवढेच आपल्या मनाचे सांत्वन असू द्यावे. त्याची खाजगी चीजवस्तू त्याचा भाऊ पित्रो मेलिखोवच्या हवाली करण्यात येईल. त्याचा घोडा रेजिमेन्टकडे राहील.

ज्यु. कॅ. पलकोवनिकोव
चौथे स्क्वाड्रन कमांडर

जंग फौज
दि. १८ सप्टेंबर १९१४

हे पत्र आल्यानंतर पांतिलेय अचानक कोमेजून गेल्यासारखा झाला. दिवसेदिवस तो लक्षात यावा असा म्हातारा दिसू लागला. त्याची भयानक अखेर जवळ येत चालली होती. त्याची स्मृती नाहीशी झाली आणि मनाचे भान हरपून

गेले. तो पोक काढून चालू लागला आणि त्याच्या चेहऱ्याला लोखंडी कळा आली. त्याच्या मनावर पडलेला ताण त्याच्या डोळ्यातील दुःखार्त चमक व्यक्त करू लागली.

देवपुतळ्याखाली त्याने ते पत्र ठेवून टाकले. दिवसातून अनेकदा पडवीत जाऊन तो दुन्याला खूण करून बोलावून घ्यायचा.

'इकडं ये.' ती त्याच्याजवळ जायची.

'ग्रिगरीबद्दलचं ते पत्र आण.'

त्याची बायको जिथे शोक करीत बसलेली असे त्या चाफेखणीच्या दाराकडे सभय दृष्टी टाकून तो म्हणे, 'जशी काय स्वतःशी वाचत्येयस असं हळू वाच !' मग धूर्तपणे डोळे मिचकावीत तो म्हणायचा, 'हळू वाच ! नायतर आईला ..... भारी वाईट !'

आपल्या आसवाना आवर घालीत दुन्या पहिले वाक्य वाचायची मग उकिडवा बसलेला पांतिलेय आपल्या प्रचंड सुंबासारखा पिंगट हात उंचावून म्हणे, 'ठीक ठीक ! पुढचं मला ठाऊकाय ! पत्र परत घेऊन जा आणि जिथून काढलंस तिथं ठेवून दे. हळूच नायतर आई.. !' मग तो दटावल्यागत पापण्यांची उघडझांप करायचा. जळालेल्या झाडसालीगत त्याचा सबंध चेहरा पिळवटून जाई.

तो पिकू लागला. तळपत्या पिकलेल्या केसांची बेटे डोक्यावर दिसू लागली आणि दाढीतून सफेद तंतू लोंबू लागले. तो खादाडही बनला आणि बकाबका अन्न गिळू लागला.

मृतात्म्याला शांती लाभावी म्हणून प्रार्थनेचे धर्मविधी झाल्यानंतर नऊ दिवसानी मेलिखोवने फादर विस्सारिओनला धारातीर्थी पडलेल्या ग्रिगरीला श्रद्धांजली वाहण्याच्या भोजनासाठी बोलावले

पांतेलेय भराभरा आणि आधाशीपणे खात होता. शेवया त्याच्या दाढीत अंगठ्यांसारख्या अडकत होत्या. गेले काही दिवस त्याला चिंतेने न्याहाळणाऱ्या इलिनिचनाला ते पाहून रडू कोसळले.

'बाबा ! तुला काय झालंय रे ?'

'आँ ?' आपली धूसर नजर थाळीतून वर उचलत म्हातारा दचकून उद्गारला. इलिनिचनाने हात झटकल्यासारखा केला आणि डोळ्यांवर हातरुमाल दाबून तोंड फिरवले.

'बाबा, तीन दिवस उपास केल्यासारखं खाताय !' दाऱ्या रागेजून म्हणाली. तिचे डोळे चमकत होते.

‘मी खातोय ? ठीक ! ठीक !! ठीक !!! नाय खाणार’ संकोचून गेलेल्या पांतेलेयनने उत्तर दिले. त्याने मेजाच्या आजूबाजूला नजर टाकली. नंतर ओठ घट्ट आवळून आणि कपाळाला आठ्या घालून विचारल्या प्रश्नांची उत्तरेही न देता तो चूप बसून राहिला.

‘धीर धर प्रोकोफिएविच ! एवढं दु:ख करून काय होणार आहे ?’ जेवण आटोपल्यावर फादर बिस्सारिओनने त्याला उभारी आणण्याचा प्रयत्न केला. ‘ग्रिगरीचं मरण पवित्र मरण होतं. देवाची अमर्यादा करू नको म्हाताऱ्या ! आपल्या झारसाठी आणि पितृभूमीसाठी तुझ्या मुलाला काटयांचा मुकुट लाभला. आणि तू ..हे पाप आहे. देव तुला माफ करायचा नाही.’

‘अगदी खराय, फादर ! ‘शूराचे मरण आले.’ त्याच्या कमांडरनं असंच लिहिलं होतं.’

पाद्र्याच्या हाताचे चुंबन घेऊन तो म्हातारा दारकसावर टेकला आणि ते पत्र आल्यापासून प्रथमच त्याला रडू कोसळले. त्याचा देह गदगदा हलत होता.

त्या दिवसापासून त्याने स्वत:वर परत ताबा मिळवला आणि त्या प्रहारातून तो थोडासा भानावर आला.

प्रत्येकजण आपापल्या प्रकारे आपल्या जखमेवर फुंकर घालीत होता. ग्रिगरी मारला गेला असे दुन्या किंचाळल्याचे नतालियाने जेव्हा ऐकले तेव्हा ती धावत आवाडात गेली. ‘मी जीव देते. माझं सगळं संपलं.’ ह्या विचारानं ती आगीत सापडल्यागत सैरभैर झाली. ती धडपडत दाऱ्याच्या बाहूत जाऊन कोसळली आणि मग आनंदी दिलाशाने तिला घेरी आली. कारण त्यामुळे जाणीव परत येण्याचा आणि काय घडलेले आहे त्याची विदारक आठवण तिला होण्याचा क्षण पुढे ढकलला गेला होता. मूढशून्यतेत तिचा आठवडा गेला आणि वास्तवाच्या जगात ती जी परतली ती बदलून गेलेली, अधिकच निमूटलेली आणि निबिड क्लैब्याने ग्रासलेली !

एका अदृश्य प्रेताने मेलिखोवांचे घर झपाटून टाकले आणि जिवंत माणसे त्याच्या धुमसत्या वासात श्वासोच्छ्वास करीत होती—!

१७.

ग्रिगरीच्या मृत्यूची बातमी आल्यानंतर बाराव्या दिवशी मेलिखोव कुटुंबां-कडे एकाच डाकेने पित्रोची दोन पत्रे आली. दुन्याने ती पोस्टातच वाचली आणि बावटळीत सापडलेल्या देठाप्रमाणे ती धावत घरी आली. नंतर झोकांड्या खात ती कुपाटीला धरून थांबली. खेड्यात तिने एकच गोंधळ उडवून दिला आणि क्षुब्धतेची एक अनिर्वचनीय भावना तिच्याबरोबर घरात आली.

'ग्रिशा जिवंताय ! आपला लाडका जिवंताय !' घर गाठायला अजून थोड अंतर असतानाच हुंदके देत ती आक्रंदू लागली.

'पित्रोनं लिहिलंय– ग्रिशा जखमी झाला. पण मेला. नाय तो जिवंताय ! जिवंताय !'

दिनांक २० सप्टेंबरच्या पत्रात पित्रोने लिहिले होते,

'बाबा आणि आईस सा. न.

मला सांगायचंय की, जो देवाघरी गेला म्हणून आपण समजून चाललो होतो तो आपला ग्रिशा देवाच्या दयेने जिवंत आणि खुशाल आहे आणि आपणही प्रभूच्या दयेने खुशाल असावे अशी आम्ही शुभेच्छा करतो.

कामेनका–स्त्रुमिलोवा गावाच्या जवळच त्याचे रेजिमेंट लढत होते आणि हल्ला चढवताना त्याच्या जुमल्यातील कझाकाना असे दिसले की, एका हंगेरियन हुससाराने त्याला खांडला आणि ग्रिगरी घोड्यावरून कोसळला. त्यानंतर कुणाला काहीच ठाऊक नव्हते. मी त्याना विचारले तेव्हा ते मला काहीच सांगू शकल नाहीत पण नंतर मिशका कोर्शेवोईकडून मला असे कळले की रात्र पडेपर्यंत ग्रिगरी पडलेला होता. मिशका जासूद म्हणून आमच्या रेजिमेन्टमधे आला होता. ग्रिगरी रात्री शुद्धीवर आला आणि सरपटत निघाला. आकाशातील चांदण्यांच्या दिशेवरून वाट शोधीत तो सरपटत होता. सरपटता सरपटत तो आमच्या एका अंमलदाराजवळ आला. हा अंमलदार गोळा लागून पोटात आणि पायात जखमी झाला होता. त्याला उचलून घेऊन तो सुमारे चार मैल फरफटत आला. ह्यामुळे ग्रिगरीला सेंटजॉर्ज क्रॉस देण्यात आला असून कारपोरलच्या जागेवर त्याला

बढती देण्यात आल्येय. हे असं आहे. त्याची जखम विशेष काळजी करण्यासारखी नाय. डोक्यावरील कातडीची तेवढी त्याला जखम झाल्येय. पण घोड्यावरून खाली कोसळल्याने तो बेशुद्ध पडला. तो आघाडीकडं परत आल्याचंही मिशाने मला सांगितले. हे पत्र इथेच संपवतो माफ करा. मी जिनात बसून हे लिहीत आहे.'

आपल्या दुसऱ्या पत्रात पित्रोने घरच्या लोकाकडे स्वत:च्या बागेतील सुक्या चेरी मागितल्या होत्या. आपल्याला विसरू नका आणि अधिक पत्रे पाठवा असे त्याने लिहिले होते.

ह्याच पत्रात ग्रिगरीची त्याने निर्भर्त्सना केली होती. कारण त्याला असे कळले होते की ग्रिगरी आपल्या घोड्याची निगराणी नीट ठेवीत नाही. त्यामुळे पित्रो रागावला होता कारण वस्तुत: तो घोडा त्याचा होता. ग्रिगरीला पत्र घाला म्हणून त्याने वडिलाना लिहिले होते.

'मी ग्रिगरीला कझाकाकडून कळविले आहे की स्वत:च्या घोड्याची करेल तशी ह्या घोड्याची नीट निगराणी न केल्यास जेव्हा आमची भेट होईल तेव्हा मी त्याला धरून हाणीन. भले त्याला सेंट जॉर्ज क्रॉस मिळाला असेल!'

नमस्कार आशीर्वादाच्या न संपणाऱ्या यादीने पत्र संपले होते. पावसाच्या थेंबाने सारवलेल्या ओळीतून कटुता आणि दु:खाची भावना ओळखणे कठीण नव्हते. आघाडीवरही पित्रोचे काही बरे चालले नसल्याचे उघड दिसत होते.

म्हातारा पांतिलेय अत्यंत अनुकंपनीय दिसत होता. आनंदाने तो सुन्न झाला होता. दोन्ही पत्रे हातात गच्च धरून तो गावात गेला आणि ज्याला ज्याला म्हणून वाचता येत होते त्याला थांबवून त्याने सक्तीने ते पत्र वाचायला लावले. आढ्यतेने नव्हे पण वेळावलेल्या आनंदाने तो खेड्यात फुशारक्या मारीत हिंडत होता.

'आहा! माझा ग्रिशा म्हणजे काय वाटला?' ग्रिगरीच्या पराक्रमाचे पित्रोने जिथे वर्णन केलेले होते त्या परिच्छेदापर्यंत वाचणारा अडखळत येऊन पोचला की हा आपले हात उंच उभारायचा.

'आपल्या खेड्यात क्रॉस मिळविणारा हा पहिला!' तो अभिमानपूर्वक जाहीर करायचा आणि कृपणपण ती पत्रे ताब्यात घेऊन आपल्या टोपीच्या अस्तरात कोंबायचा आणि दुसऱ्या एकाद्या वाचकाच्या शोधार्थ निघायचा!

आपल्या दुकानाच्या खिडकीतून त्याला पाहून सेर्गेई मोखोवसुद्धा बाहेर आले आणि टोपी काढून हातात घेत म्हणाले,

'एक मिनिट आत ये प्रोकोफिएविच !'

आत गेल्यावर त्याने त्या म्हाताऱ्याचा तळवा आपल्या गुबगुबीत गोऱ्या हातात दाबला आणि ते म्हणाले, 'तुझं अभिनंदन ....! अभिनंदन करतो तुझं ! अशा मुलाचा तुला अभिमान वाटला पाहिजे, आत्ताच पेपरात त्याच्या पराक्रमाबद्दल वाचीत होतो !'

'पेपरातपण आलंय ?' पांतिलेयच्या घशाला कोरड पडली आणि तो घटाघट घुटके घेऊ लागला.

'हो ! आताच मी वाचलं !'

मोखोवनी फळीवरून सर्वोत्तम तुर्की तंबाखूचे पाकीट खाली काढले आणि कागदाच्या एका पिशवीत काही महागडी चॉकलेटे ओतली. त्यांचं वजनबिजन करण्याचीही त्यानी पर्वा केली नाही. ती तंबाखू आणि चॉकलेटे पांतिलेयच्या हाती देऊन ते म्हणाले,

'ग्रिगरी पांतिलिएविचला पार्सल पाठवाल तेव्हा माझे नमस्कार कळवा आणि हे पाठवा त्याला !'

'अरे देवा ! ग्रिशाचा केवढा गौरव ! सबंध खेडं त्याच्याबद्दल बोलतंय. आतापर्यंतचा माझा सगळा अट्टाहास...' दुकानाच्या पायऱ्या उतरताना म्हातारा पुटपुटत होता. त्याने फर्रकन् नाक शिंकरले आणि गालावरची आसवे बाहीने पुसली. 'म्हातारा होत चाललोय ! चटकन् डोळ्याला पाणी यायला लागलंय ! वारे पांतिलेय ! जिंदगीनं तुझं काय करून टाकलं ! एकेकाळी गारगोटीसारखा टणक होतास ! आठ पुडाचे[1] वजन पिसागत पाठीवर मारून नेत होतास. पण आता.. ह्या ग्रिशा प्रकरणानं घोळवलंन् !'

चॉकलेटांची पिशवी छातीशी दाबून तो रस्त्याने लंगडत चालला होता आणि रेवणावर फडफडणाऱ्या टिटवीप्रमाणे त्याचे विचार पुन्हा पुन्हा ग्रिगरीभोवती घिरट्या घेत होते. पित्रोच्या पत्रातील शब्द त्याच्या मनात घोळत होते. ग्रिगरीचे सासरे कोर्शुनोव रस्त्याने येत होते. त्यानी पांतिलेयला हाक मारली'

'ए सोयऱ्या ! जरा थांब !'

युद्ध जाहीर झाल्यापासून ही दोन माणसे एकमेकाना भेटलेली नव्हती. ग्रिगरी घर सोडून गेल्यापासून त्यांच्या दरम्यान थंडावलेले, अवघडलेले संबंध निर्माण झाले होते.

ग्रिगरीपुढे नतालियाने लाचारी पत्करल्याबद्दल आणि बापालाही तशीच लाचारी सोसायला भाग पाडल्याबद्दल मिरोन नतालियावर रुष्ट झालेले होते.

टीप : १) 'एक पूड म्हणजे छत्तीस पौंड

'भटकी कुत्री !' घरात ते नतालियाला शिव्या घालायचे. 'सासरच्या लोकांकडं जाण्यापेक्षा तिला घरी रहायला काय झालं? जसं काय तिथं चार घास जास्त मिळतायत ! तिच्या मूर्खपणामुळेच तिच्या बापाला असला लाज-लावणेपणा आलाय ! गावात डोकं वर काढायची सोय नाही !'

मिरोन सरळ पांतिलेयकडे गेले आणि आपला ओकरंगी हात त्यानी खसकन पुढे धरला.

'कसं कायाय ?'

'देवाची दया !'

'खरेदी करायला गेलाता वाटतं ?'

पांतिलेयने आपला मोकळा उजवा हात पुढे करीत मुंडी हलवली. 'आमच्या शूराला हा नजराणा आहे ! त्याच्या कर्तुकीबद्दल सेर्गेई प्लातोनोविचनी पेपरात वाचलं न् त्याला ही चाकलेटं न् तंबाखू पाठवल्येय ! 'तुझ्या बहाद्दराला माझा नमस्कार कळवून ही भेट पाठव' असं सांगून पुढं तो म्हणाला, 'त्याला पुढंही असाच पराक्रम कर म्हणावं' त्याच्या डोळ्याला पाणी आलं ! ठाऊकाय ?' म्हाताऱ्याने अभिमानानें सांगितले आणि आपल्या शब्दानी मिरोनचे काय मत होते ते अजमावण्यासाठी तो एकटक त्यांच्या तोंडाकडे बघू लागला.

मिरोनच्या पिंगट पापण्याखाली काळोखी पसरली आणि त्यातून त्याच्या चेहऱ्यावर एक छद्मी स्मित उमटले.

'अस्सं !' ते केकाटले आणि रस्ता ओलांडण्यासाठी वळले. पांतिलेय तरातरा ती पिशवी उघडून रागाने थरथरत त्याच्या पाठोपाठ गेला.

'हं ! हे घे ! चाकलेटं खाऊन बघ ! मधासारखी गोडायत !' तो तुच्छतेने म्हणाला,

'खाऊन बघ ! जावयाच्या वतीनं तुला देतोय. तुझी जिंदगी काय फारशी गोड नाय तेव्हा हे असू दे ! एक दिवस तुझ्या मुलाला हा मान मिळेल ! बरीक, मिळेलच असंही काय नाय !'

'माझ्या जिंदगीत लुडबुड करू नको. ती काय आहे ते मला उत्तम ठाऊकाय !'

'एकच घे ! माझ्यावर मेहेरबानी कर !' मिरोनच्या पुढं धावत जाऊन पिशवी वाचकरीत पांतिलेय नाटकी सौजन्याने त्याच्या पुढे झुकला. वाकड्या बोटानी तो चाकलेटाची चांदी उलगडत होता.

'चाकलेटाची आम्हाला संवय नाय.' मिरोनने त्याचा हात झटकून टाकला

'परक्यानी दिलेल्या भेटी आमच्या दातांना मानवत नाहीत. पोरासाठी भीक मागत हिंडणं शोभलं नाय तुला. गरज पडली तर माझ्याकडं येऊ शकतोस. जावयासाठी तरी दिलं असतं. आमची नतालिया तुमचं अन्न खात्येय. तुमच्या दारिद्र्यात आम्ही मदत दिली असती !'

'खोटारडेपणा करू नकोस. आमच्या घरात कधी कुणी भिकेसाठी हात पसरलेला नाय. तू फार आगाऊ आहेस ! फारच आगाऊ ! तुम्हाला एवढी श्रीमंती आल्येय म्हणूनच तुमची पोर आमच्या घरी आली.'

'थांब !' मिरोन करडेपणाने म्हणाले, 'आपल्या भांडणात काही अर्थ नाय तुझ्याशी भांडावं म्हणून तुला हटकलं नाय. तुझ्याशी एका कामाबद्दल मला बोलायचंय.'

'बोलण्यासारखं आपलं काही काम नाहीय.'

'होय ! आहे ! इकडं ये !' त्यांनी पांतिलेयची बाही पकडुन त्याला बाजूच्या गल्लीत खेचले. खेड्यातून चालत ते माळरानावर आले.

'हं ! बोल ! काय कामाय ?' पांतिलेयने राग निवळलेल्या मवाळीच्या सुरात विचारले

कोर्शुनोवच्या डागाळलेल्या चेहऱ्याकडे त्याने तिरपा कटाक्ष टाकला. आपल्या लांब कोटाचे टोक हातात गोळा करून मिरोन एका नाल्याच्या तालीवर बसले आणि आपली जुनी तंबाखूची चंची त्यानी बाहेर काढली.

'हे पहा प्रकोफिएविच, भांडकुदळ कोंबड्यासारखा तू माझ्या अंगावर का आलास ईश्वर जाणे ! सत्य गोष्ट अशी आहे की परिस्थिती काय फारशी चांगली नाय. मला हे जाणून घ्यायचंय ....!' त्यांच्या आवाजात राकट खरखरीत सूर आला, 'तुझा पोर नतालियाचे किती दिवस हंसं करून ठेवणाराय ? हे मला सांग !'

'हे तू त्याला विचार ! मला नको विचारु !'

'त्याला विचारण्याचं माझं काम नाय ! तुझ्या घराचा तू मालक आहेस न् मी तुझ्याशीं बोलतोय !'

आपल्या हातात अद्याप धरून ठेवलेली चाकलेटे पांतिलेयने घट्ट आवळली आणि त्याच्या बोटातून चिकट द्रव झिरपू लागला. तालीवरच्या भिग्या चिखलात त्याने आपला तळवा पुसला. तुर्की तंबाखूचे पाकीट उघडून त्यातली चिमूटभर तंबाखू घेऊन तो शांतपणे चुट्टा वळू लागला. नंतर त्याने ते पाकीट मिरोनपुढे धरले. कोर्शुनोवने आडेवेढे न घेता ते घेतले आणि मोखोवने एवढ्या उदारपणे

दिलेल्या तंबाखूचा चुट्टा वळला आणि ते धूर सोडू लागले. त्यांच्या डोक्यावर एक फेनील शुभ्र पुष्ट पयोधर मस्तीत फुलारला होता. त्या दिशेने उंचावलेला कोळयाचा एक नाजूक तंतु वाऱ्यात थरथरत होता.

दिवस मावळायला आला होता. सप्टेम्बर महिन्यातील निश्चळता, निवांततेत आणि अनिर्वचनीय मांधुर्यात, पेंगुळली होती. आकाशाचे ऐन ग्रीष्माचे तेज हरपले होते आणि त्याला धूसर कबरा रंग आला होता. सफरचंदाची पाने कुठून आली होती देव जाणे आपला गर्द अंजिरी रंग त्यानी नालव्यात विखरून टाकला होता. टेकडीच्या उंच सखल कांडाळयावर वाट अदृश्य होऊन गेली होती आणि क्षितिजाच्या हिरव्याकंच स्वप्नधूमर धाग्यापलीकडे असणाऱ्या अज्ञाताच्या प्रदेशा-कडे येण्याला ती व्यर्थ खुणावत होती. आपली खोपटी आणि नित्याची चाकोरी ह्यात अडकलेली माणसे आपल्या श्रमात खरत होती. मळणीच्या जमीनीवर श्रांत क्लांत होत होती आणि ती वाट, ती निर्मनुष्य व्याकुळ एकारी, क्षितिजाला ओलांडून अदृष्टांत वाहवली होती. वारा ती तुडवीत होता. पांसोळीचे लोट उठवीत होता.

'नरम तंबाखू आहे ही ! गवतासारखी !' धुराचा लोट सोडीत मिरोन म्हणाले.

'नरमाय पण संतोष देणारी आहे !' पांतिलेयने अर्धवट रुकार दिला.

'मला उत्तर दे पांतिलेय !' जरा शांत सुरात कोर्शुनोवने म्हटले आणि आपला चुट्टा चुरगळून विझवला.

'आपल्या पत्रात ग्रिगरी काही लिहीत नाय. आता तो जखमी झालाय.'

'ऐकलंय मी !'

'पुढं काय होणार मला माहीत नाय. एकादवेळी मारलाही जायचा ! मग काय ?'

'पण हे असं कसं चालेल ?' मिरोनने व्यग्रतेने आणि व्यथितपणे डोळयांची उघडझाप केली.

'पोर बिचारी धड ना कुमारी धड ना सवाष्ण. ना धड ना ढळढळीत विधवा ! ही नामुष्कीची गोष्टाय ! हे असं होणाराय हे ठाऊक असतं तर मध्यस्ताला दारात पाऊल टाकू दिलं नसतं ! अरेरे... ! पाव्हण्या ! पाव्हण्या ! प्रत्येकालाच आपल्या पोराचं दुःखाय ! रक्ताचं नातं वेगळं, जोडलेले संबंध वेगळे !'

'मी तरी काय करू ?' पांतिलेयने आपला कावरेबावरेपणा आवरीत

उत्तर दिले. 'सांग मला ! तुला काय वाटतं ? माझा पोर घर सोडून गेल्यानं मला आनंद वाटला ? त्यात काय माझा फायदा झाला ? तुम्ही लोक... !'

'पत्र लिहून कळव त्याला !' मिरोन बजावू लागले. त्यांच्या हाताखालून नालव्यात झरणारी धूळ आणि त्यांच्या ओठातून येणारे शब्द ह्याची गती सारखीच होती. 'त्याला एकदाच सोक्षामोक्षाचं सांगू दे !'

'त्याला पोर झालंय त्या...!

'आणि हिच्याकडूनही होईल त्याला पोर !' विवर्ण होत कोर्शुनोव कडाडले. 'माणसाला हे असं वागवता होय ? आँ ! ह्यापूर्वीच तिनं जीव द्यायचा प्रयत्न केला ! जन्माची पांगळी झाली...! तिला तुडवून जमिनीत गाडायचीय का ? आँ ? त्याचं काळीज ! त्याचं काळीज...!' एका हाताने आपली छाती ओरबाडीत आणि दुसऱ्या हाताने पांतिलेयच्या कोटाचे टोक हिसकीत मिरोन फुत्कारले, 'त्याचं काळीज काय लांडग्याबिडग्याचाय आहे ?'

पांतिलेयने खाकरून तोंड फिरवले.

'पोरीनं त्याच्यावरून जीव ओवाळून टाकलाय ! त्याच्या खेरीज तिला दुसरं आयुष्यच नाय ! तुमच्या चाकरीची ती काय वेठबिगार आहे ?'

'आम्हाला पोटच्या पोरीपेक्षाही ती जास्ताय ! चुप बस !' पांतिलेय कडाडला आणि तालीवरून उठून उभा राहिला.

निरोपाचा नमस्कारही एकमेकाना न करता ते दोघे दोन दिशाना चालते झाले !

१८.

आपल्या नित्याच्या पात्रातून बाजूला लोटले गेले की जीवन नाना ओघळा-निघळातून विखुरले जाते. ह्या दगलबाज आणि नागमोडी जुतऱ्यातून त्याला कोणते वळण मिळेल त्याचे भाकीत वर्तवणे कठीण असते. आतल्या मासळीचे थवे बघून घ्यावे असा रेतीच्या तालीवरून त्याचा भापझिरा आज झुळझुळत जाईल तर उद्या त्याचा गाढा आणि धोधावता ओघ वाहू लागेल.

एकाएकी नतालिया अशा निर्णयाप्रत आली की, यागोदनोएला आक्सिनियाकडे जायचे आणि ग्रिगरी मला परत दे म्हणून तिला सांगायचे. तिच्यापुढे पदर पसरायचा.

कशामुळे तरी नतालियाला असे वाटत होते की, सगळे काही आक्सिनियावर अवलंबून आहे. तिला फक्त आपण विचारायचे की, ग्रिगरी परत येईल. आणि त्याच्याबरोबर तिचे पूर्वीचे सुखही परत येईल. हे शक्य आहे का किंवा ह्या विलक्षण विनंतीला आक्सिनिया काय उत्तर देईल ह्याचा विचार करायला ती तयार नव्हती. आतमनातील हेतूने वाहून तिने हा निर्णय शक्य तितक्या लौकर अंमलात आणायचे ठरवले.

महिनाअखेर ग्रिगरीचे पत्र आले. आपल्या आईवडिलांना नमस्कार लिहून पुढे त्याने नतालियाला नमस्कार आणि शुभेच्छा कळविल्या होत्या. हे लिहिण्यास त्याला उद्युक्त करणारे कारण कोणतेही असो पण नतालियाला हवी असलेली प्रेरणा मिळाली आणि येत्या रविवारी यागोदनोएला जायची तिने तयारी केली.

'कुठं निघालीस नतालिया?' आरशाच्या तुकड्यात आपले रूप एकाग्रतेने न्याहाळणाऱ्या नतालियाकडे बघत दुन्याने विचारले.

'माझ्या माणसांना भेटायला जात्येय!' नतालियाने खोटेच सांगितले. आयुष्यात प्रथमच आपण एक विलक्षण लाचारीचा, भयंकर नैतिक कसोटीचा धोका पत्करीत आहोत ह्या जाणिवेने तिच्या तोंडावर रक्त उसळून आले.

'एकदा तरी संध्याकाळी माझ्याबरोबर फिरायला चल!' दान्याने सुचविले. 'आज संध्याकाळी येतेस?'

'मला माहीत नाय! पण मला नाय वाटत याबंसं!'

'अग जोगिणी! आपले नवरे बाहेर गेले म्हणजेच आपली पाळी येते हो!' दान्या डोळे मोडीत म्हणाली आणि खाली वाकून आपल्या नवीन फिकट निळ्या स्कर्टचा भरतकाम केलेला काठ न्याहाळू लागली. पित्रोने प्रयाण केल्यापासून दान्या खूपच बदलून गेली होती. तिचे डोळे, तिच्या हालचाली, तिच्या चालण्याचा ढंग ह्यातून चांचल्य प्रकट होत होते. रविवारी ती मन लावून नट्टापट्टा करायची आणि संध्याकाळ टळून गेल्यावर उशीराने परत यायची. तिचे डोळे मलूल झालेले असत. ती चिडून गेलेली असे. नतालियाकडे ती गाऱ्हाणे सांगायची.

'हे मेलं भयंकरच नाही का ग? सगळे भले कझाक ते घेऊन गेलेत! खेड्यात ठेवलीत फक्त पोरंसोरं न् म्हातारे कोतारे!'

'वरं मग? तुझं काय बिघडलं?'

'म्हणजे काय ? संध्याकाळचं मन रमवायला कुणीच नाही. एक दिवस एकटीच गिरणीकडं गेले तर आहे! आपल्या सासरेबुवांबरोबर इथं काहीच गंमत नाही!' आणि पाखंडी निर्लज्जपणे तिने नतालियाला विचारलें, तुला कसं ग कझाकाशिवाय इतके दिवस काढवतात ?'

'जळलं तुझं लक्षण! तुला काही लाजबिज आहे का नाय ?' नतालिया शरमून गेली.

'तुला काही इच्छा होत नाय ?'

'तुला होत्येयसं दिसतंय!'

'अर्थात होते!' दाऱ्याचा चेहरा लालबुंद झाला. ती हसली तशी तिच्या भुवयांची धनुष्ये थरारली. 'का म्हणून लपवू मी ? आत्ता– ह्या मिटाला एखाद्या म्हाताऱ्याला सुद्धा तापवीन न् सतावून सोडीन! कल्पना कर! पित्रो गेल्याला दोन महिने लोटले!'

'दाऱ्या, स्वतःच्या दुःखाचा पाया घालत्येयस.'

'बस कर! आली मोठी गरती म्हातारी! तुम्हा खालमुंड्याना आम्ही चांगल्या ओळखून आहोत! तुम्ही कधी कबूल नाय करायच्या!'

'कबूल करायला काही नाहीच माझ्यापाशी!'

दाऱ्याने तिच्याकडे खट्याळ तिरपा कटाक्ष टाकला आणि आपल्या कणीदार लहानशा चावऱ्या दातानी ओठ रगडले. 'परवा त्या आतामानचा मुलगा तिमोफेई मानित्सोव माझ्याबरोबर बसला होता. सुरवात करायला तो भितोय हे मी ओळखलं! नंतर हळूच त्याने माझ्या दंडाखाली आपला हात सरकावला. त्याचा हात थरथरत होता. मी नुस्ती सोशीत, वाट बघत बसलें होते! संताप यायला लागला होता! पोरासारखा पोरगा तरी असावा! पण शेंबडं होतं मेलं! सोळा वर्षाच्या वर एक दिवसाचा नसेल! मी न बोलता आपली बसले होते! हा आपला पंजा आवळतोय! आवळतोय! कुजबुजत कसा म्हणतो, 'आमच्या मांगरात चल!' तेव्हा मग दाखवला त्याला इंगा.' ती आनंदाने हसत होती. तिच्या भृकुटी थरथरत होत्या. तिच्या अर्धोन्मीलित नेत्रातून हास्याची कारंजी उसळली होती. 'असा तासडलाय त्याला! उडी मारून उभी राहिले न् ओरडले, तू रांडिच्या, असल्या तसल्या! काल नाही मेल्या अंड्यातून बाहेर पडलास तर मला फूस लावायचे सुचले होय ? कालपर्यंत तर मेल्या अंथरुण भिजवत होतास!' खूप भादरंपट्टी काढली त्याची.'

नतालियाच्या बाबतीत दाऱ्याची वृत्ती अलीकडे पालटली होती. त्यांचे संबंध साधे सरळ आणि खेळीमेळीचें झाले होते. आपल्याहून लहान जावेबद्दल

तिला वाटणारी अप्रीती गेली होती आणि हरप्रकारे वेगळ्या असणाऱ्या त्या दोघी गुण्या-गोविंदाने नांदत होत्या.

नतालियाने कपडे केले आणि ती बाहेर पडली. दाऱ्याने तिला फाटकाजवळ गाठले.

'रात्री मी आले की मला दार उघडशील ?'

'आज रात्री मी माझ्या माणसांच्या घरीच राहणाराय !'

कंगव्याने नाक खाजवीत दाऱ्या विचारात गढली आणि तिने मान हलवली. 'बरं ठीकाय ! दुन्याला मला सांगायचं नव्हतं. पण सांगायला लागणार !'

आपल्या घरच्या लोकाना भेटायला जाते, असे इलीनिचनाला सांगून नतालिया बाहेर पडली. चौकातील बाजारातून रेकले खडखडत परत चालले होते. ती बाजूच्या गल्लीत वळली आणि घाईघाईने टेकडी चढू लागली. माथ्यावर ती वळली अन् तिने मागे बघितले. खेडे उन्हात न्हात होते. सफेता दिलेली लहान लहान घरं ढळढळीत पांढरीफेक दिसत होती. गिरणीच्या चौढाळ छपरावर उन्ह तळपत होते आणि त्या पत्र्याला वितळलेल्या धातूची चकाकी आली होती.

११.

यागोदनोएची पुरुषमाणसेही युद्धाने खुडून नेली होती. वेनियामिन आणि तिखोन गेले होते आणि ती वास्तू जास्तच सुस्त, रुक्ष आणि पूर्वीपेक्षा जास्त शुकशुकाट असलेली वाटत होती. वेनियामिनच्या ऐवजी आक्सिनिया सेनानी-साहेबांची चाकरी करीत होती आणि विशाल बुडाच्या लुकेरियाने स्वयंपाक करणे आणि कोंबड्याना दाणापाणी देणे ही कामे स्वत:कडे घेतली होती. म्हातारा साशका घोड्याची सरबराई करीत होता आणि फळबागेची निगराणी ठेवीत होता. एकच नवीन चेहरा आला होता. तो निकितिच नावाचा म्हातारा कझाक होता. त्याला मोतद्दार म्हणून घेण्यात आले होते.

यंदा म्हाताऱ्या लिस्तनिस्तकीने कमी पेरणी केली होती आणि लष्कराला नगद म्हणून वीस घोडी देऊन वाडीच्या गरजेपुरती तीन चार मागे ठेवली

होती. माळढोकांची पारध करण्यात आणि बरझोई कुत्री घेऊन शिकारीला जाण्यांत तो वेळ घालवीत होता.

आक्सिनियाला ग्रिगरीची केवळ कधीतरी आणि त्रोटक पत्रे येत आतापर्यंत आपण खुशाल आहोत आणि रगाड्यातून चाललो आहोत असे त्याने लिहिलेले असे. तो जास्त दणकट झाला होता किंवा आपल्या दुर्बलतेबद्दल तिला कळविण्याची त्याची इच्छा नव्हती. कारण आपली फौजी चाकरी कठीण आणि रुक्ष आहे अशी कोणतीही तक्रार तो चुकूनही स्वतःकडून होऊ द्यायचा नाही. त्याच्या पत्रात एक असा थंड सूर असे की लिहायलाच हवीत म्हणून जणू काही तो ही पत्रं लिहीत होता असे वाटावे. फक्त एकदाच त्याने लिहिले होते की, ' मी सतत आघाडीवर आहे. लढायचा आणि पाठीवर सतत मरण वागवायचा मला वीट आलेला आहे. ' प्रत्येक पत्रात तो आपल्या मुलीची चौकशी करायचा, तिच्याबद्दल लिही म्हणून आक्सिनियाला सांगायचा. ' माझी तान्युशा कधी मोठी होत्येय आणि ती कशी दिसत्येय त्याबद्दल लिही. ती मोठी झालेली आणि लाल झगा घालून आलेली अलिकडेच मला स्वप्नात दिसली.'

हा विरह आक्सिनिया धैर्याने सोसत असलेली दिसत होती. ग्रिगरीबद्दल तिला वाटणाऱ्या सर्व प्रेमाचा वर्षाव ती त्या अर्भकावर करीत होती. ही पोर ग्रिगरीचीच आहे ह्याची खात्री पटल्यानंतर तर विशेषच ! प्रत्यक्षात ह्याचा निर्विवाद पुरावा मिळालेला होता. मुलीच्या जावळाचा तांबूस पिवळट रंग जाऊन ते काळे कुरळे झाले होते. डोळ्यांचा रंग काळ्या छटेवर गेला होता आणि त्यांच्या गर्ता चिंचोळ्या झाल्या होत्या. दिवसेंदिवस ती अधिकाधिक बापासारखी दिसू लागली होती. तिचे स्मितसुद्धा मेलिखोव वंशासारखे-ग्रिगरी-सारखे रासवट होते. आता आक्सिनियाला त्याची प्रतिमा लेकीत निःसंशयपणे दिसू लागली होती आणि तिच्या भावना जास्तच गाढ बनल्या होत्या. स्तिपानच्या तृणास्पद तोंडवळ्यात झोपलेल्या मुलीच्या चेहऱ्याचे साम्य जाणवून ती पूर्वी पाळण्यापासून दचकून मागे वळायची. आता तसे नव्हते.

पण दिवस सरपटत चालले होते आणि प्रत्येक दिवसाच्या अखेरीस आक्सि-नियाच्या उरात एक दाहक कटुता साचत होती. आपल्या लाडक्याच्या जिवाची चिंता तीक्ष्ण सुईप्रमाणे तिच्या मनात घुसत चालली होती. रात्रंदिवस ती तिची पाठ सोडत नव्हती. कामाच्यावेळी आवरून धरलेली भावना रात्री सगळे बांध उध्वस्त करायची निःशब्दपणे रडत, आपल्या हुंदक्यांनी पोर जागी होऊ नये म्हणून हात

चावीत तळमळत तडफडत पडलेली असे. शारीरिक वेदनेने मनाच्या वेदना मारण्याचा तिचा प्रयत्न असे. उरलेली आसवे ती पोरीच्या दुपट्यात ढाळीत असे. तिच्या पोरकट भाबडेपणाला वाटे, 'ही ग्रिशाची पोर आहे, त्याच्यासाठी मी किती तळमळत्येय ते त्याच्या काळजाला जाणवलं पाहिजे.'

रात्र अशी घालवून ती सकाळी जी उठे ती निर्दयपणे मारहाण झाल्यासारखी ! तिचे सगळे शरीर ठणकत असे. तिच्या धमन्यातून चांदीचे घण अखंड ठोकत रहात. ओठांच्या कोपऱ्यात दर्द रेंगाळलेला असे. ह्या तळमळींच्या जागरणांमुळे आक्सिनिया निबर दिसू लागली.

एका रविवारी घऱ्याला न्याहरी वाढून झाल्यावर पावलाणावर ती उभी होती. तेव्हा एक बाई फाटकाकडे येताना तिला दिसली. तिच्या डोईच्या पांढऱ्या रुमालाखालचे डोळे विलक्षण परिचित वाटत होते. त्या बाईने फाटक उघडले आणि ती आवाडात शिरली. नतालियाला ओळखल्याबरोबर आक्सिनिया पांढरी फटक पडली. मंद पावले टाकीत ती तिला सामोरी गेली. आवाडाच्या मधोमध त्या एकमेकींना भेटल्या. नतालियाच्या बुटांवर धुळीचा दाट थर जमा झालेला होता. ती थबकली. श्रमाने राकट झालेले तिचे मोठाले हात तिच्या दोन्ही बाजूंना लोंबत होते. तिला धाप लागलेली होती. आपली व्रणित मान सरळ करायचा ती प्रयत्न करीत होती, पण तो न साध्य झाल्याने ती तिरप्या नजरेने बघत्येय असे वाटत होते.

'मी तुझ्याकडं आल्येय आक्सिनिया.' आपल्या ओठावरून कोरडी पडलेली जीभ फिरवीत ती म्हणाली.

घराच्या खिडक्यांकडे आक्सिनियाने चटकन् नजर टाकली आणि न बोलता ती नतालियाला आपल्या खोलीकडे घेऊन गेली. नतालिया तिच्या मागोमाग गेली. तिच्या हळव्या कानाना आक्सिनियाच्या झग्याची फडफड अस्वाभाविक कर्कश वाटत होती. 'माझ्या कानाना काहीतरी झालंय. गरमीमुळे असेल.' विचारांच्या इतर झुंडीबरोबर हाही एक बावरलेला विचार तिच्या मेन्दूला पासून गेला.

आक्सिनियाने दार लावून घेतले आणि एप्रनखाली हात धरून खोलीच्या मधोमध उभी रहात एकूण प्रसंगाची सूत्रे तिने स्वत:च्या हाती घेतली.

'कशाला आलीस तू ?' तिने चोरट्या आवाजात अगदी कुजबुजल्यागत विचारले.

'मला पाणी हवंय !' खोलीत इकडे तिकडे बारीक नजर टाकीत नतालियाने उत्तर दिले.

आक्सिनिया वाट बघत थांबून राहिली. नतालिया बोलू लागली. आपला आवाज चढवायला तिला कष्ट होत होते.

'माझा नवरा तू माझ्यापासून काढून घेतलास . ! माझा ग्रिगरी मला परत दे ! माझं आयुष्य तू विस्कटून टाकलंस ! माझी अवस्था बघ...!'

'तुझा नवरा हवाय तुला ?' आक्सिनिया दात खाऊन बोलू लागली दगडावर पावसाचे थेंब हळू हळू पडावेत तसे तिचे शब्द येऊ लागले, तुझा नवरा हवाय तुला ? कुणाला तू विचारत्येयस् ? आलीस का तू ? ह्याचा फार उशीरा विचार केलास ! फार उशिरा !'

छद्मीपणाने हसत, सबंध देह हलवीत आक्सिनिया नतालियाच्या अगदी निकट गेली. आपल्या गनिमाच्या चेहऱ्याकडे रोखून पाहताना ती तिचा उपहास करीत होती. कायदेशीर पण टाकलेली, अवमानित, दुःखाने विदीर्ण झालेली ती बायको इथे उभी होती. आक्सिनियाच्या आणि ग्रिगरीच्या जी आड आली होती, जिने त्याना एकमेकांपासून तोडले होते, आक्सिनियाच्या काळजाला मर्मभेदक यातना जिने दिल्या होत्या तीच ही ! मरणांतिक तळमळीने आपले प्राण कंठाशी आलेले असताना ही एक दुसरीच– ही नतालिया, ग्रिगरीला कुरवाळीत बसल्येय आणि –शंकाच नाही– आपल्याला हसत्येय– ही... ही अपेशी परित्यक्ता गृहिणी !

'मी त्याला सोडून द्यावा म्हणून तू मला सांगायला आलीस होय ?' आक्सिनिया धपापू लागली. 'अग सरपटत्या सर्पिणी ! आधी तूच ग्रिशा माझ्यापासून छिनावून घेतलास ! तो माझ्याजवळ रहात होता हे माहीत होतं तुला ! कशाला त्याच्याशी लग्न केलंस ? मी फक्त माझा होता तो परत घेतला ! तो तो माझाय ! त्याच्यापासून मला पोर झालंय ! पण तू !'

बावटळीसारख्या द्वेषाने नतालियाच्या डोळ्यात रोखून पाहिले. वेडेवाकडे हातवारे करीत शब्दांचा उकळता धोधोकार तिच्या मुखातून निघू लागला.

'ग्रिशा माझाय ! आणि तो मी कुणालाही देणार नाय. तो माझाय...! ऐकलंस का...? माझा ! चल चालती हो ! निलाजरी कुत्री ! तू त्याची बायको नव्हंस ! पोरीपासून तिचा बाप तुला छिनवायचाय होय ? आणि तू आधी का नाही ग आलीस ? बोल ना ! आधी का नाही आलीस ?

नतालिया बाजूला जाऊन बाकड्यावर बसली. डोके खाली करून तिने तोंड हातानी झाकून घेतले.

'तू तुझ्या नवऱ्याला सोडून दिलंयस ! अशी किंचाळू नकोस !'

'मला ग्रिशाखेरीज कुणी नवरा नाय ! कुणी नाय ! अलम दुनियेत कुठे नाय !' आत धुमसणाऱ्या संतापाला वाट सापडत नाही असं जाणवून आक्सिनियाने नतालियाच्या डोईच्या रुमालातून निसटलेल्या काळ्या केसांच्या बटेकडे नजर रोखून धरली.

'तुझी गरज आहे का त्याला ?' ती कडाडली. 'तुझी वाकडमान बघून घे जरा ! तुला काय वाटतं की तो झुरतोय तुझ्यासाठी ? तू धडधाकट होतीस तेव्हाच त्यानं तुला टाकली आणि तुझ्या पांगळीकडं तो बघणाराय होय ? मी ग्रिशाला देणार नाय ! एवढंच मला सांगायचंय ! चल चालायला लाग !'

आपल्या घरट्याचा बचाव करताना गतकाळच्या सर्व यातनांचा सूड घेताना आक्सिनिया हिंस्त्र झाली. तिला स्वत:ला हे दिसत होतं की मान किंचित कलती असली तरी नतालिया पूर्वीएवढीच देखणी होती. नतालियाच्या टवटवीत गालाना आणि ओठाना काळाचा स्पर्श झालेला नव्हता तर हिच्या स्वत:च्या डोळ्याभोवती मात्र सुरकुत्यांचे जाळे झालेले होते आणि हे सगळं नतालियापायी.

'विचारल्यानं तो परत मिळेल अशी मला काही आशा होती असं तुला वाटतं ?' दु:खाने धुंद झालेली नजर वर काढीत नतालियाने विचारले.

'मग कशाला आली होतीस ?'

'माझ्या तळमळीनं मला ओढून आणलं !'

त्या आवाजानी जागी होऊन आक्सिनियाच्या मुलीने अंथरुणात चाळवाचाळव केली आणि टाहो फोडला. आईने पोर घेतली आणि खिडकीकडे तोंड करून ती बसली. त्या अर्भकाकडे बघताना नतालियाचे गात्र न् गात्र थरथरत होते. एका कोरड्या पेटक्याने तिचे नरडे आवळले गेले. त्या छकुल्या चेहऱ्यातून ग्रिगरीचे नेत्र तिच्याकडे चौकसपणे रोखून बघत होते.

रडत आणि झोकांड्या खात ती फाटकाकडे निघाली. आक्सिनियाने तिचा निरोप घेतला नाही. एक दोन मिनिटानी साशका खोलीत आला.

'कोण बाई होती ती ?' त्याने अर्धवट जाणल्याचे उघड होते.

'आमच्या खेड्यातली कुणी होती !'

दोनेक मैल नतालिया चालत माघारी गेली आणि मग एका जंगली काटेरी झुडपाखाली बसली. कसलाही विचार न करता आपल्या तळमळीने ती चूर होऊन पडली होती. त्या अर्भकाच्या चेहऱ्यातून रोखून बघणारे ग्रिगरीचे उदास काळे डोळे तिला सतत स्वत:पुढे दिसत होते !

२०.

लढाईनंतरची रात्र इतकी ठसठसीत होती की, दृष्टीला काळोखी आणणाऱ्या वेदनेप्रमाणे ग्रिगरीच्या स्मृतीवर तिचा कायमचा ठसा उमटून राहिला. पहाट फुटायला थोडा अवधी असताना तो शुद्धीवर आला पिकाच्या टोचणाऱ्या खुंटातून त्याचे हात चाळवले गेले आणि मस्तकात भिनणाऱ्या वेदनेने तो विव्हळला. प्रयत्नाने त्याने हात उंचावला भुवईपर्यंत नेला आणि रक्त थिजलेल्या केसांचा त्याला स्पर्श जाणवला. त्याच्या बोटानी जखमेला स्पर्श केला तेव्हा त्याला असे वाटले की, तिथे लालबुंद धगधगीत अंगारच ठेवलेला आहे. नंतर दात खाऊन तो पाठीवर वळला. गोठवती थंडी लागलेल्या एका झाडाची पाने त्याच्या डोक्यावर किणकिणत सळसळत होती. अस्मानाच्या गर्द निळ्या पार्श्वभूमीवर त्या काळ्या पानांची स्पष्ट रेखाकृती उमटली होती आणि त्यातून चांदण्या चमकत होत्या. ग्रिगरी अपलख नजरेने टक लावून बघत होता आणि त्या चांदण्या म्हणजे डहाळ्याना लागलेली विलक्षण, निळसर सोनेरी फळेच आहेच असे त्याला वाटत होते.

आपल्याला काय झालेले आहे ते ओळखून आणि अनिवार्य भयावहतेची जाणीव होऊन तो दात खात रांगत जाऊ लागला. वेदना त्याला खेळवीत होती. त्याला उचलून आपटीत होती. अनंताकडे आपण रांगत चाललो आहोत असे त्याला वाटत होते. त्याने बळेबळे मागे वळून पाहिले. ते काळेकुट्ट झाड सुमारे पन्नास पावले दूर उभे होते. एकदा तो एका मुड्या-वरून रांगत गेला. मयताच्या खडखडीत भकाळी गेलेल्या पोटावर त्याने कोपर रुतवले. रक्तस्त्रावाने तो गळून गेला होता. एकाद्या अजाण अर्भका-प्रमाणे तो रडू लागला आणि शुद्ध हरपू नये म्हणून दहिवरात भिजलेले गवत दाताखाली रगडू लागला.. एका उलथून पडलेल्या किरांचीचा आधार घेऊन तो उभा राहिला. बराच वेळ डगमगत तो उभा होता आणि मग चालायला लागला. त्याच्या अंगात परत त्राण शिरू लागले. जास्त खंबीरपणे तो पावले टाकू लागला पूर्वेकडे सरकणाऱ्या सप्तर्षींच्या ताऱ्यांवरून आपली दिशासुद्धा त्याच्या ध्यानात येऊ लागली.

रानाच्या कडपट्टीवर एकाएकी इशाऱ्याची गर्जना ऐकून तो थबकला.

'ठैरो ! गोळी झाडीन !'

पिस्तुलाचा खटका त्याने ऐकला आणि आवाजाच्या दिशेने त्याने नजर टाकली. एक मनुष्य देवदाराला रेलून उभा होता.

'कोणायस तू ?' स्वतःचा आवाज दुसऱ्याच कुणाचा तरी असावा असा ऐकत त्याने विचारले.

'रशियन ? अरे देवा ! इकडं ये !' देवदाराजवळचा मनुष्य जमिनीवर घसरला. ग्रिगरी त्याच्याजवळ गेला.

'खाली वाक !'

'शक्य नाय !'

'का नाय ?'

'मी पडलो तर परत उठता येणार नाय. माझ्या डोईला जखम झाल्येय.'

'कुठल्या रेजिमेन्टचा तू ?'

'बारावं डॉन कझाक !'

'मला मदत कर कझाका.'

'मी पडेन हुजूर !' त्या माणसाच्या खांद्यावरील माकुलावरून तो अंमलदार असल्याचे ओळखून ग्रिगरीने उत्तर दिले.

'निदान तुझा हात तरी दे !'

ग्रिगरीने त्या अंमलदाराला हात देऊन उठवले आणि ते बरोबर चालू लागले. पण प्रत्येक पावलागणिक तो अंमलदार त्याच्या दंडावर अधिकाधिक रेलू लागला. कपारीतून ते सदरेवर आल्यावर तो ग्रिगरीची बाही पकडून म्हणाला,

'सोडून दे मला कझाका ! मला जखम झाल्येय !...पार पोटातून गेल्येय !'

त्याच्या चापाच्या चष्म्याआडचे डोळे निस्तेज दिसत होते आणि त्याच्या उघडया तोंडातून तो घरघरीत फसफसत होता. त्याला मूर्च्छा आली पण ग्रिगरीने त्याला फरफटत नेले. परत परत तो खाली आदळत आणि परत परत उठत होता. दोनदा त्याने आपला बोजा टाकून दिला आणि तो पुढे चालू लागला. पण दोन्ही वेळा परत माघारी आला आणि त्याने तो उचलला. झोपेत चालावे असा तो धडपडत चालला होता.

अकरा वाजता त्याना एका गस्ती हशमाने उचलले आणि मलमपट्टी करण्याच्या ठाण्याकडे नेले.

दुसऱ्याच दिवशी ग्रिगरी त्या ठाण्यातून निसटला. एकदा रस्त्याला लागल्यावर त्याने डोक्याची पट्टी ओरबाडून काढली आणि हायसे वाटून ती रक्तात भिजलेली पट्टी हलवीत तो चालू लागला.

'कुठून आलास तू ?' तो रेजिमेन्टच्या ठाण्यावर आल्यावर त्याच्या स्क्वाड्रन कमांडरने चकित होऊन विचारले.

'मी ड्यूटीवर परत आलोय हुजूर !'

स्क्वाड्रन कमांडरकडून आल्यावर ग्रिगरी आपल्या जुमल्याच्या सार्जंटला भेटला.

'माझा घोडा .... ! कुमायती . .. ! कुठाय तो ?'

'तो ठीकाय पोरा ! ऑस्ट्रियनाचा धुव्वा उडवल्यावर लगेच त्याला आम्ही धरला. पण तुझं काय ? तुला स्वर्गात जागा मिळावी म्हणून आम्ही प्रार्थना करीत होतो !'

'तुम्ही घाई केलीत !' उग्रट स्मित करून ग्रिगरी म्हणाला

रेजिमेन्टच्या फतव्यात पुढील एक उतारा होता.

'घोडेस्वाराच्या नवव्या रेजिमेन्टचे कमांडर लेफ्टनंट कर्नल गुस्ताव ग्रोझबेर्ग ह्यांचे प्राण वाचविल्याबद्दल बाराव्या डॉन कझाक रेजिमेन्टचा मेलिखोव ग्रिगरी ह्याला कारपोलच्या जागेवर बढती देण्यात येत आहे आणि सेंट जॉर्ज क्रॉस चौथा वर्ग ह्यासाठी त्याची शिफारस करण्यात येत आहे.'

ग्रिगरीच्या स्क्वाड्रनने कामेनकास्त्रुमिलोवा इथे दोन दिवसांचा मुक्काम केला आणि आता ते परत कूच करण्याची तयारी करीत होते. आपल्या जुमल्यातील कझाक ज्या घरात वस्तीला होते ते घर ग्रिगरीने शोधून काढले आणि आपला घोडा पहायला तो निघाला. त्याचा टावेल आणि आत घालायचे काही कपडे त्याच्या दुलंगीतून गायब झाले होते.

'माझ्या डोळ्यादेखत पळवले ग्रिगरी !' मिशा कोशेवोईने ओशाळगतीने कबुली दिली. 'इथं वस्तीला आलेल्या पायदळाची गर्दी उडाली होती, त्यानी ते पळवले !'

'पळवू दे ! ठेवून घ्या म्हणावं भडव्यानो ! मला तेवढी डोक्याला पट्टी बांधायची होती.'

'माझा टॉवेल घे !'

तें उभे होते त्या मांगरात उन्युपिन आला. आपले आणि ग्रिगरीचे जणूकाही कधी भांडण झालेच नव्हते असा त्याने आपला हात पुढे केला,

' नमस्ते मेलिखोव ! अजून जिंदा आहेस तर !'

' आहे थोडाफार !'

' तुझं डोकं सगळं रक्ताळलंय ! पुसून घे !'

' पुशीन सवडीनं !'

' तुला काय उपाय केलाय बघू दे !'

त्याने बळेच ग्रिगरचे डोके वळवले आणि तो खेकसला, ' आपले केस का त्याना कापू दिलेस ? काय अवतार दिसतोय तुझा ! डाक्तराची तुला काही मदत नाय व्हायची ! मीच तुला बरा करतो !'

ग्रिगरीच्या संमतीची वाट न बघता त्याने आपल्या गोलदानीतून एक काडतूस बाहेर काढले, ते तोडून उघडले आणि आतली काळी दारू हातावर ओतली.

' मिशा, कातिणीचं घर शोधून आण !'

आपल्या समशेरीच्या पुतळीने कोशेवोईने आढ्याचे एक कातिणीचे घर काढले आणि ते उन्युपिनला दिले. त्याच समशेरीने उन्युपिनने थोडी माती उकरून काढली ती माती, ते कातिणीचे घर आणि दारूची भुकटी एकत्र कालवून त्याने ते मिश्रण दाताखाली चावले-चघळले आणि त्या चिकट द्रवाचा लेप रक्ताळलेल्या जखमेवर लावला आणि त्याने स्मित केले.

' तीन दिवसात ठीक होऊन जाईल !' त्याने जाहीर केले, ' बघ मी तुझी काळजी घेतोय इथं आणि तू मात्र मला ठार मारलं असतंस !'

' माझी काळजी घेतल्याबद्दल मेहेरबानी ! पण तुला ठार केलं असतं तर माझ्या मनावरचं एक पाप कमी झालं असतं !'

' किती भोळसट रे तू पोरा !'

' असेन ! माझं डोकं कसं दिसतंय ?'

' अर्ध्या इंचाची खोल जखमाय ! त्यांची आठवण राहील !'

' मी त्याना विसरायचो नाय !'

' विसरतो म्हटलं तरी विसर पडायचा नाय ! ऑस्ट्रियन आपल्या तलवारींना नीट धार करीत नाहीत तेव्हा जन्मभर हा डाग राहणार तिथं !'

' नशीबवान आहेस ग्रिगरी ! त्याचा तिरपा वार बसला म्हणून ठीक !

नाय तर तुला ह्या परकी मातीत पुरायला लागला असता !' कोशेवोई हसून म्हणाला.

'माझ्या टोपीचं काय करू ?' आपली मार खाल्लेली रक्तात भिजलेली टोपी गोंधळून हातात उलट सुलट करीत ग्रिगरीने विचारले.

'दे फेकून ! कुत्र्याना होईल खायला !'

'खाद आली रे पोरांनु ! चला घेऊन चला !' घराच्या दारातून आरोळी आली.

कझाक मांगरातून निघून गेले. पाठमोऱ्या ग्रिगरीकडे पाहून आणि डोळ्यांच्या कवड्या दाखवीत त्याचा घोडा खिकाळला.

'तुझ्यासाठी तो झुरत होता ग्रिगरी !' कोशेवोई ग्रिगरीकडे पाहून म्हणाला, 'मला आश्चर्य वाटायचं ! काही खायचा नाही ! सतत आपला खिकाळत रहायचा !'

'मी रांगत येत होतो, तेव्हा त्याला हाळ्या घालत होतो !' ग्रिगरी सद्‌गदीत आवाजात म्हणाला.

'माझी खात्री होती की तो मला सोडून जायचा नाय. आणि त्याला धरणं नवख्या माणसाला सहजासहजी जमायचं नाय हेंही मला ठाऊक होतं !'

'खराय ! आम्ही फास टाकून त्याला कसाबसा पकडला !'

'चांगला घोडाय ! माझ्या भावाचा–पित्रोचाय !' आपले डबडबलेले डोळे दिसू नयेत म्हणून ग्रिगरी पाठमोरा झाला.

ते घरात गेले. पुढच्या खोलीत एका स्प्रिंगच्या खाटेवर योगोर झारकोव झोपला होता. घरधनी किती गडबडीने घर सोडून पळून गेले होते ह्याची तेथील अनिर्वचनीय बजबजपुरीने निःशब्द साक्ष पटत होती. फुटलेल्या भांड्यांचे तुकडे, फाटलेले कागद, पुस्तके, कापडाच्या चिंध्या, मुलांची खेळणी, जुने बूट, विखुरलेले पीठ ह्या सगळ्यांचा जमिनीवर नुसता गदारोळ झाला होता.

येमिलियान ग्रोशेव आणि प्रोखोर झीकोव ह्यानी खोलीच्या मधोमध थोडी जागा करून घेतली होती आणि ते जेवत होते. ग्रिगरीला पाहताच प्रोखोरचे वासरागत डोळे जवळ जवळ खोबणीतून बाहेर पडायच्या बेतात होते.

'ग्रिशा ! अरे कुठून टपकलास तू ?'

'आकाशातून !'

'पळ ! त्याला खाद घेऊन ये ! डोळे फाडून बघत बसू नको !' उन्युपिन गरजला.

‘एका मिटात ! कोपऱ्यावरच उडपाल आहे !’

तोंडातला घास चघळीत प्रोखोर दरवाज्याकडे धावला. ग्रिगरी श्रांतपणे आपल्या जागेवर बसला होता. ‘आधीचं जेवण केव्हा झालं होतं तेही आठवत नाय !’ तो ओशाळगतीने हसला.

तिसऱ्या जुमल्याच्या तुकडचा गावातून चालल्या होत्या. पायदळ, सामानासुमानाचे रेकले, रिसाला ह्यानी अरुंद रस्ते व्यापून टाकले होते. चौकातून तुंबा झाला होता आणि घराच्या बंद दरवाजातूनही रहदारीचा गोंगाट आत शिरत होता. रश्शाचे गाडगे आणि ‘ग्रेचनीकाशा’चा वाडगा घेऊन प्रोखोर चटकन परतला.

‘खाद कशात ओतू ?’

ते कशासाठी आहे हे माहीत नसल्याने ग्रोशेवने एक लघ्वीचे भांडे उचलले न् तो म्हणाला, ‘हे दांडयाचं भांडंय !’

‘तुझ्या भांडयाला घाण मारतेय !’ प्रोखोर कपाळाला आठ्या घालून म्हणाला.

‘हरकत नाय ! ओत सगळं ह्यात ! वाटून घेऊ !’

झीकोवने त्या भांडयात टोपली उपडी केली. भोवताली पोवळयाच्या रंगाची तुपाचा तवंग आलेली आटीव दाट खीर बदबदा खाली पडली. ते गप्पा मारीत जेवू लागले.

‘पलिकडच्या घरात पहाडी घोडनाळा बटालियन आहे !’ आपल्या तुमानीवर पडलेल्या तेलकट डागावर थुंकी थापटीत प्रोखोरने बातमी दिली. ‘आपल्या घोडयाना ते दानावैरण देतायत ! त्याच्या वारंट आफिसराने पेपरात वाचलंय की जर्मनीचे दोस्त पाय लावून पळतायत !’

‘आज सकाळी तू इथं यायला हवा होतास मेलिखोव’ खिरीचा बकाणा तोंडात घेऊन उऱ्युपिन पुटपुटला, ‘खुद्द डिव्हिजन कमांडरनं आमचे आभार मानले ! त्यानं आमची पाठ थोपटली आणि हंगेरियन हुस्साराचा धुव्वा उडवून बतारी बचावल्याबद्दल आमचें आभार मानले ! हुस्सारानी तोफा जवळ जवळ पळवल्या होत्या. तो म्हणाला, ‘कझाकानो, झारला आणि देशाला तुमचा विसर पडायचा नाय !’

‘हे असाय !’ बाहेर गोळीचा आवाज झाला आणि मशिनगनचा दुरटा सुरू झाला.

‘बाहेर या !’ फाटकाजवळून कुणीतरी गरजले.

आपले चमचे टाकून देऊन कझाक बाहेर धावले. डोक्यावर भयंकर घरघराट करीत एक विमान खालच्या उंचीवर येऊन घिरट्या घालीत होते.

'कुपाटीखाली आडवे व्हा ! एका मिटात ते बाँब टाकतील ! शेजारच्या घरात बतारीचा तळाय !' उन्युपिन ओरडला. 'कुणीतरी जाऊन योगोरला उठवा ! नरम गादीत मारला जाईल तो !'

'रायफली आणा !'

काळजीपूर्वक नेम धरून पावलाणावरून उन्युपिननं निशाण चालवले.

सैनिक रस्त्यातून पळत होते. काही कारणाने त्यानी मुंडकी खाली झुकवली होती. पलिकडच्या आवाडातून घोड्यांची खिकाळणी आणि करडे हुकूम येत होते. आपल्या बंदुकीचा काडतुसाचा चाप ग्रिगरीने संपूर्ण उडवला आणि कुपाटी-पलिकडं नजर टाकली. बांधानी घाईने एक तोफ मांगरांत चाकावरून ढकलून नेत होते. आकाशाच्या खुपणाऱ्या निळाईकडे किलकिल्या डोळ्यानी बघत त्याने घरघरणाऱ्या झडपणाऱ्या पक्षाकडे नजर रोखली. त्याक्षणी त्याच्यापासून काहीतरी खाली पडले आणि उन्हात लख्खकन चकाकले.

विदारक गर्जनेने घर हादरले. कझाक पावलाणाच्या बाजूने दबून बसले. पलिकडच्या आवाडात एक घोडे प्राणांतिक वेदनेने खिकाळू लागले. दारूच्या धुराची झणझणीत लाट कुपाटीवर तरंगत गेली.

'सपाट झोपा !' पावलाणावरून धावत येत उन्युपिन किंचाळला. ग्रिगरी त्याच्या मागोमाग ताडकन् उडाला आणि कटंजनापाशी ते आडवे झाले. विमानाचा अॅल्युमिनिअमचा एक भाग झळकला. शेपटी एकीकडे फिरवीत ते वळत होते. रस्त्यावरून कुणीतरी फैरी झाडत होते तोफांचा धमामा ऐकू येत होता. बंदुकीच्या सुटलेल्या गोळीचा आवाज येत होता. आपल्या बंदुकीच्या शिलेखणीत ग्रिगरीने ताज्या काडतुसाचा चाप नुक्ताच सरकावला होता. एवढ्यात विदारक स्फोटाने तो कटंजनापासून सहा फूट फेकला गेला. मातीचे एक ढेकूळ त्याच्या टाळक्यात दाणकन आदळले आणि त्याच्या डोळ्यात सगळी माती गेली.

उन्युपिनने त्याला पायावर उभा केला. डाव्या डोळ्यातील तीव्र वेदनेमुळे ग्रिगरीला काही दिसेना. कष्टाने त्याने उजवी पापणी उघडली तेव्हा निम्मे घर कोसळलेले त्याला दिसले. विटांचा अस्ताव्यस्त खच पडला होता. त्यांच्यावर गुलाबी पांसाळीचा ढग तरंगत होता.

तो रोखून बघत उभा असताना येगोर झारकोव पावलाणाखालून सरपटत बाहेर पडला. त्याचा सबंध चेहरा म्हणजे एक 'आक्रोश' झाला होता. खोबणीतून

डोळे बाहेर आल्याने त्यातून रक्ताश्रूंचे लोट वाहत होते. डोके खांद्यावर दाबून तो सरपटत होता. काळे पडत जाणारे आपले ओठ न उघडता हंबरत होता !

त्याच्या पाठोपाठ मांडीत फाटलेला त्याचा एक पाय कातडीच्या एका धाग्या-बरोबर आणि जळालेल्या तुमानीच्या धांदोटीबरोबर फरफटत येत होता. मग तो टाहो थांबला आणि तो एका कुशीला कलंडला. विटा आणि शेणाच्या सडा घातलेल्या त्या उग्र निष्ठूर जमिनीत त्याने मुस्काट दाबून धरले होते. त्याच्याकडे जाण्याचा कुणीही प्रयत्न केला नाही.

'त्याला उचला !' अजून डाव्या डोळ्यावर हात दाबून धरीत ग्रिगरी किंचाळला.

पायदळाचे लोक आवाडात धावत आले. टेलिफोन ऑपरेटर असलेली दोन चाकांची गाडी फाटकाशी येऊन थांबली.

'चलते रहो !' जवळून घोडा फेकीत जाणारा अंमलदार गरजला. 'आ वासून उभं राहू नका !'

दोन बायका आणि लांब काळा कोट घातलेला एक म्हातारा तिथे आले. झारकोवच्याभोवती चटकन लहानशी गर्दी गोळा झाली. त्यांच्यात रेटारेटी करून पुढे गेलेल्या ग्रिगरीला दिसले की, त्याचा श्वासोच्छ्वास अद्याप चालू होता. अद्याप तो केंकाटत होता. त्याच्या शरीराला भयंकर कंप सुटला होता.

'उचला त्याला ! माणसं आहात का सैतान ?'

'बोंबलतोय कशाला ?' पायदळातील एका उंच सैनिकाने त्याला फटका-रले, 'उचला त्याला, उचला त्याला' अन् कुठं न्या ? तो मरायला लागलाय दिसत नाही ?'

'दोन्ही पाय गेलेत !'

'रक्त बघा !'

'स्ट्रेचरवाले कुठं गेले ?'

'ते काय दिवे लावणारैत ?'

'अजून शुद्धीवर आहे !'

पाठीमागून उन्युपिनने ग्रिगरीच्या खांद्याला स्पर्श केला.

'त्याला हलवू नको !' तो कुजबुजला. 'त्या बाजूला चल न् बघ !'

बाहीला धरून त्याने ग्रिगरीला ओढले आणि गर्दी बाजूला रेटली. ग्रिगरीने एक नजर टाकून घेतली. नंतर खांद्याना पोक काढून तो फाटकाकडे वळला. झार-कोवच्या पोटाखाली गुलाबी आणि निळा आतडी वाफाळली होती. वाळूत एक

लोळागोळा फुगारत होता. त्या पलीकडे अवस्था लागलेल्या माणसाचे हात जमीन खरवडत होते.

'त्याचं तोंड झाकून टाका !' कुणीतरी सुचवले,

झारकोवने एकाएकी एका हातावर स्वत:ला उंचावले. खांद्याच्या दोन पात्यांच्या मधोमध लोंबेपर्यंत त्याने डोके मागे फेकले आणि खरखरीत अमानुष आवाजात तो किंचाळला,

'भाऊ, मारुन टाका मला ..! भाऊ ! बघत काय उभे राहिलात रे ? आह् ! आह् ! भाऊ मारून टाका मला !'

२१.

रेल्वेचा डबा हळुवार आंदुळत होता आणि त्याच्या चाकांच्या नादात जोजावते पेंगुळले—पण होते. कंदिलातून प्रकाशाची पिवळी फीत ओघळली होती. बूट काढून आणि पायाना मोकळीक देऊन ताणून आडवे होण्यात, आपल्यावर कोणतीही जबाबदारी नाही ही जाणीव होण्यात आता जिवाला कोणताही धोका भेडसावीत नाही आणि मरण दूरवर राहिलेले आहे ही जाणीव होण्यात एक सुख होते. चाकांची बदलती खडखड ऐकण्यात विशेष सुख होते. कारण त्याच्या प्रत्येक गिरकीगणिक, इंजिनाच्या प्रत्येक खेचेगणीक आघाडी अधिकाधिक दूर पडत चालली होती. ग्रिगरी आपल्या मोकळ्या पायांचे चवडे एकमेकांवर चोळीत आणि ताज्या स्वच्छ कपड्यानी अवघ्या देहाला सुखवीत चाकांचा आवाज ऐकत पडला होता. त्याला असे वाटत होते की एक घाणेरडी कात आपण टाकून दिली आहे आणि निष्कलंक स्वच्छतेने एका नवीन जीवनात प्रवेश करीत आहोत !

त्याच्या डाव्या डोळ्यांतील वेदनेनेच केवळ त्याच्या शांत प्रशांत आनंदात व्यत्यय येत होता. मधून मधून ती वेदना नाहीशी होत होती पण परत अचानक उसळून यायची. त्याने डोळा जळू लागे आणि बांधलेल्या पट्टीखालून अनिच्छया पाणी वाहू लागे.

कामेनका स्त्रुमिलोवो ह्या गावच्या फौजी इस्पितळात एका तरुण यहुदी

डॉक्टराने त्याचा डोळा तपासून कागदाच्या कपट्यावर काहीतरी लिहिले.

'तुम्हाला पिछाडीच्या इस्पितळात जायला हवं. तुमच्या डोळ्याची अवस्था अतिशय खराब आहे.'

'डोळा जाईल काय डॉक्टर ?'

'असं का तुम्हाला वाटतं ?' ग्रिगरीच्या स्वरातील अनावृत भय ओळखून डॉक्टराने हसत विचारले. 'पण त्याच्यावर इलाज करून घेतलेच पाहिजेत कदाचित ऑपरेशन करावं लागेल. आम्ही तुम्हाला पेट्रोग्राड किंवा मॉस्कोला पाठवतो.'

'मेहेरबानी !'

'घाबरू नका ! तुमचा डोळा ठीक होईल !' त्याने ग्रिगरीच्या खांद्यावर थाप मारली आणि हळूच त्याला व्हरांड्यात ओढले. वळता वळता त्याने बाह्या वर दुमडून ऑपरेशनची तयारी सुरू केली

बराच वेळ वाट बघितल्यानंतर ग्रिगरीला इस्पितळाच्या गाडीत जागा मिळाली. ती प्रसन्न शांतता उपभोगीत तो दिवसच्या दिवस पडून राहिला होता. डब्यांची लांबलचक साखळी ओढण्यासाठी गाडीचे पुरातन इंजिन आपली सर्व शक्ती पणाला लावीत होते. ते मॉस्कोजवळ आले आणि रात्री मुक्कामाला पोचले. गंभीर 'केसेस' स्ट्रेचरवर घालून नेण्यात आल्या. ज्याना चालता येत होते त्यांचा घोळका फलाटावर जमवण्यात आला. गाडीच्या बरोबर आलेल्या डॉक्टरने ग्रिगरीचे नाव पुकारले आणि त्याला एका नर्सच्या ताब्यात देऊन त्याने तिला सूचना दिल्या. डॉ. स्नेगिन्योव ह्यांचे नेत्र रुग्णालय, कलपाचनय् गल्ली.

'तुमच्याजवळ काही सामानबिमान आहे का ?' नर्सने विचारले.

'कझाकाजवळ काय सामान असेलसं वाटतं ? एक फर्गोल आणि एक फौजी थैली ! बस्स. !'

'माझ्या मागोमाग या !'

आपल्या कपड्यांची फडफड करीत नर्स त्याला स्टेशनाबाहेर घेऊन गेली. ग्रिगरी अनिश्चितपणे तिच्या मागोमाग चालला होता. ते एका गाडीत बसले. त्या प्रचंड शहराचा गोंगाट, ट्रामच्या घंटाचा ठणठणाट, विजेच्या दिव्याची निळसर दीप्ती ह्याचा त्याच्या मनावर विदारक परिणाम झाला. गाडीच्या मागे तो रेलून बसला होता. गजबजलेल्या रस्त्यात चौकसपणे बघत होता आणि बाजूला बसलेल्या स्त्रीच्या शरीराची उद्दीपित करणारी ऊब जाणवून त्याला चमत्कारिक वाटत होते. मॉस्कोत शरदऋतू आला होता. प्रच्छाय मार्गावर झाडांची पाने रस्त्यावरील

दव्याच्या उजेडात पिवळट चमकत होती. रात्रीच्या हवेत हिवाळ्याचा गारठा होता. फरसबंदी चकाकत होती. डोक्यावरच्या चांदण्यात शारदीय नितळता आणि थंडपण होते. शहराच्या केंद्र भागातून ते एका निर्मनुष्य गल्लीत वळले. दगडी फरसबंदीवर घोड्याचे नाल खडखडत होते. लांब निळा कोट घातलेला मोतद्दार आपल्या उंच आसनावर डुलत होता आणि लगामाची टोके आपल्या घोडी पुढे तो नाचवीत होता. दूरवरून एंजिनाची शिट्टी ऐकू येत होती. 'कदाचित डॉनकडं गाडी निघाली असेल !' तळमळीने पराण्या लागलेल्या ग्रिगरीच्या मनात विचार आला.

'झोप आली काय ?' नर्सने विचारले.

'नाय !'

'आपण लौकरच तिथं पोचू !'

'काय हवं ?' गाडीवाल्याने मागे वळून विचारले.

'लौकर हाक !'

लोखंडी अडवणामागे डबक्यातील पाणी चमकत होते. कठडेबंदी केलेल्या एका पडतोऱ्याकडे आणि त्याला बांधून ठेवलेल्या नावेकडे ग्रिगरीची नजर गेली. हवेत दमटपणाचा वास होता.

'इथं पाणीसुद्धा गजाआड ठेवतात ! आमच्या डॉनसारखं नाय !' ग्रिगरीच्या मनात विचार तरळून गेला. गाडीच्या रबरी धावाखाली पाने करकरत होती.

तीन मजली घरासमोर ते थांबले. ग्रिगरीने खाली उडी मारली.

'हात द्या मला !' त्याच्याकडे वाकून ती नर्स म्हणाली, तिचा लहानसा मऊ हात त्याने हातात घेऊन तिला उतरायला मदत केली.

'तुम्हाला सैनिकाच्या घामाचा वास येतोय !'

टापटिपीचा पोशाख केलेली नर्स प्रवेशद्वाराकडे जात शांतपणे हसली आणि तिने घंटी वाजवली.

'त्या तिकडं काही दिवस काढायला हवेत तुम्ही नर्सबाई, मग तुमच्याही अंगाला आणखी कसली घाण येईल !' दबलेल्या रागाने ग्रिगरीने उत्तर दिले.

दारवानाने दार उघडले. सोनेरी मुलामा दिलेल्या कठड्याचा जिना चढून ते पहिल्या मजल्यावर गेले. नर्सने परत एकदा घंटी वाजवली मग पांढरा एप्रन घातलेल्या बाईने त्याना आत सोडले. तिथल्या एका गोल मेजाजवळ ग्रिगरी

बसून राहिला. पांढरा एप्रन घातलेल्या त्या बाईजवळ ती नर्स काहीतरी कुज-बुजली. त्या बाईने काहीतरी लिहून घेतले.

लांब नि रुंद बोळकंडीच्या दुतर्फा असणाऱ्या दरवाजापाशी निरनिराळ्या रंगांचे चष्मे घातलेले लोक दिसत होते.

'कोट काढा!' पांढऱ्या एप्रनवाल्या बाईने सांगितले.

काही मिनिटानी एक अडली आला. त्यानेही पांढरे कपडे घातलेले होते. त्याने ग्रिगरीचा कोट घेतला आणि तो त्याला न्हाणीघराकडे घेऊन गेला.

'सगळे कपडे काढा!'

'कशासाठी ?'

'तुम्हाला आंघोळ करायला हवी!'

ग्रिगरी कपडे काढीत न्हाणीघरात चौबाजूला विस्मयाने बघत होता. तावदानाच्या खिडक्या न्हाणीघराला बसवलेल्या होत्या. त्या तावदानावर बाहेरून बर्फ गोठून बसला होता. अडलीने टबात पाणी भरले. त्याचे तपमान मोजले आणि ग्रिगरीला आत पाऊल टाकायला सांगितले.

'हे टब माझ्या कामाचं नाय.' आपला काळेजलेला पाय टबात ठेवीत ग्रिगरी पुटपुटला.

खसखसून आंघोळ करण्यात अडलीने त्याला मदत केली. मग त्याने त्याला टॉवेल, कपडे, सपाता आणि करडा पट्ट्याचा पायघोळ कबा दिला.

'माझ्या कपड्यांचं काय ?' ग्रिगरीने चकित होऊन विचारले.

'इथं असेपर्यंत तुम्ही हे कपडे घालायचे. इस्पितळातून काढून टाकल्यावर तुमचे कपडे तुम्हाला परत मिळतील.'

भिंतीला बसवलेल्या आरशाजवळून जाताना ग्रिगरीने स्वतःला ओळखले नाही. उंच यष्टी, काळगेला चेहरा, उभटलेली गालफडे, गालावरील आरक्त दळे, दाढी मिशांचे झुडतर, अंगावर पायघोळ कबा, पट्टीखाली दडपले गेलेले काळे केस— ह्या माणसाचे पूर्वीच्या ग्रिगरी मेलिखोवशी फक्त सुदूर साम्य होते. 'जास्त तरुण झालोय मी!' मनात विचार येऊन त्याने स्वतःशीच म्लान स्मित केले.

'सहावं वार्ड! उजवीकडचा तिसरा दरवाजा!' चपराशाने त्याला सांगितले.

त्या प्रशस्त शुभ्र खोलीत ग्रिगरीने प्रवेश करताच इस्पितळाचा झगा घातलेला पाद्री अर्धवट उठल्यासारखा झाला.

'कोण, शेजारी का ? आनंद झाला आपल्या भेटीनं. एकमेकाना आपली

सोबत होईल मी झाराईस्कचा.' ग्रिगरीपुढे खुर्ची करीत त्याने मनमिळाऊपण सांगून टाकले.

थोड्याच मिनिटानी थोराड, सुमार चेहऱ्याच्या एका विशाल नर्सने दरवाजा उघडला.

' मेलिखोव, आम्हाला तुमचा डोळा बघायचाय?' खोल खर्जाच्या आवाजात ती म्हणाली आणि त्याला वाट करून देण्यासाठी बाजूला सरकून उभी राहिली.

२२.

आघाडीच्या नैर्ऋत्येला दणदणीत रिसाला हल्ला चढविण्याचा लष्करी कचेरीने निर्णय घेतला. गनिमाची फळी फोडायचा, त्याचे दळणवळण तोडायचा आणि पिछाडीकडून झपाट्याने धाडी घालून त्याच्या सैन्याची दाणादाण उडविण्याचा ह्यात डाव होता. ह्या मनसुब्यावर लष्करी अधिकाऱ्यांची फार मोठी मदार होती आणि रिसाल्याचा जंगी फौजफाटा ह्या प्रदेशात एकवटण्यात आला. यवगेनी लिस्तनित्स्कीचे रेजिमेन्ट ह्यात होते. ऑगस्टच्या अठ्ठावीस तारखेला हल्ला सुरू होणार होता. पण वादळी पावसानें तो दुसऱ्या दिवसापर्यंत पुढे ढकलावा लागला.

चढाईची तयारी म्हणून विस्तीर्ण प्रदेशावर डिव्हिजन फैलावण्यात आले.

सुमारे पाच साडेपाच मैलावर उजव्या फळीच्या पायदळाने गनिमाच्या आगंलाला आकर्षित करण्यासाठी चुणुकेचा हल्ला चढवला. एका रिसाल्याचा काही भाग हुलीच्या दिशेने रवाना करण्यात आला.

लिस्तनित्स्कीच्या रेजामेन्ट समोर गनिमाची नाव निशाणी नव्हती. सुमारे पाच सव्वापाच कोस अंतरावर यवगेनीला निर्मनुष्य अलंगओळी दिसत होत्या. आणि त्यांच्या मागे वाऱ्यावर वहात जाणाऱ्या निळसर पहाट धुक्यात रायचे शेत झुळझुळत होते. हल्याची तयारी चालू असताना गनिमाला त्याची वार्ता कळली असली पाहिजे कारण रातोरात तो सुमारे चार मैल मागे सरकला होता. हल्लेखोराना सतावण्यासाठी मशीनगन्सच्या जंग्या तेवढ्या त्याने मागे ठेवल्या होत्या.

भारावलेल्या जलधरांआडून सूर्य वर येत होता. ती सबंध कंदरा मलईदार

पिवळ्या धुक्यात न्हाऊन गेली होती. चढाई सुरू करण्याचा हुकूम आला आणि रेजीमेन्टस्नी कूच केले. हजारो घोड्यांच्या टापानी असा घनगंभीर घोष झाला की तो जणू काही भूगर्भातून येत होता. घोडे चौखूर उधळू नये म्हणून लिस्तनित्स्की लगाम ताणीत होता. पाच एक फर्लांग काटले गेले आणि हमला करणाऱ्या दळभाराची सफेबस्ती धान्याच्या शेताजवळ आली. राय अर्ध पुरुषाहून जास्त उंच फोफावले होते आणि रानवेलीचे आणि रानगवताचे गचपण माजलेले होते. त्यामुळे रिसाल्याचे आगेकूच कमालीचे जिकिरीचे झाले होते. त्यांच्या पुढ्यात रायचे लालेलाल तुरे डुलत होते. त्यांच्या मागे ते टापानी तुडवून चोळा मोळा होऊन पडले होते. असल्या प्रकारची रपेट सुमारे दोन अडीच मैल केल्यावर घोडी अडखळू आणि घामाने डबडबू लागली. पण तरीही गनिमाची अद्याप नावनिशाणी नव्हती लिस्तनित्स्कीने आपल्या स्क्वाड्रन कमांडरकडे नजर टाकली. कॅप्टनच्या चेहऱ्यावर मूर्तिमंत निराशा पसरली होती.

चार मैलांच्या भयंकर जिकोरीच्या रपेटीने घोड्यांची शक्ती शोषून घेतली. काही घोडी स्वारांच्या मांड्यांखालीच कोसळली. अगदी दणकटातील दणकट जनावरेही धडपडत होती. चालते राहण्यासाठी आपली सर्व ताकद ती पणाला लावीत होती. आता ऑस्ट्रियन मशिनगन्स आपले काम बजावू लागल्या. काड-तुसांचा गारा वर्षाव त्यानी उधळला. बंदुकीची करोळी सुरू झाली. त्या प्राणघातक आग्येलाने बिनीचे सफे नेस्तनाबूद करून टाकले. सगळ्यात आधी कच खाऊन मागे वळले ते भालाइताचे रेजिमेंट. कझाकाचे रेजिमेन्ट विस्कळीत झाले. मशिनगन्सच्या काडतुसाच्या धुवांधाराने त्याना असे पिटले की घबराट उडून त्यांची पळापळ सुरू झाली. हायकमांडरच्या अक्षम्य हलगर्जीपणाने ह्या असा-धारण पल्लेदार हमल्याचा संपूर्ण पराभव होऊन तीन तेरा वाजले. काही रेजिमेन्टचे निम्मे मनुष्यबळ आणि घोडे कामी आले. एका लिस्तनित्स्कीच्याच रेजीमेन्टचे चारशे कझाक आणि सोळा अंमलदार ठार किंवा जखमी झाले.

लिस्तनित्स्कीचा स्वतःचा घोडा मांडीखाली मारला गेला. तो स्वतः डोक्यात आणि पायात जखमी झाला एका सार्जंट मेजरने घोड्यावरून उडी घेतली. त्याला उचलून आपल्या खोगिराच्या मुदीवर टाकला आणि त्याला घेऊन तो दौडत मागे पळून गेला.

त्या डिव्हिजनचा सेनापती स्टाफ कर्नल गोलोवाचेव ह्याने त्या हल्ल्याची अनेक छायाचित्रे घेतली आणि नंतर ती काही अंमलदाराना दाखवली. एका जखमी लेफ्टनंटने त्याच्या थोबाडावर गुद्दा हाणला आणि त्याला स्वतःला रडू कोसळले.

नंतर कझाक गोलोवाचेवच्या अंगावर धावून गेले आणि त्याची त्यानी लक्तरे लोंबवली. त्याच्या मुड्याची बराच वेळ त्यानी विटंबना केली आणि अखेरीस रस्त्याच्या कडेला असणाऱ्या खंदकाच्या चिखलात त्यानी ते मढे फेकून दिले. ह्या ढळढळीत नामुष्कीच्या चढाईची ही अशी इतिश्री झाली

वॉर्सामधील इस्पितळातून यवगेनीने आपल्या वडिलाना लिहिले की, आपल्याला रजा मिळालेली असून आपण यागोदनोएला परत येत आहोत.

म्हाताऱ्याने खोलीत स्वत:ला कोंडून घेतले आणि दुसऱ्या दिवशी तो प्रक्षुब्ध अवस्थेत बाहेर पडला. तुरकी चालीची घोडी 'द्रोझकी' ला जुंपण्याचा त्याने निकितिचला हुकूम सोडला. आपली न्याहरी त्याने उरकली आणि तो द्रोझकीत बसून व्येशेनस्कायाला गेला. तिथून त्याने पोराला तारेने चारशे रूबल्स पाठविले आणि लहानसे पत्र पाठवले.

लाडक्या,

तुझी अग्निदीक्षा तुला मिळाली ह्याचा मला आनंद होतो. कुळवंताची जागा तिथेच आहे. राजवाड्यातून नाही. तू अतिशय सचोटीचा आणि हुशार असल्याने मुर्दाड मनाने थुंक्या झेलीत बसणे तुला जमणार नाही. आपल्या घराण्यात कुणी तसे केलेले नाही. ह्याच कारणाने तुझे आजोबा हुजूर मर्जीतून उतरले आणि यागोदनोएत त्यानी देह ठेवला. बाजशहाच्या मेहेरनजरेची त्यानी आशा केली नाही की वाट पाहिली नाही. यवगेनी, स्वत:ची काळजी घे आणि बरा हो.

लक्षात ठेव की जगात तूच माझे सर्वस्व आहेस. तुझ्या आत्याने आशीर्वाद कळविले आहेत. ती खुशाल आहे. माझ्याबद्दल म्हणशील तर लिहिण्यासारखे काही नाही. मी कसा जगतो ते तू जाणतोसच. आघाडीवर जे काही चाललंय ते कसं काय चालू शकतंय ? सामान्य अक्कल असलेली माणसं आपल्याकडे नाहीत हे शक्य आहे का ? वर्तमानपत्रातील बातम्यांवर माझा विश्वास नाही. त्या सगळ्या थापा असतात असा माझा गतकाळचा अनुभव आहे. यवगेनी, आपण ही मोहीम हरण्याची शक्यता आहे का ? मी घरी तुझी आतुरतेने वाट बघत आहे.'

म्हाताऱ्या लिस्तनित्स्कीच्या आयुष्यात लिहिण्यासारखे खरेच काही नव्हते. पूर्वीसारखेच ते रखडत चालले होते. मजुरीचे दर वाढले होते आणि दारूची चणचण होती इतकेच. ह्या मालकाचे मद्यपान वाढले होते. तो जास्त चिडखोर आणि निमित्तखोर झाला होता. एक दिवस त्याने आक्सिनियाला बोलावून घेतले आणि तक्रार केली.

'तू तुझं काम करीत नाहीस काल नाष्टा थंडगार का होता ? कॉफीचा ग्लास नीट धुतलेला का नव्हता ? परत असं झालं तर कामावरून काढून टाकीन. मला गैंदीपणा चालत नाही, ऐकलंस ?'

आक्सिनियाने ओठ घट्ट आवळून धरले आणि तिला रडू कोसळले.

'निकोलाय अलेक्सिएविच ! माझी पोर आजारी आहे. तिच्याकडं बघायला मला वेळ द्या. मला तिला सोडून जाता येत नाय !'

'काय झालंय पोरीला ?'

'ती गुदमरत्येयसं वाटतं !'

'काय ? लालताप ? आधी का नाही बोललीस मूर्खे ? धावत जा नं निकितिचला म्हणावं गाडी घेऊन व्येशेनस्कायाला जा न् डॉक्टरला घेऊन ये. पळ !'

आक्सिनिया धावत बाहेर गेली. म्हातारा आपल्या खोल खर्जाच्या स्वरात भडीमार करीतच होता.

'मूर्ख बाई ! मूर्ख बाई ! मूर्ख !'

दुसऱ्या दिवशी सकाळी निकितिच डॉक्टरला घेऊन परत आला.

त्या बेहोश तापलेल्या पोरीला त्याने तपासले आणि आक्सिनियाच्या विनवण्याना उत्तर न देता तो सरळ मालकाकडे गेला. म्हाताऱ्याने चाफेखणीत त्याची भेट घेतली.

'हं ! काय झालंय पोरीला ?' बेफिकिरीने मानेला झटका देत डॉक्टरच्या नमस्काराचा स्वीकार करीत त्याने विचारले.

'लाल ताप, हुजूर !'

'बरी होईल का ? काही आशा ?'

'फारच थोडी. ती मरायला लागल्येय. तिचं वय तरी पहा !'

'मूर्ख आहेस !' म्हातारा काळानिळा होऊन म्हणाला. 'वैद्यक कशाला शिकलास ? बरी कर तिला !' डॉक्टर समोर उभा असताना त्याने धाडकन दरवाजा लावून घेतला आणि तो दिवाणखान्यात शतपावली घालू लागला.

दारावर टकटक करून आक्सिनिया आत आली. 'व्येशेनस्कायाला जायला डॉक्टरला घोडे हवेत !'

म्हातारा टाचेवर गर्रकन वळला.

'त्याला म्हणावं की तू मठ्ठोबा आहेस ! पोर बरी झाल्याशिवाय त्यानं ही जागा सोडून जायचं नाही म्हणून सांग त्याला ! त्याला एक खोली दे !

मनसोक्त चार त्याला ! पण त्यानं जाता कामा नये !' आपली हाडे निघालेली मूठ परजीत तो ओरडला.

ढांगा टाकीत तो खिडकीपाशी गेला आणि मिनिटभर त्याने बोटाने तबला वाजवला. नंतर दाराच्या कडेवर बसलेल्या आपल्या मुलाच्या बालपणातील फोटोसमोर तो उभा राहिला. दोन पावले मागे सरकून तो रोखून त्या फोटोकडे बघत उभा राहिला. जणूकाही ते मूल त्याला ओळखूच येत नव्हते असा तो बघत होता.

आपली पोर आजारी पडल्याबरोबर आक्सिनियाने मनाशी खूणगाठ बांधली की नतालियाला आपण उणेदुणे बोललो म्हणून देव आपल्याला शिक्षा करतोय. पोरीच्या जिवाच्या भयाने चूर होऊन तिचा स्वत:वरचा ताबा सुटला. ती भ्रमिष्टा-गत इकडे तिकडे करू लागली. तिच्याने काम होईना. 'नाय, देव तिला घेऊन नाय जायचा !' हा रसरसलेला विचार तिच्या डोक्यात सतत घुमत होता. पोर मरेल ह्यावर ती विश्वास ठेवत नव्हती. आपल्या सर्व शक्तिनिशी ह्यावर विश्वास न ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. अंतिम दया दाखवण्याची–पोरीचे प्राण वाचवण्याची-देवाची करुणा बेभानपणे भाकीत होती.

पण तापाने तो चिमणा जीव गुदमरत होता. पोर ताठ उताणी पडली होती. तिच्या सुजलेल्या घशातून श्वास घरघरून धपापत येत होता. डॉक्टर दिवसातून चारदा तिच्याकडे येऊन जात होता. संध्याकाळी नोकरांच्या बराकीच्या पावलाणा-वर उभा राहून शरद ऋतूतील विखुरलेल्या थंड ताराकडे बघत धूर काढीत उभा रहात होता.

रात्रभर आक्सिनिया बिछान्यापाशी गुडघ्यावर बसून होती. पोरीच्या घरघरीने तिचे काळीज पिळवटत होते.

'आई...!' ते करपून गेलेले चिमणे ओठ कुजबुजले.

'माझ्या पिल्ला! माझ्या बछडे!' ती विव्हळू लागली, 'माझ्या फुला! नको ग जाऊ तान्या ! इकडं बघ वेल्हाळे ! तुझे इवले इवले डोळे उघड ! काळ्या काळ्या डोळ्यांची लाडली माझी ! देवा रे !'

मधून मधून ती पोर आपल्या सुजलेल्या पापण्या उघडायची आणि लालबुंद डोळ्यांची थरथरती नजर तिच्याकडे टाकायची. आई आधाशीपणे त्या नजरेकडे बघत होती. ती नजर आत्मगत, तळमळणारी शून्य होत होती.

आईच्या मिठीत तिचे प्राण गेले. त्या इवल्याशा मुखाने शेवटचा 'आ'कार केला. झटका येऊन तनू गदगदली. चिमुकले माथे आईच्या बाहूवर पडले

चिमुकल्या 'मेलिखोव' नेत्राची विस्मयचकित उदास नजरेने टक लागली !

तळ्याकाठी असणाऱ्या जुन्या चिनार वृक्षाखाली म्हाताऱ्या साशकाने लहानशी कबर खणली. शवपेटिका त्या कबरीकडे नेली आणि अस्वाभाविक गडबडीने ती मातीने झाकून टाकली. त्या चिखलाळ ढिगाजवळून आक्सिनिया केव्हा उठते ह्याची खूपवेळ सोशिकपणे तो वाट बघत राहिला. जास्त वेळ थांबणे अशक्य झाल्यावर त्याने फर्रकन नाक शिंकरले आणि तो तबेल्याकडे निघून गेला. त्याने ओडीकोलनची एक बाटली आणि 'सदोषीकरण' केलेल्या मद्याचा चंबू गव्हाणीतून काढला. ते मिश्रण उजेडाकडे उंच धरून तो पुटपुटत होता,

'आठवण म्हणून ! चिमण्या जिवाला स्वर्गाच्या राज्याचे दरवाजे खुले होऊ देत ! देवता मेल्येय !' त्याने ते पिऊन टाकले आणि खारवलेल्या मऊ टामाटोचा चावा घेत मस्तक आवेशाने घुसळले. नंतर स्निग्धपणे त्या बाटलीकडे बघत तो म्हणाला.

'मला विसरू नको लाडले आणि मी तुला कधी विसरणार नाही !' त्याच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले.

तीन आठवड्यानंतर यवगेनी लिस्तनित्स्कीने आपण घराकडे निघाल्याची तार पाठवली. त्याला आणण्यासाठी तीन घोड्यांची 'त्रोयका' गाडी स्टेशनावर पाठविण्यात आली. वाडीवरील प्रत्येकजणाची अधीरतेने नाचानाच चालली होती. विलायती कोंबडे आणि कादंब मारण्यात आले. म्हाताऱ्या साशकाने एक मेंढी सोलली. 'जंगी मेजवानीच्या' कार्यक्रमाएवढी कसून तयारी करण्यात आली. आदल्या दिवशी कामेन्स्काला गाड्या पाठविण्यात आल्या धाकटा मालक रात्री येऊन पोचला. गोठवणारा पाऊस पडत होता. दिव्यामुळे डबक्यातून चिमुकले पळपुटे किरण पडत होते. घंटा खुळखुळवीत घोडी पावलाणाशी आली. बंद टपाच्या गाडीतून भावक्षुब्ध झालेला यवगेनी हसत हसत बाहेर आला. आपला गरम पाणकोट साशकाच्या अंगावर फेकून किंचित लंगडणारा यवगेनी पायऱ्या चढून गेला.

वाटेतील खुर्च्या उडवीत त्याचे वडील त्याला भेटायला धावले.

जेवण घरात आक्सिनियाने पाने मांडली आणि आणि त्याना मेजाकडे बोलावण्याला ती गेली. तिने दाराच्या छिद्रातून पाहिले. म्हातारा मुलाला मिठ्या मारीत त्याच्या खांद्याचे मुके घेत होता. म्हाताऱ्याच्या गळ्याची लोंबणारी कातडी

थरथरत होती. थोडे मिनिट थांबून तिने परत पाहिले. आता जमिनीवर एक भला मोठा नकाशा पसरून यवगेनी गुडघ्यावर बसला होता. म्हातारा पाईपमधून फकाफका धुराचे लोट सोडीत होता. खुर्चीच्या हातावर बोटांचे सांधे आपटीत होता आणि संतप्त गर्जना करीत होता.

'अरे अलेक्सीएव ? हे शक्य नाही. माझा विश्वास बसत नाही.'

नकाशावरून बोटे फिरवीत यवगेनीने शांतपणे पटवून दिल्यागत उत्तर दिले.

म्हातारा आपल्या धीरगंभीर आवाजात म्हणाला, 'असं असेल तर सर-सेनापतीची चूक आहे ! दूरदृष्टीच्या नावानं भोपळा ! हे बघ यवगेनी, रूसो–जपानी मोहिमेतलं असंच एक उदाहरण तुला सांगतो. सांगू दे मला ! सांगू दे मला !

आक्सिनियाने दारावर टकटक केले.

'अरे पानं घेतलीसुद्धा ? आलोच !'

म्हातारा बाहेर आला तो उद्दिपित आणि आनंदी दिसत होता. त्याचे डोळे टवटवीतपणे चमकत होते. आदल्याच दिवशी जमिनीतून काढलेली मद्याची बाटली त्याने संपवली. त्या बाटलीच्या शेवाळाने हिरवटलेल्या लेबलावर १८७९ हा आकडा अस्पष्ट दिसत होता. त्याना वाढीत असताना आणि त्यांच्या आनंदी मुद्रा न्याहाळताना तिला आपले स्वतःचे एकाकीपण जास्तच तीव्रतेने जाणवत होते एक निराश्रू तळमळ तिला छळत होती. पोर मेल्यानंतर तिला रडावेसे वाटत होते पण अश्रू येईनातच. एक आक्रोश तिच्या कंठाशी आला होता पण तिचे डोळे कोरडे होते आणि ह्या दगडी शोकाने ती दुप्पट भारावून गेली होती. खूप वेळ ती. झोपून राही. पेंगुळलेल्या शून्यतेत ती दिलासा शोधीत होती. पण झोपेतही पोरीची हाक तिला ऐकू येई. ते अर्भक बाजूला झोपलेले आहे अशी तिची कल्पना व्हायची. आणि कुशीला वळून ती अंथरूण चाचपडू लागायची. 'आई...आई !' अशी कुजबूज ऐकू येऊन 'माझ्या लाडले !' असा जबाब तिच्या गारठलेल्या ओठातून येत असे. दिवसाच्या जुलमी प्रकाशातसुद्धा तिला कल्पनेत असे वाटायचे की पोर आपल्या मांडीवर आहे आणि तिचे कुरळ्या जावळाचे मस्तक थोपटायला आपला हात जातोय असे तिच्या ध्यानात येई.

आपल्या आगमनानंतर तिसऱ्या दिवशी यवगेनी म्हाताऱ्या साशकाबरोबर तबेल्यात चांगली रात्र पडेपर्यंत बसून होता. पूर्वीच्या काळी डॉन कझाक कसे स्वच्छंदी जीवन जगत त्याबद्दलच्या रटाळ गोष्टी साशका त्याला सांगत होता

नऊ वाजता यवगेनी तिथून बाहेर पडला. आवाडातून जोराचे वारे सुटले होते. पायाखाली राड लसलसा रपकत होती. पिवळ्या मिशांचा पाडा चांद ढगातून हुंदडत होता त्याच्या प्रकाशात यवगेनीने आपल्या घड्याळाकडे नजर टाकली आणि नोकरांच्या बराकीकडे तो वळला. पावलाणापाशी सिगरेट पेटविण्यासाठी तो थांबला. क्षणभर विचार करीत उभा राहिला. मग खांदे उडवून ठामपणे पायऱ्या चढू लागला. सावधगिरीने त्याने कोयंडा उचलून दार उघडले आणि आक्सिनियाच्या खोलीत जाऊन काडी उजळली.

'कोणाय ?' अंगावर ब्लँकेट ओढून घेत तिने विचारले.

'मीच आहे !'

'मी एका मिनिटात कपडे करते !'

'तसदी घेऊ नको ! मी उगीच मिनिट दो मिनिट थांबणारै !'

त्याने आपला ओव्हरकोट काढून फेकून दिला आणि पलंगाच्या कडेला तो बसला.

'तुझी लहानगी पोर गेली तर . . . !'

'होय ती गेली !' प्रतिध्वनि उमटावा असा तिने उद्‌गार काढला.

'तू खूप बदलून गेल्येस ! पोर गमावल्यानं तुला काय वाटलं असेल ते मी ओळखू शकतो ! पण मला वाटतं तू व्यर्थ स्वतःचा छळवाद मांडलायस ! तुझ्याच्यानं काही तिका परत आणता येणार नाही ! आणि पोर व्हायच्या दृष्टीनं तर तू अगदी तरुण आहेस ! स्वतःला सावर आणि झालेली नुकसानी 'मानून' घे ! काही झालं तरी तू काही सर्वस्व गमावलेलं नाहीस ! सगळं आयुष्य तर पुढंच आहे !'

आपल्या आवाजातील खर्ज खेळवीत त्याने तिचा हात दाबला आणि लाडाने तरीही अधिकारयुक्ततेने तो थोपटला. कुजबुजावे असा त्याने आवाज खाली आणला आणि आक्सिनियाचे गुदमरते रडे ऐकून तो तिच्या ओल्या गालाचे आणि डोळ्याचे मुके घेऊ लागला.

अनुकंपा आणि प्रेमळपणा ह्यानी बाईचे मन शरण जाणारे असते. आपल्या वैफल्यानं खचून गेलेली आक्सिनिया आपण काय करतोय हे न जाणवून तीव्र आणि दीर्घकाळ सुप्तावस्थेत असलेल्या वासनानी त्याच्या स्वाधीन झाली ! पण सुखाची अभूतपूर्व संहारक आणि पागल लाट ओसरल्यावर ती भानावर आली आणि तिच्या तोंडून भेदक किंकाळी उमटली !

विवेकाची आणि शरमेची सर्व जाणीव नष्ट होऊन तिने फक्त खमिसात

अर्धनग्न अवस्थेत पावलाणाकडे धाव घेतली. दार तसेच उघडे टाकून यवगेनी तिच्या पाठोपाठ गडबडीने आला. ओव्हरकोट अंगावर ओढून घेत तो चालता झाला.

घराच्या गच्चीकडे जाणाऱ्या जिन्याच्या पायऱ्या चढून जाताना त्याने हर्षाने आणि तृप्ततेने स्मित केले.

आपली मऊ गुबगुबीत छाती चोळीत बिछान्यावर पडल्या पडल्या त्याच्या मनात विचार येत होते—

'मी जे काही केलं ते सचोटीच्या माणसाच्या दृष्टीकोनातून लांच्छनास्पद आणि अनैतिक आहे. ग्रिगरी—! माझ्या शेजाऱ्यावर मी दरोडा घातला. पण काही झालं तरी आघाडीवर मी माझे प्राण धोक्यात घातले होते. काडतूस किंचित उजवीकडे आलं असतं तर माझ्या मस्तकातून आरपार गेलं असतं आणि आज किड्या मुंग्यांच्या भक्षस्थानी पडलो असतो. आलेला प्रत्येक क्षण उत्कटतेनं जगणं आजकाल माणसाला भाग आहे. मला काहीही करण्याची मुभा आहे.'

आपल्या स्वत:च्याच विचारानी तो क्षणभर भयभीत झाला. पण हल्ल्याचा तो भयानक क्षण, आपल्या ठार झालेल्या घोड्याच्या अंगावरून आपण कसे उठलो. आणि गोळी लागून परत कसे कोसळलो ह्याचे चित्र त्याने त्याच्या कल्पनेने स्वत:पुढे परत साकार केले.

झोपी जाता जाता त्याने ठरवून टाकले. 'उद्या वेळ भरपूर आहे पण ही वेळ विश्रांतीची आहे.'

दुसऱ्या दिवशी सकाळी जेवण घरात आपल्याबरोबर आक्सिनिया एकटीच आहे असे पाहून तो तिच्याजवळ गेला. त्याच्या चेहऱ्यावर ओशाळे हसू होते. पण भिंतीत अंग चोरीत हात पुढे पसरीत, त्याला चटके द्यावे असे ती कुजबुजली 'चालता हो सैताना!'

आपले अलिखित अधिनियम जीवन माणसाला पाळायला भाग पाडीत असते. तीन दिवसानी यवगेनी रात्रीचा परत आक्सिनियाकडे गेला.

आणि तिने त्याला नकार दिला नाही!

२३

नेत्र रुग्णालयाला लागून एक लहानसा बगीचा होता. मॉस्कोच्या नगरवेशीवर असे अनेक छाटलेले अनाकर्षक बगीचे होते की, शहराच्या दगडी अडसभडस रुक्षतेतून जिथे डोळ्याना विसावा असा सापडत नव्हता आणि त्यांच्याकडे बघताना जंगलाच्या रासवट स्वातंत्र्याची आठवण जास्तच तीव्रतेने आणि दुःखाने होत होती. रुग्णालयाच्या बगिच्यावर पतझडीचे अधिराज्य होते. नारिंगी आणि ब्राँझ रंगाच्या पाचोळ्याने वाटा झाकून टाकल्या. गोठवत्या पहाटथंडीने फुले चोळामोळा करून टाकली आणि गवताच्या पुंजक्याना हिरव्या पाणरंगात बुडवून टाकले. हवा निरभ्र असेल त्या दिवशी सश्रद्ध मॉस्कोच्या गिरजाघरातून येणारे घंटानाद ऐकत रोगी पायवाटेवरून हिंडत फिरत. हवा जेव्हा खराब असेल (आणि त्या वर्षी असे पुष्कळ दिवस होते) त्या दिवशी ह्या खोल्यातून त्या खोल्यात हिंडत किंवा स्वतःला आणि एकमेकांना कंटाळवीत गुपचुप बिछान्यात पडून रहात.

रुग्णालयात नागरी रोग्यांची संख्या जास्त होती आणि जखमी सैनिकांची सोय एकाच खोलीत करण्यात आली होती. असे पाचजण होते. उंचापुरा आणि लाल तोंडाचा, निळ्या डोळ्यांचा, नीटस कापलेली दाढी ठेवलेला यान वारेइकिस हा लाटव्हिअन; व्लादिमीर प्रांतातील इवान व्रुब्लेव्स्की हा देखणा बारगीर; कोसीख हा सैबेरियन बंदूकधारी सैनिक; बुरदिन नावाचा एक चळवळ्या, बुटका, पांढूर सैनिक आणि ग्रिगरी. सप्टेम्बरअखेर ह्यात आणखी एकाची भर पडली.

आपला दुपारचा चहा ते घेत असताना त्यांच्या कानी घंटीचा पल्लेदार आवाज आला. ग्रिगरीने बाहेरच्या बोळकंडीत डोकावून पाहिले. तीन माणसानी दिवाणखान्यात प्रवेश केला होता. एक नर्स. एक लांब कॉकेशन कोट घातलेला माणूस. त्याने तिसऱ्या माणसाला बगलेत पकडले होते. त्या माणसाचा गलिच्छ सैनिकी फर्गोल आणि छातीवर पडलेले गर्द तांबडे डाग हे सूचित करीत होते की तो स्टेशनावरून नुकताच आलेला आहे.

त्याच दिवशी सायंकाळी त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली. झटपट तयारी झाली (शस्त्रक्रियेची हत्यारे उकळल्याचे आवाज वार्डातून येत होते.) मग त्याला शस्त्र-

क्रियेच्या दालनात नेण्यात आले. थोड्याच मिनिटानी इतर रोग्याना गाण्याचा दबलेला आवाज ऐकू आला. त्याला भूल दिलेली होती आणि गोळ्याचे तुकडे शिरून ठिकऱ्या उडालेल्या डोळ्याचे अवशेष सर्जन काढून टाकीत असताना तो गात होता, बोध न होणाऱ्या शिव्या देत होता. शस्त्रक्रिया झाल्यावर त्याला वार्डात आणण्यात आले. भूल उतरल्यावर त्यानें इतराना माहिती दिली की जर्मन आघाडीवर आपण जखमी झालो. आपले नाव गारांझा आणि तो मशीनगनवाला होता. चेर्निगोव प्रांतातील तो युक्रेनी होता. ग्रिगरीशी त्याची विशेष मैत्री झाली.

ग्रिगरीची खाट त्याच्या शेजारीच होती. संध्याकाळची तपासणी होऊन गेल्यावर ते हलक्या आवाजात बराच वेळ बोलत रहात.

'मग काय कझाक, कसं काय?'

'नाकात दोन पाय!'

'डोळा जाणार का?'

'सुया मारून घेतोय!'

'किती मारल्या?'

'आतापर्यंत अठरा!'

'दुखतंय?'

'नाय! सुखतंय!'

'डोळाच काढून टाकायला सांग!'

'कशाला? सगळ्यानीच एकडोळ्या व्हायचं असं काय लिहिलेलं नाय!'

'खराय!'

'ग्रिगरीचा काविळी नजरेचा, दुख धरलेल्या मनाचा शेजारी सगळ्या गोष्टींवर असंतुष्ट होता. सरकार, युद्ध, स्वतःचे नशीब, रुग्णालयातील अन्न. सैपाकी, डॉक्टर, जिभेवर जे येईल त्याला तो शिवीगाळ करीत होता.

'तू, मी, आपण सगळे कशाला लढाईवर गेलो?'

'इतर गेले त्याच कारणानं आपण गेलो!'

'नीट सांग मला!'

'चल हट्!'

'हॅः! तू मूर्ख! तुझ्यासाठी परत सगळं स्वंथ करायला हवं. आपण लढतोय ते भांडवलदारांसाठी! समजत नाही! भांडवलदार म्हणजे फळझाडावरची पाखरं.'

आपल्या बोलण्याला सर्रास शिवीगाळीचा मीठमसाला लावून त्याने ग्रिगरीला कठीण शब्दांचे अर्थ समजावून दिले.

'इतक्या झराझरा बोलू नको. मला तुझी युक्रेनी बोली समजत नाय. सावकाश बोल !' ग्रिगरी त्याला अडवीत म्हणायचा.

'तिच्यायला सालं ! तुला गाढवाला न कळण्यासारखं कायाय ?'

'सावकाश बोल !'

'मी काही तेवढं झपाट्यानं बोलीत नायै पोरा ! तुला वाटतं तू झारसाठी लढतोयस ! पण झार कोण आहे ? झार आहे लाट्या गंगाजी ! अन् झरीना आहे शिंदळ ! अन् ती दोघंही आपल्या पाठीला भार ! कळत नाय ? कारखान्याचा मालक व्होडका पितो आणि सैनिक उवा मारीत बसतो ! दोघानाही कठीणच ! कारखान्याचा मालक नफा खातो ! कामगार नंगा जातो ! हा कारभार हा असाय ! राब कझाका ! तू आपला राबत रहा ! आणखी एक क्रास मिळवशील ! झकासपैकी ओक लाकडाचा केलेला !'

तो युक्रेनी भाषेत बोलायचा, पण कधीकधी क्षुब्ध होऊन गेला की भरपूर शिव्यात घोळलेले शुद्ध रशियन सुरू करायचा.

आतापर्यंत ग्रिगरीला अज्ञात असलेली सत्ये तो त्याच्यापुढे प्रकट करीत होता. युद्धांच्या खऱ्या कारणाचा तो खुलासा करायचा. एकतंत्री सरकारची जळजळीत टर उडवायचा. ग्रिगरी हरकती घेण्याचा प्रयत्न करायचा पण जीवघेणे साधे प्रश्न विचारून गारांझा त्याला चूप करायचा आणि त्याला मान्य करणे भाग पडायचे.

सगळ्यात भयंकर म्हणजे गारांझाचे बरोबर आहे आणि त्याला विरोध करायला आपण पुचाट आहोत असे ग्रिगरीला वाटू लागले होते. झार, देश, कझाक म्हणून आपलं स्वत:चं लष्करी कर्तव्य ह्यांबद्दलच्या आपल्या पूर्वीच्या सर्व कल्पना हा बुद्धिमान आणि कडवट युक्रेनियन हळूहळू पण खात्रीपूर्वक उध्वस्त करीत आहे ही जाणीव होऊन तो भयभीत झाला. ज्यावर ग्रिगरीचे जीवन आधारित होते ती समग्र पद्धती त्या युक्रेनीच्या आगमनानंतर महिनाभरात धुमसता राखुंडा होऊन गेली. ती पद्धती आधीच कुजून गेलेली होती. युद्धाच्या घोर अनर्थकतेच्या वाळवीने खाल्लेली होती. तिला फक्त एक धक्का द्यायचीच काय ती जरुरी होती. तो धक्का दिला गेला आणि ग्रिगरीचे रांगडे धोपटमार्गी मन जागे झाले. बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्यासाठी, आपल्या बिकट गुंत्याची सोडवणूक करण्यासाठी तो तडफडू लागला आणि गारांझाच्या उत्तरात हवे ते सापडल्याने आनंदित झाला.

एकदा प्रहर रात्र होऊन गेल्यावर ग्रिगरी आपल्या बिछान्यातून उठला

आणि त्याने गारांझाला जागे केले. त्या युक्रेनीच्या खाटेच्या कडला तो बसला. सप्टेम्बर महिन्यातील हिरवट चंद्रप्रकाश खिडकीतून ओघळला होता. गारांझाचे गाल सुरकुत्यानी सावटले होते. त्याच्या डोळ्यांच्या काळ्या खोबणी आर्द्रतेने चमकत होत्या. त्याने जांभई दिली आणि ब्लँकेटात पायावर पाय चढवले.

'झोपला का नाईस ?'

'झोप येत नाय ! मला हे एक सांग ! एकाला युद्ध चांगलं न् दुसऱ्याला ते वाईट ! होय का नाय ?'

'बरं मग ?' युक्रेनीने जांभई दिली.

'थांब जरा !' ग्रिगरी कुजबुजला क्रोधाने तो पेटून गेला होता. 'तू म्हणतोस की श्रीमंतांच्या फायद्यासाठी आपल्याला मरणाच्या खाईत हाकलल जातंय ! पण लोकांचं काय ? त्याना समजत नाय ? त्यांना सांगणारं कुणी नाय ? त्यांच्याकडं जाऊन असं म्हणणारं कुणी नाय की 'भाऊ ह्या 'अशा अशा' साठी तुम्ही मरताय !'

'कसं शक्य आहे ? ते सांग मला. तू सांगशील ? इथं कळकीच्या बेटातल्या कादंबासारखे आपण कुचुकुचु करतोय. पण मोठ्यानं बोल ! की आहेच काडतूस तुझ्यासाठी तयार ! लोक गाढ अज्ञानात आहे ! युद्धानं ते जागं होईल ! गडगडाटामागं वादळ येतंच !'

'पण त्यासाठी काय करायला हवं ? ते सांग ना मला नागोबा ! माझं दिल ढवळून काढलयस तू !'

'न तुझं दिल तुला काय सांगतय ?'

'काय सांगतंय ते मला समजत नाय !' ग्रिगरीने कबुली दिली.

'माझा जो माणूस कडेलोट करू बघतो त्याचा स्वत:चाही कडेलोट होईल ! त्याच्याविरुद्ध बंदुकी चालवायला आपण भिता कामा नये ! लोकाना जे नरकात पाठववात त्यांना आधी गोळ्या घातल्या पाहिजेत !' गारांझा बिछान्यातून उठला आणि दातओठ खात त्याने हात फैलावले 'एक प्रचंड लाट उठेल आणि त्यात ते वाहून जातील !'

'तेव्हा सगळ्याची पार उलथापालथ व्हायला हवी असं तुझं म्हणणं !'

'होय ! जुन्या चिंधीसारखं सरकार फेकून द्यायला हवं ! ह्या लाट-साहेबांच्या घरादारावरून नांगर फिरवायला हवेत ! कारण आज फार दिवस ते लोकांचे मुडदे पाडतायत !'

'आणि नवीन सरकार आलं की लढाईचं काय करणार ? आपण तसेच

पिदायचे. आपण नाय तर आपली पोरं पिदतील ! माणसं शेकडो वर्षं लढत आल्येत तेव्हा युद्धाचं मूळ कसं उपटणार ?'

'सुरवातीपासून लढाया चालू आहेत हे खराय ! आणि बदसरकार आपण उलथेंस्तो त्या चालू राहतील हेही खराय ! पण प्रत्येक सरकार जेव्हा कामगाराचं सरकार होईल तेव्हा ते लढणार नाहीत ! करायला पाहिजेल ते हेच ! आणि ते केलं जाईल ! त्यांच्या आईला साली—! ते केलं जाईल ! आणि जर्मन, फ्रेंच इतर सगळ्यांची सरकारं कामगार–शेतकऱ्यांची झाली की त्यांच्याशी कशाला लढायला लागतंय ? सरहद्दी नाहीत ! रागद्वेष नाही ! सबंध जगात एकच खूबसुरत जिंदगी ! ओहो !' गारांझाने सुस्कारा सोडला. मिशाना पीळ भरीत तो स्वप्नाळूपणे हसला. त्याचे डोळे चमकत होते. 'ग्रिशा, तो दिवस बघण्यासाठी थेंबाथेंबानं रक्त सांडीत राहीन !'

पहाटेपर्यंत ते बोलत होते. भुऱ्या सावल्या पडल्यानंतर ग्रिगरीला मस्त झोप लागून गेली.

सकाळी बोलण्याचे आवाज आणि रडण्याचा सूर ऐकून ते जागे झाले इवान वृब्लेव्स्की बिछान्यात पालथे डोके करून स्फुंदत होता. त्याच्याभोवती नर्स चान वारेइकिस आणि कोसीख उभे होते.

'काय झालं त्याला गळा काढायला ?' पांघरुणातून डोके वर काढीत बूरदिन गुरगुरला.

'त्याचा डोळा फुटलाय ! ग्लासातून तो नुक्ताच बाहेर काढीत होता ! तेवढयात जमिनीवर पडला !' कोसीखने उत्तर दिले. त्याच्या स्वरात सहानुभूतीपेक्षा दुष्टावाच जास्त होता.

रशियन नागरिकत्व घेतलेला एक जर्मन कृत्रिम डोळे विकीत असे. देशप्रेमाची भावना डोकावल्याने तो आपला माल सैन्याला मोफत पुरवीत असे. परवाचे दिवशी वृब्लेव्स्कीला काचेचा डोळा देण्यात आला होता. हा डोळा अशा कौशल्याने घडविण्यात आला होता की तो खऱ्या डोळ्यासारखा निळा आणि देखणा दिसत होता. हे काम इतके निर्दोष होते की अगदी जवळून निरखून पाहिले तरी नक्कल आणि अस्सल ह्यात फरक करणे शक्य नव्हते.

'मी घरी जाईन !' आपल्या रुंद व्होलगा उच्चारात तो म्हणाला होता, 'हवी ती पोरगी धरीन ! लग्न करीन ! नंतर सांगून टाकीन की आपला डोळा काचेचा आहे म्हणून !'

'साला सैतान करेल बुवा तसं !' बुरदिन हसत म्हणाला होता. हा बुरदिन

'दुन्या' बद्दल आणि तिचा झगा कुरतडणाऱ्या झुरळांबद्दल गात असे आणि आता अपघात झाला होता. आणि हा देखणा तरुण मनुष्य एकाक्ष पांगळा म्हणून खेड्या-कडे परत जाणार होता.

'नवीन देतील तुला ! गळा काढू नको !' ग्रिगरीने त्याचे सांत्वन केले.

डोळ्याचे रिकामे भोक दाखवीत व्रुब्लेव्स्कीने आसवांनी लडबडलेला चेहरा उशीवरून वर केला. 'नाही ! नाही द्यायचे ! त्या डोळ्याची किंमत तीनशे रुबल्स होती ! मला नवा कधी नाय द्यायचे !'

'काय डोळा पण डोळा होता ! एवढी एवढी रेघ त्यात होती !' कोसिखने सकौतुक संतोष प्रकट केला.

नाष्टा झाल्यावर ब्रुब्लेव्स्की नर्सला बरोबर घेऊन त्या जर्मनाच्या दुकानावर गेला. त्या जर्मनाने त्याला नवा डोळा दिला

'अरे ! जर्मन रशियनांपेक्षा भली माणसं आहेत !' आनंदाने बेभान होऊन व्रुब्लेव्स्की ओरडला. 'रशियन व्यापारी एक कोपेक सोडायचा नाही. पण ह्यानं चकार शब्दही न काढता मला नवा डोळा दिला !'

सप्टेंबर संपला. भयानक कंटाळवाणे दिवस रखडत अप्रतिहत चालले होते. सकाळी नऊ वाजता रोग्याना चहा मिळे. ह्यात असत फ्रेंच पावाचे दोन करंटे पारदर्शी स्लाईस आणि लोण्याची नखाएवढी गुंडी. जेवणे झाली तरी ते भुकेलेच असत. संध्याकाळी परत चहा मिळे त्यातला 'तोच तो' पणा घालवण्यासाठी ते थंड पाण्याचे त्याबरोबर घुटके घेत. 'लष्करी वार्डातील (जखमी सैनिकांच्या वार्डाचे हे नाव होते) रुग्ण बदलत होते. प्रथम सैबेरियन गेला. मग लाटव्हिअन गेला. ऑक्टोबरअखेर ग्रिगरीला सोडण्यात आले. सुंदर, नेटकी कापलेली दाढी राखलेल्या डॉ. स्निगिऱ्योव ह्या इस्पितळाच्या मालकाने ग्रिगरीचे डोळे तपासलें आणि दृष्टी समाधानकारक असल्याचा निर्णय दिला.

पण त्याची दुसऱ्या एका इस्पितळात बदली करण्यात आली. कारण त्याच्या डोक्याची जखम अचानक उलली होती. आणि किंचित पिकायला लागली होती. गारांझाचा निरोप घेताना ग्रिगरी म्हणाला, 'परत भेटणार का आपण ?'

'दोन पर्वतांची भेट होत नसते पण ..!'

'बराय खोखोल ! माझे डोळे उघडल्याबद्दल मेहेरबानी ! आता डोळस झालोय आणि भडकूही झालोय !'

'रेजिमेंटकडं परत गेलास की तुला मी जे सांगितलं ते कझाकाना सांग !'

'सांगीन !'

'आणि गोरोखोवकात चेर्निगोवला कधी आलास तर आन्द्रेई गाराझा ह्या लोहाराचा पत्ता विचार ! तुला भेटायला आनंद वाटल ! अच्छा !' त्यानी एकमेकाना मिठ्या मारल्या.

खडबडीत गालावरून ओठाच्या कोपरापर्यंत आनंदी सुरकुत्या ओघळलेल्या त्या एकाक्ष युक्रेनीचे चित्र दीर्घकाळ ग्रिगरीच्या स्मरणात राहिले होते.

दुसऱ्या इस्पितळात ग्रिगरीने दहा दिवस काढले. आपल्या मनात तो अनघड बेत शिजवीत होता. गाराझाच्या शिकवणीची कावीळ त्याच्या अंतर्यामी आपले कार्य करीत होती. वार्डातील आपल्या शेजाऱ्याशी तो फारच थोडे बोलायचा आणि त्याच्या सर्व हालचालीतून विशिष्ट गोंधळ आणि अवरगत स्पष्टपणे प्रकट होत होती.

'बेचैन गडी आहे !' पहिल्या तपासणीत त्याच्या अ-रशियन चेहऱ्यावरून धावती नजर टाकीत डॉक्टराने त्याच्याबद्दल हे असे मत बनवले.

पहिले काही दिवस ग्रिगरीच्या अंगात कणकण होती. कानात होणारे नाद ऐकत तो बिछान्यावर पडून राहिला होता.

मग एक प्रसंग घडला !

राजघराण्यातील एक बडी आसामी इस्पितळाला भेट द्यायला येणार होती. सकाळी हे कळल्याबरोबर इस्पितळाच्या पदस्थ वर्गाची कोठाराला आग लागलेल्या उंदराप्रमाणे धांदल उडाली. जखमाना त्यानी नवीन मलमपट्ट्या केल्या. ठरल्या वेळेआधी पलंगपोस वगैरे बदलले. आणि एका तरण्या डॉक्टराने ह्या असामीच्या प्रश्नाला उत्तर कसे द्यावयाचे आणि त्यांच्याशी संभाषण करताना कसे वागायचे ह्याबद्दल नोकराना सूचना देण्याचाही प्रयत्न केला ! ही काळजी रुग्णापर्यंतही पोचती झाली. भेटीच्या ठरलेल्या वेळेच्या खूप आधीच त्यापैकी, काहीजण कुजबुजत बोलू लागले. दुपारी पुढच्या दारात मोटारीचे शिंग वाजले. कारभारी आणि अंमलदारांचा नेहमीचा लवाजमा घेऊन ही असामी इस्पितळाच्या फाटकातून प्रविष्ट झाली.

जखमीत एक रंगेल आणि गमत्या गडी होता. त्याने नंतर आपल्या साथी रुग्णांना सांगितले की, 'त्या दिवशी हवा कधी नव्हे अशी प्रसन्न आणि निश्चळ होती. पण ह्या सन्मान्य पाहुण्यांचा प्रवेश झाला त्या क्षणी इस्पितळाबाहेर लावलेला रेडक्रॉसचा ध्वज फडफडा फडफडू लागला आणि रस्त्यांपलीकडच्या न्हाव्याच्या दुकानावरील पाटीत रंगवलेल्या टुमदार कुरळ्या केसांच्या अक्कडबाजाच्या चित्रानंही कमरेत लवून त्याला मुजरा केला !'

आपला दर्जा आणि दरक ह्याना शोभतीलसे नेहमीचे आचरट प्रश्न विचारीत ह्या श्रेष्ठ असामीनी वार्डाची फेरी केली. डोळे फाड्फाडून बघणाऱ्या जखमींनी ज्युनिअर सर्जनने दिलेल्या सूचनेबरहुकूम 'ठीकाय खाविन्द !' आणि 'तसं काय नाय खाविन्द !' अशी उत्तरे दिली. त्यांच्या उत्तराना चीफ सर्जन भाष्यांची पुरवणी जोडीत होते. पळीवाने खोचलेला साप गवतात वळवळतो तशी वळवळ करणारे चीफ सर्जन दुरून पाहणाऱ्यालाही करुणास्पद वाटत होते. शाही आसामीनी सैनिकात लहान लहान पुतळ्या वाटल्या.

चकचकीत गणवेशातील हा जमाव आणि उंची सुगंधाची जंगी लाट ग्रिगरीच्या दिशेला वळली. दाढी वाढलेला, दुर्मुखलेला, ज्वरग्रस्त डोळ्यांचा ग्रिगरी आपल्या खाटेजवळ उभा होता. त्याच्या उंच गालफडावरील पिंगट कातडीच्या सूक्ष्म थरथरण्यातून त्याची क्षुब्धता प्रकट होत होती.

'हेच ते !' त्याच्या मनात येत होते. 'आमच्या घरच्या खेड्या खेड्यातून आम्हाला हुसकून मरणाच्या खाईत फेकून देण्यात ज्याना मौज वाटते तेच हे लोक ! ओह ! डुकरीचे ! मढी उचलली त्यांची ! आमच्या पाठीवरच्या ह्या उवा आहेत उवा ! दुसऱ्या माणसांचा धान्यदाणा आम्ही टापांखाली तुडवला आणि अनोळख्याना ठार मारलं ते काय ह्यांच्यासाठी ? पिकांच्या खुंटातून मी सरपटत गेलो आणि आरडलो ! आणि आमचं भय ? आमच्या घरादारापासून ह्यानी आम्हाला तोडलं ! बराकीतून फाके मारायला लावलं !' त्या जळजळीत विचाराने त्याचे डोके फुटायच्या बेताला आले. संतापाने त्याचे ओठ थरथरू लागले. 'त्यांची माजलेली चकचकीत थोबाडं पाहून घ्या ! तुमच्या आयला ! तुम्हालाच तिकडं पाठवतो ! पाठीवर बंदूक देऊन घालतो घोड्यावर ! उवांचा भारा लादतो पाठीवर ! कुजलेला पाव आणि कडी पडलेलं मांस खायला लावतो तुम्हाला !'

लवाजम्यांतील अंमलदाराच्या तुकतुकीत चेहऱ्यात ग्रिगरीची नजर घुसली आणि मग शाही असामींच्या घुशीसारख्या ' गालांवर स्थिरावली.

'डॉन कझाक, सेन्ट जॉर्ज क्राॅस ' चीफ सर्जन मानभावीपणे हसत म्हणाले.

त्यांच्या सुरावरून एकाद्याला असे वाटावे की क्रॉस जिंकलेला आहे तो स्वत: त्यानीच !

टीप:– १) 'मुळात उपमुषाची (Marsupials) ची उपमा लेखकाने वापरलेली आहे. उपमुष हा कांगारूसारखा प्राणी असून त्याचे तोंड घुशीसारखे दिसते.'

'कुठल्या गावचा ?' पुतळी हातात सरसावीत आसामींनी विचारले.

'व्येशेनस्कायाचा खाविंद !'

'क्रॉस कसा मिळवलास ?'

शाही असामींच्या स्वच्छ ओसाड डोळ्यात कंटाळा आणि तृप्ती रेंगाळत होती. आपला चेहरा जास्त बोलका करण्याच्या आविर्भावात त्यानी डावी भ्रुकुटी कृत्रिमपणे उंचावली होती.

क्षणभर ग्रिगरीला थंडगार पडल्यासारखे वाटले आणि एक चमत्कारिक खांडीत जाणारी जाणीव त्याच्या मनात घुसली. हल्ल्यात उडी घेताना अशीच भावना त्याला जाणवली होती. त्याचे ओठ वेडेवाकडे होऊन अगतिकपणे थरथरू लागले.

'माफ करा...! मला घाईची लागल्येय...! खाविंद...! जरा जायला हवं...!' पाठाड मोडल्यागत ग्रिगरी हेलकांडला आणि त्याने खाटेखाली बोट करून दाखवले.

आसामींची डावी भ्रुकुटी जास्तच उंच चढली. पुतळी धरून ग्रिगरीच्या दिशेने अर्धवट पुढे केलेला त्यांचा हात बधीर, काष्ठवत झाला. आश्चर्याने आपल्या गोबऱ्या ओठांचा 'आ' करून आसामी बाजूला उभ्या असलेल्या केसांच्या सेनानीकडे वळले आणि त्याना त्यानी इंग्रजीत काहीतरी विचारले. जाणवेल न जाणवेल अशा संकोचाने त्यांच्या लव्याजम्यातील मंडळी त्रस्त झाली. माकूल लावलेल्या एका उंचापुऱ्या अंमलदाराने आपल्या शुभ्र मोजे घातलेल्या हातानी डोक्याला स्पर्श केला. दुसऱ्याने डोके झुकवले. तिसऱ्याने आपल्या शेजाऱ्याकडे चौकस नजर टाकली.

पिकल्या केसांच्या सेनानीनी आदबीने हसून खाविंदाना इंग्रजीत उत्तर दिले आणि खाविंदानी ग्रिगरीच्या हातात पुतळी कोंबण्याची मेहेरबानी केली ! त्याच्या खांद्याला स्पर्श करण्याचा परमोच्च सन्मानही त्याला बहाल केला !

पाहुणे निघून गेल्यावर ग्रिगरी अंथरुणात कोसळला. उशीत तोंड खुपसून तो काही मिनिटे पडून राहिला. त्याचे खांदे गदगदत होते. तो रडतोय का हसतोय हे सांगणे कठीण होते.

चीफ सर्जनच्या खोलीकडे येण्याचे त्याला तात्काळ फर्मान आले.

'का रे, ए हरामखोर !' आपली विटक्या कबऱ्या रंगाची दाढी बोटानी चुरगाळीत डॉक्टरानी भडीमार सुरु केला.

'मी हरामखोरी केलेली नाही ए सर्पा !' डॉक्टरांच्या दिशेने टांगा टाकीत

ग्रिगरीने जबाब दिला. 'लढाईत तुला कुठं कधी पाहिला नाय!' मग स्वत:ला आवर घालीत तो शांतपणे म्हणाला, 'मला घरी पाठवा!'

आपल्या लिहिण्याच्या मेजाआड माघार घेऊन डॉक्टर जरा सौम्यपणे म्हणाले, 'पाठवतो आम्ही तुला! मसणात जा!'

ग्रिगरी बाहेर पडला. स्मिताने त्याचे ओठ थरथरत होते. डोळे लकाकत होते. शाही आसामींच्या पुढे अघोरी, अक्षम्य वर्तन केल्याबद्दल त्याचे अन्न तीन दिवस तोडण्यात आले.

पण वार्डातील त्याचे साथी आणि आंतर्गळाची व्यथा असलेला दयाळू बबर्जी ह्यानी त्याची रसद चालू ठेवली होती!

२४.

स्टेशनावरून निघालेला ग्रिगरी आपल्या स्वत:च्या जिल्ह्यातील पहिल्या खेड्यात चार नोव्हेंबरच्या संध्याकाळी पोचला. यागोदनोये काही मैलावर राहिले होते. तुरळक घरापुढून जाताना त्याच्या चाहुलीने कुत्री उभी राहून भुंकत होती. रस्त्यावरून तो चालला असताना नदीच्या वळुंजीखाली पोरे कझाक गीत म्हणत होती.

१ रानामागुन चमकत आले तलवारी भाले
कझाक शंभर दौडत दौडत आले मिशीवाले
तरणा अंमलदार तयांचा बिनिवरती स्वार
पाठीवरती कझाक घेऊन दौडतसे शंभर

सणसणीत, दाणेदार स्वच्छ सुराने गाणे पुढे नेले—

चला गड्यांनु भिऊ नगा या
माझ्या मागुत या—

इतर गाणारानी द्रुत लयीत सूर पकडला.

१ अलंगावरी खुशाल सगळे चालुन जाऊ या
अलंगास त्या भिडेल पहिला

कझाक पठ्ठा तो

मानमरातब मिळविल सगळे कीरत

मिळविल तो

प्राचीन कझाकांचे हे परिचित शब्द ऐकून ग्रिगरीला शब्दातील ऋणानुबंधाची उब जाणवावी असे वाटले. अनेकदा त्याने हे गाणे म्हणले होते. त्याच्या काळजावर काटा आला आणि त्याने त्याचे डोळे ताठरले. धूराड्यातून येणारा धूर अधाशीपणे हुंगीत तो खेड्यातून जात होता. ते गाणे त्याच्या मागोमाग येत होते.

१ अलंगावरी[1] ह्या देहाची भित आम्ही बांधली

मधमाशांचे थवे अशी ती काडतुसे उधळली

डॉनथडीचें कझाक छावे भले बहादुर गडी

कापित खांडित संगिन खुपशित रणात घेती उडी

'खूप पूर्वी मी हे गाणं म्हणत असे. आता आवाज गेला. जिदगीनं गाणं अर्धेच तोडून टाकले. दुसऱ्याच्या बायकोशी संसार करायला मी चाललोय. एकाद्या लांडग्याप्रमाणे स्वत:चा सांदीकोपरा नाही, स्वत:चे घरदार नाही.' मंद थकिस्त चालीने चालता चालता त्याच्या मनात विचार येत होते. चमत्कारिकपणे वेड्यावाकड्या होऊन गेलेल्या आपल्या जीवनाकडे बघून तो कटू स्मित करीत होता.

टेकडी चढून तो खेड्याबाहेर आला.

आल्यावर त्याने मागे वळून दृष्टी टाकली. आखरीला असलेल्या घराच्या खिडक्यातून टांगत्या दिव्यांचा पिवळा प्रकाश दिसत होता. चरख्यावर सूत काढणारी एक वयस्कर बाई त्या प्रकाशात त्याला दिसली.

वाटथडीच्या दमट गारठलेल्या गवतातून तो चालत होता. दुसऱ्या दिवशी दिवे लागणीला यागोदनोयेला पोचता यावे म्हणून 'चीर' नदीच्या काठावरील पहिल्या गावात रात्र काढण्याचे त्याने ठरविले. आखरीच्या घरात त्याने रात्र काढली. पहाटेचा नाफरमानी काळोख विरल्यावर तो पुढे निघाला. रात्री तो यागोदनोयेला पोचला.

कुपाटीवरून उडी मारून तो तबेल्याजवळून गेला. साशकाच्या खोकल्याचा आवाज ऐकून तो थबकला.

'साशका आजा, झोपलास का?' तो ओरडला.

'थांब! कोणाय? आवाज ओळखीचा वाटतोय! कोणाय ते?'

टीप : १) हा काव्यबद्ध अनुवाद शब्दश: नाही. मूळच्या शब्दांना केवळ भावार्थ लक्षात घेऊन काही जादा क्रियापदांची आणि विशेषणांची पूरक जोड दिलेली आहे.

खांद्याभोवती आपला पुराणा कोट पांघरून साशका बाहेर आला.

'पवित्र बापहो . . ! ग्रिशा ! च्यायला ! कुठून उपटलास ?'

त्यानी एकमेकाना मिठ्या मारल्या. ग्रिगरीचा चेहरा न्याहाळीत साशका म्हणाला.

'आत ये ! विडीबिडी ओढ !'

'नको ! आत्ता नको ! उद्या येईन. मी...!'

'आत ये म्हणतो ना !'

अनिच्छेने ग्रिगरी त्याच्या मागोमाग आत गेला. म्हाताऱ्याची खोकल्याची उबळ थांबेपर्यंत तो तेथील झोपण्याच्या लाकडी खाटेवर बसून राहिला.

'मग काय आजा, जिवंतायस ! हिंडता फिरतायस !'

'अरे मी म्हणजे गारगोटीचा दगड ! मला झीज घस काय नाय !'

'आक्सिनिया कशीय ?'

'आक्सिनिया ? देवाच्या दयेनं खुशालै !'

म्हाताऱ्याला खोकल्याची जबरदस्त उबळ आली. आपली बावरली अवस्था लपवण्यासाठी खोकण्याचे नाटक त्याने चालवल्याचे ग्रिगरीने ओळखले.

'तान्याला कुठं मूठमाती दिलीत ?'

'राईत ! चिनारखाली !'

'बरं ! सगळी वार्ता सांग मला !'

'माझा खोकला भयंकर त्रास देतोय ग्रिशा !'

'असं ?'

'आम्ही सगळे जिवंत धडधाकट आहोत ! मालकाच्या पिण्याला काही ताळतंत्र राहिलेलं नाय ! मूर्ख !'

'आक्सिनिया कशीय ?'

'ती आता घरकामाची बाई आहे ! विडी ओढ ! माझी तंबाखू ओढून बघ ! फसक्लासै !'

'मला ओढायची इच्छा नाय ! बोलणारैस का जाऊ ? मला वाटतं .. !' ग्रिगरी एकदम भार देऊन वळला. त्याच्या खालची खाट करकरली. 'मला वाटतं खिशात दगड लपवावा तसा तू माझ्यापासून काहीतरी लपवतोयस ! चल फेक !'

'फेकतोय ! माझ्यानं गप रहावत नाय ग्रिशा ! आणि गप् राहणं नामुष्कीचाय !'

'सांग तर मला !' म्हाताऱ्याच्या खांद्यावर लडिवाळपणे हात टाकीत ग्रिगरी म्हणाला. खाली डोके करून तो त्याच्या बोलण्याची वाट बघत बसला.

'तू साप सांभाळतोयस !' कडक कर्कश आवाजात साशका एकाएकी उद्गारला. 'सापाला तू दूध पाजीत आलास ! तिचे यवगेनीबरोबर खेळ चाललत ! काय समजलास ?'

म्हाताऱ्याच्या व्रणाने डागळलेल्या हनुवटीवरून चिकट थुंकीचा ओघळ वहात गेला. त्याने तो हाताने पुसून तुमानीवर हात घासला.

'खरं सांगतोयस् ?'

'माझ्या स्वत:च्या डोळ्यानी मी पाह्यलंय ! रोज रात्री तिच्याकडे जातो ! आतासुद्धा तिथं असेल ! जा बघ !'

'असा आहे तर मामला !' ग्रिगरीने उलटी बोटे कडाडा मोडली आणि खूप वेळ तो खांद्याना पोक काढून बसला. त्याच्या चेहऱ्याचे स्नायू हालत बोलत होते.

'बाई मांजरागत असते !' साशका म्हणाला, 'जो तिला थोपटील त्याच्या ती जवळ जाते ! त्यांच्यावर विश्वास ठेवू नको ! आपला विश्वास त्यांच्या हवाली करू नकोस !'

त्याने चुट्टाची गुंडाळी करून ती ग्रिगरीच्या हाती कोंबली. 'ओढ !'

ग्रिगरीने त्याचे एक दोन झुरके घेतले. मग तो बोटानी विझवून टाकला. एक शब्द न बोलता तो बाहेर गेला.

नोकरांच्या बराकीच्या खिडकीजवळ जोरजोराने धापा टाकीत तो थांबला आणि खटखट करण्यासाठी अनेकदा त्याने हात उचलला. पण थापटी मारून उडवून लावल्यागत त्याचा हात दर वेळेला खाली पडला. अखेरीस त्याने जेव्हा ठोठावल तेव्हा प्रथम बोटाने टकटक केले पण मग सहनशक्ती खलास होऊन त्याने भिंतीवर झेप घेतली आणि गुद्याने खिडकीवर दणादणा प्रहार केले.

आक्सिनियाचे भयभीत मुख क्षणभर खिडकीशी आले. मग तिने दार उघडले आणि ती अस्फुट किंचाळली. त्याने तिच्या डोळ्यात खोल बघत तिला मिठी मारली.

'केवढ्यानदा ठकठक केलंस ! घाबरून गेले मी ! तू येशील हे ध्यानी-मनोही नव्हतं लाडक्या...!'

'मी गारठलोय !'

त्याचे हात धगधगल्यागत गरम होते. तरी त्याचा धिप्पाड देह आवेगाने थरथरत असल्याचे आक्सिनियाला जाणवले. ती उगाचच अवडंबर करू लागली. तिने दिवा लावला. आपल्या पुष्ट गोऱ्या खांद्यावर लवदाट शाल घेऊन ती खोलीतून इकडे तिकडे धावपळ करू लागली. अखेरीस तिने चूल पेटवली.

'तू येशील हे ध्यानीमनी नाय ! तुझं पत्र येऊन खूप दिवस झाले. मला

वाटलं तू काही आता येत नैस. माझं ताजं पत्र तुला मिळालं? तुला पार्सल पाठवणार होते, पण मग म्हटलं पत्राची वाट पहावी!'

ग्रिगरीकडे ती तिरपे कटाक्ष टाकीत होती. तिच्या लाल ओठांचे सतत स्मित होऊन गेले होते.

आपला फर्गोल न उतरवता ग्रिगरी बाकावर बसून होता. दाढी वाढलेले त्याचे गाल तापले होते. खाली झुकलेल्या त्याच्या डोळ्यांवर त्याच्या फर्गोलाच्या फणाटोपीची गडद सावली पडली होती. आपली फणाटोपी तो सोडवू लागला, पण तेवढ्यात आपली तंबाखूची चंची तो चाचपडू लागला. कागदासाठी त्याने खिसे धुंडाळले. अमाप तळमळीने त्याने आक्सिनियाच्या मुखावरून नजर फिरवली.

आपल्या गैरहजेरीत हिची तब्येत भयंकर सुधारल्येय असे त्याला वाटले. तिच्या देखण्या मस्तकाला एक नवीन करारी तोल आलेला होता. फक्त तिचे नेत्र आणि केसांच्या मोठाल्या पिसारलेल्या अंगठ्या मात्र तशाच होत्या. पण तिचे संहारक धगधगीत सौंदर्य त्याच्या मालकीचे नव्हते. धन्याच्या लेकाची ती घरधनीण असताना ते तसे असणे कसे बरे शक्य होते!

'तू मोलकरणीसारखी दिसत नैस मालकिणीसारखी दिसत्येस!'

तिने दचकून त्याच्याकडे पाहिले आणि बळेच ती हसली.

आपला बिस्तरा फरफटीत ग्रिगरी दाराकडे गेला.

'कुठं चाललास?'

'चुट्टा ओढायला!'

'थोडी अंडी तळल्येत तुझ्यासाठी!'

'मी आलोच!'

पावलाणावर ग्रिगरीने बिस्तरा सोडला, स्वच्छ सदऱ्यात काळजीपूर्वक गुंडाळून ठेवलेला एक हाताने रंगवलेला रुमाल त्याने बिस्तऱ्याच्या तळातून बाहेर काढला. झितोमीर मधील एका यहुदी व्यापाऱ्याकडून त्याने तो दोन रुबलसना विकत घेतला होता. जिवापलीकडे त्याने तो जपला होता. कधीतरी तो हा रुमाल बाहेर काढायचा. त्याच्या इंद्रधनू रंगाची समृद्धी भोगायचा. आक्सिनियापुढे हा पसरला म्हणजे ती ज्याने मंत्रमुग्ध होऊन जाईल त्या हर्षातिशयाचा कल्पनेने आस्वाद घ्यायचा. दळभद्री भेट! डॉनच्या वरच्या खोऱ्यातील सर्वात धनत्तर जमीनदाराच्या मुलाने दिलेल्या भेटींशी तो काय होड घेऊ शकत होता? कोरड्या हुंदक्याचा आवेग दाबून टाकीत त्याने त्या रुमालाच्या लहान लहान धांदोट्या केल्या आणि पावलाणाखाली त्या ढकलून दिल्या. पडवीतील बाकावर त्याने आपला बिस्तरा फेकून दिला आणि तो परत खोलीत गेला.

'खाली बस ग्रिशा ! मी तुझ्या पायातले बूट काढते !'

कष्टाच्या कामाशी फार दिवस फारकत झालेल्या आपल्या गोऱ्यागोऱ्या हातानी ती ग्रिगरीचे अवजड फौजी बूट काढायला धडपडू लागली. त्याच्या गुडघ्यावर पडून बराच वेळ ती नि:शब्दपणे अश्रू ढाळीत होती. ग्रिगरीने तिला मनसोक्त रडू दिले आणि मग विचारले,

'काय झालं ? मला पाहून तुला आनंद नाय वाटला ?'

अंथरूणावर पडल्यावर तो चटकन झोपी गेला.

अंगात फक्त खमीस घातलेली आक्सिनिया पावणावर गेली. तिथल्या सरदलेल्या खांबाला मिठी मारून, उत्तरवाऱ्याचे शोकगीत ऐकत त्या थंडीत अंगात घुसणाऱ्या वाऱ्यात, ती उभी होती. पहाट होईपर्यंत तिने आपला मोहरा बदलला नाही.

सकाळी ग्रिगरीने आपला फर्गोल दोन्ही खांद्यावर टांगल्यासारखा टाकला आणि तो वाड्याकडे गेला. लोकरीचे जाकीट आणि पिवळी आस्त्राखान टोपी घालून म्हातारा धनी पावलाणावर उभा होता.

'अरे, हा तर सेंट जॉर्ज रिसाले रूस्तुम ! मर्द आहेस दोस्ता !' ग्रिगरीला सलाम करून त्याने हस्तांदोलनासाठी हात पुढे केला.

'खूप दिवस राहणार काय ?'

'दोन आठवडे हुजूर !'

'तुझ्या पोरीला आम्ही मूठमाती दिली. दुर्दैव...! दुर्दैव आहे !'

ग्रिगरी गप्प होता.

हातावर दास्ताना चढवीत यवगेनी पावलाणावर आला.

'ग्रिगरी ? कुठून आलास रे ?'

ग्रिगरीचे डोळे झाकोळले, पण त्याने स्मित केलं.

'मॉस्कोहून आलोय रजा घेऊन !'

'कसं कायाय ? तुझ्या काय डोळ्याला जखम झाली ?'

'जी हुजुर.'

'आलं होतं कानावर माझ्या ! काय उमदा जवान झालाय नाय पपा ?'

लेफ्टनंटने ग्रिगरीकडे पाहून मान हलवली आणि मोतद्दाराला हाका मारीत तो तबेल्याकडे वळला.

'निकितिच ! घोडी!'

धीरगंभीरपणे निकितिचने घोडा जुंपण्याच काम पूर्ण केले आणि ग्रिगरीकडे दुष्मनासारखी नजर टाकीत म्हाताऱ्या अशहब तुर्की चालीच्या घोड्याची

ओठाळी धरून तो त्याला पावलाणाशी घेऊन आला. हलक्या 'द्रोझकी' च्या चाकाखाली जमिनीवरचा बर्फ करकरत होता.

'हुजूर, जुन्या काळची आठवण म्हणून आपली गाडी मला चालवू द्या!' यवगेनीकडे वळून आर्जवी स्मित करीत ग्रिगरी म्हणाला

'बिचाऱ्याला काही ओळखायला आलेलं नाही!' संतुष्टपणे स्मित करणाऱ्या यवगेनीच्या मनात आले. एक भिंगाआडचे त्याचे डोळे लकाकले.

'बहोत अच्छा! मार उडी!'

'अरे, काय आहे काय प्रकार? अजून आलासुद्धा नाहीस तर बायकोला सोडून निघालास? तिची आठवण झाली नाय का काय?' म्हाताऱ्या लिस्त-नित्स्कीने मायेने स्मित करीत विचारले.

ग्रिगरी खिकाळला. 'बायको म्हणजे काय अस्वल नाय! ती काय जंगलात पळून जात नाय!'

गाडीवानाच्या जागेवर तो चढून बसला. बसण्याच्या जागेखाली आसूड ढकलला आणि लगाम हाती गोळा केले.

'आहा! आपल्याला घुमवून आणतो यवगेनी निकलाएविच.'

'नीट हाक! मग बक्षिशी देईन!'

'माझ्यावर आधीच आपले एवढे उपकार आहेत! आपले फार फार उपकार झाले! जेवू घातल्याबद्दल..! माझ्या आक्सिनियाला जेवू घातल्याबद्दल! तिला भाकरतुकडा चारल्याबद्दल...!'

ग्रिगरीचा आवाज एकाएकी फाटला आणि एक अंधुक दुःखद आशंका लेफ्टनंटला छळू लागली. 'हॅट! त्याला काय ठाऊकाय? काहीसुद्धा ठाऊक नाही. ठाऊक होईलच कसं?' असा विचार करीत मागे रेलून त्याने चुट्टा पेटवला.

'फार उशीर लावू नको!' म्हाताऱ्या लिस्तनित्स्कीने पाठमोऱ्या गाडीकडे ओरडून सांगितले.

चाकाखालून सुईसारखी तीक्ष्ण हिमधूळ उडत होती.

ग्रिगरीने घोड्याच्या मुस्कटातील लगाम हिसकले आणि भन्नाट वेगाने त्यांना पिटाळले.

पंधरा मिनिटात त्यानी टेंबा पार केला आणि वाडा दृष्टीआड जाला.

वाटेत लागलेल्या पहिल्याच बोडक्या रानात ग्रिगरीने खाली उडी घेतली आणि बसण्याच्या जागेखालचा आसूड बाहेर ओढून काढला.

'काय झालं?' लेफ्टनंटने कपाळाला आठ्या घालून विचारलं.

'सांगतो काय झालं ते!'

ग्रिगरीने आसूड गरगरा फिरवून विकट शक्तिनिशी तो लेफ्टनंटच्या थोबाडावर आणला.

मग आसुडाची वादी पकडून त्याच्या दांड्याने त्या अंमलदाराला उठण्याचीही सवड न देता तोंडावर, हातावर पिटून काढला. त्याच्या एक भिंगी चष्म्याचा कवचा उडून लिस्तनित्स्तकीच्या भुवईवर त्याने कापले आणि रक्ताची लहानशी धार त्याच्या डोळ्यात वाहू लागली. प्रथम आपले तोंड त्याने हाताने झाकून घेतले पण त्या प्रहारांचा सपाटा वाढला. तो उडी मारून उठला. रक्ताने आणि त्वेषाने त्याचा चेहरा विद्रूप होऊन गेला होता. त्याने स्वतःचा बचाव करण्याची कोशीश केली पण ग्रिगरी मागे सरकला आणि त्याच्या मनगटावर एक तडाखा हाणून त्याचा हात त्याने खिळखिळा करून टाकला.

'हा आक्सिनियाचा ! हा माझा ! आक्सिनियाचा ! आणखी एक आक्सिनियाचा ! हा माझा !'

आसूड सणाणत होता. तडाखे बदाबद बसत होते.

अखेरीस ग्रिगरीने यवगेनीला उचलून रस्त्याच्या खडखडीत चाकोरीत फेकून दिले. त्याला रस्त्यावर पालथा घातला आणि आपल्या नालखिळ्यांच्या बुटानी त्याला हिंस्त्रपणे तुडवला.

जास्त मारण्याची ताकदच जेव्हा उरली नाही, तेव्हा तो गाडीत चढून बसला आणि निर्दयपणे घोड्याना चाबकाने फोडीत वाड्याकडे पिटाळले.

ट्रोझकी त्याने फाटकाशी उभी केली. तो आसूड बाहेर काढला,

आपल्या बटणे सुटलेल्या फर्गोलाच्या टोकावर अडखळत धडपडत त्याने नोकरांच्या बराकीकडे धाव घेतली.

दार कडाड्दिशी उघडल्याबरोबर आक्सिनियाने वळून पाहिले.

'नागोण ! छिनाल रांड !' आसुडाने शीळ घालीत तिच्या श्रीमुखाला विळखा घातला.

धापा टाकीत ग्रिगरी आवाडात धावला. साशकाच्या प्रश्नाकडे लक्ष न देता तो वाडीतून बाहेर पडला. पाचेक फर्लांग तो गेला असेल तेवढ्यात आक्सिनियाने त्याला गाठला. फसफसत धापा टाकीत ती निमूटपणे त्याच्या बाजूने चालत राहिली. मधूनच ती त्याची बाही खेचायची. रस्त्याच्या फाट्यावर वाटथडीच्या शेंड्यारंगाच्या गिरजाघरापाशी आल्यावर ती विलक्षण दुरंत स्वरात म्हणाली, 'ग्रिशा, मला माफ कर !'

त्याने ओठ वळून दात विचकले. खांदे पुढे झुकवून फर्गोलाची कॉलर वर ताठ करून ओढून घेतली.

आक्सिनिया गिरजाघराशी तशीच उभी होती. एकदाही त्याने वळून पाहिले नाही. त्याच्या दिशेने लांब झालेला तिचा हात त्याला दिसला नाही.

तातारस्कीच्या वर असलेल्या टेकडीच्या माथ्यावर आल्यावर त्याच्या काहीतरी लक्षात येऊन त्याला आश्चर्य वाटले. त्याच्या हातात अजूनही तो आसूड होता. त्याने तो फेकून दिला आणि ढांगा टाकीत तो खेड्याकडे निघाला.

खिडक्यांच्या तावदानावर दाबून धरलेले चेहरे त्याला पाहून चकित होत होते.

वाटेत त्याला भेटणाऱ्या बायका तो जाताना नम्रतेने झुकत होत्या.

त्याच्या स्वतःच्या आवाडाच्या फाटकाशी एक शेलाटे, काळ्या डोळ्यांचे सौंदर्य त्याच्याकडे धावत आले. त्याच्या गळ्यात तिने हात टाकले आणि त्याच्या छातीत तोंड खुपसले. दोन्ही हातांनी तिचे गाल दाबीत त्याने तिचे मस्तक वर केले. दुन्याला त्याने ओळखले.

पांतिलेय प्रोकोफिएविच लगबगीने लंगडत पावलाण उतरून आला आणि घरात आपल्या आईने मोठ्याने गळा काढल्याचे ग्रिगरीला ऐकू आले.

डाव्या हाताने त्याने बापाला कव घातली. दुन्या त्याच्या उजव्या हाताचे मुके घेत होता.

पावलाणाची अगदी व्यथादायक ओळखीची करकर ! आणि ग्रिगरी पडवीत आला ! पिकत चाललेल्या त्याच्या आईने अल्लड पोरीसारखी त्याच्याकडे धाव घेतली. पोराला घट्ट मिठी मारून त्याच्या फर्गोलाचे पदर तिने आसवात भिजवून टाकले. आपल्या आईच्या भाषेत ती जे काही असंबद्ध पुटपुटत होती त्याला शब्दरूप देणे अशक्य होते.

झोक जाऊन पडू नये म्हणून दाराला घट्ट बिलगून उभी होती नतालिया. तिच्या फिकट चेहऱ्यावर एक व्यथित स्मित होते. ग्रिगरीने धांदलीत आणि भ्रमिष्टागत तिच्याकडे जी नजर टाकली तिने घायाळ होऊन ती जमिनीवर कोसळली.

रात्री बिछान्यात पडल्या पडल्या पांतिलेयने बायकोच्या बरगडीत ढोसले आणि तो कुजबुजला,

'हळूच जा न् बघ दोघं एकत्र झोपलेत की नाही ते !'

'पलंगावर मी त्याचा बिछाना घातलाय !'

'पण तरी जा न् बघ...! जा बघ !'

इलीनिचना उठली आणि चाफेखणीच्या दाराच्या फटीतून तिने डोकावून बघितले.

'एकत्रायत !'

'ठीक ! ईश्वराची दया ! ईश्वराची दया !' असे केकाटत आणि कोपराच्या आधारावर देह वर उचलीत त्या म्हाताऱ्याने अंगावर क्रूसाची निशाणी करून घेतली !

★ ★ ★